# पहिला महाराष्ट्र वित्त आयोग
# अहवाल

जानेवारी १९९८

# पहिला महाराष्ट्र वित्त आयोग

# अहवाल

जानेवारी १९९७

# महाराष्ट्र वित्त आयोग

## महाराष्ट्र शासन

दूरध्वनी : २०७ ४५ ११
२०७ ४५ १८
२०७ ४५ २९
फॅक्स : २०७ ६५ २१

क्रमांक : मविआ.-1097/सीआर-163/97/01
**प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय वसतिगृह**
हजारीमल सोमानी मार्ग
बोरीबंदर, मुंबई ४०० ००१
दिनांक 31 जानेवारी, 1997

प्रति

मानतीय राज्यपाल
महाराष्ट्र राज्य
राज भवन, मुंबई.

महोदय,

भारतीय घटनेच्या अनुच्छेद 243-आय तसेच अनुच्छेद 243-वाय आणि महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतूद) अधिनियम, 1994 प्रमाणे महाराष्ट्र शासनाने आदेश क्रमांक एसएफसी-1094/सीआर-22/अर्थबळ, दिनांक 23-4-1994 अन्वये राज्य वित्त आयोग गठित केलेला आहे. वित्त आयोगाला पंचायती राज संस्था व नागरी संस्थांच्या आर्थिक बाबींचा अभ्यास करून त्यांना बळकट करण्यासाठी राज्यपालांना शिफारशी करावयाच्या आहेत. मी व माझे सहकारी, सर्वश्री श्रीपाद पटवारी, दिवाकर कळसुलकर, विजयराज तातेड आणि प्रे. प्र. महाना, आम्हा सर्वांना असे वाटते की हे महत्त्वाचे काम करण्याची संधी आम्हांला प्राप्त झाली हा आमचा सन्मान आहे. माझ्या पूर्वीचे वित्त आयोगाचे अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप आणि श्री. सुरेश प्रभू तसेच आयोगाचे पूर्वीचे सदस्य यांनी या कामामध्ये मोलाची मदत केलेली आहे. त्यांचेही मला आभार मानले पाहिजेत. त्याचप्रमाणे अनेक लोकांनी व संस्थांनी आयोगाला त्याच्या कामात मदत केलेली आहे. त्या सर्वांचे वैयक्तिक नामोल्लेख करून आभार मानणे शक्य नाही. पण त्यांनी दिलेल्या मदतीबद्दल व सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

या पत्रासोबत राज्य वित्त आयोगाचा अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे.

आपला विश्वासू,

**(मकरंद कु. हेरवाडकर)**
अध्यक्ष.

एच ४०९४-१अ

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | महाराष्ट्रातील पंचायती राज संस्था व नागरी संस्था यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी | ९ |
| ३. | महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची सद्यःस्थिती | १५ |
| ४. | महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची सद्यःस्थिती | ३३ |
| ५. | नागरी स्थानिक संस्थांची सद्यःस्थिती | ४७ |
| ६. | वित्त आयोगाची भूमिका व आराखडा | ११७ |
| ७. | पंचायत राज संस्थांच्या अडचणी व प्रश्न | १२५ |
| ८. | नागरी स्थानिक संस्थांच्या अडचणी व प्रश्न | १३५ |
| ९. | राज्य शासनाचे उत्पन्न व खर्च | १६५ |
| १०. | जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाची साधने व गरजांचे निर्धारण | १७३ |
| ११. | ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाची साधने व गरजांचे निर्धारण | १८९ |
| १२. | नागरी संस्थांच्या उत्पन्नाची साधने व गरजांचे निर्धारण | १९५ |
| १३. | करांचा वाटा व अनुदानाविषयीच्या शिफारशी | २१७ |
| १४. | संकीर्ण | २४३ |
| | उपसंहार | २५७ |
| | आभार | २५९ |
| | शिफारशींचा गोषवारा | २६१ |
| | परिशिष्टे–१ ते २६ | (१)–(५४) |

## प्रकरण १

# प्रास्ताविक

### महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना

१.१. महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतूद) अधिनियम, १९९४ च्या तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना झालेली आहे. माननीय राज्यपालांनी उक्त अधिनियम व संविधानाच्या अनुच्छेद २४३ आय व अनुच्छेद २४३ वाय यांच्या अनुषंगाने अधिसूचना क्र. एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ अन्वये महाराष्ट्र वित्त आयोग गठीत केलेला आहे.

१.२. **शासनाने वित्त आयोगाच्या विचारार्थ दिलेले विषय**

दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या अधिसूचने अन्वये वित्त आयोगाला पुढील बाबींच्या बाबत शिफारशी करावयाच्या आहेत :—

" (१) राज्याकडून वसूल करण्यात यावयाच्या कर, शुल्के, पथकर व फी यांच्यापासून मिळणाऱ्या व संविधानाच्या भाग नऊ व भाग नऊ-अ अन्वये, पंचायती व नगरपरिषदा यांच्यात विभागून द्यावयाच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य, पंचायती व नगरपरिषदा यांच्यात वितरण करणे व अशा उत्पन्नामधील पंचायती व नगरपरिषदा यांच्या संबधित हिश्श्याचे पंचायती व सर्व पातळ्यांवरील नगरपरिषदा यांच्यात वाटप करणे ;

(२) पंचायती किंवा यथास्थिती, नगरपरिषदा यांच्याकडे अभिहस्तांकित करण्यात येतील किंवा यथास्थिती, पंचायती किंवा नगरपरिषदा यांच्याकडून ज्यांचे विनियोजन करण्यात येईल असे कर, शुल्के, पथकर व फी निर्धारित करणे ;

(३) पंचायती किंवा यथास्थिती, नगर परिषदा यांना राज्याच्या एकत्रिकृत निधीमधून देण्यात यावयाच्या सहाय्यक अनुदानांचे नियंत्रण करणारी तत्त्वे ठरविणे.

आयोगाला आपल्या शिफारशी करताना इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टीही विचारात घ्यावयाच्या आहेत :—

(अ) १९९४-९५ या वर्षात पंचायती व नगरपरिषदा यांची कराधान पातळी जितकी असेल त्या आधारे दिनांक १ एप्रिल १९९६ पासूनच्या पुढील पाच वर्षांमधील राज्यातील पंचायती व नगरपरिषदा यांच्या महसुली जमा व महसुली खर्चामधील (योजनेतर किंवा विकासेत्तर किंवा दोन्ही) दृश्य तफावत.

(ब) पंचायती व नगरपरिषदा यांनी महसूल मिळविण्याच्या कोणकोणत्या उपलब्ध व संभाव्य मार्गांचा कितपत वापर केला आहे व अशा उपाययोजनांमुळे त्यांच्यामधील महसुलाची तफावत कशा रितीने व कितपत कमी होऊ शकते.

(क) खंड (अ) आणि (ब ) च्या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाकडून पंचायती आणि नगरपरिषदा यांना देण्यात यावयाच्या वित्तीय सहाय्याची तत्त्वे आयोगाकडून निर्धारित करण्यात येतील.

उपरोक्त निरनिराळ्या बाबींवरील आपल्या शिफारशी करताना आयोग १९९१ च्या जनगणनेचे लोकसंख्येचे आकडे विचारात घेईल. त्या बाबतीत लोकसंख्या हा कर आणि शुल्के व सहाय्यक अनुदाने यांची प्रक्रिया निर्धारित करण्यातील एक आधारभूत घटक असल्याचे समजण्यात येईल.

(ड) पंचायती आणि नगरपरिषदा यांची दिनांक ३१ मार्च १९९४ रोजी असलेली अदत्त ऋणांची स्थिती आणि :—

(एक) पंचायती आणि नगरपरिषदा यांच्या कर्जे घेण्याच्या क्षमतेचे नियमन करण्यासाठी तत्त्वे व कार्यपद्धती विनिर्दिष्ट करील आणि,—

(दोन) त्यांची स्थिती विचारात घेऊन ऋणांच्या दायित्त्वांचा अंतर्भाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना विनिर्दिष्ट करील.

(ई) राज्य शासनाकडील साधनसंपत्ती आणि त्यावरील मागण्या विशेषतः नागरी प्रशासन, पोलीस, सामाजिक आणि आर्थिक सेवा, ऋणविषयक सेवा आणि इतर सर्व बांधिल खर्च किंवा दायित्त्वे आणि योजनेतर महसुली खर्च यासाठीच्या मागण्या विनिर्दिष्ट करील.

(फ) पंचायती आणि नगरपरिषदा यांच्या भांडवली मत्तांचे परीरक्षण व निगा आणि त्यांच्या साधनसंपत्तीची स्थिती योग्य रित्या विचारात घेऊन त्यांच्या पर्याप्त परिरक्षणाची मानके तपशीलवार तयार करील आणि त्यांची दायित्वे पार पाडण्यासाठी स्थानिकरित्या साधनसंपत्ती संघटित करून कामी लावण्याचे उपाय योजील.

(ग) पाटबंधारे प्रकल्प, परिवहन उपक्रम, नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या योजना, विंधन विहिरींचे कार्यक्रम आणि वाणिज्यिक स्वरूपाची कोणतीही कामे असल्यास अशी इतर कामे यांच्यामध्ये यथास्थिती पंचायती आणि नगरपरिषदा यांनी कोणतीही गुंतवणूक केली असल्यास अशा गुंतवणुकीवर वाजवी प्राप्ती निश्चितपणे मिळण्याची गरज विनिर्दिष्ट करील.

या अधिसूचनेत असेही म्हटले आहे की, आयोगास, नवव्या वित्त आयोगाने शिफारशी केलेल्या आपत्ती निवारण निधी योजनेच्या धर्तीवर आपत्ती निवारणाची योजना सुरू करण्यासाठी आणि आपत्ती निवारण निधी असण्याची गरज विचारात घेण्यासाठी शिफारशी करता येतील.

आयोग दिनांक १ एप्रिल १९९६ पासून सुरू होणाऱ्या पुढील पाच वर्षांच्या कालावधी संबंधातील उपरोक्तपैकी प्रत्येक बाबींवरील आपला अहवाल दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत सादर करील. आयोग, त्याने कोणत्या आधारावर आपले निष्कर्ष काढले आहेत ते नमूद करील आणि उपलब्ध जमा व खर्चाच्या अंदाजांची संबंधित आकडेवारी तयार करील. ''

**वित्त आयोगाची रचना व कार्यकालावधी**

१.३. सुरुवातीला अधिसूचना क्र. एसएफसी-१०९४/सीआंर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ अन्वये वित्त आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य सचिव या पदांवर खालीलप्रमाणे नेमणुका केल्या :—

(१) श्री. शांताराम घोलप . . अध्यक्ष

(२) श्री. आर. सी. सिन्हा . . सदस्य सचिव

यानंतर अधिसूचना क्र. मविआ-१०९४/सीआय-३९/अर्थबळ, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ अन्वये आयोगाच्या खालील तीन सदस्यांच्या नेमणुका केल्या.

(१) श्री. द. म. सुकथनकर,

(२) श्रीमती प्रभावती झाडबुके,

(३) श्री. संतोषराव गोडे.

याचाच अर्थ असा की, महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या कलम तीन प्रमाणे आयोग पूर्णपणे ऑक्टोबर १९९४ मध्येच गठीत झाला.

१.४. पुढे वित्त आयोगाच्या रचनेत बदल झाला. आयोगाचे सदस्य सचिव श्री. आर. सी. सिन्हा यांची दुसऱ्या विभागात बदली झाल्यामुळे त्यांच्या पदावर श्री. प्रे. प्र. महाना यांची दिनांक १४ नोव्हेंबर १९९४ च्या आदेशाने नेमूणक करण्यात आली. पुढे राज्यपालांनी आयोगाचे अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर यांच्या जागी श्री. सुरेश प्रभू यांची अधिसूचना क्र. एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक ५ ऑक्टोबर १९९५ अन्वये नेमणूक केली. तसेच राज्यपालांनी अधिसूचना क्र. मविआ-१०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक १ फेब्रुवारी १९९६ अन्वये ऑक्टोबर १९९४ मध्ये नेमलेले तीन सदस्य बदलून त्यांच्या पदावर खालील सदस्यांची नेमणूक केली.

(१) श्री. दिवाकर कळसुलकर,

(२) श्री. विजय तातेड,

(३) श्री. श्रीपाद पटवारी.

आयोगाचे अध्यक्ष, श्री. सुरेश प्रभू यांनी दिनांक २७ मार्च १९९६ रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे राज्यपालांनी अधिसूचना क्र. मविआ-१०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक २ जुलै १९९६ अन्वये श्री. मकरंद हेरवाडकर यांची वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली.

१.५ दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या आदेशाप्रमाणे वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत होती. परंतु वेळोवेळी झालेल्या घडामोडी विचारत घेऊन मा. राज्यपालांनी वित्त आयोगाची मुदत वेळोवेळी वाढवून ती दिनांक ३१ जानेवारी १९९७ केली.

**आयोगाने अवलंबिलेली कार्यपद्धती**

१.६. शासनाने आयोगाच्या विचारार्थ दिलेल्या विषयांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सविस्तर व व्यापक प्रमाणात आधारसामुग्री गोळा करून त्याचा अभ्यास व विश्लेषण करणे आवश्यक होते. आयोगाने ही आधारसामुग्री सर्व जिल्हापरिषदा, नगरपरिषदा व महानगरपालिकांकडून गोळा केली तसेच शासनाच्या विभागांकडून व इतर कार्यालयांकडूनही आधारसमग्री गोळा केली.

१.७ वित्त आयोगाने अहवाल तयार करण्यासाठी सर्व जिल्हापरिषदा/नगरपरिषदा/महानगरपालिका यांच्याकडून त्यांच्या उत्पन्न व खर्चाचे बाबतीत व इतर अनुषंगिक बाबींची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी सविस्तर प्रश्नावली सर्व जिल्हापरिषदा, २३२ नगरपरिषदा आणि १२ महानगरपालिका यांच्याकडे मार्च, १९९५ मध्ये पाठविण्यात आली होती. प्रश्नावलीतील माहिती संबंधितांनी एप्रिल १९९५ पर्यंत द्यावी अशा सूचना देण्यात आल्या होत्या. बराच पाठपुरावा केल्यानंतर सदरहू माहिती मे-जून, १९९५ मध्ये प्राप्त झाली.

१.८. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सद्यःस्थितीबाबत त्यांची आर्थिक स्थिती सुधारून त्यांना अधिक कार्यक्षम व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्यातील लोकनियुक्त सदस्यांशी मनमोकळी चर्चा करून त्यांचे मत घेण्याच्या दृष्टीने आयोगाने या संदर्भात त्यांना दोन वेळा पत्रे पाठवून विनंती केली होती.

१.९. आयोगाने शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांबरोबर समक्ष चर्चा केली. आयोगाच्या कामकाजाविषयी त्यांचे मत व सूचना समजावून घेतल्या आणि आवश्यक असलेली माहिती शासनाच्या विविध विभागांकडून घेतली. तसेच दिनांक ५ ऑक्टोबर १९९६ रोजी आयोगाने औरंगाबाद येथे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयाला भेट दऊन त्यांचे पदाधिकारी व अधिकारी यांचेशी चर्चा केली. तसेच स्वामी रामानंद तिर्थ रिसर्च ॲन्ड नॅशनल इंटिग्रेशन, औरंगाबाद या संस्थेच्या कार्यालयाला भेट देऊन संस्थेचे अध्यक्ष, श्री. गोविंदभाई श्रॉफ व इतर सदस्य यांचेबरोबर चर्चा केली. वरील विचारविनिमयाचा आयोगाला उपयोग झाला.

१.१०. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी व त्यास अनुसरून आयोगास अहवाल सादर करण्यासाठी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ जुलै १९९४ च्या आदेशान्वये अभ्यास गट नेमण्यात आला होता. या अभ्यास गटाने आपला अहवाल मे, १९९५ मध्ये सादर केला.

१.११. सचिव, ग्राम विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यास गट नेमलेला होता. सदर अभ्यास गटाने आपला अहवाल जून, १९९५ मध्ये वित्त आयोगास सादर केला.

१.१२. ग्रामपंचायतींच्या वित्तीय बाबींचा आढावा घेण्यासाठी त्यांच्या उत्पन्नाची व खर्चाची आकडेवारी उपलब्ध असणे आवश्यक असल्यामुळे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सल्ल्याने ग्रामपंचायतींच्या वित्तीय बाबींचा नमुना पद्धतीवर अभ्यास सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पुणे या संस्थेकडून करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथमतः सदर संस्थेने १९९१-९२ ते १९९३-९४ या ३ वर्षांची माहिती गोळा करून त्यावर अहवाल देण्याचे ठरले होते. परंतु त्यानंतर १९९०-९१ ते १९९४-९५ या ५ वर्षांची माहिती गोळा करून त्यावर विश्लेषणात्मक अहवाल देण्याचे ठरले व ते संस्थेने मान्य केले. निवडक ८२० ग्रामपंचायतींची नमुना तत्त्वावर माहिती गोळा करून सदर संस्थेने ५ वर्षांच्या माहितीवर आधारित अहवाल दिनांक ११ सप्टेंबर १९९५ रोजी आयोगास सादर केला. त्यानंतरही वेळोवेळी आयोगाने या संस्थेशी संपर्क ठेवून विचारविनिमय चालू ठेवला होता. या संस्थेने आयोगाला चांगले सहकार्य दिले.

१.१३. नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, अंधेरी या संस्थेचा संबंध येतो, या संस्थेने एक अहवाल आयोगाला दिला. आयोगाने या संस्थेला भेट देऊन त्यांचेशी चर्चा केली. आयोगाच्या कामकाजाबाबत त्यांनी केलेल्या सूचनांचा आयोगाला उपयोग झाला.

१.१४. राज्यातील ग्रामीण तसेच नागरीभागातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांबाबत नेमलेला अभ्यासगट राज्यातील नागरी अणि ग्रामीण विभागात पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा व तदनुषंगिक बाबींचा व समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्मारण मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची नेमणूक दिनांक २९ डिसेंबर १९९४ रोजी करण्यात आली होती. सदर अभ्यासगटाने आयोगाशी तीन वेळा चर्चा केल्यावर आपला अहवाल जून, १९९५ मध्ये सादर केला.

१.१५. राज्यातील नगरपरिषदा/महानगरपालिका यांच्या संदर्भात काही विषयांचा अभ्यास करण्यासाठी खालील अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आली होती.—

नगरपरिषदांच्या संबंधित विविध विषयांवर अभ्यास करून आयोगास अहवाल सादर करण्यासाठी काही निवडक मुख्य अधिकाऱ्यांचे ४ गट नेमण्यात आले. त्यांच्याकडे सोपविलेले विषय गट निहाय खालीलप्रमाणे :—

| गट क्रमांक | | सोपविलेले विषय |
|---|---|---|
| **गट क्रमांक १** | | |
| श्री. डी. एस. पायगुडे, प्रशासक, नालासोपारा नगरपरिषदा, जिल्हा ठाणे व इतर अधिकारी. | . . | मालमत्ता कर, जकात, खाजगीकरणास असलेला वाव व विकास शुल्क आणि त्या उत्पन्नाचा वापर. |
| **गट क्रमांक २** | | |
| श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगाव नगरपरिषदा व इतर अधिकारी. | . . | कराव्यतिरिक्त (नॉन टॅक्स रेव्हेन्यू) उत्पन्नाची साधने उदा. फीज, लायसन्स फीज, पाणीपुरवठा दर व इतर तत्सम उत्पन्न इत्यादी. |
| **गट क्रमांक ३** | | |
| श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगाव नगरपरिषदा व इतर अधिकारी. | . . | गलिच्छ वस्त्यांमधील सोयी उपलब्ध करण्यासाठी करावयाचा खर्च व त्यासंबंधी मिळणारी ग्रँट वगैरे वाणिज्यिक स्वरूपाच्या गुंतवणुकीवर घेणारे उत्पन्न. |

गट क्रमांक ४

| | | |
|---|---|---|
| श्री. मो. रा. चव्हाण, प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपरिषदा, जि. ठाणे, व इतर अधिकारी. | .. | नगरपरिषदा कायदा तसेच नगरपालिका उपविधी नियम व नगरपालिका लेखाविषयक नियम यांचा अभ्यास करून उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक व उपयुक्त दुरूस्त्या सुचविणे. |

या वरील चार गटांचे अहवाल दिनांक ७ सप्टेंबर १९९५ रोजी प्राप्त झाले.

१.१६. ग्रामपंचायती/जिल्हा परिषद यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी पाच जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे पाच अभ्यास गट नेमण्यात आले होते.

| | नाव | | विषय |
|---|---|---|---|
| १. | श्री. मनोज सौनिक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे. | .. | जिल्हापरिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नाची साधने व संभाव्य उत्पनाची साधने तसेच जिल्हा परिषदांनी केलेल्या व्यावसायिक गुंतवणुकीपासून मिळणारे उत्पन्न. |
| २. | श्री. अरविंद सिंग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर. | .. | जिल्हापरिषदेच्या मालमत्तांचे परिरक्षण व दुरूस्ती इत्यादि-बाबत. |
| ३. | श्री.आय. एस. चहल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक. | .. | पाणीपुरवठा योजना व पाटबंधारे योजना, अडीअडचणी, त्यावर उपाय आणि त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्न इत्यादीबाबत. |
| ४. | श्री. नंदकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती. | .. | ग्रामपंचायती व पंचायत समिती यांना बळकट करणे, जवाहर रोजगार योजना, त्यांची कार्ये इत्यादी. |
| ५. | श्री. राजेश अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव. | .. | ग्रामपंचायतींच्या स्तरावरील कर्मचारी वृंदांची कमतरता व त्यासाठी उपाययोजना इत्यादीबाबत. |

यांचे अहवाल आयोगाला मे-जून १९९५ मध्ये प्राप्त झाले.

१.१७. महानगरपालिकांच्या वित्तीय बाबी आणि विशिष्ट विषयासंदर्भात अभ्यास करणयासाठी श्री. ए. बी. मादुस्कर, सह आयुक्त, मुंबई महानगरपालिका (आता सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट नेमण्यात आला होता महानगरपालिका अभ्यासगटाकडे सोपविलेले विषय थोडक्यात खालीलप्रमाणे होते :—

महानगरपालिकांच्या मुख्य उत्पन्नाची साधने/आर्थिक प्रश्न विशेषतः (१) मालमत्ता कर, (२) जकात, (३) पाणीपुरवठा दर, (४) कराव्यतिरिक्त उत्पन्नाच्या बाबी (नॉन टॅक्स रेव्हेन्यू), (५) अधिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने अधिनियमात/नियमात सुधारणा.

या अभ्यासटाने आपला अहवाल जुलै, १९९५ मध्ये सादर केला.

१.१८. आयोगाकडे सोपविलेल्या बाबींमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध वाणिज्यक उपक्रमाबद्दल अभ्यास ही एक बाब देखील आहे. अशा उपक्रमांनी केलेली गुंतवणुक आणि गुंतवणुकीदर वाजवी प्राप्ती याचा अभ्यास करून शिफारशी करणे अपेक्षित आहे. नगरपरिषदा/महानगरपालिका मिळून एकूण ६ परिवहन उपक्रम आहेत. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा क्षेत्रातील या उद्देशासाठी म्हणजे उपक्रमानी केलेली गुंतवणूक आणि त्यावर वाजवी प्राप्ती याचा अभ्यास करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती व त्यास अनुसरून ज्या ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे परिवहन उपक्रम आहेत, त्यांच्याकडून माहिती गोळा करण्यात आली.

१.१९. राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांना देण्यात येणारी विविध प्रकारची अनुदाने याबद्दलची गेल्या ५ वर्षांची आकडेवारी संचालक, नगरपरिषदा प्रशासन आणि शासनाच्या नगरविकास विभागाकडून मागविण्यात आली. नगरपरिषदांच्या बाबतीत संचालक, नगरपरिषदा प्रशासन यांनी काही माहिती पुरविली.

१.२०. संचालक, नगररचना, पुणे यांनी नगरपरिषदांच्या मालमत्ता यासंबंधी मूल्यांकन करण्याच्या संदर्भात माहिती व अहवाल आयोगाला सादर केला . या अहवालात प्रत्येक नगरपरिषदानिहाय लोकसंख्या, एकूण मालमत्ता, ३१ मार्च १९९५ अखेरची मालमत्ता कराची रक्कम, करारचा दर, दरडोई प्रमाण, मालमत्ता कराचे पुनर्निर्धारण केले असल्यास कोणते वर्ष, एकूण मालमत्ता आणि दरडोई कराचे प्रमाण अशी अतिरिक्त माहिती त्यांच्याकडून घेण्यात आली.

१.२१. राज्यातील नगरपरिषदांच्या एकंदर कामकाजाबाबत त्यांच्या प्रशासनावर व आर्थिक परिस्थितीवर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडे अधिनियमान्वये सोपविलेल्या कर्तव्य व जबाबदाऱ्या कार्यक्षम रितीने पार पाडतात किंवा नाही हे पाहण्यासाठी राज्य शासनाचे कशा प्रकारे नियंत्रण असते, याबद्दलची सध्याची पद्धत काय आहे. सध्याच्या शासकीय नियंत्रण पद्धतीमध्ये काही उणीवा आहेत काय, असल्यास, त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे काय, ही सुधारणा कशा प्रकारे करावी, याचप्रमाणे वरील बाबतीत संचालक, नगरपालिका प्रशासन यांची काय भूमिका असते इत्यादी बद्दलची माहिती शासन व संचालक , नगरपालिका प्रशासन यांच्याकडून घेण्यात आली.

१.२२. स्थानिक स्वराज्य संस्थांचे (नगरपरिषदा/जिल्हापरिषदा/ग्रामपंचायती) लेखापरीक्षण मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्याकडून केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनामध्ये लेखा परीक्षणे हा महत्त्वाचा भाग असल्याने स्थानिक निधी लेखा विभागाकडून या बाबतीत सविस्तर अहवाल मागविण्यात आला. मुख्य लेखा परीक्षक यांनी आपला अहवाल आयोगास सादर केल्यावर त्यावर आयोगात चर्चा करण्यात आली.

१.२३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी/अधिकारी यांच्या सेवापूर्व/सेवांतर्गत प्रशिक्षणाबद्दल काय परिस्थिती आहे, सध्याची पद्धत, त्याबद्दलची व्यवस्था आणि त्याबद्दल काही अभिप्राय/सूचना असल्यास इत्यादी बद्दलची माहिती शासनाच्या नगरविकास विभागाकडून तसेच संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्याकडून घेण्यात आली आहे.

१.२४. यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय बाबींविषयक आधारभूत माहिती गोळा करण्यासाठी कोणती पद्धती असावी याचा अभ्यास करण्यासाठी वित्त आयोगाने मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचे अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला होता. या अभ्यासगटाने आपला अहवाल आयोगाला दिला.

१.२५. आयोगाचे अध्यक्ष, श्री. सुरेश प्रभू असताना आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यानी मार्च, १९९६ च्या पहिल्या आठवड्यात मा. राज्यपालांची अनौपचारिक भेट घेतली होती. तसेच आयोगाचे नवीन अध्यक्ष श्री. मकरंद हेरवाडकार व दोन सदस्य यांनी दिनांक २६ ऑगस्ट, १९९६ रोजी माननीय राज्यपालांची अनौपचारिक भेट घेतली व त्यांना आयोगाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. त्यावेळी माननीय राज्यपालांनी काही उपयुक्त सूचना दिल्या त्याचा आयोगाला फार उपयोग झाला. तसेच वित्त आयोगाने दिनांक ३ सप्टेंबर १९९६ रोजी नामदार श्री. अण्णा डांगे, मंत्री, ग्रामविकास आणि दिनांक ४ नोव्हेंबर १९९६ रोजी नामदार श्री. एकनाथ खडसे, मंत्री, वित्त यांच्या अनौपचारिक भेटी घेतल्या व आयोगाच्या कामकाजाविषयी चर्चा केली. यावेळी ना. श्री. अण्णा डांगे व ना. श्री. एकनाथ खडसे यानी केलेल्या सूचनांचा आयोगाला उपयोग झाला.

१.२६. वित्त आयोगाच्या कामकाजाबाबत झालेल्या खाली दर्शविलेल्या राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/बैठकांना आयोगाचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्यामुळे तेथील चर्चेचा आयोगाच्या कामकाजाला उपयोग झाला.

(१) महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी सदस्य सचिव, श्री. आर. सी. सिन्हा यांनी दिनांक १६ जून १९९४ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय वित्त आयोगाचे सदस्य सचिवांची भेट घेऊन आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत चर्चा केली.

(२) महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप व माजी सदस्य सचिव, श्री. आर. सी. सिन्हा यांना वित्त आयोगाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यासाठी केंद्रीय योजना आयोगाने दिनांक २७ ऑक्टोबर १९९४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीसाठी आमंत्रित केले होते. ते ह्या बैठकीस हजर राहिले.

(३) राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थान, हैद्राबाद यांनी हैद्राबाद येथे दिनांक १० फेब्रुवारी १९९५ व दिनांक ११ फेब्रुवारी १९९५ रोजी वित्त आयोगाच्या कामकाजाबाबत कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेस आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप व सदस्य सचिव, श्री. प्रे. प्र. महाना हजर राहिले होते.

(४) नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी, नवी दिल्ली यानी गठित केलेल्या वर्किंग ग्रूप ऑन प्लॅन अँड नॉनप्लॅन कॉम्पोनन्ट ऑफ एक्सपेंडिचर (ग्रुप-२) यामध्ये महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप यांचा समावेश केला होता. या गटाची पहिली बैठक मसुरी येथे दिनांक १ जुलै १९९५ व दिनांक २ जुलै १९९५ रोजी होऊन उक्त विषयावर चर्चा झाली. या बैठकीस श्री. शांताराम घोलप हजर होते.

(५) महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री. सुरेश प्रभू आणि सदस्य सचिव, श्री. प्रे. प्र. महाना यांना केंद्रीय योजना आयोग व शहरी कार्य व रोजगार मंत्रालयाने नवी दिल्ली येथे दिनांक ३ नोव्हेंबर १९९५ व दिनांक ४ नोव्हेंबर १९९५ रोजी वित्त आयोगाचे कामकाज या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीस आमंत्रित केले होते. ते या बैठकीस हजर राहिले होते.

(६) तामिळनाडू राज्य वित्त आयोगाने मद्रास येथे दिनांक १४ मार्च १९९६ व दिनांक १५ मार्च १९९६ रोजी वित्त आयोगांची राष्ट्रव्यापी परिषद आयोजित केली होती. या परिषदेला महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष, श्री. सुरेश प्रभू व सदस्य, श्री. श्रीपाद पटवारी हजर होते.

(७) राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, हैद्राबाद यांनी हैद्राबाद येथे दिनांक २४ ऑक्टोबर १९९६व दिनांक २५ ऑक्टोबर १९९६ रोजी " नॅशनल कॉन्फरन्स ऑन इमर्जिंग ट्रेंड इन इंडियन लोकल गव्हर्नमेंट फायनान्सेस " या विषयाबाबत कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेला वित्त आयोगाचे अध्यक्ष, श्री. मकरंद हेरवाडकर हे हजर होते.

**इतर राज्यांच्या वित्त आयोगांशी चर्चा**

१.२७. खाली दर्शविलेल्या राज्य वित्त आयोगांच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र वित्त आयोगाला भेटी दिल्या व आयोगाच्या कामकाजाबाबत चर्चा केली :—

| वित्त आयोगाचे नाव | पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली त्यांचे नांव व पदनाम | चर्चेचा दिनांक |
|---|---|---|
| (१) हरियाना वित्त आयोग .. | श्री. एन. सी. गुप्ता, सदस्य .. | १ जानेवारी १९९६ |
| (२) दिल्ली वित्त आयोग .. | श्री. व्ही. एस. जाफा, अध्यक्ष .. | ८ जानेवारी १९९६ |
| (३) तामिळनाडू राज्य वित्त आयोग | श्री. आर. आरूमुघम, अध्यक्ष व इतर सदस्य. | २९ जानेवारी १९९६ |
| (४) मणिपूर राज्य वित्त आयोग .. | श्री. बी. आर. बसू, अध्यक्ष .. | २१ जुलै १९९६ |

महाराष्ट्र वित्त आयोगाचे माजी सदस्य सचिव, श्री. आर. सी. सिन्हा यांनी दिनांक ५ ऑक्टोबर १९९४ ते दिनांक ९ ऑक्टोबर १९९४ या कालावधीत बंगलोर येथे कर्नाटक राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष, सदस्य सचिव व इतर सदस्य यांची भेट घेऊन आयोगाच्या कामकाजाबाबत चर्चा केली. तसेच म्हैसूर महानगरपालिकेचे आयुक्तांबरोबरही चर्चा केली.

वरील चर्चा आयोगाच्या कामकाजासाठी उपयुक्त ठरल्या.

## आयोगाला आलेल्या अडीअडचणी

१.२८. आयोगाला काम करताना सांख्यिकी माहितीबाबत फार अडचणी आल्या, दोन वेगवेगळ्या स्त्रोतातून एकाच प्रकारची घेतलेली माहितीजुळत नाही असे दिसून आले. पंचायती राज्य संस्था, नगरपरिषदा व शासन यांच्याकडून घेतलेल्या उत्पन्न व खर्चाच्या माहितीमध्ये विसंगती होती. त्यामुळे विविध माहितीच्या संचाचा एकमेकाशी मेळ घालणे कठीण झाले. ह्या अडचणीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिलेल्या आधारसामुग्रीचा उपयोग करायचा असे आयोगाने ठरविले. जी माहिती स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळाली नाही तेथे इतर स्त्रोतांच्या माहितीचा उपयोग केला आहे. तथापि, हे नमूद करणे आवश्यक आहे की, पंचायती, नगरपरिषदा, जिल्हा आणि राज्य शासन स्तरावर जी सांख्यिकी आधारसामग्री उपलब्ध आहे ती फारशी समाधानकारक नाही. म्हणून याबाबत काहीतरी ठोस उपाययोजना करणे जरूरीचे आहे. आयोगाने ह्या अहवालात अन्यत्र कायम स्वरूपी आधार सामग्री गोळा करणाऱ्या यंत्रणेची शिफारस केलेली आहे. ही यंत्रणा भविष्यामध्ये फक्त आयोगालाच नव्हे तर शासनाला सुद्धा उपयुक्त होईल.

१.२९. संविधानाच्या तरतुदीप्रमाणे राज्य स्तरावरील हा पहिलाच वित्त आयोग असल्यामुळे अशा स्वरूपाच्या कामासाठी अनुभव असलेल्या कर्मचारीवर्गाची उपलब्धता नव्हती. स्थानिक स्वराज्य संस्थांतील सांख्यिकी तसेच क्षेत्रीय अनुभवाची पार्श्वभूमी असलेला अधिकारी व कर्मचारीवृंद ह्या कामासाठी अधिक उपयुक्त होईल. आयोगासाठी जानेवारी, १९९५ च्या सुमारास आधारसामग्री कक्ष गठीत करण्यात आला. आयोगाला उपलब्ध झालेल्या अधिकारीवर्गाने अशा प्रकारच्या अडचणी असतानासुद्धा कामाची तातडी, कामाप्रती समर्पण व सांघिक कार्य या भावनेने हे काम पूर्ण केलेले आहे.

१.३०. आयोगाचे अध्यक्ष व सदस्य वारंवार बदलले गेले हे वर नमूद केलेले आहे. आयोग कार्यरत असतांनाच्या कालावधीमध्ये राज्य विधानमंडळाची निवडणूक व संसंदेची निवडणूक या दोन सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यामुळे तसेच निवडणूक काळात आचारसंहितेच्या सक्त अंमलबजावणीमुळे आयोगाचे काम मंदावले होते. कारण निवडणूक प्रक्रियेत पूर्णपणे गुंतलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबर चर्चा करण्यासाठी दौरे करणे व या संस्थांकडून माहिती गोळा करणे शक्य नव्हते. वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री. सुरेश प्रभू यांनी राजीनामा दिल्यानंतर नवीन अध्यक्षांची नेमणूक होईपर्यंतचा जवळजवळ तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये आयोगाला बैठका घेणे शक्य झाले नाही. अशाच प्रकारची स्थिती नोव्हेंबर, १९९५ ते जानेवारी १९९६ या कालावधीमध्ये आयोगाचे तीन नवीन सदस्य नेमले जाईपर्यंत निर्माण झाली होती. सुरुवातीला कॉटेज क्रमांक सी-४ व सी-५, मादाम कामा रोड, मुंबई येथे असलेले आयोगाचे कार्यालय जुलै, १९९५ मध्ये सध्याच्या ठिकाणी म्हणजे प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय वसतीगृह, हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई-१ येथे स्थलांतरित करावे लागले. ह्या सर्व घडामोडीमुळे आयोगाच्या कामात विस्कळीतपणा आला. आयोगाला वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीस ह्या घटना मुख्यतः जबाबदार आहेत.

१.३१. सर्व शासकीय विभागांनी, शासनाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आयोगाला सौहार्दपूर्ण सहकार्य दिले आहे. ह्या कामात त्यांनी स्वतः होऊन दिलेल्या सहभागामुळे आयोग त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणे आयोगाने जे अभ्यासगट नेमले होते त्यांनी दिलेल्या सूचना व शिफारशी आयोगाला फारच उपयुक्त ठरल्या. आयोगाने अहवाल लिहितांना त्यांचा आवश्यक त्या प्रमाणात उपयोग केला आहे. या ठिकाणी हेही नमूद करणे आवश्यक आहे की, पंचायती राज संस्था व महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांनी आयोगाच्या कामात उत्साह दाखविला आणि पूर्ण सहकार्य दिले.

□ □

प्रकरण २

# महाराष्ट्रातील पंचायती राज संस्था व नागरी संस्था यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## भाग–१

## पंचायती राज संस्था

२.१. प्राचीन काळापासून आपल्या देशात ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत. या ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या संपन्न व स्वयंपूर्ण आणि स्वनियंत्रित होत्या. गावाचा सर्व कारभार पंचायतीमार्फत होत असे. गावाच्या सर्व गरजा शेती व पूरक व्यवसाय यातून भागविल्या जात होत्या. ही स्वायत्त स्वयंपूर्ण ग्रामीण व्यवस्था पुढील काळात विस्कळीत व कमकुवत होऊ लागली. ब्रिटिशांच्या काळात मात्र ही ग्रामीण व्यवस्था खऱ्या अर्थाने उध्वस्त झाली. परंपरागत विकेंद्रित समाजव्यवस्था संपून केंद्रीय समाज व्यवस्था आकार घेऊ लागली.

२.२. भारतीय जनतेतील असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने सन १८८२ साली लॉर्ड रिपन यांच्या ठरावाने स्थानिक स्वराज्य संस्था सुरू झाल्या. प्रत्यक्षात जे जिल्हा व तालुका बोर्ड स्थापन करण्यात आले, त्यात शासकीय अधिकारी आणि नियुक्त सभासदांचा मोठा भरणा करण्यात आला. १९३५ साली भारत सरकारचा कायदा संमत झाल्यानंतर प्रांतिक सरकारच्या कामाच्या यादीत एक हस्तांतरित विषय म्हणून स्थानिक स्वराज्य हा विषय घालण्यात आला. १९३७ साली प्रांतिक स्वायत्ततेनुसार लोकनियुक्त मंत्रिमंडळे अधिकारावर आली. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधी काही सुधारणा केल्या. ग्रामीण समाजाच्या आर्थिक प्रश्नाकडे एकत्रित स्वरूपात पाहण्याची जाणीव यावेळी प्रथमच निर्माण झाली, त्यानुसार १९३९ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा विकास मंडळे स्थापन करण्यात आली.

२.३. स्वातंत्र्योत्तर काळात मार्च, १९५० मध्ये स्थापन झालेल्या योजना आयोगाने सामूहिक विकासाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविली. ह्या कार्यक्रमाचा दिनांक २ ऑक्टोबर १९५२ रोजी शुभारंभ करण्यात आला. कोट्यावधी रुपये खर्चाच्या पंचवार्षिक योजना सुरू झाल्या. यामध्ये समाज विकास व ग्रामीण विकासाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. सामूहिक विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रम १०० खेड्यांचे क्षेत्र असलेल्या गटात कार्यान्वित करण्यात आले. त्यांचे मुख्य कार्य खेड्यांचा सर्वांगीण विकास करणे हे होते.

**बळवंतराय मेहता समिती**

२.४. पहिल्या पंचवार्षिक योजना काळात स्थानिक लोकांचा प्रत्यक्ष सहभाग मिळाल्याखेरीज ग्रामीण विकास साधता येत नाही असा अनुभव असल्यामुळे या प्रश्नाबाबत राष्ट्रीय विकास परिषदेत चर्चा झाली व ग्रामीण विकास योजनेमध्ये लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी श्री. बळवंतराय मेहता यांचे अध्यक्षतेखाली १९५७ साली एक समिती नेमण्यात आली. या समितीने पूर्वीपासून चालत आलेल्या ग्रामपंचायती व इतर स्थानिक संस्थांचा सर्वांगीण अभ्यास केला. समितीला असे आढळून आले की, सामूहिक विकास कार्यक्रमाला लोकांतील उपक्रमशीलता वाढविण्यात व स्थानिक नेतृत्त्व निर्माण करण्यात फार कमी यश मिळाले आहे. ग्रामपंचायतीच्या वरच्या पातळीवर असणाऱ्या फारच थोड्या स्थानिक संस्थांनी या कामात आस्था व उत्साह दाखविला. जिल्हा लोकल बोर्डाकडे सोपविलेल्या कार्याची दखल घेताना त्यांच्या कामावर मोठ्या प्रमाणात नियंत्रणेही लादण्याची राज्य सरकारांची प्रवृत्ती दिसून आली. त्यामुळे समितीला राज्य सरकारच्या खालच्या पातळीवरील

जबाबदाऱ्यांची व सत्तेच्या विकेंद्रीकरणाची निकडीची गरज वाटली. तसेच राज्याच्या खालच्या पातळीवर ज्या संस्थांवर विकासाच्या कामाची संपूर्ण जबाबदारी जाईल, त्या संस्थांकडे राज्य सरकारने सत्ता सोपविली पाहिजे व सरकारने आपल्याकडे फक्त सर्वसाधारण मार्गदर्शनाचे, देखरेख ठेवण्याचे, वरच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्याचे व आवश्यक त्या कार्यक्रमासाठी जादा आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याचे अधिकार ठेवावेत, अशी मूलभूत शिफारस केली. तसेच विकासाची कामे करण्यासाठी आणि विकासाच्या कामांत स्थानिक लोकांचा सहभाग मिळावा ह्या हेतूने या समितीने स्थानिक पातळीवर ग्रामपंचायती, गट पातळीवर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय व्यवस्था निर्माण करण्याची व त्यांच्या कार्यकारी मंडळात प्रौढ मतदान पद्धतीने व नेमणुकीने लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याची शिफारस केली. कै. बळवंतराय मेहता समितीने सुचविलेल्या विकेंद्रीकरणाच्या या त्रिस्तरीय व्यवस्थेस पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ' पंचायत राज ' हे नाव दिले.

### संथानम समिती

२.५. केंद्र शासनाने जुलै, १९६२ मध्ये श्री. के. संथानम यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक साधने समाधानकारक आहेत काय व इतर अनुषंगिक बाबींचा अभ्यास व शिफारशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने दिनांक ३१ जुलै, १९६३ रोजी आपला अहवाल शासनाला सादर केला. ग्रामपंचायतीसाठी घरपट्टी, धंदा कर व वाहन कर हे कर सक्तीचे करावेत. ग्रामपंचायतीला कमीत कमी एक रुपया दरडोई याप्रमाणे देखभाल अनुदान देण्यात यावे, अशा प्रकारच्या शिफारशी ग्रामपंचायतीची उत्पन्नाची साधने वाढावीत म्हणून समितीने केल्या. पंचायत समितीस सरासरी एक रुपया दरडोई अनुदान देण्याची व जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीकडे निधी वर्ग करण्यासाठी निश्चितपणे कांही तत्त्वे ठरवून द्यावीत तसेच जिल्हा परिषदेकडे कांही लवचिक साधनसंपत्ती वर्ग करावी, अशा शिफारशी समितीने केल्या.

### अशोक मेहता समिती

२.६. देशाच्या पातळीवरून पंचायत राज संस्थांचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्र शासनाने श्री. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १९७७ मध्ये एक समिती नियुक्त केली होती. या समितीने इतर बाबींबरोबर वित्तविषयक बाबींसंबंधी शिफारशी केल्या. पंचायत राज संस्थेस सक्तीने कर बसविण्याचे अधिकार द्यावेत. जमीन महसूल यावरील उपकर, पाणीपट्टीवरील उपकर, मुद्रांक शुल्कावरील अधिभार, करमणूक कर इत्यादींचे संपूर्ण उत्पन्न पंचायत राज संस्थांना देण्यात यावे. पाच वर्षांच्या कालावधीत जमीन महसूल संपूर्णपणे पंचायत राज संस्थांकडे वर्ग करावा. पंचायत राज संस्थेकडे सोपवावयाच्या कामांची स्पष्ट यादी राज्य शासनाने बनवावी व त्या क्षेत्रातील जास्तीत जास्त अधिकार आणि प्रमाणबद्ध निधी पंचायत राज संस्थांकडे देण्यात यावा. यात विशेषतः शेती आणि संलग्न तंत्रे, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, ग्रामीण उद्योग, मागासवर्गीयांचे कल्याण यांचा समावेश असावा. अशा प्रकारच्या शिफारशी या समितीने केल्या.

### सध्याचे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वीची स्थिती

२.७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अस्तित्वात येण्यापूर्वी राज्यात मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, मध्य प्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ आणि हैद्राबाद जिल्हा मंडळ १९५५ हे अधिनियम अस्तित्वात होते. मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ अन्वये प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक मंडळ स्थापन करण्यात आले होते. या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ग्रामीण जनतेला स्वशासनाचे आर्थिक अधिकारासहित काही अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्याचप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रामपंचायत प्रशासनासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३, हैद्राबाद ग्रामपंचायत अधिनियम १९५६ आणि मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, १९४६ अस्तित्वात होते.

**वसंतराव नाईक समिती**

२.८. बळवंतराय मेहता समितीने सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात सर्वांगीण बाबींचा अभ्यास करण्यासाठी त्यावेळचे महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती दिनांक २७ जुलै १९६० साली नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल दिनांक १५ मे १९६१ रोजी शासनाला सादर केला. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ नुसार महाराष्ट्रात पंचायत राजची स्थापना करण्यात आली. हा अधिनियम बहुतांशी नाईक समितीच्या शिफारशींवरच आधारित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्त व्यवस्थेवर नाईक समितीने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत. करांची व बिगर करांची आवश्यक आर्थिक साधने जिल्हा परिषदेला मिळवून द्यावी. जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने जमीन महसूल किंवा लोकल फंड सेस वाढविण्याचा ठराव संमत केल्यास त्याप्रमाणे दर ठरविण्याचे काम सरकारने हाती घ्यावे व सेस वाढवून द्यावा. समानीकरण अनुदाने देण्याची पद्धत स्वीकारावी. ह्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीला दरडोई निदान एक रुपया उत्पन्न व जिल्हा परिषदेला दरडोई दोन रुपये उत्पन्न मिळेल. जरूर त्या अटी व शर्तीवर ७५ टक्के सप्रयोजन (परपसिव्ह) अनुदान द्यावे. जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांवरील होणारा बहुतांशी आस्थापना खर्च सरकारने करावा.

**श्री. ल. ना. बोंगिरवार समिती**

२.९. नाईक समितीने आपल्या अहवालात सुचविले होते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाचा ठराविक काळाने आढावा घेण्यात यावा. तद्नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या अधिनियमाची अंमलबजावणी व जिल्हा परिषदेचे एकूण कार्य यांचे मूल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक २ एप्रिल १९७० रोजी श्री. ल. ना. बोंगिरवार यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने राज्यातील त्रिस्तरीय पंचायती राज संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेऊन या संस्था बळकट व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय तसेच वित्त-विषयक बाबींसंबंधी महत्त्वाच्या शिफारशी केल्या. पंचायती राज संस्थांच्या मूलभूत रचनेत कोणताही आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. राज्य शासनाने राज्य, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या या तिन्ही क्षेत्रातील कामांची सुस्पष्ट यादी बनवावी व या यादीला पूरक अशी वित्तीय व्यवस्था करावी.

वित्तविषयक बाबींसंबंधी समितीने सुचविले की, आस्थापना अनुदान हे १०० टक्के करण्यात यावे. ज्या जिल्ह्यातील जमीन महसूल दरडोई दोन रुपयांहून कमी आहे अशा जिल्ह्यांमध्ये जमीन महसुलावरील उपकराची सध्याची कमाल मर्यादा १५० पैसे आहे. ती वाढवून २५० पैसे किंवा ३५० पैसे करण्यात यावी. या मर्यादेपर्यंत स्थानिक उपकराप्रीत्यर्थ देण्यात येणारे अनुरुप अनुदान सध्याप्रमाणे जिल्हा परिषदांना देण्यात यावे. सध्याच्या २ टक्के वन महसुलाच्या अनुदानाऐवजी जिल्हा परिषदांना जिल्ह्यातील वन महसुलाच्या ५ टक्के पर्यंत अनुदान देण्यात यावे. अभिकरण योजनेवरील सर्व खर्च हस्तांतरित योजनेवरील खर्चाप्रमाणे जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात यावा. बांधकामाव्यतिरिक्त अभिकरण योजनेच्या बाबतीत जिल्हा परिषदांना वरकड खर्च भागविण्यासाठी ३ टक्के अतिरिक्त अनुदान देण्यात यावे. जिल्हा परिषदांनी जमीन महसूल व समानीकरण निधीसारख्या साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ५० टक्के एवढे उत्पन्न अनुसूचित जाती व जमाती यांच्या विकासासाठी म्हणून राखून ठेवावे. राज्य पातळीवरून करण्यात येणारे साधनसंपत्तीचे वाटप एखाद्या विशिष्ट प्रमाण पद्धतीच्या आधारे म्हणजे लोकसंख्या, मागासलेपणा, क्षेत्राची दुर्गमता इत्यादींचे आधारे करण्यात यावे. ग्रामपंचायतीस द्यावयाचे समानीकरण अनुदान दरडोई दोन रुपये असावे. पंचायत समितीच्याबाबत समितीने शिफारस केली की, पंचायत समितीचा दर्जा निगमनिकाय न करता आहे तसाच ठेवावा.

**श्री. पी. बी. पाटील समिती**

२.१०. पंचायत राज समितीच्या मूल्यमापनाची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने दिनांक १८ एप्रिल १९८४ रोजी प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत राज मूल्यमापन समिती स्थापन केली. समितीने पंचायती राज संस्थांची संघटनात्मक रचना, त्यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व आर्थिक अधिकार यावर बऱ्याच शिफारशी केल्या आहेत. जिल्हा परिषदांचे आर्थिक अधिकार वाढविणे आवश्यक आहे हे नमूद करून समितीने जमीन महसुलावरील

उपकरामध्ये फेररचना व सुधारणा करून वाढ सुचविली. तसेच वन महसूल अनुदानाची प्रचलित मर्यादा वाढविण्यास सुचविले. समितीने पुढे सुचविले की, जिल्हापरिषद आकारीत असलेले कांही कर व फी हे सक्तीचे करावेत. तसेच हे कर व फी आकारण्यासाठी त्यांचे किमान व कमाल दर ठरविण्यात यावे. जेणेकरून जिल्हा परिषदा त्या मर्यादेत कर व फी आकारू शकतील.

राज्य शासनानी शक्यतो जिल्हा परिषदांचा वापर एजन्सी म्हणून करू नये. प्रसंगी, अशी गरज पडल्यास सध्याचे अभिकरण शुल्काचे दरापेक्षा जादा दराने अभिकरण शुल्क जिल्हापरिषदेला देण्यात यावे अशी शिफारस समितीने केली. पंचायत राज संस्थांना सध्याच्या पायाभूत सोयी चांगल्या ठेवण्यासाठी पुरेसा देखभाल व दुरुस्ती निधी देण्यात यावा यासाठी जिल्हा परिषदांना आवश्यक अनुदान देण्यात यावे आणि ज्या बाबीसाठी काही अनुदान देण्यात येते त्याची मर्यादा वाढविण्यात यावी. जमीन महसुलाच्या उपकरावरील अनुरुप अनुदानाचे दर वाढविण्याबाबतही समितीने शिफारस केली. थोडक्यात, समितीने पंचायत राज संस्थांची आर्थिक परिस्थिती, त्यांना त्यांचे उत्पन्न वाढवून देण्याचे अधिकार प्रदान करून, सुधारण्यासाठी व त्यांना अधिक सुदृढ करण्यासाठी गांभीर्यपूर्वक विचार केला.

## भाग २

### नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

२.११. महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळापासून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. ब्रिटीश राजवटीत या संस्थांकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे व कार्यक्षमरित्या पार पाडण्यासाठी, आवश्यक असलेले अर्थबळ उभारण्याकरिता त्यांच्याकडे सोपविण्याचे कर व त्याद्वारे महसूल गोळा करण्याबद्दलचा अभ्यास झालेला होता. देशातील प्रचलित कायद्यामध्ये त्या त्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊन बदल करण्यात आले.

२.१२. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या आर्थिकदृष्ट्या कशा वर्धनक्षम व सबळ होतील याचा अभ्यास केंद्र व राज्य शासन स्तरावर फार पूर्वीपासून होत आलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या कालावधीतील गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१९ मधील तरतुदीअन्वये जमीन आणि इमारती किंवा जमिनीच्या किंमती पाणीपट्टी, सफाई, स्वच्छता, दिवाबत्ती, वाहने, नावा व जनावरे यांच्यावर कर, पथकर, मालावरील जकात, व्यापार, उद्योग, व्यवसाय व बाजारपेठा इत्यादींवर नऊ प्रकारचे कर केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांनीच लावावेत असे स्पष्टपणे निर्देशित केले होते. सन १९२५ मध्ये इंडियन टॅक्सेस एन्क्वायरी कमिटीने स्थानिक संस्थांच्या कर आकारणी प्रश्नांचा केंद्रीय व राज्य सरकारच्या आर्थिक बाबींसह अभ्यास केला व देशातील सर्वच स्थानिक संस्थांची आर्थिक साधनसंपत्ती त्यांच्याकडून ज्या सेवा मिळण्याची अपेक्षा असते त्या विचारात घेता फारच अपुरी आढळते असा निष्कर्ष काढला. १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट मधील उल्लेखिलेल्या स्थानिक निवडक करांसंबंधात केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीच असलेल्या आरक्षणात गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ मधील तरतुदीनुसार सुधारणा करण्यात आली.

२.१३. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५१ मध्ये लोकल फायनान्स एन्क्वायरी कमिटीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या साधनसंपत्ती संदर्भात सविस्तर अभ्यास करून अहवाल दिला. त्या अहवालानुसार महसुलाच्या एकूण १३ बाबी केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राखून ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

### टॅक्सेशन एन्क्वायरी कमिशन

२.१४. टॅक्सेशन एन्क्वायरी कमिशन (१९५३-५४) च्या अहवालामध्ये स्थानिक सस्थांचे आर्थिक प्रश्न व विशेष करून कर आकारणी यांचा विचार करण्यात आला होता. त्या कमिशनने स्थानिक स्वराज्य संस्थांनी किंवा संस्थांसाठी आकारण्यासाठी सहा प्रकाराची उत्पन्नाची साधने राखून ठेवण्याची शिफारस केली होती व शिवाय उत्पन्नाची ४ वेगळी साधने ऐच्छिक वापरासाठी सुचविली होती. केवळ स्थानिक संस्थांसाठी राखून ठेवलेले मुख्य कर म्हणजे इमारतीवरील व जमिनीवरील कर (मालमत्ता कर) जकात कर, व्यवसाय, व्यापार व धंदा यावरील कर, यांत्रिक वाहनांशिवाय इतर वाहनांवरील कर हे होत. ऐच्छिक स्वरूपाच्या आकारणीच्या बाबींमध्ये नाट्यगृहे किंवा नाट्यप्रयोगांवरील कर, मालमत्ता हस्तांतरणावरील कर, रस्त्याने अथवा जलमार्गाने वाहतूक केलेल्या मालावरील व प्रवाशांवरील कर, टोल यांचा समावेश होता.

### झकेरिया समिति

२.१५. झकेरिया समिति (१९६३) ने १९६०-६१ मधील देशातील स्थानिक संस्थांची आर्थिक स्थिती तपासल्यानंतर असे नमूद केले की, ब्रिटीश राजवटीत जे कर वसूल करण्याचे अधिकार स्थानिक संस्थांना होते, जवळजवळ तेवढेच कर अद्यापही लावण्याचे अधिकार नागरी संस्थांना आहेत. या संस्थांच्या त्यावेळच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केल्यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, स्थानिक संस्थांकडील अपुऱ्या साधनसंपत्तीमुळे त्यांची अत्यावश्यक कर्तव्ये देखील पार पाडण्यास त्या असमर्थ आहेत. या समितीने स्थानिक साधनसंपत्तीची सांगड नागरी सोयींच्या दर्जाशी घालण्याचा प्रयत्न केला. काही अत्यावश्यक नागरी सेवा पुरविण्यासाठी सहा वेगवेगळ्या गटातील नागरी संस्थांना वार्षिक आवर्ती खर्चाचे किमान दरडोई प्रमाण किती असावे याची प्रमाणके विहित केली. नागरी संस्थांना आर्थिक दृष्ट्या सुदृढ करण्यासाठी समितीने राज्य शासनाच्या काही कराचे वाटे देण्यासंबंधीच्या शिफारशी केल्या. या समितीने नागरी संस्थांचे मुख्यत्वे लोकसंख्येच्या आधारावर ६ गट सुचविले होते व मुलभूत सर्वसाधारण उपयोगासाठी गटनिहाय अनुदान देण्याचे वार्षिक दरडोई दर व पद्धती काय असावी तसेच कर्जरुपाने कशी मदत करावी याबद्दल सूचना केल्या होत्या.नागरी स्थानिक संस्थांचे उत्पन्न वाढविण्याचा आणखी एक उपाय म्हणून जमिनीच्या किंमतीच्या संदर्भात बाजारभावावर आधारित ' नागरी जमीन कर ' बसविण्यात यावा. जमिनीच्या वापरातील बदलास परवानगी देण्यापूर्वी एक विकास अधिभार आकारण्यात यावा. मास्टर प्लॅनची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित संस्थांना या कराचे उत्पन्न देण्यात यावे. नागरी संस्थांना विजेच्या वापरावर कर बसविण्याचे अधिकार प्रदान करावेत.

### महाराष्ट्र राज्य नगरपालिका वित्त आयोग, १९७३

२.१६. नगरपालिका वित्त आयोग नेमण्याबद्दल वेळोवेळी विविध स्तरावर केलेली शिफारस महाराष्ट्र शासनाने स्वीकारली व त्यास अनुसरून महाराष्ट्र राज्याच्या नगरपालिका वित्त आयोगाची स्थापना फेब्रुवारी १९७३ मध्ये करण्यात आली. त्याचे अध्यक्ष श्री. बी. पी. पटेल होते. या आयोगाने नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे मूल्यांकन व मालमत्ता कर यांवर भाडे नियंत्रण कायद्यामुळे होणाऱ्या हानीकारक परिणामांबद्दल असमाधान व्यक्त केले. तसेच, झकेरिया समितीप्रमाणे, या आयोगाने देखील करमणूक कर, मोटार वाहन कर, शेतसारा व बिनशेतसारा यांमधून नागरी संस्थांना वाटा देण्याबाबत शिफारशी केल्या. जकात कराऐवजी ' मल्टीपॉईंट टर्नओव्हर टॅक्स ' आकारण्याची शिफारस या आयोगाने केलेली होती. सरतेशेवटी या आयोगाने असे सुचविले की, अनुदानाची संपूर्ण पद्धत ही प्रोत्साहनाशी संबंधित असावी आणि सर्वसाधारण उद्दिष्टांसाठीचे अनुदान हे केवळ लोकसंख्या या निकषावर आधारित असू नये.

२.१७. महाराष्ट्रात नगरपरिषदा आणि महानगरपालिका शहरे यांच्या प्रशासनासाठी स्वतंत्र असे अधिनियम ब्रिटीश राजवटीपासून अस्तित्वात असून त्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा फार मोठा कालखंड आहे. मुंबई आणि नागपूर महानगरपालिकांसाठी स्वतंत्र अधिनियम म्हणजे मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ तर नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अस्तित्वात आहेत, तर उर्वरित महानगरपालिकांसाठी " मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ " कार्यान्वित आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी नगरपालिकांच्या बाबतीत राज्याच्या मुंबई क्षेत्रात असलेले जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ आणि मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ तर राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेला मध्य प्रांत आणि वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ आणि राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रामध्ये अंमलात असलेला हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ हे नगरपरिषदांचे सर्व अधिनियम महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर निरसित झाले आणि त्याऐवजी राज्यातील सर्व नगरपरिषदांच्या प्रशासनासाठी " महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ " हा एकच अधिनियम अंमलात आला. आता ह्या अधिनियमाचे नाव " महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ " असे बदलण्यात आले आहे. वरील अंमलात असलेल्या सर्व अधिनियमांमध्ये राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा या स्थानिक नागरी संस्थांनी कोणकोणती कर्तव्ये व जबाबदाऱ्या (बंधनकारक व ऐच्छिक ) पार पाडाव्यात हे त्यांच्या संबंधित अधिनियमात विहित केले आहे. त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी लागणारे अर्थबळ उभे करण्याकरिता त्यांच्या क्षेत्रामध्ये कर आकारणी करून महसूल गोळा करण्याचे अधिकार संबंधित अधिनियमान्वये त्यांना दिलेले आहेत. यामध्ये मुख्यत्वेकरून मालमत्ता कर, वाहने व जनावरे यावरील कर, चित्रपट,



ए च ४०९४-२अ

नाट्यगृह, सर्कशी, आनंदबाजार व इतर प्रयोग व प्रदर्शने यांवरील कर, जकांत कर, शिक्षण कर, रस्ते कर, जाहिरातीवरील कर (वृत्तपत्रांतील जाहिरातीव्यतिरिक्त) अग्निशमन कर, पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिःसारण कर, मलनिस्सारण लाभ कर, दिवाबत्ती कर, विशेष स्वच्छता कर यांचा समावेश होतो. याशिवाय करेतर महसूल विशेषतः शुल्क, आकार, लायसन्स फी देखील आकारण्याचे अधिकार या संस्थांना दिलेले आहेत.

२.१८. वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या विविध समित्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या शिफारसींच्या अनुषंगाने केल्या गेलेल्या कारवाईमुळे स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासकीय दृष्ट्या आणि आर्थिक दृष्टया बळकट होण्यास बरीच मदत झालेली आहे.' अर्थात ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या दुरूस्त्या याच प्रगतीच्या दिशेकडे टाकलेले आणखी एक मोठे पाऊल आहे.

□ □

## प्रकरण ३

# महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची सद्य:स्थिती

३.१. महाराष्ट्र राज्यात २९ जिल्हा परिषदा असून त्यांच्या अंतर्गत २९७ पंचायत समित्या आहेत. वर्गवारीनुसार महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांची विभागणी खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | विषय | | "अ" वर्ग | "ब" वर्ग | "क" वर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | .. | ४ | ८ | १७ | २९ |
| २ | पंचायत समिती | .. | ८६ | ८४ | १२७ | २९७ |

वरील वर्गवारी सामूहिक विकास प्रशासन गट व लोकसंख्या या निकषांवर आधारित आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांची वरील वर्गवारी कर्मचारी आकृतीबंध ठरविण्यासाठी वापरण्यात येते.

### महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थेची रचना

३.२. महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थेची रचना अशी आहे की, शिखर संस्थांची (जिल्हा परिषद) मधल्या पातळीवरील संस्थेची (पंचायत समिती) व मधल्या पातळीवरील संस्थेची खालच्या पातळीवरील संस्थेशी (ग्रामपंचायत) सांगड घातली जाते. विकेंद्रित लोकशाहीचे नव्हे तर विकेंद्रित प्रशासनाचेही स्वरूप जिल्हा व त्या खालच्या पातळीवर आणण्याच्या उद्देशाने ही तिहेरी रचना तयार करण्यात आली आहे.

### जिल्हा परिषदेची घटना

३.३. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये प्रत्येक जिल्हा परिषद ही निगमनिकाय संस्था असून तिला अधिकार परंपरा आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेस मालमत्ता संपादन करण्याचा व ग्रहण करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेत जास्तीत जास्त ७५ व कमीत कमी ५० इतके सभासद असतात. ते जिल्ह्यातील निवडणूक विभागातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडण्यात येतात. साधारणपणे ३५ हजारपेक्षा अधिक नसेल इतक्या लोकसंख्येसाठी एक जिल्हा परिषद सदस्य असतो. जिल्ह्यातील पंचायत समित्यांचे सभापती हे जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सभासद असतात. तसेच जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे सभापती यांना जिल्हा परिषदेवर सहयोगी सभासद म्हणून नेमण्यात येते. तसेच जिल्ह्यात

असणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी भू-विकास बँक मर्यादितच्या संचालकांना जिल्हा परिषदेवर सहयोगी सदस्य म्हणून नेमण्यात येते. जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या लक्षात घेता अशा जाती व जमातींच्या प्रतिनिधित्वासाठी कोणत्याही निवडणूक विभागात शासनास एक किंवा अनेक जागा राखून ठेवता येतात. वरीलप्रमाणे असलेल्या राखीव जागांपैकी सुमारे ३० टक्के जागा स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतात. जिल्हा परिषद आपल्या निवडून अलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडते.

### जिल्हा परिषदांचे कर्तव्य, कार्य व अधिकार

३.४. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये अनुसूची १ मधील विषय जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेले आहे. यास " जिल्हा सूची " असे संबोधण्यात येते. या सूचीतील विषयासंबंधी कामे करण्यासाठी व विकास योजनेसाठी जिल्हा निधी तरतूद करणे व ती सुस्थितीत ठेवणे, विकास परियोजना चालू ठेवणे, पूर्ण करणे हे जिल्हा परिषदेचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. अधिनियमाच्या कलम १००(१) अन्वये राज्य शासनास जिल्हा यादीत नमूद केलेल्या विषयांच्या संबंधात पूर्ण झालेली, होत असलेली अशी सर्व कामे व विकास परियोजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करता येतात. राज्य शासनाकडून संबंधित विषयाच्या संदर्भात कामे सुस्थितीत ठेवण्यासाठी व परियोजना पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान देण्यात येते. संबंधित विषयाच्या अनुसूचीत बदल करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. मात्र जिल्हा सूचीतील नोंद गाळण्यासंबंधी अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय काढता येत नाही. राज्य शासनास अधिनियमाच्या कलम १२३ अन्वये त्यास योग्य वाटतील अशा कामांची किंवा विकास परियोजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेकडे सोपविता येते. त्यास आवश्यक असणारा निधी शासनातर्फे जिल्हा परिषदेस दिला जातो.

३.५. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१, कलम १०६ व कलम १०९ अन्वये जिल्हा परिषद व तिच्या अंतर्गत असलेल्या विषय समित्यांवर सोपविण्यात आलेली कार्ये व कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

### पंचायत समितीची घटना

३.६. प्रत्येक स्थानिक क्षेत्र ज्यास गट म्हणून संबोधिले जाते त्यास एक पंचायत समिती असते. या समितीत गटात अंतर्भूत असलेल्या मतदार विभागांतून निवडून आलेले सर्व जिल्हा परिषद सदस्य, गटात राहणारे स्वीकृत करून घेतलेले परिषद सदस्य, सहकारी संस्थेचे सभासद व थेट निवडणुकीद्वारे निवडून आलेले दोन सदस्य हे पंचायत समितीचे सभासद असतात. गटविकास अधिकारी हे पंचायत समितीचे पदसिद्ध सचिव असतात. १७,५०० पेक्षा अधिक नसेल एवढ्या लोकसंख्येसाठी एक पंचायत समिती सदस्य असतो. अनुसूचित जाती व जमातींसाठी तसेच स्त्रियांसाठी राखून ठेवण्याचे प्रमाण जिल्हा परिषदेतील राखीव

असलेल्या जागांप्रमाणे असते. पंचायत समितीच्या सदस्यांचा पदावधी व जिल्हा परिषद सदस्यांचा पदावधी हा सारखाच असतो.

**पंचायत समितीचे कर्तव्य, अधिकार व कार्य**

३.७. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम १०१ अन्वये दुसऱ्या सूचीमधील विषयावर पंचायत समितीस यथायोग्य तरतूद करणे ही पंचायत समितीची प्रमुख जबाबदारी असते. या सूचीत बदल करण्याचा अधिकार शासनास आहे. पंचायत समितीस तिच्या प्राधिकाराखाली असलेल्या क्षेत्रातील योजना व कामावर खर्च करता येतो. मात्र आयुक्ताच्या परवानगीने पंचायत समित्या क्षेत्राबाहेर सूचीतील विषयावर पंचायत समितीस खर्च करता येतो. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम कलम १०८ अन्वये समितीस जिल्हा परिषदेसाठी हाती घ्यावयाच्या कामाचा व विकास कामाचा एक आराखडा तयार करणे तसेच गटातील स्थानिक साधनसामुग्रीचा शक्यतोवर जास्तीत जास्त उपयोग करणे, गट अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामांचा व विकास कामांचा आराखडा तयार करणे तसेच गट अनुदानातून कामास व विकास परियोजनांना मंजुरी देणे व त्याची अंमलबजावणी करणे, त्यावर पर्यवेक्षण करणे हे पंचायत समितीचे प्रमुख कार्य आहे. जिल्हा परिषदेची कामे व विकास योजना अंमलात आणून सुस्थितीत ठेवणे हेसुद्धा पंचायत समितीकडे सोपविले आहे. पंचायत समितीस आपल्या कामकाजाचा अहवाल दर तीन महिन्यांनी जिल्हा परिषदेस पाठवावा लागतो.

**जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रशासकीय यंत्रणा**

३.८. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमांत विविध तरतुदींमध्ये समाविष्ट केल्याप्रमाणे पंचायत राज संस्थेसाठी असणाऱ्या शासकीय व्यवस्थेची दोन वेगळी वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांचा संवर्ग दुसरे वर्ग-३ व वर्ग-४ च्या निम्न पातळीवरील संवर्ग यापैकी पहिला संवर्ग हा शासकीय असून दुसरा संवर्ग हा जिल्हा पातळीवरील आहे.

३.९. सामान्यतः भारतीय प्रशासकीय सेवा संवर्गातील असलेला मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा व त्याखालील संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेचा प्रमुख अधिकारी असतो. त्याची नेमणूक शासन करते. अधिनियमाच्या कलम ९५ अन्वये कार्यकारी अधिकाऱ्यास अधिकार व कार्य सोपविण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सर्व कामावर तसेच विकास योजनांवर देखरेख व नियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांस त्याच्या अधिकाराचे प्रत्यायोजन जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास करता येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याव्यतिरिक्त जिल्हा परिषदेकडे इतर वरिष्ठ अधिकारी पुढे दर्शविल्याप्रमाणे असतात. उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(सामान्य प्रशासन), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम), कार्यकारी अभियंता (पाटबंधारे), शिक्षण अधिकारी (प्राथमिक), शिक्षण अधिकारी (माध्यमिक), कृषि अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, समाजकल्याण अधिकारी. वरील अधिकाऱ्यांना आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या् कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजुरी देता येते. हे अधिकारी संबंधित विषय समित्याचे पदसिद्ध सचिव असतात. त्यांना राज्य सेवेतून जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येते. साध्या जिल्हा परिषदांकडे ६१६ वर्ग-१ अधिकारी व ५,५८५ वर्ग-२ अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत.

३.१०. जिल्हा परिषद वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची दिनांक १ ऑगस्ट १९९६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी व लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या वर्गीकरणानुसार सुधारित आकृतीबंध मंजूर केला आहे. जिल्हा परिषदेकडे सध्या वर्ग-३ संवर्गात २९९,३६८ कर्मचारी व वर्ग-४ संवर्गात २५,५२३ कर्मचाऱ्यांची मंजूर पदे आहेत. नव्या आकृतीबंधामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये ५,१४५ पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत.

३.११. पंचायत समिती रतरावर प्रत्येक पंचायत समितीवर वर्ग-१ अथवा वर्ग-२ गटविकास अधिकारी असतो, तो पंचायत समितीचा सचिव असून पंचायत समिती स्तरावरील सर्व कामांचे व विकास परियोजनाचे नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे काम करत असतो. गट विकास अधिकारी यास राज्य शासनाकडून नामनिर्देशनाने अथवा जिल्हा परिषदांच्या वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यामधून पदोन्नती देऊन नेमण्यात येते. पंचायत समिती स्तरावर कर्मचाऱ्यांचे दोन वेगवेगळे वर्ग आहेत (१) कार्यालय कर्मचारीवर्ग, (२) विस्तार कर्मचारीवर्ग. कार्यालय कर्मचारीवर्गात लिपिक वर्गातील व लेखा विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. विस्तार वर्गात विस्तार अधिकारी (कृषी, शिक्षण, बांधकाम, पंचायत, समाजकल्याण, आरोग्य) यांचा समावेश असतो. हे विस्तार अधिकारी त्यांच्या संबंधित विषयाच्या संबंधात असणाऱ्या विषयासंबंधी जिल्हा परिषद, राज्यस्तर, केंद्र सरकारच्या योजना राबविण्यासाठी लाभार्थी शोधून त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचे काम करत असतात. याव्यतिरिक्त ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षक, आरोग्य कर्मचारी यांचा मोठा संवर्ग कार्यरत असतो. ग्रामीण जनतेपर्यन्त शासनाच्या योजना पोहचविण्याचे व राबविण्याचे मोठे कार्य या वर्गाद्वारे केले जाते.

**पंचायत राज संस्थेबाबतची घटना दुरुस्तीनंतरची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या**

३.१२. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेच्या शिखर स्थानी जिल्हा परिषद ही संस्था आहे व तिच्याकडे अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले विषय सोपविण्यात आले आहेत. या विषयांतील

बाबींवर वाजवी तरतूद करणे आणि या विषयाच्या संबंधित असलेली कामे किंवा विकास परियोजना अंमलात किंवा ती सुस्थितीत ठेवणे हे जिल्हा परिषदांचे कर्तव्य आहे. गेल्या काही वर्षांत शासनाने जिल्हा सूचीतील काही विषय जिल्हा परिषदेच्या यादीत प्रथम होते ते नंतर वगळण्यात आले. जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम कलम १०० (४) नुसार जिल्हा परिषदेवर स्थानिक साधनांचा अधिकतम वापर करून जिल्ह्याचा नियोजित विकास घडवून आणणे आणि त्यासाठी वार्षिक व दीर्घकालीन योजना तयार करणे याची जबाबदारी सोपवलेली आहे. परंतु १९७२ पासून प्रत्येक जिल्ह्याची योजना तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन आणि विकास मंडळे अशी वेगळी संस्थाच स्थापन केली आहे. या संस्थेवर जिल्हा परिषदेच्या प्राधिकाऱ्यांना सभासद म्हणून जरी घेण्यात येत असले तरी नियोजित विकासाबाबतचे जिल्हा परिषदेचे महत्त्व बरेच कमी झाले आहे. याशिवाय बेरोजगारी व दारिद्र्य निवारण्यासाठी अनेक कार्यक्रम भारत सरकारच्या वित्तीय सहाय्याने राज्यात राबविले जातात. उदा. जवाहर ग्रामीण रोजगार योजना (JRY), एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP), हे कार्यक्रम ग्रामीण विकास, समाजकल्याण यांच्याशी संबंधित असले तरी जिल्हा परिषदेच्या कक्षेत येत नाहीत. त्यासाठी शासनाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) ही एक नवीन संस्था स्थापन करून त्याच्यावर संबंधित जबाबदारी टाकली आहे.

३.१३. ७३ व्या घटना दुरूस्तीत संविधानाच्या अनुबंध २४३ (ग) प्रमाणे अनुसूची ११ मधील विषयावर आर्थिक विकास व सामाजिक न्याय देण्यासाठी योजना आखून त्या राबविण्यासाठी राज्य विधी मंडळ पंचायतींना अधिकार प्रदान करेल अशी तरतूद करण्यात आली आहे. ११ व्या अनुसूचीत एकूण २९ विषय असून त्यातील खालील विषय सध्या राज्य शासनाने अद्यापही पंचायत राज संस्थांकडे सोपविले नाहीत (१) जमीन सुधारणा (land development) व जमीन एकत्रिकरण (land consolidation) (२) मत्स्य उत्पादन (fisheries), (३) गौण वन उत्पादन (minor forest product), (४) लघु उद्योग (अन्न विषयेचे प्रक्रियेचे उद्योग धरून) खादी ग्रामोद्योग व कुटीरोद्योग, (५) ग्रामीण विद्युतीकरण (विजेचे वितरण धरून), (६) तांत्रिक प्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण, (७) प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षण, (८) सार्वजनिक वितरण व्यवस्था, (९) भू-संधारण.

३.१४. **दारिद्र्य निर्मूलन हा विषय पंचायत राज संस्थांकडे आता सोपविण्यात आलेला असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे काम पंचायत राज संस्थेकडे सोपवावे अशी आयोगाची शिफारस आहे.**

### जिल्हा परिषद उत्पन्नाची साधने व त्यांचे विश्लेषण, जिल्हा परिषदांचे वित्तविषयक अधिकार

३.१५. जिल्हा परिषदांचा त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी दोन प्रकारची उत्पन्नाची साधने उपलब्ध असतात (१) जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न, (२) शासकीय अनुदाने. जिल्हा परिषदांच्या स्वतःची उत्पन्नाची साधने तक्ता क्रमांक ३.१ मध्ये दर्शविली आहेत.

तक्ता

## जिल्हा परिषदांची स्वतःच्या

| अनु-क्रमांक (१) | | शासनाने व जिल्हा परिषदेने आकारलेला व गोळा केलेला कर (२) |
|---|---|---|
| | अ. शासनाने आकारलेली व गोळा केलेली कराचे नाव | दर व आकारणी |
| १ | जमीन महसुलावरील मूळ उपकर (कलम १४४, १५१,१५२) | जमीन महसूलाच्या १ रुपयामागे २०० पैसे |
| २ | जमीन महसुलावरील वाढीव उपकर. | जमीन महसुलाच्या १ रुपयामागे ५०० पैसे (यापैकी ६० टक्के उत्पन्न पंचायत समितीस व ४० टक्के उत्पन्न जिल्हा परिषदेस वाटले जाते.) |
| ३ | सिंचन पाणीपट्टी वरील उपकर कलम (१४६, १५१-अ, १५२-अ) | पाणीपट्टीवरील प्रत्येक रुपयाला २० पैसे |
| ४ | मुद्रांक शुल्क अनुदान (कलम १५८) | शासनास देय असलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये १ टक्का अधिक मुद्रांक शुल्क यातील ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना दिली जाते. |
| | ब. जिल्हा परिषदेने आकारणी केलेली व गोळा केलेली (कलम १५७). | |
| (१) | सार्वजनिक पाण्याचे नळ किंवा नळखांब जनतेच्या उपयोगासाठी आणली असेल तर सर्वसाधारण पाणीपट्टी. | कलम १५९ मधील तरतुदींचा अवलंब करून हे कर आकारता येतात. |
| (२) | यात्रेकरूवरील कर | |
| (३) | जमिनीवरील कर व इमारतीवरील विशेष कर. | |

क्रमांक ३.१

## उत्पन्नाची साधने

| करेतर बाबी जिल्हा परिषदेनी आकारलेली व गोळा केलेली (३) | | अभिकरण शुल्क व अनुदाने (४) | |
|---|---|---|---|
| नाव | दर व आकारणी | नाव | दर व आकारणी |
| (अ) सार्वजनिक बाजारात जमा केलेल्या–<br>(१) दलाल व अडिते यांच्या वरील लायसन फी.<br>(२) बाजारात विक्रीसाठी माल ठेवण्याच्या हक्कासाठी किंवा तेथील कोणतीही इमारत किंवा संरचना यांच्या वापरासाठी बाजार फी. | कलम १५९ मधील पद्धतीचा अवलंबकरून या फी आकारता येतात. | अभिकेरण शुल्क | जिल्हा परिषदेकडे कलम १२३ नुसार सुपूर्द केलेल्या योजनावर मिळते. आस्थापना खर्च वगळून केलेल्या खर्चा वर ३ टक्के यापैकी २ टक्के शुल्क खर्च होणाऱ्या वर्षी तर उर्वरित १ टक्के खर्चाचे लेखापरिक्षण झाल्या नंतर. |
| (३) बाजारात विकलेल्या जनावरांची नोंदणी करण्यासाठी फी.<br>(ब) गुंतवणुकीवरील व्याज<br>(क) मालमत्तेचे भाडे<br>(ड) इतर उत्पन्न | | अल्पबचत प्रोत्साहन अनुदान. | वित्तीय वर्षासाठी शासनाने निश्चित केलेल्या इष्टांकापेक्षा अधिक गुंतवणूक ज्या जिल्ह्यात होते त्यांना २५ टक्के पर्यंत कमाल मर्यादा ४० लाख एवढे अनुदान प्राप्त होते. त्यापैकी १५ टक्के हिस्सा जिल्हा परिषदेस मिळतो. अनुदानाचा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी योजना कार्यान्वित करण्यासाठी विनियोग केला जातो. |
| | | जंगल महसूल अनुदान कलम १८१-अ. | जिल्हा परिषदेच्या सीमेत वसूल केलेल्या एकूण वन महसुलाच्या |

| अनु-क्रमांक (१) | शासनाने व जिल्हा परिषदेने आकारलेला व गोळा केलेला कर (२) |
|---|---|
| | ब—चालू |
| | करांचे नाव | दर व आकारणी |

| | करांचे नाव | दर व आकारणी |
|---|---|---|
| (४) | परिषदेमध्ये विहित असलेले कोणतेही पाटबंधाऱ्याच्या कामापासून जमीन किंवा इमारतींना पुरविण्यात येणाऱ्या संबंधातील पाणीपट्टी. | |
| (५) | कलम १०० व १२३ नुसार पाटबंधाऱ्यांच्या कामापासून व विकास परियोजनापासून लाभ मिळणाऱ्या जमिनीवरील कर. | |

(आकडे लाखांत)

| करेतर बाबी जिल्हा परिषदेनी आकारलेली व गोळा केलेली (३) | | अभिकरण शुल्क व अनुदाने (४) | |
|---|---|---|---|
| नाव | दर व अकारणी | नाव | दर |
| | | | ७ टक्के अनुदान याचा विनियोग जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील वन क्षेत्रामध्ये ठराविक बाबीवर केला जातो. |
| | | स्थानिक उपकर अनुरूप अनुदान कलम १८५. | जिल्ह्यात किंवा गटात किमानदरापेक्षा अधिक दराने जमीन महसुलावर उपकर आकारला असेल तर जिल्हा परिषदेस राज्य शासन विहित करण्यात येणाऱ्या पद्धतीने हिशेब करून काढलेल्या रकमेएवढे अनुरुप अनुदान देते. ५०० पैसे उपकरावर एकूण ८०० पैसे या दराने हे अनुदान मिळते. हे अनुदान जिल्हा परिषद व पंचायत समितीना ४०: ६० प्रमाणात मिळते. |
| | | मुंबई वाहन कर अधिनियमाच्या द्वारे मिळणारे भरपाई अनुदान. | मुंबई मोटार वाहनकर अधिनियम १९३५ च्या कलम ९-क आणि मुंबई मोटार वाहनावर कर अधिनियम १९५८ च्या कलम ११ अन्वये जिल्हा परिषदांना भरपाई रकमा अनुदानाच्या स्वरूपात दिल्या जातात. |

**शासकीय अनुदाने**

३.१६. आतापर्यन्त विशद केलेल्या उत्पन्नाच्या व्यतिरिक्त जिल्हा परिषदांना राज्य शासन अनुदान देत असते या अनुदानाचे प्रकार खालील प्रकारे आहेत :—

**सप्रयोजन अनुदान (कलम १८२)**

३.१७. जिल्हा परिषदेकडून सोपविण्यात आलेल्या कार्यांच्या कक्षेतील बांधकामे, विकासाची कामे जिल्हा परिषदेकडे त्या अस्तित्वात आल्यावर हस्तांतरित करण्यात आल्या त्यावर प्रतिवर्षी खर्च करावा लागतो. जिल्हा परिषद अस्तित्वात आल्यावर देखील जसजशा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या तसतशी बांधकामे तयार झाली. विकासाची कामे पूर्ण झाली. या कामातून निर्माण झालेली संपत्ती, सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी खर्च करावा लागतो. हा सर्व खर्च करता यावा यासाठी राज्य शासन जिल्हा परिषदांना संपूर्ण खर्च भागविण्यासाठी अनुदान देते. यास " सप्रयोजन अनुदान " असे संबोधतात. योजना जसजशा पूर्ण होतात तसतसा या खर्चाचा आकार वाढत जातो.

**आस्थापना अनुदान (कलम १८३)**

३.१८. जिल्हा परिषदा अस्तित्त्वात आल्या तेव्हा त्यांच्यावर सोपविलेल्या कामाशी संबंधित प्रशासकीय सेवक जिल्हा परिषदेकडे वर्ग करावे लागले.यथावकाश कामाची व्याप्ती वाढत गेल्याने परिषदांना राज्य शासनाचे संबंधित आणखी सेवक नेमावे लागले. या सर्व सेवकांवरील खर्च भागविण्यासाठी राज्य शासन जिल्हा परिषदांना अनुदान देते ते सर्व आस्थापना अनुदान होय. पूर्वी अशा संबंधित खर्चाच्या ७५ टक्के रक्कमच आस्थापना अनुदान म्हणून देण्यात येत असे. पुढे बोंगिरवार समितीच्या शिफारशीवरून हे अनुदानाचे प्रमाण १०० टक्के करण्यात आले.

**योजनांतर्गत अनुदान (कलम १८७)**

३.१९. जिल्हा यादीत नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही विषयाच्या संबंधातील जी कोणतीही कामे आणि विकास परियोजना राज्याच्या विकास योजनेत अंतर्भूत करण्यात आल्या असतील तर त्या कामासाठी आणि विकास परियोजनासाठी राज्य शासन निर्धारीत करील त्याप्रमाणे आणि त्या मर्यादेत प्रत्येक जिल्हा परिषदेस योजनांतर्गत अनुदान देण्यात येते.

**जिल्हा परिषदांना देण्यात येणारे कर्ज व जिल्हा परिषदांचे कर्ज उभारणीचे अधिकार**

३.२०. कर महसूल आणि अनुदाने या व्यतिरिक्त जिल्हा परिषदांना कर्ज स्वरूपात वित्तीय सहाय्य देखील उपलब्ध असते. जिल्हा परिषदेकडे स्वतःच्या प्रशासकीय इमारती बांधण्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध नसल्याने त्यासाठी शासनाकडून कर्जरुपी वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी तरतूद पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत केली जाते. मात्र ही कर्जे पात्र होण्यासाठी जिल्हा परिषदेकडे स्वतःची आवश्यक तेवढी जमीन असली पाहिजे. कर्जाची सव्याज परतफेड जिल्हा परिषदेस स्वतःच्या उत्पन्नामधून करावी लागते.

३.२१. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये जिल्हा परिषदेस आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी जिल्हा निधीच्या जमा खात्यातील पैसा ज्या कोणत्याही बँकेत किंवा सहकारी संस्थेत ठेवण्यात आला असेल तर त्या बँकेकडून किंवा संस्थेकडून कर्जाऊ रक्कम घेता येते. जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वतःच्या प्रशासकीय इमारती बांधण्यासाठी अशा रितीने कर्जाऊ रक्कम उभारल्याचे निदर्शनास आले आहे.

**जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचे विश्लेषण**

३.२२. जिल्हा परिषदांचे उत्पन्न दोन भागात एक स्वतःचे उत्पन्न व दुसरे शासकीय अनुदाने यात विभागण्यात येते. हे ३.१५ या परिच्छेदात आपण बघितले आहे. जिल्हा परिषदांच्या संपूर्ण उत्पन्नाचा तक्ता क्र. ३.३ बघितला असता जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न नगण्यच दिसते. एकंदर उत्पन्नाशी त्याचे प्रमाण ३ ते ५ टक्के एवढेच आहे. स्वतःच्या उत्पन्नातही जमीन महसुलावरील आकारण्यात येणारे उपकर अनुदान व त्यावरील प्रोत्साहन अनुदानाचे प्रमाण सर्वात

मोठे म्हणजे (३४.३७ टक्के) आहे. ही अनुदाने शासनाकडून वसूल होऊन जिल्हा परिषदांना मिळत असल्याने जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे शासनावरील वित्तीय परावलंबन प्रकर्षाने जाणवते.

### जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न

३.२३. जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न तक्ता क्रमांक ३.२ मध्ये दर्शविले आहे. जिल्हा परिषदांचे संपूर्ण उत्पन्नाचे आकडे तपासले असता जिल्हा परिषदांच्या ५ वर्षांच्या उत्पन्नात ४.६० टक्के वार्षिक वाढ झाली व जिल्हा परिषदांच्या सन १९९०-९१ च्या तुलनेत जरी वाढ दिसत असली तरी प्रत्यक्षात १९९१-९२ व १९९२-९३ मध्ये जिल्हा परिषदांच्या उत्पन्नात घट झालेली दिसते. जिल्हा परिषदांच्या उत्पन्नात सन १९९३-९४ साली जी वाढ झालेली दिसते त्याचे प्रमुख कारण म्हणजे मूळ उपकर, अभिकरण शुल्क व वन महसूल, सिंचन पाणीपट्टी उपकर अनुदानात झालेली वाढ हे आहे.

तक्ता क्रमांक ३.२

## जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाचा तक्ता

(आकडे लाखात)

| वर्ष | | जमीन महसुलावरील उपकर | वाढीव उपकर | स्थानिक उपकर अनुरुप अनुदान | सिंचन पट्टी वरील उपकर | अभिकरण कमिशन | वन महसूल अनुदान | मुद्रांक शुल्क अनुदान | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १९९०–९१ | .. | २००.१४ | ६९५.८८ | ८६६.२० | .१३२.६६ | ४३३.१७ | ७०८.११ | ३७४.८१ | १,४५३.७७ | ४,८६४.७४ |
| टक्के | .. | ४.११ | १४.३० | १७.८० | २.७२ | ८.९० | १४.५६ | ७.७० | २९.८८ | १००.०० |
| १९९१-९२ | .. | १६१.५८ | ६५६.७९ | ९११.०४ | १५६.४२ | ३७८.९१ | ४०२.८८ | ४५०.७१ | १,४२८.१७ | ४,५४६.५० |
| टक्के | .. | ३.५५ | १४.४५ | २०.०४ | ३.४४ | ८.३३ | ८.८६ | ९.९१ | ३१.४१ | १००.०० |
| १९९२-९३ | .. | ११४.७८ | ५७२.९९ | ६२०.४९ | २१८.२६ | ३१६.९० | ६४८.१० | ४२७.८१ | १,२७४.१२ | ४,१९३.४५ |
| टक्के | .. | २.७४ | १३.६६ | १४.८० | ५.२० | ७.५६ | १५.४६ | १०.२० | ३०.३८ | १००.० |
| १९९३-९४ | .. | १७५.८० | ६८८.६७ | ९३०.२५ | २३५.५६ | ४०६.३० | ७४१.८७ | ५८९.७५ | १,५०८.८० | ५,२७७.०० |
| टक्के | .. | ३.३३ | १३.०५ | १७.६३ | ४.४६ | ७.७० | १४.०६ | ११.१८ | २७.६१ | १००.०० |
| १९९४-९५ | .. | ३३८.९७ | ५९७.०७ | ९००.१४ | ३०२.२६ | ३७८.६२ | १,०१६.७२ | ६२८.१५ | १,४९२.१० | ५,६५४.०३ |
| टक्के | .. | ६.०० | १०.५६ | १५.९२ | ५.३५ | ६.७० | १७.९८ | ११.११ | २६.३९ | १००.० |
| एकूण | .. | ९९१.२७ | ३,२११.४० | ४,२२८.१२ | १,०४४.१८ | १,९१३.९० | ३,५१७.६८ | २,४७१.२३ | ७,१५७.९६ | २४,५३५.७२ |
| सरासरी याबवार उत्पन्न | .. | १९८.२५ | ६४२.२८ | ८४५.६२ | २०८.८४ | ३८२.७८ | ७०३.५४ | ४९४.२५ | १,४३१.५९ | ४,९०७.१४ |

(आकडे लाखात)

| वर्ष (१) | जमीन महसुलावरील उपकर (२) | वाढीव उपकर (३) | स्थानिक उपकर अनुरुप अनुदान (४) | सिंचन पट्टी वरील उपकर (५) | अभिकरण कमिशन (६) | वन महसूल अनुदान (७) | मुद्रांक शुल्क अनुदान (८) | इतर (९) | एकूण (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण उत्पन्नाशी टक्केवारी .. | ४.०४ | १३.०९ | १७.२३ | ४.२६ | ७.८० | १४.३४ | १०.०७ | २९.१७ | १००.० |
| वार्षिक वाढीचा दर .. (टक्केवारी) | १२.०५ | २.५६ | ०.९८ | २२.७८ | –०.६५ | १४.२८ | १३.९० | १.०८ | ४.६० |

**स्रोत-जिल्हा परिषद** (आकृती क्र. १)

३.२४. जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाची खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये आढळतात :—

१. जिल्हा परिषदांचे सन १९९२-९३ या वर्षाचे उत्पन्न सर्वात खालच्या पातळीवर असल्याचे दिसते. शासनाने या वर्षी जिल्हा परिषदांना कमी अनुदाने दिल्याने (वन महसूल व मुद्रांक शुल्क व्यतिरिक्त) त्यांचे अनुदान कमी झाल्याचे आढळते.

२. जमीन महसुलावरील उपकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठे चढउतार दिसत आहेत. मागणीप्रमाणे वसुली न होणे व प्रत्यक्ष वसुलीप्रमाणे अनुदान न मिळणे ही चढउताराची कारणे आहेत.

३. अभिकरण शुल्कापासून मिळणाऱ्या उत्पन्नात फारसा बदल झाल्याचे आढळत नाही.

४. वन महसूल अनुदान व मुद्रांक शुल्क अनुदानापासून जिल्हा परिषदांना चांगले उत्पन्न मिळत असल्याचे आढळते.

५. जिल्हा परिषदांच्या इतर बाबींमध्ये गेल्या ५ वर्षात फारशी वाढ झाल्याचे दिसत नाही.


६. थोड्या फार फरकाने प्रत्येक जिल्हा परिषदेत या प्रकारची वैशिष्ट्ये आढळून आली.

**शासनाकडून प्राप्त होत असलेल्या अनुदानाचे विश्लेषण**

३.२५. शासनाकडून जिल्हा परिषदांना मागील पाच वर्षांच्या कालावधीत मिळालेल्या अनुदानाचे व त्याचे जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नाशी असलेले प्रमाण तक्ता क्रमांक ३.३ मध्ये दर्शविले आहे.

आकृति क्र. १


जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाचा तक्ता (१९९४-९५)



## आकृति क्र. २

**जिल्हा परिषदांचे उत्पन्न (योजनेतर अनुदानासहित)**

(आकडे लाखात)



## तक्ता क्र. ३.३
## जिल्हा परिषदांचे उत्पन्न (योजनेतर शासन अनुदानासहित)

(आकडे लाखांत)

| वर्ष | जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न | शासकीय अनुदान | इतर उत्पन्न | एकंदर उत्पन्न | दरडोई उत्पन्न | एकंदर उत्पन्नाशी जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नाचे प्रमाण | एकंदर उत्पन्नाशी शासन अनुदानाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १९९०-९१ | ४८६४.७४ | ९२५३४.१४ | १०.२६ | ९७४०९.१४ | २०१ | ४.९९ | ९५.०१ |
| १९९१-९२ | ४५४६.५० | ११३३२८.५८ | ७.२० | ११७८८२.२८ | २४४ | ३.८७ | ९६.१३ |
| १९९२-९३ | ४१९३.४५ | १३०७१०.२४ | २.१३ | १३४९०५.८२ | २७९ | ३.११ | ९६.८९ |
| १९९३-९४ | ५२७७.०० | १४५३६५.७९ | १.६७ | १५०६४४.४६ | ३११ | ३.५० | ९६.५० |
| १९९४-९५ | ५६५४.०३ | १६३९९६.९० | १८.९५ | १६९६६९.८८ | ३५१ | ३.३३ | ९६.६७ |
| वार्षिक वाढीचा दर (टक्केवारी). | ४.६० | १४.९५ | . . . | १४.५१ | . . | . . | . . |

**स्रोत—जिल्हा परिषद** (आकृती क्र. २)

३.२६. शासनाकडून प्राप्त होत असलेल्या अनुदानाचे सरासरी प्रमाण जिल्हा परिषदेच्या संपूर्ण उत्पन्नाशी सुमारे ९६ टक्के असल्याचे वरील तक्त्यावरून निदर्शनास येते. शासन अनुदाने जिल्हा परिषदांस मोठ्या प्रमाणात दरवर्षी वर्ग होत असल्याने ते प्रमाण दरवर्षी वाढत आहे.

३.२७. सन १९९०-९१ साली हे प्रमाण ९५.०१ टक्के होते तर ते १९९४-९५ साली वाढत जाऊन ९६.६७ टक्के झाले. त्यामुळे जिल्हा परिषदा त्यांचेवर सोपविण्यात आलेल्या कार्यासाठी शासनावरच अवलंबून असल्याचे स्पष्ट दिसते. या अनुदानाचे वर्ग होण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत असल्याचे स्पष्ट दिसते. उदा. १९९०-९१ साली रु. ९२५.३४ लाखांची अनुदाने जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यात आली तर त्यात १४.९५ टक्के वार्षिक वाढ होऊन ती १९९४-९५ साली रु. १,६३९.९६ लाखांची झाली. या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे जिल्हा परिषद आस्थापनेच्या खर्चात सतत होत असणारी वाढ होय. ग्रामीण पातळीवर काम करीत असलेला बहुतांशी कर्मचारीवर्ग जिल्हा परिषदांच्या नियंत्रणाखाली असल्याने अशा तऱ्हेने वाढ अपेक्षित आहे.

३.२८. जिल्हा परिषदेच्या इतर उत्पन्नात शासकीय योजनांपासून जिल्हा परिषदेकडे जमा झालेले उत्पन्न दाखविण्यात आले आहे जिल्हा परिषदांना हे उत्पन्न शासनाकडे वर्ग करणे आवश्यक असते.

### जिल्हा परिषदेच्या खर्चाचे विश्लेषण

३.२९. जिल्हा परिषदांना त्यांच्याकडे सोपविलेल्या कार्याच्या कक्षेतील बांधकाम व विकास योजना हस्तांतरित करण्यात येतात. त्यावर जिल्हा परिषदांनी प्रतिवर्षी खर्च करावयाचा असतो. बांधकाम सुस्थितीत ठेवण्यासाठी व योजना राबविण्यासाठी शासन जिल्हा परिषदांना संपूर्ण खर्चासाठी सप्रयोजन अनुदान देते. तसेच जिल्हा परिषदेतील कर्मचारी वर्गावरील संपूर्ण खर्च भागविण्यासाठी शासन आस्थापना अनुदान जिल्हा परिषदांना देते. वित्त आयोगाने जिल्हा परिषदांकडून शासन अनुदानातून खर्चविषयक जी माहिती गोळा केली ती तक्ता क्र. ३.४ मध्ये दाखविली आहे. सन



एच ४०९४-३

तक्ता

## जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नाव्यतिरिक्त

| वर्ष | सामान्य प्रशासन | ग्रामपंचायत प्रशासन | आरोग्य खाते | शिक्षण खाते | कृषिखाते | पशुसंवर्धन |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १९९०-९१ | ५७३३.७३ | २९३०.८६ | ६१५१.७५ | ६३१८२.६३ | १९२३.५९ | १५९६.३४ |
| (टक्के) | ६.०३ | ३.०८ | ६.४७ | ६६.४३ | २.०२ | १.६८ |
| १९९१-९२ | ६२०५.१३ | ३१७६.९१ | ७०००.७९ | ७०४४०.३७ | २०२७.७९ | १७९३.९६ |
| (टक्के) | ५.८५ | २.९९ | ६.६० | ६६.३८ | १.९१ | १.६९ |
| १९९२-९३ | ७२१५.६५ | ३५३४.२६ | ७८४२.८३ | ८४१९५.०६ | २३६७.५४ | १९१७.९९ |
| (टक्के) | ५.६९ | २.७९ | ६.१९ | ६६.४२ | १.८७ | १.५१ |
| १९९३-९४ | ८०४९.६५ | ३९६१.६७ | ८६९४.८६ | ९१५८४.०० | २६२९.७४ | २१३७.१५ |
| (टक्के) | ५.८५ | २.८८ | ६.३२ | ६६.५६ | १.९१ | १.५५ |
| १९९४-९५ | ८९०६.६५ | ४११०.६३ | १०२१६.४९ | १०१८१०.९६ | २८३१.६४ | २२२९.३७ |
| (टक्के) | ५.७४ | २.६५ | ६.५८ | ६५.६१ | १.८२ | १.४४ |
| एकूण | ३६११०.८१ | १७७१४.३३ | ३९९०६.७२ | ४११२१३.०२ | ११७८०.३० | ९६७४.८१ |
| सरासरी | ७२२२.१६ | ३५४२.८७ | ७९८१.३४ | ८२२४२.६० | २३५६.०६ | १९३४.९६ |
| (टक्के) | ५.८२ | २.८५ | ६.४३ | ६६.२४ | १.९० | १.५६ |
| वार्षिक वाढीचा दर | १२.०९ | ९.३९ | १३.१० | १२.९४ | १०.८९ | ८.८० |

**टीप**—अर्थ विभागाचा खर्च सामान्य प्रशासन विभागात दाखविण्यात आला आहे.
**स्त्रोत-जिल्हा परिषद**

क्रमांक ३.४

# शासन अनुदानातून केलेला खर्च

(आकडे लाखांत)

| बांधकाम विभाग | पाणीपुरवठा खाते | लघु पाटबंधारे | समाजकल्याण | महिला व बालकल्याण | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १०२१३.६९ | ५२.९६ | १९३२.३६ | १३८७.९६ | ० | ९५१०५.८७ |
| १०.७४ | ०.०६ | ३.०३ | १.४६ | ०.०० | १००.०० |
| ११४९५.३५ | ११६.२७ | २३०८.३३ | १५५०.६२ | ० | १०६११५.५२ |
| १०.८३ | ०.११ | २.१८ | १.४६ | ०.०० | १००.०० |
| १२६८७.०९ | ३८३.७२ | ३६८१.९४ | २४४५.८२ | ४८२.६९ | १२६७५४.५९ |
| १०.०१ | ०.३० | ३.९० | १.९३ | ०.३८ | १००.०० |
| १४३४२.८२ | ३७१.७७ | २७५१.५४ | २५१२.८४ | ५५०.६८ | १३७५८६.७२ |
| १०.४२ | ०.२७ | २.०० | १.८३ | ०.४० | १००.०० |
| १७७११.०६ | ४५४.८१ | ३२६१.३७ | २८४०.५० | ८११.६४ | १५५१८५.१२ |
| ११.४१ | ०.२९ | २.१० | १.८३ | ०.५२ | १००.०० |
| ६६४५०.०१ | १३७९.५३ | १३९३५.५४ | १०७३७.७४ | १८४५.०१ | ६२०७४७.८२ |
| १३२९०.०० | २७५.९१ | २७८७.११ | २१४७.५५ | ३६९.०० | १२४१४९.५६ |
| १०.७० | ०.२२ | २.२४ | १.७३ | ०.३० | १००.०० |
| १४.१४ | ७२.६९ | १३.०० | २१.११ | २९.६७ | १३.१९ |

(आकृती क्र. ३)



पुणे ४०९४-३अ

१९९०-९१ साली जिल्हा परिषदांचा शासन अनुदानातून खर्च ९५१०६ लाख रुपये होता तर तो वाढुन सन १९९४-९५ साली १५५२०० लाख रुपये झाला. खर्चाचा वाढीचा वार्षिक दर १३.१९ टक्के होता. जिल्हा परिषदांकडे प्रामुख्याने ११ खाती असतात. ती पुढीलप्रमाणे (१) सामान्य प्रशासन विभाग, (२) ग्रामपंचायत विभाग, (३) आरोग्य विभाग, (४) शिक्षण विभाग, (५) कृषी विभाग, (६) पशुसंवर्धन विभाग (७) बांधकाम विभाग, (८) पाणीपुरवठा विभाग, (९) लघुपाटबंधारे विभाग, (१०) समाजकल्याण विभाग, (११) महिला व बालकल्याण विभाग.

३.३०. या खर्चाची खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये आढळतात :—

(१) जिल्हा परिषदांचे शासकीय अनुदानातून मुख्यत्वे आस्थापनावरील खर्चाचे प्रमाण मोठे आहे. वरील खात्यांपैकी सामान्य प्रशासन व ग्रामपंचायत विभागांचा खर्च हा जवळपास आस्थापनेवरच होतो. या खात्यावरील खर्चात वाढ ही वेळोवेळी महागाई भत्त्यांत व इतर भत्त्यात झालेल्या वाढीमुळे असावी.

(२) जिल्हा परिषदेत सर्वांत जास्त खर्च प्राथमिक शिक्षणावर होत असल्याचे दिसते (एकूण खर्चाच्या ६६.२४ टक्के) सन १९९०-९१ च्या तुलनेत या खात्याचे खर्चात १२.९४ टक्के वार्षिक वाढ झाल्याचे दिसते.

(३) जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या खर्चात गेल्या ५ वर्षांत १४.१४ टक्के वार्षिक वाढ झाल्याचे दिसते. जिल्हा परिषदेच्या एकूण खर्चातील वाढीपेक्षा ही वाढ बरीच जास्त आहे.

(४) पाणीपुरवठा विभागाचे प्रमाण एकूण खर्चाशी अत्यल्प असले तरी या खात्याच्या खर्चात गत ५ वर्षांत ७२.६९ टक्के वार्षिक वाढ झाल्याचे दिसते.

(५) समाजकल्याण खात्याच्या खर्चात गेल्या ५ वर्षांत २१.११ टक्के वार्षिक वाढ झाल्याचे आढळते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहावरील अनुदानात वाढ हे प्रामुख्याने खर्चावरील वाढीचे कारण असावे.

(६) महिला व बालकल्याण विभागावरील खर्च प्रामुख्याने योजनेअंतर्गत अनुदानातून करण्यात घेत असल्याने या खात्याचा योजनेतर अनुदानातील खर्च अत्यल्प आहे असे दिसते.

(७) आस्थापना खर्चामुळे होणारी वाढ लक्षात घेऊनही बांधकाम, पाणीपुरवठा लघु पाटबंधारे, समाजकल्याण व महिला व बालकल्याण या खात्यांच्या खर्चाचा वार्षिक वाढीचा दर एकूण खर्चाच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे ही बाब लक्षणीय आहे.

**जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून केलेला खर्च**

३.३१. जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या बाबींबाबत मागे तक्ता क्र. ३.२ मध्ये उल्लेख केला आहे. या उत्पन्नामधून जिल्हा परिषदा त्यांचे गरजेनुसार खर्च करतात. मात्र त्यांचे उत्पन्नाचा कोणता हिस्सा कोणत्या बाबींवर खर्च करावा याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार त्यांचे उत्पन्नाच्या काही बाबींचा २० टक्के हिस्सा मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी, २० टक्के हिस्सा पाणीपुरवठा योजनांसाठी व ५ ते १० टक्के उत्पन्न महिला व बालकल्याणासाठी राखून ठेवण्यात येतो. उर्वरित खर्चातून जिल्हा परिषदांनी त्यांचे योजनांचा व प्रशासनाचा खर्च करावा असे अपेक्षित आहे (तक्ता क्र. ३.५).

तक्ता क्र. ३.५


**जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून केलेला खर्च**

(आकडे लाखांत)

| वर्ष (१) | पदाधिकारी व प्रशासनावर होणारा खर्च (२) | समाजकल्याण खात्यावरील खर्च (३) | पाणीपुरवठा योजनेवरील खर्च (४) | घसारा निधी-साठी तरतूद (५) | इतर खर्च (६) | संपूर्ण खर्च (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९०-९१ | २३१.६६ | ३५०.४४ | ३२०.४२ | ४४.१४ | ३६४६.५७ | ४५९३.२३ |
| (टक्के) | ५.०४ | ७.६३ | ६.९८ | ०.९६ | ७९.३९ | १००.०० |
| १९९१-९२ | २०१.३१ | ३८६.७६ | ३२१.३४ | ८२.४१ | ३९९४.२२ | ४९८६.०४ |
| (टक्के) | ४.०४ | ७.७६ | ६.४४ | १.६५ | ८०.११ | १००.०० |
| १९९२-९३ | ५७३.८० | ३७७.५० | ३३८.४७ | ९६.७५ | ४३८६.३७ | ५७७२.८९ |
| (टक्के) | ९.९४ | ६.५४ | ५.८६ | १.६८ | ७५.९८ | १००.०० |
| १९९३-९४ | ७१५.७९ | ४६३.९३ | २३८.१३ | ७४.८७ | ४७८६.१९ | ६२७८.९१ |
| (टक्के) | ११.४० | ७.३९ | ३.७९ | १.१९ | ७६.३३ | १००.०० |


आकृति क्र. ३

**जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नाव्यतिरिक्त शासन अनुदानातून केलेला खर्च (टक्केवारीत) १९९४-९५**




## आकृति क्र. ४

### १९९४-९५ मध्ये जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून केलेल्या खर्चाची टक्केवारी



## आकृति क्र. ५

### पंचायत समिती उत्पन्न आणि खर्च



(आकडे लाखांत)

| वर्ष (१) | पदाधिकारी द प्रशासनावर होणारा खर्च (२) | समाजकल्याण खात्यावरील खर्च (३) | पाणीपुरवठा योजनेवरील खर्च (४) | घसारा निधी-साठी तरतूद (५) | इतर खर्च (६) | संपूर्ण खर्च (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९४-९५ | ८३२.१४ | ५७५.०८ | ३८०.६९ | १६७.३४ | ४८२७.१७ | ६७८२.४२ |
| (टक्के) | १२.२७ | ८.४८ | ५.६१ | २.४७ | ७१.१७ | १००.०० |
| एकूण | २५५४.७० | २१५३.७१ | १५९९.०५ | ४६५.५१ | २१६४०.५२ | २८४१३.४९ |
| सरासरी | ५१०.९४ | ४३०.७४ | ३१९.८१ | ९३.१० | ४३२८.१० | ५६८२.६९ |
| एकूण टक्केवारी | ८.९९ | ७.५८ | ५.६३ | १.६४ | ७६.१६ | १००.०० |
| वार्षिक वाढीचा दर (टक्केवारी). | ४६.६१ | १२.४४ | ०.४५ | २९.३० | ७.७० | १०.६३ |

**स्रोत-जिल्हा परिषद** (आकृती क्र. ४)

३.३२. जिल्हा परिषदांनी सन १९९०-९१ साली रु. ४५९३ लाख त्यांचे उत्पन्नातून खर्च केला. हा खर्च वाढत जाऊन तो सन १९९४-९५ साली रु. ६७८२ लाख झाला. गेल्या पाच वर्षांत जिल्हा परिषदेने एकंदर रु. २८४१३ लाख खर्च केल्याचे दिसते. या खर्चाची तुलना जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाशी केली असता जिल्हा परिषदांनी गत पाच वर्षांत उत्पन्नापेक्षा रु. ३८७८ लाख जास्त खर्च केल्याचे निदर्शनास येते गेल्या ५ वर्षांत जिल्हा परिषदांचा खर्च सन १९९०-९१ च्या खर्चाच्या तुलनेने वार्षिक १०.६३ टक्के वाढला आहे. सन १९९२-९३ साली ही वाढ पूर्वीच्या वर्षाच्या वाढीच्या तुलनेत ७.२३ टक्के जास्त आहे. याचे प्रमुख कारण जिल्हा परिषदांचे मार्च १९९२ चे निवडणुकीनंतर जिल्हा परिषदांत नवीन प्रतिनिधीमंडळ निवडून आले व त्यामुळे सन १९९२-९३ साली जिल्हा परिषदांच्या खर्चाचे प्रमाण वाढले असावे.

३.३३. जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून केलेल्या खर्चाचे विश्लेषणावरून खालील बाबी स्पष्ट होतात.

(१) पदाधिकारी व इतर प्रशासकीय खर्चात गेल्या ५ वर्षांत मोठी वाढ झाल्याचे आढळते (४६.६१ टक्के). पदाधिकाऱ्यांच्या मानधनात व इतर भत्त्यांत होणारी वाढ हे या वाढीचे प्रमुख कारण असावे.

(२) सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीयांच्या योजनेवरील खर्चात गेल्या ५ वर्षांत १२.४४ टक्के वार्षिक वाढ झाली आहे. जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाच्या काही बाबींच्या २० टक्के एवढा खर्च समाजकल्याण खात्यावर करणे शासनाच्या धोरणानुसार आवश्यक आहे. त्यामुळे या खात्यावरील खर्चाचे प्रमाण हे त्या अनुरूप वाढलेले दिसते. तरीसुद्धा संपूर्ण खर्चाच्या प्रमाणात त्याचे प्रमाण फक्त ७.५८ टक्के असल्याचे आढळते.

(३) जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा काही बाबींचा २० टक्के भाग पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी करण्यात यावा असे शासनाचे आदेश आहेत. मात्र असे निदर्शनास येते की, पाणीपुरवठा खर्चाचे प्रमाण संपूर्ण खर्चाशी ५.६३ टक्के एवढेच आहे व खर्चाच्या वार्षिक वाढीचा दर ०.४५ टक्के आहे.

(४) जिल्हा परिषदांनी आपल्या मालमत्तेवरच्या ठराविक प्रमाणात आपल्या उत्पन्नातून घसारा निधीत अंशदान करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे जिल्हा परिषद घसारा निधीसाठी आपल्या उत्पन्नातील अंशदान घसारा निधीसाठी करीत असल्याचे आढळते. या अंशदानाचे प्रमाण गत ५ वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास येते. मात्र संपूर्ण खर्चाशी त्याचे प्रमाण फारच अत्यल्प असल्याचे दिसते (१.६४ टक्के).

(५) जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्नातून वरील बाबींव्यतिरिक्त त्यांचे अंतर्गत असलेल्या खात्यांच्या योजनांवर खर्च करतात. हा खर्च संपूर्ण खर्चाशी ७६.१६ टक्के होता व वार्षिक वाढीचा दर ७. ७० टक्के होता.

**पंचायत समित्यांचे उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण**

३.३४. पंचायत समित्यांचे उत्पन्न व खर्चाची मागील पाच वर्षांची माहिती पुढीलप्रमाणे आहे. (तक्ता क्र. ३.६).

## तक्ता क्र. ३.६
# पंचायत समित्यांचे उत्पन्न आणि खर्च

(आकडे लाखांत)

| पंचायत समित्यांची संख्या (१) | वर्ष (२) | पंचायत समितींचे उत्पन्न (३) | पंचायत समितींचे सरासरी उत्पन्न (४) | पंचायत समितींचे खर्च (५) | पंचायत समित्यांचा सरासरी खर्च (६) |
|---|---|---|---|---|---|
| २९७ | १९९०-९१ | ८९१.४८ | ३.०० | ७७०.७६ | २.६० |
| | १९९१-९२ | ७३८.१४ | २.४९ | ७३४.८४ | २.४७ |
| | १९९२-९३ | ६१७.२७ | २.०८ | ७५१.७१ | २.५३ |
| | १९९३-९४ | ७०१.४९ | २.३६ | ७५६.६५ | २.५५ |
| | १९९४-९५ | ६१६.१५ | २.०७ | ६३९.५३ | २.१५ |
| एकूण | | ३५६४.५३ | १२.०० | ३६५३.४९ | १२.३० |
| पाच वर्षांची सरासरी | | ७१२.९१ | २.४० | ७३०.७० | २.४६ |
| वार्षिक वाढीचा दर (टक्केवारी). | | −७.५९ | −७.५९ | −३.३८ | −३.३८ |

**स्रोत-जिल्हा परिषद** (आकृती क्र. ५)

३.३५. वरील तक्त्याचे अवलोकन करता असे आढळते की, प्रत्येक पंचायत समितीचे सरासरी उत्पन्न २.४० लाख आहे तर त्यातून झालेला सरासरी खर्च २.४६ लाख आहे. गेल्या ५ वर्षांचे आकडे बघितले असता असे आढळते की, पंचायत समित्यांचे उत्पन्न कमी होत आहे. सन १९९०-९१ ला पंचायत समित्यांचे उत्पन्न सरासरी ३ लाख होते तर १९९४-९५ ला कमी होऊन रु. २.०७ लाख झाले आहे. पंचायत समित्यांचे प्रमुख उत्पन्न वाढीव उपकर हे आहे. वाढीव उपकराची मर्यादा वाढली तरी त्याप्रमाणे वसुली होत नसल्याने तसेच गेल्या काही वर्षात त्यांना अल्पबचत अनुदानही मिळाले नसल्याने त्यांचे उत्पन्न कमी होत गेल्याचे आढळते.

**विकासात्मक कार्यासाठी जिल्हा परिषदांना देण्यात येणारी निधीची व्यवस्था**

३.३६. जिल्हा परिषद जी विकासाची कामे करीत असते त्यांच्याशी राज्य शासनाचे वेगवेगळे प्रशासकीय विभाग संबंधित असतात. अंदाजपत्रकातील तरतूद या विभागांद्वारे जिल्हा परिषदेस देण्यात येते. मात्र या तरतुदी खर्च करण्यासाठी जो निधी आवश्यक आहे. तो निधी ग्रामविकास विभागाद्धारे अर्थोपाय आगाऊ रकमा स्वरूपात मासिक दोन टप्प्यांमध्ये जिल्हा परिषदेस दिला जातो. जिल्हा परिषदेस या आगाऊ रकमा देण्यात येतात.

३.३७. जिल्हा परिषदेस दरवर्षी जी अंदाजपत्रकीय तरतूद द्यावयाची असते त्याच्या १/१२ रक्कम जिल्हा परिषदांना दोन हप्त्यात देण्यात येते. यापैकी एक हप्ता जिल्हा परिषदा कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यांचा खर्च भागविण्यासाठी असतो. ज्या महिन्यात हा खर्च भागवावयाचा असतो त्याच्या आधीच्या महिन्याच्या २५ तारीख किंवा त्यानंतर या हप्त्याची रक्कम दिली जाते. दुसरा हप्ता ह्या महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात त्या महिन्याची आगाऊ रक्कम म्हणून देय असतो. दर महिन्याच्या १० तारखेस आधीच्या महिन्याच्या अर्थोपाय रकमेचा तपशीलवार विनियोगाचा दाखला सादर करावा लागतो आणि त्यातील संबंधित विभागाच्या प्रती त्या त्या प्रशासकीय विभागांकडे पाठवाव्या लागतात. त्यानंतर महिन्यात देय असलेला अर्थोपाय आगाऊ रकमा जिल्हा परिषदेस प्रत्यक्षात दिल्या जातात.

३.३८. आगाऊ अर्थोपाय रकमेव्यतिरिक्त जिल्हा परिषदेस काही खात्यामार्फत रोख अनुदाने दिली जातात. याबाबतचे प्रत्यक्ष आदेश संबंधित खात्यांमार्फत जिल्हा परिषदेस दिले जातात.

३.३९. वर्षाच्या प्रत्येक तिमाहीत अर्थोपाय आगाऊ रकमेचा मेळ वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांमधून वितरित केलेले अनुदान यांचेशी ग्रामविकास विभागाकडून घातला जातो व मंजूर अनुदानापेक्षा ज्यात अर्थोपाय रकमा जिल्हा परिषदेस दिल्याचे आढळल्यास चालू वर्षातील अर्थोपाय रकमांत तेवढी कपात केली जाते. उलट परिस्थितीत त्यो रकमेत वाढ केली जाते.

३.४०. ३१ मार्चनंतर वित्तीय वर्ष समाप्त झाले की, त्यानंतरच्या जुलै महिन्यापासून आधीच्या वर्षात प्रशासकीय विभागाकडून औपचारिक मंजुरी मिळालेली अनुदाने व जिल्हा परिषदेने प्रत्यक्ष केलेला अनुज्ञेय खर्च याची तपशीलवार तुलना व निर्धारण प्रत्येक प्रशासकीय विभागाकडून केले जाईल अशी अपेक्षा असते.

□ □

## प्रकरण ४

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची सद्य:स्थिती

४.१. उपलब्ध अद्ययावत सांख्यिकीनुसार सन १९९५ यावर्षी राज्यात एकूण २७,२८९ ग्रामपंचायती होत्या. राज्यातील एकूण ४३,०२७ खेडी या ग्रामपंचायतींकडे सामावलेली आहेत. या खेड्यांची लोकसंख्या १९९१ च्या जनगणनेनुसार ४,८३,९६,००० एवढी असून ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ६१.३९ टक्के एवढे आहे. ग्रामपंचायतींचे लोकसंख्येनुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| | लोकसंख्या गट | ग्रामपंचायतींची संख्या | एकुणातील टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १,००० पर्यंत .. .. .. | ९,४०३ | ३४.५० |
| २. | १,००० ते ३,००० पर्यंत .. .. .. | १४,७४२ | ५४.०० |
| ३. | ३,००० ते ६,००० पर्यंत .. .. .. | २,३२२ | ८.५० |
| ४. | ६,००० ते १०,००० पर्यंत .. .. .. | ५८५ | २.१० |
| ५. | १०,००० पेक्षा अधिक .. .. .. | २३७ | ०.९० |
| | एकूण .. . | २७,२८९ | १००.०० |

४.२. वरील तक्त्यांवरुन असे लक्षात येते की, जवळपास ८८ टक्क्यांहून अधिक पंचायतींची लोकसंख्या ३ हजारांहून कमी आहे तर १० हजारांहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायतींचे एकूणातील प्रमाण एक टक्क्याहून कमी आहे.

### ग्रामपंचायतीची घटना, कर्तव्ये, अधिकार व कार्ये

४.३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये प्रत्येक ग्रामपंचायत ही निगमनिकाय संस्था असून तिला अधिकारपरंपरा आहे. ग्रामपंचायतीस मालमत्ता संपादन करण्याचा व ग्रहण करण्याचा अधिकार आहे. वरील अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये ग्रामपंचायतीवर सोपविलेल्या विषयांची यादी अधिनियमाच्या अनुसूची १ मध्ये देण्यात आली आहे. त्यामध्ये कृषी,पशुसंवर्धन, वने, समाजकल्याण, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आला असून ग्रामपंचायतीने त्यावर वाजवी तरतूद करणे हे ग्रामपंचायतीची प्रमुख कर्तव्य असते.

४.४. ७३ व्या घटना दुरूस्तीने ग्रामपातळीवर ग्रामपंचायतीस आता संविधानिक दर्जा प्रदान करण्यात आला असून स्वयंशासित संस्था होण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतींना विधी मंडळाने आर्थिक विकास व सामाजिक न्याय मिळविण्यासाठी योजना तयार करण्याचे व राबविण्याचे अधिकार व जबाबदाऱ्या सोपविण्यात याव्यात अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींच्या घटनेत काही बदल करण्यात आले आहेत.

**ग्रामपातळीवरील प्रशासकीय यंत्रणा**

४.५. गावाचा विस्तार, लोकसंख्या व पंचायतींचे उत्पन्न विचारात घेऊन प्रत्येक पंचायतीसाठी किंवा पंचायतीच्या गटासाठी जिल्हा परिषदेचें मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायतींचे सचिव म्हणून जिल्हा सेवा वर्ग-३ संवर्गातून ग्रामसेवकाची नेमणूक करतात. ग्रामसेवकांचे वेतन व भत्ते हे जिल्हा निधीतून देण्यात येतात. ग्रामपंचायतीला मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ६१ अन्वये आपली कर्तव्ये योग्य रितीने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येते व त्यांचे वेतन ग्रामनिधीतून देण्यात येते. तसेच निकडीच्या परिस्थितीत सरपंचाला सुद्धा आवश्यक वाटेल तितके अस्थायी कर्मचारी कामावर लावता येतात. पंचायतीने वेळोवेळी नेमणूक केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कारवाई पंचायतीस करता येते.

४.६. पंचायतीस असलेल्या अधिकारांना बाधा येऊ न देता राज्य शासनास, ग्रामपंचायतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवाप्रवेश, सेवेच्या अटी व शर्तींचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतात. महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतींच्या कर्मचाऱ्यांना १९६५ पासून किमान वेतन दर देण्यात आला असून शासनाने ३ जुलै १९९० च्या अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित किमान वेतन विहित केले आहे. हे किमान वेतन रुपये ५०० ते ८५० या दरम्यान निश्चित करण्यात आले असून वेतन दर कामाचे स्वरूप व त्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न यानुसार ठरविले आहे.

४.७. वर उद्घृत केल्याप्रमाणे शासनाने मुंबई ग्रामपंचायत सेवक (सेवा शर्ती) नियम, १९६० तयार केले आहेत. या नियमांत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची अर्हता, वयोमान, सेवानिवृत्तीचे वय, कामाचे स्वरुप, पगार व भत्ते, रजा, गौण शिक्षा इत्यादींचा समावेश केला आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत परिपत्रक दिनांक ४ मे १९६५ अन्वये ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाच्या जास्तीत जास्त २५ टक्के रक्कम कर्मचारी वर्गाच्या पगारावर खर्च करता येईल अशी मर्यादा घातलेली आहे.

**ग्रामपंचायतींचे वित्तीय अधिकार**

४.८. मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाला जोडलेल्या अनुसुचीनुसार ग्रामपंचायतींनी कोणती कामे करावीत हे स्पष्ट करण्यात आले आहे. या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अधिनियमात ग्रामपंचायतीच्या कर व फी यांच्या बाबी नेमून दिल्या आहेत. पंचायतीचे विविध करांद्वारे मिळणाऱ्या महसुलाचे प्रमाण एकूण उत्पन्नाच्या तुलनेत मोठे असल्याचे आढळते. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, कलम १२४ अन्वये ग्रामपंचायतीस खालील कर व फी बसविण्याचे अधिकार आहेत.

१. गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषि निर्धारणास अधिन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषि निर्धारणास अधिन आहेत अशा) यावरील कर ;

२. ग्रामपंचायतींनी ग्रामीण निधीमधून हाती घेतलेल्या परियोजना किंवा प्रकल्प यापासून लाभ मिळणाऱ्या जमिनींवरील सुधार आकार ;

३. राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने जकात ;

४. यात्रेवरील कर ;

५. जत्रा, उत्सव किंवा इतर करमणूक यांवरील कर ;

६. सायकली किंवा जनावरांकडून ओढली जाणारी वाहने यावरील कर ;

७. संविधानाच्या अनुच्छेद-२७६ च्या तरतुदींच्या अधिनतेने पुढील व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यावरील कर ;

(अ) दुकाने चालविणे किंवा हॉटेल चालविणे ;

(ब) वाफेवर, तेलावर, वीज शक्तीवर किंवा शारीरिक श्रमाने चालणाऱ्या यंत्राच्या सहाय्याने चालविलेला (कृषि व्यतिरिक्त) कोणताही व्यापार किंवा आजिविका ;

(क) गुरांच्या बाजारातील दलालीचा व्यवसाय किंवा आजिविका ;

८. सार्वजनिक शौचकूप बांधण्यासाठी व सुस्थितीत ठेवण्यासाठी व बांधणे व सुस्थितीत ठेवणे या दोन्हीसाठी व केरकचरा काढण्यासाठी व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी सर्वसाधारण स्वच्छता उपकर ;

९. इमारती व जमिनी यांवर निर्धारित केलेल्या पट्टीच्या स्वरुपात व कोणत्याही वर्गाच्या प्रकरणातील परिस्थितीनुसार अंगिकार करता येईल अशी अन्य कोणत्याही स्वरुपात आकारता येईल अशी सर्वसाधारण पाणीपट्टी ;

१०. दिवाबत्ती कर ;

११. संविधानान्वये राज्य विधान मंडळास राज्यात कर बसविण्याचा जो अधिकार असेल किंवा जे राज्य शासनाने मंजूर केलेले असतील असे इतर कोणतेही कर ;

१२. बाजार व आठवड्याचा बाजार यावरील फी ;

१३. गाडी तळ, टांगा तळ यावरील कर ;

१४. पंचायतीकडून नळाने पाणी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याबद्दल विशेष पाणीपट्टी, अशी ही, पाणीपट्टी पुरविण्यात घेणाऱ्या पाण्याबद्दल घेण्यांत येणारे आकार धरुन इतर कोणत्याही स्वरूपात बसविता येते व ती कोणत्याही वर्गाच्या प्रकरणातील परिस्थितीनुसार अंगिकारण्यात येईल अशा पद्धतीने किंवा पद्धतीनी निश्चित करता येते.

१५. पंचायतीमध्ये निहित असलेल्या विहिरी व तलाव यामध्ये घरगुती उपयोगाव्यतिरिक्त व गुरांव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी पुरविलेल्या पाण्यावर फी.

१६. कोणत्याही सार्वजनिक सडकेवर किंवा जागेवर तात्पुरते इमले उभारून प्रक्षेप ठेवणे व तिचा तात्पुरता भोगवटा करणे याबद्दल फी ;

१७. पंचायत अभिकरणाकडून साफ करण्यात येणारी खाजगी शौचकूप, इतर परिवास्तु व आवारे यावरील विशेष स्वच्छता उपकर.

१८. जमिनीवर बांधलेली मळकुंडी साफ करण्याबद्दलची फी, मग ती पंचायतीच्या मालकीची असो किंवा नसो ;

१९. पंचायतीमध्ये विहित असलेल्या चरायच्या जमिनीवर चरण्याबद्दलची फी ;

२०. पंचायतीच्या मालकीच्या व तिच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही बाजारात किंवा जागेत विकल्या जाणाऱ्या गुरांच्या नोंदणीसाठी फी ;

वरील कर व फी पैकी एक व दोन क्रमांकाचे कर अनिवार्य असून (नऊ व चौदा क्रमांकाचे कर पाणीपुरवठा योजना असल्यास अनिवार्य) इतर कर व फी ऐच्छिक आहेत. इमारतींवरील व जमिनीवरील कर हा त्या इमारतीच्या, जमिनीच्या मालकाकडून किंवा ज्या व्यक्तिकडे हस्तांतरित करण्यात आली असेल त्याच्याकडून वसूल करता येतो. राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येतो की, संबंधित इमारती किंवा जमिनी यावरील कर हा ज्या क्षेत्रातील लोकसंख्या मुख्यत्वेरित्या अनुसूचित जाती किंवा जमाती यांची असेल त्या

क्षेत्रातील अशा इमारती किंवा जमिनी किंवा इमारतींचा किंवा जमिनींचा कोणताही वर्ग यावर बसविण्यात येणार नाही. राज्य शासनास अधिसूचनेद्वारे एखाद्या कराच्या किंवा फीच्या संबंधातील आक्षेप दूर करण्यात येईपर्यंत अशा कराची किंवा फीची किंवा त्याच्या अशा भागाची आकारणी निलंबित करण्यात येते.

४.९. पंचायतीने बसविलेल्या कराऐवजी सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही करांच्या ठोक रकमेच्या स्वरुपांत अंशदान करण्यासाठी पंचायतीला राज्य शासनाच्या मंजुरीने कोणत्याही कारखान्याशी करार करता येतो. अशा तऱ्हेचा कोणताही करार होऊ शकत नसेल तर तेथे, ही बाब विहित रीतीने राज्य शासनाकडे निर्देशित करता येते आणि संबंधित पंचायतीला व कारखान्याला आपले म्हणजे ऐकण्याची संधी दिल्यानंतर राज्य शासनाला अशा अंशदानाची रक्कम ठरविता येते. राज्य शासनाचा निर्णय संबंधित पंचायत व कारखानदार यांच्यावर बंधनकारक असतो.

४.१०. पंचायतीस बाजार व आंठवड्याचा बाजार यावर त्यांनी बसविलेली कोणतीही फी वसुली करण्यासाठी जाहीर लिलावाने किंवा खाजगी संविदा करून मक्ता देता येतो. परंतु मक्त्याच्या शर्तीच्या योग्य पूर्ततेसाठी मक्तेदाराने प्रतिभूती दिली पाहिजे.

वर उद्घृत कर किंवा फीचे किमान व कमाल दर शासनाने नियम तयार करुन ठरविले आहेत, तसेच हे कर किंवा फी कोणत्याही पद्धतीने ग्रामपंचायतीस लावता येईल यासंबंधीचे नियम शासनाने तयार केले आहेत.

४.११. जर ग्रामपंचायतींचे उत्पन्न ग्रामपंचायतींचे कर्तव्य योग्य रितीने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राप्तीपेक्षा कमी आहे असे पंचायत समितीचे मत असेल तर पंचायतीला आपली प्राप्ती वाढविण्यासाठी ६ महिन्यांच्या आत उपाययोजना करण्यास पंचायत समिती फर्मावू शकते. पंचायतीने आवश्यक तितपत आपली प्राप्ती वाढविण्यासाठी पुरेशी उपाययोजना कऱण्यास कसूर केल्यास कलम ए १२४ मध्ये विनिर्दिष्ट केलेले कर किंवा फी यापैकी कोणताही कर किंवा फी बसविण्यास किंवा त्यांचे दर वाढविण्यास तिला फर्मावू शकेल. परंतु पंचायत समती याबाबत विहित करण्यात आलेल्या अशा कमाल दरापेक्षा अधिक दराने कोणताही कर किंवा फी बसविण्यास वा वाढविण्यास पंचायतीस सक्ती करू शकत नाही. ग्रामपंचायतीस पंचायत समितीच्या आदेशाविरूद्ध स्थायी समितीकडे अपील करता येते व स्थायी समिती अशा अपीलावर निर्णय देईपर्यंत तिस अशा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येते.

**ग्रामपंचायतींना वित्तीय सहाय्य**

४.१२. शासनाकडून ग्रामपंचायतींना जी अनुदाने दिली जातात त्यांचे प्रामुख्याने खालील प्रकार आहेत :—

१. **जमीन महसूल अनुदान.**—(कलम १३१ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८). प्रत्येक ग्रामपंचायतीस पंचायतीच्या हद्दीत जमिनीपासून वसूल झालेल्या सामान्य जमीन महसुलाच्या (कृषितर आकारणीधरून) पाच वर्षांच्या सरासरीच्या रकमे इतके अनुदान राज्य शासनाकडून प्राप्त होते.

२. **समानीकरण अनुदान.**—(कलम १३२-अ) अन्वये एखाद्या पंचायतीस देय असलेली रक्कम ही गावाच्या लोकसंख्येच्या दरडोई १ रुपया या आधारे हिशेब करून याबाबत येणारी रक्कम आणि जमीन महसूल अनुदानांची पंचायतीस देय असलेली रक्कम यातील फरकाइतक्या रकमेचे समानीकरण अनुदान ग्रामपंचायतीस राज्य शासनाकडून देण्यात येते.

३. राज्य शासनाने ग्रामपंचायतीच्या अधिकारीतेत असलेल्या क्षेत्रात राज्य शासनाला सामान्य जमीन महसूल म्हणून द्यावयाच्या प्रत्येक रकमेच्या रुपयावर १०० पैसे या दराने उपकर बसविलेला आहे. महसूल यंत्रणेर्माफत हा उपकर जमा करून अनुदानाच्या स्वरुपात ग्रामपंचायतीस दिला जातो.

४. वरील अनुदानाव्यतिरिक्त ग्रामपंचायतीस खालील अनुदाने राज्य शासनाकडून प्राप्त होतात.

(१) रस्त्यावरील दिवा बत्तीवरील खर्चाच्या प्रित्यर्थ वीज देयकाचा खर्च भागविण्यासाठी राज्य शासनाकडून १०० टक्के.

(२) पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या योजनेवरील वीज देयकाचा खर्च भागविण्यासाठी ५० टक्के अनुदान दिले जाते.

(३) जिल्हा परिषदेकडून संबंधित ग्रामपंचायतीस मुद्रांक शुल्क अनुदानातून ५० टक्के हिस्सा दिला जातो.

(४) टी.सी.एल. पावडर खरेदी करण्यासाठी ५० टक्के अनुदान.

(५) मागासभागातील ग्रामपंचायतींना शासनामार्फत काही प्रमाणात अर्थसहाय्य दिले जाते.

(६) गौण खनिजावरील स्वामित्त्व धनाच्या हिश्श्याप्रित्यर्थ ग्रामपंचायतीला शासनाकडून अनुदान दिले जाते.

**ग्रामपंचायत उत्पन्नाचे व खर्चाचे विश्लेषण**

४.१३. ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाच्या साधनांचा तसेच शासनाकडून ग्रामपंचायतीस मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरूपाबाबत मागील परिच्छेदात नमूद करण्यात आले. या व्यतिरिक्त ग्रामपंचायतीस १९८९ पासून केंद्र व राज्य शासनाकडून जवाहर रोजगार योजनेसाठी मोठ्या स्वरूपात निधी उपलब्ध होत आहे. हा निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस खालीलप्रमाणे उपलब्ध झाला :—

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | वर्ष | एकूण उपलब्ध निधी |
|---|---|---|
| १. | १९९०-९१ .. .. .. | २२,७८२.५० |
| २. | १९९१-९२ .. .. .. | २०,७७६.६० |
| ३. | १९९२-९३ .. .. .. | २२,०९७.२३ |
| ४. | १९९३-९४ .. .. .. | ३३,६५३.७५ |
| ५. | १९९४-९५ .. .. .. | ४५,०२४.८७ |
| | सरासरी .. | २८,८६६.९९ |

४.१४. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचे सन १९९०-९१ ते १९९४-९५ चे सरासरी उत्पन्न रुपये १०१.११ कोटी होते (तक्ता क्र. ४.१). ग्रामपंचायतीस मागील पाच वर्षांत जवाहर रोजगार योजनेंतर्गत सरासरी रुपये २८८.६६ कोटी रुपये उपलब्ध झाले. म्हणजे ग्रामपंचायतीचे एकत्रितरित्या ३८९.७६ कोटी उत्पन्न होते. म्हणजेच प्रत्येक ग्रामपंचायतीचे पाच वर्षांचे सरासरी उत्पन्न रुपये १.४३ लाख एवढे होते. जवाहर रोजगार योजनेमधून ग्रामपंचायतींना त्यांच्या उत्पनाच्या ७४ टक्के निधी उपलब्ध झाला. जवाहर रोजगार निधीमधून ग्रामपंचायतींनी मोठ्या प्रमाणात मालमत्ता निर्माण केली आहे. जवाहर रोजगार योजनेमधून मालमत्ता परिरक्षणासाठी १० टक्के निधी ग्रामपंचायतीस उपलब्ध होतो. ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या उत्पन्नात प्रामुख्याने ग्रामपंचायत स्वतः आकारीत व गोळा करीत असलेले कर व फी करेतर उत्पन्न व शासनाकडून मिळत असलेली निरनिराळी अनुदाने याचा समावेश होतो. याची सविस्तर माहिती खालील तक्त्यात उपलब्ध होते.

## तक्ता क्रमांक ४.१
## ग्रामपंचायतींचे उत्पन्न

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | ग्राम-पंचायतीची संख्या | कर व उपकर | शुल्क व दर | शासकीय जिल्हा परिषद अनुदाने | इतर उत्पन्न | संपूर्ण उत्पन्न | सरासरी वार्षिक उत्पन्न प्रति ग्रा.पं. | दरडोई (प्रत्यक्ष रक्कम) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९०-९१ | २७२८९ | २७८३९८ | १६७९९५ | २५७९६९ | ४२२६९ | ७४६६३१ | २७.३६० | १५.४२ |
| | | | ३७.२९ | २२.५० | ३४.५५ | ५.६६ | १००.०० | | |
| २. | १९९१-९२ | | ३२५१०२ | २०८९९४ | २५७२५३ | ३८०३९ | ८२९३९५ | ३०.३९३ | १७.१३ |
| | | | ३९.२० | २५.२० | ३१.०२ | ४.५९ | १००.०० | | |
| ३. | १९९२-९३ | | ३५०२११ | २४९१९४ | ३१२८१९ | ५७१८३ | ९६९४०७ | ३५.५२४ | २०.०० |
| | | | ३६.१३ | २५.७१ | ३२.२७ | ५.९० | १००.०० | | |
| ४. | १९९३-९४ | | ४०४४३० | ३१२२९१ | ४००९४७ | ६६९३४ | ११८४६०२ | ४३.४१० | २४.४७ |
| | | | ३४.१४ | २६.३६ | ३३.८५ | ५.६५ | १००.०० | | |
| ५. | १९९४-९५ | | ४६१७९७ | ३९६९९६ | ३९०७७३ | ७५८४३ | १३२५४०९ | ४८.५६९ | २७.३८ |
| | | | ३४.८४ | २९.९५ | २९.४८ | ५.७२ | १००.०० | | |
| ६. | सरासरी | | ३६३९८९ | २६७०९४ | ३२३९५२.२ | ५६०५३.६ | १०११०८८.८ | ३७.०५१ | २०.८९ |
| ७. | टक्केवारी | | ३६.०० | २६.३२ | ३२.०४ | ५.५४ | १००.०० | | |
| | वृद्धी दर | | १३.०९% | २३.६४% | १३.५९% | १८.९४% | १६.२३% | | |

(आकृती क्र. १)

**स्त्रोत :** जिल्हा परिषद

४.१५. सन १९९०-९१ साली महाराष्ट्रातील पंचायतींचे एकंदर उत्पन्न रुपये ७४.६६ कोटी होते (ज.रो.यो. निधी वगळून) तर ते वाढत जाऊन १९९४-९५ साली रुपये १३२.५४ कोटी झाले. या ४ वर्षांत उत्पन्न वाढीचा दर वार्षिक १६.२३ टक्के होता. सन १९९३-९४ मध्ये उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचा दर या दरापेक्षा फारच मोठा म्हणजे २२.२० टक्के आढळतो. सन १९९३-९४ मध्ये ग्रामअभियान कार्यक्रमाद्वारे जमविलेल्या अंशदानामुळे हा दर वाढलेला असावा.

४.१६. ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात कर व शुल्क उत्पन्नाचा हिस्सा सर्वांत जास्त म्हणजे ६२.४२ टक्के होता. दुसरा महत्त्वाचा ग्रामपंचायत उत्पन्नाचा स्त्रोत शासकीय व जिल्हा परिषद अनुदाने हा होता (३२.०४ टक्के).


४.१७. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण तक्ता क्र. ४.२ मध्ये करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील ६२ टक्के ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न रुपये २०,००० पर्यंत आहे. १ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या एकूण ग्रामपंचायतींच्या ६ टक्के एवढी आढळते.

## तक्ता क्रमांक ४.२
## ग्रामपंचायतींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण

| | वार्षिक उत्पन्न (१) | ग्रामपंचायतींची संख्या (२) | एकूणातील टक्केवारी (३) |
|---|---|---|---|
| १. | रुपये ५,००० पेक्षा कमी .. .. .. | ५,५०१ | २०.१६ |
| २. | रुपये ५,००० ते १०,००० पेक्षा कमी .. .. | ६,१२० | २२.४३ |
| ३. | रुपये १०,००० ते २०,००० पेक्षा कमी .. .. | ५,२८८ | १९.३८ |
| ४. | रुपये २०,००० ते ३०,००० पेक्षा कमी .. .. | ३,१६२ | ११.५९ |

## आकृति क्र. १

### ग्रामपंचायतींचे उत्पन्न (१९९४-९५)



| | (१) | | | (२) | (३) |
|---|---|---|---|---|---|
| ५. | रुपये ३०,००० ते ५०,००० पेक्षा कमी | .. | .. | २,८७३ | १०.५३ |
| ६. | रुपये ५०,००० ते ७५,००० पेक्षा कमी | .. | .. | १७८९ | ६.५६ |
| ७. | रुपये ७५,००० ते १,००,००० पेक्षा कमी | | .. | ९२२ | ३.३८ |
| ८. | रुपये १,००,००० पेक्षा जास्त | .. | .. | १,६३४ | ५.९९ |
| | | एकूण | .. | २७,२८९ | १००.०० |

(आकृती क्र. २)

स्त्रोत : जिल्हा परिषद.

### कर व शुल्क याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषण

४.१८. पंचायतींना कर व शुल्क याद्वारे मिळणारे उत्पन्न सन १९९०-९१ मध्ये प्रतिग्रामपंचायत रुपये १६,३५८ होते. ते वाढत जाऊन १९९४-९५ साली प्रतिग्रामपंचायत रुपये ३१,४७० झाले. कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचा दर १३.०९ टक्के एवढा होता. ग्रामपंचायत करामध्ये प्रामुख्याने इमारती व जमिनीवरील कर याचा प्रमुख हिस्सा आहे. (३४ टक्के), तर पाणीपट्टीचा हिस्सा २१ टक्के आहे. त्याच्या गेल्या पाच वर्षांतील उत्पन्नाची माहिती खालील तक्त्यांत देण्यात आली आहे.

तक्ता क्रमांक ४.३

**ग्रामपंचायतीचे कर, उपकर व शुल्क, दर यांचे वर्षनिहाय विवरणपत्र**

(रुपये हजारात)

| वर्ष | | कर व उपकर | | | शुल्क व दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इमारती व जमिनीवरील कर | इतर | एकंदर | पाणीपट्टी | इतर | एकंदर |
| १९९०-९१ .. | .. | १६५११३० | ११३२६३ | २७८३९३ | ९४६३५ | ७३३५९ | १६७९९३ |
| १९९१-९२ .. | .. | १७७५६२ | १४७५४६ | ३२५१०८ | १११४९८ | ९७४९५ | २०८९९३ |
| १९९२-९३ .. | .. | २०७३७९ | १४२८३१ | ३५०२१० | १२९३६८ | ११९८२५ | २४९१९३ |
| १९९३-९४ .. | .. | २३५४४२ | १६८९९० | ४०४४३२ | १५६३४९ | १५५९४८ | ३१२२९७ |
| १९९४-९५ .. | .. | २७५२७८ | १८६५१७ | ४६१७९५ | १७९५२९ | २१७४६८ | ३९६९९७ |
| सरासरी .. | .. | २१२१५८.२ | १५१८२९.४ | ३६३९८७.६ | १३४२७५.८ | १३२८१९ | २६७०९४.६ |
| वृद्दी दर .. | .. | १३.९३% | १२.००% | १३.०९% | १७.५७% | ३०.२५% | २३.६४% |

(आकृती क्र. ३)

स्त्रोत : जिल्हा परिषद

### इमारती व जमिनीवरील कर (घरपट्टी)

४.१९. ग्रामपंचायत आकारीत असलेल्या व गोळा करीत असलेल्या कर व फीमध्ये मुख्यत्वे घरावर आकारण्यात येत असलेली घरपट्टी हा सर्वांत महत्त्वाच्या उत्पन्नाचा स्त्रोत होय. याबद्दलची माहिती तक्ता क्र. ४.३ मध्ये देण्यात आली आहे. सन १९९०-९१ मध्ये ग्रामपंचायतींना रुपये १६.५१ कोटींचे उत्पन्न घरपट्टीपासून प्राप्त झाले. तर ते वाढत जाऊन १९९४-९५ साली रुपये २७.५३ कोटी झाले. घरपट्टीच्या उत्पन्नात होत असलेली सतत वाढ लक्षात घेता ही वाढ समाधानकारक आहे असे म्हणता येईल.

४.२०. घरपट्टीपासून जरी ग्रामपंचायतींना भरीव उत्पन्न प्राप्त झाले तरी एकूण उत्पन्नाशी याचे प्रमाण १९९०-९१ साली २२.११ टक्केवरून १९९४-९५ साली २०.७६ टक्केपर्यंत घसरले.

**पाणीपट्टीच्या रूपाने जमा होणारा महसूल (तक्ता क्र. ४.३)**

४.२१. पाणीपट्टीच्या बाबतीत सामान्य पाणीपट्टी व विशेष पाणीपट्टी असे दोन प्रकार आहेत. सामान्य पाणीपट्टी ही इमारतीच्या करयोग्य मूल्याच्या काही टक्केवारीप्रमाणे आकारता येते. मात्र त्याचे किमान व कमाल दर विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत. विशेष पाणीपट्टी ही जेथे ग्रामपंचायत नळाद्वारे पाणीपुरवठा करते तेथे आकारण्यात येते. त्याचे किमान व कमाल दर नियमांत विनिर्दिष्ट करण्यात आले आहे.

४.२२. पंचायतींच्या उत्पन्नाच्या दृष्टीने हा दुसरा क्रमांकाचा महत्त्वाचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे. संपूर्ण उत्पन्नाच्या १३.२८ टक्के या स्त्रोताचे उत्पन्न असल्याचे आढळते. संपूर्ण उत्पन्नाच्या वार्षिक वृद्धीच्या दरापेक्षा पाणीपट्टीचा वार्षिक वाढीचा दर (१७.५७ टक्के) जास्त असल्याने पाणीपट्टीद्वारे उत्पन्नात एकंदर उत्पन्न वाढीच्या तुलनेने सतत चांगली वाढ होत असल्याचे निदर्शनास येते.

**ग्रामपंचायतींच्या करेतर उत्पन्नाचे विश्लेषण**

४.२३. ग्रामपंचायतींच्या करेतर उत्पन्नामध्ये इमारतीपासून भाडे जमिनीचे भाडे, व्यापारी संकुले, सेंद्रिय खताची विक्री इ. चा समावेश होतो. ग्रामपंचायतींच्या एकंदर उत्पन्नाच्या तुलनेनेही उत्पन्नाची साधने फारच कमी प्रमाणात (५.५ टक्के) असल्याचे आढळते. मात्र गेल्या पाच वर्षांत १९९१-९२ व्यतिरिक्त या साधनांपासून मिळालेल्या उत्पन्नाची पातळी वाढत असल्याचे निदर्शनास येते.

**ग्रामपंचायतींना मिळणारी अनुदाने**

४.२४. ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या अनुदानात शासनाकडून व जिल्हा परिषदांकडून मिळणाऱ्या अनुदानाचा समावेश होतो. ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या अनुदानात गेल्या ४ वर्षांत वाढ होत असली तरी एकंदर उत्पन्नाशी त्याचे प्रमाण घसरत असल्याचे आढळून येते. सन १९९०-९१ साली एकंदर उत्पन्नाशी त्याचे प्रमाण ३४.५५ टक्के होते. तर १९९४-९५ साली ते कमी होऊन २९.४८ टक्के झाल्याचे आढळते.

४.२५. सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पुणे (सीएसएसएस) या संस्थेने महाराष्ट्र वित्त आयोगाकरिता राज्यातील ग्रामपंचायतींच्या वित्तविषयक बाबींचा नमुना पाहणी तत्त्वावर अभ्यास केला. या अभ्यास पाहणीमध्ये त्यांना ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाची खालीलप्रमाणे ठळक वैशिष्ट्ये आढळून आली :–

(१) पंचायतींचे एकूण उत्पन्नानुसार वर्गीकरण अतिशय विषम आहे. बहुसंख्य पंचायतींचे एकूण उत्पन्न नमुना पंचायतींच्या सरासरी उत्पन्नाहून कमी असल्याचे दिसते.


(२) परंतु ग्रामपंचायतींच्या लोकसंख्या गटानुसार वर्गीकरणात एकाच लोकसंख्या गटांतर्गत समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातील तफावत त्यामानाने बरीच कमी असलेली दिसते. पंचायतींच्या उत्पन्नावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक घटकांपैकी पंचायतींची लोकसंख्या हा एक महत्त्वाचा घटक असल्याचे दिसते.

४.२६. सीएसएसएसच्या अहवालात ग्रामपंचायतींच्या काही महत्त्वाच्या कर व फीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आढळतात :—

**(१) इमारती व जमीन यावरील कर**


४.२७. विविध लोकसंख्या गटांतील बहुसंख्य पंचायती प्रस्तुत कराची आकारणी सरसकट दरानेच करतात असे आढळून येते. प्रस्तुत करासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींशी ही बाब विसंगत आहे. कराधान सोपान पद्धतीनुसार प्रस्तुत करआकारणी करणाऱ्या पंचायतींपैकी बहुसंख्य पंचायतींनी विद्यमान सोपान पद्धतीतील प्रत्येक कर सोपानांतर्गत कर आकारणीची कमाल मर्यादा केव्हाच गाठली आहे. या कराद्वारे जमा व्हावयाच्या महसुलाच्या वसुलीचे प्रमाण मोठ्या पंचायतींमध्ये लक्षणीयरीत्या कमी आहे.

ग्रामपंचायतींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण



## आकृति क्र. ३

**ग्रामपंचायतींचे कर व एकूण उत्पन्न (१९९४-९५)** (रुपये हजारात)




| | |
|---|---|
| पाणीपट्टीची एकूण कराशी टक्केवारी | २०.९० |
| इमारतीवरील व जमिनीवरील कर व महसूलाची एकूण कराशी टक्केवारी | ३२.०५ |
| एकूण कराची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | ६४.७९ |

या करासंबंधीच्या कायदेशीर तरतुदीनुसार नियमित कालावधीनंतर होणे अपेक्षित असलेले कर आधाराचे पुनर्मूल्यन (Revaluation of tax base) बहुसंख्य पंचायती करीत नसल्याचे आढळते.

### (२) दुकान चालविणे व पथिकाश्रम (हॉटेल) चालविणे यावरील कर

४.२८. (१) शासकीय अध्यादेशानुसार हा कर रद्द करण्यात आला असला तरी पंचायतींकडे या कराच्या नावाखाली महसूल गोळा होत असल्याचे आढळून येते.

(२) प्रस्तुत कर हा उत्पन्नाच्या दृष्टीने पंचायतीचा फारसा महत्त्वाचा स्त्रोत असल्याचे दिसत नाही. परंतु पंचायतींकडे या कराद्वारे जमा झालेल्या रकमांत गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. मोठ्या व तुलनेने अधिक विकसित पंचायतींच्या बाबतीत या कराद्वारे जमा झालेल्या सरासरी महसुलाचे आकारमान लक्षणीयरीत्या अधिक असल्याचे दिसते.

### (३) पाणीपट्टीच्या रूपाने जमा होणारा कर महसूल

४.२९. पंचायतींच्या उत्पन्नाच्या दृष्टीने हा दुसऱ्या क्रमांकाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. या कराची आकारणी करणाऱ्या पंचायतींत मोठ्या पंचायतींचे प्रमाण लहान पंचायतींपेक्षा अधिक आहे. परंतु लहान पंचायतींमध्येही या कराची आकारणी करणाऱ्या पंचायतींची संख्या अलिकडे चांगल्यापैकी वाढताना दिसते. या कराद्वारे मिळणाऱ्या महसुलाचे प्रमाण (पातळी) पंचायतींची लोकसंख्या व विकासाची पातळी या दोहोंशी प्रत्यक्षानुसारी संबंधित असल्याचे दिसते. या कराद्वारे पंचायतींना मिळणाऱ्या महसुलाच्या पातळीत गेल्या पाच वर्षांत भरीव वाढ झाल्याचे आढळून येते. विशेष पाणीपट्टी आकारणाऱ्या पंचायतींचे प्रमाण मोठ्या पंचायतीमध्ये अधिक आहे. अन्यथा, बहुतेक पंचायती सर्वसाधारणपणे सामान्य पाणीपट्टीच आकारताना दिसतात. पाणीपट्टी आकारणाऱ्या (सामान्य, विशेष अथवा दोन्ही प्रकारची) बहुसंख्य पंचायती सरसकट दरानेच पाणीपट्टीची आकारणी करताना दिसतात. पाणीपट्टीच्या विद्यमान कायदेशीर तरतुदीनुसार पाणीपट्टीची आकारणी घराच्या बांधकाम प्रकारानुसार निर्धारित अशा कराधान-सोपान पद्धतीनुसार केली जाणे आवश्यक आहे. अनेक पंचायती पाणीपट्टीच्या आकारणीसंबंधातील कायदेशीर तरतुदींचे पालन करीत नसण्याची शक्यता बरीच बळकट व मोठी दिसते, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. घराच्या बांधकामानुसार आकारलेली सामान्य पाणीपट्टी असो अथवा स्वतंत्र कनेक्शनसाठी वापारलेल्या नळाच्या व्यासानुसार आकारलेली पाणीपट्टी असो, पाणीपट्टीचे आकारलेले दर कराधान-सोपानातील किमान पातळीशीच संलग्न ठेवण्याचा कल सर्वच ग्रामपंचायतींत दिसून येतो, याला लहान अथवा मोठया पंचायती अपवाद नाहीत. किंबहुना गेल्या चार वर्षांत जवळपास निम्म्या पंचायतींनी त्या आकारीत असलेल्या पाणीपट्टीच्या दरात वाढ केलेली असल्याचे दिसते. तरीही आकारित कर दरांबाबतचे चित्र वर वर्णन केल्याप्रमाणे आहे. मोठ्या पंचायतींच्या बाबतीत पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी आहे.

### (४) दिवाबत्ती कराद्वारे मिळणारा महसूल

४.३०. पंचायतींच्या दृष्टीने या कराद्वारे मिळणारा महसूल हा उत्पन्नाचा एक किरकोळ मार्ग आहे. किंबहुना कित्येक पंचायती दिवाबत्ती कराची आकारणीच करताना आढळत नाहीत. परंतु या कराद्वारे जमा होणाऱ्या महसुलात गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. या कराद्वारे मोठ्या पंचायतींना मिळणाऱ्या महसुलाची सरासरी रक्कम लक्षणीयरीत्या अधिक असल्याचे दिसून येते.

### (५) मार्केट व आठवड्यांचा बाजार यांवरील फी

४.३१. अनेक पंचायतींना या कराची आकारणी करण्याच्या संधीच उपलब्ध नसल्याने बऱ्याच पंचायतींद्वारे या कराची आकारणी केली जात नाही. परंतु ज्या पंचायतींनी या कराची आकारणी केली आहे, त्यांना यापासून मिळणारा महसूल नगण्य नाही. सर्वसाधारणपणे मोठी व अधिक विकसित गावे हीच आठवडे बाजार व मार्केट भरण्याची गावे असल्याने साहजिकच अशा मोठ्या पंचायतींचे प्रमाण प्रस्तुत कराची आकारणी करणाऱ्या एकूण पंचायतींत अधिक

आहे. कमी लोकसंख्या असणाऱ्या व तुलनेने कमी विकसित अशा पंचायतींकडे प्रस्तुत कराच्या आकारणीद्वारे जमा होणाऱ्या महसुलाची सरासरी रक्कम ही मोठ्या व अधिक विकसित पंचायतींच्या मानाने कमी असलेली आढळते.

४.३२. सीएसएसएसच्या अहवालात ग्रामपंचायतींच्या करेतर महसूल व अनुदानाविषयी खालील अभिप्राय नोंदविण्यात आले आहेत.

### करेतर महसूल

४.३३. ग्रामपंचायतींना करेतर साधनांद्वारे प्राप्त होणाऱ्या महसुलात अलिकडील काही वर्षांत भरीव वाढ झाल्याचे आढळून येते. परंतु या मार्गांनी मिळणाऱ्या महसुलाचे पंचायतींच्या एकूण उत्पन्नातील प्रमाण मात्र लक्षणीय असल्याचे अजून दिसत नाही. त्याचप्रमाणे करेतर मार्गाने महसूल जमा होणाऱ्या पंचायतींचे एकूणातील प्रमाणही तसे कमीच आहे. करेतर मार्गांनी महसूल जमा करणाऱ्या पंचायतींचे प्रमाण हे तुलनेने विकसित व मोठ्या पंचायतींमध्ये अधिक असल्याचे दिसते. तसेच अशा पंचायतींना करेतर मार्गांनी मिळणाऱ्या महसुलाची सरासरी रक्कमही अधिक असल्याचे दिसते. अधिक लोकसंख्येच्या व अधिक विकसित पंचायतींना करेतर उत्पन्नाचे मार्ग/साधने विकसित करून त्याद्वारे आपल्या महसुलात वाढ घडवून आणण्यास वाव असल्याचे यावरून सूचित होते. कमी लोकसंख्येच्या व त्यातही पुन्हा अवर्षणप्रवण क्षेत्रातील लहान पंचायतींना मात्र उत्पन्नाच्या करेतर मार्गांच्या विकासाद्वारे महसुलात वृद्धी घडवून आणण्यास फारसा वाव असल्याचे दिसत नाही. मोठ्या पंचायतींकडे शेती, पंचायतीच्या मालकीच्या इमारती, व्यापारी संकुले यांसारखी करेतर उत्पन्नाची नवनवीन साधने असल्याचे दिसते. याच्या तुलनेत लहान पंचायती मात्र करेतर उत्पन्नासाठी अजूनही खंड, वृक्ष लागवड, सेंद्रीय खतांची विक्री यांसारख्या पारंपरिक साधनांवरच अवलंबून असल्याचे दिसते.

### शासकीय अनुदाने

४.३४. पंचायतींच्या एकूण सरासरी उत्पन्नात अनुदानाद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण (सरासरी) कराद्वारे मिळणाऱ्या (सरासरी) महसुलापेक्षा किंचित कमी असलेले आढळते. अनुदानाद्वारे मिळणाऱ्या निधीचा पंचायतीच्या लोकसंख्येशी प्रत्यक्षानुसार संबंध असलेला दिसतो. परंतु लोकसंख्येने लहान असणाऱ्या पंचायतींच्या गटात मात्र तुलनेने कमी विकरित पंचायतींच्या उत्पन्नात अनुदानाचे प्रमाण त्याच लोकसंख्या गटातील अधिक विकसित पंचायतींपेक्षा अधिक असलेले दिसते. मात्र लोकसंख्येने अधिक असणाऱ्या पंचायतींच्या गटात विकसित पंचायतींच्या एकूण उत्पन्नातील अनुदानांचे प्रमाण हे तुलनेने कमी विकसित पंचायतींपेक्षा अधिक दिसते. पंचायतींना मिळणाऱ्या विविध अनुदानांपैकी महत्त्वाची अनुदाने पुढीलप्रमाणे :—

### (१) जमीन महसूल आणि समानीकरण अनुदान

४.३५. हे अनुदान म्हणजे पंचायतींना खात्रीशीर उत्पन्नाचे उपलब्ध असणारे भरवशाचे साधन आहे. परंतु प्रस्तुत अनुदानाच्या वितरणात होणाऱ्या विलंबामुळे पंचायतींना खात्रीशीर मिळणाऱ्या उत्पन्नाच्या या स्त्रोतावर प्रतिकूल परिणाम होतो. जमीन महसूल गोळा करणारी यंत्रणा आणि अनुदानाच्या स्वरूपात या रकमेचे वितरण करणारी यंत्रणा या दोन यंत्रणांतर्गत कार्यालयीन/प्रशासकीय विलंबामुळे बहुतेक वेळा पंचायतींना ही अनुदाने वेळेवर मिळत नाहीत. असे असूनही मोठ्या ग्रामपंचायती या तुलनेने अधिक सजग असल्याने या प्रशासकीय विलंबावर मात करून त्यांना येणे असणारी या अनुदानाची रक्कम त्यातल्या त्यात वेळेवर पदरात पाडून घेण्यात त्या यशस्वी होताना दिसतात. लहान पंचायतींना जमीन महसुल अनुदानापोटी मिळणारी सरासरी रक्कम ही किमान असली तरी या पंचायतींची सरासरी लोकसंख्याही कमी असल्याने या अनुदानाची दरडोई रक्कम मात्र लक्षणीय दिसते.

### (२) मुद्रांक शुल्क अनुदान

४.३६. मोठ्या व तुलनेने अधिक विकसित पंचायतींच्या बाबतीत या अनुदानापोटी मिळणारा महसूल हा त्यांच्या उत्पन्नाचे एक महत्त्वाचे साधन असल्याचे दिसते. अन्यथा सर्वसाधारणपणे पाहिल्यास, या अनुदानापोटी मिळणारी

रक्कम हे पंचायतींच्या उत्पन्नाचे फारसे महत्त्वाचे साधन असल्याचे दिसत नाही. तसेच या अनुदानाद्वारे निधी मिळणाऱ्या पंचायतींचे एकूणातील प्रमाणही अल्पच असल्याचे दिसते.

### (३) पाणीपुरवठ्यासाठी वापरलेल्या विजेच्या बिलापोटी मिळणारे अनुदान

४.३७. हे अनुदान प्राप्त होणाऱ्या पंचायतींचे एकूणातील प्रमाण कमी असल्याचे दिसते. परंतु ज्या पंचायतींना हे अनुदान प्राप्त होते, त्यांच्याकडून उत्पनातील या अनुदानाचे प्रमाण मात्र लक्षणीय असल्याचे दिसते. लोकसंख्येच्या दृष्टीने लहान असलेल्या पंचायतींपैकी, बहुसंख्य पंचायतींना प्रस्तुत अनुदानाची रक्कम प्रत्येक आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीतच मिळत असल्याचे आढळून आले. हे अनुदान मिळणाऱ्या पंचायतींचे प्रमाण व या अनुदानापोटी प्राप्त होणारी सरासरी रक्कम यांत गेल्या पाच वर्षांच्या काळात लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

### (४) जिल्हापरिषदा/पंचायत समिती यांजकडून मिळणारी अनुदाने/निधी

४.३८. बहुसंख्य पंचायतींच्या बाबतीत ही अनुदाने त्यांच्या उत्पन्नाचे एक महत्त्वाचे साधन असल्याचे आढळले. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत हे अनुदान मिळणाऱ्या पंचायतींचे प्रमाण व या अनुदानाची सरासरी रक्कम या दोहोंतही भरीव वाढ झाल्याचे दिसते. या अनुदानाची प्राप्ती होणाऱ्या पंचायतींमध्ये लहान पंचायतींपेक्षा मोठ्या पंचायतींचे प्रमाण अधिक आहे.

## ग्रामपंचायतींचा खर्च

४.३९. वित्त आयोगाने जिल्हापरिषदांकडून ग्रामपंचायतींच्या खर्चाची जी माहिती गोळा केली आहे त्यात असे आढळून येते की, ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात जी वार्षिक वाढ झाली आहे, बहुतांशी त्याच प्रमाणानुसार ग्रामपंचायतींच्या खर्चातही वाढ झाली आहे. ग्रामपंचायतींच्या खर्चाचे बाबवार विवरण खालील तक्ता क्रमांक ४.४ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक ४.४**

**ग्रामपंचायतींच्या खर्चाचे विवरणपत्र**

(रुपये हजारांत)

| वर्ष | इमारतीं वरील खर्च | आरोग्य व स्वच्छता व पाणी-पुरवठ्या-वरील खर्च | ग्रा. पं. ने नेमलेला कर्मचारी-वर्गावरील खर्च | इतर खर्च | एकूण खर्च | सरासरी वार्षिक खर्च (प्रति-ग्रा. पं.) | दरडोई खर्च (प्रत्यक्षात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९०–९१ .. | २,७७,२७८ | १,६०,९५७ | ८४,६३१ | १,७४,३१० | ६,९७,१७६ | २५.५४० | १४.४० |
| | (३९.७७) | (२३.०९) | (१२.१४) | (२५.००) | (१००%) | | |
| १९९१–९२ .. | ३,०२,८८३ | १,९७,०७७ | ९५,१२१ | १,८६,१८२ | ७,८१,२६३ | २८.६२१ | १६.१४ |
| | (३८.७७) | (२५.२३) | (१२.१८) | (२३.८३) | (१००%) | | |
| १९९२–९३ .. | ३,४५,४४९ | २,२८,२८८ | १,१२,४३७ | १,९०,६४७ | ८,७६,८२१ | ३२.१३१ | १८.११ |
| | (३९.४०) | (२६.०४) | (१२.८२) | (२१.७४) | (१००%) | | |
| १९९३–९४ .. | ४,५३,९२४ | २,७७,७७९ | १,३३,८७० | २,३७,०७५ | ११,०२,६४८ | ४०.४०६ | २२.७८ |
| | (४१.१७) | (२५.१९) | (१२.१४) | (२१.५०) | (१००%) | | |
| १९९४–९५ .. | ५,१७,०३१ | ३,२२,४३८ | १,५६,९९७ | २,४८,४८५ | १२,४४,९५१ | ४५.६२१ | २५.७२ |
| | (४१.५३) | (२५.९०) | (१२.६१) | (१९.९६) | (१००%) | | |
| सरासरी खर्च .. | ३,७९,३१३ | २,३७,३०८ | १,१६,६११ | २,०७,३४० | ९,४०,५७२ | ३४.४६७ | १९.४३ |
| टक्केवारी .. | (४०.३३) | (२५.२३) | (१२.४०) | (२२.०४) | (१००%) | | |
| वृद्धीदर .. | १७.९५ | १८.९२ | १७.०९ | ९.९७ | १६.२३ | | |

(आकृती क्र. ४)

स्त्रोत : जिल्हा परिषद



एच ४०९४–४

खर्चाच्या वार्षिक वाढीच्या दराचे अवलोकन करता हा दर उत्पन्नाप्रमाणेच सन १९९३–९४ साली मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते. १९९२–९३ साली हा वार्षिक वाढीचा दर १६.१९% एवढा झाल्याचे दिसते, तर तो १९९३–९४ साली वाढून २२.१९% एवढा झाल्याचे दिसते. नंतर हा दर कमी होऊन ११.८८ % झाल्याचे दिसते. १९९३–९४ साली हा दर वाढल्याचे कारण प्रामुख्याने त्या साली घेण्यात आलेल्या ग्रामअभियान कार्यक्रमामुळे असावे असे दिसते.

४.४०. ग्रामपंचायत खर्चाच्या प्रमुख बाबी प्राथम्यक्रमाने लावल्या असता खालीलप्रमाणे आढळतात :—

१. इमारती, रस्ते, गटारे यांचे बांधणी व दुरुस्तीवर होणारा खर्च (एकूण खर्चाच्या ४०.३३%.).

२. आरोग्य व स्वच्छता व पाणीपुरवठ्यावर होणारा खर्च. (एकूण खर्चाच्या २५.२३%).

३. इतर खर्च (एकूण खर्चाच्या २२.०४%).

४. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर होणारा खर्च (एकूण खर्चाच्या १२.४०%).

ग्रामपंचायतींच्या गेल्या ५ वर्षांची खर्चविषयक दिसलेल्या वैशिष्ट्यांचे, खर्चाचे विविध बाबींनुसार विवेचन पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

**सार्वजनिक इमारती व रस्ते यांवरील देखभालीवर होणारा खर्च**

४.४१. ग्रामपंचायतींमधील अंतर्गत रस्ते, इमारती, ग्रामपंचायत कार्यालय, समाजमंदिर, चावडी, स्मशान भूमी, बाजार, वाचनालय, कोंडवाडा, प्राथमिक शाळा यांच्या इमारतींवरील दुरुस्तीवर व देखभालीवर खर्च करीत असल्याचे आढळते. ग्रामपंचायत आपल्या उत्पन्नापैकी ४० % खर्च या बाबींवर करीत असल्याचे आढळते. खर्चाच्या बाबींमध्ये हा खर्च सर्वाधिक असल्याचे दिसते. ग्रामपंचायती आपल्या एकूण खर्चाच्या वार्षिक वाढीच्या तुलनेने इमारतींच्या दुरूस्तीवर अधिक खर्च करीत असल्याचे आढळते.

**१. आरोग्य, स्वच्छता व पाणीपुरवठ्यावर होणारा खर्च**

४.४२ ग्रामीण जनतेकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र हे जिल्हा परिषदांकडून चालविण्यात येत असले तरी ग्रामीण स्वच्छतेवर होणारा खर्च ग्रामपंचायती करतात. स्वच्छतागृहे बाधणे. गटार बाधणे, पाणीशुद्धीकरणासाठी टी. सी. एल. पावडर विकत घेणे, पाणीपुरवठ्याचा पंप चालविणे. विंधन विहिर दुरुस्तीचे अंशदान, विजेचे बिल इत्यादी बाबींचा यात समावेश होतो. एकंदर खर्चाच्या प्रमाणात हा खर्च २५.२३% आहे व गेल्या ५ वर्षांत वरील बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे असे दिसते. सन १९९०–९१ ला आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा या बाबींवर रुपये १६.०९ कोटी खर्च झाला तर १९९४–९५ साली हा खर्च दुपटीने वाढून रुपये ३२.२४ कोटी झाला. या बाबीवरील खर्चाच्या वाढीचा दर १९% होता. ग्राभपंचायतींच्या एकूण खर्चाच्या वार्षिक वाढीच्या तुलनेने आरोग्य व पाणीपुरवठा या बाबींवर ग्रामपंचायती जादा लक्ष देऊन खर्च करीत असल्याचे आढळून येते. नुकतेच शासनाने ग्रामपंचायतीकरिता टी.सी.एल. पावडर खरेदीच्या ५०% खर्च सोसण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. तसेच ग्रामपंचायतींना त्यांचे जमीन महसूल अनुदानाच्या ३५% हिस्सा आता पाणीपुरवठ्यावर खर्च करावा लागणार आहे. ह्या सर्व बाबी लक्षात घेता ग्रामपंचायतींचा आरोग्य, स्वच्छता व पाणीपुरवठा या बाबींवर भविष्यात खर्चाचे प्रमाण वाढणार आहे असे दिसते.


**इतर खर्च**

४.४३. ग्रामपंचायतींस वर नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर खर्च करावा लागतो. त्यात ग्रामपंचायत निधीतून मागासवर्गीयांसाठी घेतलेल्या योजनांचा ग्रामपंचायतींच्या सभेचा, सरपंच मानधन इ. बाबत होणाऱ्या खर्चाचा समावेश होतो. हा संपूर्ण खर्चाच्या २२.४% असल्याचे आढळते. १९९२–९३ आणि १९९४–९५ या वर्षांत वाढीचा दर अतिशय अत्यल्प म्हणजे अनुक्रमे २.३९% व ४.८१% एवढा होता. म्हणजे वार्षिक वाढीच्या दरापेक्षा फारच कमी होता.

Graph.xls(11)217

आकृति क्र. ४

ग्रामपंचायतींच्या खर्चाची टक्केवारी (१९९४-९५)



### ग्रामपंचायतींनी कर्मचाऱ्यांवर केलेला खर्च

४.४४. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा पगार, प्रवासभत्ता व इतर आनुषंगिक खर्च यांचा वरील बाबींमधील खर्चामध्ये समावेश होतो. संपूर्ण खर्चाच्या १२.४०% ग्रामपंचायत या बाबींवर खर्च करीत असल्याचे आढळते. तसेच प्रचलित शासकीय आदेशातील टक्केवारीपेक्षा या बाबींवरील खर्च बराच कमी असल्याचे आढळते.

४.४५. सीएसएसएसच्या नमुना पाहणीतील पंचायतींच्या गेल्या पाच वर्षांच्या खर्चविषयक सांख्यिकीच्या विश्लेषणाद्वारे दिसलेल्या वैशिष्ट्यांचे विविध बाबींनुसार विवेचन खालीलप्रमाणे आढळले.

### १. आरोग्य व स्वच्छतेवर होणारा खर्च

४.४६. या सुविधेवर तुलनने अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती लहान पंचायतींपेक्षा मोठ्या पंचायतींमध्ये अधिक दिसते. ही सुविधा पुरविणाऱ्या पंचायतींमध्ये ही लहान पंचायतींच्या तुलनेत मोठ्या पंचायतींचे प्रमाण अधिक आहे. ही सुविधा पुरविणाऱ्या पंचायतींचे प्रमाण व या सेवेच्या पुरवठ्यावर खर्च झालेली रक्कम या दोन्ही गोष्टी पंचायतींच्या विकासाच्या पातळीशी निगडित असल्याचे दिसते. सर्वच प्रकारच्या पंचायतींमध्ये या सुविधेच्या पुरवठ्यावर खर्च होणाऱ्या रकमेत गेल्या काही वर्षांत लक्षणीय वाढ घडून येत असल्याचे दिसते. याला अपवाद केवळ आदिवासी पंचायतींचा आहे. या गटातील पंचायतींद्वारे प्रस्तुत सेवेच्या पुरवठ्यावरील खर्चात झालेल्या वाढीचे प्रमाण अन्य पंचायतींच्या बाबतीतील वाढीपेक्षा कमी असल्याचे दिसते. पंचायतींच्या दृष्टीने या सेवेच्या पुरवठ्यास व त्यावरील खर्चास फारसे प्राधान्य दिले जात असल्याचे आढळून येत नाही.

### २. पाणीपुरवठ्याचा खर्च

४.४७. गेल्या काही वर्षांत पाणीपुरवठ्यावर खर्च करणाऱ्या पंचायतींचे प्रमाण वाढताना दिसतच होते. परंतु अलिकडच्या काही वर्षांत तर हे प्रमाण अत्यंत लक्षणीय रीत्या वाढलेले दिसते. पाणीपुरवठ्यावर खर्च करणाऱ्या पंचायतींचे सर्वाधिक प्रमाण अवर्षणप्रवण विभागातील पंचायतींच्या गटात असल्याचे दिसते. अवर्षणप्रवण विभागांतील पंचायतींमध्येही पुन्हा पाणीपुरवठ्यावर खर्च करणाऱ्या पंचायतींचे सर्वाधिक प्रमाण त्यातल्या त्यात अधिक विकसित पंचायतींमध्ये दिसून येते. मोठ्या पंचायती आणि त्यातील अधिक विकसित पंचायती या लहान व त्यातही पुन्हा कमी विकसित पंचायतींपेक्षा पाणीपुरवठ्यावर अधिक रक्कम खर्च करताना दिसतात. पाणीपुरवठ्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण सर्वच पंचायतींमध्ये वाढत असल्याचे दिसते.

### ३. दिवाबत्तीवरील खर्च

४.४८. दिवाबत्तीवर खर्च करणाऱ्या पंचायतींचे प्रमाण पंचायतींच्या विकासाच्या पातळीशी प्रत्यक्षानुसारी संबंधित असलेले दिसते. अन्यथा पंचायतींच्या वर्गीकरणाच्या अन्य प्रकारांनुसार विविध पंचायतींद्वारा या सुविधेवर होणाऱ्या खर्चात फारसा फरक दिसत नाही. या सुविधेवर खर्च करणाऱ्या पंचायतींच्या एकूणातील प्रमाण लक्षणीय आहे. परंतु दिवाबत्तीवरील खर्चाचे पंचायतींच्या एकूण खर्चातील प्रमाण मात्र तसे वाजवीच असल्याचे आढळते. सर्वच पंचायतींनी दिवाबत्तीवर खर्च केलेल्या सरासरी रकमेत अलिकडे सातत्याने वाढ होताना दिसते. त्यातही अधिक दिलासा देणारी बाब म्हणजे अवर्षणप्रवण विभागांतील पंचायतींच्या दिवाबत्तीवरील खर्चातही अलिकडे भरीव वाढ होताना दिसत आहे.

### ४. अंतर्गत रस्ते आणि गटार बांधणी/दुरुस्ती यांवरील खर्च

४.४९. अंतर्गत रस्ते व गटारे यांचे बांधकाम अथवा दुरुस्तीवर खर्च करणाऱ्या पंचायतींचे प्रमाण लहान पंचायतींपेक्षा मोठ्या पंचायतींमध्ये अधिक आहे. या सेवेवर खर्च होणाऱ्या सरासरी रकमेचे पंचायतींच्या एकूण खर्चातील प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळते. तसेच, रस्ते व गटारे बांधणी अथवा दुरुस्तीवर खर्ची पडणाऱ्या रकमेचा पंचायतींची लोकसंख्या व विकासाची पातळी या दोहोंशी प्रत्यक्षानुसारी संबंध असल्याचे दिसते. मोठ्या पंचायतींत उपलब्ध असणाऱ्या रस्ते व गटारे या सुविधांचा गुणात्मक दर्जा लहान पंचायतींत उपलब्ध असणाऱ्या त्याच प्रकारच्या सुविधांपेक्षा

खूपच श्रेष्ठ असल्याचे आढळून येते. याचमुळे या सुविधांची देखभाल व दुरुस्ती यावर होणारा आवर्ती खर्च हा मोठ्या पंचायतींच्या बाबतीत लहान पंचायतींपेक्षा अधिक असल्याचे दिसते.

### ५. सार्वजनिक इमारतींची देखभाल व दुरुस्तीवर होणारा खर्च

४.५०. एकूणांपैकी जवळपास एकतृतियांश पंचायती त्यांच्या अखत्यारीतील सार्वजनिक इमारतींची देखभाल व दुरुस्ती यावर कोणत्याही प्रकारचा खर्च करताना दिसत नाहीत. परंतु या कामावर ज्या पंचायती खर्च करतात, त्यांच्या बाबतीत अशा देखभाल व दुरुस्तीवर होणाऱ्या खर्चाचे त्यांच्या एकूण खर्चातील प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून येते. या प्रमाणात अलिकडील पाच वर्षांत लक्षणीय वाढ झाल्याचेही आढळून येते. गुणात्मक दर्जा श्रेष्ठ असणाऱ्या मालमत्ता मोठ्या पंचायतींकडे अधिक प्रमाणात दिसतात. अशा मालमत्तांच्या उपलब्धतेनुसार त्यांच्या देखभाल व दुरुस्तीवर होणाऱ्या सरासरी खर्चाची रक्कमही बदलताना दिसते.

### ६. आस्थापनेवरील खर्च (वेतनाव्यतिरिक्त)

४.५१. जवळपास सर्वच पंचायतींच्या बाबतीत खर्चाची ही अनिवार्य अशी बाब आहे. आस्थापनेवर पंचायती केवळ अत्यावश्यक तेव्हाच व तितकीच रक्कम खर्च करीत असाव्यात असे दिसते. या खर्चात गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत फारसे चढ-उतार झाल्याचे दिसत नाहीत. आदिवासी पंचायतींच्या बाबतीत आस्थापनेवर खर्च करण्याची प्रवृत्ती अधिक विकसित पंचायतींमध्ये कमी विकसित आदिवासी पंचायतींपेक्षा अधिक असल्याचे आढळून येते.

### ७. पंचायतींच्या सेवकवर्गाचे वेतन व अन्य आनुषंगिक बाबींवरील खर्च

४.५२. पंचायतींच्या सेवकवर्गाच्या पगारापोटी खर्च होणाऱ्या रकमेचे पंचायतींच्या एकूण खर्चातील प्रमाण दखल घेण्याजोगे आहे. या खर्चाचे गेल्या पाच वर्षांतील प्रमाण लक्षणीय रीत्या वाढलेले आहे. या बाबीवर खर्च करणाऱ्या पंचायतींचे एकूणातील प्रमाण बरेच अधिक आहे. मात्र, हे प्रमाण आदिवासी पंचायतींच्या बाबतीत कमी आहे. लहान पंचायतींच्या तुलनेत मोठ्या पंचायती या बाबीवर अधिक खर्च करीत असल्याचे दिसते. सर्वाधिक लोकसंख्या गटातील पंचायतींच्या बाबतीत तर हे चित्र अधिकच स्पष्टपणे दिसते. लहान पंचायतींमध्ये बहुतेक वेळा केवळ एकच कर्मचारी नेमलेला आढळतो. अधिक करून हा कर्मचारी म्हणजे पंचायतीचा शिपाई असतो. परंतु मोठ्या पंचायतींमध्ये मात्र वेगवेगळ्या प्रकारच्या कामांसाठी स्वतंत्र कर्मचारी नेमलेले आढळतात. परिणामी, मोठ्या पंचायतींची सेवकसंख्याही लक्षणीय असते.

### ८. शिक्षणावरील खर्च

४.५३. शिक्षणावर कोणत्याही प्रकारचा खर्च न करणाऱ्या पंचायतींचे प्रमाण अतिशय लक्षणीय असलेले दिसून येते. अलिकडील पाच वर्षांतही या परिस्थितीत फारसा बदल पडून आलेला दिसून येत नाही. परंतु शिक्षणावर खर्च करणाऱ्या पंचायतींच्या बाबतीत त्यांच्या सरासरी खर्चात गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत भरीव वाढ झाल्याचे दिसते. मोठ्या पंचायतींच्या क्षेत्रात शिक्षणाची कोणत्याही प्रकारची सुविधा (उदा. शाळा / अंगणवाडी / बालवाडी इत्यादी) उपलब्ध असण्यावर अगर नसण्यावर त्या त्या पंचायतींच्या एकूण खर्चाची पातळी अवलंबून असल्याचे आढळते.

□ □

## प्रकरण ५

# नागरी स्थानिक संस्थांची सद्य:स्थिती

**सर्वसाधारण**

५.१. महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिका यांचे कामकाज ४ वेगवेगळ्या अधिनियमांद्वारे चालते. या अधिनियमांन्वये दिनांक ३१ मार्च १९९५ अखेर एकूण १२ महानगरपालिका व २३२ नगरपरिषदा कार्यरत होत्या. या नागरी संस्थांच्या गेल्या तीन दशकांतील वाढीची माहिती तक्ता क्र. ५.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. ५.१**

| संस्थेचा प्रकार | संस्थांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | १९७१ | १९८१ | १९९१ | १९९५ (मार्च) |
| महानगरपालिका .. .. | ५ | ११ | ११ | १२ |
| नगरपरिषदा .. .. | २२२ | २२४ | २२६ | २३२ |

५.२. राज्यातील नागरी संस्थांची विभागनिहाय माहिती खालिलप्रमाणे आहे :—

**विभागनिहाय नागरी संस्थांची संख्या**

| विभाग | महानगरपालिका | नगरपरिषदांची संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| कोकण .. .. .. | ४ | ४ | ७ | १८ | ३३ |
| नाशिक .. .. .. | १ | ५ | १० | २४ | ४० |
| पुणे .. .. .. | ४ | ४ | ८ | ३१ | ४७ |
| औरंगाबाद .. .. .. | १ | ५ | ६ | ४२ | ५४ |
| अमरावती .. .. .. | १ | ३ | १० | २६ | ४० |
| नागपूर .. .. .. | १ | ३ | ८ | १८ | ३० |
| एकूण .. | १२ | २४ | ४९ | १५९ | २४४ |

५.३. १९९१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ७८९.३७ लक्ष असून त्यातील नागरी विभागातील लोकसंख्या २९२.८० लाख म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ३७.१ टक्के होती.

५.४. या नागरी संस्थांचे क्षेत्रफळ त्यांची वर्गनिहाय लोकसंख्या, लोकसंख्येची घनता याचा तपशील थोडक्यात तक्ता क्र. ५.२ व ५.३ मधे दिला आहे.

## तक्ता क्र. ५.२

| अनुक्रमांक | महानगरपालिका | स्थापना वर्ष | क्षेत्रफळ चौ. कि. मी. | लोकसंख्या (१९९१ जनगणना | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | १८८८ | ६०३.००० | ९९,२५,८९१ | १६,४६१ |
| २ | ठाणे | १९८२ | १४७.००० | ८,०३,३८९ | ५,४६५ |
| ३ | नवी मुंबई | १९९२ | १६४.००० | ३,१८,४४७ | १,९४२ |
| ४ | कल्याण | १९८३ | १३०.२८३ | ८,२०,०८९ | ६,२९५ |
| ५ | नाशिक | १९८२ | २५९.१०० | ६,५६,९२५ | २,५३५ |
| ६ | पुणे | १९५० | १४६.११० | १५,६६,६५१ | १०,७२२ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | १९८२ | ८७.०५० | ५,१७,०८३ | ५,९४० |
| ८ | सोलापूर | १९६४ | १८०.६९० | ७,०८,७४१ | ३,९२२ |
| ९ | कोल्हापूर | १९७२ | ६६.८२० | ४,०६,३७० | ६,०८२ |
| १० | औरंगाबाद | १९८२ | १३८.००० | ५,७३,२७२ | ४,१५४ |
| ११ | अमरावती | १९८३ | १२४.६५० | ४,३३,७४६ | ३,४८० |
| १२ | नागपूर | १९५१ | २१७.५६० | १६,२४,७५२ | ७,४६८ |
| | एकूण | | २,२६४.२६ | १,८३,५५,३५६ | ८,१०७ |

## तक्ता क्रमांक ५.३

| संस्थेचा प्रकार | संख्या | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसंख्या | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|---|
| अ वर्ग नगरपरिषदा | २४ | ७२६.९० | ४७,०८,४१६ (१६.०८) | ६,४७७ |
| ब वर्ग नगरपरिषदा | ४९ | ८४०.६३ | २८,८२,१२१ (९.८४) | ३,४२९ |
| क वर्ग नगरपरिषदा | १५९ | २,१७४.९६ | ३३,३३,८८० (११.३८) | १,५३३ |
| एकूण नगरपरिषदा | २३२ | ३,७४२.४९ | १,०९,२४,४१७ (३७.३१) | २,९१९ |
| महानगरपालिका | १२ | २,२६४.२६ | १,८३,५५,३५६ (६२.६९) | ८,१०७ |
| एकूण सर्व नागरी संस्था | २४४ | ६,००६.७५ | २,९२,७९,७७३ (१००) | ४,८७४ |

१. (कंसातील आकडे एकूण नागरी लोकसंख्येशी टक्केवारी दाखवितात)

२. महानगरपालिका व नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्न व खर्च काढण्यासाठी या तक्त्यातील १९९१ ची लोकसंख्या विचारात घेतली आहे.

५.५. वरील तपशिलावरून असे दिसून येईल की, एकूण नागरी क्षेत्रातील लोकसंख्येपैकी ६२.७० टक्के लोकसंख्या महानगरपालिका क्षेत्रात तर अ, ब व क वर्ग नगरपरिषदांसाठी हेच प्रमाण अनुक्रमे १६.०८, ९.८४ व ११.३८ असे आहे. लोकसंख्येच्या घनतेचा विचार केल्यास सर्व नागरी संस्थांसाठी सरासरी घनतेचे प्रमाण ४,८७४ प्र.चौ.कि.मी. आहे. महानगरपालिका क्षेत्रात मात्र घनतेचे प्रमाण सरासरीच्या जवळजवळ दुपटी एवढे महणजे ८,१०७ प्र.चौ.कि.मी. आहे.

**लोकसंख्येची वाढ**

५.६. महाराष्ट्र राज्यात १९७१ मध्ये एकूण नागरी संस्थांची संख्या २२७ होती व त्यांची लोकसंख्या १५१.१७ लक्ष होती. गेल्या २४ वर्षांच्या कालावधीत नागरी संस्थांच्या संख्येत २२ संस्थांची वाढ झाली असून एकूण संस्थांची संख्या २४४ झाली आहे व लोकसंख्या १५१.१७ लक्ष (१९७१) वरून २९२.८० लक्ष (१९९१) पर्यंत वाढली आहे. याचाच अर्थ नागरी लोकसंख्येत गेल्या २ दशकांत जवळजवळ ९३ ते ९४ टक्के एवढी वाढ झाली आहे. आज राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी ३७.१ टक्के लोकसंख्या नागरी विभागांत राहात आहे. महाराष्ट्र राज्यातील मोठ्या शहरात तसेच परिसरांत औद्योगिकीकरण जलद गतीने होत असल्याने व शहरी भागात रोजगाराच्या संधी फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने इसवी सन २००० पर्यंत राज्यातील नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ४४ टक्केपर्यंत वाढेल असा अंदाज अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी त्यांच्या एका अहवालात व्यक्त केला आहे.

५.७. राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात, विशेषतः मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड तसेच इतर नागरी भागातही औद्योगिकिकरण झपाट्याने होत असल्याने राज्याच्या तसेच भारताच्या इतर भागांतून फार मोठ्या प्रमाणात लोक येत असून लोकसंख्येत सतत वाढ होत आहे. यामुळे शहराच्या निरनिराळ्या भागांत मोकळ्या शासकीय, निमशासकीय, खाजगी मोकळ्या जमिनी, रस्त्यांच्या कडा, रेल्वेमार्गांचेलगत असंख्य झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. या झोपडपट्यांमध्ये राहणारी जनता प्रामुख्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकापैकी आहे. त्यामुळे या वस्त्यांमध्ये मूलभूत सेवा व सुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेवर पडलेली आहे. या सर्वांचा भार सध्याच्या नागरी सेवा-सुविधांवर फार मोठ्या प्रमाणात पडला असल्याने आर्थिक दृष्ट्या नागरी संस्थांची स्थिती फारच बिकट झाली आहे.

**महानगरपालिका/नगरपरिषदांची भूमिका**

५.८. राज्यांसाठी राज्यशासन, विभागीय स्तरावर विभागीय कार्यालये, जिल्हा तालुका स्तरावर शासकीय यंत्रणा अशी राज्याची प्रशासकीय यंत्रणा महाराष्ट्र राज्यात असून राज्याचा कारभार चालविला जातो. असे असले तरी प्रत्येक शहर, गाव यांचे सामाजिक/आर्थिक/राजकीय असे प्रश्न/समरया असतात. स्थानिक जनतेच्या कोणत्या मूलभूत समस्या आहेत, त्यांना कोणत्या सेवा-सुविधांची गरज आहे, त्या कशा रीतीने सोडविता येतील याचा सर्वंकष विचार व सोडवणूक स्थानिक पातळीवरच होऊ शकते. या विचारापासूनच नागरी भागांसाठी महानगरपालिका व नगरपरिषदांची स्थापना झाली आहे. शहराचे आरोग्य, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, शाळा, रस्ते, पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे/नाल्या, दवाखाने, सार्वजनिक सुरक्षितता, जमिनीचा नियोजित वापर, नगररचना, शहराचे सुशोभीकरण, स्मशान भूमी, साफसफाई व कचऱ्याची विल्हेवाट, नागरी विकासाची कामे इ. प्रश्नांबाबतची जाणीव स्थानिक लोकांना फार चांगल्या प्रकारे असते. उत्पन्नाच्या मर्यादा व प्रश्नांची तीव्रता लक्षात घेऊन त्याचा क्रम ठरविणे, स्थानिक स्तरावर त्वरित निर्णय घेणे व ती कामे करवून घेणे इ. बाबी स्थानिक पातळीवरच जबाबदारीने व कार्यक्षमतेने पार पाडल्या जाऊ शकतात व चांगल्या प्रकारे विकास साधला जाऊ शकतो. तेव्हा महानगरपालिका/नगरपरिषदा या स्थानिक संस्थांना नागरी जीवनात एक महत्त्वाचे असे स्थान असून त्या नगरातील जनतेच्या सामाजिक व आर्थिक जीवनात महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

## नागरी संस्थांची रचना

### नगरपरिषदा

५.९. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ अन्वये राज्य शासन ज्या स्थानिक क्षेत्रांची लोकसंख्या २५,००० पेक्षा कमी नाही असे क्षेत्र नगरपरिषद क्षेत्र म्हणून जाहीर करु शकते.

५.१०. राज्यांमध्ये जी थंड हवेची ठिकाणे व गिरीस्थाने आहेत त्या सर्वांचा समावेश क-वर्ग नगरपरिषदांमध्ये करण्यात आलेला आहे. भारतीय संविधानात ७४ व्या घटना दुरुस्ती अन्वये अनुच्छेद (आर्टिकल) २४३-क्यू मधील तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाने नगरपरिषदांच्या फेरवर्गीकरणाबाबत ' महाराष्ट्र महानगरपालिका/नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९४ ' अन्वये सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार नगरपरिषदांची वर्गवारी खालील लोकसंख्येच्या प्रमाणात असेल. याच सुधारणा अधिनियमाद्वारे नगरपंचायती व औद्योगिक नगरे स्थापन करण्यासंदर्भात नव्याने तरतूद करण्यात आली आहे. शासनाच्या दिनांक २८ ऑगस्ट १९९६ च्या अधिसूचनेद्वारे १९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर नगरपरिषदांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

| वर्ग | लोकसंख्या निकष | नगरपरिषदांची संख्या |
|---|---|---|
| अ वर्ग नगरपरिषदा . . . . | १ लाख लोकसंख्येपेक्षा जास्त (अ-वर्ग लहान नागरी क्षेत्र) | २२ |
| ब वर्ग नगरपरिषदा . . . . | ४०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या परंतु १ लाखापेक्षा जास्त नाही. (ब-वर्ग लहान नागरी क्षेत्र). | ४७ |
| क वर्ग नगरपरिषदा . . . . | ४०,००० किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या (क-वर्ग लहान नागरी क्षेत्र). | १६४ |
| | एकूण . . | २३३ |

५.११. फेरवर्गीकरणामुळे अ-वर्गातील नगरपरिषदांची संख्या २४ वरून २२ ब-वर्गातील नगरपरिषदांची संख्या ४९ वरून ४७ पर्यंत कमी झाली तर क-वर्गातील नगरपरिषदांची संख्या १५९ वरून १६४ पर्यंत वाढली आहे. या १६४ मध्ये कुपवाड, जिल्हा सांगली या नगरपरिषदेची नव्याने भर पडली आहे. हे वर्गीकरण दिनांक २८ ऑगस्ट १९९६ पासून लागू करण्यात आले आहे. असे असले तरी आयोगाने पूर्वीच गोळा केलेली माहिती पूर्वीच्या नगरपरिषदांच्या वर्गीकरणाप्रमाणे संकलित करून त्यानुसार माहितीचे विश्लेषण केले आहे.

### नगरपरिषदा/महानगरपालिकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

५.१२. नगरपरिषदा व महानगरपालिकांची कर्तव्ये, कार्ये व सोपविलेल्या जबाबदाऱ्यांचा विचार केल्यास असे दिसून येते की, संबंधित क्षेत्रांतील नागरिकांच्या जन्मापासून तर त्यांच्या मृत्यूपर्यंत आवश्यक असलेल्या नागरी सुख-सुविधा, सुरक्षितता, आरोग्य, अत्यावश्यक गरजा पुरविण्याची अधिनियमात तरतूद केली आहे. अधिनियमानुसार कार्याची (१) आवश्यक व (२) स्वेच्छाधीन कर्तव्ये अशी विभागणी केली आहे.

५.१३. **आवश्यक कर्तव्ये.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४९(२) अन्वये आवश्यक कर्तव्ये व कार्ये तसेच ४९(३) अन्वये स्वेच्छाधीन कर्तव्ये व कार्ये तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६१ व ६३ अन्वये नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम

५७ व कलम ५८ अन्वये तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६३ व कलम ६६ अन्वये आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्ये विहित केलेली आहेत. आवश्यक कर्तव्यांमध्ये सार्वजनिक रस्त्यांची व जागांची सफाई व दिवाबत्ती, मलनिःस्सारण, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, अग्निशामक दल, रुग्णालये आणि दवाखाने यांच्या व्यवस्थापनाद्वारे सार्वजनिक आरोग्य सेवा पुरविणे, धोकादायक व्यवसायापासून सार्वजनिक सुरक्षितता बिघडणार नाही यासाठी नियम करणे, बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी जागा निश्चित करणे व ती सुव्यवस्थित ठेवणे, देवीरोग निर्मूलनासाठी सार्वजनिक लस टोचणी, आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक अशा वस्त्यांचे पुनःप्रापन करणे, संसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, रस्ते आणि पूल बांधणे व त्यांची देखभाल/दुरुस्ती करणे, पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून सुस्थितीत ठेवणे, प्राथमिक शिक्षणासाठी योग्य इमारती उपलब्ध करणे व सुस्थितीत ठेवणे, जन्म व मृत्यु यांच्या नोंदी ठेवणे, दुष्काळात आणि नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या व्यक्तींना मदत पुरविणे यांचा समावेश होतो.

५.१४. **स्वेच्छाधीन कर्तव्ये.—स्वेच्छा निर्णयानुसार करण्यास अनुमती असलेल्या कर्तव्यामध्ये पुढील प्रकारच्या** बाबींचा समावेश आहे :—

(१) आजारी आणि अपंग व्यक्तींची काळजी घेण्यासाठी संस्था स्थापन करणे.

(२) गरोदर स्त्रियांना तसेच नवप्रसुत माता, लहान मुले आणि शाळेत जाणारी मुले यांना दुधाचा पुरवठा करणे.

(३) आपल्या कार्यक्षेत्रात प्रवासी मोटार वाहतूक किंवा ट्राम यासारख्या सुविधा उपलब्ध करणे.

(४) ग्रंथालये, पोहण्याचे तलाव इत्यादी सुविधा निर्माण करणे.

(५) नाट्यगृहे, सार्वजनिक बागा, क्रिडा संवर्धनासाठी प्रदर्शने, रुग्णवाहिका सेवा, विवाह नोंदणी इत्यादी.

(६) ग्रंथालये, वस्तु संग्रहालये, कला दालने, वनस्पती संग्रहालये, प्राणी संग्रहालये स्थापन करणे.

(७) मलप्रवाहाची विल्हेवाट लावण्यासाठी कारखान्यांची स्थापना करणे.

(८) वीज शक्ती व गॅस पुरवण्याची व्यवस्था करणे. (सध्या राज्यात कोणतीच नागरी संस्था नागरिकांना गॅस पुरविण्याचे कार्य करीत नाही.)

(९) खाजगीरित्या चालणाऱ्या प्राथमिक/माध्यमिक शाळांना तसेच विद्यार्थी वसतिगृहांना अनुदाने/देणग्या देणे.

(१०) गलिच्छ वस्तींची सुधारणा करणे.

(११) प्रसुतिगृहे व बालकल्याण केंद्रे स्थापन करणे व चालविणे.

(१२) सार्वजनिक आरोग्य संवर्धनासाठी रासायनिक किंवा अणुजीव शास्त्रीय प्रयोग शाळा स्थापन करणे व चालविणे.

(१३) रुग्णवाहिका सेवेची व्यवस्था करणे.

(१४) पोहण्याचे तलाव, सार्वजनिक स्नानगृहे.

(१५) विवाह नोंदणी.

(१६) उपद्रव देऊ शकणाऱ्या प्राण्यांचा, पक्ष्यांचा नाश करणे.

(१७) शहरातील नागरिकांवर ओढवलेली आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना.

(१८) टंचाईच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची विक्री करण्याकरिता दुकाने/विक्री केंद्रे स्थापन करणे/चालविणे.

(१९) स्वतःच्या कर्मचाऱ्यांचे व त्यांचेवर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाचे संवर्धन करणे.

५.१५. भारतीय संविधानातील ७४ व्या घटना दुरुस्ती अन्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या संदर्भातील घटनेत अंतर्भूत केलेल्या १२ व्या अनुसूचीतील बाबी विचारात घेऊन राज्य शासनाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित वेगवेगळ्या चारही अधिनियमातील कर्तव्ये व कार्ये ज्या कलमात विहित केलेली आहेत त्यामध्ये " महाराष्ट्र महानगर

पालिका/नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९४ " (१९९४ चा ४१ वा सुधारणा अधिनियम) अन्वये सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार १२ व्या अनुसूचीतील ज्या कर्तव्ये व कार्यासंबंधीच्या बाबी पूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सोपविलेल्या नव्हत्या, त्या सर्व बाबी आवश्यक किंवा ऐच्छिक कर्तव्ये म्हणून पुढीलप्रमाणे सोपविलेली आहेत :—

| कर्तव्ये | आवश्यक किंवा ऐच्छिक |
|---|---|
| (१) आर्थिक व सामाजिक विकासासाठी नियोजन . . | महानगरपालिका/नगरपरिषदांचे आवश्यक कर्तव्य म्हणून. |
| (२) नागरी वनीकरण, पर्यावरण संरक्षण व वातावरण विषयक बाबींना चालना. | महानगरपालिका/नगरपरिषदांचे आवश्यक कर्तव्य म्हणून. |
| (३) गलिच्छ वस्ती सुधारणा व श्रेणीवाढ . . | महानगरपालिका/नगरपरिषदांचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून. |
| (४) नागरी दारिद्र्य कमी करणे . . . . | महानगरपालिका/नगरपरिषदांचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून. |
| (५) जनावरांसाठी कोंडवाडे आणि जनावरांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध. | मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका/ नगरपरिषदांचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून. |
| (६) चर्म प्रक्रिया उद्योगांचे विनियमन . . | मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका/ नगरपरिषदांचे ऐच्छिक कर्तव्य म्हणून. |

५.१६. नगरपरिषदा व महानगरपालिकांकडे सोपविलेली कार्ये व जबाबदाऱ्या त्यांनी स्वतःच्या आर्थिक बळावर पार पाडावयाच्या आहेत. यासाठी आर्थिक उत्पन्नाची साधनेही अधिनियमाद्वारे विहित केलेली आहेत. असे असले तरी आवश्यक व ऐच्छिक कार्याचा व्याप, वाढते नागरीकरण व त्यासाठी लागणारा निधी लक्षात घेता ही कार्ये निधी अभावी नगरपरिषदा/महानगरपालिकांना पूर्णतः पार पाडणे त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे दृष्टीकोनातून कठीण जाते. त्यामुळे नगरपरिषदा/महानगरपालिकां बरोबरच राज्य शासनाचा ही कार्ये पार पाडण्यासाठी सहभाग असतो. काही नगरपरिषदांचेबाबत आर्थिक नियोजनासंदर्भात दूरदृष्टीचा अभाव दिसून आल्याने आवश्यक व ऐच्छिक कार्ये पार पाडताना, त्यांचे प्राथम्यक्रम विचारात न घेता, उपलब्ध निधी, आवश्यक बाबीपेक्षा ऐच्छिक बाबींवर खर्च केल्याचेही दिसून आले आहे. राज्य शासनाला या बाबींची कल्पना व जाणीव असल्याने राज्य शासन नगरपरिषदा/महानगरपालिका यांना सोपविलेली कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी काही प्रमाणात का होईना अनुदानाचे स्वरुपात आर्थिक मदत करीत असते. तरीही नागरी जीवनाशी संबंधित असलेली कार्ये नगरपरिषदा/महानगरपालिकेकडून पूर्णतः पार पाडली जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

५.१७. नागरी संस्थांकडे सोपविलेली नवीन कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या नागरी संस्थांना राज्य शासनाने आवश्यक तो निधी हस्तांतरित करावा किंवा त्यासाठी अनुरुप अशी उत्पन्नाची साधने उपलब्ध करून या संस्था आर्थिकदृष्ट्या सबळ व स्वायत्त व्हाव्यात व अशा प्रकारे नागरी भागात, केंद्र शासन व राज्य शासन यांच्या धर्तीवरच, स्थानिक संस्थांचा " नागरी शासन " असा प्रशासकीय तिसरा स्तर निर्माण व्हावा असा ७४ व्या घटना दुरुस्तीचा उद्देश आहे.

५.१८. नागरी संस्थांची आर्थिक स्थिती लक्षात घेता या संस्था आवश्यक त्या मूलभूत सेवा-सुविधाही पुरेशा निधी अभावी व्यवस्थितपणे चालू ठेवू शकत नाही. त्यामुळे त्या सेवा-सुविधांचा विस्तार करणे, त्यात नव्याने भर घालणे, त्याची देखभाल/दुरुस्ती इ. बाबीवर खर्च करणे या संस्थांना अशक्य ठरते. अशा परिस्थितीत नवीन जबाबदाऱ्या या संस्था शासनाच्या आर्थिक मदतीशिवाय कितपत पेलू शकतील याबाबत शंका आहे. म्हणून बदललेल्या संदर्भात नागरी संस्थांना स्वतःची साधनसंपत्ती उभारणे, त्यांचा कार्यक्षमरित्या वापर करणे आणि त्यांना शासनाने सर्वतोपरीने मदत करणे आवश्यक झाले आहे.

५.१९. नागरी विभागात राबवावयाच्या राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या काही योजना या प्रामुख्याने नगरपरिषदा/महानगरपालिका यांचे मार्फत राबविल्या जातात व अशा योजनांसाठी राज्य शासन व केंद्र शासन संबंधित नगरपरिषदा/महानगरपालिकांना निधी उपलब्ध करून देते. उदा. नेहरू रोजगार योजना, लहान व मध्यम शहरांच्या एकात्मिकृत विकास योजना (आयडीएसएमटी), गरीबांसाठी नागरी मूलभूत सेवा योजना (युबीएसपी), इ. पर्यायाने नागरी क्षेत्रातील निगडीत अशा बाबींवरील योजनांचे कार्यान्वयन केंद्र/राज्य सरकार करून प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या नगरपरिषदांना त्यांची कर्तव्ये/कार्ये पार पाडण्यासाठी तांत्रिक तसेच आर्थिक मदत करते.

**कार्यकारी अधिकारी व कर्मचारीवृंद**

५.२०. राज्यातील नगरपरिषदा/महानगरपालिका या नागरी स्वायत्त संस्था आहेत. या संस्थांवर सोपविलेली विविध प्रकारची कामे पार पाडण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय, तांत्रिक व व्यवस्थापकीय कर्मचारी तसेच कामगारांची आवश्यकता असते. नगरपरिषदांना आवश्यकतेप्रमाणे कर्मचाऱ्यांची/कामगारांची पदे शासनाची मान्यता घेऊन निर्माण करणे व योग्य त्या मार्गाने भरण्याची तरतूद अधिनियमाद्वारे करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे बाबतीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करणे व त्यावर नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकांना आहेत, वैधानिक पदांचे संदर्भात मात्र महानगरपालिकेला शासनाची मान्यता प्राप्त करावी लागते. नगरपरिषदांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार कांही वैधानिक पदे संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्या मान्यतेनंतर किंवा शासनाच्या आदेशावरून निर्माण करता येतात. महानगरपालिकेचे आयुक्त हे पद शासनाच्या प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याचे प्रतिनियुक्तीने भरण्यात येते तर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी हे पद शासनाने निर्माण केलेल्या मुख्याधिकारी या संवर्गातून भरण्यात येते. हे अधिकारी नगरपरिषदा/महानगरपालिकांचे कार्यकारी अधिकारी असतात व ते राज्य शासन व नागरी संस्था यांच्यात दुवा व समन्वय साधण्याचे कार्य करतात.

५.२१. नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या आस्थापनेवरील खर्च त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या ४२ टक्के पेक्षा जास्त होऊ नये व विकास कार्यासाठी निधी उपलब्ध व्हावा या दृष्टीने शासनाने एका विहित सूत्राद्वारे या खर्चावर मर्यादा घातली आहे. महानगरपालिकेचे बाबतीत आस्थापनेवरील खर्च उत्पन्नाच्या किती टक्के असावा याबाबत मर्यादा घातलेली नाही. ही ४२ टक्के खर्चाची मर्यादा काढताना स्वयंधारित (Self Supporting Schemes) योजनांपासूनचे उत्पन्न तसेच त्यावरील खर्च वगळण्यात यावा असे शासन आदेशात नमूद केले आहे. नगरपरिषदांच्या ज्या आस्थापनेचा खर्च ४२ टक्के या मर्यादेसाठी विचारात घेतला जातो त्या आस्थापनेवरील काही पदे रिक्त असतात किंवा अधिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने नवीन पदाना शासनाची मंजुरी घेण्यासाठी प्रस्ताव पाठविलेले असतात. परंतु अशा पदांना शासनाकडून मंजुरी मिळण्यास विलंब लागतो. काही प्रकरणांत पदे रिक्त ठेवून व त्याबाबतचे प्रस्ताव शासनास न पाठविताही नगरपरिषदात रोजंदारी तत्त्वावर काही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जाण्याची शक्यता असते. अशाप्रकारे रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या मजुरीवरील खर्च ४२ टक्केची मर्यादा काढताना विचार करावा किंवा कसे याबाबत उल्लेख वरील शासन आदेशात दिसून येत नाही.

५.२२. वित्त आयोगाने आस्थापनेवर झालेल्या खर्चाबाबतची माहिती सर्व नगरपरिषदा/महानगरपालिकांकडून गोळा करून एकत्रित केली. प्राप्त झालेल्या माहितीचा अभ्यास केल्यावर असे आढळून आले की, बऱ्याच नगरपरिषदांनी आस्थापना खर्चाबाबतची माहिती योग्य प्रकारे दिली नाही. काही प्रकरणात नियमित आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इ. चाच समावेश करण्यात आला तर काही प्रकरणात मात्र रोजंदारी तत्त्वावर नेमलेल्या कामगारांच्या वेतनावरील खर्चाचाही समावेश करण्यात आला. तसेच काही प्रकरणात कार्यालयीन खर्चाचाही समावेश आस्थापनेवरील खर्चात केल्याचे दिसून आले. नगरपरिषदेच्या उत्पन्नाच्या ४२ टक्के पेक्षा आस्थापना खर्च जास्त होऊ नये यासाठी जे सुत्र शासनाने विहित केले आहे त्यानुसार उत्पन्न तसेच आस्थापना खर्चाच्या बाबींचे वर्गीकरणाबाबतची माहिती आयोगाकडे उपलब्ध नसल्याने या टक्केवारीपेक्षा किती नगरपरिषदांचा आस्थापना खर्च जास्त वा कमी आहे ते येथे निश्चितपणे देता येत नाही. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीचे आधारे वेतनावरील खर्चाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण नगरपरिषदा व महानगरपालिकांचे बाबतीत ढोबळमानाने काढण्याचा प्रयत्न तक्ता क्र. ५.४ मध्ये केला आहे. उत्पन्नात शासकीय अनुदानापोटी मिळालेल्या रकमांचाही समावेश आहे.

तक्ता क्रमांक ५.४

**नागरी संस्थांचा कर्मचारी वर्ग, वेतन खर्च व त्या खर्चाचे उत्पन्नाशी प्रमाण (१९९४–९५)**

(आकडे लाखांत)

| नगरपरिषदा/महानगरपालिका | १००० लोकसंख्येमागे कर्मचाऱ्यांचे प्रमाण (संख्या) | एकूण उत्पन्न (महसुली) | एकूण वेतनावरील खर्च | वेतनावरील खर्चाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| नगरपरिषदा | | | | |
| अ-वर्ग | ६ | २८,१३५.२८ | ९,०८४.४५ | ३२.२९ |
| ब-वर्ग | ६ | १४,९०५.४२ | ५,८४०.२१ | ३९.१८ |
| क-वर्ग | ६ | १२,५१३.१५ | ५,६९८.०६ | ४५.५४ |
| महानगरपालिका | ११ | २,४८,९८७.८३ | १,०९,४७७.५७ | ४३.९७ |

५.२३. वेतनावरील खर्च एकूण महसूली उत्पन्नाच्या ४२ टक्क्यांपेक्षां जास्त असलेल्या नगरपरिषदांची संख्या खालीलप्रमाणे आहे (तक्ता क्रमांक ५.५ पहावा).

तक्ता क्र. ५.५

| वेतनावरील खर्चाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | नगरपरिषद वर्ग अ | ब | क | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४२ टक्के ते ५० टक्के | ६ | १० | ३४ | ५० |
| ५१ टक्के ते ६० टक्के | ४ | १२ | ३५ | ५१ |
| ६१ टक्के ते ७० टक्के | .. | ८ | २१ | २९ |
| ७१ टक्के ते ८० टक्के | .. | २ | ८ | १० |
| ८१ टक्केचे वर | .. | .. | ३ | ३ |
| एकूण | १० | ३२ | १०१ | १४३ |
| नगरपरिषदांच्या वर्गातील संख्येशी टक्केवारी | ४१.६ | ६५.३ | ६३.५ | ६१.६ |

राज्यातील जवळजवळ ६२ टक्के नगरपरिषदांचा वेतनावरील खर्च विहित प्रमाणापेक्षा जास्त आहे व त्यात अमरावती, नागपूर, औरंगाबाद व नाशिक विभागातील नगरपरिषदांची संख्या फार मोठी आहे.

**५.२४. आयोग अशी शिफारस करीत आहे की, आस्थापना खर्चाचा वाजवी अंदाज व त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने नगरपरिषदेचे एकूण उत्पन्न व आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे तसेच स्वयंधारित योजनावरील**

कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच रोजंदारीवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन इ. विचारात घेऊन वेतनावरील एकूण खर्चाची तुलना उत्पन्नाशी करण्याबाबत विचार व्हावा असे आयोगाला वाटते. स्वयंधारित योजनेपासूनचे उत्पन्न व त्यावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च याचा वरील प्रकारे विचार झाल्यास प्रत्यक्ष सेवासुविधा पुरविण्यासाठी किती खर्च या नागरी संस्था करतात याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे.

५.२५. प्रत्येक महानगरपालिकेचा एकूण कर्मचारी वर्ग, त्यांच्या वेतन श्रेणी वेगवेगळ्या आहेत. या संदर्भात काही महानगरपालिकांकडून कांही विशिष्ट संवर्गातील पदांच्या वेतन श्रेणी व त्यांना मिळणारे एकूण वेतन याची माहिती घेऊन अवलोकन केले असता मुंबई, ठाणे या दोन महानगरपालिकांच्या वेतन श्रेण्या व एकूण वेतन इतर महानगरपालिकांच्या तुलनेतच नव्हे तर राज्य शासन व निमशासकीय संस्थांतील समान पदाच्या वेतनापेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. **म्हणून या नागरी संस्थांचा आस्थापना खर्च योग्य त्या मर्यादेत राहील यासाठी तसेच वेगवेगळ्या नागरी संस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांत एकसूत्रीपणा असावा या दृष्टिकोनातून एक निश्चित असे समान धोरण ठरविले पाहिजे.**

### नगरपरिषदा/महानगरपालिकांचे वित्तीय अधिकार

५.२६. नगरपरिषदा व महानगरपालिकांची जी कर्तव्ये व कार्ये अधिनियमाद्वारे विहित केलेली आहेत, ती पार पाडण्यासाठी त्यांना उत्पन्नाची साधनेही उपलब्ध करण्यात आली आहेत. या संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०५ ते १०८ नुसार नगरपरिषदांना तर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १३९, १४०, १९५-ई अन्वये, मुंबई महानगरपालिकेसाठी, नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम ११४, ११५, १५३-अ व १५३-ब अन्वये नागपूर महानगरपालिकेसाठी व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १२७, १२९, १४८-अ व १४८-क अन्वये राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी कर व करेतर उत्पन्नांची साधने विहित केलेली आहेत. त्यानुसार कराच्या उत्पन्नांची साधने खालीलप्रमाणे आहेत :—

**स्वतःच्या उत्पन्नाची साधने**

| महानगरपालिका | नगरपरिषदा | |
|---|---|---|
| | सक्तीचे कर | ऐच्छिक कर |
| (१) मालमत्ता कर यात— | (१) एकत्रित मालमत्ता कर यात— | (१) वाहने, नावा, जनावरे यांवरील कर (मोटार वाहन अधिनियम, १९३९ मध्ये व्याख्या केलेल्या वाहनांव्यतिरिक्त). |
| (अ) सर्वसाधारण कर (सामान्य कर) | (अ) सर्वसाधारण कर | |
| (ब) पाणीपट्टी | (ब) सर्वसाधारण पाणीपट्टी | |
| (क) पाणी लाभ कर | (क) दिवाबत्ती कर | (२) कुत्र्यांवरील कर |
| (ड) मलनिःस्सारण कर | (ड) सर्वसाधारण स्वच्छताविषयक कर | (३) विशेष स्वच्छता कर |
| (इ) मलनिःस्सारण लाभ कर | (इ) विशेष शौचकुपकर | (४) जलनिस्सारण कर |
| (फ) अग्निशमन कर | (फ) अग्निशमन कर | (५) पाणीपट्टी |
| | (ग) पर्यावरण कर याचा समावेश आहे. | (६) विशेष शिक्षण कर. |

| महानगरपालिका | नगरपरिषदा | |
|---|---|---|
| | सक्तीचे कर | ऐच्छिक कर |
| (२) वाहने, नांवा व जनावरे यांच्यावरील कर. | (२) जकात | |
| (३) नाट्यगृह कर | (३) चित्रपट/नाट्यगृह/सर्कस/आनंद बाजार/प्रयोग/प्रदर्शने यांवरील कर. | |
| (४) जकात कर | (४) जाहिरात कर (वृत्तपत्रांतील वगळून) | |
| (५) शिक्षण कर | | |
| (६) पथकर/रस्ताकर | | |
| (७) सुधार आकार | | |
| (८) कुत्रा कर. | | |

करेतर साधने (महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी)—

(१) विकास शुल्क (महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमान्वये

(२) बाजार शुल्क

(३) इतर शुल्क व आकार

(४) परवाना शुल्क

(५) मालमत्तांच्या भाड्यांपासून मिळालेले उत्पन्न

(६) मीटरद्वारे मिळणारी पाणीपट्टी

(७) वृक्ष कर

(८) इतर शुल्क, आकार, दर इत्यादी

(९) व्याजरूपाने मिळणारे उत्पन्न.

इतर उत्पन्नाची साधने—

(अ) शासकीय अनुदाने

(ब) कर्जे

(क) वित्तीय संस्था/बँका व राज्य शासनाकडून मिळणारी कर्जे

स्वतःच्या उत्पन्नाच्या साधनांपैकी मालमत्ता कर व जकात कर ही नगरपरिषदा/महानगरपालिकांच्या उत्पन्नाची दोन प्रमुख साधने आहेत.

५.२७. **मालमत्ता कर.**—हा कर नगरपरिषदा/महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी किंवा इमारती यावर अथवा दोन्हींवर त्यांच्या करयोग्य मुल्यांवर आधारलेला असून ते एक उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. मालमत्ता कराची आकारणी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सर्व इमारती व जमिनी यांच्या करयोग्य मूल्यावर आधारीत असते. या इमारती व जमिनीपासून भाड्याच्या रूपाने प्रत्यक्ष मिळणाऱ्या किंवा मिळू शकणाऱ्या वार्षिक भाड्याच्या रकमेवर करयोग्य मुल्य ठरविले जाते व त्या कर योग्य मूल्याच्या टक्केवारीने मालमत्ता कर आकारला जातो. मालमत्ता कर हा मुख्यत्वे घरांचे मालक/भोगवटादार/पट्टेदार यांचेकडून गोळा करण्यात येतो.

५.२८. **मालमत्ता कराचे दर, प्रमाण इत्यादी.**—मालमत्ता कर या सर्वंकष शीर्षाखाली निरनिराळ्या करांची आकारणी केली जाते. अधिनियमातील/नियमांतील तरतुदीनुसार मालमत्तेच्या एकूण करयोग्य मूल्याच्या आधारावर बसविण्यात येणाऱ्या मुख्य करांचे दर खालील तक्त्यात दाखविले आहेत :—

| कर प्रकार | मुंबई महानगरपालिका अधिनियम | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम | नागपूर महानगरपालिका अधिनियम | महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम |
|---|---|---|---|---|
| मालमत्ता कर— | | | | |
| (१) सर्वसाधारण वा सामान्य कर. | करयोग्य मूल्याच्या ८ ते २६ टक्के ही २६ टक्के ची कमाल मर्यादा ५० टक्के पर्यंत ऑगस्ट, १९९५ पासून केली आहे. | करयोग्य मूल्याच्या १२ टक्केपेक्षा कमी नाही. | करयोग्य मूल्याच्या १२ टक्केपेक्षा कमी नाही. | एकत्रित मालमत्ता कर<br>किमान कमाल<br>अ. २३ २८<br>ब. २२ २७<br>क. २१ २६ |
| (२) अग्निशमन कर | करयोग्य मूल्याच्या किमान १/८ टक्के व कमाल ५ टक्के. | किमान १/८ टक्के व कमाल २ टक्के. | नियमांत दर विहित केले नाहीत. परंतु १ टक्का कर आकारतात. | वरील दरांत समाविष्ट आहे. |
| (३) शिक्षण उपकर | करयोग्य मूल्याच्या १२ टक्केपर्यंत. | करयोग्य मूल्याच्या ५ टक्केपर्यंत. | करयोग्य मूल्याच्या ५ टक्केपर्यंत. | .... |
| (४) रस्ता कर | करयोग्य मूल्याच्या कमाल १५ टक्के. | करयोख्य मूल्याच्या कमाल १० टक्के. | करयोग्य मूल्याच्या कमाल १० टक्के. | .... |

५.२९. सामान्य कराशिवाय मालमत्ता करामध्ये पाणीपट्टी कर, दिवाबत्ती कर, सर्वसाधारण स्वच्छता कर, विशेष शौचकूप कर, पर्यावरण कर, पाणी लाभ कर, मलनिःससारण लाभ कर, विशेष शिक्षण कर, अग्निशमन कर अशा तऱ्हेच्या इतर करांचादेखील समावेश असतो. यापैकी पाणी लाभ कर व मलनिस्सारण लाभ कर हे सर्वसाधारणपणे महानगरपालिका क्षेत्रात बसविण्यात येतात. या करांचे दर ठरविण्याचे अधिकार संबंधित नागरी संस्थांना आहेत. या कर आकारणीचा हेतू अनुक्रमे पाणीपुरवठ्याच्या व मलनिःस्सारणाच्या कामासाठी लागणाऱ्या भांडवली स्वरूपाच्या खर्चासाठी निधी उपलब्ध करून घेणे हा असतो.

५.३०. मालमत्ता कराची वसुली वेळेवर व्हावी, यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १५०(३) मध्ये अशी तरतूद आहे की, करदात्याने करविषयक नोटीस मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम भरली तर त्याला त्या रकमेच्या १ टक्का इतकी सूट देण्यात यावी.

मालमत्ता कराची रक्कम त्याविषयी नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत न भरणाऱ्या मालमत्ताधारकांना व्याज आकारण्याची तरतूद १९६५ च्या महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमाच्या कलम १६६ मध्ये आहे, त्यानुसार विलंबित कालावधी १५ दिवस ते ६ महिनेपर्यंत असल्यास प्रतिमाह १/२ टक्का व त्यापुढील कालावधीकरिता प्रतीमाह १ टक्का व्याज आकारणी करता येते.

५.३१. मालमत्ता करासंबंधी अधिनियमात इमारती व जमिनी यांच्या करपात्र मूल्यांवर कर आकारणी करण्याचे अधिकार नागरी संस्थांना आहेत. तथापि, बऱ्याच नागरी संस्थांच्या हद्दीतील मोकळ्या भूखंडावर करआकारणी केली जात नाही.

५.३२. **केंद्र व राज्य शासनाच्या मालमत्ता.**—नागरी संस्थांना केंद्र शासनाच्या मालमत्तांवर तसेच रेल्वे व इतर केंद्र शासन उपक्रमांवर मालमत्ता कराची आकारणी करता येत नाही. या मालमत्ता कराऐवजी एक ठराविक रक्कम किंवा सेवाशुल्क या नागरी संस्थांना दिले जाते. तर राज्य शासनाच्या मालमत्तांवर सवलतीच्या दराने कर आकारणी केली जाते. यामुळे या संस्थांचे फार मोठे आर्थिक नुकसान होते. याबाबतचा सविस्तर तपशील प्रकरण ८ मध्ये दिला आहे.

## जकात कर

५.३३. राज्यातील महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांच्या एकूण उत्पन्नाच्या साधनांपैकी जकात कर हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. शहरात विक्रीसाठी किंवा उपभोगासाठी आणण्यात येत असलेल्या जवळजवळ सर्वच मालावर, वस्तूंवर आणि जनावरांवर जकात कर आकारण्यात येतो व त्यापासून या स्थानिक संस्थांना दररोज रोख स्वरूपात उत्पन्न मिळत असते. महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांच्यासंबंधीच्या अधिनियमांमध्ये हा कर बसविणे सक्तीचे आहे. हा कर या नागरी संस्था स्वतः गोळा करू शकतात किंवा प्रतिनिधींमार्फत वसूल करू शकतात. जकात कर कोणत्या दराने किमान व कमाल आकारण्यात यावे हे जकात नियमांत विहित केले आहे. बऱ्याच वस्तूंवर जकात किमतीवर आधारित असते, तर काही विशिष्ट वस्तूंच्या बाबतीत जकात कर आयात मालाच्या वजनावर किंवा संख्येवर आधारित असतो. एकाच विशिष्ट वस्तूवर निरनिराळ्या महानगरपालिकांमध्ये किंवा नगरपरिषदांमध्ये वेगवेगळ्या दराने जकात कर बसविलेले आढळून येतात. काही विशिष्ट परिस्थितीत जकात कर न बसविण्याची तरतूद संबंधित अधिनियमात/नियमांत करण्यात आली आहे.

५.३४. जकात कराचे उत्पन्न, वस्तूंच्या किमतीत सतत होत असलेली भाववाढ विचारात घेता त्याच्या दरामध्ये वाढ न करताही, वाढत असते. महत्त्वाची बाब म्हणजे नागरी संस्थांना या करापासून दररोज रोख स्वरूपात निधी मिळत असल्याने दैनंदिन खर्चाची कामे त्यांना चांगल्या प्रकारे हाताळता येतात व त्यासाठी राज्य शासनाकडून मिळणाऱ्या मदतीसाठी थांबावे लागत नाही. या जकात कराच्या उत्पन्नामुळे या संस्था कितपत स्वावलंबी/परावलंबी आहेत हे निश्चित होते. जकात कराचे किमान व कमाल दर नियमांन्वये निश्चित केले असले तरी बऱ्याच नागरी संस्था जकात करासाठी विहित केलेली कराची कमाल मर्यादा गाठण्यासाठी प्रयत्नशील नाहीत. कमाल मर्यादेपर्यंत कर आकरणीचा प्रयत्न झाल्यास या करापासूनच्या उत्पन्नांत भरीव वाढ होण्याची शक्यता आहे. इतकेच नव्हेतर नियमांनुसार विहित केलेल्या किमान व कमाल दराचे कालानुरूप पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे.

५.३५. जकात करासंबंधी निरनिराळ्या गटांतून येणाऱ्या तक्रारी आणि नागरी संस्थांचा तो कर चालू ठेवण्याबद्दल आग्रह याविषयी सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी शासनाने वेळोवेळी समित्यांची स्थापना केली. या समित्यांच्या शिफारशींचा विचार करून शासनाने जकात कराऐवजी " लेखा आधारित जकात उपकर " लावण्याबद्दलचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे फक्त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यामध्ये १९९५ मध्ये सुधारणा केली आहे. इतर अधिनियमांत ही सुधारणा करण्यात आलेली नाही. या लेखाधारित जकात उपकराचा प्रयोग अलिकडेच नव्याने निर्माण केलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात सुरू करण्यात आला आहे.

५.३६. हा कर म्हणजे नागरी संस्थांची कामधेनू आहे. हा कर रद्द करावा व पर्यायी कर लावावा याबाबत सतत प्रयत्न होत आहेत, परंतु अद्याप तरी जकात कराच्या उत्पन्नाएवढे उत्पन्न व त्यांत सतत वाढ होईल असे पर्यायी कर/साधन गवसले नाही. त्यामुळे राज्यातील सर्वच नागरी संस्था हा कर रद्द करण्याच्या विरोधात प्रखरपणे उभ्या आहेत. उलट हा कर रद्द केल्यास उत्पन्नाचे एक प्रमुख साधन कमी झाल्यामुळे राज्यातील बहुतेक सर्वच नागरी संस्थांची आर्थिक स्थिती कमजोरच होणार नाही तर त्यामुळे इतर अनेक आर्थिक प्रश्नही निर्माण होतील. त्यामुळे या नागरी संस्थांची आर्थिक स्वायत्तता धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## कराची इतर साधने

५.३७. मालमत्ता कर आणि जकात कर या दोन प्रमुख करांशिवाय नागरी संस्थांना उत्पन्नासाठी पुढील करांची साधने उपलब्ध आहेत :—

(१) पाणीपट्टी कर.

(२) पाणीपट्टी लाभकर.

(३) मलनिस्सारण कर किंवा साफसफाई कर.

(४) शिक्षण कर किंवा विशेष शिक्षण कर.

(५) पथकर किंवा रस्ते कर/उपकर.

(६) पर्यावरण कर.

(७) दिवाबत्ती कर.

(८) वृक्षकर.

वरील बहुतांश कर हे नागरी क्षेत्रातील मालमत्तांच्या करपात्र मुल्याच्या विशिष्ट टक्केवारीनुसार लावण्याची तरतूद अधिनियमामध्ये आहे. या करांपैकी पाणीपट्टी लाभकर आणि जलनिस्सारण लाभकर यापासून मिळणारे उत्पन्न नागरी संस्था आपल्या कार्यक्षेत्रात हाती घेतलेल्या पाणीपुरवठ्याच्या आणि मलनिस्सारणाच्या प्रकल्पाचा भांडवली खर्च वसूल करण्यासाठी वापरतात. रस्तेकर, पथकर किंवा रस्ते उपकर या करांपासून मिळणारे उत्पन्न शहरातील रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती व नवीन रस्ते तयार करणे यासाठी प्रामुख्याने वापरले जाते.

५.३८. **पाणीपट्टी.—**शहरांतील पाणी पुरवठा योजनांसाठी सर्वसाधारण पाणीपट्टी या कराशिवाय प्रत्येक घरी दिलेल्या नळाच्या जोडणीबाबत वार्षिक कररुपाने नागरी संस्थांना उत्पन्न प्राप्त होते. काही नगरपरिषदा महानगरपालिकांच्या क्षेत्रात जेथे पाणीमापक बसविण्याची व्यवस्था केली आहे तेथे मापकाच्या आधारे विविक्षित दराने पाणीपट्टी वसूल केली जाते. पाणीपट्टी कर व पाणीपट्टीद्वारे नगरपरिषदा/महानगरपालिका यांना मिळणारे उत्पन्न व नागरी क्षेत्रात पाणीपुरवठ्यासाठी केलेला खर्च याचा तपशीलवार ऊहापोह प्रकरण ८ मध्ये केला आहे.

**करेतर उत्पन्नाची साधने**

५.३९. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या अधिनियमांतील निरनिराळ्या तरतुदींअन्वये करेतर उत्पन्नाची साधने उपलब्ध आहेत. त्यापैकी प्रमुख साधने खालीलप्रमाणे :—

(१) बाजार, कत्तलखाने, व्यापार, व्यवसाय याबद्दल परवाना शुल्क.

(२) नगरपरिषदांनी दिलेल्या सेवा व सुविधाबाबतचे सेवाशुल्क/आकार/दर.

(३ नागरी संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात बांधलेल्या इमारती/व्यापारी संकुलापासूनचे भाडे.

(४) नागरी संस्थांच्या शाळा, दवाखाने/इस्पितळे यांपासुन मिळणारे शुल्क.

(५) विकास शुल्क–नागरी क्षेत्रातील रिकाम्या भूखंडांवर इमारती बांधण्यास किंवा विस्तार करण्यास अथवा फेरफार करण्यास परवानगी देताना विकास शुल्क आकारले जाऊ शकते.

(६) इतर शुल्क, आकार, दर इत्यादी.

५.४०. करेतर उत्पन्नाच्या साधनापासून नगरपरिषदा/महानगरपालिकांना फारच अल्प प्रमाणात उत्पन्न मिळते. या उत्पन्नाचे प्रमाण कमी असण्याची कारणे सर्वसाधारणपणे अशी दिसून येतात की, (१) करेतर साधनांतून फारच अल्प उत्पन्न मिळते, (२) या साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे अनेक वर्षांपासून या शुल्क/आकाराच्या दरांमध्ये वाढ करण्यासाठी वाव असूनही वाढ करण्यात आलेली नाही, (३) काही दर. आकर, शुल्क हे त्यांच्या बाबींवर होणाऱ्या खर्चाशी निगडित असूनही त्या बाबींचा वाढीव खर्च विचारात न घेता पूर्वीच्या दरानुसारच आकारणी केली जाते, (४) ज्या बाबींसाठी किमान व कमाल दर विहित केले आहेत त्यांचा वेळोवेळी पुनर्विचार होऊन कमाल मर्यादा वाढविण्यासाठी दुर्लक्ष केले जाते.

५.४१. करेतर उत्पन्नाची वरील साधने हीदेखील उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची साधने आहेत व त्या संदर्भात वेळोवेळी नियमितपणे आढावा घेऊन किंवा त्या सेवेवर होणारा प्रत्यक्ष खर्च विचारात घेऊन शुल्क, आकार व दरांमध्ये वाजवी वाढ केल्यास नागरी संस्थांना या साधनांपासून वाढीव उत्पन्न मिळू शकते.



एच ४०९४–५

**उत्पन्नाची इतर साधने**

**शासकीय अनुदाने**

५.४२. कर, करेतर व इतर उत्पन्नांच्या साधनांव्यतिरिक्त नगरपरिषदा/महानगरपालिका यांना शासनाकडून योजनेतर अनुदाने प्राप्त होतात. प्रमुख योजनेतर अनुदानांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :—

| नगरपरिषदांना मिळणारी अनुदाने | महानगरपालिकांना मिळणारी अनुदाने |
|---|---|
| (१) महागाई भत्ता अनुदान . . | (१) जमीन महसूल व बिगर शेतसारा अनुदान. |
| (२) मुख्य अधिकारी रजा वेतन प्रतिपूर्ती अनुदान | (२) रस्ता अनुदान (मुंबई महानगरपालिका वगळून). |
| (३) मुख्य अधिकारी वेतन अनुदान . . | (३) व्यवसायकर अनुदान (काही विशिष्ट महानगरपालिकांना). |
| (४) जमीन महसूल व बिनशेती सारा अनुदान . . | (४) करमणूक कर अनुदान (शासनाने गोळा केलेल्या करातील हिस्सा). |
| (५) करमणूक कर अनुदान (शासनाने गोळा केलेल्या करातील हिस्सा). | |
| (६) रस्ते अनुदान. | |
| (७) मोटार वाहन कर अनुदान. | |
| (८) मुद्रांक शुल्क अनुदान. | |
| (९) गौण खनिज अनुदान. | |
| (१०) व्यवसायकर अनुदान (काही विशिष्ट नगरपरिषदांना) | |
| (११) यात्रा कर अनुदान (विशिष्ट नगरपरिषदांना). | |

५.४३. वरील बाबींव्यतिरिक्त राज्य व केंद्र शासनाच्या योजना आकृतीबंधानुसार ज्या योजना नगरपरिषदा/महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात घेतल्या जातात, त्याबाबत ह्या संस्थांना योजनांतर्गत अनुदाने ही प्राप्त होतात, तसेच नागरी क्षेत्राच्या व विशिष्ट शहरांच्या विकासासाठी विशेष अनुदानेही मंजूर केली जातात. योजनांतर्गत मिळणाऱ्या प्रमुख अनुदानाचा तपशील खालिलप्रमाणे आहे :—

(१) प्राथमिक शिक्षण अनुदान.

(२) पाणीपुरवठा योजनांसाठी अनुदान.

(३) विकास योजना (डेव्हलपमेंट प्लॅन) कार्यान्वित करण्यासंबंधी अनुदान.

(४) कुटूंब कल्याण, हिवताप निर्मूलन, साथीचे रोगनिर्मूलन इत्यादीसाठी अनुदान.

(५) कमी खर्चाच्या स्वच्छता योजना.

(६) नेहरू रोजगार योजना.

(७) नागरी क्षेत्रातील कमकुवत घटकांसाठी मूलभूत सेवा पुरविण्यासाठी अनुदान.

(८) बालकल्याण व महिला आरोग्य अनुदान.

(९) झोपडपट्टी सुधारणा अनुदान.

(१०) लहान व मध्यम शहरातील एकात्मिक विकासासाठी योजना अनुदान.

## महागाई भत्ता अनुदान

५.४४. हे अनुदान नगरपरिषदांच्या मंजूर पदांवरील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या खर्चापोटी नगरपरिषदांना खालीलप्रमाणे दिले आहेत :—

| नगरपरिषदा वर्ग | महागाई भत्त्याचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| अ-वर्ग | ८० |
| ब-वर्ग | ८५ |
| क-वर्ग | ९० |

नगरपरिषदांची वित्तीय स्थिती लक्षात घेता या अनुदानाद्वारे नागरी संस्थांना भरघोस अशी आर्थिक मदत होते. हे अनुदान नगरपरिषदांना त्रैमासिक हप्त्याने दिले जाते. हे अनुदान नगरपरिषदांनी मागील वर्षात केलेल्या करांच्या (एकत्रित मालमत्ता कर आणि इतर करांचाही समावेश असतो.) वसुलीच्या (मागील थकबाकी-संबंधित वर्षाची मागणी) खालील प्रमाणावर अवलंबून असते.

| वसुलीची टक्केवारी | अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याची टक्केवारी (टक्के) |
|---|---|
| ५० टक्केपर्यंत | ८० |
| ५१ ते ६० टक्केपर्यंत | ८५ |
| ६१ ते ७० टक्केपर्यंत | ९० |
| ७१ ते ८० टक्केपर्यंत | ९५ |
| ८० टक्केचे वर | १०० |

५.४५. वसुलीची टक्केवारी लक्षात घेताना शासकीय विभागाकडून घेणे असलेल्या तसेच न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणातील मागणी किंवा शासन / जिल्हाधिकारी यांनी कर व वसुलीसाठी दिलेली स्थगिती अथवा मुदतवाढ अशा रकमांचा मागणीत अंतर्भाव केला जात नाही. नगरपरिषदांना अनुज्ञेय महागाई भत्ता अनुदान हे करांच्या वसुलीशी संबंधित आहे. ५० टक्के वसुली असल्यास ८० टक्के महागाई भत्ता अनुदान मिळते व वसुली ८० टक्केच्या वर केल्यास हे अनुदान १०० टक्के मिळते. म्हणजे वसुलीबाबत अधिक प्रयत्न केल्यास महागाई भत्त्याच्या अनुदानाच्या टक्केवारीत फार थोडी वाढ होते. किमान वसुली ५० टक्के असल्यास ८० टक्के अनुदान मिळत असल्याने नगरपरिषदा वसुलीसाठी आवश्यक तेवढे प्रयत्न करतातच असे दिसून येत नाही.

महानगरपालिकांना हे अनुदान अनुज्ञेय नाही.

## मुख्य अधिकाऱ्यांच्या रजा वेतनासाठी प्रतिपूर्ती अनुदान

५.४६. हे अनुदान नगरपरिषदांच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या रजा वेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी म्हणून दिले जाते.

## मुख्य अधिकारी वेतन अनुदान

५.४७. राज्यातील १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपरिषदांच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्चाच्या १०० टक्के अनुदान दिले जाते. या अनुदानाचा उद्देश लहान नगरपरिषदांना आर्थिक मदत व्हावी असा आहे. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे पूर्वी ६५ नगरपरिषदांना हे अनुदान प्राप्त होत होते.



एच ४०९४–५अ

तर १९९१ च्या जनगणनेनुसार १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ४२ नगरपरिषदांनाच हे अनुदान वितरित करण्यात येते.

### जमीन महसूल व बिगर शेतीसारा अनुदान

५.४८. हे अनुदान महाराष्ट्रातील १५,००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व नगरपरिषदांना संबंधित नगरपरिषदांच्या क्षेत्रात आर्थिक वर्षात वसूल करण्यात आलेल्या जमीन महसुलाच्या १५ टक्के व बिन शेती साऱ्याच्या ७५ टक्के रक्कम अनुदान म्हणून शासनाकडून देण्यात येते. याच प्रमाणात महानगर पालिकांनाही अनुदानाचे वाटप करण्यात येते. ज्या नगरपरिषदांची लोकसंख्या १५,००० पेक्षा कमी आहे त्यांच्या क्षेत्रात वसुल झालेल्या जमीन महसुलाचा १०० टक्के भाग या प्रमाणित दरानुसार नगरपालिकेचे लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई रु. १ याप्रमाणे होणारे अनुदान यातील फरक समानीकरण रूपाने देण्यात येते तर बिनशेती सारा उत्पन्नाच्या ७५ टक्के भाग अनुदान म्हणून देय ठरते.

### करमणूक कर अनुदान

५.४९. नगरपरिषदा / महानगरपालिका ह्यांना हे अनुदान करमणूक कर अनुदान म्हणून मिळत असले तरी हे अनुदान राज्य शासनाने ह्या संस्थांच्या हद्दीतील करमणूक करापोटी वसूल केलेल्या रकमेतील हिस्सा असे आहे. सदरचे अनुदान खालील प्रमाणात त्यांच्या हद्दीत वसूल झालेल्या करमणूक कराच्या टक्केवारीने मिळते.

| | |
|---|---|
| महानगरपालिका | १० टक्के |
| नगरपरिषदा अ-वर्ग | ३० टक्के |
| ब-वर्ग | ३५ टक्के |
| क-वर्ग | ४० टक्के |

तथापि नगरपरिषदांना हे अनुदान वाटप करण्यापूर्वी नगरपरिषदांनी त्यांच्या हद्दीत एकत्रित मालमत्ता कराच्या परिच्छेद ५.२८ मध्ये नमूद केलेल्या किमान व कमाल दरापैकी किती टक्के दर लागू केला आहे त्याच्याशी हे अनुदान १९८२-८३ पासून निगडित केले आहे.

### रस्ते अनुदान

५.५०. राज्यातील सर्व नगरपरिषदा व सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) यांना मोटार वाहन करापासून शासनाला मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या १० टक्के इतकी रक्कम रस्ते अनुदान म्हणून सर्व नगरपरिषदा व महानगरपालिकांना (मुंबई महानगरपालिका वगळून) लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येते. हे अनुदान नगरपरिषदा / महानगरपालिकांच्या हद्दीतील रस्ते दुरुस्ती किंवा नवीन रस्ते बांधण्यासाठी वापरावयाचे असते. शिवाय हे अनुदान मिळाल्याच्या वर्षअखेरपर्यंत किंवा पुढील वर्षअखेरपर्यंत वापरावयाचे असून त्याबाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदा / महानगरपालिकांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना द्यावयाचे असते.

### मोटार वाहन कर अनुदान

५.५१. मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम २० अन्वये नगरपरिषदा / महानगरपालिकांना वाहन कर लावण्यास मनाई करण्यात आली आहे. परंतु ज्या नगरपरिषदा / महानगरपालिका त्यापूर्वी वाहन कर, पथकर आकारीत होत्या, त्यांचे वरील कायद्याच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई म्हणून त्यांना मोटार वाहन कर अनुदान देण्यात येते. या अनुदानाच्या रकमेत कोणताही बदल होत नाही.

### मुद्रांक शुल्क अनुदान

५.५२. मुद्रांक शुल्क अनुदान महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम, १९६५ चे कलम १४७अ नुसार सर्व नगरपरिषदांना नगरपरिषद क्षेत्रातील स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरावरील (विक्री, दान, गहाणखत) त्या लेख्याद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर $^1/_2$ टक्के या दराने अधिभार आकारून त्यातून मुद्रांक शुल्क अनुदान देण्यात येते. हे अनुदान महानगरपालिकांना अनुज्ञेय नाही.

### गौण खनिज अनुदान

५.५३. राज्यातील "क" वर्ग नगरपरिषदांच्या साधनसामुग्रीत वाढ करून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने नगरपरिषदा क्षेत्रात शासनाला गौण खनिजांपासून मिळणाऱ्या स्वामित्व धनातून "क" वर्ग नगरपरिषदांनाच फक्त वित्तीय सहाय्य म्हणून हे अनुदान देण्यात येते. मात्र एकाच वेळी एका नगरपरिषदेस देण्यात येणारे अनुदान रु. १ लाखापेक्षा जास्त असू नये अशी अट आहे.

### व्यवसाय कर अनुदान

५.५४. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (व्यवसाय कर कायदा) अस्तित्वात येण्यापूर्वी ज्या नगरपरिषदा / महानगरपालिका व्यवसाय कर आकारीत होत्या. त्या नगरपरिषदा / महानगरपालिकांना वर नमूद केलेल्या कायद्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून ठराविक रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते. राज्यात हे अनुदान ३४ नगरपरिषदांना तर ६ महानगरपालिकांना उदा. पुणे, सोलापूर, कोल्हापूर, पिंपरी-चिंचवड, कल्याण व नागपूर यांना मिळते.

### यात्रा कर अनुदान

५.५५. १९७७-७८ पासून शासनाने यात्राकर लावण्यास नगरपरिषदांना मनाई केली आहे. त्यामुळे या करापासून होणारे नुकसान भरून काढण्यासाठी ठराविक वार्षिक रक्कम यात्राकर अनुदान म्हणून राज्यातील ६ नगरपरिषदांना दिले जाते. उदा. त्रिंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक.

## इतर महत्त्वाची अनुदाने

५.५६. **प्राथमिक शिक्षणावर अनुदान.**—नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षणासाठी शाळा चालविणे, त्यांना मदत देणे व त्यांच्यासाठी योग्य जागांची व्यवस्था करणे हे एक आवश्यक कर्तव्य आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे ही जबाबदारी आर्थिकदृष्ट्या अत्यंत खर्चिक अशी आहे व ती जबाबदारी नगरपरिषदा व महानगरपालिकांना त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून स्वबळावर राबविणे कठीण आहे. या दृष्टीकोनातून शासनामार्फत नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाच्या मान्यता बाबीवरील खर्चाच्या खाली दर्शविलेल्या टक्केवारीप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येते.

| नगरपरिषदा | अनुदानाचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| अ-वर्ग | खर्चाच्या ८० |
| ब-वर्ग | खर्चाच्या ९० |
| क-वर्ग | खर्चाच्या १०० |

### महानगरपालिका

५.५७. मुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील इतर महानगरपालिकांना त्यांनी गेल्या आर्थिक वर्षात प्राथमिक शिक्षणावर केलेल्या मान्य बाबींवरील खर्चाच्या ५० टक्के अनुदान देण्यात येते. मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत हे अनुदान खर्चाच्या २० टक्के एवढे देण्यात येते. परंतु १९९५-९६ पासून या टक्केवारीत दरवर्षी

५ टक्क्यांनी वाढ करण्यात येणार असून, सन २०००-२००१ पासून मुंबई महानगरपालिकेलाही इतर महानगरपालिकांप्रमाणे खर्चाच्या ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून अनुज्ञेय होईल.

५.५८. **विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) प्रस्ताव अंमलबजावणीसाठी सहाय्यक अनुदान.**—नागरी क्षेत्रातील विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक मदत व्हावी म्हणून शासनाकडून सहाय्यक अनुदान नगरपरिषदा व महानगरपालिका (मुंबई वगळून) यांना देण्यात येते.

नगरपरिषदांना ही मदत कर्ज तसेच अनुदान या स्वरूपात असून त्याचे प्रमाण खालील-प्रमाणे आहे :—

| नगरपरिषदा वर्ग | कर्ज | अनुदान |
| --- | --- | --- |
| अ-वर्ग | ६६ $^{2}/_{3}$ टक्के | ३३ $^{1}/_{3}$ टक्के |
| ब-वर्ग | ५० टक्के | ५० टक्के |
| १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या क-वर्ग | . . | १०० टक्के |

महानगरपालिकांच्या (मुंबई वगळून) बाबतीत मात्र विकास आराखड्यातील योजनेवर त्यांनी केलेल्या खर्चाच्या २३.३३ टक्के इतके अनुदान देण्यात येते.

५.५९. **वित्तीय संस्था / बँका व राज्य शासनाकडून मिळणारी कर्जे व इतर साधने.**—महानगरपालिका व नगरपरिषदा क्षेत्रात नागरिकांना पुरवावयाच्या सोई सुविधांसाठी या नागरी संस्थांना फार मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करावा लागतो. या नागरी संस्थांची वित्तीय स्थिती विचारात घेता दैनंदिन सेवा सुविधा पुरविण्यासाठी लागणारा खर्च ह्या त्यांच्या महसूली उत्पन्नातून जेमतेम भागतो. काही नागरी संस्थांच्या बाबतीत महसुली उत्पन्न हे महसुली खर्चापेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे. तर काही संस्थांच्या बाबतीत महसुली खर्च वजा जाता फारच अल्प अशी महसुली उत्पन्नाची रक्कम भांडवली खर्चासाठी या नागरी संस्थांना उपलब्ध होते. परिणामतः पाणी पुरवठ्याच्या योजना / रस्ते बांधणी / गटार बांधणी / शाळा व रुग्णालयासाठीच्या इमारती / अग्नीशमनासाठीच्या सोई व इतर सामाजिक सोईसाठी लागणारे भांडवल उपलब्ध नसते. या बाबी नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने त्या पुरविणे ही या संस्थेची जबाबदारी ठरते. अशा प्रकारच्या बाबी संबंधीचा भांडवली खर्च भागविण्याच्या दृष्टीकोनातून या नागरी संस्थांना राज्यातील वित्तीय संस्था / बँका तसेच राज्य शासन कर्ज पुरवठा करून आर्थिक मदत करीत असते. काही प्रकरणांत खुल्या बाजारातूनही शासकीय हमीवर कर्जे उभारण्याची तरतूद उपलब्ध आहे. सर्वसाधारणपणे आयुर्विमा महामंडळ, हुडको, बँका, जागतिक बँका इत्यादी माध्यमातून या नागरी संस्थांना मोठमोठ्या योजनांसाठी दीर्घ मुदतीची कर्जे उपलब्ध झालेली आहेत.

## नागरी संस्थांची वित्तीय स्थिती

५.६०. महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांच्या एकूण महसुली उत्पन्न महसुली खर्चाची सद्य:स्थिती दर्शविणारी आकडेवारी तक्ता क्र. ५.६ मध्ये दिली आहे :— (आकृती १ पहावी)

तक्ता क्रमांक ५.६

**महानगरपालिका / नगरपरिषदांच्या महसूली उत्पन्न व खर्चाचा तपशील**

(रुपये कोटीत)

| महानगर-पालिका/ नगरपरिषदा | बाब | वर्ष | | | | | वार्षिक वाढीचा दर (**) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | |
| १. महानगर-पालिका | उ.* | १३४६ | १५२२ | १६६२ | २०८९ | २४९० | १६.७३ |
| | ख. | १११५ | १२६९ | १४७० | १८०८ | २१३७ | १८.०१ |
| २. **नगरपरिषदा** | | | | | | | |
| अ-वर्ग | उ. | १६१ | १८७ | २२१ | २४३ | २८१ | १४.७१ |
| | ख. | १३४ | १६५ | १९४ | २१६ | २३५ | १४.८० |
| ब-वर्ग | उ. | ८२ | ९७ | ११५ | १३३ | १४९ | १६.१० |
| | ख. | ७४ | ८९ | ९५ | १०५ | ११९ | ११.८७ |
| क-वर्ग | उ. | ७६ | ८८ | १०३ | ११५ | १२५ | १३.४५ |
| | ख. | ७२ | ८३ | ९५ | १०६ | ११३ | १२.२७ |
| एकूण न. प. | उ. | ३२० | ३७२ | ४३९ | ४९१ | ५५५ | १४.७९ |
| | ख. | २८१ | ३३७ | ३८४ | ४२८ | ४६७ | १३.४१ |
| ३. एकूण म.न.पा. + न.पा. | उ. | १६६६ | १८९४ | २१०१ | २५८१ | ३०४५ | १६.३६ |
| | ख. | १३९५ | १६०६ | १८५४ | २२३५ | २६०५ | १३.४१ |

**टीप.**—(१) या तक्त्यातील तसेच यापुढे दिलेल्या निरनिराळ्या तक्त्यातील आकडे पूर्णांकात घेतले असल्याने त्यांच्या बेरजा जुळणार नाहीत.

(२) महानगरपालिका / नगरपरिषदांच्या वेगवेगळ्या वित्तीय बाबींची माहिती या संस्थांनी आयोगाला पुरविलेल्या माहितीवर आधारित आहे.

(* उ=उत्पन्न, ख=खर्च)

** वार्षिक वाढीचा दर रिग्रेशन पद्धतीने काढला आहे. इतर तक्त्यातील वार्षिक वाढीचे दरही याच पद्धतीने काढले आहेत.

५.६१. वरील नागरी संस्थांचे उत्पन्नाच्या साधनांनुसार व खर्चाच्या बाबींनुसार विश्लेषण खालील परिच्छेदात केले आहे.

५.६२. महानगरपालिका व नगरपरिषदांची भौगोलिक स्थिती त्यांची लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, तेथील उद्योग व व्यापार, वाढती झोपडपट्टी, पाणी पुरवठा, पर्यावरण त्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्या यांत फार मोठा फरक असल्याने त्यांच्या वित्तीय बाबींसंदर्भात सर्व स्थानिक संस्थांचा एकत्रित विचार न करता वेगवेगळा विचार करणे उचित ठरेल. नगरपालिकांच्या बाबतीत अ, ब, क ह्या तीन वर्गांत त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या वर्गांनुसार त्यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास होणे आवश्यक वाटते. राज्यात ६ गिरीस्थान नगरपरिषदा असून त्या सर्व क-वर्गात मोडतात. क-वर्गातील नगरपालिकांचा एकत्रित विचार झाला तरी या गिरीस्थान नगरपालिका राज्यातील निसर्गरम्य व पर्यटन केंद्रे असल्याने त्यांचे प्रश्न इतर नगरपालिकांच्या तुलनेत वेगळे आहेत. त्यामुळे त्यांचा स्वतंत्रपणे विचार होणे योग्य ठरेल. वरील बाबी विचारात घेऊन वित्तीय बाबींचा अभ्यास करताना नागरी संस्थांची विभागणी दोन भागांत केली आहे.

### भाग १ : महानगरपालिका

५.६३. राज्यामध्ये १२ महानगरपालिका असून त्यांचे एकूण महसुली उत्पन्न व दरडोई उत्पन्न (शासनाकडून मिळणारा करातील वाटा व शासकीय अनुदाने यांसह) तक्ता क्र. ५.७ मध्ये दाखविले आहे :—

**तक्ता क्रमांक ५.७**


**महानगरपालिकांचे सर्व साधनांपासूनचे एकूण दरडोई महसुली उत्पन्न**

(एकूण उत्पन्न रुपये कोटींत)
(दरडोई उत्पन्न रुपयांत)

| अ.क्र. | म. न. पा. चे नाव | एकूण व दरडोई महसुली उत्पन्न | | | | | वार्षिक उत्पन्न वाढीचा दर ** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मुंबई .. | ८८४.९१ | ९९०.३७ | १०६६.०९ | १४१६.३३ | १६७९.७० | १७.८१ |
| | | (८९२) | (९९८) | (१०७४) | (१४२७) | (१६९२) | |
| २ | ठाणे .. | ७२.४७ | ८९.०७ | ८९.३१ | ९७.३४ | १२१.५३ | ११.८८ |
| | | (९०२) | (११०९) | (१११२) | (१२१२) | (१५१३) | |
| ३ | नवी मुंबई .. | .. | ०.४७ | २.६६ | १०.७५ | ८.६१ | .. |
| | | .. | (१५) | (८४) | (३३८) | (२७०) | |
| ४ | कल्याण .. | ३९.०९ | ५०.१२ | ४७.०४ | ५५.६० | ७७.१८ | १५.७७ |
| | | (४७७) | (६११) | (५७४) | (६७८) | (९४१) | |
| ५ | नाशिक .. | ४७.९० | ५१.१० | ५८.९७ | ६५.९१ | ७७.४१ | १२.९१ |
| | | (७२९) | (७७८) | (८९८) | (१००३) | (११७८) | |
| ६ | पुणे .. | ९१.२९ | १०६.३५ | १३०.५७ | १३९.८० | १६६.२४ | १५.८६ |
| | | (५८३) | (६७९) | (८३३) | (८९२) | (१०६१) | |
| ७ | पिंपरी-चिंचवड .. | ६३.३१ | ७४.४६ | ८०.२९ | ९२.७२ | ११५.७७ | १५.३२ |
| | | (१२२४) | (१४४०) | (१५५३) | (१७९३) | (२२३९) | |
| ८ | सोलापूर .. | २६.०८ | २८.४८ | ३४.७९ | ३९.५० | ४३.८८ | १४.६५ |
| | | (३६८) | (४०२) | (४९१) | (५५७) | (६१९) | |
| ९ | कोल्हापूर .. | २२.४३ | २५.२८ | ३२.८४ | ३७.०४ | ४२.१० | १७.८४ |
| | | (५५२) | (६२२) | (८०८) | (९१२) | (१०३६) | |
| १० | औरंगाबाद .. | २३.८९ | २५.९० | ३१.७२ | २९.२६ | ३९.५१ | ११.९४ |
| | | (४१७) | (४५२) | (५५३) | (५१०) | (६८९) | |

## आकृती क्र. १

### नागरी संस्थांच्या महसूली उत्पन्नातील महानगरपालिका व नगरपरिषदांचा वाटा–१९९४–९५



| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | अमरावती | .. | १०.१८ | १३.०२ | १२.३४ | १९.६१ | १८.६३ | १७.५५ |
| | | | (२३५) | (३००) | (२८४) | (४५२) | (४२९) | |
| १२ | नागपूर | .. | ६४.४९ | ६६.९० | ७५.५९ | ८५.४८ | ९९.३२ | ११.७२ |
| | | | (३९७) | (४१२) | (४६५) | (५२६) | (६११) | |
| | एकूण | .. | १३४६.०५ | १५२१.५१ | १६६२.२२ | २०८९.३४ | २४८९.८८ | १६.७३ |
| | म. न. पा. | .. | (७३३) | (८२९) | (९०६) | (११३८) | (१३५६) | |

(** वार्षिक उत्पन्न वाढीचा दर रिग्रेशन पद्धतीचा अवलंब करून काढला आहे).

(कंसांतील आकडे दरडोई उत्पन्न दर्शवितात.)

५.६४. सर्वच महानगरपालिकांचे महसुली उत्पन्न १९९०-९१ च्या तुलनेत दरवर्षी वाढत असल्याचे दिसून येते. मागील ५ वर्षांत सर्व महानगरपालिकांच्या महसुली उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर १६.७३ % होता. ठाणे, औरंगाबाद व नागपूर या महानगरपालिकांचा वाढीचा दर सर्वात कमी दिसून आला. नवी मुंबई ही महानगपालिका १९९१-९२ मध्ये अस्तित्वात आली असून मालमत्ता कर आणि जकात कर याबाबतच्या काही प्रश्नाची उकल अद्याप न झाल्याने या महानगरपालिकेच्या उत्पन्नातील वाढ फार मोठी दिसत असली तरी ती प्रातिनिधिक समजता येणार नाही. राज्यामध्ये अमरावती या महानगरपालिकेचा वार्षिक वाढीचा दर जास्त असला तरी दरडोई उत्पन्न मात्र राज्यामध्ये नवी मुंबई वगळता सर्वात कमी आहे, तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे दरडोई उत्पन्न राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये पाचही वर्षांत सर्वाधिक होते. मुंबई महानगरपालिकेचे एकूण महसुली उत्पन्न राज्यात सर्वाधिक असले तरी दरडोई उत्पन्नात राज्यात तिचा क्रमांक दुसरा लागतो. **अमरावती महानगरपालिकेचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी असण्याची काय कारणे आहेत याचा अभ्यास करून उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे.**

### ५.६५. महसुली उत्पन्नाची बाबनिहाय वर्गवारी.

महानगरपालिकांच्या महसूली उत्पन्नाची बाबनिहाय वर्गवारी १९९०-९१ व १९९४-९५ या कालावधीसाठी खालील तक्ता क्र. ५.८ मध्ये दाखविली आहे. (आकृती २ व ३ पहावी).

तक्ता क्रमांक ५.८

**महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाची बाबनिहाय वर्गवारी**

उत्पन्न : कोटी रुपयांत

दरडोई उत्पन्न : रुपयांत

| अ.क्र. | महानगर-पालिका | वर्ष | उत्पन्न दरडोई | कर | करेतर व इतर उत्पन्न | शासन करातील हिस्सा (करमणुक कर) अनुदानाचे स्वरुपात | अनुदान (योजनेतर) | एकूण | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मुंबई | १९९०-९१ | उत्पन्न | ५६१.७३ | २९५.७१ | २.४० | २५.०७ | ८८४.९१ | |
| | | | दरडोई | ५६६ | २९८ | २ | २५ | ८९२ | |
| | | | टक्केवारी | ६३.५ | ३३.४ | ०.३ | २.८ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ११११.०४ | ४९७.५७ | २.६७ | ६८.४३ | १६७९.७० | १७.८१ |
| | | | दरडोई | १११९ | ५०२ | ३ | ६९ | १६९२ | |
| | | | टक्केवारी | ६६.१ | २९.६ | ०.२ | ४.१ | १००.०० | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ठाणे | १९९०-९१ | उत्पन्न | ६०.९३ | ८.५९ | .. | २.९६ | ७२.४७ | |
| | | | दरडोई | ७५८ | १०७ | .. | ३७ | ९०२ | |
| | | | टक्केवारी | ८४.१ | ११.९ | .. | ४.१ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | १०३.८१ | १५.२४ | ०.१७ | २.३१ | १२१.५३ | ११.८८ |
| | | | दरडोई | १२९२ | १९० | २ | २९ | १५१३ | |
| | | | टक्केवारी | ८५.४ | १२.५ | ०.१ | १.९ | १००.०० | |
| ३ | नवी मुंबई | १९९०-९१ | उत्पन्न | .. | .. | .. | .. | .. | |
| | | | दरडोई | .. | .. | .. | .. | .. | |
| | | | टक्केवारी | .. | .. | .. | .. | .. | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ०.१७ | १.५० | ०.१४ | ६.८१ | ८.६१ | .. |
| | | | दरडोई | ५ | ४७ | ४ | २१४ | २७० | |
| | | | टक्केवारी | १.९ | १७.४ | १.६ | ७९.० | १००.०० | |
| ४ | कल्याण | १९९०-९१ | उत्पन्न | ३०.४७ | ५.६० | ०.०८ | २.९४ | ३९.०९ | |
| | | | दरडोई | ३७३ | ६८ | १ | ३६ | ४७७ | |
| | | | टक्केवारी | ७८.० | १४.४ | ०.२ | ७.५ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ५७.५७ | १६.२३ | ०.११ | ३.२७ | ७७.१८ | १५.७७ |
| | | | दरडोई | ७०२ | १९८ | १ | ४० | ९४१ | |
| | | | टक्केवारी | ७४.६ | २१.० | ०.१ | ४.२ | १००.०० | |
| ५ | नाशिक | १९९०-९१ | उत्पन्न | ३४.६५ | ६.२९ | .. | ६.९६ | ४७.९० | |
| | | | दरडोई | ५२७ | ९६ | .. | १०६ | ७२९ | |
| | | | टक्केवारी | ७२.३ | १३.४ | .. | १४.५ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ६३.०० | १२.९५ | ०.१८ | १.३० | ७७.४१ | १२.९१ |
| | | | दरडोई | ९५९ | १९७ | ३ | २० | ११७८ | |
| | | | टक्केवारी | ८१.४ | १६.७ | ०.२ | १.७ | १००.०० | |
| ६ | पुणे | १९९०-९१ | उत्पन्न | ५८.१४ | २२.१८ | ०.४१ | १०.५५ | ९१.२९ | |
| | | | दरडोई | ३७१ | १४१ | ३ | ६७ | ५८३ | |
| | | | टक्केवारी | ६३.७ | २४.३ | ०.५ | ११.६ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ११२.१७ | ३८.६३ | ०.४४ | १५.०० | १६६.२४ | १५.८६ |
| | | | दरडोई | ७१६ | २४७ | ३ | ९६ | १०६१ | |
| | | | टक्केवारी | ६७.५ | २३.३ | ०.३ | ९.० | १००.०० | |
| ७ | पिंपरी-चिंचवड | १९९०-९१ | उत्पन्न | ५६.७७ | ५.७० | .. | ०.८४ | ६३.३१ | |
| | | | दरडोई | १०९८ | १११ | .. | १६ | १२२४ | |
| | | | टक्केवारी | ८९.७ | ९.१ | .. | १.३ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | १०२.६५ | १०.६१ | ०.०९ | २.४१ | ११५.७७ | १५.३२ |
| | | | दरडोई | १९८५ | २०५ | २ | ४७ | २२३९ | |
| | | | टक्केवारी | ८८.७ | ९.१ | ०.१ | २.१ | १००.०० | |
| ८ | सोलापूर | १९९०-९१ | उत्पन्न | १५.४३ | ६.८१ | ०.१४ | ३.६९ | २६.०८ | |
| | | | दरडोई | २१८ | ९६ | २ | ५२ | ३६८ | |
| | | | टक्केवारी | ५९.२ | २६.१ | ०.५ | १४.१ | १००.०० | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९४-९५ | उत्पन्न | २७.६० | १३.४४ | ०.२१ | २.६४ | ४३.८८ | १४.६५ |
| | | | दरडोई | ३८९ | १८९ | ३ | ३७ | ६१९ | |
| | | | टक्केवारी | ६२.९ | ३०.६ | ०.५ | ६.० | १००.०० | |
| ९ | कोल्हापूर | १९९०-९१ | उत्पन्न | १५.६७ | ३.४० | ०.१७ | ३.२० | २२.४३ | |
| | | | दरडोई | ३८६ | ८४ | ४ | ७९ | ५५२ | |
| | | | टक्केवारी | ६९.९ | १५.२ | ०.७ | १४.३ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | २६.४४ | १४.५३ | ०.०९ | १.०४ | ४२.१० | १७.८४ |
| | | | दरडोई | ६५१ | ३५८ | २ | २६ | १०३६ | |
| | | | टक्केवारी | ६२.८ | ३४.५ | ०.२ | २.५ | १००.०० | |
| १० | औरंगाबाद | १९९०-९१ | उत्पन्न | १२.७५ | ३.१४ | .. | ७.९९ | २३.८९ | |
| | | | दरडोई | २२२ | ५५ | .. | १३९ | ४१७ | |
| | | | टक्केवारी | ५३.४ | १३.२ | .. | ३३.५ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | २९.४६ | ६.५७ | .. | ३.४८ | ३९.५१ | ११.९४ |
| | | | दरडोई | ५१४ | ११५ | .. | ६१ | ६८९ | |
| | | | टक्केवारी | ७४.६ | १६.६ | .. | ८.८ | १००.०० | |
| ११ | अमरावती | १९९०-९१ | उत्पन्न | ७.९० | ०.७१ | .. | १.५७ | १०.१८ | |
| | | | दरडोई | १८२ | १७ | .. | ३६ | २३५ | |
| | | | टक्केवारी | ७७.६ | ७.० | .. | १५.४ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | १५.४६ | १.५२ | ०.०८ | १.५७ | १८.६३ | १७.५५ |
| | | | दरडोई | ३५६ | ३५ | २ | ३६ | ४२९ | |
| | | | टक्केवारी | ८३.० | ८.२ | ०.४ | ८.४ | १००.०० | |
| १२ | नागपूर | १९९०-९१ | उत्पन्न | ३८.०७ | १५.४९ | ०.१६ | १०.७८ | ६४.४९ | |
| | | | दरडोई | २३४ | ९५ | १ | ६६ | ३९७ | |
| | | | टक्केवारी | ५९.० | १६.० | ०.२ | १६.७ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | ७३.०३ | १६.५२ | ०.३६ | ९.४० | ९९.३२ | ११.७२ |
| | | | दरडोई | ४४९ | १०२ | २ | ५८ | ६११ | |
| | | | टक्केवारी | ७३.५ | १६.७ | ०.४ | ९.५ | १००.०० | |
| | एकूण | १९९०-९१ | उत्पन्न | ८९२.५२ | ३७३.६३ | ३.३६ | ७६.५५ | १३४६.०५ | |
| | | | दरडोई | ४८६ | २०४ | २ | ४२ | ७३३ | |
| | | | टक्केवारी | ६६.३ | २७.७ | ०.२ | ५.७ | १००.०० | |
| | | १९९४-९५ | उत्पन्न | १७२२.३९ | ६४५.३१ | ४.५२ | ११७.६६ | २४८९.८८ | १६.७३ |
| | | | दरडोई | ९३८ | ३५१ | २ | ६४ | १३५६ | |
| | | | टक्केवारी | ६९.२ | २५.९ | ०.२ | ४.७ | १००.०० | |
| | वार्षिक वाढीचा दर .. | | | १७.९२ | १४.९५ | (-) १.६३ | ११.३८ | १६.७३ | |

५.६६. महानगरपालिकेचे १९९०-९१ मधील कर उत्पन्न ६६.३ टक्के वरून १९९४-९५ मध्ये ६९.२ टक्के पर्यंत वाढले. याउलट करेतर उत्पन्न २७.७ टक्के वरून १९९४-९५ मध्ये २५.९ टक्के पर्यंत खाली आले. करेतर उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून विशेष प्रयत्न न होता त्याकडे दुर्लक्षच झाले असल्याचे यावरून दिसते. शासनाकडून मिळणाऱ्या शासन करातील हिस्सा व अनुदानापोटी मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये १९९०-९१ च्या तुलनेत १९९४-९५ मध्ये घट झाली आहे. उत्पन्नातील वाढ ही एक स्वागतार्ह बाब आहे तर शासन मदतीत झालेली घट ही बाब महानगरपालिकेचे शासनावरील परावलंबित्त्व दिवसेंदिवस कमी होत असल्याचे दाखविते.

५.६७. महानगरपालिकांच्या स्वतःच्या उत्पन्नात मागील ५ वर्षांत झालेली वाढ खालील तक्ता क्र. ५.९ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.९

**महानगरपालिकेचे स्वतःचे एकूण उत्पन्न**

(रुपये कोटीत)

| वर्ष | | कर उत्पन्न | | | | करेतर उत्पन्न | | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मालमत्ता कर | जकात कर | इतर कर | एकूण | करेतर शुल्क/दर आकार | इतर | |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १९९०-९१ | .. | २०७.७८ | ६७९.३८ | ५.३६ | ८९२.५२ (७०.५) | २०९.१३ (१६.५) | १६४.५० (१३.०) | १२६६.१४ (१००) |
| १९९१-९२ | .. | २३६.३६ | ७८८.७१ | ७.३१ | १०३२.३८ (७१.७) | २१६.११ (१५.०) | १९१.४० (१३.३) | १४३९.८९ (१००) |
| १९९२-९३ | .. | २६२.४१ | ८५९.३९ | ८.३६ | ११३०.१६ (७२.३) | २२५.९१ (१४.५) | २०७.२६ (१३.३) | १५६३.३२ (१००) |
| १९९३-९४ | .. | ३८५.३३ | १०४४.९३ | १०.५१ | १४४०.७७ (७२.४) | ३४९.८० (१७.६) | २००.३१ (१०.१) | १९९०.८८ (१००) |
| १९९४-९५ | .. | ४४९.४८ | १२६०.२० | १२.७१ | १७२२.३९ (७२.७) | ४०५.८२ (१७.१) | २३९.४९ (१०.१) | २३६७.७० (१००) |

(कंसातील आकडे एकूण उत्पन्नाशी टक्केवारी दाखवितात).

५.६८. सर्वच महानगरपालिकांच्या उत्पन्नात कर उत्पन्नाचा वाटा प्रमुख असून त्याचे प्रमाण १९९०-९१ मधील ७०.५टक्के वरून १९९४-९५ मध्ये ७२.७ टक्के झाले आहे तर करेतर उत्पन्नाचे प्रमाण मात्र २९.५ टक्के (१६.५ +१३.०० टक्के) वरून १९९४-९५ मध्ये २७.२ टक्के पर्यंत कमी झाले आहे. विशेषतः मालमत्ता व जकात करातील उत्पन्नात मोठी वाढ झाली असून करेतर उत्पन्न मात्र त्या प्रमाणात वाढले नाही.

## महानगरपालिकानिहाय स्वतःचे उत्पन्न

५.६९. महानगरपालिकांचा एकत्रितपणे विचार न करता महानगरपालिकानिहाय विचार केल्यास स्वतःच्या साधनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा तपशील खालील तक्ता क्र. ५.१० मध्ये दिला आहे :—

तक्ता क्रमांक ५.१०

**महानगरपालिकांचे स्वतःचे बाबनिहाय उत्पन्न**


**(वर्ष-१ १९९०-९१) (वर्ष-२ १९९४-९५)**

(रुपये कोटीत)

| महानगर पालिका | वर्ष | कर उत्पन्न | | | | करेतर उत्पन्न | | एकूण उत्पन्न | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मालमत्ता कर | जकात कर | इतर कर | एकूण | शुल्क/दर इत्यादी | इतर उत्पन्न | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ मुंबई | १ | १५२.७० | ४०५.६३ | ३.४१ | ५६१.७३ | १५६.४१ | १३९.३० | ८५७.४४ | |
| | २ | ३४१.११ | ७६५.०० | ४.८९ | ११११.०४ | २९७.३८ | २००.१९ | १६०८.६१ | १७.५३ |


## आकृती क्र. २

### महानगरपालिकांचे बाबवार महसुली उत्पन्न १९९४-९५



आकृती क्र. ३

गहानगरपालिकांचे स्वतःचे व महसुली उत्पन्न



| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ ठाणे | १ | ४.८३ | ५६.०३ | ०.०६ | ६०.९२ | ३.९१ | ४.६८ | ६९.५१ | |
| | २ | १७.६० | ८६.०८ | ०.१३ | १०३.८१ | ११.९४ | ३.३० | ११९.०६ | १२.५२ |
| ३ नवी | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | |
| मुंबई | २ | ०.१६ | .. | .. | ०.१७ | १.१७ | ०.३३ | १.६७ | |
| ४ कल्याण | १ | ६.९९ | २३.४५ | ०.०३ | ३०.४७ | ४.२९ | १.३१ | ३६.०७ | १६.६७ |
| | २ | १७.०२ | ४०.५१ | ०.०३ | ५७.५७ | १२.२६ | ३.९७ | ७३.८० | |
| ५ नाशिक | १ | ३.७० | ३०.२८ | ०.६७ | ३४.६५ | ५.६३ | ०.६६ | ४०.९४ | १६.८० |
| | २ | ६.७० | ५४.९९ | १.३१ | ६३.०० | १२.०९ | ०.८५ | ७५.९४ | |
| ६ पुणे | १ | १६.१९ | ४१.६४ | ०.३१ | ५८.१४ | १७.४४ | ४.७४ | ८०.३२ | |
| | २ | २६.८८ | ८०.२५ | ५.०४ | ११२.१७ | ३३.०४ | ५.५९ | १५०.८० | १६.६३ |
| ७ पिंपरी- | १ | ३.३४ | ५३.३८ | ०.०४ | ५६.७७ | १.११ | ४.५९ | ६२.४७ | |
| चिंचवड | २ | ५.५३ | ९७.०२ | ०.१० | १०२.६५ | ४.०८ | ६.५३ | ११३.२६ | १४.९४ |
| ८ सोलापूर | १ | ३.८० | ११.५७ | ०.०६ | १५.४३ | २.७१ | ४.१० | २२.२५ | |
| | २ | ४.८६ | २२.७१ | ०.०३ | २७.६० | ६.०६ | ७.३८ | ४१.०४ | १७.९३ |
| ९ कोल्हापूर | १ | ३.३५ | १२.२४ | ०.०७ | १५.६७ | १.२५ | २.१५ | १९.०७ | |
| | २ | ५.९५ | २०.४० | ०.०९ | २६.४४ | ७.७९ | ६.७४ | ४०.९७ | २२.८३ |
| १० औरंगाबाद | १ | १.८० | १०.४४ | ०.५१ | १२.७५ | २.९४ | ०.२० | १५.९० | |
| | २ | ३.६३ | २४.८० | १.०३ | २९.४६ | ६.०० | ०.५७ | ३६.०३ | २१.११ |
| ११ अमरावती | १ | १.३८ | ६.४९ | ०.०३ | ७.९० | ०.५९ | ०.१२ | ८.६१ | |
| | २ | ३.१९ | १२.२३ | ०.०३ | १५.४६ | ०.९३ | ०.५९ | १६.९८ | १९.४८ |
| १२ नागपूर | १ | ९.६९ | २८.२१ | ०.१७ | ३८.०७ | १२.८५ | २.६४ | ५३.५६ | |
| | २ | १६.८१ | ५६.१९ | ०.०३ | ७३.०३ | १३.०८ | ३.४४ | ८९.५५ | १४.२६ |
| एकूण .. | १ | २०७.७८ | ६७९.३८ | ५.३६ | ८९२.५२ | २०९.१३ | १६४.५० | १२६६.१४ | १७.०७ |
| | २ | ४४९.४८ | १२६०.२० | १२.७१ | १७२२.३९ | ४०५.८२ | २३९.४९ | २३६७.७० | |
| वार्षिक वाढीचा दर | | २२.५३ | १६.३८ | २३.२४ | १७.९२ | १९.८१ | ८.२९ | १७.०७ | |

### ५.७०. कर उत्पन्न

महानगरपालिकांच्या उत्पन्नात मागील ५ वर्षांत चांगलीच वाढ झाली असून वार्षिक वाढीचा दर १७.०७ टक्के असल्याचे दिसून आले. प्रत्येक महानगरपालिकेचा स्वतंत्र विचार केल्यास कोल्हापूर या महानगरपालिकेचे उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर राज्यात सर्वाधिक तर ठाणे या महानगरपालिकेचा उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर सर्वात कमी असल्याचे दिसून आले. सर्वच महानगरपालिकांच्या कराच्या बाबनिहाय उत्पन्नाचा विचार केल्यास मालमत्ता व इतर करातील वाढ ही जकात करातील वाढीपेक्षा जास्त आहे असे असले तरी जकात करापासूनच्या उत्पन्नाचें एकूण उत्पन्नाशी प्रमाण मात्र सर्वाधिक आहे. उलट इतर कराच्या उत्पन्नाचे प्रमाण फारच अत्यल्प आहे.(आकृती ४ पहावी).

### ५.७१. करेतर उत्पन्न व इतर उत्पन्न

करेतर उत्पन्नात शुल्क दर, आकार यापासून मिळणारे उत्पन्न व इतर उत्पन्न महानगरपालिकेच्या मालमत्ता इ. पासून भाडे, संकुले इ. पासूनच्या उत्पन्नाचा समावेश होतो. या करेतर व इतर उत्पन्नातील मागील ५ वर्षांच्या कालावधीतील वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे १९.८१ टक्के व ८.२९ टक्के होता. करेतर व इतर उत्पन्नात वाढ होण्यास भरपूर वाव आहे.

## ५.७२. महानगरपालिकांच्या कर उत्पन्नाचे विश्लेषण

महानगरपालिकांच्या स्वतःच्या साधनापासूनच्या उत्पन्नात कर उत्पन्नाचे प्रमाण जास्त आहे. या कर उत्पन्नात मालमत्ता व जकात करापासून जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होत असून इतर करांपासूनचे उत्पन्न फारच अल्प आहे. या कर उत्पन्नाच्या वेगवेगळ्या बाबींपासूनच्या उत्पन्नाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

## ५.७३. मालमत्ता कर

महानगरपालिकेच्या कराच्या एकूण उत्पन्नात जकात करानंतर मालमत्ता कराचा वाटा दुसऱ्या क्रमांकावर आहे. या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा तपशील तक्ता क्र. ५.१० मध्ये दिला आहे. तर खालील तक्ता क्र. ५.११ मध्ये या करापासूनचे दरडोई उत्पन्न व त्या उत्पन्नाची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी दाखविली आहे.

तक्ता क्रमांक ५.११


**महानगरपलिकांचे मालमत्ता करापासूनचे दरडोई उत्पन्न**

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | महानगर-पालिकेचे नाव | १९९०-९१ | | १९९४-९५ | | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दरडोई उत्पन्न | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | दरडोई उत्पन्न | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई .. | १५४ | २७.२ | ३४४ | ३०.७ | २४.३७ |
| २ | ठाणे .. | ६० | ७.९ | २१९ | १७.० | ३३.९४ |
| ३ | नवी मुंबई .. | .. | .. | ५ | ९७.१ | .. |
| ४ | कल्याण .. | ८५ | २२.९ | २०८ | २९.६ | २२.६४ |
| ५ | नाशिक .. | ५६ | १०.७ | १०२ | १०.६ | १७.१६ |
| ६ | पुणे .. | १०३ | २७.९ | १७२ | २४.० | १२.५२ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | ६५ | ५.९ | १०७ | ५.४ | १६.६३ |
| ८ | सोलापूर .. | ५४ | २४.६ | ६९ | १७.६ | ५.४३ |
| ९ | कोल्हापूर .. | ८३ | २१.४ | १४६ | २२.५ | १५.२२ |
| १० | औरंगाबाद .. | ३१ | १४.१ | ६३ | १२.३ | १८.०३ |
| ११ | अमरावती .. | ३२ | १७.४ | ७४ | २०.७ | २१.६२ |
| १२ | नागपूर .. | ६० | २५.४ | १०३ | २३.० | १४.८४ |
| | एकूण .. | ११३ | २३.३ | २४५ | २६.१ | २२.५३ |

५.७४. महानगरपालिकांचा एकत्रितपणे विचार केल्यास मालमत्ता करापासून मिळणारे उत्पन्न १९९०-९१ मध्ये एकूण कर उत्पन्नाच्या २३.३ टक्के तर १९९४-९५ मध्ये ते २६.१ टक्के असल्याचे दिसून येते. मालमत्ता करात मागील ५ वर्षांत सर्वच महानगरपालिकांच्या बाबतीत वाढीचा कल दिसून आला असून वार्षिक वाढीचा दर २२.५३ टक्के होता. महानगरपालिकांचा स्वतंत्रपणे विचार केल्यास मुंबई, ठाणे व कल्याण या महापालिकांच्या दरडोई मालमत्ता कराच्या उत्पन्नात मागील ५ वर्षांत लक्षणीय वाढ झाली आहे. औरंगाबाद व अमरावती या महानगरपालिकांच्या उत्पन्नातील गेल्या ५ वर्षांतील वाढ अनुक्रमे १८.०३ टक्के व २१.६२ टक्के असली तरी त्यांचे दरडोई उत्पन्न सर्व महानगरपालिकांच्या तुलनेत फारच कमी आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करआकारणी संदर्भात अद्याप प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने त्याबाबत कोणतेही अभिप्राय देता येत नाहीत.

आकृती क्र. ४



महानगरपालिकांचे करापासूनचे बाबनिहाय उत्पन्न
२०००
१५००
१०००
५००
०
रु. कोटीत
१९९०-९१
१९९१-९२
१९९२-९३
१९९३-९४
१९९४-९५
इतर कर
जकात
मालमत्ता कर

५.७५. मालमत्ता कराच्या उत्पन्नातील वाढ ही प्रामुख्याने (१) कार्यक्षेत्रात नव्याने बांधलेल्या इमारती तसेच जुन्या इमारतींमध्ये झालेले फेरबदल, (२) मालमत्ता कराच्या दरात झालेली वाढ, (३) फेरमूल्यांकनानंतर करयोग्य मूल्यात झालेली वाढ तसेच (४) करवसुलीबाबत झालेली प्रगती इत्यादीमुळे झालेली दिसते.

**मालमत्तांच्या संख्येतील व कराच्या वार्षिक मागणीतील वाढ**

५.७६. मालमत्ता करांच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी जे घटक प्रामुख्याने कारणीभूत आहेत, त्यात मालमत्तांच्या संख्येतील वाढ हा एक घटक आहे. गेल्या पाच वर्षांत मालमत्तांच्या संख्येतील वाढ त्याचबरोबर या कराच्या मागणीतील वाढ व त्यांच्या वसुलीची टक्केवारी सारांशरूपाने पुढील तक्ता क्र. ५.१२ मध्ये दर्शविलेली आहे :—

तक्ता क्रमांक ५.१२

**महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेची संख्या व मालमत्ता कराची मागणी**

| अ.क्र. | महानगर-पालिका | मालमत्तांची संख्या | | | मालमत्ता कराची वार्षिक मागणी (थकबाकी वगळून) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०-९१ | १९९४-९५ | सरासरी वार्षिक वाढीची टक्केवारी | १९९०-९१ (रु. हजारांत) | १९९४-९५ (रु. हजारांत) | सरासरी वार्षिक वाढीची टक्केवारी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मुंबई .. | २२४३५६ | २४१३१७ | १.८९ % | १६३८९९८ | ३३८४२३५ | २६.६२ % |
| २ | ठाणे .. | ८३१८३ | १०६१६३ | ६.९१ % | ८६४७२ | २४८२४६ | ४६.७७ % |
| ३ | नवी मुंबई .. | .. | ८३०६१ | .. | .. | .. | .. |
| ४ | कल्याण .. | ५९७८० | ८००६७ | ८.४८ % | ६५८३४ | १८२१७२ | ४४.१८ % |
| ५ | नाशिक .. | ७६७५४ | १०५१३६ | ९.२४ % | ४७११७ | १२१०१९ | ३९.२१ % |
| ६ | पुणे .. | १२२७५५ | १४९८८७ | ५.५२ % | १८४६२० | ३३५११६ | २०.३८ % |
| ७ | पिंपरी-चिंचवड | ४८७३५ | ६७८५९ | ९.८१ % | ४०९५५ | ६५४८० | १४.९७ % |
| ८ | सोलापूर .. | ३८००० | ४८४६२ | ६.८८ % | ३६१९१ | ५८५०३ | १५.४१ % |
| ९ | कोल्हापूर .. | ४९५४७ | ७०५६९ | १०.६१ % | ३८९५० | ६६४२४ | १७.६३ % |
| १० | औरंगाबाद .. | ६६४५९ | ८५७३० | ७.२५ % | ४७०३० | १२२९४८ | ४०.३६ % |
| ११ | अमरावती .. | ५९७५३ | ६४३८० | १.९४ % | २१०२४ | २७३८८ | ७.५७ % |
| १२ | नागपूर .. | ३११२९९ | ३६९५२८ | ४.६७ % | ५०३७६ | ७६०८७ | १२.७६ % |
| | एकूण .. | ११४०६२१ | १४७२१५९ | ७.२७ % | २२५७५७१ | ४६८७६२२ | २६.९१ % |

५.७७. मागील ५ वर्षांचे कालावधीत करयोग्य मालमत्ताच्या संख्येत बरीच वाढ झाल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते. कोल्हापूर महानगरपालिकेचे हद्दीत मालमत्तांच्या संख्येतील वाढीचा दर सर्वाधिक होता तर मुंबई महानगरपालिकेचेबाबत मात्र मालमत्तांच्या संख्येतील वाढ ही सर्वात कमी झाली.

५.७८. राज्यातील बहुतेक महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात लोकसंख्येत वाढ झाली असून या शहरांमध्ये औद्योगिकिरणही झपाट्याने होत आहे. मालमत्ताच्या संख्येतील वाढीबरोबरच वर्षातील मालमत्ता कराच्या मागणीमध्येही (थकबाकी वगळता) झालेली वाढ याचा तुलनात्मक अभ्यास केल्यास मालमत्तांच्या संख्येतील वाढीपेक्षा कराच्या मागणीत झालेली वाढ काही महानगरपालिकांच्या बाबतीत लक्षणीय आहे. ही वाढ प्रामुख्याने करांच्या दरातील वाढ, फेरमूल्यांकनामुळे करयोग्य मूल्यांत झालेली वाढ इत्यादीमुळे झाली आहे.

### मालमत्ता कराची वसुली

५.७९. मालमत्ता कराची मागणी (थकबाकी धरून) वर्षात झालेली वसुली व वर्षअखेर थकबाकीची टक्केवारी याबाबतची माहिती १९९०-९१ व १९९४-९५ या वर्षासाठी खालील तक्ता क्रमांक ५.१३ मध्ये दिली आहे :—

तक्ता क्रमांक ५.१३

**मालमत्ता कराची मागणी, वसुली व थकबाकी**

(रुपये कोटीमध्ये)

| अ.क्र. | महानगर-पालिका | थकबाकीसह मागणी | | वर्षातील वसुली * | | थकबाकी | | थकबाकीची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०-९१ | १९९४-९५ | १९९०-९१ | १९९४-९५ | १९९०-९१ | १९९४-९५ | १९९०-९१ | १९९४-९५ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मुंबई | ३०१.१४ | ५१०.८२ | १४२.५७ | ३२५.८७ | १५८.५७ | १८४.९४ | ५२.६ | ३६.२ |
| २ | ठाणे | १८.१३ | ३६.४३ | ६.२६ | २१.९९ | ११.८७ | १४.४४ | ६५.४ | ३९.६ |
| ३ | नवी मुंबई | . . | . . | . . | ०.१६ | . . | . . | . . | . . |
| ४ | कल्याण | १०.७७ | २४.६२ | ६.०५ | १७.१५ | ४.७२ | ७.४७ | ४३.८ | ३०.३ |
| ५ | नाशिक | ५.८८ | १४.४६ | ४.८७ | ११.१६ | १.०१ | ३.३० | १७.२ | २२.८ |
| ६ | पुणे | २७.१० | ५०.४१ | १६.५० | ३१.९१ | १०.६० | १८.४९ | ३९.१ | ३६.६ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | १२.०१ | १६.३८ | ३.३४ | ५.५२ | ८.६७ | १०.८५ | ७२.२ | ६६.२ |
| ८ | सोलापूर | ८.१० | १४.५१ | ३.८० | ४.८६ | ४.३० | ९.६४ | ५३.१ | ६६.४ |
| ९ | कोल्हापूर | ५.७१ | ९.३० | ३.३५ | ५.९४ | २.३५ | ३.३५ | ४१.२ | ३६.० |
| १० | औरंगाबाद | ११.४९ | २४.२२ | ३.२६ | ५.९७ | ८.२२ | १८.२५ | ७१.५ | ७५.३ |
| ११ | अमरावती | ४.५८ | ४.९७ | १.३७ | ३.१९ | ३.२० | १.७८ | ६९.९ | ३५.८ |
| १२ | नागपूर | ६.७० | १६.२६ | ५.१६ | ८.३५ | १.५४ | ७.९१ | २३.० | ४८.६ |
| | एकूण . . | ४११.६७ | ७२२.४२ | १९६.५६ | ४४१.९६ | २१५.११ | २८०.४६ | ५२.२ | ३८.८ |

टीप तक्ता क्रमांक ५.१० व या तक्त्यातील मालमत्ता करांच्या उत्पन्न व वसुलीचे आकड्यांत फरक आहे. कारण तक्ता क्र. ५.१० मधील आकडे वार्षिक लेख्यांवरून घेतले आहेत. तर या तक्त्यातील आकडे मालमत्ता विभागातील लेख्यांवर आधारित आहेत. वर्षअखेर न्यायालयाच्या आदेशानुसार किंवा इतर कारणांमुळे जी कराची रक्कम परत केली जाते. काही धनादेश वटले जात नाहीत, अशा रकमांची नोंद विभागात केली जाते. परंतु त्याप्रमाणे वार्षिक लेख्यांत बदल केले जातातच असे नाही. त्यामुळे या आकड्यांत फरक आहे.

५.८०. सर्व महानगरपालिकांचा एकत्रित विचार केल्यास मागील पाच वर्षांच्या कालावधीत काही महानगरपालिकांचा अपवाद वगळल्यास थकबाकीची एकूण मागणीशी टक्केवारी कमी झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा होतो की, वसुलीचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. औरंगाबाद, सोलापूर, पिंपरी-चिंचवड. नागपूर या महानगरपालिकांच्या वसुलीचे प्रमाण मात्र बरेच कमी असल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे ज्या वर्षी मालमत्ता कराच्या मागणीत वाढ करण्यात आली त्या वर्षी काही अपवादात्मक महानगरपालिका वगळता (उदा. मुंबई, ठाणे, कल्याण, कोल्हापूर) इतर महानगरपालिकांच्या वसुलीचे प्रमाण प्रामुख्याने कमी असल्याचे दिसून आले. वसुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी या संस्थांनी अधिक प्रशासकीय प्रयत्न करणे गरजेचे आहे.

जकात कर

५.८१. सर्व महानगरपालिकांचे १९९४-९५ या वर्षाचे जकातीपासून मिळणारे उत्पन्न त्यांच्या एकूण कर उत्पन्नाच्या ७३.२ टक्के आहे. राज्यात नवी मुंबई महानगरपालिका वगळता, सर्व महानगरपालिका जकात कराची आकारणी करतात. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात जकात कराऐवजी लेखाधारित जकात उपकर आकारण्याबाबतची प्रक्रिया सुरू झाली आहे. महानगरपालिकांचे जकात करापासूनचे दरडोई उत्पन्न व त्याची एकूण कर उत्पन्नाशी (मालमत्ता, जकात कर व इतर कर) टक्केवारी खालील तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये दिली आहे :—

तक्ता क्रमांक ५.१४

**महानगरपालिकांचे जकात करापासूनचे दरडोई उत्पन्न**

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | महानगर-पालिकेचे नाव | १९९०-९१ | | १९९४-९५ | | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दरडोई उत्पन्न | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | दरडोई उत्पन्न | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई .. | ४०९ | ७२.२ | ७७१ | ६८.९ | १७.४१ |
| २ | ठाणे .. | ६९७ | ९२.० | १०७२ | ८२.९ | ९.५४ |
| * ३ | नवी मुंबई .. | .. | .. | .. | .. | .. |
| ४ | कल्याण .. | २८६ | ७७.० | ४९४ | ७०.४ | ११.५५ |
| ५ | नाशिक .. | ४६१ | ८७.४ | ८३७ | ८७.३ | १५.७१ |
| ६ | पुणे .. | २६६ | ७१.६ | ५१२ | ७१.५ | १६.४४ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | १०३२ | ९४.० | १८७६ | ९४.५ | १४.३५ |
| ८ | सोलापूर .. | १६३ | ७५.० | ३२० | ८२.३ | २०.०० |
| ९ | कोल्हापूर .. | ३०१ | ७८.१ | ५०२ | ७७.२ | १४.११ |
| १० | औरंगाबाद .. | १८२ | ८१.९ | ४३३ | ८४.२ | २१.८० |
| ११ | अमरावती .. | १५० | ८२.२ | २८२ | ७९.१ | १८.३३ |
| १२ | नागपूर .. | १७४ | ७४.१ | ३४६ | ७६.९ | १९.१३ |
| | एकूण .. | ३७० | ७६.१ | ६८७ | ७३.२ | १६.३८ |

* नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात जकात कर लागू नाही.

५.८२. महानगरपालिकांचे जकात करापासूनचे उत्पन्न दरवर्षी वाढत असल्याचे वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते. औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात उत्पन्नातील वाढीचा सर्वाधिक दर २१.८० टक्के आहे. तर सर्वात कमी वाढ ठाणे महानगरपालिकेची असून ती केवळ ९.५४ टक्के आहे.

५.८३. दरडोई उत्पन्नाचा विचार केल्यास पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकेचे दरडोई जकातीचे उत्पन्न १९९४-९५ साठी रुपये १,८७६ आहे. त्या खालोखाल दरडोई उत्पन्न ठाणे रुपये १,०७२, नाशिक रुपये ८३७ तर मुंबई रुपये ७७१ आहे. या शहरांच्या औद्योगिकरणात फार मोठी वाढ होत असल्याने व्यापारी व वाणिज्य उलाढालीचे प्रमाण मोठे असल्याने येथील दरडोई उत्पन्न जास्त असल्याचे दिसते. त्यानंतर इतर महानगरपालिकांचा क्रम लागतो. सर्वात कमी दरडोई उत्पन्न रुपये २८२ अमरावती या महानगरपालिकेचे आहे.



एच ४०९४-६

५.८४. जकात कराचे उत्पन्न निश्चित स्वरूपाचे असल्याने व त्यात दरवर्षी सतत वाढ होत असल्याने या नागरी संस्था स्वबळावर त्यांचा दैनंदिन कार्यभार समर्थपणे चालवू शकतात व त्याना शासकीय मदतीवर फारसे अवलंबून रहावे लागत नाही. परिणामतः हा कर रद्द केला जाऊ नये अशी भूमिका सर्वच महानगरपालिकांची आहे. जकात कर आकारणीचे दर व त्याबद्दलचे नियम हे प्रत्येक महानगरपालिकेचे वेगवेगळे आहेत. जकात कराच्या आकारणीसंदर्भात आयातकारांचा/व्यापाऱ्यांचा प्रखर विरोध आहे. जकातीमुळे जकात नाक्यावर फार वेळ वाहनांचा खोळंबा होतो. त्यामुळे पेट्रोल, डिझेल सारख्या राष्ट्रीय संपत्तीचे फार मोठे नुकसान होते. कर्मचाऱ्यांकडून कर आकारणी संदर्भात भेदभाव व त्रास दिला जातो. त्याचबरोबर जकात कर उत्पन्नात बऱ्याच गळती व कमतरता आहेत हे जरी वादासाठी मान्य केले तरी या संस्थांची आर्थिक स्वायत्तता अभेद्य राहण्याच्या दृष्टीने जकात करासारखे सतत वाढ होणारे उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध करून दिल्याशिवाय जकात कर रद्द करता येईल असे वाटत नाही. जकात कर हे एक हुकमी उत्पन्नाचे साधन असल्याने त्यातील त्रुटी दूर करण्यास वाव आहे व तसा प्रयत्न या नागरी संस्थांनी करावयास पाहिजे असे अभिप्राय या आयोगाने नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने व्यक्त केले आहेत, या विचारांशी आयोग सहमत आहे. (जकात करासंबंधीच्या शिफारशी प्रकरण क्र. ८ मध्ये केल्या आहेत.) जकात कराऐवजी लेखाधारीत जकात उपकर पद्धती नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. आयोगाने या महानगरपालिकेच्या पदाधिकारी व अधिकारी याचेबरोबर चर्चा केली असता असे सांगण्यात आले की, प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेल्या लेखाधारीत जकात उपकर पद्धतीबाबतही व्यापारीवर्गात मतभिन्नता आहे. उलट इतरत्र सुरू असलेली जकात कर पद्धती नवी मुंबई क्षेत्रात सुरू करावी अशी काही व्यापारी गोटातून मागणी होत आहे. परंतु लेखाधारीत जकात उपकर पद्धत नवीन व अलिकडेच सुरू झाली असल्याने याबाबत आताच मत व्यक्त करणे आयोगाला योग्य वाटत नाही.

**इतर कर**

५.८५. इतर करापासून मिळणारे दरडोई उत्पन्न व त्याची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी तक्ता क्रमांक ५.१५ मध्ये दर्शविली आहे :—

तक्ता क्रमांक ५.१५

**महानगरपालिकांचे इतर करांपासूनचे दरडोई उत्पन्न व त्याची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी**

| अ.क्र. | महानगर-पालिकेचे नाव | १९९०-९१ | | १९९४-९५ | | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दरडोई उत्पन्न रुपये | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | दरडोई उत्पन्न रुपये | एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मुंबई .. | ३ | ०.६ | ५ | ०.४ | ८.९० |
| २ | ठाणे .. | १ | ०.१ | २ | ०.१ | १३.८५ |
| ३ | नवी मुंबई .. | .. | .. | ० | २.९ | .. |
| ४ | कल्याण .. | ० | ०.१ | ० | ० | –२.६२ |
| ५ | नाशिक .. | १० | १.९ | २० | २.१ | २१.९३ |
| ६ | पुणे .. | २ | ०.५ | ३२ | ४.५ | ८६.०० |

| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | पिंपरी-चिंचवड | | १ | ०.१ | .२ | ०.१ | २५.९१ |
| ८ | सोलापूर | .. | १ | ०.४ | ० | ०.१ | –१३.०७ |
| ९ | कोल्हापूर | .. | २ | ०.५ | २ | ०.३ | २.९६ |
| १० | औरंगाबाद | .. | ९ | ४.० | १८ | ३.५ | २२.११ |
| ११ | अमरावती | .. | १ | ०.४ | १ | ०.२ | ०.३० |
| १२ | नागपूर | .. | १ | ०.४ | ० | ० | –२९.६४ |
| | एकूण | .. | ३ | ०.६ | ७ | ०.७ | २३.२४ |

५.८६. इतर करामध्ये प्रामुख्याने वाहने व जनावरांवरील कर, जाहिरात कर, करमणूक प्रयोगावरील कर तसेच इतर करांपासूनच्या उत्पन्नाचा समावेश आहे. वरील आकडेवारीवरून असे दिसून येईल की, या उत्पन्नाची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी औरंगाबाद, पुणे व नाशिक या महानगरपालिकांचा अपवाद वगळता १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. आयोग अशी शिफारस करते की, **ज्या महानगरपालिकांचे उत्पन्न फारच कमी आहे त्यांनी इतर करात समाविष्ट असलेल्या कराविषयक बाबी व त्यांचे दर इत्यादी चे पुनर्विलोकन करून या उत्पन्नात वाढ होईल असे प्रयत्न करावे.**

**महानगरपालिकांचे करेतर व इतर उत्पन्न**

५.८७. महानगरपालिकांच्या करेतर व इतर उत्पन्नाची मागील ५ वर्षांची आकडेवारी तक्ता क्रमांक ५.९ तसेच तुलनात्मक दृष्ट्या १९९०-९१ व १९९४-९५ ची आकडेवारी तक्ता क्रमांक ५.१० मध्ये दिली आहे. या बाबी पासूनचे दरडोई उत्पन्न व उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर खालील तक्ता क्रमांक ५.१६ मध्ये दिला आहे :—

तक्ता क्रमांक ५.१६

**महानगरपालिकांचे दरडोई करेतर व इतर उत्पन्न व वार्षिक वाढीचा दर**

| अ.क्र. | महानगर-पालिका | | करेतर उत्पन्न | | | इतर उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९०-९१ | १९९४-९५ | वार्षिक वाढीचा दर | १९९०-९१ | १९९४-९५ | वार्षिक वाढीचा दर |
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | रुपये | रुपये | | रुपये | रुपये | |
| १ | मुंबई | .. | १५८ | ३०० | १९.१३ | १४० | २०२ | ७.६६ |
| २ | ठाणे | .. | ४९ | १४९ | ३१.२२ | ५८ | ४१ | (–)१०.०९ |
| ३ | नवी मुंबई | .. | .. | ३७ | .. | .. | १० | .. |
| ४ | कल्याण | .. | ५२ | १५० | २९.६० | १६ | ४८ | १८.८९ |
| ५ | नाशिक | .. | ८६ | १८४ | २१.९७ | १० | १३ | ९.२१ |
| ६ | पुणे | .. | १११ | २११ | २०.२६ | ३० | ३६ | ५.०२ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | | २२ | ७९ | ४०.४० | ८९ | १२६ | १२.०७ |
| ८ | सोलापूर | .. | ३८ | ८५ | २२.१३ | ५८ | १०४ | १८.७६ |



एच ४०९४-६अ

| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कोल्हापूर | .. | ३१ | १९२ | ७२.९४ | ५३ | १६६ | ३२.९० |
| १० | औरंगाबाद | .. | ५१ | १०५ | २१.१४ | ४ | १० | १९.०१ |
| ११ | अमरावती | .. | १४ | २१ | १७.९७ | ३ | १४ | ५१.१२ |
| १२ | नागपूर | .. | ७९ | ८१ | १.४३ | १६ | २१ | ८.७५ |
| | एकूण | .. | ११४ | २२१ | १९.८१ | ९० | १३० | ८.२९ |

**करेतर उत्पन्न**

५.८८. करेतर उत्पन्नात मागील ५ वर्षांत झालेल्या वाढीचा वार्षिक दर १९.८१ टक्के तर इतर उत्पन्नाचेबाबत हा दर ८.२९ टक्के आहे. महानगरपालिकेचा स्वतंत्रपणे विचार केल्यास करेतर उत्पन्नातील वाढ कोल्हापूर व पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांचे बाबतीत खूपच जास्त आहे तर ती नागपूर महानगरपालिकेचे बाबतीत फारच कमी आहे. या बाबीपासून उत्पन्नात भरीव अशी वाढ होत नाही व हे उत्पन्न गोळा करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची भरपाई होत नाही. या सबबीवर वेगवेगळ्या शुल्क, दर, आकार इ. त्या दरामध्ये पुनर्विलोकन होऊन ते वाढविण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत. नागरी क्षेत्रात याबाबत संलग्न असलेल्या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी जो खर्च केला जातो, किमान तेवढा खर्च तरी निघावा यासाठी शुल्क, दर व आकार यांच्या दरात वेळोवेळी सुधारणा होणे व उत्पन्न वाढीचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**इतर उत्पन्न**

५.८९. या बाबींपासूनच्या उत्पन्नात नागरी संस्थांच्या मालमत्ता पासूनचे भाडे, संकुल इ. सोईचे भाडे, गुंतवणुकी-वरील व्याज व इतर यांचा समावेश आहे. या उत्पन्नाच्या वाढीचा दर ८.२९ टक्के आहे. याही बाबतीत वाढीचा दर जास्तीत जास्त ५१.१२ टक्के (अमरावती) तर कमीत कमी (-) १०.०९ टक्के (ठाणे) असा दिसून आला. वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे या बाबीपासूनच्या उत्पन्न वाढीकडेही पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही. उत्पन्न कमी आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे परिणामी उत्पन्नात वाढ न होणे हे एक दुष्टचक्र आहे ते थांबविणे आवश्यक आहे. ज्या ज्या बाबींपासून उत्पन्न मिळते त्याचा वेळोवेळी विचार झाल्यास व त्याप्रमाणे आकार/दरात सुधारणा झाल्यास, उत्पन्नात निश्चितपणे वाढ होऊ शकेल व त्यामुळे जनतेत असंतोष वाढणार नाही. उलट अनेक वर्षानंतर या उत्पन्नाच्या दरात अचानकपणे वाढ केल्यास भरमसाठ वाढीचे विरोधात नागरिकांत असंतोष पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**व्यापारी संकुले व त्यापासूनचे उत्पन्न**

५.९०. बहुतेक सर्वच महानगरपालिकांच्या क्षेत्रात मध्यवर्ती व मोक्याच्या ठिकाणी जनता व व्यापाऱ्यांना बाजारपेठेची सुविधा उपलब्ध करण्यासाठी व्यापारी संकुलांची उभारणी करण्यात आली असून त्यापासून एक उत्पन्नाचे प्रभावी साधन निर्माण करण्यात आले आहे. ही संकुले या नागरी संस्था स्वतःच्या किंवा शासनाने हस्तांतरित केलेल्या जागेवर शासनाकडून कर्ज घेऊन तसेच स्वतःच्या निधीचा वापर करून बांधतात. संकुलातील गाळे व्यापाऱ्यांकडून अनामत रकमा घेऊन भाडेतत्त्वावर दिले जातात व त्यापासून त्यांना मासिक भाड्याशिवाय गाळ्यावरील परवाना शुल्क व इतर आकारापासून उत्पन्न मिळते. या संकुलांची मालकी पूर्णतः नागरी संस्थेची असते.

५.९१. व्यापारी संकुले बांधणीसाठी किती भांडवली गुंतवणूक केली, त्याचे स्त्रोत काय होते याची आकडेवारी आयोगाने गोळा केली असता काही संस्थांनी त्यांचेकडे जुन्या व्यापारी संकुलांच्या भांडवली खर्चाची माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. तरीपण ३१ मार्च १९९५ रोजीची संकुलाबाबतची जी माहिती उपलब्ध झाली ती तक्ता क्रमांक ५.१७ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.१७

## व्यापारी संकुले

(रुपये लाखात)

| महानगर पालिका | व्यापारी संकुल संख्या | संकुल बांधणीचा खर्च | | | | संकुला-पासूनचे पासूनचे उत्पन्न | सोयी वापरात नसल्याने झालेले नुकसान | थकबाकी ३१ मार्च १९९५ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वतःचा निधी | कर्ज | इतर | एकूण | | | |
| मुंबई . . | ८७ | . . | . . | . . | . . | ७०४ | . . | २६४ |
| ठाणे . . | ५ | ८५ | . . | . . | ८५ | ३ | . . | २२ |
| कल्याण . . | १४ | . . | . . | . . | . . | ११ | . . | ४० |
| नवी मुंबई . . | . . | . . | . . | . . | . . | . . | . . | . . |
| नाशिक . . | २६ | . . | . . | . . | . . | ५३ | . . | २३ |
| पुणे . . | ४६ | ९६८ | . . | १९ | ९८७ | २२४ | . . | ३८ |
| पिंपरी-चिंचवड . . | ४ | ४८२ | . . | . . | ४८२ | १३ | ३ | २५ |
| सोलापूर . . | ५२ | ११८ | २५२ | . . | ३७० | ५६ | २ | १४ |
| कोल्हापूर . . | ४५ | . . | १२१ | . . | १२१ | ६१ | १ | ८० |
| औरंगाबाद . . | २३ | १३५ | ३० | . . | १६५ | २६ | १ | १२ |
| अमरावती . . | ३ | . . | . . | . . | . . | १० | . . | ३ |
| नागपूर . . | १८ | . . | . . | . . | . . | ५२ | . . | १४ |
| एकूण . . | ३२३ | १७८८ | ४०३ | १९ | २२१० | १२१३ | ७ | ५३६ |

गुंतवणुकीच्या आकडेवारी अभावी या संकुलापासून मिळणारे उत्पन्नाचे प्रमाण किती आहे हे पुरेसे आहे किंवा कसे, याबाबत काही अभिप्राय देता येत नाही.

५.९२. या संकुलात निर्माण केलेल्या सोयीमध्ये प्रामुख्याने दुकानांसाठी गाळे, ओटे तसेच इतर बाबी उदा. सभागृह इत्यादीचा समावेश आहे. त्याचा तपशील तक्ता क्र. ५.१८ मध्ये दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.१८

## संकुलातील सोयी

| महानगरपालिका | निर्माण केलेल्या सोयींची संख्या | | | सोयींचा वापर | | | वापरात नसलेल्या सोयींची एकूण सोयींशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ओटे | दुकाने | इतर | स्वतःसाठी | लिलावाने व भाड्याने दिलेल्या | वापरात नसलेले | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| मुंबई . . | ६१ | १२,२३१ | ३५२ | ९१ | १२,५५३ | . . | . . |
| ठाणे . . | ६४ | ४१४ | . . | ३ | ४७५ | . . | . . |
| नवी मुंबई . . | . . | . . | . . | . . | . . | . . | . . |
| कल्याण . . | २७ | ३४४ | . . | . . | ३१३ | ५८ | १९ |

| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नाशिक | . . | ३०६ | ८२४ | . . | २२ | ११०८ | . . | . . |
| पिंपरी-चिंचवड | | ८१२ | . . | . . | . . | ६६९ | १४३ | २१ |
| पुणे | . . | ६ | २६३१ | १३६ | ३३ | २५३० | २१० | ८ |
| सोलापूर | . . | . . | १२८३ | . . | . . | ११७२ | १११ | ९ |
| कोल्हापूर | . . | . . | १३१७ | . . | २३ | १२७५ | १९ | १ |
| औरंगाबाद | . . | ३६३ | ३९१ | ३१ | ३ | ७१० | ७२ | १० |
| अमरावती | . . | . . | . . | ७५ | . . | ७५ | . . | . . |
| नागपूर | . . | . . | ११९२ | . . | . . | ११९२ | . . | . . |
| एकूण | . . | १६३९ | २०६२७ | ५९४ | १७५ | २२०७२ | ६१३ | ३ |

**वापरात नसलेल्या सोयींची संख्या फारशी नसली तरी या सोयीपासून उत्पन्नाचे नुकसान होते ते टाळण्यासाठी या सोयींचा योग्य वापर झाला पाहिजे.**

५.९३. **शासनाकडून मिळणारे आर्थिक सहाय्य.**—महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकांना दोन प्रकारे वित्तीय सहाय्य प्राप्त होते. (१) राज्य करातील हिस्सा व (२) शासकीय अनुदाने (योजनेतर) योजनांतर्गत अनुदाने विशिष्ट योजनांसाठी असल्याने, त्या अनुदानापासूनच्या उत्पन्नाचा महसूली उत्पन्नात (तक्ता क्रमांक ५.८) समावेश केला नाही.

५.९४. **राज्य करातील हिस्सा (करमणूक कर अनुदानाचे स्वरूपात).**—राज्यामध्ये करमणूक कराची वसुली राज्य शासनाकडून केली जाते. व त्यातील काही हिस्सा संबंधित महानगरपालिकांच्या हद्दीत वसूल झालेल्या करमणूक कराच्या १०% या दराने महानगरपालिकांना प्रदान केला जातो. या बाबतची माहिती तक्ता क्र. ५.८ मध्ये दिली आहे. १९९०-९१ च्या तुलनेत १९९४-९५ मधील सर्व महानगरपालिकांच्या या बाबींच्या उत्पन्नात वाढ झाली असली तरी मागील ३-४ वर्षात बऱ्याच महानगरपालिकांचे या बाबींच्या उत्पन्नात घटच झाली आहे. हे या बाबींच्या वार्षिक वाढीचा दर –१.६३% पाहता दिसून येते. सर्व महानगरपालिकांसाठी या बाबीपासूनचे उत्पन्न दोन्ही वर्षासाठी एकूण उत्पन्नाच्या ०.२% एवढेच होते.

५.९५. ***शासकीय अनुदाने (योजनेतर).***—महानगरपालिका न नगरपरिषदांना शासनाकडून जी अनुदाने प्राप्त होतात त्याची यादी परिच्छेद ५.४२ मध्ये दिली आहे. शासनाकडून महानगरपालिकांना मुख्यत्वे जमीन महसूल व बिगर शेतसारा अनुदान व रस्ता अनुदान (मुंबई वगळून) मिळते. व्यवसाय कर अनुदान मात्र केवळ ६ महानगरपालिकांना उदा. पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, कल्याण व नागपूर महानगरपालिकानांच मिळते. इतर महानगरपालिकांना ते अनुज्ञेय नाही. तक्ता क्र. ५.८ वरून बऱ्याच महानगरपालिकांना मिळणाऱ्या अनुदानाच्या एकूण उत्पन्नात गेल्या ५ वर्षात उत्तरोत्तर घट झाल्याचे दिसते. परंतु सर्वच महानगरपालिकांचा एकत्रित विचार केल्यास उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर ११.३८% आहे. १९९०-९१ व १९९४-९५ या वर्षात या बाबीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी सर्व महानगरपालिकांसाठी अनुक्रमे ५.७% व ४.७% होती. नवी मुंबई या महानगरपालिकेचे या बाबीपासूनचे १९९४-९५ चे उत्पन्न रु. ६८१ लाख हे तिच्या एकूण उत्पन्नाच्या ७९% एवढे होते. ही महानगरपालिका नव्यानेच स्थापन झाल्याने तिला प्राथमिक अवस्थेत अपवाद म्हणून जादा अनुदान मिळाल्याचे दिसते. त्या खालोखाल औरंगाबाद या महानगरपालिकेला या बाबीपासून उत्पन्न प्राप्त झाले.

५.९६. विविध अनुदानांपासून महानगरपालिकांना मिळालेल्या दरडोई उत्पन्नाची आकडेवारी खालील तक्ता क्र. ५.१९ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.१९

## महानगरपालिकांना मिळालेले दरडोई अनुदान

| महानगरपालिका | जमीन महसूल व बिगर शेती अनुदान (रुपये) | | रस्ता अनुदान (रुपये) | | इतर अनुदाने (रुपये) | | एकूण अनुदाने (रुपये) | | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९०-९१ | ९४-९५ | ९०-९१ | ९४-९५ | ९०-९१ | ९४-९५ | ९०-९१ | ९४-९५ | |
| १. मुंबई .. | २ | ५ | .. | .. | २३ | ६४ | २५ (२.८) | ६९ (४.१) | २७.६० |
| २. ठाणे .. | .. | २ | ७ | १२ | ३० | १६ | ३७ (४.१) | ३० (१.९) | –९.४३ |
| ३. नवी मुंबई .. | .. | .. | .. | ११ | .. | २०३ | .. | २१४ (७९.०) | .. |
| ४. कल्याण .. | १ | १ | ८ | १४ | २७ | २५ | ३६ (७.५) | ४० (४.२) | १.५९ |
| ५. नाशिक .. | .. | १ | ७ | १३ | ९९ | ६ | १०६ (१४.५) | २० (१.७) | –३४.०८ |
| ६. पुणे .. | ६ | .. | ९ | ९ | ५३ | ८७ | ६८ (११.६) | ९६ (९.०) | १०.०० |
| ७. पिंपरी-चिंचवड .. | .. | १ | २ | १२ | १४ | ३४ | १६ (१.३) | ४७ (२.१) | ३२.९० |
| ८. सोलापूर .. | .. | १ | ८ | १० | ४४ | २७ | ५२ (१४.१) | ३८ (६.०) | –९.७७ |
| ९. कोल्हापूर .. | १ | .. | १० | १२ | ६८ | १४ | ७९ (१४.३) | २६ (२.५) | –३०.५६ |
| १०. औरंगाबाद .. | .. | .. | ५ | ११ | १३४ | ५० | १३९ (३३.५) | ६१ (८.८) | –२१.६७ |
| ११. अमरावती .. | १ | .. | ९ | ११ | २६ | २५ | ३६ (१५.४) | ३६ (८.४) | ४.५४ |
| १२. नागपूर .. | १ | .. | १८ | १२ | ४७ | ४६ | ६६ (१६.७) | ५८ (९.५) | –४.६५ |
| एकूण .. | २ | ३ | ४ | ५ | ३६ | ५६ | ४२ (५.७) | ६४ (४.७) | ११.३८ |

(कंसातील आकडे एकूण महसुली उत्पन्नाशी टक्केवारी दाखवितात.)

सारांशाने असे म्हणता येईल की, अनुदानापासून मिळणारे उत्पन्न फार कमी असून ते एकूण उत्पन्नाच्या ५.७% (१९९०-९१) व ४.७% (१९९४-९५) होते. सर्व महानगरपालिकांच्या एकूण अनुदानाच्या रकमेत वाढ दिसत असली तरी अनुदानाच्या प्रमाणात दरवर्षी घट होत असल्याचेही दिसून आले.

५.९७. **महानगरपालिकेचा महसुली खर्च**—महानगरपालिकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबाबतचा ऊहापोह परिच्छेद ५.१२ मध्ये केला आहे. नागरी क्षेत्रातील नागरिकांच्या जन्मापासून तर त्यांच्या मृत्यूपर्यंत आवश्यक असलेल्या नागरी सेवा-सुविधा, सुरक्षितता, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा इत्यादी पुरविण्याची जबाबदारी या नागरी संस्थांवर संबंधित अधिनियमाद्वारे सोपविण्यात आलेली आहे. या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी नागरी संस्थांनी १९९०-९१ ते १९९४-९५ या ५ वर्षात केलेल्या महसुली खर्चाची माहिती आयोगाने गोळा केली असून त्याचा तपशील खालील तक्त्यात क्र. ५.२० मध्ये दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.२०

## महानगरपालिकांचा एकूण व दरडोई महसुली खर्च व खर्चाच्या वाढीचा दर

(एकूण खर्च रु. कोटीत)

| अनु- | महानगरपालिकेचे | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई .. | ७७१.९६<br>(७७८) | ८६१.६६<br>(८६८) | ९९९.१२<br>(११०७) | १२७१.२३<br>(१२८१) | १५२१.२७<br>(१५३३) | १९.०७ |
| २ | ठाणे .. | ५२.८५<br>(६५८) | ६५.१२<br>(८११) | ६९.७८<br>(८६९) | ७७.६५<br>(९६६) | ८९.७७<br>(१११७) | १३.९५ |
| ३ | नवी मुंबई .. | .. | ०.२४<br>(८) | १.९०<br>(६०) | ४.७६<br>(१५०) | ६.६१<br>(२०८) | .. |
| ४ | कल्याण .. | २७.५८<br>(३३६) | ३४.८१<br>(४२५) | ३६.५१<br>(४४६) | ४२.५८<br>(५१९) | ४३.३४<br>(५२९) | ११.६९ |
| ५ | नाशिक .. | २८.४६<br>(४३३) | ३२.६४<br>(४९७) | ३९.५४<br>(६०२) | ४०.४७<br>(६१५) | ५३.८२<br>(८१९) | १६.०३ |
| ६ | पुणे .. | ८०.६१<br>(५१५) | ९१.६४<br>(५८५) | १०८.५२<br>(६९३) | १२६.४१<br>(८०७) | १३८.९२<br>(८८७) | १५.१५ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | २७.८३<br>(५३८) | ३३.९४<br>(६५६) | ४०.३२<br>(७८०) | ५१.७६<br>(१००१) | ७०.७८<br>(१३६९) | २५.७२ |
| ८ | सोलापूर .. | २५.८०<br>(३६४) | २७.९६<br>(३९५) | ३२.३१<br>(४५६) | ३६.६०<br>(५१६) | ४२.४६<br>(५९९) | १३.५० |
| ९ | कोल्हापूर .. | २२.७६<br>(५६०) | २८.१६<br>(६९३) | ३३.७९<br>(८३२) | ३८.१५<br>(९३९) | ३९.५१<br>(९७२) | १५.१० |
| १० | औरंगाबाद .. | १४.१३<br>(२४६) | २०.७०<br>(३६१) | २५.१२<br>(४३८) | २५.८३<br>(४५१) | २९.६५<br>(५१७) | १८.५८ |
| ११ | अमरावती .. | ९.८४<br>(२२७) | ११.११<br>(२५६) | १२.०८<br>(२७८) | १४.६८<br>(३३८) | १६.४९<br>(३८०) | १४.०२ |
| १२ | नागपूर .. | ५२.७७<br>(३२५) | ६०.८०<br>(३७४) | ७०.९५<br>(४३७) | ७७.६९<br>(४७८) | ८४.४६<br>(५२०) | १२.५९ |
| | एकूण .. | १११४.५९<br>(६०७) | १२६८.८०<br>(६९१) | १४७०.०१<br>(८०१) | १८०७.७१<br>(९८५) | २१३७.१०<br>(११६४) | १८.०१ |

(कंसातील आकडे दरडोई खर्च रुपयांत दाखवितात.)

५.९८. सर्वच महानगरपालिकांच्या महसुली खर्चात मागील ५ वर्षांत वाढ झाली असून वार्षिक वाढीचा दर १८.०१% आहे. तर खर्चात सर्वाधिक वाढ २५.७२% पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकेचे बाबतीत झाली आहे. दरडोई खर्चाचा विचार केल्यास मुंबई महानगरपालिकेचा खर्च सर्वाधिक असून त्या खालोखाल पिंपरी-चिंचवड व ठाणे या महानगरपालिकांचा क्रम लागतो. दरडोई खर्च सर्वांत कमी असणाऱ्या महानगरपालिकांत अमरावतीचा क्रमांक शेवटचा लागतो.

५.९९. महानगरपालिकांचा १९९०-९१ व १९९४-९५ या दोन वर्षांतील एकूण खर्चाची माहिती दरडोई खर्च तसेच त्या खर्चाची महानगरपालिकांच्या एकूण खर्चाशी टक्केवारी तक्ता क्र. ५.२१ मध्ये दाखविली आहे. (आकृती ५ पहावी)

तक्ता क्रमांक ५.२१

## महानगरपालिकांच्या महसुली खर्चाचा तपशील


(खर्च कोटी रुपयांत
(दरडोई खर्च रुपयात)

| महानगरपालिका | वर्ष | खर्च दरडोई टक्केवारी | सामान्य प्रशासन | शिक्षण ग्रंथालय | पाणी-पुरवठा | सार्व. आरोग्य व वैद्यकीय सेवा | स्वच्छता रस्ते-सफाई गटारे | रस्ते इमारती व दिवा-बत्ती | इतर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. मुंबई | १९९०-९१ | खर्च | ३०.३३ | ११२.२१ | ८९.९६ | १२१.०८ | १३४.२७ | ९०.८४ | १९३.२८ | ७७१.९६ |
| | | दरडोई | ३१ | ११३ | ९१ | १२२ | १३५ | ९२ | १९५ | ७७८ |
| | | टक्केवारी | ३.९३ | १४.५४ | ११.६५ | १५.६८ | १७.३९ | ११.७७ | २५.०४ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ५९.०५ | २१८.७८ | १६०.३० | २४७.६४ | २७५.०९ | १९२.१३ | ३६८.२८ | १५२१.२७ |
| | | दरडोई | ५९ | २२० | १६२ | २४९ | २७७ | १९४ | ३७१ | १५३ |
| | | टक्केवारी | ३.८८ | १४.३८ | १०.५४ | १६.२८ | १८.०८ | १२.६३ | २४.२१ | १००.०० |
| २. ठाणे | १९९०-९१ | खर्च | ४.३५ | ११.८४ | ११.३५ | ३.४१ | ४.९७ | ५.७५ | ११.१९ | ५२.८५ |
| | | दरडोई | ५४ | १४७ | १४१ | ४२ | ६२ | ७२ | १३९ | ६५८ |
| | | टक्केवारी | ८.२४ | २२.४० | २१.४८ | ६.४५ | ९.३९ | १०.८८ | २१.१७ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ५.७७ | १५.७२ | २६.९८ | ८.१३ | ९.८० | १०.७० | १२.६७ | ८९.७७ |
| | | दरडोई | ७२ | १९६ | ३३६ | १०१ | १२२ | १३३ | १५८ | १११७ |
| | | टक्केवारी | ६.४३ | १७.५२ | ३०.०५ | ९.०६ | १०.९२ | ११.९२ | १४.११ | १००.०० |
| ३. नवी मुंबई | १९९०-९१ | खर्च | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | दरडोई | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | टक्केवारी | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | १९९४-९५ | खर्च | ३.०३ | .. | २.१८ | ०.६० | ०.४३ | ०.३५ | ०.०३ | ६.६१ |
| | | दरडोई | ९५ | .. | ६८ | १९ | १४ | ११ | १ | २०८ |
| | | टक्केवारी | ४५.७६ | .. | ३२.९५ | ९.०८ | ६.५४ | ५.२२ | ०.४६ | १००.०० |
| ४. कल्याण | १९९०-९१ | खर्च | ४.३० | २.१८ | ८.४४ | १.७६ | ३.५९ | ३.८६ | ३.४६ | २७.५८ |
| | | दरडोई | ५२ | २७ | १०३ | २१ | ४४ | ४७ | ४२ | ३३६ |
| | | टक्केवारी | १५.५८ | ७.८९ | ३०.५९ | ६.३८ | १३.०२ | १४.०० | १२.५५ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ६.४८ | १.८६ | १४.१८ | २.०७ | ५.५१ | ४.४५ | ८.८० | ४३.३४ |
| | | दरडोई | ७९ | २३ | १७३ | २५ | ६७ | ५४ | १०७ | ५२९ |
| | | टक्केवारी | १४.९४ | ४.२९ | ३२.७२ | ४.७७ | १२.७२ | १०.२६ | २०.३१ | १००.०० |
| ५. नाशिक | १९९०-९१ | खर्च | ४.२३ | २.५२ | ३.८८ | २.०७ | २.६६ | ३.६८ | ९.४१ | २८.४६ |
| | | दरडोई | ६४ | ३८ | ५९ | ३२ | ४० | ५६ | १४३ | ४३३ |
| | | टक्केवारी | १४.२८ | ८.८६ | १३.६३ | ७.२८ | ९.३३ | १२.९५ | ३३.०७ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ९.३७ | ५.७७ | ११.१० | ३.६० | ४.८० | ११.०३ | ८.१४ | ५३.८२ |
| | | दरडोई | १४३ | ८८ | १६९ | ५५ | ७३ | १६८ | १२४ | ८१९ |
| | | टक्केवारी | १७.४२ | १०.७३ | २०.६३ | ६.६९ | ८.९२ | २०.४९ | १५.१२ | १००.०० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. पुणे | १९९०-९१ | खर्च | ६.४९ | १५.६६ | १०.५४ | ५.९८ | १३.४३ | ९.४८ | १९.०३ | ८०.६१ |
| | | दरडोई | ४१ | १०० | ६७ | ३८ | ८६ | ६१ | १२१ | ५१५ |
| | | टक्केवारी | ८.०५ | १९.४३ | १३.०८ | ७.४२ | १६.६६ | ११.७६ | २३.६० | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | १२.२१ | २२.२३ | २६.५५ | १०.३० | २१.५३ | १६.५४ | २९.५६ | १३८.९२ |
| | | दरडोई | ७८ | १४२ | १६९ | ६६ | १३७ | १०६ | १८९ | ८८७ |
| | | टक्केवारी | ८.७९ | १६.०० | १९.११ | ७.४१ | १५.५० | ११.९१ | २१.२७ | १००.०० |
| ७. पिंपरी-चिंचवड | १९९०-९१ | खर्च | ४.४६ | ६.०७ | ३.७७ | ४.२७ | ३.८५ | ३.४३ | १.९८ | २७.८३ |
| | | दरडोई | ८६ | ११७ | ७३ | ८३ | ७४ | ६६ | ३८ | ५३८ |
| | | टक्केवारी | १६.०३ | २१.८१ | १३.५४ | १५.३५ | १३.८३ | १२.३२ | ७.११ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ७.९३ | ७.४३ | ८.८० | ६.२५ | ५.६८ | ५.०८ | २९.६१ | ७०.७८ |
| | | दरडोई | १५३ | १४४ | १७० | १२१ | ११० | ९८ | ५७३ | १३६९ |
| | | टक्केवारी | ११.२० | १०.५० | १२.४४ | ८.८३ | ८.०२ | ७.१८ | ४१.८३ | १००.०० |
| ८. सोलापूर | १९९०-९१ | खर्च | २.१६ | ५.७५ | ४.६१ | १.४४ | २.९८ | १.९० | ६.९६ | २५.८० |
| | | दरडोई | ३० | ८१ | ६५ | २० | ४२ | २७ | ९८ | ३६४ |
| | | टक्केवारी | ८.३६ | २२.२८ | १७.८८ | ५.५७ | ११.५६ | ७.३७ | २६.९९ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ३.४६ | ४.७१ | ९.४९ | २.३० | ४.५४ | ३.६३ | १४.३३ | ४२.४६ |
| | | दरडोई | ४९ | ६७ | १३४ | ३२ | ६४ | ५१ | २०२ | ५९९ |
| | | टक्केवारी | ८.१५ | ११.१० | २२.३४ | ५.४२ | १०.६९ | ८.५४ | ३३.७५ | १००.०० |
| ९. कोल्हापूर | १९९०-९१ | खर्च | १.६० | ४.९० | ०.४७ | १.७१ | ३.३४ | २.५५ | ८.१९ | २२.७६ |
| | | दरडोई | ३९ | १२० | १२ | ४२ | ८२ | ६३ | २०२ | ५६० |
| | | टक्केवारी | ७.०२ | २१.५१ | २.०६ | ७.५३ | १४.६९ | ११.१९ | ३६.०० | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | ३.१८ | ४.२४ | ५.६८ | ३.४० | ५.२१ | ४.३० | १३.४९ | ३९.५१ |
| | | दरडोई | ७८ | १०४ | १४० | ७४ | १२८ | १०६ | ३३२ | ९७२ |
| | | टक्केवारी | ८.०५ | १०.७४ | १४.३७ | ८.६१ | १३.१८ | १०.८९ | ३४.१५ | १००.०० |
| १०. औरंगाबाद | १९९०-९१ | खर्च | १.५९ | १.९१ | २.६८ | ०.४७ | ३.७५ | २.४२ | १.३१ | १४.१३ |
| | | दरडोई | २८ | ३३ | ४७ | ८ | ६५ | ४२ | २३ | २४६ |
| | | टक्केवारी | ११.२९ | १३.५३ | १८.९६ | ३.३० | २६.५३ | १७.१४ | ९.२४ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | २.४८ | ४.३० | ७.०७ | १.३१ | ७.२० | ४.७० | २.६० | २९.६५ |
| | | दरडोई | ४३ | ७५ | १२३ | २३ | १२६ | ८२ | ४५ | ५१७ |
| | | टक्केवारी | ८.३५ | १४.५१ | २३.८४ | ४.४१ | २४.२८ | १५.८६ | ८.७६ | १००.०० |
| ११. अमरावती | १९९०-९१ | खर्च | १.२१ | २.१६ | ०.४६ | ०.७४ | १.५८ | १.२२ | २.४७ | ९.८४ |
| | | दरडोई | २८ | ५० | ११ | १७ | ३६ | २८ | ५७ | २२७ |
| | | टक्केवारी | १२.२९ | २१.९८ | ४.६७ | ७.४८ | १६.०८ | १२.४० | २५.१० | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | २.१८ | ३.४४ | ०.८२ | १.३० | ३.०१ | २.१४ | ३.६१ | १६.४९ |
| | | दरडोई | ५० | ७९ | १९ | ३० | ६९ | ४९ | ८३ | ३८० |
| | | टक्केवारी | १३.२३ | २०.८७ | ४.९८ | ७.८८ | १८.२३ | १२.९४ | २१.८७ | १००.०० |
| १२. नागपूर | १९९०-९१ | खर्च | १७.०७ | ७.०६ | ९.१९ | २.३७ | ६.६५ | ६.७२ | ३.७० | ५२.७७ |
| | | दरडोई | १०५ | ४३ | ५७ | १५ | ४१ | ४१ | २३ | ३२५ |
| | | टक्केवारी | ३२.३५ | १३.३८ | १७.४२ | ४.४९ | १२.६१ | १२.७३ | ७.०२ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | २२.३६ | १२.८९ | १८.७७ | ३.८५ | १२.२१ | ८.८२ | ५.५६ | ८४.४६ |
| | | दरडोई | १३८ | ७९ | ११६ | २४ | ७५ | ५४ | ३४ | ५२० |
| | | टक्केवारी | २६.४८ | १५.२६ | २२.२३ | ४.५६ | १४.४६ | १०.४४ | ६.५८ | १००.०० |
| एकूण सर्व | १९९०-९१ | खर्च | ७७.७९ | १७२.२४ | १४५.३५ | १४५.३० | १८१.०७ | १३१.८६ | २६०.९८ | १११४.५९ |
| | | दरंडोई | ४२ | ९४ | ७९ | ७९ | ९९ | ७२ | १४२ | ६०७ |
| | | टक्केवारी | ६.९८ | १५.४५ | १३.०४ | १३.०४ | १६.२५ | ११.८३ | २३.४१ | १००.०० |
| | १९९४-९५ | खर्च | १३४.५० | ३०१.३९ | २९१.९३ | २९०.७५ | ३५५.०१ | २६३.८५ | ४९६.६७ | २१३७.१० |
| | | दरडोई | ७५ | १६४ | १५९ | १५८ | १९३ | १४४ | २७१ | ११६४ |
| | | टक्केवारी | ६.४३ | १४.१० | १३.६६ | १३.६० | १६.६१ | १२.३५ | २३.२४ | १००.०० |

आकृती क्रमांक ५

# महानगरपालिकांचा बाबवार महसूली खर्च



५.१००. महानगरपालिकांचे स्थान, लोकसंख्या, घनता, औद्योगिकीकरण, व्यापार व दळणवळण इत्यादी बाबी विचारात घेता प्रत्येक महानगरपालिकेचे एक वेगळे असे स्थान आहे. तसेच त्यांचे प्रश्नही वरील बाबींचा विचार करता वेगवेगळे आहेत. त्यामुळे महानगरपालिकांच्या खर्चाची तुलना एकमेकांशी करणे योग्य ठरत नाही.

५.१०१. वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, १९९०-९१ च्या तुलनेत १९९४-९५ मध्ये प्रत्येक महानगरपालिकेच्या खर्चात जवळजवळ दुपटीएवढी वाढ झाली आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. त्याचबरोबर जागतिक व्यापाराचे भारतातील एक प्रमुख केंद्र तसेच पश्चिम किनाऱ्यावरील महत्त्वाचे बंदर असल्यामुळे या शहरात राज्यातूनच नव्हे तर परप्रांतांतूनही लोकांचा लोंढा सतत येत आहे. त्यामुळे मुंबईच्या लोकसंख्येत विलक्षण अशी वाढ होत आहे. उलट घरांची संख्या कमी असल्यामुळे शहराच्या मोकळ्या जागांवर झोपडपट्ट्यांची संख्या सतत वाढत आहे. या शहरात अंतर्गत वाहतुकीसाठी रेल्वे व रस्त्यांचे जाळे उपलब्ध असल्याने रस्त्यावरील वाहनांच्या संख्येतही झपाट्याने वाढ झालेली आहे. या सर्व बाबींचा परिणाम मुंबईतील सद्यः सेवा सुविधांवर होत असून, या सुविधा दिवसेंदिवस अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे या महानगरपालिकेच्या विविध बाबींवरील दरडोई खर्चाचे प्रमाण पाणीपुरवठ्याचा खर्च वगळता इतर महानगरपालिकांच्या तुलनेत सर्वाधिक असे आहे. सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवेवर ही महानगरपालिका दरडोई रु. २४९ खर्च करते. मुंबई महानगरपालिकेची सर्व सोयींनी युक्त अशी अत्याधुनिक रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये असून, तेथे निष्णात वैद्यकीय तज्ज्ञ उपलब्ध असल्याने त्यांचा लाभ मुंबईतीलच नव्हे तर राज्यातील व देशातील नागरिक घेतात. त्यामुळे वैद्यीकय सेवेवरचा या महाननगरपालिकेचा दरडोई खर्च रु. २४९ हा राज्यामध्ये सर्वाधिक असा आहे.

५.१०२. ठाणे व कल्याण या महानगरपालिका मुंबईला नजीक असल्याने त्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. औद्योगिकीकरणातही वाढ होत असल्याने त्यांचा उपलब्ध सेवा सुविधांवर विशेषतः पाणीपुरवठा, जल व मलनिःस्सारण, स्वच्छता इत्यादींवर फार मोठा ताण पडत असून, हे प्रश्न त्यांच्या क्षेत्रात गंभीर रूप धारण करीत आहेत.

५.१०३. नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रात व परिसरात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. हे. शहर तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच ते कृषि व बागायती उत्पादनांच्या बाबतीत उलाढालीचे एक प्रमुख केंद्र आहे. या महानगरपालिकेचा १९९४-९५ चा सर्व बाबींवरील दरडोई खर्च रु. ८१९ होता.

५.१०४. पुणे ही महानगरपालिका मुंबईनंतर स्थापन झालेली सर्वांत जुनी अशी स्थानिक स्वराज्य संस्था आहे व ती राज्याची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी म्हणूनच नव्हे तर एक ऐतिहासिक शहर म्हणूनही प्रसिद्ध आहे. उद्योगांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळे या शहराच्या परिसरात फार मोठया प्रमाणात औद्योगिकीकरण झाले आहे. त्यामुळे लोकसंख्येत व त्याचबरोबर झोपडपट्ट्यांच्या संख्येतही बरीच वाढ झाली आहे.

५.१०५. पिंपरी-चिंचवड ही महानगरपालिका नव्याने स्थापन झाली असली तरी पुणे या औद्योगिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक केंद्राशी निकट आहे. दळणवळणाच्या साधनांनी हे शहर प्रमुख शहरांशी जोडलेले आहे. त्यामुळे या शहरात व शहराच्या परिसरात उद्योगधंद्यांची, कारखान्यांची वाढ वेगाने झालेली आहे. वाढती लोकसंख्या व त्याचबरोबर वाढती झोपडपट्टी यामुळे या महानगरपालिकेच्या दरडोई खर्चात १९९०-९१ च्या तुलनेत १९९४-९५ मध्ये जवळजवळ २५८% नी वाढ झाली आहे.

५.१०६. सोलापूर महानगरपालिकेच्या दरडोई खर्चातही १९९०-९१ च्या तुलनेत १९९४४-९५ मध्ये ६४.५% वाढ होऊन दरडोई खर्च रु. ५९९ एवढा झाला आहे. सोलापूर ही एक जुनी महानगरपालिका असली तरी तिच्या क्षेत्रामध्ये नव्याने काही ग्रामीण भागाचा समावेश करून तिची हद्दवाढ केली आहे. हे शहर हातमाग उद्योगाचे प्रमुख केंद्र असून, परिसरात बरेच साखर कारखाने स्थापन झालेले आहेत.

५.१०७. कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिसरात उद्योगधंद्यांची वाढ तसेच सिंचनाच्या चांगल्या सोयी उपलब्ध असल्याने कृषि उत्पादनात विशेषतः उसाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात घेतले जात असल्याने या भागात साखर कारखान्यांची संख्या फार मोठी आहे. परिणामतः कोल्हापूर हे कृषि तसेच औद्योगिक उलाढालीचे मोठे केंद्र आहे. या महानगरपालिकेचा दरडोई खर्चात ७३% ची वाढ झाली आहे.

५.१०८. औरंगाबाद महानगरपालिका ही मराठवाड्यातील एकमेव महानगरपालिका आहे. या शहराला ऐतिहासिक महत्त्व असून, लगतच्या परिसरात अजिंठा, वेरूळ व दौलताबादसारखी प्रसिद्ध स्थळे असल्याने हे शहर एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ झाले आहे. गेल्या दहा वर्षांत या शहराच्या परिसरात उद्योग व कारखान्यांची वाढ झपाट्याने झाली आहे. परंतु हे क्षेत्र मात्र औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असल्याने त्यापासून महानगरपालिकेला विशेष असा आर्थिक लाभ होत नाही. परंतु या क्षेत्रामुळे शहराच्या लोकसंख्येत वाढ झाली असून, उपलब्ध सेवा-सुविधांवर त्याचा ताण पडत असून, अधिकाधिक सोयी पुरविण्याची जबाबदारी या महानगरपालिकेवर येऊन पडली आहे. या शहराच्या कार्यक्षेत्रात सिडको ही संस्था कार्यरत असून, त्या संस्थेने शहराच्या बऱ्याच मोठ्या भागाचा विकास घडवून आणला. तसेच शहरातील अनेक भागात खाजगी व शासकीय जमिनींवर अतिक्रमणे झाली असून ती अद्याप नियमित झाली नाहीत. या सर्व भागात मानवतेच्या दृष्टिकोनातून सेवा-सुविधा पुरवाव्या लागतात. परंतु त्यापोटी कोणतेही उत्पन्न मिळत नाही. या महानगरपालिकेचा १९९४-९५ च्या दरडोई खर्च १९९०-९१ च्या तुलनेत दुप्पटीपेक्षाही जास्त वाढला आहे.

५.१०९. अमरावती महानगरपालिका ही विदर्भातील नागपूरनंतरची दुसरी महानगरपालिका आहे. याच महानगरपालिकेबरोबर स्थापन झालेल्या ठाणे, कल्याण, नाशिक, पिंपरी-चिंचवड व औरंगाबाद या महनगरपालिकांच्या तुलनेत ही महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत असल्याचे दिसते. या महानगरपालिकेचा दरडोई खर्च १९९४-९५ साठी रु. ३८० होता व तो राज्यातील अ वर्ग नगरपालिकांचा दरडोई खर्चापेक्षा कमी दिसून आला.

५.११०. नागपूर महानगरपालिका ही विदर्भातील सर्वांत जुनी महानगरपालिका असून, नागपूर शहराला राज्याच्या उपराजधानीचा दर्जा प्राप्त आहे. शिवाय नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी वसले आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येतही ती मुंबईनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. या शहरात नागपूर सुधार प्रन्यास ही संस्थादेखील कार्यरत असून, ती संस्था तिच्या कार्यक्षेत्रात विकासाची कामे करीत असते. परंतु त्या भागात सेवा-सुविधा पुरविण्याची व त्या चालू ठेवण्याची जबाबदारी मात्र महानगरपालिकेवर येऊन पडते. या महानगरपालिकेचा दरडोई खर्च १९९०-९१ मध्ये रु. ३२५ होता. तो १९९४-९५ मध्ये रु. ५२० झाला आहे. इतर महानगरपालिकांच्या तुलनेत औरंगाबाद व अमरावतीचा अपवाद वगळता या महानगरपालिकेचा दरडोई खर्च राज्यात कमी आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या महानगरपालिकेचे १९९४-९५ ते दरडोई उत्पन्नही केवळ रु. ६११ आहे.

५.१११. **महानगरपालिकांच्या एकूण महसुली उत्पन्नाशी महसुली खर्चाचे प्रमाण.**—महानगरपालिकांच्या एकूण महसुली उत्पन्नाशी त्यांच्या एकूण महसुली खर्चाचे प्रमाण उत्पन्न तसेच खर्चातील वार्षिक वाढीचा दर याचाही आढावा घेणे येथे उचित ठरेल. याबाबतची माहिती खालील तक्त क्र. ५.२२ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.२२

## महानगरपालिकांचे दरडोई महसुली उत्पन्न व खर्चाचे प्रमाण

(उत्पन्न व खर्च रुपयांत)

| अनुक्रमांक (१) | महानगरपालिका (२) | बाब (३) | १९९०–९१ (४) | १९९४–९५ (५) | वार्षिक वाढीचा दर (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | उत्पन्न | ८९२ | १,६९२ | १७.८२ |
| | | खर्च | ७७८ | १,५३३ | १९.०७ |
| | | टक्केवारी | ८७.२ | ९०.६ | . . . |
| २ | ठाणे | उत्पन्न | ९०२ | १,५१३ | ११.८८ |
| | | खर्च | ६५८ | १,११७ | १३.१५ |
| | | टक्केवारी | ७२.९ | ८३.८ | . . . |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३ नवी मुंबई | .. | .. उत्पन्न .. | ... | २७० | ... |
| | | खर्च .. | ... | २०८ | ... |
| | | टक्केवारी .. | ... | ७७.० | ... |
| ४ कल्याण | .. | .. उत्पन्न .. | ४७७ | ९४१ | १५.७७ |
| | | खर्च .. | ३३६ | ५२९ | ११.६९ |
| | | टक्केवारी .. | ७०.४ | ५६.२ | ... |
| ५ नाशिक | .. | .. उत्पन्न .. | ७२९ | १,१७८ | १२.९१ |
| | | खर्च .. | ४३३ | ८१९ | १६.०३ |
| | | टक्केवारी .. | ५९.४ | ६९.५ | ... |
| ६ पुणे | .. | .. उत्पन्न .. | ५८३ | १,०६१ | १५.८६ |
| | | खर्च .. | ५१५ | ८८७ | १५.१५ |
| | | टक्केवारी .. | ८८.३ | ८३.६ | ... |
| ७ पिंपरी-चिंचवड | .. | .. उत्पन्न .. | १,२२४ | २,२३९ | १५.३३ |
| | | खर्च .. | ५३८ | १,३६९ | २५.७२ |
| | | टक्केवारी .. | ४४.० | ६१.१ | ... |
| ८ सोलापूर | .. | .. उत्पन्न .. | ३६८ | ६१९ | १४.६६ |
| | | खर्च .. | ३६४ | ५९९ | १३.५० |
| | | टक्केवारी .. | ९८.९ | ९६.८ | ... |
| ९ कोल्हापूर | .. | .. उत्पन्न .. | ५५२ | १,०३६ | १७.८४ |
| | | खर्च .. | ५६० | ९७२ | १५.१० |
| | | टक्केवारी .. | १०१.४ | ९३.८ | ... |
| १० औरंगाबाद | .. | .. उत्पन्न .. | ४१७ | ६८९ | ११.९४ |
| | | खर्च .. | २४६ | ५१७ | १८.५८ |
| | | टक्केवारी .. | ५९.० | ७५.० | ... |
| ११ अमरावती | .. | .. उत्पन्न .. | २३५ | ४२९ | १७.५५ |
| | | खर्च .. | २२७ | ३८० | १४.०२ |
| | | टक्केवारी .. | ९६.६ | ८८.६ | ... |
| १२ नागपूर | .. | .. उत्पन्न .. | ३९७ | ६११ | ११.७२ |
| | | खर्च .. | ३२५ | ५२० | १२.५९ |
| | | टक्केवारी .. | ८१.९ | ८५.१ | ... |
| | एकूण .. | उत्पन्न .. | ७३३ | १,३५६ | १६.७३ |
| | | खर्च .. | ६०७ | १,१६४ | १८.०१ |
| | | टक्केवारी .. | ८२.८ | ८५.८ | ... |

५.११२. मागील ५ वर्षात सर्वच महानगरपालिकांच्या उत्पन्न वाढीचा दर १६.७३ टक्के तर खर्चातील वार्षिक वाढीचा दर त्यापेक्षा जास्त म्हणजे १८.०१ टक्के होता. त्याचबरोबर वार्षिक वाढीचा दर विचारात घेतल्यास मुंबई, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद व नागपूर या महानगरपालिकांचा खर्चातील वार्षिक वाढीचा दर उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे. असे असले तरी महसूली खर्च महसुली उत्पन्नाच्या मर्यादेतच आढळून आला आहे. महसुली उत्पन्नापैकी बरीच मोठी रक्कम महसुली बाबींवर खर्च करणाऱ्या महानगरपालिकांमध्ये मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती व नागपूर या महानगर पालिकांचा क्रम लागतो. विशेषतः सोलापूर, कोल्हापूर व अमरावती या महानगरपालिकांचा महसुली खर्च महसुली उत्पनाएवढाच असल्याने या महानगरपालिकांना भांडवली खर्चासाठी फारच अल्प निधी उपलब्ध झाला. पर्यायाने भांडवली खर्चासाठी या महानगरपालिकांना शासन, आयुर्विमा महामंडळ, हुडको इत्यादी संस्थांकडून कर्ज घेऊन निधी उभा करावा लागला. याउलट पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांचे महसुली खर्चाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण ४४ टक्के (१९९०-९१) व ६१.१ टक्के (१९९४-९५) या दरम्यान दिसून आले. असे असले तरी या महानगरपालिकेचा दरडोई खर्च मात्र १९९४-९५ मध्ये राज्यात सर्वाधिक होता. नाशिक, औरंगाबाद, ठाणे या महानगरपालिकांचे खर्चाचे प्रमाणही इतरांच्या तुलनेत कमी असले तरी त्यात मागील ५ वर्षात वाढ झालेली आहे. परंतु महसुली खर्च एकूण महसुली उत्पन्नाच्या प्रमाणात कमी असल्याने या महानगरपालिका उर्वरित निधीचा वापर त्यांच्या कार्यक्षेत्रातील भांडवली खर्चासाठी करू शकल्या. नवी मुंबई या महानगरपालिकेचा येथे विचार केलेला नाही. महानगरपालिकांच्या संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार या संस्थांनी त्याची वार्षिक अंदाजपत्रके तुटीची करू नयेत असे बंधन असल्याने या संस्थाचा महसुली खर्च महसुली उत्पन्नापेक्षा कमीच असल्याचे दिसून येते. त्यामुळे महसुली उत्पन्न व महसुली खर्चात कोणतीही तुट संभवत नाही.

५.११३. **महानगरपालिकांचा पाणीपुरवठ्यावरील खर्च व त्यापासूनचे उत्पन्न.**——मागील तक्ता क्र. ५.२० मध्ये पाणीपुरवठ्यासाठी महानगर पालिकांनी प्रत्येक वर्षात केलेला प्रत्यक्ष खर्च दिला आहे. परंतु या खर्चात काही बाबींवरील खर्चाचा (थकबाकी इत्यादीचा) समावेश नाही. तेव्हा पाणीपुरठ्यासाठी एका वर्षासाठी किती खर्च येतो व त्यापासून महानगरपालिकांना किती उत्पन्न मिळते याची आयोगाने १९९४-९५ या वर्षाची माहिती गोळा केली असून ती तक्ता क्र. ५.२३ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. ५.२३

## पाणीपुरठ्यावरील खर्च व उत्पन्न

(उत्पन्न व खर्च रुपयांत)

| महानगरपालिका | पाणीपुरवठ्यावरील खर्च | | | | | | | पाणी बिलापोटी वर्षाची मागणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाणी खरेदी खर्च | वीज खर्च | पाणी निर्जंतुकीकरण खर्च | देखरेख व देखभाल | कर्मचारी खर्च | इतर | एकूण खर्च | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १. मुंबई | ३५१ | ४,८०६ | ४२५ | ४६७ | ५,३४१ | ६,१०१ | १७,४९१ | ४३००१ |
| २. ठाणे | २,१३२ | २४ | . . . | ३४ | १६१ | ७६ | २,४२६ | १,०४८ |
| ३. कल्याण | १८१ | . . . | . . . | १ | २०७ | . . . | १,१९० | ८२३ |
| ४. नवी मुंबई | २४० | . . . | . . . | २० | . . . | . . . | २६० | ३९ |
| ५. नाशिक | १९६ | ५०२ | ५६ | ५३ | ११९ | ७०५ | १,६३१ | ५९१ |
| ६. पुणे | ४४१ | १,१८८ | ११९ | १३१ | ६०६ | १७० | २,६५५ | ३,५५१ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. पिंपरी-चिंचवड | ३१५ | ३३१ | ९ | २०७ | २०८ | २ | १,०७२ | ४५८ |
| ८. सोलापूर | १०५ | ५०५ | ४८ | ४१ | १०५ | १४५ | ९४९ | ५८८ |
| ९. कोल्हापूर | १२१ | ३२० | १८ | २८ | १५१ | ५० | ६८८ | ४५० |
| १०. औरंगाबाद | २,१५७ | ७६ | ६ | १५ | ५९ | ३५ | २,३४८ | २५१ |
| ११. अमरावती | ३२ | ४ | . . . | ८ | ३ | . . . | ४७ | ५ |
| १२. नागपूर | १८३ | १,२४७ | ६१ | २८५ | २४० | ९७५ | २,९९१ | १,१२० |
| एकूण . . | ७,२५४ | ९,००३ | ७४२ | १,२९० | ७,२०१ | ८,२५९ | ३३,७४८ | ५१,९२५ |
| मुंबई म.न.पा. वगळून | ६,९०३ | ४,१९७ | ३१७ | ८२३ | १,८६० | २१५८ | १६,२५७ | ८,९२४ |

५.११४. एकूण खर्चात वर्षात प्रत्यक्ष केलेला खर्च व थकित बीले याचा समावेश आहे. वरील तपशीलावरून महानगरपालिकांमध्ये मुंबई व पुणे या दोन महानगरपालिका वगळता सर्वच महानगरपालिकांचा पाणीपुरवठ्यावरील खर्च जास्त असून, त्यापासून वर्षाला मिळणारे उत्पन्न कमी आहे. या संस्थांना पाणी पुरवठ्यावर फार मोठे नुकसान सोसावे लागते. परिणामतः इतर बाबींवर होणाऱ्या खर्चात तेवढ्या रकमेने कपात करावी लागते.

५.११५. मुंबई महानगरपालिकेची स्वतःची पाणीपुरवठा योजना असून त्यापासून या महानगरपालिकेला चांगले उत्पन्न झाल्याचे दिसते. याचे कारण असे की, मुंबई महानगरपालिकेचे औद्योगिक व व्यापारी कामासाठी जे पाणी दिले जाते. त्यापासून मिळणारे उत्पन्न हे घरगुती वापरासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. घरगुती पाणी वाटपात मुंबई महानगरपालकेला नुकसान सोसावे लागते असे सांगण्यात आले आहे. अमरावती शहरातील पाणीपुरवठा महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळाकडून होतो. शहरातील बोअरवेल इत्यादीवरील खर्च व त्यापासून मिळणारे उत्पन्न वरील तक्त्यात दिले आहे व त्यातही फार मोठे नुकसान या महानगरपालिकेला होते. ठाणे, नाशिक व औरंगाबाद व नागपूर या महानगरपालिकांचे उत्पन्न तर पाण्यावर होणाऱ्या खर्चाच्या निम्यापेक्षाही कमी आहे. शहरातील पाण्याचे स्त्रोत दिवसेंदिवस कमी होत आहेत व लांब अंतरावरून पाणी आणून नागरिकांना उपलब्ध करून द्यावे लागणार असल्याने पाणी पुरवठ्यावरील खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. **तेव्हा हा खर्च भरून निघण्यासाठी व या योजना ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविण्याचे दृष्टीने पाण्याच्या दरांत वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे.**

५.११६. **भांडवली उत्पन्न.**—वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे एकूण महसुली खर्च वजा जाता फारच अल्प अशी रक्कम या महानगर पालिकांच्याकडे भांडवली खर्चासाठी शिल्लक राहते. ही रक्कम नागरी क्षेत्रात विविध कार्यासाठी कराव्या लागणाऱ्या भांडवली खर्चाच्या तुलनेत फारच अल्प आहे. पाणी पुरवठ्याच्या सोयी, व्यापारी संकुले, शाळांच्या व दवाखान्यांच्या इमारती, गटार बांधणी, नवीन रस्ते, मल निःस्सारण योजना, अग्निशमन सोयी, झोपडपट्ट्यांमध्ये मूलभूत सेवा सुविधा इत्यादी बाबींसाठी करावा लागणारा भांडवली खर्च हा फार मोठा असल्याने तो खर्च महसुली उत्पन्नातून भागविणे शक्य नसल्याने या संस्थांना शासनाकडून तसेच वित्तीय संस्थांकडून कर्जे, अनुदाने, आर्थिक मदत याद्वारे रकमा उभ्या करून हा भांडवली खर्च भागवावा लागतो. राज्य शासनाकडून महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात ज्या योजना राबविल्या जातात व त्यासाठी शासनाकडून जी अनुदाने प्राप्त होतात ते भांडवली उत्पन्न म्हणून संबोधता येत नसले तरी त्या उत्पन्नाचा भांडवली उत्पन्न म्हणून या विश्लेषणात समावेश केला आहे. तक्ता क्र. ५.२४ मध्ये दरडोई भांडवली उत्पन्नाचा तपशील दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.२४

## महानगरपालिकांचे भांडवली दरडोई उत्पन्न

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | वर्ष | शासकीय कर्ज रु. | शासकीय अनुदान रु. | वित्तीय संस्थांचे कर्ज रु. | एकूण रु. | योजनांतर्गत अनुदाने रु. | एकूण भांडवली उत्पन्न रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई .. | १९९०–९१ | ५२ | .. | .. | ५२ | .. | ५२ |
| | | १९९४–९५ | ८० | ७ | .. | ८७ | .. | ८७ |
| २ | ठाणे .. | १९९०–९१ | .. | .. | २८ | २८ | २ | ३० |
| | | १९९४–९५ | .. | .. | ६३ | ६३ | ७ | ७० |
| ३ | नवी-मुंबई .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | १९९४–९५ | .. | .. | ७९ | ७९ | २२१ | ३०० |
| ४ | कल्याण .. | १९९०–९१ | .. | .. | ९ | ९ | ४ | १३ |
| | | १९९४–९५ | .. | .. | ११० | ११० | ७ | ११७ |
| ५ | नाशिक .. | १९९०–९१ | .. | .. | १५ | १५ | ७ | २२ |
| | | १९९४–९५ | .. | .. | .. | .. | २३ | २३ |
| ६ | पुणे .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | ११ | ११ |
| | | १९९४–९५ | २१ | .. | .. | २१ | १८ | ३९ |
| ७ | पिंपरी-चिंचवड .. | १९९०–९१ | .. | .. | ६० | ६० | १ | ६१ |
| | | १९९४–९५ | .. | .. | .. | .. | ५ | ५ |
| ८ | सोलापूर .. | १९९०–९१ | १ | .. | ३४ | ३५ | ८ | ४३ |
| | | १९९४–९५ | ११ | .. | १६ | २८ | ३८ | ६६ |
| ९ | कोल्हापूर .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | ६ | ६ |
| | | १९९४–९५ | .. | ४९ | .. | ४९ | ९ | ५८ |
| १० | औरंगाबाद .. | १९९०–९१ | ५४ | .. | .. | ५४ | ९९ | १५३ |
| | | १९९४–९५ | .. | .. | .. | .. | ४ | ४ |
| ११ | अमरावती .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | ११ | ११ |
| | | १९९४–९५ | .. | .. | .. | .. | १२१ | १२१ |
| १२ | नागपूर .. | १९९०–९१ | .. | .. | ४१ | ४१ | ३० | ७१ |
| | | १९९४–९५ | .. | .. | २६ | २६ | ३३ | ५९ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, सर्वच महानगरपालिकांचे दरडोई भांडवली उत्पन्न त्यांच्या दरडोई महसुली उत्पन्नाच्या तुलनेत (तक्ता क्रमांक ५.७ पहावा) फारच अल्प आहे.

### ५.११७ महानगरपालिकांची विविध प्रयोजनासाठी कर्ज उभारणी व कर्जाची परतफेड

राज्यातील काही मोठ्या महानगरपालिका वगळता सर्वच महानगरपालिकांची आर्थिक स्थिती पुरेशी मजबूत आहे असे दिसत नाही. तेव्हा या संस्थांना सदरची भांडवली खर्चाची कामे शासनाकडून किंवा वित्तीय संस्थांकडून कर्जे घेतल्याशिवाय पूर्ण करता येत नाहीत. या नागरी संस्थांना शासनाच्या मान्यतेनंतर खुल्या बाजारातून कर्ज उभारणी करता येते.

५.११८ नागरी संस्थांनी विविध प्रयोजनासाठी जी कर्जे शासनाकडून किंवा इतर वित्तीय संस्थांकडून घेतली ती कर्जे कोणत्या प्रयोजनासाठी घेतली त्याची माहिती महानगरपालिकानिहाय खालील तक्ता क्रमांक ५.२५ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.२५

## महानगरपालिकांनी घेतलेल्या कर्जाचा प्रयोजननिहाय तपशील

(दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीचा)

(रुपये लाखात)

| अ.क्र. | महानगरपालिका | | पाणी पुरवठा | मल व जल-निःस्सारण | रस्ते बांधणी | इमारती | अग्निशमन सेवा | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई | .. | ६३,९९२ | .. | ६०६ | .. | ७६ | ९९,६२१ | १,६४,२९५ |
| २ | ठाणे | .. | ५,०१० | ७० | .. | .. | ४० | २३३ | ५,३५३ |
| ३ | कल्याण | .. | ६,५२६ | ८९ | .. | ९ | ३२ | १ | ६,६५७ |
| ४ | नवी-मुंबई | .. | .. | .. | .. | .. | .. | १७ | १७ |
| ५ | नाशिक | .. | ८१६ | .. | ८ | ४ | ३९ | १६३ | १०३० |
| ६ | पुणे | .. | ६४ | ९२ | .. | ३ | ८५ | ३,१५६ | ३४०० |
| ७ | पिंपरी-चिंचवड | .. | .. | .. | .. | ७६२ | .. | .. | ७६२ |
| ८ | सोलापूर | .. | ३,३३८ | .. | .. | ५० | ४२ | १,३५३ | ४,७८३ |
| ९ | कोल्हापूर | .. | १५१ | .. | .. | ३ | १३ | १.५५२ | १,७१९ |
| १० | औरंगाबाद | .. | ८५९ | ४१ | .. | ४९ | ९ | ३२९ | १,२८७ |
| ११ | अमरावती | .. | .. | .. | .. | २० | ३ | ३६ | ५९ |
| १२ | नागपूर | .. | ५,१८७ | .. | .. | .. | .. | १६० | ५,३४७ |
| | | एकूण | ८५९४३ | २९२ | ६१४ | ८९९ | ३४० | १,०६,६२११ | १,९४,७१० |

५.११९ ज्या प्रयोजनांसाठी कर्जे घेतली आहेत त्यात प्रामुख्याने पाणी पुरवठ्यासाठी घेतलेल्या कर्जाचा भाग मोठा आहे. त्यानंतर रस्ते बांधणी व इमारतीसाठी घेतलेल्या कर्जाचा क्रम लागतो. इतर बाबींसाठी घेतलेल्या कर्जांची रक्कम सर्वाधिक असल्याचे दिसते. ही कर्जे प्रामुख्याने गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम, कमी खर्चाची स्वच्छता योजना, नागरी हिताची भांडवली बांधकामे, वाहने खरेदी करण्यासाठी, एकात्मिक विकास योजनांची कामे, पोहण्याचे तलाव बांधणे, व्यापारी संकुले इ. बहुउद्देशीय प्रयोजनांसाठी घेतली आहेत. महानगरपालिकांनी घेललेल्या कर्जाच्या माहितीचे अवलोकन केले असता सर्वाधिक कर्जे मुंबई महानगरपालिकेने घेतलेली आहेत. त्यातील जवळजवळ ४० टक्के कर्जे ही एकट्या पाणी व जलनिःस्सारणासाठी घेतली आहेत असे दिसते.

५.१२० वेगवेगळ्या प्रयोजनांसाठी घेतलेली एकूण कर्जे, त्याची १९९४–९५ या वर्षात केलेली परतफेड, कर्जफेडीचे वार्षिक दायित्व, दि. ३१ मार्च १९९५ रोजीची कर्जांची बाकी व थकबाकी याची माहिती क्रमांक ५.२६ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.२६

## महानगरपालिकांचे ३१ मार्च १९९५ रोजी असलेले कर्ज व कर्जफेडीचा तपशील

(रुपये लाखात)

| अ.क्र. | महानगरपालिका | एकूण कर्ज रक्कम | ३१ मार्च १९९५ पर्यंत केलेली कर्जफेड | | वार्षिक दायित्व | ३१ मार्च १९९५ रोजी कर्जबाकी | ३१ मार्च १९९५ रोजीची थकबाकी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुद्दल | व्याज | | | मुद्दल | व्याज |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई .. | १,६४,२९५ | ११,४०७ | ६४,८१७ | १७,६५७ | १,५२,८८८ | .. | .. |
| २ | ठाणे .. | ५,३५३ | १,०६९ | २,३४० | २८३ | ४,२८४ | .. | .. |
| ३ | कल्याण .. | ६,६५८ | २६७ | ९८८ | २१२ | ६,३९० | .. | .. |
| ४ | नवी-मुंबई .. | १७ | १७ | १ | ६ | .. | .. | .. |
| ५ | नाशिक .. | १,०३० | १७२ | ६९३ | १९ | ८५८ | .. | .. |
| ६ | पुणे .. | ३,४०० | ३०८ | ३७९ | १५९ | २५२ | .. | .. |
| ७ | पिंपरी-चिंचवड .. | ७६२ | ७६२ | १७६ | .. | .. | .. | .. |
| ८ | सोलापूर .. | ४,७८४ | २१६ | १,८९५ | ४७ | ४,५६८ | .. | .. |
| ९ | कोल्हापूर .. | १,७१९ | ८० | १,०५७ | १,५०६ | १,५५३ | .. | .. |
| १० | औरंगाबाद .. | १,२८७ | ३३६ | ५९८ | ५० | ९५१ | .. | .. |
| ११ | अमरावती .. | ५९ | ३१ | २५ | ४ | २८ | .. | .. |
| १२ | नागपूर .. | ५,३४७ | ५७१ | २,२२० | ३३५ | ४,७७७ | .. | .. |
| | एकूण .. | १,९४,७१० | १५,२३६ | ७५,११० | २०,२७९ | १,७६,५४८ | .. | .. |

राज्यातील सर्वच महानगरपालिकांनी कर्जफेडीचे हप्ते वेळेवर भरल्याने दि. ३१ मार्च १९९५ रोजीची थकबाकी काही नाही.

### ५.१२१ महानगरपालिकांचे एकूण दरडोई उत्पन्न व खर्च (महसुली व भांडवली धरून)

उपरोक्त परिच्छेदात महसुली उत्पन्न व महसुली खर्च, भांडवली उत्पन्न व भांडवली खर्च याचा विचार केला. त्याच बरोबर एकूण महसुली व भांडवली उत्पन्न व त्यानुसार केलेल्या खर्चाचे प्रमाणही विचारात घेणे योग्य होईल. या बाबतची माहिती तक्ता क्रमांक ५.२७ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक ५.२७

## महानगरपालिकांचे भांडवली दरडोई उत्पन्न

(रुपयांत)

| अ.क्र. | महानगरपालिका | वर्ष | महसूली उत्पन्न | भांडवली उत्पन्न | एकूण उत्पन्न | महसूली खर्च | भांडवली खर्च | एकूण खर्च (रु.) | एकूण खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मुंबई .. | १९९०–९१ | ८९२ | ५२ | ९४४ | ७७८ | १७४ | ९५२ | १००.८ |
| | | १९९४–९५ | १,६९२ | ८७ | १,७७९ | १,५३३ | ३४८ | १,८८१ | १०५.७ |
| २ | ठाणे .. | १९९०–९२ | ९०२ | ३० | ९३२ | ६५८ | २९१ | ९४९ | १०१.८ |
| | | १९९४–९५ | १,५१३ | ७० | १,५८३ | १,११७ | ४४३ | १,५६१ | ९८.६ |
| ३ | नवी-मुंबई .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | .. | .. | |
| | | १९९४–९५ | २७० | ३०० | ५७० | २०८ | १७९ | ३८७ | ६७.९ |
| ४ | कल्याण .. | १९९०–९१ | ४७७ | १३ | ४९० | ३३६ | ७० | ४०६ | ८२.९ |
| | | १९९४–९५ | ९४१ | ११७ | १,०५८ | ५२९ | ४३३ | ९६१ | ९०.८ |
| ५ | नाशिक .. | १९९०–९१ | ७२९ | २२ | ७५१ | ४३३ | १९० | ६२३ | ८३.० |
| | | १९९४–९५ | १,१७८ | २३ | १,२०१ | ८१९ | ४३० | १,२४९ | १०४.० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | पुणे .. | १९९०–९१ | ५८३ | ११ | ५९४ | ५१५ | ७० | ५८५ | ९८.५ |
| | | १९९४–९५ | १,०६१ | ३९ | १,१०० | ८८७ | २१० | १,०९७ | ९९.७ |
| ७ | पिंपरी-चिंचवड .. | १९९०–९१ | १,२२४ | ६१ | १,२८५ | ५३८ | ७८९ | १,३२७ | १०३.३ |
| | | १९९४–९५ | २,२३९ | ५ | २,२४४ | १,३६९ | ४८३ | १,८५२ | ८२.५ |
| ८ | सोलापूर .. | १९९०–९१ | ३६८ | ४३ | ४११ | ३६४ | ८४ | ४४८ | १०९.० |
| | | १९९४–९५ | ६१९ | ६६ | ६८५ | ५९९ | ५८ | ६५७ | ९५.९ |
| ९ | कोल्हापूर .. | १९९०–९१ | ५५२ | ६ | ५५८ | ५६० | ९८ | ६५८ | ११७.९ |
| | | १९९४–९५ | १,०३६ | ५८ | १,०९४ | ९७२ | ११४ | १,०८६ | ९९.३ |
| १० | औरंगाबाद .. | १९९०–९१ | ४१७ | १५३ | ५७० | २४६ | ११४ | ३६० | ६३.२ |
| | | १९९४–९५ | ६८९ | ४ | ६९३ | ५१७ | २२४ | ७४१ | १०६.१ |
| ११ | अमरावती .. | १९९०–९१ | २३५ | ११ | २४६ | २२७ | ४६ | २७३ | १११.० |
| | | १९९४–९५ | ४२९ | १२१ | ५५० | ३८० | २०८ | ५८८ | १०६.९ |
| १२ | नागपूर .. | १९९०–९१ | ३९७ | ७१ | ४६८ | ३२५ | ६४ | ३८९ | ८३.१ |
| | | १९९४–९५ | ६११ | ५९ | ६७० | ५२० | १७० | ६९० | १०३.० |
| | एकूण .. | १९९०–९१ | ७३३ | ४७ | ७८० | ६०७ | १६१ | ७६८ | ९८.५ |
| | | १९९४–९५ | १,३५६ | ७७ | १,४३३ | १,१६४ | ३०९ | १,४७३ | १०२.८ |

टीप : यांत राज्य शासनाच्या नागरी क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी अनुदान मिळते, त्या अनुदानाचा समावेश आहे.

५.१२२ वरील माहितीवरून असे दिसते की, मुंबई व अमरावती या महानगरपालिकांचा १९९०–९१ तसेच १९९४–९५ या दोन्ही वर्षातील दरडोई एकूण खर्च त्यांच्या एकूण उत्पनापेक्षा जास्त आहे. ठाणे, पुणे, सोलापूर व कोल्हापूर या महानगरपालिकांचा खर्चही सर्वसाधारणपणे एकूण उत्पन्नाएवढा आहे. तर कल्याण व पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांचा १९९४–९५ चा एकूण दरडोई खर्च मात्र एकूण उत्पन्नापेक्षा कमी दिसून येतो. एकूण खर्च हा एकूण उत्पन्नाच्या मर्यादेत असावा असे असले तरी काही महानगरपालिकांचा खर्च मात्र उत्पन्नापेक्षा जास्त दिसतो व तो त्यानी आधीच्या वर्षात ज्या बाबींवर खर्च होऊ शकला नाही व त्यासाठीच्या शिल्लक निधीमधून केला असावा असे दिसते.

भाग-२

## नगरपरिषदा

५.१२३ राज्यात एकूण २३२ नगर परिषदांच्या महसूली उत्पन्नाचा व दरडोई उत्पन्नाचा तपशील खालील तक्ता क्रमांक ५.२८ मध्ये दिला आहे :— (आकृती ६ पहावी).

तक्ता क्रमांक ५.२८

### नगरपरिषदांचे सर्व साधनापासूनचे एकूण महसूली उत्पन्न

(एकूण उत्पन्न रु. कोटीत)
(दरडोई उत्पन्न रुपयांत)

| तपशील | एकूण महसुली उत्पन्न | | | | | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९०–९१ | १९९१–९२ | १९९२–९३ | १९९३–९४ | १९९४–९५ | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| नगरपरिषदा | | | | | | |
| अ–वर्ग .. | १६१.५० | १८७.०९ | २२१.११ | २४३.३३ | २८१.३५ | १४.७२ |
| | (३४३) | (३९७) | (४७०) | (५१७) | (५९८) | |



पंध ४०९४–७अ

| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब–वर्ग | .. | ८२.४२ (२८६) | ९७.४२ (३३८) | ११४.५४ (३९७) | १३२.६५ (४६०) | १४९.०५ (५१७) | १६.११ |
| क–वर्ग | .. | ७६.२१ (२२९) | ८८.०७ (२६४) | १०३.१८ (३११) | ११५.४७ (३४८) | १२५.१२ (३७७) | १३.४६ |

(कंसातील आकडे दरडोई उत्पन्न दर्शवितात.)

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, " ब " वर्ग नगरपरिषदांच्या उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर " अ व " क " वर्गापेक्षा जास्त आहे. परंतु " ब " वर्ग नगरपरिषदांच्या पेक्षा " अ " वर्ग नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्न तुलनात्मकदृष्ट्या जास्त आहे.

**महसुली उत्पन्नाची बाबनिहाय वर्गवारी**

५.१२४ याच प्रकरणाच्या परिच्छेद ५.२६ मध्ये नमूद केलेल्या साधनापासून १९९०–९१ व १९९४–९५ या वर्षांच्या कालावधीत नगरपरिषदांचे उत्पन्न तक्ता क्रमांक ५.२९ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक ५.२९


**नगरपरिषदांचे महसुली उत्पन्नाची बाबनिहाय वर्गवारी**

(एकूण उत्पन्न रु. कोटीत)
(दरडोई उत्पन्न रुपयांत)

| उत्पन्नाचे साधन (१) | | नगर परिषदा वर्गवारी (२) | १९९०–९१ (३) | १९९४–९५ (४) | वार्षिक वाढीचा दर (५) |
|---|---|---|---|---|---|
| कर उत्पन्न | .. | अ–वर्ग | १०४.३९ (२२२) | २०९.२३ (४४४) | १९.०१ |
| | | ब–वर्ग | ४३.९८ (१५३) | ८९.८९. (३१२) | १९.९९ |
| | | क–वर्ग | ३५.०६ (१०५) | ६८.६७ (२०६) | १८.०९ |
| करेतर उत्पन्न | .. | अ–वर्ग | ८.१५ (१७) | १६.०० (३४) | १९.१० |
| | | ब–वर्ग | ५.२७ (१८) | १७.४२ (६०) | ३६.३७ |
| | | क–वर्ग | ३.९८ (१२) | ७.३९ (२२) | १७.८८ |
| राज्य करातील शिस्सां | .. | अ–वर्ग | २.६३ (६) | २.७० (६) | २.१३ |
| | | ब–वर्ग | १.३२ (५) | १.३७ (५) | २.२० |
| | | क–वर्ग | ०.८१ (२) | ०.६२ (२) | (-) १.७३ |
| शासकीय अनुदाने | .. | अ–वर्ग | ३८.३७ (८१) | ४०.९५ (८७) | ०.४५ |
| | | ब–वर्ग | २६.२४ (९१) | ३२.५२ (११३) | ५.३३ |
| | | क–वर्ग | ३०.१० (९०) | ३८.१६ (११४) | ६.२३ |

आकृती क्र. ६

नगरपरिषदांचे बाबवार महसुली उत्पन्न—१९९४–९५



| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|---|
| इतर उत्पन्न | .. | अ–वर्ग | ७.९६ (१७) | १२.४७ (२६) | १३.४२ |
| | | ब–वर्ग | ५.६२ (२०) | ७.८५ (२७) | ७.७४ |
| | | क–वर्ग | ६.२६ (१९) | १०.२९ (३१) | १३.०७ |
| एकूण उत्पन्न | .. | अ–वर्ग | १६१.५० (३४३) | २८१.३५ (५६८) | १४.७२ |
| | | ब–वर्ग | ८२.४२ (२८६) | १४९.०५ (५१७) | १६.११ |
| | | क–वर्ग | ७६.२१ (२२९) | १२५.१२ (३७७) | १३.४६ |

(कंसातील आकडे दरडोई उत्पन्न दर्शवितात)

५.१२५. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सर्वसाधारणपणे सर्वच नागरी संस्थांचे कर उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण मागील ५ वर्षांत ६४ टक्के ते ६९ टक्के पर्यंत आहे. त्या खालोखाल करेतर उत्पन्नाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण १२ टक्के पासून ते १५ टक्के पर्यंत आढळून आले. तक्ता क्रमांक ५.३० मध्ये एकूण महसुली उत्पन्नात कर, करेतर व शासनाकडून मिळणाऱ्या वित्तीय सहाय्याची टक्केवारी दाखविली आहे. (आकृती ७ पहावी).

तक्ता क्रमांक ५.३०

## एकूण महसुली उत्पन्नात कर, करेतर व शासकीय करातील वाटा व अनुदाने यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची टक्केवारी

| नगरपरिषद वर्ग (१) | | बाब (२) | १९९०–९१ (टक्के) (३) | १९९१–९२ (टक्के) (४) | वार्षिक वाढीचा दर (५) |
|---|---|---|---|---|---|
| अ–वर्ग | .. | कर | ६४.६ | ७४.४ | १९.०१ |
| | .. | करेतर | ९.९ | १०.१ | १६.९० |
| | .. | शासकीय करातील वाटा | १.६ | १.० | २.१३ |
| | | अनुदाने | २३.८ | १४.६ | ०.४५ |
| | | एकूण .. | १००.० | १००.० | १००.० |
| ब–वर्ग | .. | कर | ५३.४ | ६०.३ | १९.९९ |
| | .. | करेतर | १३.२ | १७.० | २३.६६ |
| | .. | शासकीय करातील वाटा | १.६ | ०.९ | २.२० |
| | | अनुदाने | ३१.८ | २१.८ | ५.३३ |
| | | एकूण .. | १००.० | १००.० | १००.० |
| क–वर्ग | .. | कर | ४६.० | ५४.९ | १८.०९ |
| | .. | करेतर | १३.४ | १४.१ | १४.९६ |
| | .. | शासकीय करातील वाटा | १.१ | ०.५ | (-) १.७३ |
| | | अनुदाने | ३९.५ | ३०.५ | ६.९३ |
| | | एकूण .. | १००.० | १००.० | १००.० |

५.१२६ मागील ५ वर्षांच्या कालावधीत सर्वच वर्गाच्या नगरपरिषदांच्या कर व करेतर उत्पन्नात वाढ झाल आहे तर शासनाकडून शासन करातील हिश्श्यापोटी मिळणारी व अनुदानापोटी मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात मा बरीच घट झाली आहे. एकूण या नगरपरिषदा स्वतःच्या उत्पन्नात त्याना अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून जास्तीत जास्त वाढ करण्यांचा प्रयत्न करीत आहेत, व त्यांचे शासकीय मदतीवर अवलंबून राहण्याच प्रमाण कमी होत आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

५.१२७ **नगरपरिषदांचे स्वतःच्या साधनांपासूनचे उत्पन्न**

स्वतःच्या साधनांपासून नगरपरिषदांना मिळालेल्या उत्पन्नाचा तपशिल तक्ता क्रमांक ५.३१ मध्ये दिला आहे

तक्ता क्रमांक ५.३१

## नगरपरिषदांचे स्वतःचे साधनापासूनचे कर व करेतर उत्पन्न

(एकूण उत्पन्न रु. कोटीत)
(दरडोई उत्पन्न रुपयांत)

| नगरपरिषद वर्ग | वर्ष | कर उत्पन्न | | करेतर उत्पन्न | | एकूण उत्पन्न | वार्षिक वाढीचा दर (एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | रुपये | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| " अ " .. | १९९०–९१ | १०४.३९ (२२२) | ८६.६ | १६.११ (३४) | १३.४ | १२०.५० (२५६) | |
| | १९९४–९५ | २०९.२३ (४४४) | ८८.० | २८.४७ (६०) | १२.० | २३७.७० (५०५) | १८.७५ |
| " ब " .. | १९९०–९१ | ४३.९८ (१५३) | ८०.२ | १०.८९ (३८) | १९.८ | ५४.८६ (१९०) | — |
| .. | १९९४–९५ | ८९.८९ (३१२) | ७८.१ | २५.२७ (८७) | २१.९ | ११५.१६ (४००) | २०.७५ |
| " क " .. | १९९०–९१ | ३५.०६ (१०५) | ७७.४ | १०.२४ (३१) | २२.६ | ४५.३० (१३६) | — |
| | १९९४–९५ | ६८.६७ (२०६) | ७९.५ | १७.६८ (५३) | २०.५ | ८६.३५ (२५९) | १७.४० |

(कंसातील आकडे दरडोई उत्पन्न दर्शवितात.)

### मागील पाच वर्षातील उत्पन्नातील वाढ

५.१२८ **कर उत्पन्न.**—वर दिलेल्या तक्त्यावरून सर्वच नगरपरिषद वर्गाच्या कर उत्पन्नामध्ये मागील पाच वर्षांत वाढ झाली आहे. याचे प्रामुख्याने कारण असे की, मागील २–३ वर्षात सर्वच वर्गातील काही नगर-परिषदांच्या मालमत्तांचे फेरमुल्यांकन झाले असून त्यामुळे मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. जकात करापासून उत्पन्नही वाढले आहे. " अ " वर्ग नगरपरिषदांचे बाबत या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी " ब " व "क " वर्गापेक्षा जास्त आहे.


५.१२९ **करेतर उत्पन्न व इतर उत्पन्न.**—करेतर उत्पन्नाच्या बाबतही मागील पाच वर्षात निश्चितपणे वाढ झाली आहे. " ब " व "क " वर्गासाठी या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी २० ते २३ टक्के दरम्यान असली तरी " अ " वर्गासाठी ती बरीच कमी आहे. करांच्या दरांचे पुनर्विलोकन वरचेवर झाल्यास या बाबींपासूनचे उत्पन्नात निश्चित भरीव वाढ करता येते.

५.१३० सर्वच वर्गाच्या नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्नात मागील ५ वर्षात सातत्याने वाढ झाली आहे. असे असले तरी ब व क वर्ग नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्न फारच कमी आहे.


## आकृती क्र. ७

### नगरपरिषदांचे महसुली व स्वतःचे उत्पन्न


'अ' वर्ग नगरपरिषदा




'ब' वर्ग नगरपरिषदा




'क' वर्ग नगरपरिषदा



५.१३१. **कर उत्पन्नाचे बाबनिहाय विश्लेषण**

नगरपरिषदांच्या मालमत्ता कर, जकात कर व इतर करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी तक्ता क्रमांक ५.३२ मध्ये दर्शविली आहे. (आकृती ८ पहावी).

तक्ता क्रमांक ५.३२

**नगरपरिषदांच्या विविध करापासून मिळणारे उत्पन्न व त्याची एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी**

(रु. कोटीत)

| नगरपरिषद | कराचा प्रकार | १९९०–९१ | १९९४–९५ | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| अ–वर्ग | .. मालमत्ता कर | १३.३७<br>(१२.८) | २३.७०<br>(११.४) | १७.१४ |
| | .. जकात कर | ८७.०७<br>(८३.४) | १७९.६१<br>(८५.८) | १९.५६ |
| | .. इतर कर | ३.९६<br>(३.८) | ५.८३<br>(२.८) | ११.६७ |
| | एकूण .. | १०४.३९<br>(१००) | २०९.२३<br>(१००) | १९.०१ |
| ब–वर्ग | .. मालमत्ता कर | ८.५६<br>(१९.५) | १६.०४<br>(१७.८) | १८.९० |
| | .. जकात कर | ३३.०५<br>(७५.१) | ६९.७४<br>(७७.६) | २०.४७ |
| | .. इतर कर | २.३७<br>(५.४) | ४.११<br>(४.६) | १६.३६ |
| | एकूण .. | ४३.९८<br>(१००) | ८९.८९<br>(१००) | १९.९९ |
| क–वर्ग | .. मालमत्ता कर | ६.२१<br>(१७.७) | १२.२७<br>(१७.९) | १९.११ |
| | .. जकात कर | २६.०३<br>(७४.२) | ५१.९३<br>(७५.७) | १८.२६ |
| | .. इतर कर | २.८२<br>(८.१) | ४.४७<br>(६.५) | ११.९६ |
| | एकूण .. | ३५.०६<br>(१००) | ६८.६६<br>(१००) | १८.०९ |

(कंसातील आकडे दरडोई उत्पन्न दर्शवितात.)

५.१३२. वरील आकडेवारीवरून दिसून येते की, सर्व वर्गाच्या नगरपरिषदांच्या उत्पन्नात जकात करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा सर्वाधिक आहे. तर त्या खालोखाल मालमत्ता करापासून उत्पन्न प्राप्त झाले. परंतु मागील ५ वर्षात जकातीच्या उत्पन्नात सतत वाढ झाली तर मालमत्ता कराच्या उत्पन्नाच्या टक्केवारीत मात्र घट झाल्याचे दिसते. इतर करापासूनच्या उत्पन्नाची टक्केवारीही फारच अल्प असल्याचे दिसुन आले. " ब " व " क " वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत जकात करापासूनच्या उत्पन्नाची टक्केवारी " अ " वर्गापेक्षा कमी असल्याचे दिसते. या उलट मालमत्ता करापासूनच्या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी " अ " वर्गामध्ये जास्त आहे. इतर उत्पन्नाच्या बाबतीतही १९९०–९१ च्या तुलनेत पुढील वर्षात या बाबींपासुन मिळणाऱ्या उत्पन्नाच्या टक्केवारीत घटच झाल्याचे दिसते.

५.१३३. एकूण वरील आकडेवारीनुसार सर्व वर्गातील नगरपरिषदांचा भर प्रामुख्याने जकात करापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर असून त्या खालोखाल मालमत्ता कराचा क्रम लागतो. इतर कराचा कर उत्पन्नातील वाटा मात्र नाममात्र आहे.

**मालमत्ता कर**

५.१३४. मालमत्ता करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वर्गनिहाय तपशील तक्ता क्रमांक ५.३२ मध्ये दिला आहे. या करापासूनचे दरडोई उत्पन्न खालील तक्ता क्रमांक ५.३३ मध्ये दाखविला आहे .—

तक्ता क्रमांक ५.३३

**नगरपरिषदांचे मालमत्ता करापासूनचे दरडोई उत्पन्न**

| नगरपरिषद वर्ग (१) | १९९०–९१ (रु.) (२) | १९९४–९५ (रु.) (३) | वार्षिक वाढीच दर (४) |
|---|---|---|---|
| अ–वर्ग .. .. .. | २८ | ५१ | १७.१४ |
| ब–वर्ग .. .. .. | ३० | ५६ | १८.९० |
| क–वर्ग .. .. .. | १९ | ३७ | १९.९१ |

५.१३५. सर्व " अ " वर्ग नगरपरिषदांचे मालमत्ता करापासूनचे दरडोई उत्पन्न १९९०–९१ मध्ये रु. २८ होते ते वाढून १९९४–९५ मध्ये रु. ५१ झाले, " ब " वर्गाचे दरडोई उत्पन्न " अ " वर्गापेक्षा थोडे जास्त दिसते. एकूण " ब " वर्ग नगरपालिकेचे मालमत्ता कराचे दरडोई उत्पन्न नगरपरिषदांमध्ये राज्यांत जास्त होते. **मालमत्तांचे फेरमूल्यांकन वेळचेवेळी व्हावयास पाहिजे. त्यामुळे या कराच्या दरडोई उत्पन्नात चांगलीच वाढ होईल.**

५.१३६. **मालमत्ता कराच्या वार्षिक उत्पन्न वाढीचा दर**

" अ " वर्ग नगरपरिषदेमध्ये वार्षिक वाढीचा दर १७.१४ टक्के, " ब " वर्ग नगरपरिषदांसाठी वाढीचा दर १८.९ टक्के तर " क " वर्ग नगरपरिषदांचा वार्षिक वाढीचा दर सर्वाधिक म्हणजे १९.९१ टक्के दिसून आला.

५.१३७. मालमत्ता करातील उत्पन्नात वाढ होण्याची, परिच्छेद क्रमांक ५.७५ मध्ये दिलेली, कारणे नगरपरिषदांनाही लागू ठरतात.

५.१३८. नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रातील इमारतींची संख्या, वार्षिक मालमत्ता कराची मागणी, वर्षाची थकबाकीसह एकूण मागणी, वर्षातील वसुली व वर्षअखेर थकबाकी याबाबतची माहिती सर्वच नगरपरिषदांच्या क्षेत्रात करपात्र मालमत्तांच्या संख्येत मागील ५ वर्षात झालेली वाढ तक्ता क्रमांक ५.३४ मध्ये दाखविली आहे.

तक्ता क्रमांक ५.३४


| नगरपरिषदा वर्ग (१) | १९९०–९१ मधील मालमत्तांची संख्या (२) | १९९४–९५ मधील मालमत्तांची संख्या (३) | वार्षिक वाढीच दर (टक्के) (४) |
|---|---|---|---|
| अ–वर्ग (२४) .. .. .. | ५,४८,८९५ | ७,४७,९५३ | ९.०० |
| ब–वर्ग (४९) .. .. .. | ३,५६,५८६ | ४,५५,७८६ | ६.९५ |
| क–वर्ग (१५९) .. .. .. | ५,०३,५०६ | ५,८९,३२६ | ४.२६ |


५.१३९. जिल्हा मुख्यालयाची ठिकाणे, औद्योगिक प्रगत परिसर, मोठ्या शहराचे सान्निध्य, वाहतुकीच्या साधनांची उपलब्धता जेथे जास्त प्रमाणात आहे अशा " अ " वर्ग नगरपरिषदांमध्ये मालमत्तांच्या सख्येत चांगलीच वाढ झाली आहे. या उलट अशा सोई नसलेल्या नगरपरिषदांच्या बाबतीत इमारतींच्या संख्येतील वाढीचा दर कमी आहे.


## आकृती क्र. ८

### नगरपरिषदांचे करापासूनचे बाबवार उत्पन्न

'अ' वर्ग नगरपरिषदा



५.१४१. मालमत्ता करापासूनच्या उत्पन्नात वाढ होण्याचे दुसरे कारण म्हणजे मालमत्ता कराच्या दरातील वाढ हे आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दिनांक १ एप्रिल १९९२ व दिनांक १० जानेवारी १९९४ च्या अधिसूचनेद्वारे नगरपरिषदांच्या एकत्रित मालमत्ता कराच्या दरात तक्ता क्र. ५.३५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ केलेली आहे.

तक्ता क्रमांक ५.३५

| नगरपरिषदा वर्ग | १ एप्रिल १९९२ पासून दराची टक्केवारी (वार्षिक करयोग्य मूल्याच्या) | | १ एप्रिल १९९४ पासून दराची टक्केवारी (वार्षिक करपात्र मूल्याच्या) | |
|---|---|---|---|---|
| | कमाल | किमान | कमाल | किमान |
| अ-वर्ग | २७ | २१ | २८ | २३ |
| ब-वर्ग | २६ | २० | २७ | २२ |
| क-वर्ग | २५ | १९ | २६ | २१ |

५.१४२. शासनाने मालमत्ता कराचे दर विहित केले असले तरी त्या दराने नगरपरिषदा कर आकारणी करतातच असे नाही. १९९४-९५ मध्ये नगरपरिषदा कोणत्या दराने कर आकारणी करीत होत्या. या बाबतच्या खालील तक्ता क्र. ५.३६ मधील आकडेवाडीवरून असे दिसून येईल की, संबंधित नगरपरिषदा वर्गातील बहुतेक सर्व नगरपरिषदा किमान दराचीच आकारणी करीत होत्या. फारच थोड्या नगरपालिकांनी कराची कमाल मर्यादा गाठण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

तक्ता क्रमांक ५.३६

| नगरपरिषद वर्ग | कर आकारणी दरानुसार नगरपरिषदांची संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ-वर्ग | २८% | २७% | २६% | २५% | २४% | २३% | २३% पेक्षा कमी |
| | १ | ३ | ३ | २ | ११ | ० | ४ |
| ब-वर्ग | २७% | २६% | २५% | २४% | २३% | २२% | २२% पेक्षा कमी |
| | ० | २ | ७ | ७ | ३१ | १ | १ |
| क-वर्ग | २६% | २५% | २४% | २३% | २२% | २१% | २१% पेक्षा कमी |
| | ० | ५ | १० | २६ | १०४ | २ | १२ |

(रेखेखालील आकडे नगरपरिषदांची संख्या दाखवितात)

किमान दरापेक्षा कमी आकारणी करणाऱ्या संस्थांची संख्या " अ ", " ब " व " क " वर्गामध्ये अनुक्रमे ४, १ व १ अशी आहे. मालमता कराच्या दरात शासनाने दिनांक १ एप्रिल १९९४ पासून वाढ केली आहे. मालमता कराच्या आकारणीबाबतची कार्यवाही नवीन वर्ष (येथे १९९४-९५) सुरू होण्यापूर्वीच करावी लागत असल्याने, शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे कर आकारणी झाली नसावी अशीही शक्यता येथे नाकारता येत नाही.

५.१४३. नगरपरिषदांच्या तक्ता क्र. ५.३६ मधील माहितीवरून करांच्या दरात ४ ते ५ टक्क्यांनी वा **करून कराची कमाल मर्यादा गाठवयाचा प्रयत्न केल्यास या नगरपरिषदांचे उत्पन्न बऱ्याच मोठ्या प्रमाणा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे.**

५.१४४. मालमत्ता करापासून उत्पन्नात वाढ होण्याचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे फेरमूल्यांकनामुळे करयोग्य मूल्यातील व त्यामुळे कर आकारणीतील वाढ हे होय. फेरमूल्यांकनाबाबत प्रकरण ८ मध्ये विस्तृत माहिती दिली आहे.

**मालमत्ता कराची वसुली**

५.१४५. नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे मुल्यांकन / फेरमुल्यांकन करून योग्य दराने कर आकारणी करणे व त्याचबरोबर प्रशासकीय यंत्रणा योग्यप्रकारे राबवून या मालमत्ता कराची वसुली कार्यक्षमतेने करणे हे देखील महत्त्वाचे आहे. तक्ता क्र. ५.३७ मध्ये याबाबतची माहिती दिली आहे :—

तक्ता क्रमांक ५.३७

**मालमत्ता कराची मागणी, वसुली व थकबाकी**

(रुपये कोटीत)

| नगरपरिषदा वर्ग | वर्ष | थकबाकीसह मागणी | वर्षात केलेली वसुली * | वर्षअखेर थकबाकी | थकबाकीची एकूण मागणीशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ-वर्ग | १९९०-९१ | २३.७१ | १३.४६ | १०.२५ | ४३.२ |
| | १९९४-९५ | ६१.७३ | २३.१६ | ३८.५७ | ६२.४ |
| ब-वर्ग | १९९०-९१ | १३.२५ | ८.१७ | ५.०८ | ३८.३ |
| | १९९४-९५ | ३३.१९ | १५.०७ | १८.१२ | ५४.६ |
| क-वर्ग | १९९०-९१ | ९.५१ | ६.१४ | ३.३७ | ३५.४ |
| | १९९४-९५ | २२.८० | १२.१५ | १०.६५ | ४६.७ |

(*तक्ता क्र. ५.३२ मधील मालमत्ता कराचे आकडे वार्षिक लेख्यावर तर या तक्त्यातील वसुलीचे आकडे संबंधित विभागाच्या आकडेवारीवर आधारीत आहेत. विभागातील आकडेवारीत कराच्या परतव्यामुळे, धनादेश / धनाकर्ष आदेश न वटल्यामुळे किंवा जादा वसुली यामुळे झालेल्या बदलाचे समायोजन न झाल्याने हा फरक असू शकतो.)

५.१४६. एकूण २३२ नगरपरिषदांपैकी मालमत्ता कराच्या एकूण मागणीपैकी ६० टक्केपेक्षा जास्त वसुली करणाऱ्या नागरी संस्थांची संख्या १९९०-९१ मध्ये १६५ होती. ती १९९४-९५ मध्ये १२५ पर्यंत खाली आली असून एकूण थकबाकीचे प्रमाण वाढले आहे.

५.१४७. थकबाकीत वाढ होण्याच्या कारणांची विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, नगरपरिषदांच्या क्षेत्रातील मालमत्तांच्या मूल्यांकनात झालेली वाढ व त्याआधारे वाढलेल्या मालमत्ता कराच्याबाबत जनतेमध्ये असंतोष पसरल्याने कर भरण्यात नागरिकांचा निरुत्साह त्याचबरोबर अकार्यक्षम वसुली यंत्रणा, तसेच कर आकारणी विरुद्ध न्यायालयात प्रविष्ट झालेली प्रकरणे अशी प्रामुख्याने कारणे आहेत. **नगरपरिषदांना महागाईभत्ता अनुदान हे त्यांनी केलेल्या कराच्या वसुलीच्या प्रमाणात दिले जाते व वसुलीची टक्केवारी कमी असल्यास अनुदानाच्या रकमेतही कपात केली जाते. अशा प्रकारच्या वजातीमुळे होणारे दुहेरी नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून वसुलीची टक्केवारी वाढविली पाहिजे.**

जकात कर

५.१४८. नगरपरिषदांच्या बाबतीत जकातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा फार मोठा आहे. जकात करापासून १९९४-९५ या वर्षात अ-वर्ग नगरपरिषदांना त्यांच्या कर उत्पन्नाच्या ८५.८ टक्के उत्पन्न मिळाले. ब-वर्ग व क-वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत ही टक्केवारी अनुक्रमे ७७.६ टक्के व ७५.७ टक्के आहे.

५.१४९. १९९०-९१ ते १९९४-९५ या पाच वर्षांच्या कालावधीत जकात करापासूनच्या उत्पन्नात झालेली वाढ तक्ता क्रमांक ५.३२ मध्ये दाखविण्यात आलेली आहे. या करापासूनचे दरडोई उत्पन्न व त्या उत्पन्नात मागील वर्षाच्या तुलनेत झालेली वाढ व मागील ५ वर्षांतील जकात कर उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर तक्ता क्रमाक ५.३८ मध्ये दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.३८

**नगरपरिषदाचे वर्गनिहाय जकात करापासूनचे दरडोई उत्पन्न व उत्पन्न वाढीचा दर**

| नगरपरिषद वर्ग | | १९९०-९१ रुपये | १९९४-९५ रुपये | वार्षिक वाढीचा दर रुपये |
|---|---|---|---|---|
| अ-वर्ग | .. | १८५ | ३८१ | १९.५६ |
| ब-वर्ग | .. | ११५ | २४२ | २०.४७ |
| क-वर्ग | .. | ७८ | १५६ | १९.९१ |

५.१५०. दरवर्षी जकात कराचे उत्पन्नात सातत्याने वाढ झाली असल्याचे वरील तक्त्यावरून स्पष्ट दिसून येते. मागील ५ वर्षांत जकात करापासून उत्पन्नात अ-वर्ग नगरपरिषदांचे बाबतीत वार्षिक वाढीचा दर १९.५६ टक्के होता तर ब-वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत हा वाढीचा दर सर्वाधिक म्हणजे २०.४७ टक्के होता. क-वर्ग नगरपरिषदांसाठी हा दर १९.९१ टक्के आहे.

५.१५१. उपलब्ध आकडेवारीचा विचार केला असता, सर्वसाधारणपणे ज्या संस्थाच्या परिसरात कृषि व्यवसाय प्राधान्याने चालतो, व्यापार उद्योगांची कमतरता आहे व ही ठिकाणे विकसित भागापासुन लांबवर आहेत, त्या नागरी संस्थांचे जकातीपासूनचे दरडोई उत्पन्न कमी असल्याचे आढळून आले आहे.

**इतर कर**

५.१५२. एकूण कर उत्पन्नातील इतर करांपासून मिळणारे उत्पन्न फारच कमी असल्याचे दिसून येते. या करांमध्ये प्रामुख्याने वाहने, जनावरावरील कर, जाहिरात कर, करमणुक प्रयोगावरील कर, तसेच इतर बाबींवरील करपासूनचे उत्पन्न यांचा समावेश आहे. तक्ता क्रमाक ५.३२ मधील माहितीवरून या करापासूनच्या उत्पन्नाचे एकूण कर उत्पन्नाशी प्रमाण अ-वर्ग नगरपरिषदांसाठी मागील पाच वर्षांत किमान २.८ टक्के ते ३.८ टक्के आढळून आले आहे. ब-वर्गासाठी हे प्रमाण ४.६ टक्केपासून ५.४ टक्केपर्यंत तर क-वर्गाच्या बाबतीत हे प्रमाण ६.५ पासून ते ८.१ टक्केपर्यन्त दिसून आले व त्या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाशी टक्केवारी दरवर्षी कमी झाल्याचेही दिसून आले आहे.

**करेतर उत्पन्न व इतर उत्पन्न**

५.१५३. करेतर साधनापासूनचे उत्पन्न व इतर बाबींपासूनचे उत्पन्न याचा तपशील तक्ता क्रमांक ५.३१ मध्ये दिला आहे. करेतर उत्पन्नांच्या साधनात शुल्क, आकार, दर, दंड यांचा तसेच ज्या नगरपरिषदांच्या क्षेत्रात पिण्याचे पाणी मीटरद्वारे पुरविले जाते व त्यानुसार पाणीपट्टीची आकारणी होते किंवा जेथे सरसकट विशिष्ट दराने पाणीपट्टी आकारली जाते त्या पाणीपट्टीपासूनचे उत्पन्न/विकास शुल्क इत्यादिचा समावेश आहे. इतर बाबींच्या उत्पन्नात प्रामुख्याने नागरी संस्थांच्या इमारती व जमिनीचे भाडे, बाजार, तात्पुरते गाळे याचे भाडे, व्यापारी संकुलापासूनचे भाडे, गुंतवणुकीवरील व्याज इत्यादींचा समावेश आहे.

५.१५४. तक्ता क्रमांक ५.३१ वरून असे दिसून येईल की, १९९४-९५ मध्ये अ-वर्ग नगरपरिषदांसाठी या दोन्ही बाबींपासूनचे उत्पन्न सर्वसाधारणपणे स्वतःच्या एकूण उत्पन्नाच्या १२ टक्के, ब-वर्गासाठी २२ टक्के तर क-वर्गासाठी २१ टक्के आहे. करेतर साधनांपासूनचे उत्पन्न तसेच इतर बाबींपासूनचे उत्पन्न हे नागरी क्षेत्रात नागरिकांना सेवा व सुविधा पुरविण्याच्या संदर्भातील आहे. प्रत्यक्षात मात्र या बाबींपासून फारच अल्प असे उत्पन्न मिळते, या सबबीखाली या उत्पन्नाकडे विशेष असे लक्ष जात नाही. परिणामतः पूर्वीपासून अस्तित्वातअसलेल्या दरानेच आकार, शुल्क, दर लावले जात असल्याने अनेक वर्षांपासून या उत्पन्नान विशेष अशी वाढ झालेली नाही.सेवासुविधा पुरवण्यासाठी लागणारा खर्च व त्यासाठी आकारलेले दर/शुल्क इत्यादीची सांगड घातल्यास व त्याचे वेळोवेळी पुनर्विलोकन करून त्यात नियमितपणे सुधारणा केल्यास या बाबींपासून होणाऱ्या उत्पन्नात चांगली वाढ होण्याची शक्यता आहे. स्वतःचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून या बाबी विचारात घेणे व त्यानुसार त्यांच्या दरांत वाढ केली पाहिजे.

## व्यापारी संकुलापासूनचे उत्पन्न

५.१५५. महानगरपालिकेप्रमाणेच नगरपरिषदांनीही त्यांच्या क्षेत्रात नागरीकांच्या तसेच व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी मध्यवर्ती वा मोक्याच्या ठिकाणी व्यापारी संकुलाची उभारणी केली आहे. तक्ता क्रमांक ५.३९ मध्ये व्यापारी संकुलावरील गुंतवणूक व त्यापासूनचे उत्पन्न याची माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.३९

### नगरपरिषदांतील व्यापारी संकुले, खर्च व उत्पन्न

दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीची स्थिती

| बाब | नगरपरिषदा | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. व्यापारी संकुले .. | २६५ | ३०७ | ४१२ | ९८४ |
| २. बांधणी खर्च (रु. लाख)— .. | | | | |
| स्वतःचे उत्पन्न .. | १,२८०.६४ | १,१४८.९२ | ५९९.७३ | ३,०२९.२९ |
| कर्ज .. | ४२३.२४ | ७१४.३९ | ७८२.८२ | १,९२०.४५ |
| इतर .. | १३८.४० | २२२.५८ | ७००.१० | १,०६१.०८ |
| एकूण .. | १,८४२.२९ | २,०८५.९० | २,०८२.६५ | ६,०१०.८४ |
| ३. निर्माण सोयींची संख्या— | | | | |
| ओटे .. | ३,६१० | १,८९४ | २,१४६ | ७,६५० |
| दुकाने/गाळे .. | १०,७६४ | ६,३२८ | ६,८०० | २३,८९२ |
| सभागृह इत्यादी .. | ७८ | ५ | ५६ | १३९ |
| ४. सोयीचा वापर— | | | | |
| स्वतःसाठी .. | २८० | ११३ | १६२ | ५५५ |
| भाड्याने .. | १२,७६१ | ७,४२५ | ७,७९८ | २७,९८४ |
| वापरात नसलेले .. | १,४११ | ६८९ | १,०४२ | ३,१४२ |
| वापरात नसण्याची टक्केवारी | ११ | ९ | १३ | ९.९१ |
| ५. संकुलापासूनचे वार्षिक उत्पन्न (रुपये लाखांत) .. | ३८९.६३ | २८२.४२ | ३००.५६ | ९७२.९१ |
| ६. सोयी वापरात नसल्याने झालेले नुकसान (रुपये लाखांत) .. | ५९.९१ | १६.२५ | ३७.७० | ११३.८६ |
| ७. थकबाकी (रुपये लाखांत) .. | ३३०.७५ | १८६.३३ | १६५.५४ | ६८२.६२ |

५.१५६.    सर्व नागरी संस्थांची संकुल बांधणी वरील भांडवली गुंतवणुक आकडेवारीच्या आधारे रु. ६०.१० कोटींची आहे. ज्या नगरपरिषदांनी संकुल उभारणीबाबत झालेल्या भांडवली खर्चाची माहिती दिली नाही त्यांची गुंतवणूक विचारात घेतल्यास ही भांडवली गुंतवणूक बरीच मोठी असण्याची शक्यता आहे. हा भांडवली खर्च प्रामुख्याने स्वतःचे उत्पन्न व कर्ज घेऊन केला तर क-वर्ग नगरपरिषदांनी मात्र मोठ्या प्रमाणात स्वतःच्या उत्पन्नाबरोबरच कर्ज व आगाऊ रकमा घेऊन हा खर्च केला आहे.

५.१५७.    या संकुलामुळे नागरी क्षेत्रात ओटे. दुकाने, सभागृहे इत्यादींच्या सोई निर्माण करण्यात आल्या असून त्यापैकी काही सोयीचा वापर संस्था स्वतःसाठी करतात. तर काही सोयीचा वापर अद्याप झाला नाही. विशेषतः अ, ब व क-वर्ग नगरपरिषदांमध्ये सोयीचा वापर न होण्याचे प्रमाण बरेच जास्त आहे व त्यामुळे या संस्थांना दरवर्षी रु. १.१४ कोटी एवढ्या उत्पन्नाचे नुकसान होते. संकुलापासून वार्षिक रु. ९.७३ कोटी उत्पन्न मिळते. **व्यापारी संकुलापासून नागरी संस्थांना उत्पन्न मिळते हे निर्विवाद सत्य असले तरी या उत्पन्नाची एकूण भांडवली गुंतवणुकीशी सांगड घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच गुंतवणूक दीर्घकालीन मुदतीचे ठेवीत बँकेमध्ये किंवा इतरत्र केली असता जे उत्पन्न प्राप्त झाले असते किमान तेवढ्या उत्पन्न दराने तरी व्यापारी संकुलापासून उत्पन्न मिळावे या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत, अशी आयोगाची शिफारस आहे.**

### शासनाकडून मिळणारे आर्थिक सहाय्य

५.१५८.    **शासनाकडून शासन कराचा हिस्सा (करमणूक कर अनुदान).**—या करमणूक कराच्या हिश्श्यापोटी नगरपरिषदाना मिळालेल्या एकूण व दरडोई उत्पन्नाचा तपशील तक्ता क्रमांक ५.२९ मध्ये दिला आहे. राज्य शासनाच्या करातील नगरपरिषदांना मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नात अ-वर्गाचे उत्पन्न जास्त असून ते ब-वर्ग व क-वर्गांसाठी क्रमशः कमी झाले आहे व त्यांची एकूण महसुली उत्पन्नाशी मागील ५ वर्षातील प्रमाण अ व ब-वर्ग नगरपरिषदांसाठी १.६ टक्केवरून (१९९०-९१) १.० टक्के (१९९४-९५) पर्यंत खाली आले. क-वर्गासाठी हे प्रमाण १.१ टक्के (१९९०-९१) वरून ०.५ टक्के (१९९४-९५) पर्यंत खाली घसरले आहे.

### शासकीय अनुदाने

५.१५९.    शासकीय अनुदानापोटी मिळालेल्या उत्पन्नाचे एकूण महसुली उत्पन्नाशी प्रमाण मागील ५ वर्षांत अ-वर्ग नगरपरिषदांसाठी २३.८ टक्के (१९९०-९१) होते. ते १९९४-९५ मध्ये १४.६ टक्क्यापर्यन्त खाली आले. ब-वर्ग नगरपरिषदां- बाबतीतही ते ३१.८ टक्केवरून २१.८ टक्क्यापर्यंत कमी झाले. तर क-वर्ग नगरपरिषदांसाठी ते ३९.५ टक्केवरून ३०.५ टक्केपर्यंत कमी झाले. विशेष म्हणजे क-वर्ग नगरपरिषदांना ब-वर्गापेक्षा जास्त तर ब-वर्ग नगरपरिषदांना अ-वर्गापेक्षा जास्त दरडोई अनुदान प्राप्त होते. हे खालील तक्ता क्रमांक ५.४० मधील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

तक्ता क्रमांक ५.४०

अनुदानापासूनचे दरडोई उत्पन्न

| नगरपरिषद | १९९०-९१ रुपये | १९९४-९५ रुपये | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|
| अ-वर्ग | ८१ (२३.८) | ८७ (१४.६) | ०.४५ |
| ब-वर्ग | ९१ (३१.८) | ११३ (२१.८) | ५.३३ |
| क-वर्ग | ९० (३९.५) | ११४ (३०.५) | ६.९३ |

(कंसांतील आकडे एकूण महसुली उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.)

५.१६० क वर्ग नगररिषदांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने त्यांना शासनाकडून 'अ' व 'ब' व नगरपरिषदांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अनुदान दिले जाते हे अनुदानापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची एकूण उत्पन्नाश टक्केवारी (तक्ता क्र. ५.४०) विचारात घेता दिसून येते. या नगरपरिषदांना शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्या त्यांनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देखिल देण्याची त्यांची क्षमता नाही. त्यामुळे मूलभूत सेवा-सुविध पुरविण्यासाठी या वर्गातील संस्थांकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. पर्यायाने नागरी क्षेत्रात करावयाची विकास का या संस्थांना हाती घेता येत नाही. स्वतःच्या उत्पन्नाचा वाढीचा दर व अनुदानापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या वाढीचा दर यात फारच मोठी तफावत आहे. अ, ब व क वर्ग नगरपरिषदांच्या अनुदानात घट होण्याच्या कारणांचा विचार केला असता असे आढळून आले की, या नगरपरिषदांना देय असलेल्या अनुदानामधून त्यांनी इतर प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जापोटी व इतर बिलांपोटीच्या हप्त्यांची रक्कम वळती करून घेण्यात आली. या वजातीमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाला देय कर्जे हप्ते तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची विद्युत देयकांची बाकी इ. वसुलीचा समावेश आहे. अशाप्रकारे अनुदानामधुन केलेल्या वजाती ह्या संबंधित नगरपरिषदांच्या खर्चाच्या बाबी असल्यातरी त्यांच्या नोंदी बहुतांशी नगरपरिषदांच्या लेख्यामध्ये त्याप्रमाणे केल्या जात नाहीत व अनुदानापोटी वजातीनंतर मिळालेल्या निव्वळ रक्कमांचा समावेश केवळ जमेच्या बाजूस केला जातो. याशिवाय सर्वसाधारणपणे असेही निदर्शनास आले की, शासकीय अनुदानाच्या रकमा वर्षअखेरीस मार्च महिन्यात वितरित केल्या जातात व या रकमांचे धनादेश या नागरी संस्थांना संबंधित आर्थिक वर्षात प्राप्त न होता ते पुढील आर्थिक वर्षात एप्रिल-मे मध्ये प्राप्त होतात. या रकमांच्या नोंदी ज्या दिवशी असे धनादेश प्राप्त झाले त्या दिवशी संबंधित संस्थांच्या लेख्यामध्ये जमा म्हणून केल्या जातात. यामुळे अनुदानाच्या उत्पन्नाची टक्केवारी कमी वा जास्त असल्याची शक्यता नाकारता येत नाही. **नगरपरिषदांच्या लेखा-विषयक नोंदीमध्ये वरील प्रकारच्या त्रुटी वर्षानुवर्षे आढळून येत आहेत. हे टाळण्याचे दृष्टीने या संदर्भात नगरविकास विभाग/नगरपालिका प्रशासन संचालनालय संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच लेखापरीक्षकांनी लक्ष घालून अशा त्रुटी राहणार नाहीत यासाठी योग्य ती संहिता आखून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे हे वरचेवर तपासणे आवश्यक आहे.**

५.१६१ **बाबवार अनुदाने.**—नगरपरिषदांना शासनाकडून जी अनुदाने प्राप्त होतात त्याचा बाबवार तपशील खालील तक्ता क्र. ५.४१ मध्ये दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.४१

**शासकीय अनुदानापासून बाबवार मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नाचा तपशील**

| नगर परिषद | वर्ष | जमीन महसूल व बिनशेतसारा अनुदान (रुपये) | महागाई भता अनुदान (रुपये) | रस्ता अनुदान (रुपये) | मुद्रांक शुल्क अनुदान (रुपये) | इतर अनुदान (रुपये) | एकूण अनुदान (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| अ-वर्ग | १९९०-९१ | ०.४ | ३६ | ६ | .. | ३९ | ८१ |
| | १९९४-९५ | १ | ४६ | १२ | ०.३ | २८ | ८७ |
| ब-वर्ग | १९९०-९१ | १ | ४१ | ७ | ०.३ | ४२ | ९१ |
| | १९९४-९५ | १ | ६१ | १६ | ०.५ | ३४ | ११३ |
| क-वर्ग | १९९०-९१ | १ | ३९ | ८ | १ | ४२ | ९० |
| | १९९४-९५ | १ | ५५ | १६ | १ | ४१ | ११४ |

५.१६२ अनुदानामध्ये प्रामुख्याने महागाई भत्ता अनुदान, रस्ता अनुदान व इतर अनुदाने यांचा समावेश आहे. इतर अनुदानात शिक्षण अनुदान, वैद्यकीय अनुदान, यात्राकर, मुख्याधिकाऱ्यांचे रजा वेतन अनुदान, कोर्ट फी अनुदान यांचा समावेश आहे. वरील तक्त्यातील माहितीवरुन महागाई भत्त्यापोटी मिळणारे अनुदान हे एकूण अनुदानाच्या

जवळजवळ ५०% असल्याचे दिसते. विशेषतः महागाई भत्त्याचे अनुदानात नगरपरिषदांच्या सर्व वर्गात दरवर्षी वाढ झाली असून, " ब " वर्ग नगरपरिषदांना ' अ ' व ' क ' वर्गाचे तुलनेत दरडोई जादा अनुदान मिळाल्याचे दिसून येते. रस्ता अनुदानातही दरवर्षी वाढ झाली आहे.

५.१६३ **नगरपरिषदेचा महसुली खर्च.**—नगरपरिषदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबाबतचा उहापोह परिच्छेद ५.१२ मध्ये केला आहे. नागरी क्षेत्रातील नागरिकांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी नागरी संस्थांनी १९९०-९१ ते १९९४-९५ या ५ वर्षांत केलेल्या महसुली खर्चाची माहिती तक्ता क्र. ५.४२ मध्ये दाखविली आहे.

तक्ता क्रमांक ५.४२

**नगरपरिषदांचा एकूण महसुली खर्च**

(रुपये कोटीत)

| नगर परिषद | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | वार्षिक वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|
| अ-वर्ग | १३४.४५ | १६५.२३ | १९४.४६ | २१६.०१ | २३४.५६ | १४.८१ |
| | (२८६) | (३५१) | (४१३) | (४५९) | (४९८) | |
| ब-वर्ग | ७४.१२ | ८८.९७ | ९५.२२ | १०५.१४ | ११९.४७ | ११.८७ |
| | (२५७) | (३०९) | (३३०) | (३६५) | (४१५) | |
| क-वर्ग | ७२.१६ | ८२.६५ | ९४.७० | १०६.४२ | ११३.४५ | १२.२८ |
| | (२१७) | (२४९) | (२८५) | (३२०) | (३४२) | |

(कंसातील आकडे दरडोई खर्च रुपयात दाखवितात.)

५.१६४ राज्यातील सर्वच वर्गाच्या नगरपरिषदांच्या महसुली खर्चात गेल्या पाच वर्षांत चांगलीच वाढ झालेली आहे. विशेषतः अ-वर्गातील नगरपरिषदांच्या खर्चातील वार्षिक वाढीचा दर सर्वाधिक आहे. तर क-वर्ग नगरपरिषदेसाठी हा दर ब-वर्ग नगरपरिषदेपेक्षा जास्त आहे.

५.१६५ खर्चाची वरील वर्गवारी लक्षात घेता नगरपरिषदांनी १९९०-९१ व १९९४-९५ या दोन वर्षांच्या कालावधीत वेगवेगळ्या बाबीवर केलेल्या खर्चाचा तपशील खालील तक्ता क्रमांक ५.४३ मध्ये दिला आहे. (आकृती ९ पहावी).

तक्ता क्रमांक ५.४३

**नगरपरिषदांचा बाबवार महसुली खर्च**

(दरडोई खर्च रुपयांत)

| बाब | वर्ष | नगरपरिषदा | | |
|---|---|---|---|---|
| | | अ दरडोई खर्च | ब दरडोई खर्च | क दरडोई खर्च |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. सामान्य प्रशासन व करवसुली खर्च | १९९०-९१ | ३४ | ४२ | ४७ |
| | १९९४-९५ | ६४ | ७३ | ७९ |
| | | (१२.७६) | (१७.६३) | (२३.१७) |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २. शिक्षण व ग्रंथालये. | १९९०-९१<br>१९९४-९५ | ५३<br>४२<br>(८.३५) | ४७<br>४७<br>(११.२६) | ३९<br>४१<br>(१२.०४) |
| ३. पाणीपुरवठा | १९९०-९१<br>१९९४-९५ | ३३<br>६८<br>(१३.६२) | ३५<br>६८<br>(१६.४३) | २७<br>५०<br>(१४.५०) |
| ४. सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय मदत. | १९९०-९१<br>१९९४-९५ | २५<br>४७<br>(९.४०) | १७<br>२९<br>(७.०९) | ९<br>१५<br>(४.५३) |
| ५. स्वच्छता रस्ते सफाई. गटारे व जलनिस्सारण. | १९९०-९१<br>१९९४-९५ | ४१<br>७५<br>(१५.४) | ४४<br>७७<br>(१८.४९) | ३३<br>५८<br>(१६.९८) |
| ६. रस्ते, इमारती पूल व सार्वजनिक दिवाबत्ती. | १९९०-९१<br>१९९४-९५ | ४७<br>१०६<br>(२१.२१) | ३०<br>५२<br>(१२.५३) | २४<br>३०<br>(११.४८) |
| ७. इतर. | १९९०-९१<br>१९९४-९५ | ५३<br>९८<br>(१९.६३) | ४२<br>६९<br>(१६.५८) | ३९<br>५९<br>(१७.३०) |
| एकूण .. | १९९०-९१<br>१९९४-९५ | २८६<br>४९८<br>(१००) | २५७<br>४१५<br>(१००) | २१७<br>३४२<br>(१००) |

(कंसातील आकडे १९९४-९५ मधील एकूण खर्चाची टक्केवारी दाखवितात.)


५.१६६ वरील आकडेवारीवरून असे दिसून येईल की, १९९०-९१ च्या तुलनेत १९९४-९५ मध्ये अ, ब, व क वर्ग नगरपरिषदांच्या सर्वच बाबीवरील खर्चामध्ये वाढ झाली आहे. काही नगरपरिषदा क्षेत्रातील प्राथमिक शाळांचा कारभार जिल्ह्यातील शिक्षण मंडळाकडे सोपविण्यात आल्यामुळे शिक्षकांचा पगार इत्यादींचा खर्च संबंधित मंडळाकडून होत असतो. त्यामुळे शिक्षणावरील खर्चात वाढ झाल्याचे आढळून येत नाही.


१९९४-९५ या वर्षातील एकूण खर्चाच्या प्रमाणांत निरनिराळ्या बाबीवरील केलेल्या खर्चाची टक्केवारी तक्ता क्रमांक ५.४३ मध्ये नमूद केली आहे. परंतु याच बरोबर प्रत्येक वर्गातील नगरपरिषदांच्या विविध बाबीवर केलेल्या दरडोई खर्चाचा स्वतंत्रपणे विचार करणेही उचित ठरेल.


५.१६७ या संदर्भात उपलब्ध आकडेवारीचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, प्रत्येक नगरपरिषद वर्गात नगरपरिषदांनी केलेल्या खर्चाचे प्राधान्य वेगवेगळे आहे. या नगरपरिषदांची वेगवेगळी परिस्थिती असल्याने, त्यांचे प्रश्न व अडचणी, कामाची निकड सारख्याच असण्याची शक्यता नाही. त्यामुळे ज्या निकडीच्या बाबीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे त्या बाबींना प्राधान्य देऊन नगरपरिषदांनी खर्च केला असे वरवर तरी दिसून येते. प्रत्येक नगरपरिषदांचा स्वतंत्रपणे विचार करणे येथे शक्य नसल्याने वर्गनिहाय खर्चाचा विचार केला असता खालील परिस्थिती आढळून आली.

आकृती क्रमांक ९

# नगरपरिषदांचा बाबवार महसूली खर्च



५.१६८ अ-वर्ग नगरपरिषदांचे बाबत प्राधान्यानुसार खर्चाचा क्रम (१) रस्ते व इमारती, (२) स्वच्छता व साफसफाई, (३) पाणीपुरवठा व (४) सामान्य प्रशासन इ. असा आहे. हाच क्रम ब-वर्ग नगरपरिषदांच्या बाबत (१) स्वच्छता व रस्ते सफाई, (२) सामान्य प्रशासन, (३) पाणीपुरवठा, (४) रस्ते व इमारती असा आहे. तर क-वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत मात्र सामान्य प्रशासनावरील खर्च प्रथम क्रमांकावर असून दुसऱ्या क्रमांकावर स्वच्छता. रस्ते सफाई व त्यानंतर पाणीपुरवठा इ. चा क्रम लागतो. सामान्य प्रशासनावरील एकूण दरडोई खर्च सर्वच नगरपरिषदांचे बाबतीत जास्त असल्याचे दिसते. विशेष म्हणजे सार्वजनिक आरोग्य या महत्त्वाच्या बाबीवरील खर्च विचारांत घेतल्यास, त्याकडे विशेष असे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. उलट कांही नगरपरिषदा या बाबीवर कांहीहीं खर्च करीत नाही असे दिसून आले आहे. नगरपरिषदांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतील **नागरी जीवनाशी निगडीत असलेल्या अत्यावश्यक सेवांचा प्राधान्याने विचार करून त्या सेवा व सुविधा पुरविण्यासंदर्भात योग्य ते कार्यक्रम राबविले पाहिजे.**

५.१६९ ***महसुली उत्पन्न व खर्चाचे प्रमाण.***—नगरपरिषदांचे महसुली उत्पन्न व महसुली खर्चाचा उहापोह मागील परिच्छेदात केला आहे. तक्ता क्रमांक ५.४४ मध्ये या संस्थांच्या महसुली खर्चाचे एकूण महसुली उत्पन्नाशी प्रमाण दाखविले आहे —

तक्ता क्रमांक ५.४४

**महसुली खर्चाची महसुली उत्पन्नाशी टक्केवारी**

| नगरपरिषद | १९९०-९१ (टक्के) | १९९४-९५ (टक्के) |
|---|---|---|
| अ-वर्ग | ८३ | ८४ |
| ब-वर्ग | ९० | ७० |
| क-वर्ग | ९५ | ९० |

सर्वच स्थानिक नागरी संस्थांचे एकूण महसूली उत्पन्न महसूली खर्चापेक्षा जास्त आहे. नागरी स्थानिक संस्थांच्या संबंधित अधिनियमातील तरतदीनुसार या नागरी संस्थांनी त्यांची वार्षिक अंदाजपत्रके तयार करतांना ती तुटींची असू नयेत अशी बंधनकारक तरतूद आहे. कायद्यातील या तरतुदीमुळे सर्वच नागरी संस्थांचा महसूली खर्च हा महसूली उत्पन्नापेक्षा कमी आहे. या महसूली उत्पन्नातील आधिक्य नागरी संस्थांना त्यांच्या क्षेत्रातील भांडवली खर्चासाठी वापरता येते. गेल्या ५ वर्षातील माहिती विचारात घेता महसूली उत्पन्नातील आधिक्यात दरवर्षी अल्पशी वाढ झालेली आहे. ही बाब तक्ता क्रमांक ५.४४ मधील खर्चाच्या टक्केवारीवरून दिसते. याचे प्रामुख्याने कारण असे की जकातीच्या उत्पन्नात वाढ मालमत्तांचे फेरमूल्यांकन केल्याने मालमत्ता करात झालेली वाढ तसेच शासकीय अनुदानामधील वाढ हे आहे. असे असले तरी नागरी संस्थांचा स्वतंत्रपणे विचार केल्यास काही नागरी संस्थांच्या बाबतीत मात्र महसुली खर्च हा महसुली उत्पन्नापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. हा जादा खर्च या नागरी संस्थां त्यांच्याकडील उपलब्ध प्रारंभिक शिल्लक, अगाऊ अनामत रकमा, राखीव निधीतील शिल्लक रकमा तसेच काही प्रकरणांत शासनाकडून वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या रकमेतून भागवितात.

५.१७० नगरपरिषदांचा महसुली खर्च हा प्रामुख्याने त्यांच्या क्षेत्रात ज्या मुलभूत अत्यावश्यक सेवा-सुविधा पुरवावयाच्या आहे त्या नियमितपणे चालू ठेवण्यासाठी केला जातो. शिवाय ज्या सेवा-सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती याचाही या महसूली खर्चात समावेश होतो. विविध प्रकारच्या सेवा पुरविण्यासाठी कोणते प्रमाण योग्य आहे त्या बाबतचे सर्वसाधारण निकष पाणीपुरवठ्या व्यतिरिक्त अद्याप तरी ठरविता आलेले नहीत. या निकषाच्या बाबतीत वेगवेगळ्या अभ्यासगटांचे वेगवेगळे मत असून निकषाबाबत अद्याप तरी एकमत झालेले नाही. सेवा-सुविधा पूरविण्याबाबतच्या निकषाबाबतची मतभिन्नता विचारात घेता कोणत्या बाबीवर किती खर्च करावा अथवा किती दरडोई खर्च अपेक्षित आहे हे ठरविणे केवळ अशक्य आहे.



एच ४०९४-८

५.१७१ महसूली खर्च व भांडवली खर्च याबाबत लेखासंहिते मधील व्याख्या स्पष्ट असल्या तरी काही अ-वर्ग नगरपालिका वगळल्यास या खर्चातील भेद तसेच विविध बाबींवर होणाऱ्या खर्चाच्या वर्गीकरणाबाबत विशेष अशी जाण संबंधित कर्मचाऱ्यांना नसल्याने महसूली खर्च आणि भांडवली खर्चामध्ये वर्गीकरण तसेच योजनेतर व योजनांतर्गत बाबींवर प्राप्त झालेले उत्पन्न व त्यावर केलेला खर्च यांतील फरक लक्षांत न घेता सरसकट वर्गीकरण केले जाते. त्यामुळे योजनांतर्गत (प्लॅन) योजनेवरील खर्च महसूली खर्च म्हणून दाखविला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५.१७२ ***नगरपरिषदांचा पाणीपुरवठ्यावरील खर्च व उत्पन्न.***–तक्ता क्रमांक ५.४३ मध्ये पाणीपुरवठ्यावरील प्रत्यक्ष केलेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. परंतु त्यावरून वर्षासाठी किती खर्च झाला याचा अंदाज घेता येत नाही. तेव्हा नगरपरिषदांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठ्यासाठी १९९४-९५ मध्ये केलेला खर्च (वर्षासाठीचा प्रत्यक्ष खर्च व त्या वर्षासाठीची थकबाकी धरून) तसेच त्यापासूनचे वर्षाचे उत्पन्न याबाबतची गोळा केलेली आकडेवारी खालील तक्ता क्रमांक ५.४५ मध्ये दिली आहे.—

तक्ता क्रमांक ५.४५

**नगरपरिषदांचा पाणीपुरवठ्यावरील खर्च व उत्पन्न**

(रुपये लाखात)

| बाब | नगरपालिका वर्ग | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| अ– | | | | |
| १ पाणी खरेदी .. | २४५१ | १०१९ | ३०५ | ३७७५ |
| २ वीज खर्च .. | ९६२ | ९७० | ९१८ | २८४९ |
| ३ निर्जंतूकीकरण .. | २१९ | ११७ | १७४ | ५१० |
| ४ देखभाल दुरूस्ती .. | ३९९ | ५८३ | ३२२ | १३०२ |
| ५ आस्थापना खर्च .. | ५६६ | ४२६ | ४९२ | १४८४ |
| ६ इतर .. | ४२८ | २५४ | २१९ | ९०१ |
| एकूण खर्च .. | ५०२४ | ३३६८ | २४३० | १०८२३ |
| ब) उत्पन्न – | | | | |
| १ पाणीपट्टीची वार्षिक मागणी .. | १६५९ | ९०९ | ७२१ | ३२८९ |
| २ वार्षिक मागणीची खर्चाशी टक्केवारी .. | ३३ | २७ | ३० | ३०.४ |
| क) | | | | |
| १ तूट .. | ३३६५ | २४६० | १७०९ | ७५३४ |
| २ तुटीची एकूण खर्चाशी टक्केवारी .. | ६७ | ७३ | ७० | ६९.६ |

पाणीपुरवठ्याच्या योजनांचा भांडवली खर्च फारच मोठा असून तो नगरपरिषदांच्या आर्थिक कुवतीबाहेरचा आहे. बऱ्याच नगरपरिषदा महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसःरण मंडळ किंवा पाटबंधारे विभाग किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी विकत घेऊन ते नागरिकांना पूरवितात. काही संस्थांनी मात्र त्यांच्या स्वतःच्या पाणीपुरवठा योजना राबविल्या आहेत. काही पाणीपुरवठ्याच्या योजना नगरपरिषदेचे वतीने महाराष्ट्र पाणीपुरवठा व जल निस्सःरण मंडळाने पुर्ण केल्या आहेत परंतु अनेक नगरपरिषदा या योजना स्वतःच्या ताब्यात घेण्यास तयार नाहीत. पाणीपुरवठ्यावर होणारा खर्च बघितल्यास सर्व नगरपरिषदांचा पाणी खरेदी व वीजेवरील खर्च सर्वाधिक असून त्याचे एकूण खर्चाशी प्रमाण अनुक्रमे ३४.९ टक्के व २६.३ टक्के आहे. ' अ ' वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत मात्र या खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ४८.८ व १९.१ टक्के तर ' ब ' वर्गासाठी ३०.३ व २८.८ टक्के आहे. ' क ' वर्ग नगरपरिषदांचे बाबतीत पाणी खरेदी खर्च कमी आहे. मात्र वीजेवरील खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण ३७.८ टक्के म्हणजे सर्वाधिक आहे.

५.१७३ पाणीपुरवठ्यावर होणाऱ्या खर्चाचे तुलनेत या बाबीपासून मिळणारे उत्पन्न फारच अल्प आहे व त्यातून एकूण खर्चाचा ३० टक्के एवढाच खर्च भरून निघतो. ' अ ' वर्गापेक्षा ' ब ' व ' क ' वर्गातील उत्पन्नाची परिस्थिती जास्त गंभीर आहे. काही नगरपरिषदा पाणीपुरवठ्यासाठी मिटरद्वारे आकारणी करतात तर काहींनी घरगुती वापरासाठी नळाच्या आकारावर मासिक/वार्षिक दर नश्चित केले आहेत. हे पाण्याचे दर बरेच कमी व कालबाह्य असून त्यात सुधारणा केल्याशिवाय या उत्पन्नांत वाढ होऊ शकत नाही.

### भांडवली उत्पन्न

५.१७४ नागरी क्षेत्रात विविध प्रयोजनासाठी करावा लागणारा भांडवली खर्च उदा. पाणीपुरवठा योजना, व्यापारी संकुले, शाळांच्या इमारती, दवाखान्याच्या इमारती, गटार व मलनिसःरण योजना, अग्नीशमन योजना इत्यादी फारच मोठा असल्याने व तो खर्च महसुली उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक निधितून करणे शक्य नसल्याने नागरी संस्थांना शासनाकडून किंवा वित्तिय संस्थांकडून (जागतिक बँक, आयुर्विमा महामंडळ, हुडको इत्यादी) कर्जे/मदत घेऊन हा खर्च करावा लागतो. नागरी संस्थांनी १९९०-९१ ते १९९४-९५ या पाच वर्षाच्या कालावधीत घेतलेली कर्जे खालील तक्त्यात दिली आहे. राज्य शासनाच्या ज्या योजना नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रात संबंधित नागरी संस्थांमार्फत राबविल्या जातात त्या योजनांसाठी शासनाकडून योजना/आकृतीबंधानुसार योजनांतर्गत अनुदाने दिली जातात. या योजनांतर्गत मिळणाऱ्या अनुदानाचा समावेश भांडवली उत्पन्नात केला आहे. तसेच शासनाच्या काही योजनांसाठी वित्तिय सहाय्य नागरी संथांना दिले जाते त्यातील काही भाग कर्जरुपाने तर काही भाग अनुदानरुपाने नगरपरिषदांना दिला जातो. अनुदानाचाही समावेश भांडवली उत्पन्नात केला आहे. तक्ता क्रमांक ५.४६ मध्ये नागरी संस्थांना शासन, वित्तिय संस्था तसेच योजनांतर्गत योजनांसाठी प्राप्त झालेली अनुदाने याचा तपशील दिला आहे.—

तक्त क्रमांक ५.४६

**नागरी संस्थांचे भांडवली उत्पन्न**

(रुपये कोटीत)

| नगर-परिषदा | वर्ष | | शासकीय | | वित्तिय संस्था कडून कर्ज | एकूण (३+४+५) | योजनां-अंतर्गत अनुदाने | एकूण भांडवली उत्पन्न (६+७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कर्ज | अनुदान | | | | |
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| अ-वर्ग | १९९०-९१ | .. | १.८१ | ०.७० | ७.९९ | १०.५० | ३.८४ | १४.३४ |
| | १९९१-९२ | .. | २.२७ | १.०० | ८.८९ | १२.१६ | ५.०७ | १७.२३ |
| | १९९२-९३ | .. | ३.५७ | ०.६१ | ११.५४ | १५.७३ | ४.१५ | १९.८८ |
| | १९९३-९४ | .. | २.९१ | १.१६ | ३.७२ | ७.८० | ४.२४ | १२.०४ |
| | १९९४-९५ | .. | ३.८१ | ०.७४ | ६.२३ | १०.८६ | ५.७२ | १६.५८ |

| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब-वर्ग | १९९०-९१ | .. | १.७० | १.०८ | २.९० | ५.६८ | २.९६ | ८.६४ |
| | १९९१-९२ | .. | २.१३ | २.८६ | २.२४ | ७.२४ | ४.७७ | १२.०१ |
| | १९९२-९३ | .. | १.७९ | १.५४ | ३.८३ | ७.१६ | ३.७४ | १०.९० |
| | १९९३-९४ | .. | २.८८ | ३.०३ | ३.९० | ९.८१ | २.८९ | १२.७० |
| | १९९४-९५ | .. | ३.०८ | १.७९ | ०.५९ | ५.४६ | ३.९८ | ९.४४ |
| क-वर्ग | १९९०-९१ | .. | ३.७० | १.४६ | १.३५ | ६.५१ | ६.२४ | १२.७५ |
| | १९९१-९२ | .. | ३.८२ | २.३२ | १.७० | ७.८४ | ९.९९ | १७.८३ |
| | १९९२-९३ | .. | २.७९ | १.७९ | १.५३ | ६.११ | ९.८८ | १५.९९ |
| | १९९३-९४ | .. | ३.०० | २.२९ | २.१४ | ७.४३ | १०.०६ | १७.४९ |
| | १९९४-९५ | .. | ४.१५ | २.६५ | १.७६ | ८.५६ | ९.३६ | १७.९२ |

एकूण भांडवली उत्पन्नात अ-वर्ग नगरपरिषदांचे बाबतीत कर्जाचे प्रमाण जास्त असल्याचे तर " ब " व " क " वर्गासाठी ते प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. भांडवली उत्पन्न हे एकूण महसूली उत्पन्नाच्या तुलनेत फारच कमी आहे. भांडवली खर्चाचा काही भाग महसूली उत्पन्नातून भागवला जातो. त्यामुळे त्या सर्वाचा महसूली व भांडवली उत्पन्न व खर्च असा एकत्रितपणे विचार करावा लागेल.

५.१७५. ***नगरपरिषदांची कर्ज उभारणी व कर्जाची परतफेड.***—नगरपरिषदांनी विविध प्रयोजनांसाठी जी कर्जे शासनाकडून किंवा इतर वित्तीय संस्थांकडून घेतली ती कर्जे कोणत्या प्रयोजनासाठी घेतली त्याची माहिती खालील तक्ता क्र. ५.४७ मध्ये दिली आहे :—

तक्ता क्रमांक : ५.४७

**नगरपरिषदांच्या प्रयोजननिहाय घेतलेल्या कर्जाची दिनांक ३१ मार्च १९९५ ची स्थिती**

(रुपये कोटीत)

| कर्ज घेण्याचे प्रयोजन | | नगरपरिषदा | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
| १. पाणीपुरवठा | .. | ७१.५९ | ३५.२० | १५.८८ | १२२.६७ |
| २. मल व जलनिःसारण | .. | १७.२२ | २.५३ | २.६६ | २२.४१ |
| ३. रस्ते बांधणी | .. | ११.५३ | २२.४५ | ३.५१ | ३७.४९ |
| ४. इमारती | .. | १३.६७ | १०.४५ | १४.४३ | ३८.५५ |
| ५. अग्नीशमन सेवा | .. | १.३५ | २.३१ | २.९० | ६.५६ |
| ६. इतर | .. | ८.९४ | १२.७२ | १०.३१ | ३१.९७ |
| एकूण | .. | १२४.३० | ८५.६५ | ४९.७४ | २५९.६५ |

ACADEMY OF DEVELOP

ज्या प्रयोजनासाठी कर्जे घेतली आहेत त्यात प्रामुख्याने पाणीपुरवठ्यासाठी घेतलेल्या कर्जाचा भाग मोठा आहे. त्यानंतर इमारती व रस्ते बांधणी यासाठी घेतलेल्या कर्जाचा क्रम लागतो. इतर बाबींसाठी घेतलेल्या कर्जाची रक्कम मोठी आहे. ही कर्जे प्रामुख्याने गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम, कमी खर्चाची स्वच्छता योजना, नागरी हिताची भांडवली बांधकामे, वाहने खरेदी करण्यासाठी एकात्मिक विकास योजनांची कामे, पोहण्याचे तलाव बांधणे, व्यापारी संकुले इ. बहुउद्देशीय प्रयोजनांसाठी तक्ता क्र. ५.४८ मध्ये दाखविल्याप्रमाणे घेतली आहेत.

तक्ता क्रमांक : ५.४८

**नगरपरिषदांनी घेतलेल्या कर्जाचा हप्ता व परतफेड इत्यादीची**
**दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीची स्थिती**

(रुपये लाखात)

| तपशील | नगरपरिषदा | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. एकूण घेतलेले कर्ज .. | १२४३० | ८५६५ | ४९७४ | २५९६५ |
| २. ३१ मार्च १९९५ पर्यंत केलेल्या कर्जाची परतफेड– .. | | | | |
| अ–मुद्दल .. | २४५५ | ८८५ | ८२१ | ४१६२ |
| ब–व्याज .. | ३३८३ | १८०५ | ११७० | ६३५८ |
| ३. कर्जफेडीचे वार्षिक दायित्त्व .. | ६८१ | ४५० | ३९६ | १५२७ |
| ४. दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीची कर्जबाकी | ९९७५ | ७६७९ | ४०३४ | २१६८८ |
| ५. दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी कर्जाची थकबाकी– | | | | |
| अ–मुद्दल .. | ४९१२ | ४०१ | ३४६ | ५६६० |
| ब–व्याज .. | १६७६ | ५५६ | ४४२ | २६७५ |

वर नमूद केलेल्या माहितीमधील बाब क्र. ३ ची (कर्जफेडीचे वार्षिक दायित्त्व)माहिती अंदाजित आहे. या कर्जाची परतफेड जरी सुरू झाली नसली तरी परतफेड सुरू झाल्यास त्या कर्जापोटी वर्षाला या नागरी संस्थांना किती रक्कम लागेल याचा अंदाज घेतला आहे व वार्षिक कर्जफेडीचे दायित्त्व काढण्याचा प्रयत्न केला आहे. नगरपरिषदांच्या बाबतीत मात्र कर्जाची थकबाकी व्याजासह फारच मोठी असल्याचे दिसून येते. सर्वच नगरपरिषदांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने या संस्था विहित केलेले कर्जफेडीचे हप्ते वेळेवर व नियमितपणे देऊ शकत नाहीत हेच यावरून दिसते.

५.१७६. **नागरी संस्थांचे एकूण महसुली व भांडवली तसेच दरडोई उत्पन्न व खर्च.**—महसुली उत्पन्न व खर्च, तसेच भाडवली उत्पन्न या बाबतचा उहापोह वरील परिच्छेदात केला आहे. त्याच बरोबर या नागरी संस्थांचे दरडोई महसुली तसेच भांडवली उत्पन्न व खर्च याचा आढावा घेणेही महत्त्वाचे आहे. तक्ता क्रमांक ५.४९ मध्ये महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाची १९९०–९१ ते १९९४-९५ या ५ वर्षांची वर्गनिहाय माहिती दिली आहे.

तक्ता क्रमांक ५.४९

## नगरपरिषदांचे महसुली व भांडवली उत्पन्न तसेच खर्चाचा तपशील

(एकूण उत्पन्न/खर्च = रु. लाखात)

| वर्ग | वर्ष | | उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महसुली | भांडवली | एकूण | महसुली | भांडवली | एकूण |
| अ-वर्ग | १९९०-९१ | .. | १६,१५० | १,४३४ | १७५८४ | १३,४४५ | ३,४५४ | १६,८९९ |
| | | | (३४३) | (३०) | (३७३) | (२८६) | (७३) | (३५९) |
| | १९९४-९५ | .. | २८,१३५ | १,६५८ | २९,७९३ | २३,४५६ | ५,५४१ | २८,९९७ |
| | | | (५९८) | (३५) | (६३३) | (४९६) | (११८) | (६१६) |
| ब-वर्ग | १९९०-९१ | .. | ८,२४२ | ८६४ | ९,१०६ | ७,४१२ | १,५४५ | ८,९५७ |
| | | | (२८६) | (३०) | (३१६) | (२५७) | (५४) | (३११) |
| | १९९४-९५ | .. | १४,९०५ | ९४४ | १५,८४९ | ११,९४७ | ३,४२७ | १५३७५ |
| | | | (५१७) | (३३) | (५५०) | (४१५) | (११९) | (५३३) |
| क-वर्ग | १९९०-९१ | .. | ७,६२१ | १,२७५ | ८,८९६ | ७,२१६ | १,६९६ | ८,९१२ |
| | | | (२२९) | (३९) | (२६८) | (२१७) | (५१) | (२६८) |
| | १९९४-९५ | .. | १२,५१२ | १,७९२ | १४,३०४ | ११,३४५ | २,३६६ | १३,७१२ |
| | | | (३७७) | (५४) | (४३१) | (३४२) | (७१) | (४१३) |

(भांडवली उत्पन्नात योजनांतर्गत अनुदानाचा समावेश आहे.)
(कंसातील आकडे दरडोई उत्पन्न/खर्च दाखवितात.)

५.१७७. नागरी संस्थांच्या सर्वच वर्गात मागील ५ वर्षात एकूण उत्पन्न व खर्चात (महसुली व भांडवली धरून) सतत वाढ झाल्याचे वरील माहितीवरून दिसते. काही वर्षामध्ये मात्र एकूण खर्च एकूण उत्पन्नापेक्षा थोडा जास्त असल्याचेही दिसून आले आहे. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असता कामा नये हे सर्वमान्य असे तत्व आहे. परंतु हा उत्पन्नापेक्षा जास्त झालेला खर्च या नगरपरिषदा एकतर त्यांच्या प्रारंभीच्या शिलकेतून किंवा ही रक्कमही कमी पडत असल्यास नगरपरिषदांकडे विविध प्रयोजनासाठी ज्या अनामत व ठेवीपोटी रकमा जमा होतात त्यातून व क्वचित प्रसंगी जे वेगवेगळे निधी ठेवलेले असतात त्यातून तात्पुरती उचल घेऊन भागवितात. अशाप्रकारे त्यांच्याकडे जमा होणाऱ्या ठेवी व अनामतीच्या रकमेतून उचल घेऊन खर्च केला असल्यास त्याप्रमाणे त्याच्या नोंदी त्यांनी लेख्यामध्ये घेणे आवश्यक होते परंतु तशा नोंदी केल्याचे दिसत नाही ही एक लेखाविषयक त्रुटी आहे.

### गिरीस्थान नगरपरिषदा

५.१७८. गिरीस्थाने व थंड हवेची ठिकाणे असलेल्या नगरपरिषदा.—महाराष्ट्र राज्यात खालील तक्ता क्रमांक ५.५० मध्ये दाखविलेल्या ६ नगरपरिषदा गिरीस्थाने किंवा थंड हवेची ठिकाणे म्हणून अस्तित्वात आहेत—

तक्ता क्रमांक ५.५०

| अनुक्रमांक | गिरीस्थान नगरपालिकांचे नाव | | जिल्हा | लोकसंख्या (१९९१ च्या जनगणनेनुसार) | पर्यटकांची संख्या (१९९४-९५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | माथेरान | .. | रायगड | ४,७०८ | २,००,००० |
| २ | पांचगणी | .... | सातारा | १०,५६९ | १,८०,००० |
| ३ | महाबळेश्वर | .. | सातारा | १०,५६४ | ७,००,००० |
| ४ | पन्हाळा | .. | कोल्हापूर | २,९६८ | उपलब्ध नाही |
| ५ | खुलदाबाद | .. | औरंगाबाद | ९,१९२ | उपलब्ध नाही |
| ६ | चिखलदरा | .. | अमरावती | ३,०८१ | ८५,८३३ |

५.१७९. या गिरीस्थान नगरपरिषदा क-वर्गात मोडतात. ही गिरीस्थाने थंड हवेची, प्रेक्षणीय व निसर्गरम्य स्थळे म्हणून राज्यात प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी पर्यटकांची सतत वर्दळ सुरू असते. या ठिकाणच्या नगरपरिषदा व इतर नगरपरिषदा यांच्या कार्ये व कर्तव्यामध्ये अधिनियमाप्रमाणे कोणताही फरक नसला तरी या गिरीस्थानांचे भौगोलिक व पर्यटनाचे दृष्टिकोनातून असलेले महत्त्व विचारात घेता या ठिकाणाच्या नगरपरिषदांवर त्यांच्या कार्यक्षेत्रात पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या सेवा सुविधा उदा. सततचा पाणीपुरवठा, परिसर स्वच्छ ठेवणे, रस्त्यांची निगा, दिवाबत्तीची सोय, आरोग्य, पर्यटन स्थळांची व्यवस्था, बाग-बगिच्यांची निगा राखून ती आकर्षक करणे, पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था इ. नियमितपणे चालू राहतील, या दृष्टीकोनातून त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कार्यक्षम व्यवस्था करण्याची विशेष अशी जबाबदारी आहे. या विशिष्ट जबाबदाऱ्या लक्षांत घेता या गिरीस्थान नगरपरिषदांचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

५.१८०. ***गिरीस्थान नगरपरिषदांचे उत्पन्न.***—गिरीस्थान नगरपरिषदांची १९९३-९४ व १९९४-९५ या दोन वर्षाची विविध साधनांपासूनच्या दरडोई उत्पन्नाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे. क-वर्ग नगरपरिषदांच्या दरडोई उत्पन्नाचा तपशिलही तुलना करण्यासाठी तक्ता क्रमांक ५.५१ मध्ये दाखविला आहे.

तक्ता क्रमाक ५.५१

**गिरीस्थान नगरपरिषदांचे १९९३-९४ व १९९४-९५ विविध साधनापासूनचे दरडोई उत्पन्न**

| उत्पन्नाच्या बाबी | वर्ष | नगरपरिषदा | | | | | | राज्यातील क-वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माथेरान | पांचगणी | महाबळेश्वर | पन्हाळा | खुलदाबाद | चिखलदरा | न. प. चे. दरडोई उत्पन्न |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| कर उत्पन्न— | | | | | | | | |
| (१) मालमत्ता कर | १९९३-९४ | ७६ (१३) | १०९ (३३.०) | १६३ (२३.२) | ४६ (१८.८) | २३ (२४.३) | १८२ (५३.३) | ३३ (१९.४) |
| | १९९४-९५ | ७५ (११.४) | १५४ (३५.७) | १६८ (२०.२) | ५१ (१९.३) | १९ (१८.७) | २३४ (५३.८) | ३७ (१७.९) |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२) जकात कर | १९९३-९४ | १८४ | १५५ | ३०८ | ९४ | ५६ | ८३ | १२५ |
| | | (३१.४) | (४७.०) | (४३.८) | (३८.५) | (५९.१) | (२४.३) | (७३.७) |
| | १९९४-९५ | २३४ | १९६ | ३९७ | १०१ | ६० | ९१ | १५६ |
| | | (३५.४) | (४५.६) | (४७.८) | (३८.६) | (५७.८) | (२०.८) | (७५.६) |
| (३) इतर कर | १९९३-९४ | ३२४ | ६६ | २३३ | १०४ | १६ | ७७ | १२ |
| | | (५५.५) | (२०.०) | (३३.१) | (४२.७) | (१६.६) | (२२.४) | (७.०) |
| | १९९४-९५ | ३५२ | ८१ | २६६ | १११ | २४ | ११० | १३ |
| | | (५३.२) | (१८.८) | (३२.०) | (४२.२) | (२३.५) | (२५.३) | (६.५) |
| (४) एकूण कर | १९९३-९४ | ५८४ | ३३० | ७०४ | २४४ | ९५ | ३४२ | १६९ |
| उत्पन्न | १९९४-९५ | ६६१ | ४३० | ८३१ | २६२ | १०४ | ४३४ | २०७ |
| (५) करेतर व इतर | १९९३-९४ | १९१ | ९७ | ४९१ | १५८ | ३९ | १६२ | ५१ |
| उत्पन्न | १९९४-९५ | १८७ | ४९ | ५०४ | २०७ | ५८ | १९१ | ५३ |
| (६) शासकीय | १९९३-९४ | .. | १ | ३ | .. | १ | १ | ४ |
| करातील हिस्सा | १९९४-९५ | .. | २ | ४ | .. | १ | .. | २ |
| (७) अनुदाने | १९९३-९४ | २४८ | १४८ | २१५ | २५१ | ७१ | १४१ | १२४ |
| | १९९४-९५ | २५८ | १३० | २८२ | २५२ | १२१ | २०५ | ११५ |
| एकूण .. | १९९३-९४ | १,०२४ | ५७६ | १,४१४ | ६५३ | २०७ | ६४६ | ३४८ |
| | १९९४-९५ | १,१०७ | ६११ | १,६२१ | ७२० | २८४ | ८३१ | ३७७ |

(कंसातील आकडे एकूण कर उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.)

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, खुलदाबाद ही गिरीस्थान नगरपरीषद वगळता सर्व गिरिस्थान नगरपरिषदांचे कर व करेतर बाबीपासूनचे दरडोई उत्पन्न हे राज्यातील सर्व क-वर्ग नगरपरिषदांच्या दरडोई उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

५.१८१. शासकीय करातील हिस्सा म्हणून करमणूक करापोटी केवळ महाबळेश्वर, पांचगणी व खुलदाबाद या नगरपरिषदांनाच उत्पन्न मिळते. तर माथेरान, चिखलदरा व पन्हाळा या नगरपरिषदांना गेल्या पांच वर्षात या करातील हिश्यापोटी काहीही उत्पन्न मिळाले नाही.

५.१८२. शासकीय अनुदानाच्या बाबतीत मात्र या गिरिस्थान नगरपरिषदांना इतर क-वर्ग नगरपरिषदांच्या तुलनेत जास्त अनुदान प्राप्त झाल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते.

वरील आकडेवारीवरुन या गिरीस्थान नगरपरिषदांचे सर्वच बाबी पासूनचे उत्पन्न क-वर्ग नगरपरिषदांच्या तुलनेत जास्त आहे असा समज निर्माण होतो. याचे कारण असे की या नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्न काढताना त्यांची स्थानिक लोकसंख्याच विचारांत घेतली आहे. पर्यटकांची कमी जास्त लोकसंख्या विचारात घेतल्यास या नगरपरिषदांचे दरडोई उत्पन्नात बदल होईल. परिणामतः हे दरडोई उत्पन्न कदाचित क वर्ग नगरपरिषदांच्या दरडोई उत्पन्नापेक्षा कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५.१८३. **गिरीस्थान नगरपरिषदांचा खर्च.**–पर्यटकांची सतत मोठ्या प्रमाणात ये-जा असल्याने या नगरपरिषदांवर त्यांच्या कार्यक्षेत्रात आवश्यक त्या त्या सेवासुविधा योग्य त्या प्रमाणात पुरविण्याची व व्यवस्थितपणे चालू ठेवण्याची, त्यात वाढ करण्याची फार मोठी जबाबदारी आहे. या नगरपरिषदांची स्थानिक लोकसंख्या कमी असली तरी पर्यटकांच्या सततच्या येण्यामुळे त्यांची संख्या विचारात घेता या शहरांची लोकसंख्या इतर नगरपरिषदांच्या तुलनेत नेहमीच जास्त असते. खालील तक्ता क्र. ५.५२ मध्ये गिरीस्थान नगरपरिषदांचा १९९३-९४ व १९९४-९५ चा बाबवार दरडोई खर्चाचा तपशील दिला आहे.

तक्ता क्रमांक : ५.५२

**गिरीस्थान नगरपरिषदांचा दरडोई खर्च**

(रुपयांत)

| खर्चाच्या बाबी (१) | वर्ष (२) | माथेरान (३) | पांचगणी (४) | महाबळेश्वर (५) | पन्हाळा (६) | खुलदाबाद (७) | चिखलदरा (८) | राज्यतील सर्व क-वर्ग न. प. (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सामान्य प्रशासन .. | १९९३-९४ | १०८ | ८३ | २३९ | १७१ | ८५ | २१८ | ७० |
| | १९९४-९५ | ९८ | ८४ | २३९ | १८७ | १०५ | २६५ | ७९ |
| २. शिक्षण व ग्रंथालय .. | १९९३-९४ | ६९ | २ | ३१ | .. | ५ | .. | ३९ |
| | १९९४-९५ | १०० | ८ | ३८ | .. | ६ | .. | ४१ |
| ३. पाणीपुरवठा .. | १९९३-९४ | ६७ | .. | ११ | १९ | २ | १० | ५१ |
| | १९९४-९५ | ३६ | ३ | १३ | २२ | ७ | २९ | ५० |
| ४. सार्वजनिक आरोग्य .. | १९९३-९५ | २१५ | ३० | ३८ | १०५ | .. | .. | १३ |
| | १९९४-९५ | २२७ | ५६ | ४० | १३० | .. | .. | १५ |
| ५. स्वच्छता, रस्ते सफाई व गटारे इ. | १९९३-९४ | .. | ६१ | ७० | .. | ५४ | ५४ | ५२ |
| | १९९४-९५ | .. | ६९ | ७७ | .. | ६९ | ५५ | ५८ |
| ६. रस्ते, इमारती व दिवाबत्ती | १९९३-९४ | ३०७ | ३६ | १५७ | २८ | १७२ | ९४ | ३८ |
| | १९९४-९५ | २६५ | ६१ | १३९ | ११८ | १२८ | ११० | ३९ |
| ७. इतर .. | १९९३-९४ | ४३४ | १२४ | २२१ | २१९ | ३२ | ३४२ | ५८ |
| | १९९४-९५ | ४७० | १७२ | २२१ | २६८ | ३५ | ७०८ | ५९ |
| ८. एकूण महसुली खर्च .. | १९९३-९४ | १२०० | ३३५ | ७६६ | ५४३ | ३४९ | ७१८ | ३२० |
| | १९९४-९५ | ११९६ | ४५३ | ७६७ | ७२४ | ३४९ | ११६८ | ३४१ |
| ९. भांडवली खर्च .. | १९९३-९४ | ९२ | ३५९ | २५१ | ४८० | .. | २३७ | ७५ |
| | १९९४-९५ | .. | ३७६ | १७९ | २१९ | .. | ३५२ | ७१ |

या तक्त्यावरुन असे दिसून येईल की या सर्व गिरीस्थान नगरपरिषदांचा पांचगणी व खुलदाबाद या नगरपरिषदा वगळता सर्वच खर्चाच्या बाबीवरील एकूण व दरडोई खर्च क-वर्ग नगरपरिषदांच्या दरडोई खर्चाच्या तुलनेत जास्त आहे.

५.१८४. या नगरपरिषदांची स्थानिक लोकसंख्या कमी आहे. ही वस्तुस्थिती असली तरी प्रवाशांची/पर्यटकांची लोकसंख्या विचारात घेता दरडोई खर्चाचे प्रमाण जास्त आहे असे अनुमान काढणे योग्य होणार नाही. उलट सेवेचा विशिष्ट दर्जा व प्रमाण राखण्याच्या व प्रवाशांना आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून हा दरडोई खर्च कमी आहे असेच म्हणावे लागेल. किंबहुना पर्यटकांची संख्या, त्यात सतत होणारी वाढ यामुळे या नगरपपरिषदांच्या कार्यक्षेत्रात अधिकाधिक सेवा पुरविण्याची नितांत आवश्यकता असून मर्यादित उत्पन्नामुळे त्या सेवा-सुविधा योग्य त्या प्रमाणात पुरविता येत नाहीत, त्यांचा दर्जा व्यवस्थित ठेवला जात नाही, देखभाल दुरुस्तीची कामे वेळेवर व वरचेवर निधीअभावी पूर्ण करता येत नाही, किंवा गरजेनुसार त्यात वाढ करता येत नाही. सद्यःस्थितीत या नगरपरिषदा त्यांचा खर्च त्यांच्या उत्पन्नातूनच पूर्ण करीत असल्या तरी या नगरपरिषदा आर्थिकदृष्ट्या सबळ आहेत असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. या नगरपरिषदांची विशिष्ट स्थिती व या ठिकाणी उद्योग, व्यापार वाढण्यासाठी आवश्यक असलेली परिरिथती नसल्यामुळे या नगरपरिषदांच्या उत्पन्नात प्रयत्न करूनही वाढ होण्याची शक्यता आहे असे वाटत नाही. असे असले तरी **या नागरी संस्थांच्या ज्या सेवासुविधांचा वापर व्यापारी वा औद्योगिक कारणासाठी केला जातो अशा सेवासुविधांसाठी सर्वसाधारण दराने आकारणी न करता वाणिज्यिक दराने आकारणी केली पाहिजे. तसेच ही गिरिस्थाने सुस्थितीत राहण्यासाठी व पर्यटनासाठी अधिक आकर्षक करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना इतर नगरपरिषदांसारखीच वागणूक न देता पर्यटनाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचे राज्याचे धोरण विचारात घेऊन या नगरपरिषदांना आर्थिक मदतीच्या बाबतीत झुकते माप देण्याची आवश्यकता आहे.**

□□

# प्रकरण ६

## वित्त आयोगाची भूमिका व आराखडा

६.१. अनेक शतकांपासून स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था ही भारताच्या अंतर्गत स्वास्थाची आणि अर्थव्यवस्थेची आधार बनून राहिली आहे. परंतु कालौघात बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे विकासोन्मुख भारतातील लक्षावधी खेड्यांत राहणारी ७० टक्के जनता ही आर्थिक आणि सामाजिक विकासापासून वंचित राहिल्याचे जाणवते. तर वाढत्या शहरीकरणाच्या रेट्यामुळे आणि सातत्याने वाढणाऱ्या उपेक्षित वस्त्यांमुळे आपल्या अन्यथा स्वयंपूर्ण सक्षम होऊ शकणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या अर्थसंकल्पातील चणचणीला तोंड देणे अशक्यप्राय होऊन बसलेले दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वंकष लोकशाहीचा विचार करून शहरी भागातील महानगरपालिका आणि नगरपरिषदांबरोबरच ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती असे स्थानिक स्वराज्य संस्थांचे जाळे निर्माण करण्यात आले आणि राज्यांचा पैसा ग्रामीण विभागाकडे वळवून अनेक सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रात तो विशेषत्वाने झाला असला तरी ह्या संस्था स्थानिक स्वराज्य संस्था या संज्ञेस खऱ्या अर्थाने पात्र झाल्या त्या १९९४ साली केलेल्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने. या दुरुस्तीने महत्त्वाचे पाऊल टाकून त्या संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. त्यानुसार राज्याना वित्त आयोग निर्माण करून या संस्थांची आर्थिक आणि प्रशासकीय बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने विचार करण्यास प्रवृत्त केले.

६.२ महाराष्ट्रात वित्त आयोग दिनांक २३ एप्रिल १९९४ रोजी स्थापन झाला. घटनेमधील ७३ व्या व ७४ व्या क्रांतीकारी दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना आजपर्यंत वाटचाल केलेल्या मार्गावर एका महत्त्वाच्या वळणावर आणून ठेवले आहे असे या राज्याच्या पहिल्या वित्त आयोगाला वाटते. हे वळण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक मजबूत आर्थिक पायावर उभे करून अधिक स्वायत्तता आणि आत्मनिर्भतेबरोबरच पारदर्शी व्यवहाराने वेगवान विकासाकडे नेणारे ठरावे असा या घटना दुरुस्तीचा अर्थ पहिल्या वित्त आयोगाला अभिप्रेत आहे. या आयोगाने पुढील अनेक वर्षांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा संघटनात्मक, सक्षम आणि विकासोन्मुख असा पारदर्शी स्वायत्त ढाचा निर्माण होण्यासाठी काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचविणेही अपेक्षित आहे असे आयोगाला वाटते. म्हणूनच आयोगाला नेमून दिलेल्या कार्यकक्षेत राहून आणि राज्याच्या अर्थकारणाच्या मर्यादा लक्षात घेऊनही काही उपाययोजना ज्यांची अंमलबजावणी मागील अनेक वर्षांच्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर थोडी अधिक काटेकोरपणे व्हावी त्याच बरोबर आत्मनिर्भतेसाठी अधिक प्रयत्न करण्यास वाव मिळावा, संस्थांच्या कार्यात आणि योजनांत लोकांचा सहभाग वाढवून आणि त्याच बरोबर त्या प्रयत्नांना राज्याची प्रोत्साहनात्मक जोड मिळावी अशा त्रिस्तरावर आयोगाने आपल्या शिफारशी करण्याचे ठरविले आहे.

६.३ राज्यपालानी आदेश देऊन (वित्त विभागाचे आदेश क्र. एसएफसी-१०९४ सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४) वित्त आयोगाच्या कामाची व्याप्ती निश्चित केली आहे.

६.४ स्थानिक संस्थांना आर्थिक स्त्रोतांचे वाटप करताना आयोगाला स्थानिक संस्थांच्या महसुली जमा आणि योजनेतर व विकासेतर महसुली खर्च यांचे पुढील अंदाज विचारात घेऊन त्यामधील तफावत विचारात घ्यावयाची आहे. हे करताना स्थानिक संस्था त्यांच्या स्वतःच्या आर्थिक स्त्रोतांचा किती प्रमाणात फायदा घेऊ शकतील व राज्य शासनाचा

स्वतःचा योजनेतर बांधील महसुली खर्चही आयोगाला विचारात घ्यावयाचा आहे. हे करण्यासाठी स्थानिक संस्थांनी त्यांचा कारभार व्यवस्थित करणे व नियंत्रित करणे यासाठी उच्च पातळीची आर्थिक शिस्त व प्रशासकीय कार्यक्षमता असणे अपेक्षित आहे. स्थानिक संस्थांना त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने व पूर्णपणे पार पाडणे शक्य व्हावे म्हणून त्यांना आर्थिक स्त्रोत उपलब्ध करून देताना त्यांनी केवळ बाह्य आर्थिक मदतीकडे न पाहता स्वतःच्या आर्थिक स्त्रोतांचा पूर्णपणे उपयोग करून घेतला पाहिजे. स्वायत्त दर्जा व जबाबदारी आणि कार्यक्षम व्यवस्थापन यांचा समन्वय साधला पाहिजे असे असले तरी त्यांच्या अडचणी व समस्यांकडे दुर्लक्ष करून त्यांना त्यांच्या नशिबावर सोडून देता येत नाही.

६.५ स्थानिक स्वराज्य संस्थांचा संबंध काही मूळ नागरी सुविधा आणि सेवांच्या तरतुदींशी असून आता सामाजिक, आर्थिक स्वरूपाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांशी येतो या कर्तव्यांची आर्थिक बाबींची सांगड घातली पाहिजे ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत स्पष्ट भूमिका आहे. कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडताना सध्या अस्तित्वात असलेल्या सुविधा-सेवांची देखभाल व दुरुस्ती करणे, त्या चालू ठेवणे, त्या वाढविणे आणि नवीन सुरू करणे या बाबी उद्भवतात. नवीन सुविधा व सेवा निर्माण करताना नेहमी काही निकषांचा संबंध येतो. उदा. आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी पुरवठा व प्राथमिक शाळा यासाठी भांडवली खर्च लागतो. पंचायती राज संस्थांच्या बाबतीत भांडवली खर्च हा जवळजवळ पूर्णपणे योजनांतर्गत स्वरूपाचा असतो. तर नगरपालिकांच्या बाबतीत त्याचा काही भाग योजनांतर्गत खर्चाचा व काही भाग त्यांच्या महसुली उत्पन्नातील शिलकेचा असतो. अशा परिस्थितीत फक्त योजनेतर वाढ पाहिल्यास संपूर्ण चित्र दिसणार नाही आणि म्हणून त्यांच्या बाबतीत भांडवली खर्चही विचारात घेणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित योजनांतर्गत खर्चाचे प्रक्षेपित अंदाज तयार करणे प्रत्यक्षात कठीण आहे. त्यापैकी एक बाब अशी आहे की, नववी योजना तयार करण्याचे काम नुकतेच सुरू झाले आहे आणि आता राज्य शासनाकडून योजनांचे प्रक्षेपित अंदाज व विविध बाबीं प्राप्त होणे जवळजवळ अशक्य आहे. या कालावधीत राज्याच्या विकासांतर्गत प्रक्रियेत एक महत्त्वाची घटना घडली. ती म्हणजे विभागीय विकास मंडळांची स्थापना. राज्यामध्ये तीन विकास मंडळे स्थापन केलेली आहेत. विकासाच्या स्वरूपाची कामे करणे व राज्यातील विविध विभागांतील असमतोल घालविणे या दृष्टीकोणातूनही ही विकास मंडळे काम करीत आहेत.

६.६ राज्य शासनाने वित्त आयोगाच्या कार्याचा केंद्रीय वित्त आयोगाच्या कार्याच्या दृष्टीकोनातून विचार केलेला आहे. संविधानाच्या अनुच्छेद क्र. २८० अन्वये संविधानाच्या तरतुदीनुसार विभागणी योग्य असलेल्या निव्वळ उत्पन्नांचे केंद्र व राज्य यामध्ये वाटप करणे या बाबीशी केंद्रीय वित्त आयोगाचा संबंध आहे. ते केंद्र शासनाच्या एकत्रित निधीतून राज्यांना देण्यात येणारे सहाय्यक अनुदान नियंत्रित करणारी तत्त्वे ठरविते. तसेच ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे राज्य वित्त आयोगांनी केलेल्या शिफारशींच्या आधारे पंचायती राज संस्था व नगरपालिका यांचे उत्पन्नांचे स्त्रोत अधिक बळकट करण्यासाठी राज्यांचे एकत्रित निधी वाढविणे या बाबीशीही केंद्रीय वित्त आयोगाचा संबंध येतो. घटनेप्रमाणे उपलब्ध असलेल्या उत्पन्नाच्या एकूण निधीतून केंद्र व राज्ये यामध्ये वाटप करण्याबाबतची तत्वे ठरविणे ही केंद्रीय वित्त आयोगाची निश्चित केलेली स्पष्ट भूमिका आहे. दहाव्या वित्त आयोगाच्या अहवालातील प्रकरण २ मधील परिच्छेद क्र. २.२७ मध्ये आयोगाची भूमिका स्पष्टपणे नमूद केलेली आहे. त्याचा उतारा खाली दिला आहे :—

> " आमचे मत असे आहे की, वित्त आयोगाने फक्त योजनेतर महसुली खर्चाच्या बाबी न हाताळता सर्व महसुली लेख्यांच्या बाबी हाताळाव्यात याची स्पष्ट कारणमिमांसा आहे. आमच्या शिफारशींचा कालावधी आठव्या योजनेबरोबर संपत नाही. त्यामुळे या प्रकरणी आणखी गुंतागुंत झाली आहे. योजनेच्या उर्वरित दोन वर्षांसाठी योजनेच्या खर्चाचे मान्य होतील असे प्रक्षेपित अंदाज तयार करणे प्रत्यक्षात कठीण आहे. ही बाब योजना आयोगाच्या प्रतिनिधींनी आमच्या नजरेस आणून दिली होती. बहुतेक राज्यांनी काही अंदाज करण्याचा धोका पत्करलेला नाही. या बंधनाच्या दृष्टीने आम्ही आमचे योजनेतर महसुली लेख्यांचे पुनर्निर्धारण मर्यादित केले आहे."

६.७ राज्य वित्त आयोगाची भूमिका यापेक्षा व्यापक आहे. त्याला स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अनुरूप आर्थिक स्त्रोत उपलब्ध करून द्यावयाचे आहेत, अशी आयोगाची भूमिका आहे.

६.८ योजनेतर व विकासेतर खर्चाबरोबरच योजनांतर्गत व विकासात्मक खर्च यांचा आयोगाच्या कार्यकक्षेत समावेश करण्याबाबत वित्त विभागाशी बराच पत्रव्यवहार झाला. आयोगाचे सुरुवातीपासूनच असे मत आहे की, आयोगाच्या शिफारशींच्या कक्षा पुरेशा विस्तृत असून या सर्व खर्चाचा आयोगाचा कक्षेत समावेश होऊ शकते हे अगदी अलिकडे म्हणजे नोव्हेंबर १९९६ मध्ये वित्त विभागाकडून आलेल्या पत्राने स्विकृत झाले असले तरी वित्त आयोगाने आपल्या कार्यकक्षांच्या मर्यादेत म्हणजे योजनेतर आणि विकासेतर खर्चाच्या बाबतीतच विचार करून आपल्या कामकाजात सातत्य ठेवले आहे.

६.९ ऐतिहासिक संदर्भात व संविधानातील तरतुदीमुळे शासन, पंचायती राज संस्था व नगरपरिषदांच्या कारभारामध्ये प्रभावी भूमिका पार पाडते. ह्या संस्था गठित करणे, त्यांच्या कार्याच्या भौगोलिक क्षेत्रात फेरबदल करणे, त्यांचे संघटन व घडण करणे, निवडणुका घेणे, काही विशिष्ट परिस्थितीत या संस्था विसर्जित करणे, निष्प्रभावित करणे या बाबी त्याच्या कार्यकक्षेत येतात. या संस्थांची कार्ये व जबाबदाऱ्या यावर शासनाची काटेकोर देखरेख व नियंत्रण आहे. काही पदे निर्माण करताना आणि ती पुढे पुढे चालू ठेवण्यासाठी प्रामुख्याने शासनाची संमती घ्यावी लागते. काही मालमत्ता विकत घ्यावयाची असेल अथवा विकायची असेल तर त्यासाठी या संस्थांना शासनाची संमती घ्यावी लागते. कायद्यामध्ये काही दंडनीय तरतुदी आहेत. त्या अन्वये शासन गैरवर्तणुकीबाबत पदाधिकाऱ्यांवर कारवाई करू शकते व संस्थेने केलेले ठराव रद्द करू शकते. काही गोष्टी कराव्यात किंवा करू नयेत याबाबत शासन या संस्थांना आदेश देऊ शकते आणि त्या आदेशांचे पालन करणे त्यांना सक्तीचे आहे. अशा प्रकारचे अधिकार असले तरी या दंडनीय तरतुदींचा व नियंत्रणांचा वापर ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार दिलेल्या स्वायत्ततेच्या तत्वाला बाधा येणार नाही. या दृष्टीकोनातून किमान व्हावा असे आयोगाला वाटते.

६.१० सध्याच्या कायद्यांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी लावण्याचे कर व शुल्क इत्यादीचे प्रकार व दर निश्चित केले आहेत. अनुदान, कर्ज व काही प्रमाणात करांचा वाटा या द्वारे राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थांना सहाय्य करते. आर्थिक बाबतीत जिल्हापरिषदा जवळजवळ पूर्णपणे राज्य शासनावर अवलंबून आहेत. ग्रामपंचायती अंदाजे ४५ टक्के पर्यंत शासकीय अनुदानावर अवलंबून आहेत. नागरी संस्थांच्या बाबतीत राज्य शासन स्वतःच्या उत्पन्नातून महानगरपालिकांना त्यांच्या एकूण साधनसंपत्तीच्या ५ टक्के पासून क वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत ३१ टक्के पर्यंत आर्थिक मदत करते. एकुण नागरी संस्थांचा आर्थिक दर्जा पंचायत राज संस्थांच्या तुलनेत स्वयंपूर्ण आहे. शासनाने स्वतःचे दायित्व संभाळून या स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी विविध प्रकारे आर्थिक सहाय्य करून त्यांचे पोषण केले आहे व त्यांना बळकट करण्याचे व आधार देण्याचे स्तुत्य प्रयत्न केले आहेत. नव्या घटनादुरुस्तीचा हेतू आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून निर्माण झालेल्या आकांक्षा, अपेक्षा पूर्ण होण्याकरिता या प्रयत्नांत अधिक वाढ झाली पाहिजे.

६.११ संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांना संघराज्य पद्धतीमध्ये स्थान दिले आहे. त्यांच्या रचनेचा प्रकार व पद्धती व घडण, स्वतंत्र निवडणुक यंत्रणा तसेच अनुसूची क्रमांक ११ व १२ मध्ये नमूद केलेली त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठरवून दिलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाकडून जे कर, शुल्क, जकात लावले जातात व गोळा केले जातात ते लावण्याचे, ते गोळा करण्याचे, त्यांचे विनियोजन करण्याचे आर्थिक अधिकार राज्य विधानमंडळ या स्थानिक स्वराज्य संस्थांना देते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारामध्ये राज्य शासनाने महत्त्वाची भूमिका करावी अशी जरी संविधानाची दृष्टी असली तरी ह्या संस्था केवळ राज्य शासनाच्या हातातल्या बाहुल्या नसून कार्यांच्या व आर्थिक बाबतीत त्यांना स्वतःचा दर्जा आहे हे आता नव्या घटनादुरुस्तीने प्रस्थापित झाले आहे. त्यांची ही वाढलेली भूमिका काळाच्या ओघात अधिक विकसित होणार आहे. इतर बाबींबरोबरच या स्थानिक संस्थांना त्यांची कार्ये, कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यात विशेषतः योजनेच्या प्रक्रियेत स्वतःचे स्थान निर्माण होईल. यासाठी स्वतःची चांगली उत्पन्नाची साधनेही उपलब्ध असली पाहिजेत.

६.१२ स्थानिक स्वराज्य संस्थांचे घटनात्मक कार्य, त्यांची सध्याची आर्थिक शक्ती व आर्थिक दुबळेपणा विचारात घेता, त्यांना आर्थिक शक्ती व स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता असल्याशिवाय या संस्थांनी स्वायत्त व्हावे अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. वर नमूद केल्याप्रमाणे पंचायती राज संस्था विशेषतः जिल्हापरिषदांकडे स्वतःचे

उत्पन्न म्हणून थोडा निधी असतो. हे उत्पन्न सुद्धा शासन गोळा करते व अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार या संस्थांना प्रदान करते. परिणामतः जिल्हापरिषदा पूर्णतः शासकीय अनुदानावर अवलंबून आहेत. पंचायत समित्या आर्थिकदृष्ट्या फारच कमजोर आहेत. ग्रामपंचायतींना उत्पन्नाची काही साधने आहेत. परंतु लोकांच्या अपेक्षेप्रमाणे सेवा देण्यास त्यांचे हे उत्पन्न पुरेसे नाही. शासनाकडून पुरविण्यात येणारे अनुदान विविध प्रयोजनांशी निगडित आहे. कालपरत्वे अनुदानाची रक्कम व त्यांची स्वतःची उत्पन्नाची साधने यामध्ये थोडी वाढ झालेली आहे. परंतु अनुदानाचा घटक मोठा असल्यामुळे ही वाढ अतिशय अल्प आहे. या संस्थाचे अनुदानाबाबतचे परावलंबित्व अल्पावधीत कमी करता येणार नाही किंवा त्याला दुसरा पर्यायही नाही. हे परावलंबन कमी करावयाचे झाल्यास ते क्रमाक्रमाने करावे लागेल. त्यासाठी या संस्थांना एकूण उपलब्ध निधीचे वाटप करताना कराचा हिस्सा वाढवून देण्याचा प्रयत्न करावा लागेल याची आयोगाला जाणीव आहे.

६.१३ नागरी स्थानिक संस्थांकडे त्यांची स्वतःची उत्पन्नाची साधने अधिक आहेत. त्याना जकातीपासून चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे कदाचित आर्थिक सहाय्यासाठी त्यांना शासनावर कमी प्रमाणात अवलंबून रहावे लागते. वस्तूस्थिती अशी आहे की, अलिकडच्या काळात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे व त्यामुळे नागरी सुविधा व सेवांच्या समस्या वाढत आहेत. यासाठी योजनांतर्गत निधी व स्थानिक स्वराज्य संस्थांचे महसुली उत्पन्नात जास्त प्रमाणात भर घालून आर्थिक सहाय्य दिले पाहिजे. त्यामुळे या संस्थांकडे भांडवली खर्च करण्यासाठी पुरेसा निधी शिल्लक राहील व तो निधी सध्या असलेल्या पायाभूत सेवासुविधा चालू ठेवणे, त्यांना सुस्थितीत ठेवणे यासाठी तसेच सेवा सुविधा वाढविणे, नवीन सेवा सुविधा निर्माण करणे यासाठी आवश्यक असेल याचीही दखल घ्यावी लागेल. भविष्य काळात नागरी संस्थांच्या स्वायत्ततेच्या दर्जावर भर देताना राज्य शासनाकडून त्याना सध्या जे अर्थसहाय्य मिळते ते आवश्यकतेप्राणे वाढत जाईल याची काळजी घेतली पाहिजे.

६.१४ क वर्ग नगरपरिषदाची आर्थिक स्थिती बऱ्याच बाबतीत मोठ्या ग्रामपंचायतींपेक्षा काही फार चांगली नाही. विशेषतः ज्या नगरपरिषदा राज्याच्या आर्थिकदृष्ट्या मागास भागात आहेत, त्यांची परिस्थिती तर फारच कमकुवत आहे. भविष्यात तेथे नागरीकरणाचा जास्त ताण पडणार आहे.अशा नगरपरिषदांकडे शासनाने विशेष लक्ष देऊन त्यांना आर्थिक सहाय्य दिले पाहिजे. अन्यथा या नागरी संस्थांच्या क्षेत्रात जनतेला जादा कराचा बोजा उचलूनही ग्रापंचायतींच्या तुलनेत कमी किंवा तेवढ्याच दर्जाच्या सेवा-सुविधांवरच समाधान मानावे लागेल.

६.१५ महानगरपालिका आपली साधनसंपत्ती वाढविण्याचा स्तुत्य प्रयत्न करीत असल्या तरीही त्यांना स्वतःचे उत्पन्न वाढविण्यास भरपूर वाव आहे ही वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकांनी त्यांची कर वसूल करण्याची क्षमता वाढविली पाहिजे. तसेच सर्व उत्पन्नाच्या साधनांचा पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे व आपली विश्वासार्हता वाढवून आर्थिक बाजाराची दारेही ठोठावली पाहिजेत. महानगरपालिकांच्या बाबतीत झोपडपट्ट्यांचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करीत आहे. त्यामुळे एरवी सक्षम असलेल्या महानगरपालिकांना शासनाच्या मदतीची गरज निर्माण झाली आहे. मुंबई शहर हे राज्याच्या राजधानीचे शहर आहे तसेच ते देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख केंद्र आहे. औद्योगिक दृष्ट्याही मुंबईला एक वेगळे महत्व आहे. या शहरातील वैद्यकीय सेवासुविधांचा फायदा मुंबईतीलच नव्हेतर देशातील सर्वच नागरिक घेत असतात व यादृष्टीने हे शहर महत्वाची भूमिका व सेवा बजावत आहे. या पुढेही या शहराने ही भूमिका बजावावी या दृष्टीकोनातून राज्य शासनानेच नव्हेतर केंद्र शासनानेही या शहराच्या उन्नतीकडे विशेष लक्ष द्यावे अशी आयोगाची भूमिका आहे. आयोगाने आपल्या शिफारशी करताना मुंबईच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्थानाची योग्य दखल घेतली आहे.

६.१६ शासनाकडून देण्यात येणारे अनुदान बऱ्याच वेळा नियमितपणे देण्यात येत नाही किंवा पूर्ण सूचना न देता त्यातून नगरपालिकांकडून येणे रक्कम कापून घेण्यात येतात. वर्षामध्ये जर अनुदान ठरलेल्या टप्प्यांनी, ठराविक कालांतराने मिळाले नाही तर त्याचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर गंभीरपणे विपरित परिणाम होतो. हे विषेशतः जेव्हा अनुदान वर्षाच्या शेवटी देण्यात येते तेव्हा घडते. स्थानिक संस्थांच्या अर्थसंकल्पातील ही अडचण शक्यतो दूर केली पाहिजे. म्हणजेच हे अनुदान सर्वसाधारणपणे निश्चित रकमेचे आणि निश्चित वेळी मिळाले पाहिजे.

६.१७ नव्याने घटनात्मक दर्जा मिळालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी शक्य तितके आता आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिकले पाहिजे ही वस्तुस्थिती आपण मान्य केली पाहिजे. त्यांचा कारभार अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थित केला पाहिजे. लोकांना मिळू शकणाऱ्या सेवा सुविधा योग्य त्या प्राणांत आणि योग्य कालावधीत मिळू शकतील असा विश्वास निर्माण केल्यास नागरिकांचा कर व दर वाढविण्यास सर्वसाधारणपणे असणारा विरोध कमी होतो. त्यांनी आपली उत्पन्नाची साधने वाढविण्याची प्रबळ इच्छा दाखविली पाहिजे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्त्रोतांचा पाया अरुंद व दुबळा आहे आणि त्याला राज्य शासनाच्या आर्थिक मदतीने पुरवठा करून सुधारणे आवश्यक आहे. ह्या संस्थांना त्यांचे स्वतःचे आर्थिक स्त्रोत उभे करण्यासाठी अधिकार व उत्तेजन दिले गेले पाहिजे.

६.१८ आयोगाचा संबंध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कराबाबतच्या कार्यक्षमतेशी आहे. ही मोठ्या प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. फक्त अतिरिक्त आर्थिक स्त्रोत निर्माण करणे पुरेसे नाही तर चांगली काटकसर आणि काळजीपूर्वक खर्च करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आज आस्थापनेवर मोठा खर्च आहे. त्याला पायबंद घालून नियंत्रित करणे गरजेचे आहे. हे केल्याशिवाय विकासाच्या व लोकांच्या कामांसाठी अधिक निधी उपलब्ध होणार नाही. सेवा पुरविण्यासाठी होणारा मोठा खर्च पाहता ज्या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्रातील संस्था महत्वाच्या भूमिका बजावू शकतील अशी क्षेत्रे शोधली पाहिजेत. सध्या खाजगीकरणामार्फत सुविधा व सेवांची देखभाल करण्याच्या क्षेत्रात फारच थोडे प्रयत्न करण्यात आले आहेत. ह्या क्षेत्रामध्ये अधिक प्रयत्नांची व पुढाकाराची गरज आहे.

६.१९ वरील परिच्छेदामध्ये विहीत केलेली आयोगाची भूमिका आर्थिक परिभाषेत व्यक्त करण्यासाठी जी काही मूलभूत माहिती आवश्यक असते त्या माहितीमध्ये खालील प्रकारच्या त्रुटी आढळून आल्या :—

(१) या नागरी संस्थांच्या सध्याच्या लेखा पद्धतीनुसार त्यांचे लेखे जमा व खर्च या पद्धतीने ठेवले जातात. या पद्धतीमुळे एका विशिष्ट वर्षाच्या उत्पन्न व खर्चाची माहिती मिळत नाही, कारण आधीच्या वर्षाचा काही खर्च या वर्षात केला असेल तर तो पूर्ण खर्च चालू वर्षाचा म्हणून दाखविला जातो. त्यामुळे या संस्थांच्या खऱ्या उत्पन्न व खर्चाचे कल याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे या अशा जमा आणि खर्चाच्या आधारांवर या संस्थांचे पुढील कालावधीचे अंदाज करून त्यातील तफावत निश्चित करणे योग्य ठरणार नाही. आयोगापुढे या संदर्भात दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने पुढील कालावधीचे अंदाज काढण्यासाठी जमा व खर्चाच्या उपलब्ध माहितीचाच विचार केला आहे.

(२) ग्रामीण स्थानिक संस्थांच्या लेख्यामध्ये खर्चाची फोड भांडवली खर्च (उदाहरणार्थ कर्जाची परतफेड) व महसुली खर्च अशी वेगवेगळी दाखविली जात नाही. (उदा. कर्जाची परतफेड जी संस्थांच्या लेख्यात महसुली खर्च म्हणून दाखविली जाते ती वाणिज्य लेखे पद्धतीत तशी दाखविली जात नाही.) या उणीवेमुळेही या संस्थांचे पुढील कालावधीचे अंदाज निर्धारित करताना परिणाम होण्याची शक्यता आहे.

(३) नागरी संस्थांच्या बाबतीत विशेषतः नगरपरिषदा तसेच ग्रामपंचायतींच्या लेख्यांमध्ये सुसूत्रतेचा अभाव दिसून आला. जमा व खर्चाच्या बाबीचे चुकीचे वर्गीकरण, अपूर्ण तपशील असाही प्रकार आढळून आला. त्याचबरोबर या संस्थांची लेखा परीक्षणेही अनियमितपणे झाल्याचे व ते कमी दर्जाचे दिसून आले. या मर्यादांचाही आयोगाला विचार करावा लागला.

६.२० पुनर्रचित आयोगाला अहवाल देण्याचा कालावधी सिमित असल्याने नवी आकडेवारी मागविण्यापेक्षा पूर्वीच उपलब्ध असलेल्या आणि संकलित केलेल्या आकडेवारीवर अवलंबूनच आपला अहवाल निर्धारित करावा लागला.

६.२१ आयोगाने शिफारशी करताना वरील मर्यादेचा विचार केला आहे. आयोगाला असे वाटते की, या स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्त करण्याचे अपेक्षित उद्दिष्ट गाठण्याकरिता आर्थिक बाबींचाच विचार न करता प्रशासकीय नियंत्रण, स्थानिक संस्थांना स्वतंत्रपणे, लवचिकतेने कार्य करण्यात अडथळा करणाऱ्या मर्यादांबाबतचे कायदे इ. या सारख्या क्षेत्रांचाही एकत्र विचार केला पाहिजे.

६.२२. स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक पुढारी यांचेबरोबर झालेल्या बैठकीत त्यांनी त्यांच्या प्रश्नांची आयोगाला माहिती दिली त्यापैकी बरेच प्रश्न अहवालाच्या निरनिराळ्या प्रकरणांमध्ये स्वतंत्रपणे आले आहेत. तथापि, काही आर्थिक दृष्टीने परिणाम करणाऱ्या समस्या/प्रश्न जे आयोगाने शिफारशी करण्यासाठी महत्त्वाचे मानले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत :—

(१) कर वाढविण्यास नागरिकांचा विरोध.

(२) स्थानिक संस्थांच्या आर्थिक बाबीसंबंधी नागरिकांची उदासीनता/अज्ञान.

(३) राज्य शासनावर जास्त प्रमाणात अवलंबून राहण्याची प्रवृत्ती व शासनाकडून जादा मदतीची अपेक्षा.

(४) अनियमित व अनिश्चित अनुदानाचे प्रदान

(५) उत्पन्नाची मर्यादित साधने.

(६) करांच्या दरावरील कमाल व किमान मर्यादा, त्यामुळे स्थानिक संस्थांच्या उत्पन्न वाढीच्या लवचिकतेवर झालेला अनुचित परिणाम.

(७) स्थानिक संस्थांच्या अधिकाऱ्यांकडून कर/करेतर बाबींपासूनचे उत्पन्न वाढविण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यास लोकप्रतिनिधींची अनिच्छा.

६.२३. आयोगाला असे वाटते की, स्थानिक संस्थांच्या स्तरावर निर्णय घेण्यामध्ये लोकांचा सहभाग फारच कमी आहे. त्यामुळे या स्थानिक संस्थांच्या आर्थिक परिस्थितीचा विपरित परिणाम होतो. हे लक्षात घेऊन या संस्थांच्या कार्यभारात पारदर्शकता यावी या दृष्टीने आयोगाने लोकजागृतीच्या मोहिमा आयोजित करण्यासाठीच्या उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यामुळे स्थानिक संस्था व नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होऊन सहकार्याची भावना निर्माण होईल.

६.२४. किमान व कमाल करांच्या दराबाबत स्थानिक संस्थांवर असलेल्या मर्यादा कमी करण्याची किंबहुना कमाल मर्यादा संबंधित संस्थांच्या अखत्यारीत असावी अशी आयोगाची भूमिका आहे.

६.२५. आयोगाला असे वाटते की, जर या स्थानिक संस्था त्याच्यावर सोपविलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे, प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने पार पाडत असतील तर त्यांना अधिक उत्पन्नाची साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत.

६.२६. हे करीत असताना आर्थिक दृष्ट्या दुर्बल संस्थांना आयोगाने महत्त्व दिले आहे. म्हणून ग्रमपंचायती व क-वर्ग नगरपरिषदांना त्या मानाने सढळपणे उत्पन्नाची साधने प्रस्तावित केली आहेत.

६.२७. पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक संस्था यांना अनुदान देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी सन १९९४-९५ ला असलेल्या कराधानाच्या पातळीच्या आधारावर पुढील २०००-२००१ पर्यंतच्या महसुली उत्पन्न व महसुली खर्चाचा अंदाज घेऊन यामधील तफावत काढावी लागेल. स्थानिक संस्थांना जी कार्यपद्धत सध्या लागू आहे, त्यामध्ये तुटीच्या अर्थसंकल्पाची स्थिती येऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना आपला खर्च उत्पन्नाच्या आवाक्यातच मर्यादित ठेवावा लागतो. सन १९९४-९५ मध्ये जिल्हा परिषदांचे उत्पन्न रु. १६९७ कोटी आणि खर्च रु. १६२० कोटी होता, तर ग्रामपंचायतींचे एकूण उत्पन्न रु. १३३ कोटी आणि खर्च रु. १२४ कोटी होता.

६.२८. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीतसुद्धा ही परिस्थिती दिसून येते आयोगाने जी आकडेवारी गोळा केली आहे. त्यानुसार सन १९९४-९५ मध्ये सर्व नगरपरिषदांचे महसुली उत्पन्न रु. ५५५ कोटी आणि महसुली खर्च रु. ४६७ कोटी होता. सर्व महानगरपालिकांचे महसुली उत्पन्न रु. २४९० कोटी आणि महसुली खर्च रु. २१३७ कोटी होता. अ, ब आणि क वर्ग नगर परिषदांचे महसुली ऊत्पन्न अनुक्रमे रु. २८१ कोटी, रु. १४९ कोटी व रु. १२५ कोटी आणि महसुली खर्च अनुक्रमे रु. २३५ कोटी रु. ११९ कोटी आणि रु. ११३ कोटी होता. याचे कारण असे की, नगर परिषदांकडे भांडवली खर्चासाठी त्यांचेकडे निधी असावा म्हणून महसुली खर्चापेक्षा महसुली उत्पन्न

शिल्लक असावे अशी अपेक्षा केली जाते. तसेच खर्चापेक्षा जास्त असलेल्या ह्या उत्पन्नापैकी बरेचसे उत्पन्न सुरुवातीची शिल्लक व खर्च न झालेल्या शिलकीचे आहे. ही खऱ्या अर्थाने शिल्लक नाही.

६.२९. तथापि ह्याचा अर्थ असा नव्हे की, आर्थिक स्थिती समाधानकारक आहे आणि विशेष जास्तीचे काही करण्याची गरज नाही. स्थानिक गरज नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीच्या मर्यादेत राहून काटकसर करून त्यांचा कारभार करावा लागतो. बऱ्याच वेळेला ही तारेवरची कसरत आवश्यक अशा प्रकारचा खर्चही पुढे ढकलून/किंवा टाळून केली जाते. म्हणून निधीच्या कमतरतेच्या वेळी ज्या क्षेत्रातील खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात कपात करण्यात येते अशा क्षेत्रांचा आयोगाने विचार केलेला आहे. अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधा, वास्तव मालमत्ता, रस्ते व इमारती यांची जपणूक, देखभाल व दुरुस्ती, त्यांना सुव्यवस्थित चालविणे हे एक असे क्षेत्र आहे. सेवांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक पदे रिक्त ठेवणे हे दुसरे क्षेत्र आहे. ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाचे पद हे एक अशा प्रकारचे उदाहरण आहे. सेवा सुविधांसाठी ठरविलेले प्रमाण किंवा निकषाचे संदर्भातही सद्य:पातळीचा विचार करून तफावत काढता येऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अंमलबजावणी करावयाच्या सर्व प्रकारच्या सेवांचे निकष उपलब्ध नसल्यामुळे ह्याचा अंदाज घेणे कठीण आहे. शिवाय ज्या सेवांचे निकष उपलब्ध आहेत अशा सेवांची निकषाप्रमाणे अंमलबजावणी करणे यात योजनांतर्गत व योजनेतर या दोन्ही प्रकारच्या खर्चांचा समावेश होतो. सेवांच्या निकषांच्या संदर्भात गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही दृष्टींनी तफावतीचे निर्धारण करणे वेळखाऊ व मोठ्या खर्चाचे आहे. या निर्बंधांचा विचार करून आयोगाने काही ठळक तफावतींचा शोध घेऊन निर्धारण करण्याची स्वतःला मर्यादा घातली आहे. अशी तफावत विचारात घेऊन योग्य आणि वाढीव खर्चाचे अंदाज ऐतिहासिक वाढीच्या दरानुसार प्रक्षेपित केलेल्या खर्चामध्ये समाविष्ट करून अंदाजित उत्पन्न व अंदाजित खर्च यामधील तफावत काढली.

६.३०. नगरपालिकांच्याबाबत आयोगाने यापुढे जाऊन विचार केला आहे. नगर परिषदांचे उत्पन्नात शासकीय अनुदानाच्या रूपाने भर टाकून त्याचा महसुली खर्च भागविल्यानंतर भांडवली खर्चासाठी पुरेसा निधी शिल्लक राहील असा विचार आयोगाने केला आहे. जिल्हा परिषदांबाबत स्थिती वेगळी आहे. जिल्हा परिषदा जवळजवळ पूर्णपणे शासकीय अनुदानावर अवलंबून आहेत. त्याचे स्वतःचे उत्पन्न,ज्याला सेस फंड म्हणतात, ते फारच कमी आहे. ह्या सेस फंडातून खर्च करण्यास शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे कडक पालन करावे लागते. ज्या उद्देशासाठी सेसफंड खर्च करावयाचा आहे त्यासाठी तो अपुरा आहे. म्हणून जिल्हा परिषदांना विहित कामांची अंमलबजावणी करणे शक्य व्हावे यासाठी हा निधी वाढविणे आवश्यक आहे. अतिरिक्त निधी मिळविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था स्वतः उत्पन्न कसे वाढवू शकतील हे बघण्याचा आयोगाने प्रयत्न केला आहे. याच प्रश्नाची दुसरी बाजू अशी आहे की, स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासन त्यांना कशा प्रकारे मदत करू शकेल. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अतिरिक्त निधी उभारण्याचे आणि प्रशासकीय व आर्थिक कार्यक्षमता वाढविण्याचे दुहेरी प्रयत्न करूनही तफावतीचा जो भाग शिल्लक राहतो, त्यासाठी अनुदान वाटपाचा प्रश्न निर्माण होतो आणि तो प्राधान्याने कराचा वाटा या स्वरुपाने त्यांना शासनाने उपलब्ध करून दिला पाहिजे.

६.३१. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे घटनेत समाविष्ट झालेल्या अनुच्छेद क्र. २४३-एम आणि २४३-झेड (सी) भाग ९ व भाग ९-अ, अनुच्छेद क्र. २४४ चा उपखंड २ मध्ये नमूद केलेले अनुसूचित क्षेत्र व आदिवासी क्षेत्र यांना लागू होत नाहीत. याचा अर्थ असा की, राज्य वित्त आयोगाच्या तरतुदी राज्यातील अशा क्षेत्राला लागू नाहीत. तथापि आम्ही कोणताही भेद न करता सर्व क्षेत्रांसाठी शिफारशी केल्या आहेत आणि जेव्हा योग्य व शक्य होईल तेव्हा या शिफारशीही अशा क्षेत्रांना लागू करण्याचा निर्णय घेण्याचे राज्य शासनावर सोपविले आहे.

६.३२. केंद्र शासनाच्या दहाव्या वित्त आयोगाने आपला अहवाल ज्या वेळी सादर केला त्या वेळी राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी तयार नव्हत्या. म्हणून त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता तदर्थ पद्धतीने अनुदानाची शिफारस केली आहे. हे अनुदान राज्याकडून देण्यात येणाऱ्या रकमेव्यतिरिक्त असेल आणि ते वेतन व मजुरीसाठी खर्च करता येणार नाही या अटीच्या अधीन राहून तदर्थ अनुदानाची तरतूद केली आहे. शेवटी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचे स्वतःचे निधी उभारून विविध योजनांसाठी या अनुदानाच्या अनुरूप निधीची व्यवस्था करतील. हे अनुदान फक्त



ना ४०९४-९

योजनांतर्गत कामांसाठीच आहे. ह्या अनुदानाचा वापर कसा करावा याबाबत काही मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहेत असे आयोगाला कळले आहे. त्यामुळे हे अनुदान काही विशिष्ट मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच वापरण्यात येणार आहे.

६.३३. वस्तुस्थितीचा एकंदर आढावा घेता आयोगाला असे वाटते की, संबंधित घटना दुरुस्तीमुळे शासनाच्या तिसऱ्या स्तरावर असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा दर्जा उन्नत होऊन त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वायततेची ही संकल्पना ह्या बदललेल्या परिस्थितीत ह्या संस्थांना त्यांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये जाणीवपूर्वक पार पाडून मिळालेली स्वायतता सार्थ केली पाहिजे. नागरी आणि ग्रामीण स्वराज्य संस्थांनी आता आपल्या पायावर उभे राहणे आवश्यक झाले आहे. राज्य शासनानेदेखील या संस्थांना अर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे व वैधानिक अशा दोन्ही प्रकारच्या तरतुदीद्वारे, त्यांना बळकट करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. भविष्य कांळात राज्य शासनाची मदत ही करातील वाटा व विशेष प्रयोजनासाठीची अनुदाने या स्वरुपात असावीत. या स्थानिक संस्थांच्या परावलंबित्वाला आळा घालून त्या शक्यतोवर कशा स्वायत्त होतील असा शासनाचा उद्देश असावा. या संस्थांनीदेखील घटनेत अभिप्रेत असल्याप्रमाणे त्याच्या प्रशासकीय व आर्थिक बाबींच्या कार्यक्षमतेत वाढ करून त्यांची कर्तव्ये अधिक कार्यक्षमतेने व काटकसरीने पार पाडली पाहिजेत. स्वायतत्तेच्या तत्त्वाला स्थानिक संस्थांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणूनही अधिक बळकटी आणता येईल. त्याच्या कार्यपद्धतीत स्वयंनियंत्रण व स्वयंशिस्त आणण्यासाठी आणि बदलत्या परिस्थितीत त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत हे जनतेला समजण्यासाठी या स्थानिक संस्थांच्या कार्याच्या मूल्यमापनासाठी काही निकष लावले पाहिजेत. विकासात्मक कार्ये व नियोजनामध्येही या संस्थांचा अधिक क्रियाशील सहभाग असावा. या भविष्यकालीन उद्दिष्टांना चालना देण्यासाठी पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची निर्मिती हे ह्यादृष्टीने टाकलेले पहिले पाऊल आहे.

□□

प्रकरण ७

# पंचायत राज संस्थांच्या अडचणी व प्रश्न

७.१. पंचायत राज संस्थांना येणाऱ्या अडचणी प्रचलीत पद्धतीमुळे निर्माण झाल्या आहेत. त्यांचे विश्लेषण खाली केले आहेत.

७.२. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सर्वसाधारण अडचणी त्यांचे जे उत्पन्नाचे प्रमुख स्रोत आहेत. त्यांतून निर्माण झाल्या आहेत. जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न अतिशय कमी आहे. तसेच ते अलवचिकही आहे. या अडचणींमुळे त्यांचे शासनावर परावलंबित्व मोठ्या प्रमाणात आहे. सन १९९४-९५ साली जिल्हा परिषदांचे एकंदर उत्पन्न रु. १६९७ कोटींचे होते. त्यातील जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न फक्त रु. ५६.५४ कोटी होते. म्हणजे जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ३.३३ टक्के होते. (शासनाकडून मिळणारे योजना अनुदान एकूण उत्पन्नात धरल्यास त्याचे प्रमाण त्यापेक्षाही कमी होईल.)

७.३. जमीन महसुलावरील उपकराची वसुली महसूल यंत्रणेमार्फत केली जाते. वसुलीच्या प्रमाणावर प्रत्यक्ष वाढीची रक्कम किती मिळेल हे अवलंबून असते. त्यामुळे कोणत्या वर्षी किती रक्कम जिल्हा परिषदांना मिळेल याची शाश्वती नसते. शासनाने वाढीव उपकराची वसुली सक्तीने करू नये असे आदेश १९९५-९६ या वर्षासाठी दिल्याचे आढळले. उपकराची वसुली कमी झाल्याने मिळणाऱ्या उपकर अनुरुप अनुदानावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

७.४. जिल्हा परिषदांना मिळणाऱ्या सिंचनपट्टीवरील उपकरात हीच अडचण निर्माण झाल्याचे आढळले. १९९४-९५ या वर्षात उपकराची मागणी रु. १८४३ लाख होती. त्यापोटी पाटबंधारे खात्याने रु. ९०७ लाख वसुली केली. तर प्रत्यक्ष जिल्हा परिषदांना ४३३ लाख रु. एवढीच रक्कम मिळाली. म्हणजे एकूण मागणीच्या २३ टक्के रक्कमच जिल्हा परिषदांना मिळाली येथे नमूद केले पाहिजे की, जिल्हा परिषदांनी व शासनाने वित्त आयोगाला या उपकराविषयी पुरविलेल्या माहितीत फार मोठा फरक आढळून आला. याबाबतीत जिल्हा परिषदांकडे वित्त आयोगाने विचारणा केली असता. जिल्हा परिषदांच्या हिशोबात ही रक्कम नंतरच्या वर्षी लेख्यात समाविष्ट करण्यात आल्याने तसेच काही बाबतीत पाटबंधारे खात्याने ग्रामपंचायतीची वसुली जिल्हा परिषदेच्या या उत्पन्नातून वळती करून घेतल्यामुळे हा फरक येत असल्याचे सांगण्यात आले.

७.५. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या त्यांच्या अंदाजपत्रकाप्रमाणे निधी खर्च करीत नाहीत अशी टीका या संस्थांवर नेहमी केली जाते. या संस्था त्यांचे अंदाजपत्रकाप्रमाणे निधी उपलब्ध होत नाही अशी नेहमी तक्रार करतात. त्यात वरील आर्थिक परावलंबनामुळे मोठा तथ्यांश आढळतो. शासनाकडून कमी प्रमाणात अनुदाने कमी वसुलीमुळे मिळतात. हा जिल्हा परिषदांच्या अडचणीचा एक भाग झाला. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे प्रत्यक्ष वसुली होऊन सुद्धा शासनाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद कमी पडल्याने या रकमा पंचायत राज संस्थेला वेळेवर मिळत नाहीत. राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेस आकारणी करून गोळा केलेले उपकर अनुदानाच्या स्वरुपात दिले जातात. यामध्ये जमीन महसुलावरील उपकर, मुद्रांक शुल्क व पाणीपट्टीवरील उपकर इत्यादींचा समावेश होतो. शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेमार्फत हा महसूल गोळा केला जातो व कोषागारात भरला जातो. जिल्हा परिषदेस अनुदान देण्यासाठी शासन त्यांच्या अंदाजपत्रकात तरतूद करते. हे अनुदान शासनाचे विविध विभाग जसे महसूल खाते, पाटबंधारे खाते महानिरीक्षक मुद्रांक शुल्क यांच्या मार्फत जिल्हा परिषदेस दिले जाते. वसुली झाली आहे मात्र अंदाजपत्रकात तरतूद नाही किंवा



एच ४०९४-९अ

कमी आहे या अडचणीमुळे जिल्हा परिषदांना अनुदाने वेळेवर मिळत नाहीत. वित्त आयोगाच्या सर्वेक्षणानुसार सन १९९४-९५च्या अखेरीस राज्यातील २६ जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्काचे २१.६६ कोटी रुपये शासनाकडून अशा तऱ्हेचे येणे होते. अशाच तऱ्हेची सिंचन पट्टीवरील उपकराची परिस्थिती परिच्छेद क्र. ७. ४ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

७.६. उपकर व उपकर आधारित अनुदाने हीच जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रमुख उत्पन्नाची साधने असल्याने या रकमा त्यांना तात्काळ प्राप्त झाल्या पाहिजेत. जिल्हा परिषदांनी पुढाकार घेऊन स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी दर वाढी करून प्रयत्न चालविले असतांना शासकीय यंत्रणेकडून वसुली न होणे अथवा ताळमेळाच्या कामात दिरंगाई होणे आणि जिल्हा परिषदांना त्यामुळे पुरेसे व वेळेवर अनुदान प्राप्त न होणे ही बाब जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या बाबतीत अधिक अडचणीची आहे. अशी परिस्थिती असली तरी उपकर वसुली यंत्रणा शासनाकडेच राहून वसुलीकडे जास्त लक्ष देणे हाच एकमात्र पर्याय आहे.

७.७. या सर्व अडचणींवर एक उपाय म्हणजे जमीन महसुलातील व सिंचन पट्टीवरील उपकर अनुदान जिल्हा परिषदांना मागणीच्या आधारे देणे. मागणीचे दर ठरले असल्याने प्रत्यक्ष मागणीच्या आधारे देय अनुदानाची रक्कम एका ठराविक कालावधीसाठी निश्चित करण्यात यावी व त्याची शासनाच्या अर्थसंकल्पात दरवर्षी तरतूद करण्यात यावी. उपकराचे दर जेव्हा बदलतील त्यावेळी आणि त्या बदलानुसार या रकमेत फरक करावा. शिवाय ही रक्कम वर्षातून एक किंवा दोन आगाऊ हप्त्यांत जिल्हा परिषदांना वितरित करावी. म्हणजे जिल्हा परिषदांना अर्थसंकल्पीय नियंत्रण व खर्चाचे नियोजन करणे सुलभ होईल. (या संदर्भात आयोगाने परिच्छेद १३.४ मध्ये शिफारस केली आहे).

७.८. जमीन महसुलावरील उपकर हे जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. महाराष्ट्रातील आजचा जमीन महसूल हा पाऊणशेहून अधिक वर्षांपूर्वी झालेल्या जमीनधारा निश्चितीवर आधारलेला आहे. त्यामुळे त्या काळानंतर जमिनीच्या उत्पादकतेमध्ये जी वाढ झाली ती जमीन महसुलाचे सूत्र ठरविण्याकरिता लक्षात घेण्यात आली नाही. परिणामी हा कर अलवचिक बनलेला आहे असा हा अलवचिक कराधार धरून आकारलेला उपकर देखील उत्पन्न प्राप्त करण्याच्या दृष्टीने तसाच अलवचिक ठरेल हे उघड आहे. त्यामुळे उपकरात झालेली वाढ जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात भरीव वाढ करु शकत नाही हे स्पष्ट आहे.

७.९. जिल्हा परिषदा अधिनियमाद्वारे निरनिराळे कर व फी आकारू शकतात. वित्त आयोगाने आतापर्यंत ज्या जिल्हा परिषदांना भेटी दिल्या त्यांपैकी फारच कमी जिल्हा परिषदांनी पाणीपट्टीच्या व्यतिरिक्त इतर कर व फी आकारल्याचे आढळते. जेथे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुरू आहेत तेथे पाणीपट्टीची थकित रक्कम मोठ्या प्रमाणात आढळली. उदा. रत्नागिरी जिल्हा परिषदेची पाणीपट्टीची मागणी सन १९९४-९५ साठी थकबाकीसह रु. ७५,९७,६०० होती तर प्रत्यक्षात वसुली त्या वर्षी रु. ८,९२, ४०२ झाली. म्हणजे मागणीच्या १२ टक्के रक्कम वसूल झाली होती. जिल्हा परिषद जळगावची सन १९९४-९५ ची पाणीपट्टीची मागणी थकबाकीसह रु. ८४,६९,००० होती तर वसुली फक्त रु. १,४८,००० होती. म्हणजे मागणीच्या १. ७५ टक्के होती. पाणीपट्टीच्या थकित रकमेमुळे त्याच्या प्रादेशिक पाणीपुरवठा यंत्रणेस निधीची कमतरता प्रकर्षाने आढळते व त्यामुळे या योजना चांगल्या रीतीने चालविण्यास अडचणी येतात. या बाबीचा परामर्श ग्रामीण पाणीपुरवठा योजनेखाली घेण्यात आला आहे.

७. १०. जिल्हा परिषदेचे स्वतःचे उत्पन्न हे तिच्यावर सोपविण्यात आलेल्या कार्याची यादी बघता अत्यल्प असल्याचे लक्षात येते. त्यातून शासनाने जिल्हा परिषदेवर सोपविण्यात आलेल्या कार्यावर खर्च करणे अडचणीचे जाते. अलिकडे शासनाने जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांचे मानधन, भत्ते व इतर सोयी यामध्ये भरीव वाढ केली आहे. जिल्हा परिषदांना स्वतःच्या उत्पन्नातून हा खर्च करणे अपेक्षित आहे. याशिवाय एकूण उत्पन्नाच्या २० टक्के पाणीपुरवठा, २० टक्के मागासवर्गीय योजनांसाठी, ५ ते १० टक्के रक्कम महिला व बालकल्याण योजनांसाठी, नियमाप्रमाणे घसारा निधीमध्ये, टक्केवारीनुसार अंशदान हा खर्च सक्तीचा आहे. त्यामुळे अनेक जिल्हा परिषदांना पदाधिकाऱ्यांवरील खर्च भागविता येत नाही. काही जिल्हा परिषदांनी या आर्थिक अडचणीमुळे घसारा निधीत अंशदान न दिल्याचे आढळून आले.

**नियत वेळेस अनुदानाचे वाटप**

७.११. जिल्हा परिषदांना देण्यात येणारी सप्रयोजन अनुदाने ही वर्षाचे शेवटी मोठ्या प्रमाणात देण्यात येतात. त्यामुळे या अनुदानाचे वापर एकतर योग्य रितीने होत नाही व त्यामुळे मोठ्या प्रमाणात अनुदानाचा काही भाग नामंजूर केला जातो. लेखा आक्षेप घेतले जातात अशी बहुसंख्य जिल्हा परिषदांची तक्रार आहे. त्यामुळे अनुदाने न वापरल्यामुळे व्यपगत झाल्याचे आढळते यासर्व प्रकरणात जिल्हा परिषदेच्या अधिकारी व पदाधिकारी यांचेवर अनुदान न वापरल्याचा दोष देण्यात येतो. **त्यामुळे आयोगाची अशी शिफारस आहे कि प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यापर्यत वर्षाचे कमीत कमी ७५ टक्के अनुदान व उर्वरित अनुदान फेब्रुवारी महिन्यापर्यंत वाटप करावे.**

**लेखा परिक्षणात अमान्य केलेल्या रकमा.**

७.१२. जिल्हा परिषदेचे व पंचायत समितींचे लेखा परीक्षण मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचेकडून केले जाते, हे लेखा परीक्षण स्थानिक निधी लेखा कायदा १९३० च्या तरतुदीन्वये केले जाते. यात लेखा परीक्षकांना शासकीय अनुदानातून केलेला काही खर्च अमान्य करण्याचे अधिकार आहेत असा अमान्य खर्च जिल्हा परिषदांकडून यथावकाश वसूल केला जातो. अशी अमान्य रक्कम फार मोठी असून त्याच्या वसुलीमुळे जिल्हा परिषदांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होतो. प्रा. पी. बी. पाटील समितीने त्यांच्या पंचायत राज मूल्यमापन अहवालामध्ये अशी शिफारस केली होती की, अशा अमान्य रकमा जिल्हा परिषदांकडून वसूल करू नयेत. सन १९९२-९३ सालाच्या पंचायत राज संस्थांच्या लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालानुसार सर्व जिल्हा परिषदांच्या मिळून एकूण रु. ३३० कोटी इतक्या अमान्य रकमा आहेत. **आयोगाची अशी शिफारस आहे की, अमान्य रक्कमांबाबत लेखा परीक्षण अहवाल मिळल्यापासून २ वर्षांत निर्णय घेऊन त्या संबंधित व्यक्तीकडून किंवा संस्थांकडून त्याची वसुली करण्याची दक्षता घ्यावी किंवा योग्य वाटल्यास केवळ तांत्रिक मुद्यातून उदभवणारे आक्षेप दूर करून टाकावेत की ज्या योगे अशी कुठलीही रक्कम दोन वर्षाहून अधिक कालावधीत आक्षेपाधीन राहू शकणार नाही, तसेच आधीच्या थकित रकमांबाबतही याप्रकाराचा आढावा घेऊन कार्यवाही करावी.**

**कर्मचारीवृंदाची कमतरता**

७.१३. जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केलेल्या योजना राबविण्यासाठी असलेल्या कर्मचारीवृंद अत्यंत अपुरा आहे. एखादी योजना हस्तांतरित झाल्यानंतर त्यावरील कर्मचारीवृंद हस्तांतरित होतो. मात्र प्रशासन लेखा अशा सामायीक प्रशासकीय सेवा देणाऱ्या विभागातील कर्मचारीवृंदात वाढ होत नाही. जिल्हा परिषदांसाठी सन १९७५ साली कर्मचारी आकृतीबंध तयार केला होता. त्यात अद्यापर्यंत वाढ झालेली नव्हती मात्र दोन उच्चस्तरीय समित्यांच्या अहवालानुसार नुकताच शासनाने सुधारित आकृतीबंध तयार केला असून ३ टप्पात नवीन पदे निर्माण करण्याचे ठरविले आहे. शासनाने लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंध स्विकारला असला तरी ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या ग्रामसेवकांच्या पदाबाबत विचार करणे आवश्यक आहे. ग्रामस्तरावर ग्रामसेवकांची पदे कमी असल्याने तीन-चार. ग्रामपंचायतींचे दप्तर एकच ग्रामसेवक सांभाळत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे ग्रामीण जनतेपर्यंत शासनाच्या योजना पोहोचण्यास निश्चितपणे अडचणीचे जाते.

**देखभाल व दुरुस्तीसंबंधीच्या अडचणी**

७.१४. आतापर्यंत आपण जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या साधनांचा विचार केला. जिल्हा परिषदांना आधीच्या योजनांमधून निर्माण झालेल्या मालमत्तेच्या परिरक्षणासाठी खर्च करावा लागतो.

**जिल्हा परिषदांकडे खालील प्रकारच्या मालमत्ता असतात**

(१) जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून बांधलेले रस्ते तसेच जिल्हा परिषदांकडे देखभालीसाठी शासनाने हस्तांतरित केलेले रस्ते.

(२) जिल्हा परिषदांनी स्वतःच्या उत्पन्नातून बांधलेल्या व जिल्हा परिषदांनी देण्यात येणाऱ्या अनुदानातून बांधलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या इमारती उदा. प्राथमिक शाळांच्या इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती पशुवैद्यकीय दवाखाने, प्रशासकीय इमारती, समाज मंदिरे इत्यादी.

(३) ग्रामीण पाणीपुरवठा योजना, विंधन विहिरी इतर विहिरी यांचा समावेश असलेल्या पाणीपुरवठा योजना

(४) पाझर तलाव, मालगुजारी तलाव, छोटे बंधारे इत्यादींचा समावेश असलेल्या लहान पाटबंधारे योजनांचे काम

(५) इतर यंत्रसामुग्री, वाहने, उपकरणे, इत्यादी.

**रस्ते–**

७.१५. शासनाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्हा परिषदांकडे १,२८,७१८ कि. मी. लांबीचे रस्ते देखभाल व दुरुस्तीसाठी दिलेले आहेत. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग (२५५ कि. मी.), प्रमुख जिल्हा मार्ग (२४२८१ कि. मी.), जिल्हा मार्ग (३५९६४ कि. मी), ग्रामपंचायत रस्ते (५९३७६ कि. मी.) व इतर रस्ते (७८४२ कि. मी.) यांचा समावेश होतो. या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदानाच्या स्वरूपात अनुदान उपलब्ध करून दिले जाते. शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरआरएमआर-३९७७/७२२/डेस्क-२८, दिनांक २५ मार्च १९७८ अन्वये रस्ते, पूल यासाठी देखभाल व दुरुस्ती कारण्यासंबंधीची प्रमाणके यापूर्वी विहित करण्यात आली होती. त्यानंतर जवळ जवळ १७ वर्षांचा कालावधी लोटला आहे. नुकतेच शासन परिपत्रक क्र. आरएमआर-१०८९/सीआर-८७/रस्ते-१, दिनांक १५ नोव्हेंबर १९९५ अन्वये सुधारित प्रमाणके तयार केलेली आहेत ती खालीलप्रमाणे –

| क्रमांक | रस्त्याचे वर्गीकरण | प्रती कि. मी. दर |
|---|---|---|
| १ | राज्य मार्ग | रु. २४००० ते ३८२०० |
| २ | प्रमुख जिल्हा मार्ग | रु. २१०५० ते ३०००० |
| ३ | इतर जिल्हा मार्ग | रु. २०३०० ते २०६५० |
| ४ | ग्रामीण मार्ग | रु. १९१२५ ते २०३०० |
| ५ | अ वर्गीकृत रस्ते | रु. १०४५०. |

वरील मानके सन १९८९-९० च्या दरसुचीवर आधारित आहेत. बांधकाम खात्याने दिलेल्या माहितीनुसार जिल्हा परिषदांना २९ टक्के रक्कम १९९४-९५ साठी शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात आली. मानकाप्रमाणे निधी उपलब्ध होत नसल्याने जिल्हा परिषदा देत असलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. वाढत्या औद्योगिकरणामुळे जिल्हा परिषद क्षेत्रातील दळणवळणावर अधिक ताण पडतो. मात्र त्यासाठी जिल्हा परिषदांना काही अनुदान मिळत नाही. अशा तक्रारी लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषद भेटीच्या वेळी केल्या. त्यासाठी मानकाप्रमाणे निधी मिळावा व साखर कारखान्यांकडून प्रती टन उसावर ठराविक रक्कम जिल्हा परिषदेस मिळावी अशा मागण्या करण्यात आल्या.

**इमारती**

७.१६. महाराष्ट्र वित्त आयोगाने केलेल्या सर्वेक्षणानुसार जिल्हा परिषदांकडे एकूण ९४ हजार ७३७ इमारती आहेत व त्यांचे चटई क्षेत्र ९५ लाख २३ हजार ४९ चौ. मीटर आहे. यामध्ये प्रशासकीय इमारती, शाळांच्या इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती, पशुवैद्यकीय दवाखाने, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने इत्यादींचा समावेश आहे. वित्त आयोगाने ज्या जिल्हा परिषदांना भेटी दिल्यात त्या प्रत्येक ठिकाणी शाळेच्या व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींच्या दुरावस्थेविषयी लोकप्रतिनिधींनी अडचणी मांडल्यात जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्नातून जरी या इमारतीवर देखभाल दुरुस्तीसाठी काही प्रमाणात खर्च करीत असल्या तरी इमारतीच्या परिरक्षणासाठी जिल्हा परिषदांना पुरेशा प्रमाणात शासकीय अनुदान मिळण्याची आवश्यकतेचे प्रत्येक ठिकाणी प्रतिपादन करण्यात आले.

**यंत्रसामुग्री, वाहने, उपकरणे इत्यादींवरील खर्च**

७.१७. जिल्हा परिषदांनी शासकीय अनुदानातून खरेदी केलेली वाहने यंत्रसामुग्री वेळोवेळी नादुरुस्त होतात. तसेच त्या उपयोगात आणण्यासाठी इंधनाची गरज भासते. या बाबींसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध होते. मात्र

हे अनुदान कमी पडत असल्यामुळे यंत्रसामुग्रीच्या उपयोगावर बंधने येतात. येथे नमूद केले पाहिजे की, या यंत्रसामुग्रीपासून मिळालेले उत्पन्न जिल्हा परिषदांना शासनाकडे जमा करावे लागते. हे उत्पन्न जिल्हा परिषदांना शासनाकडे स्थलांतरीत न करता आपल्याकडेच ठेवू दिल्यास जिल्हा परिषदांना एक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल तसेच ही यंत्रसामुग्री अधिक चांगल्या रितीने जिल्हा परिषदांना वापरता येईल. (या संदर्भातील शिफारस परिच्छेद १३.२० मध्ये करण्यात आली आहे).

### लघुपाटबंधारे योजना

७.१८. सद्यःस्थितीत राज्यामध्ये जिल्हा परिषदांकडे सुमारे ११५०० लघुपाटबंधारे प्रकल्पांद्वारे अदमासे २.५५ लाख हेक्टर सिंचन निर्मिती झाली आहे. यामध्ये सुमारे १२०० लघु पाटबंधारे तलाव (८०,००० हे.), ४१०० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (१०७००० हे.), ३९०० कच्चे बंधारे (४०,००० हे.) व २३०० उपसा सिंचन योजना (२८,००० हे.) याचा समावेश आहे. या व्यतिरिक्त विदर्भातील अंदाजे ७२०० मालगुजारी तलावांतर्गत सुमारे ०.८५ लक्ष सिंचनक्षमतेची निर्मिती लक्षात घेता राज्यात सुमारे १८७०० लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत अंदाजे ३.४० लक्ष हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. राज्यामध्ये दरवर्षी जवळपास १४०० ते १५०० लघुपाटबंधारे प्रकल्प जिल्हा परिषदांतर्गत पूर्ण करण्यात येतात व त्यापासून सुमारे ०.३५ लक्ष हेक्टर सिंचन निर्मिती होते. या शिवाय जिल्हा परिषद अन्तर्गत १२३०९ पाझर तलाव असुन त्याची देखभाल व दुरूस्ती जिल्हा परिषदांना करावी लागते.

७.१९. राज्यामधील जिल्हा परिषदांतर्गत लघुपाटबंधारे प्रकल्पांचे सिंचन व्यवस्थापन/पाणीपट्टी वसुली संदर्भात आढावा घेतला असता सुमारे १३३९२२ हेक्टर सिंचनक्षमता प्रत्यक्षात वापरली जात आहे असे दिसून येते. मालगुजारी तलावापासून होणारे सिंचन वापर वगळल्यास हे प्रमाण अत्यल्प म्हणजे सुमारे ४९००० हेक्टर एवढेच दिसून येत आहे. म्हणजेच २.५५ लक्ष हेक्टर तुलनेत हे प्रमाण फक्त १९ टक्के येते. शासनातर्फे बांधण्यात आलेल्या लघु पाटबंधारे योजनापासून जिल्हा परिषदकडून पाणीपट्टीची वसुली होणे अपेक्षित आहे. पाटबंधारे खात्यानी ठरवून दिलेल्या पिकांच्या दराप्रमाणे महाराष्ट्र सिंचन अधिनियम , १९७६ व जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ प्रमाणे जिल्हा परिषदकडे लघु पाटबंधारे प्रकल्पावर पाणीपट्टी आकारण्याची पद्धत आहे.

आतापर्यंत निर्माण झालेल्या सिंचनक्षमतेपासून सरासरी ६५ लाख रु. पाणीपट्टीची आकारणी होत असून, त्यातून प्रत्यक्षात ११.५ लाख रुपये वसुली होते २.५५ लाख हेक्टर सिंचनक्षमता लक्षात घेता राज्यामध्ये ५ कोटी रुपयांची आकारणी व्हावयास पाहिजे. या तुलनेत आकारणीचे प्रमाण १३ टक्के तर प्रत्यक्ष वसुलीचे प्रमाण २ टक्के एवढे नगण्य दिसते. **आठव्या पंचवार्षिक योजनेअखेर जिल्हा परिषदांतर्गत योजनांवर ६०० कोटी रु. अपेक्षित खर्च बघता, सिंचन पाणीपट्टी वसुलीच्या परिस्थितीकडे गांभीर्यपूर्वक बघणे आवश्यक वाटते.**

७.२०. सिंचन व्यवस्थापन व पाणीपट्टी वसुली परिणामकारक न होण्याची खालील कारणे असल्याचे मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर यांचेकडून सांगण्यात आले.

**(१) सिंचन कर्मचारीवृंदाचा अभाव**

जिल्हा परिषदांतर्गत आजतागायत केवळ लघु पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम घेण्यात आलेले आहे. पंरतु सिंचन व्यवस्थापनासाठी कर्मचारीवृंदसुद्धा उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे व्यवस्थापन/पाणीपट्टी हा एकूण दुर्लक्षित ठरला आहे.

**(२) हस्तांतरण प्रक्रियेत अडचणी**

कोल्हापूर प्रकारचे बंधारे स्थानिक लाभधारकांनी वा ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदांकडून हस्तांतरीत करून घ्यावे अशी संकल्पना असताना प्रत्यक्ष तसे घडत नाही. लाभधारकांचा कल प्रकल्प बांधून घेण्याकडे असतोच पण प्रकल्पाचे हस्तांतरण करून घेऊन सिंचन व्यवस्थापनेत सहभागी होण्यास टाळाटाळ होते. या प्रकल्पाचे हस्तांतरण करून घेण्याचा आग्रह स्वतंत्र कर्मचारीवर्ग उपलब्ध नसल्याने होत नाही.

**(३) देखभाल दुरुस्ती निधीचा अभाव**

शासनाने बांधलेल्या लघुपाटबंधारे प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती होणे अपेक्षित असते. पाटबंधारे खात्याने मोठ्या/मध्यम व लघुप्रकल्पाविषयी क्षेत्रावर आधारित देखभाल दुरुस्तीसाठी मापदंड ठरविले आहेत. स्थानिक प्रकल्पांचे सिंचनक्षेत्र लक्षात घेता राज्यामध्ये सुमारे ८ ते ९ कोटी रु. देखभाल दुरुस्तीसाठी निधी मिळावयास हवा अर्थात तेवढी

पाणीपट्टी सुद्धा मिळावयास हवी. लाभार्थी हस्तांतरित करून घेत नाहीत व शासनाकडून दुरुस्तीसाठी योग्य तो निधी उपलब्ध करून दिला जात नाही ही आजची परिस्थिती होय. त्यामुळे लघुपाटबंधारे प्रकल्पांची पडझड झालेली आहे. त्यामुळे अपेक्षित पाणीसाठा व सिंचन क्षमता परिणामकारकरित्या वापरणे शक्य होत नाही. सद्यःस्थितीत सुमारे २ कोटी रुपये प्रतीवर्षी देखभाल दुरुस्तीसाठी दिले जातात. हा निधी एकूणच कमी आहे.

**ग्रामीण पाणीपुरवठा**

७.२१. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये विविध प्रकारच्या/कायमच्या/तात्पुरत्या व विविध क्षमतेच्या १५८५६ नळ पाणीपुरवठा योजना असून पाणीपुरवठ्याची इतर साधने लक्षात घेतल्यावर सन १९९५ पर्यंत नळ पाणीपुरवठ्याच्या एकूण रु. २००० कोटी भांडवली खर्च झालेला आहे. बहुतांशी योजना एका गावासाठीच्या नळ पाणीपुरवठा योजना असून त्यावरील भांडवली खर्च रु. १० लाख (सरासरी ३ ते ४ लाख) पेक्षा कमीच असतो. अशा बहुतांश योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. अशा एका गावाच्या नळ पाणीपुरवठा योजनेचा देखभाल दुरुस्तीचा सर्वसामान्यतः भांडवली खर्चाच्या अंदाजे ३ ते ४ टक्के इतका येतो. या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केल्यानंतर या योजनेवरील देखभाल व दुरुस्ती खर्च पूर्णतः ग्राम पंचायतींनी करणे अपेक्षित आहे सध्या जिल्हा परिषदांमध्ये " नळ पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती निधी " निर्माण करण्यात आलेला असून ज्या ग्रामपंचायती देखभाल दुरुस्तीचा मोठा खर्च करू शकत नाही. त्याना या खास निधीमधून अर्थसहाय्य देणे अपेक्षित आहे. या देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषद त्यांना प्राप्त होणाऱ्या स्वतःच्या उत्पन्नामधून २० टक्के इतकी रक्कम अंशदान करतात. या शिवाय शासनाकडून एकूण नळ पाणीपुरठ्यासाठी उपलब्ध असलेल्या योजनांतर्गत तरतुदीच्या १० टक्के इतकी रक्कम जिल्हा परिषदांना देखभाल दुरुस्ती निधीमध्ये अंशदान म्हणून दिली जाते. याच तऱ्हेचा निधी ग्रामपंचायत स्तरावर उभारण्याचे प्रस्तावित आहे. या निधीमध्ये जमीन महसुल अनुदानाची ३५ टक्के रक्कम व जमा होणाऱ्या पाणीपट्टीचा समावेश करण्यात येणार आहे.

७.२२. एकापेक्षा अधिक गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांना प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना असे म्हणतात. याचे हस्तांतरण जिल्हा परिषदांकडे करावयाचे असते व या योजना जिल्हा परिषदांनी राबवावयाच्या असतात. सध्या महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने ग्रामीण भागामध्ये एकूण २५४ प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण केल्या असून त्यापैकी १५० योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. यावरील (एकूण २५४ योजनांवरील) भांडवली खर्च रु. ४०० कोटी आहे तसेच मोठ्या प्रमाणांत नळ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. या व्यतिरिक्त काही नळ पाणीपुरवठा योजना ब्रिटीश व जागतिक बँकेच्या सहाय्याने बाह्य सहाय्यता योजना राबविण्यात येत आहेत.

७.२३. एका गावासाठी असणाऱ्या छोट्या नळ पाणीपुरवठा योजना काही जिल्ह्यामध्ये समाधानकारक चालविल्या जात आहे आणि इतरत्रही थोड्या प्रयत्नांनी त्या सुव्यवस्थित ठेवण्यात घेऊ शकतील. मात्र प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या संदर्भात विशेषतः खर्चाच्या व व्यवस्थापनाच्या मुद्दयांवर परिस्थिती असमाधानकारक आहे. अनेक जिल्हा परिषदांनी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना त्यांचा देखभाल दुरुस्ती खर्च, त्यांना परवडण्यासारखा नसल्याने, हस्तांतरित करून घेतलेल्या नाहीत. अशा योजना महाराष्ट्र पाणीपुरवठा आणि जलनिःसारण मंडळाकडून चालविल्या जात आहेत. महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून या योजनांची पाणीपट्टी वसुली होत नसल्याने त्या मंडळाचा खर्चाचा बोजा वाढत आहे. या प्रयोजनासाठी शासनाकडून मंडळाला काही खास अनुदान प्राप्त होत नसल्याने, ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी मिळणाऱ्या नियमित अनुदानातूनच देखभाल दुरूस्तीचा खर्च होत राहतो व प्रत्यक्ष योजनांसाठी निधी अपुरा पडतो. ज्या जिल्हा परिषदांनी अशा योजना हस्तांतरित करून घेतलेल्या आहेत अशा जिल्हा परिषदांना या योजनांवरील देखभाल दुरूस्तीचा खर्च भागविणे अशक्य होत आहे आणि त्यांच्याकडून शासनाकडे अर्थसहाय्यासाठी वारंवार मागणी केली जात आहे. या संदर्भात अकोला आणि औरंगाबाद जिल्हा परिषद यांची उदाहरणे देता येतील. यापैकी अकोला जिल्हा परिषदेस प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेवरील येणारी तूट भरून काढण्यासाठी गेली २ वर्षे शासनाने खास बाब म्हणून रुपये ८४ लक्ष इतके अर्थसहाय्य प्रत्येक वर्षी दिले आहे. प्रादेशिक नळ पाणीपुरवठा

योजनांचा भांडवली खर्च आणि देखभाल दुरुस्ती खर्च हा बराच जास्त असतो. या योजनेमध्ये बऱ्याच अंतरावरून पाणी आणावे लागत असल्याने देखभाल दुरुस्तीचा खर्चही मोठ्या प्रमाणावर वाढतो. याशिवाय या योजनेच्या व्यवस्थापनाचा अवाका आणि क्षेत्र बरेच मोठे असल्याने व्यवस्थापन गुंतागुंतीचे असते. देखभालीसाठी कर्मचारीवृंद मोठ्या प्रमाणावर लागतो आणि शिवाय अनेक गावांना पाणीपुरवठा होत असल्याने त्या गावांकडून/ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी वसुलीची कामे कार्यक्षमतेने होत नाहीत. याबाबतचा उल्लेख ७.९ मध्ये करण्यात आला आहे.

७.२४. जागतिक बँक व ब्रिटीश सहाय्य यांतून तयार होणाऱ्या व मोठ्या खर्चाच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांमुळे जिल्हा परिषदांच्या वित्तीय व्यवस्थेवर फार मोठा ताण पडणार आहे. याशिवाय येत्या ५ वर्षांत जर्मनी आणि जपान यांचेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून इतर जिल्ह्यांमध्ये नळ पाणीपुरवठा योजना घेण्याचा विचार असून (यासंबंधी बोलणी चालू आहेत) असे झाल्यास देखभाल व दुरुस्तीच्या खर्चामुळे जिल्हा परिषदांची फार मोठी आर्थिक कुचंबणा होणार आहे. २०००–२००१ या सालापर्यंत ब्रिटीश अर्थसहाय्य व जागतिक बँक प्रकल्प यातील सर्व योजना पूर्णत्वाने कार्यान्वित होणार आहेत शिवाय जर्मनी व जपान यांच्याकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातूनही (यासंबंधीची बोलणी चालू आहेत.) काही योजना पूर्ण होतील. जर्मनी व जपान यांच्या सहाय्याने घेण्यात येणाऱ्या योजनांचा सध्या विचार न करताही असे म्हणता येईल की, २००१ सालापर्यंत ब्रिटीश सहाय्यित व जागतिक बँकेच्या सहाय्याने घेतलेल्या एकूण रुपये ३९० कोटी रुपये भांडवली खर्चाच्या अतिरिक्त पाणीपुरवठा योजना तयार होतील. याशिवाय सध्याच्या सर्व योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केल्यावर व सध्या ज्यांची कामे प्रगतिपथावर आहेत अशा योजना पूर्ण होऊन हस्तांतरित झाल्यावर जिल्हा परिषदांकडे एकूण अंदाजे १६०० कोटी रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी असतील. त्यावरील देखभाल दुरुस्तीचा खर्च जिल्हा परिषदांना मोठ्या प्रमाणात करावा लागणार आहे.

७.२५. वर नमूद केलेला खर्च हा केवळ नळ पाणीपुरवठ्यावर काम करणारे कर्मचारी, वीज बिले, इतर आस्थापना खर्च, रसायने, सुटे भाग आणि यंत्रसामुग्री यासाठीचा आहे. सध्या जिल्हा परिषदांकडील नळ पाणीपुरवठ्याच्या देखभालीची कामे लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे सोपविलेली आहेत. कोणत्याही जिल्ह्यामध्ये केवळ पाणीपुरवठा योजनांसाठी म्हणून स्वतंत्र कार्यकारी अभियंत्याचे पद उपलब्ध नाही. अनेक वर्षांपूर्वी जेव्हा पाणीपुरवठा व लघु पाटबंधारे या दोहांची कामे थोड्या प्रमाणात होती, त्या वेळी एक कार्यकारी अभियंता व एक विभाग पुरेसा होता. **मात्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये आता मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा देखभालीची कामे करावयाची असल्याने पाणीपुरवठ्यासाठी केवळ देखभाल व दुरुस्तीसाठी प्रत्येक जिल्ह्यात मालमत्तेच्या उत्पादकतेशी व उत्पन्नाशी सांगड घालून एक स्वतंत्र यंत्रणा असणे आवश्यक आहे.** यावर शासनातर्फे विचार सुरू आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी वेगळी यंत्रणा असण्याची कारणे अशी की, जिल्हा परिषदांमध्ये सध्याचा लघु पाटबंधारे विभाग प्रामुख्याने जलसंधारणाच्या योजना वा पाणीपुरवठ्याच्या योजना निर्माण करण्यासाठी आहे एखादी योजना तयार करणे आणि तयार झाल्यानंतर त्याची देखभाल करणे यामध्ये फार मोठा फरक असतो, देखभाल व दुरुस्तीच्या कामामध्ये तांत्रिक प्रकारच्या कामाव्यतरिक्त विविध कर्तव्ये व कर्मचारी आणि लाभधारक यांचा समन्वय साधणे आवश्यक असते. ग्रामपंचायतीनिहाय पाणीपट्टी वसूल करणे, वसूली होत नसेल अशा ठिकाणी प्रयत्न करणे आणि वसुली न होण्याची कारणे शोधून त्यावर कार्यवाही करणे, ग्रामपंचायतीकडून आणि सामान्य जनतेकडून विविध प्रकारच्या तांत्रिक/अतांत्रिक/वाटपासंबंधी इत्यादी आलेल्या तक्रारींचे निवारण करणे, पाणीपट्टी दर ठरविणे व समाधानकारक सेवा देणे या कामाचा देखभाल व दुरुस्तीमध्ये समावेश होतो. ही कामे सद्यःस्थितीला जिल्हा परिषदांमध्ये लघु पाटबंधारे विभागाकडून परिणामकारकरीत्या केली जात नाहीत. हे लक्षात घेता प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक स्वतंत्र देखभाल व दुरुस्ती यंत्रणेची आवश्यकता असून अशी यंत्रणा एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली असणे आवश्यक आहे. हा अधिकारी देखभाल व दुरुस्ती यंत्रणेचा व्यवस्थापक म्हणून गणला गेला पाहिजे. आणि देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य व तंत्रविषयक गुणवत्ता असणारा आवश्यक कर्मचारीवृंद, वित्तीय व्यवस्थेबाबत प्रशिक्षित व व्यावसायिक ज्ञान असणारा अधिकारी/कर्मचारीवृंद व तक्रार निवारणार्थ ग्रामपंचायतीशी सातत्याने संपर्क साधू शकणारा व उत्तम समाजशास्त्र-विषयक पार्श्वभूमी असणारा संपर्क अधिकारी असणे आवश्यक आहे. देखभाल व दुरुस्तीसाठीची यंत्रणा अशा पद्धतीने नवीन आव्हाने पेलू शकेल अशी असणे आवश्यक आहे.

७.२६. राज्यातील ग्रामीण भागामध्ये एकूण १ लक्ष १८ हजार विंधण विहिरी आहेत. या विंधण विहिरींची देखभाल जिल्हा परिषदांकडून केली जाते. सध्या प्रत्येक विंधण विहिरीचा देखभाल दुरुस्तीचा सरासरी खर्च हा रुपये ७०० येतो. मात्र ग्राम पंचायतीकडून सरासरीने फक्त रुपये २०० ते ३०० इतकीच वसुली करण्यात येते. याशिवाय रुपये २०० ते ३०० या दराने ठराविलेली वसुलीही प्रत्यक्षात ५० ते ६० टक्के होते. यावरून असे दिसून येते की, जिल्हा परिषदांना विंधण विहिरींच्या देखभालीसाठी एकूण रुपये १०.५० कोटी इतका खर्च येतो. त्यापैकी अंदाजे २.२५ कोटी इतक्या खर्चाची वसुली ग्रामपंचायतीकडून होते. उर्वरित खर्च ग्रामीण पाणीपुरवठा निधीतून केला जातो, त्यामुळे या निधीवर अतिरिक्त भार पडतो. नुकतेच शासनाने ग्रामपंचायतीकडून देखभाल संदर्भात घेणाऱ्या खर्चाचे दर सुधारले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदांना विंधण विहिरी दुरुस्तीसाठी जादा निधी उपलब्ध होणार आहे. ज्या गावात नळ पाणीपुरवठा योजना नाही तेथे पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी विंधण विहिरीचाच वापर होतो. हे लक्षात घेऊन **आयोग अशी शिफारस करीत आहे कि त्या गावामधील सार्वजनिक विहिरी व विंधण विहिरींवर ग्रामपंचायतीने ऐच्छिक कराऐवजी अनिवार्य कर समजून सामान्य पाणीपट्टीची आकारणी केली पाहिजे त्यासाठी ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्ती होणे आवश्यक आहे.**

**सार्वजनिक आरोग्य खात्याच्या समस्या**

७.२७. जिल्हा परिषदेच्या कर्तव्याच्या सूचीमध्ये सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण स्वच्छता याबाबत जिल्हा परिषदांच्या अंदाजपत्रकात वाजवी तरतूद करणे व यासंबंधात असलेल्या परियोजना राबविणे हे जिल्हा परिषदांचे प्रमुख कर्तव्य आहे. आयोगाने परिषदांच्या बैठका घेतल्या त्यामध्ये आरोग्य सेवेबाबत अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी खालील अडचणी मांडल्या :–

(१) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागा बहुतेक ठिकाणी गैरसोयीच्या ठिकाणी आहेत याचे कारण असे सांगण्यात आले की, प्राथमिक केंद्राची जागा ही विना मोबदला उपलब्ध व्हावयास पाहिजे. त्यामुळे केंद्राच्या जागा ह्या बहुतेक ठिकाणी गावाच्या बाहेर आहेत.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधासाठी देण्यात येणारे अनुदान औषधाच्या वाढलेल्या किंमती व ग्रामीण भागातील औषधांची गरज याचा विचार केल्यास कमी पडते. याशिवाय ग्रामीण भागात रोगाची साथ पसरल्यास हे अनुदान फारच अपुरे पडते.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वाहनासाठी प्रतिवर्षी रुपये ७,४०० अनुदान मंजूर असते, यापैकी रुपये ५,००० इंधनासाठी व रुपये २,४०० दुरूस्तीसाठी मंजूर असतात. सध्या प्रचलित असलेल्या डिझेलच्या किंमती विचारात घेतल्यास प्रत्येक महिन्यात वाहन ५०० कि. मी. जाऊ शकते. प्राथमिक आरोग्य केंद्राकडील कार्य विचारात घेता महिन्याला १००० कि. मी. धाव आवश्यक आहे. तरी शासनाने इंधनाच्या अनुदानात वाढ करावी व हे अनुदान रुपयाच्या निकषाऐवजी लिटरच्या प्रमाणात द्यावे.

(४) आरोग्य केंद्राच्या आकस्मिक खर्चासाठी प्रतिवर्षी ६,००० रुपये आकस्मिक अनुदान उपलब्ध असते. याची या अनुदानातून वीजखर्च, टेलीफोनखर्च, स्टेशनरी याचा खर्च भागवावयाचा असतो. त्यामुळे हे अनुदान अपुरे पडते.

**इतर खात्यांच्या अडचणी**

**समाजकल्याण खाते**

७.२८. जिल्हा परिषदांमार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे चालविली जातात. या विद्यार्थ्यांसाठी दरडोई रुपये २५० खर्च केला जातो. हा खर्च फारच अपुरा पडत असल्याचे जिल्हा परिषद भेटीच्या वेळी प्रतिपादन करण्यात आले. तसेच शासनाचे गवतारू घरे कौलारू करण्याच्या योजनेत प्रत्येक घरासाठी देण्यात येणारे अनुदान अपुरे असल्याचे सांगण्यात आले. समाजकल्याण खाते ज्या बालवाड्या चालविते तेथील शिक्षिकेस दरमहा रुपये ६० मानधन मिळते. हे अनुदान रुपये ३०० पर्यंत वाढवून द्यावे अशी मागणी करण्यात आली.

शिक्षण खाते

७.२९. जिल्हा परिषदांचा सर्वात जास्त खर्च प्राथमिक शिक्षण या विषयावर होतो. मात्र या खात्याच्या खर्चाचा विचार केला असता तो बहुतांश प्राथमिक शिक्षकांच्या पगारावरच खर्च होतो असे दिसते. मात्र शाळांच्या इमारती व इतर शालेय साहित्य याकरिता फारच अल्प तरतूद होत असल्यामुळे शाळांच्या इमारती, खडू, फळा, पिण्याचे पाणी व इतर शालेय वस्तु इत्यादी मुलभूत स्वरूपाच्या गरजा भागत नाहीत. त्यामुळे शिक्षक खऱ्या अर्थाने समाधानकारक काम करु शकत नाहीत. याकरिता एकूण खर्चाच्या निदान १२ टक्के तरतूद वरील खर्चासाठी आरक्षित ठेवणे गरजेचे आहे. असे सांगण्यात आले. प्राथमिक शाळेच्या इमारतींविषयी परिच्छेद ७.१६ मध्ये परामर्श घेण्यात आला आहे.

**पंचायत समित्यांची वित्तीय व्यवस्था**

७.३०. प्रचलित अधिनियमाच्या तरतुदी अन्वये जिल्हा परिषद निगमनिकाय संस्था असून तिचे स्वरूप स्वायत्त आहे. म्हणून तिला खास अधिकार प्राप्त झालेले आहेत. पंचायत समिती मात्र निगमनिकाय नाही किंवा स्वायत्त संस्थाही नाही ती अधिनियमाद्वारे निर्माण केलेली संस्था असून तिला कार्यकारी व देखरेखीचे अधिकार आहेत. तिचे स्वरूप मुलतः जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील यंत्रणा असे आहे.

७.३१. वित्त आयोगाने जिल्ह्यात ज्या बैठकी घेतल्या त्यात खालील मुद्दे मांडण्यात आले. पंचायत समित्यांना पूर्वी गट अनुदाने मिळत होती ती आता बंद झाली आहेत. त्यांचे सध्याचे उत्पन्न अगदी नगन्य आहे. पंचायत समित्या जिल्हा परिषदेची एजन्सी झालेल्या आहेत. पंचायत समित्यांची पाहणी केली असता असे दिसते की, जिल्हा परिषदांचा बराच मोठा कर्मचारीवृंद/अधिकारी पंचायत समितीस्तरावर अजूनही पंचायत समित्यांना हस्तांतरित योजनांच्या संदर्भात अधिकार नाहीत. तसेच त्यांचे उत्पन्न त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास अपुरा आहे. अधिनियमामध्ये पंचायत समित्यांना जे कार्यक्षेत्र नेमून दिलेले आहे ते जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये मोडत असल्यामुळे पंचायत समितींना स्वतःचे स्पष्ट असे कार्यक्षेत्र नाही. त्यासाठी कायद्यामध्ये काही निश्चित कार्यविषयक जबाबदाऱ्या पंचायत समित्यांकडे सोपविण्याचा बदल करावा लागेल. शिवाय गट पातळीवरील नियोजनाचीही अंमलबजावणी झाली पाहिजे. असे केल्यास पंचायत समित्यांना अधिक अधिकार प्राप्त होतील. त्यांच्या स्तरावरील योजना अधिक कार्यक्षमतेने राबविल्या जातील. तसेच त्या प्रमाणात जिल्हा परिषदेवरील कार्याचा भारही हलका होईल.

**ग्रामपंचायतीच्या आर्थिक अडचणी**

**घर व जमिनीवरील करापासून मिळणारे उत्पन्न**

७.३२. महाराष्ट्र राज्यात एकूण २७,२८९ ग्रामपंचायती आहेत. त्यांमध्ये ४३,०२७ गावांचा समावेश होतो. ग्रामपंचायतींच्या बाबतीत एक विशेष अडचण आहे की, ग्रामपंचायतींची संख्या फार मोठी आहे. त्यापैकी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांच्या आर्थिक, सामाजिक, भौगोलिक इत्यादी बाबत व मागासलेपणाबाबत फार मोठी विविधता आहे.

७.३३. सध्याचे घरावरील व जमिनीचे कराचे दर १९७५ साली सुधारित करण्यात आले. दरात सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादन करतांना या कराचा जो भांडवली मूल्यावर किंवा वार्षिक भाडे मूल्यावर आधारित दराचा जो आधार आहे त्याचे नियमित कालावधीनंतर पुनर्मुल्यन (Revalution of tax base) करणे आवश्यक आहे. बहुसंख्य पंचायती ते करीत नसल्याचे आढळते. मोठ्या ग्रामपंचायतींच्या बाबतीत ही वस्तुस्थिती अधिक प्रकर्षाने दिसून येते. यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेने इमारतीच्या क्षेत्रफळावर अधारीत कर आकारणी केल्याचे आढळले त्यामुळे ती वाजवी होऊनही तेथील ग्रामपंचायतीचे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. महाराष्ट्र वित्त आयोगातर्फे पुणे जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या ग्रामपंचायतींचा घरपट्टी आकारणीच्या नवीन पद्धतीचा अभ्यास केला असतांना ग्रामपंचायतीच्या घरपट्टीच्या मागणीमध्ये ६४ टक्केने वाढ झाल्याचे निदर्शनास आले. **या संदर्भात आयोग अशी शिफारस करीत आहे कि शासनाने पुणे जिल्हा परिषदेने अनुसरलेल्या पद्धतीचा अभ्यास करून इमारत व जमिनीवरील करविषयाच्या तरतुदीत योग्य ती सुधारणा करावी म्हणजे ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल.**

**ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवरील वेतनाचा प्रश्न**

७.३४. ग्रामपंचायती त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या वेतनावर एकूण खर्चाच्या ११.२४ टक्के खर्च करते (प्रकरण-४ ग्रामपंचायतीचा खर्च) याशिवाय स्वच्छता, आरोग्य व पाणीपुरवठा यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार त्या शिर्षाखाली दाखविला असल्यास हा खर्च वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांना सन १९६२ पासून किमान वेतन दर देण्यात आले असून सन १९८९ मध्ये शासनाने ३ जुलै १९९० च्या अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित किमान वेतन दर विहित केलेले आहेत. हे किमान वेतन दर निश्चित करण्यासाठी सन १९८९ मध्ये श्री. पी. डी. कसबेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. सन १९९०–९१ च्या आकडेवारीनुसार राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये २७,२४९ पूर्णवेळ तर १०,७४८ अर्धवेळ कामगार होते. गेल्या ४–५ वर्षांमध्ये कसबेकर समितीच्या शिफारशीनुसार किमान वेतन दर सुधारित केल्यानंतर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून सातत्याने अशी तक्रार येत आहे की, बहुतांशी ग्रामपंचायती आपल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन दरानुसार वेतन देत नाहीत. यासंबंधी विधी मंडळातही अनेकदा प्रश्नाद्वारे व इतर माध्यमांतून या प्रश्नावर चर्चा होत आहे. याची माहिती घेतल्यानंतर असे दिसून येते की, बऱ्याच ग्रामपंचायतींचे स्वतःचे उत्पन्न फारच कमी असल्यामुळे ग्रामपंचायत किमान वेतन दराची अंमलबजावणी करू शकत नाही शासनाने याबाबत अशी भूमिका घेतलेली आहे कि ग्रामपंचायतीचे कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या वेतनाचे कोणतेही दायित्व शासनाने स्वीकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मात्र अशी भूमिका घेत असताना ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढावे, त्या आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हाव्यात व ग्रामपंचायतीची स्वतःची उत्पन्न व साधनसामुग्रीची मर्यादा लक्षात घेऊन किमान संख्येने कर्मचारी ठेवावेत यासाठी शासनाने काही प्रयत्न केलेले आहेत. उत्पन्न वाढविण्यासाठी जमीन महसुलावरील उपकर वाढविण्यात आले असून मुद्रांक शुल्क अनुदान दुपट्टीने वाढविण्यात आले आहे. असे असूनही ग्रामपंचायतींच्या कर्मचाऱ्यांचा किमान वेतनाचा प्रश्न बहुतांशी ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे समाधानकारकरित्या सुटलेला नाही. म्हणून ग्रामपंचायतींच्या आर्थिक गरजांचा विचार करीत असताना ग्रामपंचायत कमीत कमी वेतन दरानुसार वेतन देऊ शकतील असे पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र वित्त आयोगास शासनाकडून किमान वेतन दराविषयी जी माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, त्यानुसार कर्मचारी वर्ग असलेल्या २३,५९८ ग्रामपंचायतींपैकी ६,९९७ ग्रामपंचायती त्यांच्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन दराने वेतन देत आहे. उर्वरित १६,६०० ग्रामपंचायती किमान वेतन दर देत नसल्याचे आढळते. त्यांचे एकंदर ग्रामपंचायतींशी प्रमाण ७० टक्के असल्याचे निदर्शनास आले. वरील ग्रामपंचायतींनी ४२,७८९ एवढा कर्मचारी वर्ग नेमलेला आहे. त्यापैकी २४,२५१ कर्मचाऱ्यांना किमान वेतन दराने वेतन मिळत नसल्याचे निदर्शनास येते व त्यांचे एकंदर कर्मचाऱ्यांशी प्रमाण ५७ टक्के असल्याचे निदर्शनास येते. या सर्व कर्मचाऱ्यांना किमान वेतन दराने जर वेतन द्यावयाचे असल्यास ग्रामपंचायतीवर मोठा भार पडणार आहे.

७.३५. ग्रामपंचायतींची उत्पन्नाची साधने बघितली असता ग्रामपंचायतीच्या करेतर बाबींचा एकूण उत्पन्नात हिस्सा फारच कमी म्हणजे एकूण उत्पन्नाच्या ५.५ टक्के असल्याचे आढळते. या तऱ्हेचे उत्पन्न वाढविण्यासाठी फारसे प्रयत्न होत असल्याचे आढळत नाही. ग्रामपंचायतीच्या करविषयक उत्पन्नाच्या मर्यादा लक्षात घेऊन भविष्यात या प्रकारचे उत्पन्न वाढविणे ग्रामपंचायतीस आवश्यक ठरणार आहे. गावातील तळ्याचा मत्स्योत्पादनासाठी वापर करणे, सामाजिक वनीकरणाच्या योजनेचा फायदा घेऊन वनीकरणापासून उत्पन्न मिळविणे, जवाहर रोजगार योजनेमधून बांधण्यात येणाऱ्या इमारतींपासून उत्पन्न मिळविणे, इत्यादी उपाययोजनांमधून ग्रामपंचायतींनी करेतर बाबींवरील उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने ग्रामपंचायतींना प्रोत्साहन द्यावे अशी आयोग शिफारस करीत आहे.

□ □

## प्रकरण ८

# नागरी स्थानिक संस्थांच्या अडचणी व प्रश्न

८.१. नागरी स्थानिक संस्थांचे प्रश्न व अडचणी हे त्यांच्याकडे सोपविलेली कार्ये व जबाबदाऱ्या आणि कर विषयक अधिकार यामधून निर्माण होतात. या अगोदर प्रकरण ५ मध्ये या नागरी संस्थांच्या सद्य:स्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे. भारतीय संविधानात झालेली ७४ वी दुरुस्ती लक्षात घेऊन राज्य शासनाने नुकतीच काही सांविधानिक कार्ये, ज्याबद्दल पूर्वी वैधानिक तरतुदी नव्हत्या, ह्या संस्थांकडे सोपविलेली आहेत. ही सोपविलेली अतिरिक्त कार्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ह्या संस्थांनी स्वतः साधनसंपत्ती उभी करावी असे गृहीत धरण्यात आलेले दिसते.

### नागरी संस्थांच्या कर आकारणीतील सर्वसाधारण अडचणी

८.२. नागरी संस्थांना त्यांच्या क्षेत्रात कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी लागणारी साधनसंपत्ती उभी करता यावी याकरिता विविध कर आकारण्याचे आणि वसूल करण्याचे अधिकार अधिनियमाद्वारे या संस्थांना प्रदान करण्यात आलेले आहेत. जेव्हा अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करण्याचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या उत्पन्नाच्या साधनाचा एकत्रित आढावा घेतला जात नाही, तर केवळ ठराविक निवडक बाबींकडेच लक्ष दिले जाते. उत्पन्नांचे जे मोठे स्त्रोत आहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे हे जरी मान्य असले तरी कमी उत्पन्नाची जी साधने आहेत त्याकडेही उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने या संस्थांनी अधिक लक्ष दिले पाहिजे.

८.३. वरील बाबींचा विचार करता करांच्या संदर्भात आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :—

**(१) नागरी संस्थांच्या सर्व कायद्यातील तरतुदीमध्ये करांच्या दराबाबत सध्या तरी एकवाक्यता दिसून येत नाही. यापुढे सर्व कायद्यामध्ये एकवाक्यता यावी या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.**

**(२) करांचे दर.**—अधिनियमाद्वारे आणि नियमान्वये शासनाने काही विशिष्ट करांचे किमान आणि कमाल दर निश्चित करून दिलेले आहेत. काही बाबतीत असे आढळून आले आहे की, या संस्था कमाल मर्यादेपर्यंत कराची आकारणी करीत नाहीत, तर केवळ किमान दर आकारतात व त्यात वेळोवेळी सुधारणा करीत नाहीत किंवा जेमतेम मध्यंतरीचा टप्पा गाठतात. **तेव्हा उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने दर आकारणीच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचण्यासाठी या संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत.**

**(३) करांचे दर सुधारण्याचे प्रस्ताव.**—उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने करांच्या दरामध्ये बदल करण्यासाठी अधिनियमात किंवा नियमांत सुधारणा करण्यासाठी शासन मान्यतेसाठी नागरी संस्था जेव्हा प्रस्ताव पाठवितात, त्यांना वेळीच शासन मान्यता प्राप्त होत नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. **या संदर्भात आयोग असे सुचविते की, नियमांमध्ये सुधारणा करण्याचे जे प्रस्ताव असतात आणि ज्याबाबतचा अंतिम निर्णय शासनाच्या स्तरावर होतो, अशा प्रस्तावांबाबत शक्यतोवर तीन महिन्यांच्या आत शासनाने आपला निर्णय संबंधित नागरी संस्थेला कळवावा. ज्या प्रस्तावासंदर्भात अधिनियमात बदल करणे अपेक्षित आहे, असे प्रस्ताव शासनाने विधीमंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्याकरिता प्राधान्याने कार्यवाही करावी.**

८.४. नागरी संस्थांच्या करविषयक अडचणींची प्रामुख्याने खालील तीन भागात विभागणी करता येईल.—

(१) **प्रमुख करविषयक अडचणी.**—यात मालमत्ता व जकात कर याचा समावेश आहे.

(२) **इतर कर.**—ज्यापासून नागरी संस्थांना कमी उत्पन्न मिळते अशा करविषयक बाबी.

(३) **करेतर उत्पन्नाच्या इतर बाबी.**—यांत (१) नागरी संस्था लावत असलेले शुल्क, दर व आकार यांचा व (२) सेवासुविधांसाठी लावण्यात येणारा सेवा आकार याचा समावेश आहे.

वरील अडचणींचा सविस्तर उहापोह खालील परिच्छेदात केला आहे.

**मालमत्ता कर**

**भाडे नियंत्रण कायदा—**

८.५. मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी भाडे नियंत्रण कायद्यामधील तरतुदींचा फार मोठा अडसर आहे. मालमत्ता करासाठी निश्चित केलेले करयोग्य मूल्य त्या मालमत्तांच्या स्वरूपात बदल झाल्याशिवाय किंवा नूतनीकरण केल्याशिवाय वाढविता येत नाही. हा एक फार जुना असा प्रश्न आहे. भाडे नियंत्रण कायद्यामुळे नागरी संस्थांच्या मालमत्ता कराच्या आकारणीत कसा अडसर निर्माण होतो, तसेच नागरी संस्थांना या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नास कसे मुकावे लागते याचा उहापोह आणि उल्लेख यापूर्वीच्या विविध समित्यांनी/आयोगानी त्यांच्या अहवालात केला आहे. श्री. बी. पी. पटेल आयोगाने देखील या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी भाडे नियंत्रण कायदा व नागरी संस्थांच्या कायद्यात सुधारणा सुचविल्या होत्या.

८.६. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या वेळेपासून अंमलात असलेल्या भाडे नियंत्रण कायद्यामुळे गेली ५० वर्षे जुन्या इमारतींची भाडी गोठल्यामुळे वाढविता आलेली नाहीत व त्यामुळे घर भाड्यावर आधारित असलेले करयोग्य मूल्य देखील वाढविता आले नाही. याचा परिणाम असा झाला की, जुन्या इमारतींच्या घरमालकांकडून त्या इमारतींचे करयोग्य मूल्य कमी असल्याने मालमत्ता कराचे रुपाने फार कमी रक्कम नागरी संस्थांना मिळते. याउलट शहरामध्ये नव्याने बांधलेल्या इमारतींच्या मालकांना, त्यांच्या इमारतीचे करयोग्य मूल्य प्रचलित भाड्याशी निगडित असल्यामुळे त्यांना त्याचे क्षेत्र जुन्या इमारतीएवढे किंवा कमी असूनही जादा मालमत्ता कर भरावा लागतो. मालमत्ता कराची योजना सध्याच्या खऱ्या भाड्यावर आधारित अशी नसल्याने नागरी संस्थांकडून समान पातळीवर सेवा मिळणाऱ्या निरनिराळ्या नागरिकांना त्या सेवेची किंमत म्हणून वेगवेगळ्या दराने कर द्यावे लागणे हे सर्वथा अनुचित विषमता निर्माण करणारे आहे. या संदर्भात आयोग अशी शिफारस करीत आहे की, नागरी संस्थांच्या **मालमत्ता कराच्या महसुलात होणारे आर्थिक नुकसान तसेच एकाच शहरातील नागरिकांवर होत असलेली कर आकारणीतील विषमता दूर करण्याचे दृष्टीकोनातून भाडे नियंत्रण अधिनियमांत आणि नागरी संस्थांच्या अधिनियमात योग्य त्या सुधारणा होणे गरजेचे आहे. या संदर्भात भारत सरकारने तयार केलेला नमुना भाडेनियंत्रण कायदा, १९९२ (मॉडेल रेन्ट कंट्रोल लॉ, १९९२) मधील तरतुदी विचारात घेऊन, भाडेनियंत्रण अधिनियमांत सुधारणा करता येईल काय, याचा शासनाने विचार करावा आणि भाडे नियंत्रण कायद्याचा प्रभाव नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे करयोग्य मूल्य निर्धारित करताना पडणार नाही अशी सुधारणा करण्यात यावी.** नागरी क्षेत्रात सध्या मालमत्तांचे कर योग्य मूल्य काढताना त्या जागेचे भाडेमूल्य विचारात घेतले जाते. करयोग्य मूल्य काढण्यासाठी भाडे मूल्याऐवजी मालमत्तांचे क्षेत्रफळच फक्त विचारात घेऊन त्या आधारावर कराचे दर ठरविता येईल किंवा कसे याबाबत विचार व्हावा असे आयोगाला वाटते. यात असे दर ठरविताना इमारतीचे स्थान, क्षेत्रफळ, बांधकामाचा प्रकार या बाबींना योग्य तो भार (वेटेज) देऊन विरूद्ध अर्थसहायित तत्वाची (क्रॉस सबसीडी) अंमलबजावणी केली तर उत्पन्नात चांगली वाढ होऊ शकेल.

**नगरपरिषदा क्षेत्रातील मालमत्तांचे फेरमूल्यांकन**

८.७. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये मालमत्ता करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ व्हावी या दृष्टीकोनातून नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांच्या फेरमूल्यांकनाचे काम दर चार वर्षांनी त्या विषयातील तज्ञ अधिकाऱ्यांकडून व्हावे यासाठी नगररचना संचालनालयातील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. शासनाने १९९२ व १९९३ या कालावधीत राज्यातील सर्व नगर परिषदांसाठी नगररचना संचालनालयाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक " प्राधिकृत मूल्यांकन अधिकारी " म्हणून केली. मार्च १९९५ पर्यंतच्या तीन वर्षांत राज्यातील एकूण २३२ पैकी १२७ नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रांतील फेरमूल्यांकनाचे काम पूर्ण झाले असून आणखी ३९ नगरपरिषदांचे काम प्रगतीपथावर आहे.

८.८. या प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्यांच्याद्वारे करण्यात आलेल्या मूल्यांकनाबाबत नागरिकांकडून फार मोठ्या प्रमाणात असंतोष प्रगट झाला. फेरमूल्यांकनाबाबत आक्षेप घ्यावयाचा झाल्यास न्यायालयात अपील करावे लागत असे व त्यावर निर्णय होण्यास फार विलंब लागत असे, म्हणून शासनाने अलिकडेच उक्त अधिनियमाची कलमे १६९ ते १७१ सुधारित करून मालमत्ता कर अपील समितीची नेमणूक करण्याची तरतूद केली. ही व्यवस्था दिनांक २ नोव्हेंबर १९९४ पासून अंमलात आली आहे.

८.९. नगर रचना संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत झालेल्या मालमत्ताच्या फेरमूल्यांकनामुळे मालमत्ता करापासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये पुढीलप्रमाणे वाढ अपेक्षित आहे :—

| | | | |
|---|---|---|---|
| " अ " वर्ग नगरपरिषदा | .. | .. | १२५ टक्के |
| " ब " वर्ग नगरपरिषदा | .. | .. | ११० टक्के |
| " क " वर्ग नगरपरिषदा | .. | .. | १४० टक्के |

या अपेक्षित वाढीबाबत काही प्रकरणांत मालमत्तेच्या मालकांनी तक्रारी केल्यानंतर अपील समितीकडून मूल्यांकनात बदल झाला तर वरील टक्केवारीत काही बदल होण्याची शक्यता असली, तरीदेखील मालमत्ता कराचे उत्पन्नात अंतिमतः होणारी वाढ काही नगरपरिषदांचे बाबतीत दुपटी एवढी तरी होईल असे आयोगाने गोळा केलेल्या आकडेवारीवरून दिसून येते. **आयोगाची अशी शिफारस आहे की, नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे फेरमुल्यांकन समयबद्ध रीतीने वेळचेवेळी झाले पाहिजे, म्हणजे नागरीकांवर कराचा अचानक बोजा पडणार नाही व त्यामुळे त्यांच्यात असंतोषही निर्माण होणार नाही. तसेच फेरमूल्यांकनानुसार करावयाच्या कर आकारणीची अंमलबजावणी संबंधित नागरी संस्थांनी त्वरित अंमलात आणली पाहिजे.**

८.१०. महानगरपालिका क्षेत्रात इमारती व जमिनीचे फेरमूल्यांकन महानगरपालिकेच्या स्वतःच्या यंत्रणेमार्फत करणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेच्या अधिनियमामध्ये फेरमूल्यांकन चार वर्षांनी करण्याची स्पष्ट तरतूद आहे. **तशी स्पष्ट तरतूद महानगरपालिकांच्या अधिनियमामध्ये नाही फेरमूल्यांकनाबाबत अधिनियमांत निश्चित स्वरूपाची स्पष्ट तरतूद करण्यात यावी अशी काही महानगरपालिकांची मागणी आहे व त्या बरहुकूम कार्यवाही व्हावी अशी आयोगाची शिफारस आहे.**

### मालमत्ता कराची वसुली

८.११. मालमत्ता कराची वसुली वेळेवर व्हावी यासाठी महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमाच्या कलम १५० (३) मध्ये अशी तरतूद आहे की, करदात्याने करविषयक नोटीस मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम भरली तर त्याला त्या रकमेच्या १ टक्का इतकी सूट देण्यात यावी. मालमत्ता कराची रक्कम त्याविषयी नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत न भरणाऱ्या मालमत्ताधारकांना व्याज आकारण्याची तरतूद १९६५ च्या महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमाच्या कलम १६६ मध्ये आहे. त्यानुसार विलंबित कालावधी १५दिवस ते ६ महिन्यापर्यन्त असल्यास प्रतिमाह १/२ टक्का व त्यापुढील कालावधीकरिता प्रतिमाह १ टक्का व्याज आकारणी करता येते. ही व्याज आकारणी इतकी अल्पदराची आहे की, मोठ्या रकमा थकबाकीमध्ये ठेवणाऱ्यांना त्या दराने व्याज भरणे ही गोष्ट शिक्षात्मक वाटत नाही व नागरी संस्थांना त्यापासून फार कमी प्राप्ती होते. **या संदर्भात वित्त आयोगाची अशी शिफारस आहे की, शिक्षात्मक व्याजाचा दर दरमहा एकूण देय रकमेच्या २ टक्के एवढा असावा.**

८.१२. जे मालमत्ताधारक मालमत्ता कराच्या आकारणी संदर्भात कोणतीही रक्कम न भरता न्यायालयात दावे दाखल करतात त्यामुळे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल लागेपर्यन्त त्या वर्षाच्या कराच्या रकमेचाच नव्हेतर त्या पुढील वर्षांच्या कराच्या रकमेची वसुली होण्यास अडसर निर्माण होतो व नागरी संस्थांची अशा प्रकरणी फार मोठी रक्कम गुंतून पडते. **तेव्हा कराच्या रकमेबाबत काही विवाद निर्माण झाल्यास अपील दाखल करण्यापूर्वी मालमत्ताधारकाने पूर्वीच्या मागणीच्या १०० टक्के रक्कम तरी या संस्थांकडे भरणे आवश्यक असेल. त्याच बरोबर या विवादाचा निकाल लागेपर्यन्तच्या नंतरच्या वर्षांच्या मागणीपोटीही पूर्वीच्या मागणीएवढी १०० टक्के रक्कम या संस्थांकडे प्रथम भरावी अशी तरतूद नियमात/अधिनियमात होणे आवश्यक आहे, अशी आयोगाची शिफारस आहे.**

## मोकळ्या भूखंडावरील कर आकारणी

८.१३. मालमत्ता करासंबंधी अधिनियमात इमारती व जमिनी यांच्या करपात्र मूल्यांवर कर आकारणी करण्याचे अधिकार नागरी संस्थांना आहेत. तथापि बऱ्याच महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील मोकळ्या भूखंडांवर कर आकारणी केली जात नाही. बऱ्याचशा भूखंडांचे ले-आऊट मंजूर केलेले असतात, परंतु विकसित न करता मोकळ्या ठेवलेल्या भूखंडांचे मूल्य कालमानानुसार वाढत असले तरी त्यांचे करपात्र मूल्य कशा पद्धतीने ठरवावे व कोणत्या कमाल/किमान दरांच्या मर्यादेत कर आकारणी करावी याबाबत स्पष्ट तरतूद नियमांमध्ये नाही. त्यामुळे या आकारणीबाबत बऱ्याच नागरी संस्था संभ्रमात आहेत. यासंबंधी या आयोगाची अशी शिफारस आहे की, **' असे भूखंड विक्रीमुळे हस्तांतरित होताना मुद्रांक शुल्क ठरविण्यासाठी नगर-रचना संचालनालयाच्या वतीने निरनिराळ्या विभागांतील मिळकतीचे जे आधारभूत मूल्य ठरविले जाते, तेच मूल्य विचारात घेऊन त्यावर प्रतिवर्षी ६ टक्के दराने वाढ करून भाडे मूल्य निश्चित करण्याची तरतूद अधिनियमांत करावी. मोकळ्या भूखंडावर कर आकारणीची पद्धत, त्यांचे मूल्यांकन, कराचे दर इत्यादीबाबत निश्चित अशी मार्गदर्शक तत्वे ठरवून नियमात योग्य ते बदल तातडीने करणे आवश्यक आहे.**

## केंद्र शासनाच्या मालमत्ता

८.१४. केंद्र शासनाच्या मालकीच्या तसेच केंद्रीय उपक्रमांच्या मालकीच्या मालमत्तेवर राज्य सरकार व स्थानिक संस्था यांना कोणताही कर बसविता येत नाही. तर सर्वसाधारण कर आकारणी ऐवजी एक ठराविक रक्कम किंवा सेवाशुल्क या नागरी संस्थांना मिळते. तसेच राज्य शासनाच्या मालमत्तांवर सवलतीच्या दराने कर आकारणी करावी लागते. यामुळे या नागरी संस्थांना मालमत्ता करापासूनच्या उत्पन्नास वंचित व्हावे लागते व आर्थिक नुकसान सोसावे लागते. याबाबत या आयोगाने राज्यातील कांही महानगरपालिकांकडून केंद्र शासनाच्या मालकीच्या मालमत्तांवर सर्वसाधारण कर आकारणीप्रमाणे करापोटी मिळावयाची रक्कम व त्या पोटी प्रत्यक्षांत केंद्र शासनाकडून मिळालेली रक्कम किंवा सेवाशुल्क व त्यामुळे महानगरपालिकांना होणारे नुकसान याबाबतची माहिती गोळा केली. त्याचा तपशिल तक्ता क्रमाक ८.१ मध्ये दिला आहे :—

तक्ता क्रमांक : ८.१

(रुपये लाखांत)

| अनु-क्रमांक | महानगरपालिका | | एकूण मालमत्तांची संख्या | करयोग्य मूल्य (१९९५-९६ च्या आकारणी नुसार) रुपये | पूर्ण दराने कर आकारणी केल्यास कराची रक्कम रुपये | केंद्र शासनाकडून कराऐवजी मिळालेली रक्कम किंवा सेवा शुल्क रुपये | महानगर-पालिकांना झालेले नुकसान रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१ एप्रिल १९३७ पूर्वी बांधलेल्या** | | | | | **(अ) केंद्र शासन मालमत्ता (रेल्वे वगळून)** | | |
| १ | मुंबई | .. | २,८४०* | ५०.११ | ३९.०९ | १२.६३ | २६.४६ |
| २ | पुणे | .. | १२ | २.०२ | ०.९१ | ०.५० | ०.४० |
| | | | | | **(ब) रेल्वे मालमत्ता** | | |
| १ | मुंबई | .. | ४,८८१* | ४१.५५ | ३२.४१ | ६.९८ | २५.४३ |
| **१ एप्रिल १९३७ नंतर बांधलेल्या** | | | | | **(अ) केंद्र शासन मालमत्ता (रेल्वे वगळून)** | | |
| १ | मुंबई | .. | २,८४०* | ५२८.४५ | ३७६.३९ | १६६.३१ | २१०.०८ |
| २ | पुणे | .. | ३५ | १५२.४८ | ७९.२९ | ३७.८७ | ४१.४२ |
| ३ | पिंपरी-चिंचवड | .. | २२ | ४४.११ | १७.१७ | ८.४२ | ८.७५ |
| ४ | अमरावती | .. | ४९४ | १२६.२२ | ३९.०४ | ०.४० | ३८.६४ |
| ५ | सोलापूर | .. | २२५ | २०.९९ | १२.४० | १०.७३ | १.६७ |
| | | | | | | **(ब) रेल्वे मालमत्ता** | |
| १ | मुंबई | .. | ४,८८१* | १६३.५० | १२७.५४ | ५७.६१ | ६९.९३ |
| २ | पुणे | .. | ३ | ७.८७ | ४.०२ | १.४७ | २.५५ |
| | एकूण | .. | ... | ... | ६५५.८५ | २८२.८१ | ३७३.०४ |

* यात मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील केंद्र शासनाने १ एप्रिल १९३७ पूर्वी किंवा त्यानंतर बांधलेल्या इमारतींचा समावेश आहे.

८.१५. १९९५-९६ च्या कर आकारणीचे दर विचारात घेऊन महानगरपालिकांना मिळणारे अपेक्षित उत्पन्न व त्यापोटी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या/होणाऱ्या रकमांचा वरील तक्त्यामधील तपशील लक्षांत घेता मुंबई व पुणे महानगरपालिकांना केंद्र शासनाच्या मालमत्तावरील करापोटी होणारे नुकसान अनुक्रमे रु. २६.४६ व ०.४० लाख आहे तर रेल्वे (मध्य व पश्चिम) च्या मालमत्तेवरील करापोटी रु. २५.४३ लाख नुकसान झाले आहे. केंद्र शासनाच्या तसेच रेल्वेच्या मालमत्तेचा एकत्रित विचार केल्यास मुंबई महानगरपालिकेला करापोटी रु. ७१.५० लाख (३९.०९ + ३२.४१) उत्पन्न मिळाले असते. परंतु प्रत्यक्षात मात्र रु. १९.६१ लाख एवढेच उत्पन्न अपेक्षित असल्याने रु. ५१.८९ लाख एवढे नुकसान आहे. इतर महानगरपालिकांनाही केंद्र शासन तसेच रेल्वेच्या मालमत्तांपासूनच्या करापोटी नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तक्त्यात नमूद केलेल्या महानगरपालिकांना एकूण रु. ३७३.०४ लाखाचे नुकसान अपेक्षित आहे.

८.१६. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भारतीय संविधानांत झालेल्या सुधारणेनुसार आता पूर्वी नसलेला असा एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला आहे हे लक्षात घेता **काही सार्वजनिक हिताचे खास कारण असल्याशिवाय सर्वच सरकारी मालमत्तेवर (त्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे-महामंडळे यांच्याही मालमत्तांचा समावेश असेल.) स्थानिक संस्थांना सर्वसाधारण करदात्याप्रमाणे कर आकारणीचे अधिकार दिले पाहिजेत आणि कराचा भरणा केला पाहिजे. या दृष्टीने तपशीलवार अभ्यास करून अधिनियमात योग्य त्या सुधारणा करण्यासाठी विचार व्हावा. केंद्र शासनाच्या आणि त्यांची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमे, मंडळे, महामंडळे इत्यादींच्या मालमत्तांवर वरील प्रकारे कर आकारणी करण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या कायद्यात अथवा नियमांत बदल करणे आवश्यक असल्यास, त्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा.**

### जकात कर

८.१७. जकात कर हा अप्रत्यक्ष कर असून सर्वच नागरी संस्था या करापासून त्यांच्या स्वतःच्या एकूण उत्पन्नाच्या जवळजवळ ७४ ते ७७ टक्क्यापर्यंत उत्पन्न प्राप्त करतात. हा कर रद्द करावा अशी व्यापारी तसेच वाहतूकदार या वर्गाची फार जुनी मागणी आहे. परंतु या कराएवढे सतत वाढ होणारे उत्पन्नाचे पर्यायी साधन नागरी संस्थांना उपलब्ध करून दिल्याशिवाय हा कर रद्द करणे योग्य ठरणार नाही. अशीच भूमिका सर्व नागरी संस्थांनी घेतली आहे. या कराच्या आकारणी व वसुली संदर्भात व्यापाऱ्यांच्या बऱ्याच तक्रारी असून कर वसुलीत भ्रष्टाचार व गळती असल्याचेही निदर्शनास आले आहे परंतु ज्या ज्या नागरी संस्थांनी कर व्यवस्थापनात कार्यक्षमता आणली व देखरेख व नियंत्रणाचे प्रमाण वाढविले त्या त्या प्रकरणी या नागरी संस्थांच्या जकातीच्या उत्पन्नात चांगलीच वाढ झाल्याचे दिसून आले. आयोग अशी शिफारस करीत आहे की, जकातीपासूनचे उत्पन्नवाढीसाठी जकातीच्या दरात वाढ करणे हाच एकमेव पर्याय नसून **जकात वसुलीच्या संदर्भात योग्य व सक्षम व्यवस्थापन व त्यावर नियंत्रण व देखरेख ठेवावी कर चुकवेगिरी व लाचलुचपत करणाऱ्या व्यक्तीवर व वसुली यंत्रणेत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांवर ठोस आणि कडक कार्यवाही व्हावी या योगे जकात करापासूनच्या उत्पन्नात भरीव वाढ होऊ शकते. उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून जकात वसुलीचे लक्ष ठरवून दिल्यास व त्याप्रमाणे किंवा त्यापेक्षा जास्त जकातीची वसुली झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनात्मक काही बक्षिसे देण्याबद्दल या संस्थांनी विचार करावा.**

८.१८. नगरपरिषदांसाठी शासनाने १९६६ मध्ये तयार केलेले नगरपरिषद जकात नियम अंमलात आहेत. आता जवळजवळ ३० वर्षांचा कालावधी लोटला असून व्यापार उदीमाच्या प्रकारातही आमूलाग्र बदल झालेले आहेत. हे विचारात **घेता जकात नियमातील तरतुदींचे काळानुरुप पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे.** या संदर्भात आयोग खालील शिफारशी करीत आहे :—

(अ) **जेथे जकातीचे दर वजनावर आधारित आहेत, ते मूल्यावर आधारित करता येत असल्यास त्याप्रमाणे त्यात सुधारणा करून बदलण्यात यावेत.**

(ब) नागरी संस्थांची जकातीची वसुली जकात नाक्यावर केली जाते. परंतु आयात करण्यात आलेल्या मालावर भरलेली जकात कितपत बरोबर भरली याचा पडताळा प्रचलित पद्धतीत घेता येत नाही. या पद्धतीत सुधारणा करून व्यापाऱ्यांचे लेखे चाचणी स्वरूपात तपासण्याचे अधिकार प्रदान केल्यास प्रत्यक्ष भरलेला जकात

कर कितपत बरोबर होता हे तपासता येईल व त्यामुळे करचुकवेगिरीला दुहेरी आळा बसू शकेल. **या दृष्टीकोनातून व्यापाऱ्यांचे लेखे तपासण्यासाठी नगरपरिषदांच्या अधिकाऱ्यांना/बाह्य लेखा परिक्षकांना अधिकार देण्याबाबत नियमात योग्य त्या सुधारणा करण्याचा विचार व्हावा.**

**(क) करचुकवेगिरी संदर्भात ज्या दंडात्मक तरतुदी आहेत त्या अधिक कठोर कराव्यात. त्यामुळे देखील जकात चुकवेगिरीला आळा बसू शकेल.**

### अभिकर्त्याद्वारे जकातीची वसुली

८.१९. जकात कर हे राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. जकात कर संकलन करणे हे नियमित स्वरूपाचे काम असून या कार्यावर देखरेख ठेवणे, तपासणी करणे, त्याचे अभिलेखे ठेवणे इत्यादीमध्ये या संस्थांचा फार मोठा वेळ व शक्ती खर्च होते. हे जकात संकलनाचे काम कोणत्याही प्रकारचे नुकसान न होता खाजगी व्यक्ती/संस्थाद्वारे केल्यास त्यामुळे या स्पर्धेच्या काळात नागरी संस्थांना जादा वाढीव उत्पन्न मिळेल व त्यामुळे कर्मचाऱ्यांवरील खर्च कमी होईल व तो निधी शहरातील इतर विकासाच्या कामाकडे वापरता येईल. या दृष्टीने महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ मध्ये जकात कराच्या वसुलीसाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली. शासनाने अधिनियमांत सुधारणा करून १४३-अ हे नवे कलम अंतर्भूत केले व जकात वसुलीचे काम अभिकर्त्याद्वारे करण्याची योजना कशी कार्यान्वित करावी याबाबतची कार्यपद्धती व अन्य अनुषंगिक बाबी शासनाने आदेशाद्वारे विहित केल्या आहेत.

८.२०. विहित कार्यपद्धतीस अनुसरून राज्यातील बऱ्याच नगरपरिषदांनी जकात कर वसुलीचे काम अभिकर्त्याकडे सोपविले आहे. महानगपालिकांमध्ये अमरावती या एकमेव महानगरपालिकेने जकात वसुलीचे खाजगीकरण केले आहे. मराठवाडा विभागात बऱ्याच नगरपरिषदांनी ही पद्धती अनुसरली आहे. या विभागातील नगरपरिषदांचा या पद्धतीबाबत काय अनुभव आहे याचा अभ्यास आयोगाने केला असता त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :—

८.२१. मराठवाडा विभागात अभिकर्त्याद्वारे जकात वसुली करणाऱ्या नागरी संस्थांची संख्या खालील तक्ता क्र. ८.२ मध्ये दिली आहे.—

तक्ता क्रमांक ८.२

| जिल्हा | जिल्ह्यातील एकूण नगरपरिषदा | अभिकर्त्याद्वारे जकात वसुली करणाऱ्या संस्थांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ |
| औरंगाबाद .. | ६ | ... | १ | १ |
| जालना .. | ४ | ४ | ... | ... |
| परभणी .. | ११ | १० | ५ | ३ |
| बीड .. | ६ | ६ | ४ | ३ |
| नांदेड .. | १३ | ५ | २ | २ |
| लातूर .. | ५ | २ | ... | ... |
| उस्मानाबाद .. | ८ | ३ | ३ | ३ |
| एकूण .. | ५३ | ३० | १५ | १२ |

विभागातील ५३ संस्थांपैकी १९९४-९५ या वर्षात ३० नगरपरिषदांनी जकात वसुलीचे काम अभिकर्त्याकडे सोपविले. त्यापैकी १९९६-९७ मध्ये १२ नगरपरिषदांचे काम अभिकर्त्याद्वारे सुरू आहे.

जकातीची वसुली

८.२२. अभिकर्त्याद्वारे जकात वसुली व तत्पूर्वी जकातीपासूनचे उत्पन्न याचा आढावा घेतला असता जकातीचे खाजगीकरण केल्यामुळे सर्वच नगरपरिषदांच्या जकातीच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. नियमातील तरतुदीनुसार ही वाढ अपेक्षित होतीच. तक्ता क्र. ८.३ मध्ये या बाबतची आकडेवारी दिली आहे :—

तक्ता क्रमांक ८.३

(रुपये लाखात)

| जिल्हा | नगरपरिषदा | खाजगीकरणापूर्वी | | खाजगीकरणानंतरचे उत्पन्न | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १९९४-९५ | | १९९५-९६ | |
| | | उत्पन्न | उत्पन्न वाढीचा वार्षिक दर | उत्पन्न | उत्पन्न वाढीची टक्केवारी | उत्पन्न | उत्पन्न वाढीची टक्केवारी |
| औरंगबाद | पैठण | २५.५२ | १२.९९ | ... | ... | ३१.५२ | २४ |
| जालना | जालना | ३४०.०४ | १०.७८ | ४१२.४५ | २१ | बंद | |
| | अंबड | २२.७३ | २१.०९ | ३०.९३ | ३६ | बंद | |
| | भोकरदन | १०.९१ | २५.१० | १४.०३ | २९ | बंद | |
| | परतूर | १८.७९ | १४.०४ | २४.७१ | ३१ | बंद | |
| परभणी | परभणी | १५०.४८ | १३.३९ | ३११.१७ | १०७ | २६२.५६ | ... |
| | हिंगोली | ६५.३६ | १४.०३ | ८३.७५ | २८ | बंद | |
| | बसमत | ३४.९५ | १२.२० | ५३.५३ | ५३ | ५७.२१ | ७ |
| | पाथरी | १४.९४ | १९.४३ | १८.२४ | २२ | २२.०० | २१ |
| | गंगाखेड | २७.५५ | २०.२२ | ३७.०७ | ३५ | ४२.६१ | १५ |
| | पूर्णा | ३५.७३ | ४१.०० | २६.११ | ... | बंद | |
| | सेलू | ३१.८३ | १७.६८ | ४६.५१ | ४६ | बंद | |
| | मानवत | ३०.०० | १०.२० | ३९.६५ | ३२ | बंद | |
| | सोनपेठ | ७.४२ | १०.१८ | ८.९५ | २१ | १०.४० | १६ |
| | जिंतूर | २२.९१ | ३.५० | ३३.१६ | ४५ | बंद | |
| बीड | बीड | १४७.६७ | १३.८६ | १९२.०० | ३० | बंद | |
| | माजलगाव | २८.८० | २१.२२ | ३४.०६ | १८ | ३२.१३ | ... |
| | धारूर | ११.०६ | २७.७० | १५.३७ | ३९ | १६.७७ | ९ |
| | परळी | ६०.६० | ११.४९ | ९३.४७ | ५४ | बंद | ... |
| | गेवराई | ३१.८४ | १७.८१ | ३९.४६ | २४ | ४३.०४ | ९ |
| | अंबेजोगाई | २७.८६ | १३.४२ | ४५.५८ | ६४ | ५६.२२ | २३ |
| नांदेड | नांदेड | ५०३.६४ | १९.२३ (तीन महिने) | १७१.१४ | ... | बंद | ... |
| | वाघाळा | ९.७६ | १७.३८ | १४.९० | ५३ | १९.९५ | ३४ |
| | किनवट | १७.५६ | ६.६८ | २६.११ | ४९ | २७.५६ | ६ |
| | उमरी | ८.१३ | ७.७७ | १०.१० | २४ | बंद | |
| | मुखेड | २०.५५ | ७.३५ | २६.१० | २७ | बंद | |
| लातूर | निलंगा | २०.८३ | ११.३८ | २७.४५ | ३२ | बंद | |
| | औसा | ... | (फक्त ७-८ दिवस) | | | बंद | |
| उस्मानाबाद | कळंब | २३.४८ | ४.९४ | ३७.११ | ५८ | ४१.६८ | १२ |
| | उमरगा | ३५.३४ | २३.१७ | ४२.३३ | २० | ४८.३१ | १५ |
| | मुरुम | ६.६४ | १७.७६ | ९.३० | ४० | १०.७५ | १६ |



एच ४०९४-१०अ

८.२३. वरील आकडेवारीवरून अभिकर्त्यामार्फत जकात वसुलीमुळे बहुतेक नगरपरिषदांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली असे निश्चितपणे म्हणता येते. परभणी नगरपरिषदेच्या बाबतीत ही वाढ खाजगीकरणापूर्वीच्या उत्पन्नाच्या १०० टक्क्यापेक्षा जास्त होती. परंतु त्यानंतर मात्र उत्पन्नात बरीच घट झाल्याचे दिसते. परंतु त्यानंतरच्या वर्षात मात्र उत्पन्नातील घट अनाकलीनय आहे. या मागच्या कारणांचा वेगळा अभ्यास करून शोध घेणे आवश्यक आहे असे वाटते. दुसऱ्या वर्षी जकातीची रक्कम ठरविताना ती मागच्या वर्षीच्या देकारापेक्षा १० टक्क्यांनी जास्त असावी असा निकष असला तरी ३-४ नगरपरिषदांच्या दुसऱ्या वर्षीच्या जकातीच्या उत्पन्नातील वाढ १० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे दिसून आले, तर परभणी नगरपरिषदेचे उत्पन्न मात्र पहिल्या वर्षापेक्षा दुसऱ्यावर्षी घटले आहे. बऱ्याच नगरपरिषदांचे जकात वसुलीचे काम अभिकर्त्यांनी निविदा न भरल्यामुळे किंवा त्यांनी थकबाकी ठेवल्यामुळे किंवा अभिकर्ते व नगरपरिषदामध्ये काही वाद निर्माण झाल्यामुळे नगरपरिषदांना हे काम पुनःश्च स्वतःच्या कर्मचाऱ्यांकडून करून घ्यावे लागत आहे.

**खाजगीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न**

८.२४. अभिकर्त्याकडून जकात वसुलीचे काम सुरु झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द काही तक्रारीही नोंदविण्यात आल्या आहेत.

(१) विशेषतः अभिकर्ते शहरात आणलेल्या पूर्ण मालाची तपासणी करतात, आणलेला माल शक्यतोवर सुट्या वा मोकळ्या स्वरुपात आणण्यासाठी आग्रह धरतात.

(२) मालाची पक्की देयके दाखविण्यासाठी आग्रह धरतात व न दाखविल्यास त्यावर जादा जकात कर आकारतात. चांगली वागणूक देत नाहीत. इत्यादि या तक्रारी थोड्याफार प्रमाणात सत्य असतीलही परंतु जकात वसुलीचे काम नगरपरिषदा करीत असताना ज्या नियमबाह्य सोयी सवलती व सुट आयातदारांना प्राप्त होत होत्या त्या या पद्धतीमुळे बऱ्याच कमी झाल्या व करचुकवेगिरीला आळा बसल्याने अशा तक्रारी येण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु या संदर्भात नगरपरिषदांनी योग्य ती देखरेख व नियंत्रणाची व्यवस्था केल्यास या तक्रारीवर मात करता येऊ शकेल.

(३) मराठवाडा विभागातील बऱ्याच नगरपपरिषदांनी अभिकर्ते करारपत्रात नमूद केलेल्या सेवा शर्तींचे पालन करीत नाहीत असे स्पष्ट केले आहे. विशेषतः जकात वसुलीच्या रकमा नगरपरिषदेकडे दररोज भरुन दर आठवड्यात निविदा रकमेच्या २ टक्के एवढी रक्कम पूर्ण भरणे या संदर्भात जास्तीत जास्त तक्रारी आहेत. काही अभिकर्त्यांनी जकात वसुलीच्या रकमा नगरपरिषदांकडे वेळोवेळी न भरल्याने त्यांचे करारपत्र रद्द करावे लागले. अशा संस्थांची संख्याही बरीच मोठी आहे. जकात कराची थकबाकी असलेल्या नगरपरिषदा व थकबाकीची रक्कम खालील तक्ता क्र. ८.४ मध्ये दिली आहे :—

तक्ता क्रमांक : ८.४

| जिल्हा | नगरपरिषद | थकबाकी (रु. लाखात) | थकबाकीची निविदा रकमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| जालना .. | जालना | १६२.५५ | ३९.४१ |
| | अंबड | ११.२१ | ३६.२४ |
| | भोकरदन | ५.०१ | ३५.७१ |
| | परतूर | २.१ | ८.५० |
| परभणी .. | हिंगोली | २३.३५ | २८.३५ |
| | जिंतूर | ९.७६ | २९.४३ |
| | सेलू | ९.१७ | १९.७२ |
| | मानवत | ७.८७ | १९.८५ |

| जिल्हा | | नगरपरिषद | थकबाकी (रु. लाखात) | थकबाकीची निविदा रकमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| बीड | .. | माजलगांव | ४.५४ | १३.३३ |
| | | परळी | १४.६३ | १५.६५ |
| | | अंबेजोगाई | ९.८० | २१.५० |
| नांदेड | .. | नांदेड | ५३.३८ | ३१.१९ |
| लातूर | .. | औसा | ०.११ | .. |

एकूण निविदा रकमेच्या प्रमाणात थकबाकीचे प्रमाण बरेच जास्त असूनही थकबाकी वसूल करण्यासाठी करारपत्रातील तरतुदीप्रमाणे संबंधित नगरपरिषदांना अभिकर्त्यांच्या बँकेत ठेवलेल्या बँक गॅरंटीच्या रकमांवर टाच आणावी लागली. काही नगरपरिषदांना मात्र बँकांनी बँक गॅरंटीच्या रकमा प्रदान केल्या नाहीत. त्यासाठी या नगरपरिषदांना न्यायालयाकडे धाव घ्यावी लागली.

**जकात वसुलीचे खाजगीकरणाबाबत आयोगाचे निष्कर्ष**

८.२५. जकात वसुलीच्या खाजगीकरणामुळे या करापासुनच्या उत्पन्नात चांगलीच वाढ होईल. त्याचबरोबर जकात वसुलीवर होणारा नागरी संस्थांचा कर्मचाऱ्यांवरील खर्चात बचत होईल व त्या निधीचा वापर इतरत्र करता येईल. हा खाजगीकरणामागचा मूळ उद्देश होता. परंतु मराठवाडा विभागातील नगरपरिषदांचे, वरील परिच्छेदात, विशद केलेले अनुभव विचारात घेता हा उद्देश साध्य झाला असे दिसून येत नाही. याची प्रामुख्याने कारणे पुढील प्रमाणे आहेतः—

(१) सुरूवातीच्या काळात अभिकर्त्यांद्वारे जकातीची वसुली ही संकल्पना नवीन होती व त्यामुळे त्याला स्पर्धेमुळे चांगला प्रतिसादही मिळाला. परंतु त्यानंतरच्या कालावधीत मात्र अपेक्षित असलेली स्पर्धा दिसून आली नाही. परिणामतः या जकातीच्या देकाराच्या रकमांमध्ये घट झाल्याचे दिसून आले आहे. इतकेच नव्हे तर स्पर्धकांनी आपआपसामध्ये संगनमत करून जकात देकाराच्या कमी दराच्या निविदा देऊन नागरी संस्थांची कोंडी करण्याचाही प्रयत्न केला आहे. तर काही नगरपरिषदांना अनेकदा जाहिराती देऊनही याबाबत प्रतिसाद मिळाला नाही.

(२) या पद्धतीमुळे जकात वसुलीसाठी असलेल्या कर्मचारीवर्गावरील खर्चात बचत होईल असे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. कारण तो कर्मचारीवर्ग इतरत्र सामावून घ्यावा लागला.

(३) या पद्धतीमुळे बऱ्याच नगरपरिषदांमध्ये स्वयंसंतुष्टतेची भावना निर्माण झाली. अभिकर्त्यांकडून परस्पर उत्पन्न मिळते यावर ते विसंबून राहिल्याने जकात वसुलीच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष असे प्रयत्न झाले नाहीत.

८.२६ जकातीच्या खाजगीकरणाची पद्धती पूर्णतः नवीन आहे व अधिक अनुभव घेतल्याशिवाय ती पद्धती योग्य वा अयोग्य हे वरील कारणमीमांसा विचारात घेता आताच ठरविणे उचित होणार नाही. ज्या नागरी संस्थांनी जकातीच्या वसुली संदर्भात देखरेख व नियंत्रणाच्या व्यवस्थापनात वाढ केली त्यांच्या जकातीच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. जकात हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन आहे व त्यात अभिकर्त्यांनी काही अडचणी निर्माण केल्यास नागरी संस्थेचा आर्थिक डोलाराच कोसळून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. **आयोग या संदर्भात अशी शिफारस करीत आहे की, खाजगीकरणामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांचा सखोल विचार करून त्याचप्रमाणे नियमांत किंवा पद्धतीमध्ये योग्य त्या सुधारणा कराव्यात. तसेच ज्या नागरी संस्थांचे जकातीपासूनच्या उत्पन्न वाढीचा दर संबंधीत वर्गाच्या सरासरी जकात उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा कमी असेल, त्या नागरी संस्थांना जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यासाठी, नियमांत योग्य त्या तरतुदी करून भाग पाडावे.**

## इतर कर

८.२७. नागरी संस्थांना इतर कराच्या आकारणीपोटी मिळालेल्या रकमांचा आढावा घेतला असता असे दिसते की, या करांच्या उत्पन्नाच्या वेगवेगळ्या बाबींकडे या संस्थांनी विशेष असे लक्ष दिलेले नाही. इतर करापासून अल्प उत्पन्न मिळते, त्यामुळे या बाबींकडे विशेष असे लक्ष न दिल्याने, पूर्वीपासून ठरवून दिलेल्या दरानेच कराची आकारणी केली जाते. परिणामतः इतर करापासूनचे उत्पन्न फारच कमी आहे. या करात समाविष्ट असलेल्या वेगवेगळ्या बाबींच्या **दरांचा व त्यांच्या उत्पन्नाचा वेळोवेळी आढावा घेतल्यास व दरामध्ये योग्य त्या सुधारणा केल्यास या बाबींपासून या संस्थांना चांगले उत्पन्न प्राप्त होईल या दृष्टीने आटोकाट प्रयत्न झाले पाहिजेत अशी आयोगाची शिफारस आहे.**

## करेतर बाबी व सेवा सुविधांपासूनचे उत्पन्न

८.२८. या उत्पन्नात विविध प्रकारचे शुल्क आणि सेवा आकाराचा समावेश असून त्यापासून स्वतःच्या उत्पन्नाच्या २०-३५% उत्पन्न नागरी संस्थांना प्राप्त होते. १९९४-९५ पूर्वीच्या पाच वर्षात या साधनापासूनच्या उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर लक्षात घेता उत्पन्नात चांगलीच वाढ झाल्याचे दिसते. तरीसुद्धा या बाबीच्या उत्पन्नाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचे दिसते. अनेक बाबींचे शुल्क तसेच दरापासूनचे उत्पन्नातून त्या बाबी पुरविण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई देखील होत नाही. सेवा आकार देखील खर्चाचे तुलनेत फारच कमी आहे.

८.२९. सेवा आकार व शुल्काचे दर या बाबींपासूनचे उत्पन्न फारच अल्प आहे, या सबबीवर वर्षानुवर्षे सुधारित केले जात नाहीत. **आयोगाची अशी शिफारस आहे की, सर्व शुल्क व आकाराचे ठराविक कालांतराने पुनर्विलोकन करून त्यांचे दर त्यावरील चालू खर्चाचे पातळीवर आणले पाहिजेत. ज्या शुल्काचे बाबतीत त्यावर होणारा एकूण खर्च सेवा आकारातून पूर्णतः भरून निघण्याची शक्यता आहे, तेथपर्यंत वाढविले पाहिजेत.** थोडक्यात उत्पन्नाचे कोणतेही साधन त्यापासूनचे उत्पन्न कितीही लहान असले तरी ते दीर्घकाळापर्यंत दुर्लक्षित राहू नये. **आधुनिक काळात काही शुल्क अप्रस्तुत आहे असे वाटल्यास, ते पुढे चालू ठेवावे की नाही याचेही पुनर्विलोकन व्हावे.** करेतर उत्पन्नाच्या विविध बाबींपासून किती उत्पन्न घेतले जावे व ते वाढविण्यासाठी कितपत प्रयत्न झाले ही नागरी संस्थांच्या सुदृढ अर्थव्यवस्थेची एक महत्त्वाची चाचणी असावी अशी आयोगाची शिफारस आहे.

## इतर उत्पन्न

८.३०. यात व्यापारी संकुले व इतर वाणिज्यिक कार्ये यापासून मिळणारे भाडे यांचा अंतर्भाव आहे. नागरी संस्थांना स्वतःच्या एकूण उत्पन्नाच्या ८.६७% उत्पन्न या साधनापासून प्राप्त झाले व मागील पाच वर्षाच्या कालावधीतील या वाढीचा दर ९.६% दिसून आला आहे. व्यापारी संकुलाची बांधणी व त्याचे व्यवस्थापन यापासून मिळणारे उत्पन्न हे नागरी संस्थांना वाढीव उत्पन्न देणारे एक क्षेत्र आहे. काही नागरी संस्था उदा. जळगांव नगरपरिषद यांनी याबाबत सकृत दर्शनी चांगली प्रगती साधली आहे आणि त्यावरून असे वाटते की, इतर नागरी संस्थांना तेथील याबाबतच्या आर्थिक व्यवस्थापनाचा व कार्यपद्धतीचा अवलंब करता येऊ शकेल, तसेच नागरी संस्थांच्या मालकीच्या ज्या जमिनी मोकळ्या आहेत त्याचा वेळीच योग्य वापर न झाल्यास त्यावर झोपडपट्या उभ्या राहतात व त्या जमिनीचा इतर कामासाठी वापर करणे कठीण होऊन बसते. **त्याऐवजी अशा मोकळ्या जमिनीवर व्यापारी संकुले/गाळे उभारल्यास व त्यांची एकरकमी विक्री केल्यास, त्यापासून नागरी संस्थांना फार मोठे उत्पन्नही मिळेल व अशा जागी झोपडपट्या उभ्या राहणार नाहीत, त्या दृष्टीने अधिनियमांत योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात, अशी आयोगाची शिफारस आहे.**

## शासकीय अनुदाने

८.३१. अधिनियमांतील तरतुदीप्रमाणे प्रदान केलेल्या अधिकाराचा पूर्ण वापर केल्यानंतर जर या संस्थांना खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी पडत असेल अशा परिस्थितीत शासकीय अनुदानासाठी केलेली मागणी उचित ठरते. परंतु या नागरी संस्थांच्या उत्पन्न व खर्चाच्या बाबींचा विचार केला असता या संस्थाा त्यांना असलेल्या वित्तीय अधिकरांचा पूर्णतः वापर करून उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक करीत नाहीत. त्यामुळे खर्च व उत्पन्नातील तूट भरून काढण्यासाठी या संस्था शासकीय अनुदानावर काही प्रमाणावर अवलंबून रहातात. शासनाकडून विविध

प्रयोजनासाठी जी अनुदाने या नागरी संस्थांना दिली जातात, त्यात आयोगाच्या असे निदर्शनास आले की, शासनाकडून नागरी संस्थांना वितरित करण्यात आलेल्या अनुदानात फार मोठे चढ-उतार आहेत. अनुदानाचे वितरण हे अनियमितपणे व अवेळी करण्यात येते.

८.३२. शासनाची बरीच अनुदाने काही अपवाद वगळता या नागरी संस्थांना आर्थिक वर्षाच्या अगदी शेवटी दिली जातात. परिणामतः या अनुदानाची दखल या नागरी संस्थांना पुढील आर्थिक वर्षात घेणे भाग पडते. इतकेच नव्हे तर अनुदानाच्या देय रकमेतून नागरी संस्थांकडून शासकीय येणे रकमापोटी कपातही केली जाते. यामुळे या संस्थांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या अनुदानापोटी निश्चित अशी किती रक्कम प्राप्त होणार आहे हे अनिश्चित असते. त्यामुळे या नागरी संस्था या अनुदानापासून किती उत्पन्न मिळणार आहे ते विचारात घेऊन खर्चाचे व्यवस्थितपणे नियोजन करू शकत नाहीत. **तेव्हा या नागरी संस्थांना अनुदानापोटी अपेक्षित किती रक्कम व केव्हा मिळेल याबाबतची पूर्व माहिती असणे आवश्यक आहे असे आयोगाला वाटते. यामुळे या संस्थांच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाचे अंदाजावर फारसा विपरित परिणाम होणार नाही. आर्थिक वर्षाच्या अगदी शेवटच्या आठवड्यात अनुदान निधीचे वितरण टाळले जावे. अनुदानाच्या ज्या वजाती करावयाच्या आहेत त्याची पूर्व माहिती या संस्थांना वेळीच देण्यात यावी.** शक्यतोवर जिल्हाधिकारी कार्यालयाचे स्तरावर ज्यांची कल्पना शासनाला व नागरी संस्थांना नाही अशा वजाती करण्याचे टाळण्यात यावे. अशा प्रकारची व्यवस्था व उपाययोजना केल्यास या संस्थांना अनुदानापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ओघ सुरळीत आणि नियमितपणे चालू राहण्यात जे अडथळे आहेत ते कमी होण्यास मदत होईल.

८.३३. नागरी संस्थांना शासनाकडून विविध प्रयोजनांसाठी जी अनुदाने दिली जातात, त्यांची बाबवार रक्कम किती दिली याबाबतची माहिती शासन स्तरावर किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाचे स्तरावर सहजगत्या उपलब्ध नसल्याचे दृष्टोत्पतीस आले आहे. ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी असून, भूषणावह नाही. नागरी संस्थांना विविध अनुदानापोटी किती रकमा मिळाल्या, त्यापासून कोणत्या वजाती केल्या, याची अनुदाननिहाय माहिती जिल्हाधिकारी व शासनाचे स्तरावर संकलित करून ती जतन करणे अत्यावश्यक आहे. **एवढेच नव्हे तर दिलेल्या अनुदानाच्या नोंदी नागरी संस्थांच्या संबंधित लेख्यात योग्य प्रकारे झाल्या आहेत किंवा नाहीत, हे तपासणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर वर्षअखेर त्याचे वार्षिक समायोजनही दरवर्षी व्हायला पाहिजे.** अनुदानातून ज्या कपाती केल्या जातात, त्या रकमांची नोंद नागरी संस्थांनी त्यांच्या खर्चात केली पाहिजे. अन्यथा अनुदानापोटी निव्वळ मिळालेल्या रकमांच्याच नोंदी आजच्यासारख्या घेतल्या जातील व त्यामुळे या नगरपरिषदेच्या आकडेवारीवरून उत्पन्न व खर्चाची सत्य परिस्थिती त्याच्या वार्षिक लेख्यावरून तरी दिसून येणार नाही. **तेव्हा शासनाकडून वितरित केलेल्या निधीचे लेखे नियमाप्रमाणे व्यवस्थित ठेवले जातात याचे वरचेवर निरीक्षण होणे आवश्यक आहे असे आयोगाचे स्पष्ट मत आहे.**

### पाणीपुरवठा

८.३४. नागरी क्षेत्रात शुद्ध पिण्याचे पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी नागरी संस्थेची आहे. हा नागरिकांच्या दृष्टीकोनातून अत्यंत जिव्हाळ्याचा असा ज्वलंत प्रश्न आहे. या प्रश्नाची जाण शासनाचे स्तरावर असून नागरी संस्थांना पाणी पुरवठ्याच्या योजना पार पाडण्यासाठी शासन आर्थिक मदत करीत असते. तरीपण वाढत्या नागरिकरणाबरोबर पाणीपुरवठ्याचा प्रश्नही गंभीर रुप धारण करीत आहे.

### वित्त आयोगाने गठित केलेल्या अभ्यासगटाचा अहवाल

८.३५. राज्याच्या नागरी क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, त्यांची आर्थिक परिस्थिती, समस्या, उत्पन्न व खर्च याबाबतचा सांगोपांग अभ्यास करण्यासाठी आयोगाने सदस्य-सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट डिसेंबर १९९४ मध्ये गठित केला होता. या अभ्यासगटाच्या जून १९९५ च्या अहवालात पाणीपुरवठ्यासंदर्भात परिस्थिती विशद केली आहे. महाराष्ट्र पाणीपुरवठा व जल निस्सारण मंडळ राज्याच्या नागरी भागातील मुंबई वगळून पाणीपुरवठा योजनांचे नियोजन करून त्या योजना कार्यवाहीत आणणे, नागरी संस्थांनी तयार

केलेल्या योजनांना संमती देणे, योजनांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी व आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला देणे किंवा तंत्रज्ञ प्रतिनियुक्तीवर पुरविणे ही कामे वरील मंडळाकडे सोपविलेली आहेत. पाणीपुरवठ्याच्या संदर्भात मंडळाचे कार्य एजन्सी स्वरूपाचे असून त्यात योजनांचे नियोजन व आखणी करणे, त्या पूर्ण करणे व त्यानंतर त्या योजना संबंधित नागरी संस्थांना हस्तांतरित करणे असे आहे. योजना पूर्ण झाल्यावर ती चालविणे त्याची देखभाल दुरुस्ती व ती योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने योग्य त्या दराने पाणीपट्टी आकारणे इत्यादीची जबाबदारी नागरी संस्थेची असते.

८.३६. नागरी क्षेत्रात स्वच्छ पेयजल पुरविण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका/नगरपारिषदांची असली तरी उपलब्ध मर्यादित साधनसंपत्तीमुळे या नागरी संस्थाना नागरी पाणी पुरवठ्याच्या योजना स्वबळावर राबविता येत नसल्याने त्यांना शासन अनुदान, आयुर्विमा मंडळाचे कर्ज व खुल्या बाजारातून कर्ज याद्वारे आर्थिक मदत करित असते. या आर्थिक मदतीचा आकृतीबंध नगरपरिषदांच्या वर्गानुसार खालीलप्रमाणे आहे. शासनाच्या दिनांक ५ डिसेंबर १९९५ च्या निर्णयानुसार लोकवर्गणीची अट रद्द करण्यात आली असून कर्जाच्या रकमेत वाढ केली आहे. त्यामुळे या आकृतीबंधात झालेल्या सुधारणा कंसात दिल्या आहेत.

| | महानगरपालिका/ नगरपारिषदा वर्ग (१) | लोक वर्गणी (२) | शासकीय अनुदान (३) | कर्ज (४) | एकूण (५) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | बृहन्मुंबई सोडून इतर महानगरपालिका. . | १० टक्के<br>— | २३ १/३ टक्के<br>(२३ १/३ टक्के) | ६६ २/३ टक्के<br>(७६ २/३ टक्के) | १०० टक्के |
| (२) | " अ " वर्ग नगरपरिषदा . . | १० टक्के<br>— | २३ १/३ टक्के<br>(२५ टके) | ६६ २/३ टक्के<br>(७५ टक्के) | १०० टक्के |
| (३) | " ब " वर्ग नगरपरिषदा . . | १० टक्के<br>— | ४० टक्के<br>(४० टक्के) | ५० टक्के<br>(६० टक्के) | १०० टक्के |
| (४) | " क " वर्ग नगरपारिषदा (१९८१ गणनेनुसार १५,००० किंवा जास्त लोकसंख्या असलेल्या) . . | — | ५० टक्के | ५० टक्के | १०० टक्के |
| (५) | " क " वर्ग नगरपारिषदा (१९८१ गणनेनुसार १५,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या) | — | १०० टक्के | — | १०० टक्के |

(कंसातील आकडे सुधारित आर्थिक मदतीची टक्केवारी दर्शविते)

८.३७. बऱ्याचशा शहरातील पाणीपुरवठा योजनांचे स्त्रोत पुरेसे उपलब्ध नसल्याने जास्त अंतरावरून पाणी आणण्याची व्यवस्था करावयाची गरज जाणवते. या विस्तारित योजनांसाठी फार मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागते. शासनाने दिनांक १५ सप्टेंबर १९९४ च्या शासन निर्णयाद्वारे पाण्याचा उद्‌भव दूर अंतरावर (म्हणजे " क " वर्ग नगरपारिषदा (१५,००० पेक्षा जास्त लोकसंख्या यांचेबाबत ३ किलोमीटरपेक्षा जास्त " ब " वर्ग नगरपरिषदांचेबाबत ५ किलोमीटरपेक्षा जास्त आणि " अ " वर्ग नगरपरिषदांचे बाबत ८ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरून आणावे लागल्यास त्या अधिक अंतरासाठी लागणारी मुख्य जलवाहिनी, नवीन पंपीग मशिनरी आणि ब्रेक प्रेशर टँक यावर होणारा सर्व भांडवली खर्च १०० टक्के शासकीय अनुदान म्हणून देण्याचे ठरविले आहे.

८.३८. पाणीपुरवठा योजनेला होणाऱ्या एकूण खर्चापैकी बराचसा भाग शासकीय अनुदान आणि १० टक्के लोकवर्गणी (शासननिर्णय नगरविकास विभाग क्रमांक इएसटी/१०९५/प्रक्र/११९/न.वि.-२८, दिनांक ५ डिसेंबर १९९५ अनुसार लोकवर्गणीची अट रद्द केली आहे) या रुपाने उपलब्ध केल्यानंतर बाकीची रक्कम आयुर्विमा मंडळाकडून कर्ज रुपाने संबंधित नगरपरिषदेला देण्यात येते. महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळ या योजना कार्यवाहीत आणत असल्याने या कर्जाच्या रकमा मंडळाला हस्तांतरित करण्यात येतात. या कर्जाच्या परतफेडीसाठी राज्य शासन हमी देते. आयुर्विमा महामंडळाच्या सध्याच्या धोरणानुसार पाणी पुरवठा योजनेच्या एकूण खर्चाच्या काही टक्केवारीप्रमाणे कर्ज मंजूर करण्यात येते.

८.३९. मोठ्या योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकून कर्ज घेतल्यानंतर देखील काही अधिक रकमांची गरज शिल्लक राहते. त्यासाठी संबंधित नागरी संस्थांना खुल्या बाजारातून कर्ज घ्यावी लागतात व त्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची परवानगी घेतली जाते. अलिकडे १९९४ पासून खुल्या बाजारातील कर्जे उभी करण्यास नागरी संस्थाना परवानगी देण्याऐवजी राज्य शासन स्वतःच अशाप्रकारचे कर्जे मिळविते आणि त्यातून आवश्यक तो निधी पाणी पुरवठा मंडळाला उपलब्ध करून देण्यात येतो.

### पाणीपुरवठ्याचे प्रमाण

८.४०. नागरी भागात पाणीपुरवठा योजना तयार करताना ३० वर्षांच्या काळानंतरची अंदाजित लोकसंख्या लक्षात घेऊन व पुढे निर्देशित केलेल दरडोई दर दिवशीचे पाणी पुरवट्याचे प्रमाण आधारभूत धरून योजना तयार केली जाते.

| | |
|---|---|
| (१) लोकसंख्या २०,००० पेक्षा कमी | ७० लिटर दरडोई प्रतिदिन |
| (२) लोकसंख्या २०,००० ते ६०,००० | १०० लिटर दरडोई प्रतिदिन |
| (३) लोकंख्या ६०,००० ते १ लाख | १२५ लिटर दरडोई प्रतिदिन |
| (४) लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त | १५० लिटर दरडोई प्रतिदिन |

राज्य शासनाने दिनांक २६ जुलै १९९५ च्या श्वेतपत्रिकेत हेच मापदंड यापुढेही चालू ठेवावेत असे नमूद केले आहे.

८.४१. नागरी क्षेत्रात नळाने पाणीपुरवठा योजनेचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) काही शहरात पाणीपुरवठा योजनेचा सर्व खर्च राज्य शासनाने केला होता आणि त्या योजना राज्य शासनाच्या मालकीच्या होत्या आणि महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळाची स्थापना झाल्यानंतर अशा एकूण ५३ योजना मंडळाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखाली आहेत.

(२) यापैकी काही योजनांच्याबाबतीत हे मंडळ नागरी संस्थांना घाऊक प्रमाणात पाणी देते आणि शहरातील पाणी वितरणाची जबाबदारी नागरी संस्था पार पाडते.

(३) इतर काही योजनांमध्ये प्रत्येक नागरिकापर्यंत नळाने पाणी पुरविण्याचे काम हे महामंडळ करीत असते.

८.४२. वरीलपैकी पहिल्या प्रकारात पाण्याचा घाऊक स्वरुपात पुरवठा केल्यानंतर नगरपरिषदांकडून वेळोवेळी ठरलेल्या दराप्रमाणे त्या पाण्याची किंमत वसूल करण्यात येते अशा बाबतीत पाणी वाहून नेणाऱ्या नळांच्या दुरुस्तीचा खर्च तसेच जलशुद्धीकरणाकरिता रसायने इ. चा खर्च नागरी संस्था करते. वरील ५३ पैकी २० योजना अशाप्रकारे कार्यान्वित केल्या जातात. उरलेल्या ३३ योजनासाठी पाणी वाटण्याची जबाबदारी या मंडळाने घेतली असून नागरिकांकडून त्याबाबत आकार गोळा करण्यात येतो.

८.४३. याशिवाय आणखी २० पाणीपुरवठा योजना अशा आहेत की, ज्या नागरी संस्थांच्या मालकीच्या आहेत पण त्यांची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळ करते व त्यासाठी लागणारा देखभाल दुरुस्ती खर्च नागरी संस्थेने मंडळाकडे आगाऊ भरावयाचा असतो. परंतु बऱ्याच नागरी संस्था अशाप्रकारे आगाऊ रकमा भरत नाहीत. इतकेच नव्हे तर मंडळाने केलेल्या खर्चाची भरपाई देखील नियमितपणे योग्य वेळेत करण्यात येत नाही उरलेल्या १७१ नागरी संस्था स्वतःची पाणीपुरवठा योजना स्वतःच सांभाळतात.

### पाणीपुरवठा योजनेच्या खर्चाची वसुली

८.४४. महामंडळाच्या एकूण ५३ योजनांपैकी २० योजनांमधून घाऊक प्रमाणात नागरी संस्थाना पाणी पुरविले जाते. तरीदेखील सर्व ५३ योजनांच्या खर्चाची एकत्रित माहिती लक्षात घेऊन ना नफा ना तोटा या तत्वावर पाण्याचे घाऊक दर ठरविले जातात आणि संबंधित नागरी संस्थांकडे त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या रकमांची मागणी केली जाते. तथापि, त्या संस्था पाण्याची किंमत योग्य वेळेत मंडळाला देत नाहीत. अशा परिस्थितीत, शहराचा पाणीपुरवठा थांबविणे शक्य नसते. म्हणून संबंधित नगरपरिषदांनी देणे रकमा दिल्या नसल्या तरी सर्व योजना चालूच ठेवाव्या लागतात. अशा प्रकारच्या थकबाकीची एकूण रक्कम मार्च, १९९५ अखेर रु. १९३.५९ कोटी होती.

**नागरी संस्थांच्या क्षेत्रात पाणीपुरवठा करण्यासाठी आकारावयाचे दर**

८.४५. अभ्यास गटाने पाणीपुरवठ्याच्या दराबाबत असे सुचविले की, या योजनांवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाच्या बाबींचा (उदा. पाणी खरेदी, आस्थापना खर्च, रसायनावरील खर्च, देखभाल-दुरुस्ती व इतर) विचार व्हावा. त्याचबरोबर कर्जाची परतफेड करण्यासाठी लागणारा निधी, घसारा निधी, सिंकिंग फंड इ. चा दरवर्षी नोव्हेंबर/डिसेंबर या महिन्यांत अंदाज घेऊन पुढील वर्षासाठीचे दर निश्चित करावेत. तसेच सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या नळांची संख्या मर्यादित ठेवावी व प्रत्येक सहा व्यक्तींच्या कुटुंबाला एक खाजगी पाण्याचा नळ घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास पाणीपुरवठा योजनेवर होणारा तोटा काही प्रमाणात कमी होऊ शकेल. अभ्यास गटाने केलेल्या अंदाजाप्रमाणे १,००० लिटरसाठी रुपये ३ या दराने १५ मि. मी. व्यासाच्या नळासाठी क-वर्ग नगरपरिषदांसाठी दरमहा रुपये ४०, ब-वर्ग नगरपरिषदेसाठी दरमहा रुपये ५० व अ वर्ग नगरपरिषदेसाठी दरमहा रुपये ६० असे आधारभूत दर ठरविता येणे शक्य आहे. त्यापेक्षा मोठ्या आकाराच्या म्हणजे २० मि. मी. व्यासाच्या नळासाठी क-वर्ग नगरपरिषदेत दरमहा रुपये ८०, ब वर्ग नगरपरिषदेत दरमहा रुपये १०० आणि अ-वर्ग नगरपरिषदेत दरमहा रुपये १२० असे दर किमान ठरविता येतील तर २५ मि. मी. व्यासाच्या नळासाठी अनुक्रमे रुपये १२०, २०० व २४० दरमहा असे दर सुचविण्यात आले आहेत. बिगर घरगुती वापराचे दर वरील दराच्या दुप्पट प्रमाणात सुरुवातीला ठरविण्यात यावेत. त्यानंतर हळुहळू ते तीनपट व शेवटी पाचपट असे वाढविण्याची योजना आखण्यात यावी. व्यापारी पाणी वापरासाठी घरगुती वापराच्या पाचपट दर ठरविण्यात यावेत. असे सुचविण्यात आलेले आहे. अशा प्रकारची दरआकारणी स्वीकारली आणि ती वेळोवेळी गरजेप्रमाणे सुधारित करण्यात आली तर पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल-दुरुस्तीच्या खर्चामध्ये होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकेल.

**पाण्याचा अपव्यय**

८.४६. या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, पाणीपुरवठ्याच्या वितरण व्यवस्थेत आणि पाण्यावर प्रक्रिया करण्याच्या व्यवस्थेत आणि पाणी आणण्याच्या कार्यपद्धतीमध्ये सर्वसाधारणपणे २० टक्के पाण्याचा अपव्यय होऊ शकतो आणि तो ग्राह्य धरता येईल. मात्र २० टक्केपेक्षा जास्त पाण्याचा अपव्यय होणे योग्य नाही. काही नागरी संस्थांच्या बाबतीत २० टक्केपेक्षा जास्त पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आले आहे. पाण्याचा बेसुमार अपव्यय होण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत. (१) वितरण व्यवस्था ही जुनी असल्यामुळे गळतीचे प्रमाण जास्त आहे, (२) सदोष नळजोडणी, (३) अनधिकृत जोडण्या, (४) स्टॉप कॉकशिवाय असणाऱ्या सार्वजनिक स्टँडपोस्टमधून मोठ्या प्रमाणावर होणारा पाण्याचा अपव्यय, (५) पाण्याची गरज भागल्यानंतरही खाजगी नळ चालू राहणे, (६) मुख्य जलवाहिन्या तसेच वितरण व्यवस्था यांच्या देखभालीतील निष्काळजीपणा. **नागरी संस्थांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत आणि सार्वजनिक नळांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे पाण्याचा काटकसरीने उपयोग तसेच घरातील नळामधून पाण्याचा अपव्यय होणार नाही यासाठी जनतेत जागृती निर्माण करण्यांचा प्रयत्न झाला पाहिजे.**

**महाराष्ट्र शासनाची श्वेतपत्रिका**

८.४७. महाराष्ट्र शासनाने पाणी पुरवठा कार्यक्रम या संदर्भात दिनांक २६ जुलै १९९५ रोजी प्रसिद्ध केलेल्या श्वेत पत्रिकेतदेखील नागरी पाणीपुरवठ्याबाबत अभ्यास गटाच्या अहवालात जे निष्कर्ष काढले आहेत त्या निष्कर्षांचीच पुष्टी केलेली आहे. नगरपरिषदांच्या पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र पाणीपुरवठा व जल- निःस्सारण मंडळाकडून केली जाते व योजना पूर्ण झाल्यानंतर त्या संबंधीत नगरपालिकांनी ताब्यात घ्यावयाची असते. परंतु योजना पूर्ण झाल्यानंतर या योजनांच्या देखभाल-दुरुस्तीचा खर्च परवडण्यासारखा नाही, या कारणास्तव त्या ताब्यात घेण्याबाबत टाळाटाळ करण्यात येते. तसेच काही नगर परिषदा मंडळाकडून घाऊक प्रमाणात पाणी घेत असूनही पाण्याच्या बिलाच्या रकमा वेळेवर मंडळाला देत नाहीत. परिणामतः फार मोठ्या रकमा नगर परिषदांकडून मंडळाला घेणे आहेत. नगर परिषदांनी या पूर्ण झालेल्या योजना ताब्यात घेऊन व त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य ती व्यवस्था करून **तसेच पाणीपुरवठ्याचे दर हे त्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात आकारणे व पाणीपुरवठा**

योजना ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालतील या दृष्टीने नगर परिषदांनी कार्यवाही करण्याची आवश्यकता नमूद केली आहे.

८.४८. अभ्यास गटाच्या अहवालात व श्वेतपत्रिकेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेता आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :—

(१) नागरी क्षेत्रात सार्वजनिक पाण्याच्या नळांची संख्या कमीत कमी असावी. तसेच हे सार्वजनिक नळ ज्या भागात लावावयाचे आहेत त्या भागातील रहिवाशांची एक समिती नेमून त्या समितीच्या ताब्यात हा नळ द्यावा व या समितीमार्फत रहिवाशांकडून सवलतीच्या दराने का होईना, पाणीपट्टी वसूल करावी. अशा प्रकारे पाण्यासाठी पैसे द्यावे लागतात ही भूमिका जनतेच्या मनावर बिंबवल्यास त्यामुळे पाण्याचा अपव्यय फार मोठ्या प्रमाणात टाळता येईल.

(२) सहा व्यक्तींच्या कुटुंबासाठी एक नळ घेण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहीत करावे व पाणीपुरवठा मीटरद्वारेच करण्यात यावा. ज्यांचे पाण्याचे मीटर बंद वा नादुरूस्त होतील त्यांनी ते एका विशिष्ठ कालमर्यादेत उदा. १५ दिवस/१ महिन्याचे आत दुरुस्त करून न घेतल्यास त्यांना पाणीपट्टीचा जादा दर आकारण्यात यावा. परंतु असे करीत असताना मीटर दुरुस्तीची व त्यांच्या तपासणीची योग्य ती व्यवस्था उपलब्ध असेल याची खात्री नागरी संस्थांनी करणे आवश्यक असेल.

(३) महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने पाण्याची प्रक्रिया व वितरणात २० टक्के पाण्याचा अपव्यय ग्राह्य धरला आहे. आयोगाच्या मते हे प्रमाण फार मोठे आहे. पाणी वितरण व्यवस्थेत जास्तीत जास्त पाण्याचा अपव्यय १५ टक्केचे मर्यादेत असावा. त्याचबरोबर पाणी वितरणात जो पाण्याचा अपव्यय होतो तो टाळण्यासाठी प्रशासकीय स्तरावर आटोकाट प्रयत्न होणे जरुरीचे आहे. तसेच जनजागृतीद्वारे पाण्याचा अपव्यय टाळता येऊ शकेल.

(४) पाणीपुरवठा योजना '' ना नफा ना तोटा '' या तत्त्वावर चालविण्यासाठी व कर्जाचे दायित्व पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून पाण्याचे योग्य ते दर खर्चाच्या आधारावर निश्चित केले पाहिजेत. इतकेच नव्हे तर वेळोवेळी पाणीपुरवठ्यासाठी केलेल्या खर्चाचा आढावा घेऊन दरामध्ये अशा सुधारणा केल्या पाहिजेत की जेणेकरून पाणीपुरवठ्यावर केलेल्या खर्चाची १०० टक्के वसुली होईल.

(५) पाणीपुरवठा योजना, जल-मलनिःसारण योजना किंवा इतर मोठ्या भांडवली खर्चाच्या लोकोपयोगी योजनांचा खर्च भागविण्यासाठी आर्थिक मदत म्हणून नागरिकांचा सहभाग असला पाहिजे. यासाठी संबंधित नागरी संस्थांनी अशा योजनांची माहिती व त्यापासून जनतेला होणारे फायदे याची जाणीव प्रसार माध्यमाद्वारे करून दिली पाहिजे. तसेच पुढे जाऊन जनतेच्या वित्तीय बांधिलकीमुळे काही निधी उपलब्ध होईल किंवा श्रमदानाद्वारेही खर्चात बचत होईल याकडेही लक्ष द्यायला पाहिजे. पर्यायाने नागरी संस्थांवर पडणारा भांडवली खर्चाचा बोजा थोड्या प्रमाणात का होईना कमी होईल. महत्त्वाचे म्हणजे अशा योजनांबद्दल जनतेची वित्तीय बांधिलकी असल्याने त्यांच्या मनात आत्मीयता निर्माण होईल असे प्रयत्न नागरी संस्थेने करायला पाहिजेत.

(६) नागरी क्षेत्रात औद्योगिक व वाणिज्यिक कामासाठी पाण्याचा वापर होतो, त्या पाणीपुरवठ्याच्या दरात वाढ करावी व या दरांचे वेळोवेळी पुनर्विलोकन व्हावे. यामुळे घरगुती वापराच्या पाणीपुरवठ्यात होणारे नुकसान इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याच्या फायद्यातून (क्रॉस सबसिडायझेन प्रिन्सिपल) काही प्रमाणात का होईना भरून काढता येईल.

(७) पाणीपुरवठ्याच्या संदर्भात नागरी संस्थांच्या स्तरावर वेगळे हिशेब ठेवले जात नाहीत. त्यामुळे या बाबींवर होणारा खर्च व त्यापासून मिळणारे उत्पन्न याचा ताळा घेणे कठीण जाते. पाणीपुरवठ्याचा फार मोठ्या प्रमाणावर खर्च होतो व त्या प्रमाणात त्यापासून किती उत्पन्न मिळते याचा हिशेब वेगळा ठेवणे आवश्यक आहे असे आयोगाला वाटते. तेव्हा या बाबीसाठी स्वतंत्र असे अंदाजपत्रक तयार करून पाणीपुरवठ्याचा खर्च व उत्पन्न याचा आढावा वरचेवर घ्यावा.

## सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता

८.४९. शहरामध्ये सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखणे हे नागरी संस्थांचे महत्त्वाचे तसेच सक्तीचे कर्तव्य आहे. शहरातील साफसफाई, कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट, पाण्याचा निचरा होण्यासाठी आणि सांडपाणी वाहून नेण्यासाठी भुयारी गटारे योजना कार्यान्वित करणे, मलनि:सारण योजना, प्राथमिक वैद्यकीय सुविधा पुरविणे, पर्यावरण आणि दूषित वातावरणामुळे निर्माण झालेले प्रश्न हाताळणे, सार्वजनिक शौचालये आणि मुताऱ्या यांची व्यवस्था करणे अशी कार्ये नागरी संस्थांनी करणे अपेक्षित आहे. मात्र सार्वजनिक आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या सर्वंकष बाबी हाताळण्याकडे या संस्थांचे निधीअभावी दुर्लक्ष झाले आहे. याबाबतची कारणे खालीलप्रमाणे आहेत :—

(१) नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रामध्ये सार्वजनिक आरोग्याची परिस्थिती समाधानकारक नाही.

(२) शहरांत पाणीपुरवठा अपुरा होतो.

(३) कचरा व घाणीची विल्हेवाट योग्य तऱ्हेने लावली जात नाही, आरोग्यास अपायकारक जीवजंतू व कीटके यांचा नायनाट करण्यासाठी योग्य पद्धतीचा अभाव दिसून येतो.

(४) सार्वजनिक आरोग्याच्या योजना हाताळण्यासाठी अपुरा निधी आणि कर्मचारीवर्ग.

(५) आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव.

८.५०. शहरामध्ये सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता याबद्दलच्या ज्या सेवासुविधा आहेत त्या पुरेशा प्रमाणात नसतील तर नागरिकांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो. **तेव्हा नागरी संस्थांनी आरोग्य व स्वच्छताविषयक सेवा पुरविण्यासाठी योग्य असे व्यवस्थापन राबविले पाहिजे. यासाठी त्यांनी आवश्यक तो खर्च उपलब्ध निधीतून केला पाहिजे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यामधील काही बाबींचे व्यवस्थापन करताना खाजगीकरणाचा मार्ग अवलंबिण्यास हरकत नसावी.**

## भुयारी गटार योजना

८.५१. योग्य स्वच्छता आणि सांडपाण्याचा निचरा (घरगुती आणि औद्योगिक) यासाठी भुयारी गटार योजना असणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि असे दिसून येते की, नागरी संस्था या प्रथम पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांना प्राथम्य देतात आणि मलनि:सारणाच्या योजना पुढे ढकलतात. वास्तविक पाहता अशा योजनांनादेखील शासनाकडून ठराविक आकृतीबंधानुसार आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकते. या आयोगाने गठित केलेल्या अभ्यास गटाने त्यांच्या अहवालात असे नमूद केले आहे की, साधनसंपत्तीच्या कमतरता लक्षात घेऊन भुयारी गटार योजना ही १ लाखा-पेक्षा जास्त लोकसंख्या शहरानांच सध्या लागू करण्यात यावी. २४ नगर परिषदा/महानगरपालिका शहरांमध्ये भुयारी गटार योजना कार्यान्वित झालेल्या आहेत आणि ५ शहरांमध्ये अशा योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. या व्यतिरिक्त नागपूर व सोलापूर महानगरपालिका शहरांत सुधारित भुयारी गटार योजनांचे काम सुरू आहे. इतर शहरांमध्ये देखील अशा योजना टप्प्याटप्प्याने राबविण्याचे ठरविले गेले पाहिजे व त्यासाठी योग्य अशी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली पाहिजे. असेही निदर्शनास येते की, ज्या ज्या ठिकाणी अशा योजना अस्तित्वात आहेत त्यापैकी अगदी थोड्या नागरी संस्था वगळता इतर संस्था या योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. **नागरी संस्था मालमत्ता-धारकांवर मलनि:सारण कर आकारीत असल्यामुळे या योजनांच्या देखभाल दुरुस्तीकडे आणि त्यामध्ये सुधारणा करण्याकडे त्यांनी पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे. भुयारी गटार योजनेअंतर्गत सांडपाण्यावर प्रक्रिया झाल्यानंतर जे निरुपयोगी पाणी सोडले जाते अशा पाण्याचा उपयोग जवळच्या क्षेत्रामध्ये सिंचनासाठी होऊ शकेल आणि असे केल्यास संबंधित संस्थांना काही महसूलही उपलब्ध होऊ शकेल, याबद्दल विचार झाला पाहिजे.**

कमी खर्चाच्या स्वच्छता योजना

८.५२. डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या पद्धतीचे उच्चाटन करण्यात यावे असे राष्ट्रीय धोरण आहे. जलनि:सारणाच्या योजना सर्वच शहरांमधून निधीअभावी राबविता येत नाहीत. हे लक्षात घेता कमी खर्चाच्या विविध स्वच्छता योजना राबवाव्यात असे निश्चित झाले आहे. कमी खर्चाच्या स्वच्छता योजना कार्यक्रम हा केंद्र शासन पुरस्कृत असून तो १९८२ ते १९८९ पर्यंत महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळामार्फत शासनाने ठरवून दिलेल्या अर्थसहाय्याच्या आकृतीबंधानुसार राबविण्यात येत असे. १९८९ मध्ये शासनाने असे ठरविले की, कमी स्वच्छतेच्या योजनांचा कार्यक्रम हा संबंधित नागरी संस्थांनी राबवावा. त्यानुसार महाराष्ट्रातील १०५ शहरांमध्ये या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्याचा आकृतीबंध हा केंद्र शासनाने ठरवून दिलेला आहे. या योजनेखाली नागरी संस्थांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून हुडकोकडून कर्ज व अनुदान मिळवून त्याचे वाटप संबंधित नागरी संस्थेला करणे व कार्यक्रमाच्या प्रगतीचे वेळोवेळी मूल्यमापन करण्याचे काम महाराष्ट्र पाणी-पुरवठा व जलनि:सारण मंडळ करते. या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना असे दिसून आले की, या कार्यक्रमाच्या कार्यान्वयनासाठी नागरी भागात, विशेषत: शौचालये बांधकामाच्या कामास खूपच वाव आहेत.

८.५३. या कार्यक्रमाच्या संथ प्रगतीची कारणे लक्षात घेऊन शासनाने १० ऑक्टोबर १९९६ च्या शासन आदेशान्वये आता असा निर्णय घेतला आहे की, नागरी भागातील कमी खर्चाची स्वच्छता योजना केवळ १०५ शहरांपुरती मर्यादित न ठेवता राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात राबविण्यात यावी. या योजनेच्या कार्यक्रमाअंतर्गत घर तेथे शौचालय बांधले जाईल असा हेतू आहे. नागरी भागात वैयक्तिक शौचालयाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याकरिता हुडकोकडून मिळणाऱ्या कर्ज व अर्थ सहाय्याव्यतिरिक्त राज्य शासन निधीतून प्रति शौचालय रुपये १५०० अनुदान देण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्याचा आकृतीबंध देखील आता सुधारण्यात आला आहे. लाभार्थीनीसुद्धा या योजनेंअंतर्गत काही खर्च करावयाचा आहे. तेव्हा या योजनेतील कार्यक्रम राबविण्यासाठी जनतेचा सहभाग देखील असणे आवश्यक आहे. **ही योजना नगरपरिषदा व महानगरपालिका यांनी त्यांच्या क्षेत्रात यशस्वीरीतीने कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करावा.**

झोपडपट्टी सुधारणा

८.५४. नागरी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार व उद्योग व्यवसाय याच्या शोधात येणाऱ्या लोकसंख्येची भर पडत आहे. शहरातील जागेची टंचाई, न पेलवणारे जागेचे भाव यामुळे शहरात झोपडपट्टी वस्त्यांची बेसुमार वाढ झाली आहे व होत आहे. या वस्त्या नगरपरिषदा/महानगरपालिका यांच्या जागांवर तसेच शहरातील केंद्र व राज्य शासन तसेच खाजगी मालकीच्या मोकळ्या जागांवर अधिकृत अथवा अनधिकृतरित्या दाटीवाटीने निर्माण झाल्या आहेत. या वस्त्यांत कोणतेही नियोजन नाही. त्यामुळे तेथे आत्यावश्यक सेवा-सुविधांचे अयोजनही व्यवस्थितपणे करता येत नाही. या वस्त्यांमधील गलिच्छ वातावरणाचा तेथील नागरिकांबरोबर शहरातील इतर नागरिकांवरही विपरीत परिणाम होतो. हे लक्षात घेऊन झोपडपट्ट्यांमध्ये किमान अत्यावश्यक प्राथमिक सेवा-सुविधा पुरविण्याची जबाबदारी नागरी संस्थांवर पडली आहे. मोठ्या नागरी शहरांत झोपडपट्ट्यांचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करीत आहे. या प्रश्नांची शासन स्तरावर जाण असून झोपडपट्टी सुधार योजना काही शहरामधून राबविण्यात येत आहे. या योजनेखाली संबंधित नागरी संस्थांनी अशा वस्त्यांमध्ये किमान अत्यावश्यक सेवा-सुविधा उदा. सार्वजनिक संडास, सार्वजनिक नळाद्वारे पाणीपुरवठा, रस्ते, गटार, दिवाबत्ती या पुरविणे अपेक्षित आहे. ही योजना जेथे लागू आहे अशा नागरी संस्थांना शासनाकडून दरडोई रुपये ५०० इतके आर्थिक सहाय्य उपलब्ध होते. आता नुकतेच या आर्थिक सहाय्यात दिनांक ३१ ऑगस्ट १९९६ च्या शासन निर्णयाद्वारे दरडोई रुपये ८०० पर्यंत इतकी वाढ केली आहे. परंतु मुंबई शहरासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना व पुणे शहरासाठी झोपडपट्टी पुनर्विकास योजना लागू करण्यात आली असल्यामुळे ही वाढ मुंबई आणि पुणे महानगरपालिका क्षेत्रात लागू असणार नाही. या वस्त्यांचे घोषित आणि अघोषित असे दोन प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारच्या वस्त्यांमध्ये आवश्यक सेवा-सुविधा पुरविणे हे अत्यंत जिकरीचे व फार मोठ्या भांडवली खर्चाचे काम आहे.

८.५५. राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांच्या क्षेत्रात असलेल्या घोषित तसेच अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या, त्यातील लोकसंख्या, त्यात पुरविलेल्या आवश्यक सेवा-सुविधाचे प्रमाण व त्यावर झालेला भांडवली खर्च, देखभाल व दुरुस्तीचा खर्च शासनाकडून या प्रयोजनासाठी मिळालेली मदत इत्यादीची माहिती आयोगाने महानगरपालिका/नगरपरिषदांकडून गोळा केली. त्याचा गोषवारा खालील तक्ता क्रमांक ८.५ मध्ये दिला आहे :—

तक्ता क्रमांक ८.५

**झोपडपट्टी सुधार कार्यक्रम**

| बाब | महानगर-पालिका (सर्व) | नगरपरिषदा | | | | एकूण महानगर पालिका + नगरपरिषदा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | एकूण नगरपरिषदा | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **१. गलिच्छ वस्त्यांची संख्या** | | | | | | |
| घोषित | ३००६ | ५३१ | २३३ | २० | ७८४ | ३७९० |
| अघोषित | ५०० | ३२९ | ४५९२ | ४५३ | ५३७४ | ५८७४ |
| **२. गलिच्छ वस्त्यांमधील लोकसंख्या** | | | | | | |
| घोषित | ५३५९१९६ | १३४२३७७ | २८८८५५ | १६८०६ | १६४८०३८ | ७००७२३४ |
| अघोषित | ८४८३८१ | ४९२४८५ | ३९६०३९ | ३०६६४३ | ११९५१६७ | २०४३५४८ |
| **३. गलिच्छ वस्त्यांमधील लोकसंख्येची एकूण नागरी लोकसंख्येशी टक्केवारी** | ३३.८२ | ३८.९७ | २३.७६ | ९.७० | २६.० | ३०.९ |
| **४. पुरविलेल्या मूलभूत सेवा** | | | | | | |
| संडास (संख्या) | ६८२३७ | १३०६४ | ३६३० | ८५७ | १७५५१ | ८५७८८ |
| पाण्याचे नळ | २९३९९ | ९२१८ | ८६०४ | ५२४९ | २३०७१ | ५२४७० |
| रस्त्यावरील दिवे | १६०११ | १२४०० | ९५३२ | ५१८७ | २७११९ | ४३१३० |
| रस्ते (चौ. मि.) | ६०१४३३४ | १४३९०६० | ५२६३९८ | ८९८२८४ | २८६३७४२ | ८८७८०७६ |
| गटारे (मिटर) | ६३६९४५२ | ४३०५०२ | २३८५२२ | १८७०९७ | ८५६१२१ | ७२२५५७३ |
| **५. गलिच्छ वस्ती सुधारणे वरील भांडवली खर्च** (रुपये लाखात) | | | | | | |
| १९९०-९१ | ११३६ | ३१५ | ३३ | ६४ | ४१२ | १५४८ |
| १९९१-९२ | ११९७ | २०७ | ४३ | ६० | ३१० | १५०७ |
| १९९२-९३ | १०१६ | ३२० | ४५ | ८२ | ४४७ | १४६३ |
| १९९३-९४ | १२०० | ३४८ | ५६ | ७८ | ४८२ | १६८२ |
| १९९४-९५ | १०६१ | ३६३ | १२२ | १०६ | ५९१ | १६५२ |
| **६. शासनाकडून खर्चाची प्रतिपूर्ती** (रुपये लाखात) | | | | | | |
| १९९०-९१ | ७६९ | ९६ | ७ | १८ | १२१ | ८९० |
| १९९१-९२ | ४६८ | ७० | ९ | १६ | ९५ | ५६३ |
| १९९२-९३ | ८७७ | ५५ | ९ | ८ | ७२ | ९४९ |
| १९९३-९४ | २३५ | ६१ | ६ | १० | ७७ | ३१२ |
| १९९४-९५ | ४७३ | ६९ | १२ | १४ | ९५ | ५६८ |

| बाब | | महानगर-पालिका (सर्व) | नगरपरिषदा | | | | एकूण महानगर पालिका + नगरपरिषदा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | एकूण नगरपरिषदा | |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **७. गलिच्छ वस्तीवर होणारा देखभाल दुरुस्ती खर्च** (रुपये लाखात) | | | | | | | |
| १९९०-९१ | | ६६८ | २० | ११ | १३ | ४४ | ७१२ |
| १९९१-९२ | | ८२२ | २८ | ७ | १४ | ४९ | ८७१ |
| १९९२-९३ | | ९९२ | ३० | १४ | १६ | ६० | १०५२ |
| १९९३-९४ | | ११५४ | २४ | २३ | २१ | ६८ | १२२२ |
| १९९४-९५ | | १२०४ | २९ | २६ | २२ | ७७ | १२८१ |
| **८. सेवाशुल्काची मागणी / वसुली** (रुपये लाखात) | | | | | | | |
| १९९०-९१ | मा. | १०४९ | ७१ | २३ | १० | १०४ | ११५३ |
| | व. | ४११ | ४६ | १६ | ५ | ६७ | ४७८ |
| १९९१-९२ | मा. | ११०४ | ७४ | २९ | १३ | ११६ | १२२० |
| | व. | ४९२ | ४४ | १३ | ७ | ६४ | ५५६ |
| १९९२-९३ | मा. | ११६३ | ८२ | ४० | १६ | १३८ | १३०१ |
| | व. | ६०३ | ४७ | २२ | ६ | ७५ | ६७८ |
| १९९३-९४ | मा. | १६५४ | ९८ | ५८ | २४ | १८० | १८३४ |
| | व. | ७४४ | ५५ | २५ | १४ | ९४ | .८३८ |
| १९९४-९५ | मा. | १७६२ | १०७ | ६६ | २७ | २०० | १९६२ |
| | व. | ७७८ | ६२ | २६ | १४ | १०२ | ८८० |

मा = मागणी    व = वसुली

८.५६. वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट दिसून येते की, महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रात अघोषित झोपडपट्ट्यांचे प्रमाण बरेच आहे. महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी वस्त्यात राहणाऱ्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी जवळजवळ ३४ टक्के आहे. तर ती अ-वर्गाच्या बाबतीत ३९ टक्के असून ब-वर्गासाठी ती २४ टक्के आहे. या लोकसंख्येच्या प्रमाणावरून झोपडपट्टी वस्त्यांमध्ये सेवा-सुविधा पुरविण्याची आवश्यकता व त्यावर होणारा खर्च याचा सहज अंदाज करता येऊ शकतो. या झोपडपट्ट्या कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता बांधलेल्या असल्यामुळे या भागात रस्ते व गटारे बांधण्यासाठी आवश्यक ती मोकळी जागा उपलब्ध नसल्याने या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी या झोपडपट्ट्यांची फेररचना करणे आवश्यक ठरते. हे काम अत्यंत जिकरीचे, वेळखाऊ तसेच फारच मोठ्या भांडवली खर्चाचे आहे.

८.५७. झोपडपट्टी सुधारणेसाठी या नागरी संस्थांनी मागील ५ वर्षात केलेला भांडवली खर्च व त्या खर्चापोटी शासनाकडून जी मदत मिळाली याची आकडेवारी विचारात घेता असे दिसून येईल की, दरवर्षी नागरी संस्थांच्या भांडवली खर्चात सतत वाढ होत आहे. तर शासनाकडून या भांडवली खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी मिळणारी रक्कम दिवसेंदिवस कमी होत आहे. झोपडपट्ट्यामध्ये सेवा-सुविधा पुरविण्यासाठी ज्याप्रमाणे भांडवली खर्चाची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे या वस्त्यांमध्ये निर्माण केलेल्या सेवा-सुविधा व्यवस्थितपणे चालू ठेवण्यासाठी देखभाल दुरुस्तीचा खर्चही आवश्यक आहे. वरील तक्यातील आकडेवारी लक्षात घेता जवळजवळ भांडवली खर्चाच्या ७५ टक्के एवढी रक्कम देखभाल व दुरुस्तीवर खर्च करावी लागते. या वस्त्यांतील नागरिकांपासून या नागरी संस्थांना सेवाशुल्कापासून फारसे

उत्पन्न मिळत नाही. सेवाशुल्कापोटी नागरी संस्थांनी केलेली मागणी व त्यापोटी झालेली वसुली अत्यंत अल्प असून थकबाकीचे प्रमाण जास्त असल्याचे वरील आकडेवारीवरून स्पष्ट दिसते. या झोपटपट्टी वस्तीतून सेवाशुल्क मिळत नाही. या सबबीवर बऱ्याच नागरी संस्थांनी सेवाशुल्कांची आकारणीच केली नाही. तर काही नागरी संस्थांनी झोपडपट्ट्यांचे कर आकारणीसाठी मूल्यांकनही केलेले नाही. या झोपडपट्ट्यांमधील नागरीक गरीब आहेत हे जरी मान्य केले तरी त्यांना रोजगारापासून उत्पन्न मिळते व ते नागरी संस्थांच्या सेवा-सुविधांचा लाभ घेतात. तेव्हा त्यांनी या सेवा-सुविधांसाठी काही मोबदला देणे आवश्यक आहे. **नागरी संस्थांनी या झोपडपट्ट्यांवर मालमत्ता कराची आकारणी, सवलतीच्या दराने का होईना करून त्याद्वारे उत्पन्न प्राप्त केलेच पाहिजे व देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च तरी परिणामकारकपणे वसूल झाला पाहिजे या दृष्टीने कारवाई करावी अशी आयोगाची शिफारस आहे. इतकेच नव्हे तर अशा झोपडपट्ट्या नव्याने निर्माण होणार नाहीत याबाबत शासनाने योग्य ते निर्बंध लादले पाहिजेत.**

### कर्ज उभारणी

८.५८ नागरी संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मोठ्या भांडवली खर्चाच्या योजना राबविण्यासाठीं कर्ज उभारणी करता येते. असे कर्ज उभारण्यासाठी या संस्थांना संबंधित भांडवली खर्चाच्या योजनांसाठी शासनाची मंजुरी घेणे आवश्यक असते. या संस्था जरी खुल्या बाजारातून कर्जे उभारू शकत असल्या तरी ती कर्जे शासन मान्यतेशिवाय व शासकीय हमी शिवाय उभारता येत नाहीत. अशा कर्जांना हमी देतांना शासन त्याबद्दल हमी शुल्क (गॅरंटी फ़ी) आकारते. या भांडवली खर्चाच्या योजना शासनाकडे मंजुरीसाठी पाठविल्यानंतर विशिष्ट कालावधीत त्यांना मंजुरी प्राप्त होणे आवश्यक असते. परंतु या संदर्भात शासनाने जी क्लीष्ट कार्यपद्धती आखून दिली आहे. त्यानुसार मंजुरी प्राप्त होण्यास फारच विलंब होतो. क्वचित प्रसंगी हा विलंब दोन तीन वर्षांच्या कालावधीपेक्षाही जास्त असल्याचे दिसून आले आहे. परिणामतः मंजूर झालेली योजना कालबाह्य ठरत असल्याने व तिच्या खर्चातही विलंबामुळे दरम्यानच्या काळात वाढ झाल्याने ती योजना राबविणे कठीण असते. एकूण योजनांना शासनाची मान्यता प्राप्त करण्यासाठी जो विलंब होतो व त्या विलंबामुळे योजनेच्या खर्चात जी दुपटी तिपटी एवढी वाढ होते. पर्यायाने त्या संस्थेवर योजनेचा खर्च वाढल्याने कर्जाचा बोजाही वाढतो. त्यामुळे या नागरी संस्थेचेच नव्हे तर राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. एवढेच नव्हे तर ज्या उद्देशाने ही योजना आखली तो उद्देशच विफल होतो व नागरीकांना त्या सेवा सुविधांपासून वंचित रहावे लागते. या संदर्भात आयोग खालील शिफारशी करीत आहे.

**(१) जेंव्हा भांडवली खर्चाच्या योजनांकरिता कर्ज उभारणीचे जे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर होतात त्यांना विनाविलंब व वेळीच मान्यता दिली गेली पाहिजे. त्यात शासकीय हमीची गरज नसल्यास त्या प्रस्तावांना त्वरित मान्यता ६० दिवसांचे आत देण्यात यावी. तर ज्या प्रस्तावास शासकीय हमी आवश्यक असेल त्या प्रस्तावांना ६ महिन्याचे आत शासनाने मान्यता द्यावी किंवा निर्णय कळवावा. अन्यथा या कालावधीनंतर या प्रस्तावाना शासनाने मंजुरी दिली आहे. असे गृहित धरण्यात यावे.**

**(२) नागरी संस्थांच्या ज्या कर्जासाठी शासनाकडून हमी दिली जाते ती सरसकट न देता निवडक बाबींच्या संदर्भातच देण्यात यावी. ज्या योजनांमुळे शहरातील आम नागरीकांना (नागरिकांच्या काही विवक्षित गटाला नव्हे) लाभ मिळणार असेल व नागरी संस्थेलाही काही आर्थिक फायदे होणार असतील अशाच योजनांसाठी हमी देण्यात यावी.**

**(३) राज्यातील ग्रामीण तसेच नागरी भागातील निरनिराळ्या पाणीपुरवठा जलनिःसारण योजना निर्माण करण्याची जबाबदारी सध्या महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाकडे सोपविली जाते. तुर्तासतरी या मंडळाचा या बाबतीत एकाधिकार असल्याचे दिसते. मंडळाने आजपर्यंत अनेक योजना यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत हे जरी खरे असले तरी नागरी संस्था या स्वायत्त संस्था आहेत. त्यांनी वरील प्रकारच्या भांडवली खर्चाच्या योजना सध्याच्या स्पर्धात्मक युगात या एकमेव संस्थेकडूनच करून घ्यावे असे बंधन त्यांच्यावर असू नये. त्यांना त्यांच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा, भुयारी गटार जलनिःसारण इत्यादींच्या योजना तयार करून पूर्ण**

**करण्यासाठी सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील योग्य अशा तज्ज्ञ व अभियांत्रिकी ज्ञान असलेल्या संस्थांशी / मंडळाशी स्वतंत्रपणे करार करण्याची मुभा असायला पाहिजे. ज्या योजनांसाठी शासनाकडून काही आर्थिक मदत वा अनुदान मिळते त्या योजनांसंदर्भातही वरील पद्धतीस शासनाची हरकत असू नये. ही सूचना शासनाच्या खाजगीकरणाच्या धोरणाशी सुसंगत अशीच ठरेल.**

### व्यापारी संकुले

८.५९. प्रकरण ५ मध्ये महानगरपालिका व नगरपरिषदांनी उभारलेल्या व्यापारी संकुलाची माहिती परिच्छेद क्र. ५.९० व ५.१५५ मध्ये दिली आहे. या संकुल बांधणीचा उद्देश नागरीकांना मध्यवर्ती ठिकाणी एकत्रित बाजारपेठ उपलब्ध करणे हा आहे. काही नागरी संस्था व्यापारी संकुल उभारणीसाठी शासन वा इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतात व शासन त्यासाठी हमी देत असते. तत्त्वतः हे योग्य असले तरी नागरिकांना ज्या मुलभूत सेवा-सुविधांसाठी जो भांडवली खर्च आवश्यक आहे त्याकडे दुर्लक्ष करून अशा बाबींवर किती प्रमाणात लक्ष द्यावे याचा विचार प्रामुख्याने होणे आवश्यक आहे. शक्यतो या संकुलाचे जे लाभार्थी असतील त्यांचेकडून संकुल बांधणीसाठीचा भांडवली खर्च भरून निघेल, अशा रितीने ठेवी घ्याव्यात व त्यातून संकुलाची उभारणी पूर्ण करावी. **ही संकुल उभारणी करताना नागरी संस्थेच्या उत्पन्नांत वाढ होण्याचा प्रमुख उद्देश असावा व ही बाब केवळ व्यापारी उलाढालीचे साधन होऊ नये. त्याशिवाय नागरी क्षेत्रात अत्यावश्यक असलेल्या सेवा सुविधांकडे दुर्लक्ष करून या संकुल उभारणीच्या कार्यक्रमास प्राधान्य देणेही उचित ठरणार नाही.**

### रस्ते, इमारती, देखभाल-दुरुस्ती

८.६०. **रस्ते.**—नागरी क्षेत्रामध्ये वाहतुक व्यवस्थेसाठी आणि जनतेच्या उपयोगाकरिता योग्य लांबी-रुंदीचे आणि दर्जाचे रस्ते असणे अत्यावश्यक आहे. वाढत्या गरजांप्रमाणे नविन रस्ते निर्माण करणे आणि जे रस्ते, मार्ग अस्तित्वात आहेत त्यांची निगा राखणे ही जबाबदारी नागरी संस्थांची आहे. परंतु ही जबाबदारी नागरी संस्थांना निधीअभावी पूर्णांशाने पार पाडता येत नाही. नागरी क्षेत्रातील ही अत्यावश्यक सुविधा आहे हे लक्षांत घेऊन मुंबई वगळता इतर नागरी संस्थाना ही जबाबदारी पार पाडण्यासाठी मदत व्हावी म्हणून शासनाकडून राज्याच्या मोटार वाहन कराच्या निव्वळ उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम नागरी संस्थांसाठी वेगळी काढून ती लोकसंख्येच्या प्रमाणांत दरडोई प्रमाणे अनुदान म्हणून दिली जाते. काही महानगरपालिका आणि मोठ्या नगरपरिषदा वगळल्यास इतर शहरातील रस्त्यांची परिस्थिती चांगली नाही इतकेच नव्हेतर नागरी क्षेत्रात केवळ मुख्य रस्त्यांच्या देखभाल दुरुस्ती व विशेषतः पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्याची तात्पुरती जुजबी डागडुजी यापुरतीच मर्यादित असते. तात्पुरत्या स्वरूपाची केलेली डागडुजी जास्त काळ टिकत नसल्याने या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीवर वारंवार खर्च करावा लागतो. परिणामतः ही तात्पुरती मलमपट्टी असते. बरेचदा रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीवर केलेली तरतूद विविध कारणांमुळे नवीन रस्त्यांच्या बांधणी किंवा इतर कामांसाठी वळविली जाते. याचा विपरीत परिणाम असा होतो की पुरेशा निधीअभावी जुनेच नव्हेतर नवीन रस्तेही खराब होतात व ते पुनःश्च तयार करण्याची आवश्यकता भासते. एकूण रस्ते बांधणीसाठी झालेला भांडवली खर्च त्यामुळे वाया जातो.

८.६१. या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चासाठी कोणते निकष आहेत व किती निधीची आवश्यकता आहे याबाबत नागरी संस्थांना माहिती नाही. ही अडचण लक्षांत घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांचा प्रकार, त्याची रुंदी, वाहतुकीचे प्रमाण इ. बाबी विचारांत घेऊन तसेच भारत सरकारच्या रस्ते वाहतुक मंत्रालय, नवी दिल्ली यांनी त्यांच्या अहवालात दिलेले निकष विचारात घेऊन देखभाल व दुरुस्तीसाठी निधीची आवश्यकता काढली असून त्याबाबतची सविस्तर माहिती व पुढील खर्चाचे अंदाज याबाबतचा तपशील प्रकरण १२ मध्ये गरजांचे निर्धारण करताना विचारात घेतला आहे.

### नागरी संस्थांच्या इमारती

८.६२. नागरी क्षेत्रात वेगवेगळ्या सेवासुविधा पुरविण्याचे काम सुरळीत व व्यस्थितपणे चालविण्याच्या दृष्टीकोनातून नागरी संस्थांना अनेक इमारती बांधाव्या लागतात. कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत, विभागीय कार्यालये, दवाखाने, शाळा, समाज मंदिरे, व्यापारी संकुले, बंदिस्त बाजार, वाचनालये, जकात नाके, निवासस्थाने इ. या इमारतीच्या बांधकामावर फार मोठा भांडवली खर्च केला जातो. या इमारती चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी त्याची



पुव ४०९४-११

नियमितपणे देखभाल व दुरुस्तीही आवश्यक असते. परंतु निधीअभावी व विशेषतः शहरांत भांडवली खर्चाची इतर कामे पार पाडण्यासाठी निधी खर्ची पडत असल्याने अस्तित्वात असलेल्या इमारतींची आवश्यक तेवढी निगा राखली जात नाही व त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेक नागरी संस्थांच्या क्षेत्रात बांधलेल्या इमारती मोडकळीस आल्या असून त्या आता नव्याने बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. इमारतींचे एक ठराविक आयुष्य असते हे मान्य केले तरी योग्य त्या देखभाल व दुरुस्तीमुळे त्यांचे आयुष्य निश्चितच वाढविता येऊ शकते व त्या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी करावा लागणारा खर्च कांही काळ तरी लांबविता येऊ शकतो.

८.६३. या संदर्भात आयोगाने नागरी संस्थांच्या क्षेत्रात ३१ मार्च १९९५ रोजी असलेल्या इमारतींची संख्या, त्यांचे क्षेत्रफळ व त्यावर १९९४–९५ या वर्षात देखभाल दुरुस्तीवर केलेला खर्च याची आकडेवारी गोळा केली. देखभाल दुरुस्तीसाठी खर्चाचे निकष काय असावे याची माहिती जवळजवळ सर्वच संस्थांना नाही. त्यामुळे शासनाने स्वतःच्या तसेच जिल्हा परिषदेच्या इमारती दुरुस्ती व देखभालीसाठी जे निकष वापरले त्या निकषाप्रमाणे किती खर्च आला असता याचा अंदाज सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वरील आकडेवारीचे आधाराने घेतला असून याबाबतचा सविस्तर तपशिल नागरी संस्थांच्या गरजांचे निर्धारण करताना प्रकरण १२ मध्ये दिला आहे

## विकास निधी व इतर वैधानिक निधी

### विकास निधी

८.६४ नागरी क्षेत्रात नागरीकरणाची वाढ प्रचंड प्रमाणात झाल्याने नागरी भागातील मोकळ्या जमिनीवर लोकांच्या राहण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात, आवश्यक त्या रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण व पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे, वीज व रस्त्यांवरील दिवे इ. सोयी व सुविधा उपलब्ध नसलेल्या अनिर्बंध व अनियंत्रित अशा नागरी वसाहती निर्माण झाल्या. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ हा नागरी भागाचा नियोजनबद्ध विकास करणे व नवीन शहर स्थापण्यासाठी योजना आखणे यासाठी संमत करण्यात आला. एखाद्या जागेचा अथवा इमारतीचा वापर करणे, वापरात बदल करणे, त्यांचा विकास करणे ज्यासाठी नागरी संस्थांची परवानगी आवश्यक असते, त्यासाठी विकास आकार आकारण्याची व गोळा करण्याची तरतूद या अधिनियमातील कलम २२४ अन्वये करण्यात आली व त्याचे किमान व कमाल दर निश्चित करणयात आले. या दुरूस्तीनुसार ऑगस्ट १९९२ पासून गोळा होणारा असा निधी " विकास निधी " या वेगळ्या शीर्षाखाली ठेवावयाचा असून त्याचा वापर शहरातील नियोजित विकासाच्या कामासाठी करावयाचा आहे.

८.६५ राज्यातील सर्वच महानगरपालिका व बहुतेक नगरपरिषदांनी हा विकास आकार त्यांच्या कार्यक्षेत्रात लागू केला आहे. आयोगाने विकास निधीमध्ये १९९२–९३ ते १९९४–९५ या तीन वर्षाच्या कालावधीत विकास आकारापोटी निधीत जमा रक्कम व तिचा विनियोग याबाबतची माहिती गोळा केली असून ती तक्ता क्रमांक ८.६ मध्ये दाखविली आहे.

तक्ता क्रमांक ८.६

**महानगरपालिका / नगरपरिषदांचा विकास निधी व त्यातून केलेला खर्च**

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | महानगरपालिका | विकास निधीची वसुली | | | निधीतून केलेला खर्च | | | शिल्लक दिनांक ३१ मार्च १९९५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९२–९३ | १९९३–९४ | १९९४–९५ | १९९२–९३ | १९९३–९४ | १९९४–९५ | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई .. | .. | २२.३४ | ३५.६४ | .. | १५.५० | .. | ४२.४९ |
| २ | ठाणे .. | ०.०१ | ०.६८ | १.३६ | .. | .. | .. | २.०५ |
| ३ | नवी-मुंबई .. | .. | .. | ०.५८ | .. | .. | .. | ०.५८ |
| ४ | कल्याण .. | ०.४८ | १.६४ | १.९६ | ०.३४ | १.९३ | ०.४२ | १.५७ |

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | महानगरपालिका | | विकास निधीची वसुली | | | निधीतून केलेला खर्च | | | शिल्लक दिनांक ३१ मार्च १९९५ अखेर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | १९९२-९३ | १९९३-९४ | १९९४-९५ | |
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| ५ | नाशिक | .. | ४.६५ | १.७१ | २.३८ | .. | ०.१४ | १.८५ | ६.७५ |
| ६ | पुणे | .. | ०.०५ | ४.६६ | ६.५६ | .. | ३.०० | ५.०० | ३.२७ |
| ७ | पिंपरी-चिंचवड | .. | ०.३१ | ०.४० | ०.४७ | .. | .. | .. | १.१८ |
| ८ | सोलापूर | .. | ०.०६ | ०.३७ | ०.४१ | .. | .. | .. | ०.८४ |
| ९ | कोल्हापूर | .. | ०.४९ | १.४७ | ०.८३ | ०.२९ | १.४६ | ०.९८ | ०.०७ |
| १० | औरंगाबाद | .. | ०.१८ | १.०७ | ०.८१ | २.०४ | १.५७ | २.३७ | .. |
| ११ | अमरावती | .. | ०.२६ | ०.९६ | ०.६५ | .. | .. | ०.२१ | १.६७ |
| १२ | नागपूर | .. | .. | ०.०५ | ०.३१ | .. | .. | .. | ०.३६ |
| | एकूण | .. | ६.५० | ३५.३६ | ५१.९६ | २.६७ | २३.५९ | १०.८२ | ६०.८३ |
| | नगरपरिषदा | | | | | | | | |
| | अ-वर्ग | .. | ०.९१ | ३.८४ | ३.६६ | ३.४२ | ३.५३ | ६.४७ | २.६५ |
| | ब-वर्ग | .. | ०.८२ | ५.४६ | ९.२२ | ०.४५ | १.२७ | १.७१ | ९.२४ |
| | क-वर्ग | .. | ०.४० | १.०६ | १.२२ | ०.२६ | ०.५३ | ०.७८ | ०.६९ |
| | एकूण | .. | २.१४ | १०.३७ | १४.१० | ४.१३ | ५.३३ | ८.९७ | १२.५९ |

८.६६ राज्यातील सर्वच महानगरपालिकांनी विकास आकार लागू केला असून काही अपवाद वगळता विकास आकारापोटी गोळा केलेल्या रकमेत दरवर्षी वाढ होत असल्याचे दिसते. सर्वाधिक वसुली मुंबई महानगरपालिकेची असून त्या खालोखाल पुणे, नाशिक, कल्याण व ठाणे या महानगरपालिकांचा क्रम लागतो. वर नमूद केल्याप्रमाणे हा निधी नागरी क्षेत्रातील नियोजित विकासाच्या कामासाठी वापरावयाचा आहे. काही महानगरपालिकांनी या निधीचा वापर अद्याप केल्याचे दिसत नाही. तर कांहीनी मात्र दरवर्षी निधीतील रक्कम विकास कार्यासाठी उदा. रस्ते बांधणे, गटारी व्यवस्था, रस्त्यावरील दिवे इत्यादीसाठी वापरल्याचे दिसते.

८.६७. काही नगरपरिषदांनी ऑगस्ट १९९२ पूर्वीच्या तरतुदीप्रमाणे जे तपासणी शुल्क / विकास कर गोळा केले त्यातील निधी विकास कार्यासाठी वापरला, तर काही नगरपरिषदांनी जमा रक्कम परस्पर महसुली खर्चासाठी वापरली, तर काहीनी विकास निधीतून केलेल्या खर्चाचे हिशोब वेगळे ठेवले नाहीत. " ब " वर्ग नगरपरिषदांनी " अ " वर्गापेक्षा या विकास निधीची आकारणी करून चांगली वसुली केली आहे. अनुषंगाने येथे नमूद करावेसे वाटते की, " अ ", " ब " व " क " या वर्गात अनुक्रमे ३, ६ व २७ नगरपरिषदांनी हा विकास कर लागू केला नाही.

८.६८ विकास निधीतून जी विकास कार्ये घेण्यात आली त्यावर झालेल्या खर्चातही मागील तीन वर्षात वाढ झाल्याचे दिसून येते. " अ " वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत निधीचा वापर विकास कार्यावर झाल्याचे दिसते तर " ब "



१९९८-१५७

वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत विकास निधीतून केलेला खर्च फारच अल्प आहे. " ब " वर्गातील १९ नगरपरिषदांनी विकास निधीतून कोणताही खर्च केला नाही. " क " वर्गात ज्या नगरपरिषदांनी विकास आकार गोळा केला, त्यापैकी ६९ नगरपरिषदांनी त्यातून विकास कार्यासाठी कोणताही खर्च केल्याचे दिसून आले नाही. **या निधीमध्ये ३१ मार्च १९९५ अखेरची शिल्लक विचारात घेता नगर रचना व विकास कार्याच्या योजना आखून त्या राबविण्यासाठी योग्य प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्थांनी विकास आकार अद्याप आकारला नाही किंवा त्यांनी वेगळा विकास निधी ठेवला नाही त्यांनी विकास आकार आकारून निधी ठेवणे व त्याचा वापर नियोजित नगर रचना व विकास कार्यासाठी करणे उचित ठरेल.**

### राखीव निधी

८.६९ नागरी संस्थांसाठीच्या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे नागरी संस्थांना त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्ती वेतन निधी, वेतन, राखीव निधी, तसेच संपत्ती व मालमत्तांसाठी घसारा निधी निर्माण करावयाचे असतात. सेवानिवृत्ती वेतन निधीचा उद्देश सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय निवृत्तीवेतनाचा भार नियमित उत्पन्नावर न पडता तो या निधीतून भागविला जावा असा आहे. राखीव वेतन निधीचा उद्देशही कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देताना काही आकस्मिक अडीअडचणी आल्यास त्यांना वेळेवर वेतन मिळावे, त्यात विलंब होऊ नये हा आहे. नागरी संस्थांच्या मालकीच्या ज्या स्थावर मालमत्ता तसेच वाहने, यंत्रे इत्यादी चलअचल मालमत्ता आहेत त्या सतत उपयोगात असल्याने या मालमत्तांची झीज व नुकसान होत असते. पर्यायाने या मालमत्तांच्या किंमतीत काळानुसार घट होते व शेवटी त्या निकामी ठरल्याने त्यांचे नूतनीकरण, पुनर्बांधणी किंवा पुनर्खरेदी करणे आवश्यक असते. या झिजेपोटी झालेले नुकसान व जुन्या मालमत्तेऐवजी नवीन मालमत्ता घेण्यासाठी काही रक्कम दरवर्षी वेगळी काढून त्याचा स्वतंत्र असा घसारा निधी निर्माण केल्यास या निधीत जमा झालेली रक्कम त्या रकमेवर मिळालेले व्याज इत्यादीचा उपयोग या मालमत्तांचे पुनर्जीवन करण्यासाठी अथवा त्या नवीन खरेदी करण्यासाठी सहजपणे करता येऊ शकतो व त्यामुळे नियमित उत्पन्नातून या भांडवली खर्चासाठी इतर महसुली खर्चात कपात करून हा खर्च भागविण्यासाठी वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता भासत नाही.

८.७० " राखीव निधी " निर्माण करून त्यात आवश्यक त्या रकमा नियमितपणे भरण्यात येतात किंवा कसे, त्या निधीचा वापर कशाप्रकारे केला जातो याबाबतची माहिती आयोगाने गोळा केली असता असे दिसून आले की, बऱ्याच नागरी संस्था एकतर वैधानिक निधी ठेवतच नाहीत. इतकेच नव्हेतर या निधीमध्ये नियमितपणे किती रक्कम जमा करावी लागते या बाबतची माहिती बऱ्याच संस्थांना नाही. काही संस्थांनी हे निधी निर्माण केले आहेत परंतु त्या निधीमध्ये कोणत्याही प्रकारची भर मागील काही वर्षात पडलेली नाही. या नागरी संस्थांचे उत्पन्न त्यांना विविध नागरी प्रयोजनासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाच्या तुलनेत अपुरे पडत असल्याने निधीमध्ये जमा करावयाच्या रकमा वेळच्या वेळी भरल्या जात नाहीत असे दिसते. या उलट राखीव निधीमध्ये जमा असलेल्या रकमांचा उपयोग मात्र इतर प्रयोजनासाठी केला असल्याचे दिसून आले.

### वेतन निधी

८.७१ महानगरपालिकांच्या बाबतीत वेतन निधी फक्त ठाणे, नाशिक व औरंगाबाद या तीन महानगरपालिकांनी निर्माण केला आहे, व नियमितपणे त्यात आवश्यक तो निधी जमा केल्याचे दिसते. कल्याण महानगरपालिकेने हा निधी १९९४-९५ या वर्षापासून ठेवला आहे. इतर महानगरपालिकांनी याबाबतची माहिती आयोगाला दिली नाही. नगरपरिषदांच्या बाबतीत सर्वच नगरपरिषदांनी हा निधी ठेवला आहे व त्यात ३ महिन्याच्या वेतना इतकी रक्कम शिल्लक राहील अशाप्रकारे निधी ठेवला जातो. त्याचा तपशील तक्ता क्र. ८.७ मध्ये पहावा.

तक्ता क्रमांक ८.७

## महानगरपालिका / नगरपरिषदांचा वेतन निधी

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | महानगरपालिका | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमित जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ठाणे .. | १९९०–९१ | २७१.५५ | ६०.७७ | ३३२.३२ | .. | ३३२.३२ | .. |
| | | १९९४–९५ | १८७.२८ | १५.९१ | २०३.१९ | .. | २०३.१९ | .. |
| २ | कल्याण .. | १९९०–९१ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | १९९४–९५ | ०.१२ | ०.१२ | ०.२४ | ०.१२ | ०.१२ | .. |
| ३ | नाशिक .. | १९९०–९१ | १०५.४५ | १२.६४ | ११८.०९ | .. | ११८.०९ | .. |
| | | १९९४–९५ | १६६.२८ | ३२२.२२ | ४८८.५० | .. | ४८८.५० | ०.३० |
| ४ | औरंगाबाद .. | १९९०–९१ | १००.०१ | ८.२८ | १०८.२९ | .. | १०८.२९ | .. |
| | | १९९४–९५ | १६३.२५ | १.९९ | १६५.२४ | .. | १६५.२४ | .. |
| | एकूण .. | १९९०–९१ | ४७७.०१ | ८१.६९ | ५५८.७० | .. | ५५८.७० | .. |
| | | १९९४–९५ | ५१६.९३ | ३४०.२४ | ८५७.१७ | ०.१२ | ८५७.०५ | ०.३० |
| नगरपरिषदा | | | | | | | | |
| | अ–वर्ग .. | १९९०–९१ | ८९८.२५ | १४६.६७ | १,०४४.९२ | २४.०० | १,०२०.९२ | २९३.३३ |
| | | १९९४–९५ | १,२८०.१२ | २१७.३८ | १,४९७.५० | १२३.५४ | १,३७३.९५ | ४७३.१३ |
| | ब–वर्ग .. | १९९०–९१ | ४१०.२६ | ७५.३४ | ४८५.६० | ६१.७५ | ४२३.८५ | ३४६.२४ |
| | | १९९४–९५ | ५९६.४७ | ११५.९२ | ७१२.३९ | ३३.५६ | ६७८.८४ | ५२५.५३ |
| | क–वर्ग .. | १९९०–९१ | ३९०.६१ | ७६.२२ | ४६६.८३ | ३८.०० | ४२८.८३ | ३२०.६१ |
| | | १९९४–९५ | ५७५.२० | १३५.२४ | ७१०.४४ | ५८.१७ | ६५२.२७ | ५१७.५८ |
| | एकूण .. | १९९०–९१ | १,६९९.१२ | २९८.२३ | १,९९७.३५ | १२३.७५ | १,८७३.६० | ९६०.१८ |
| | | १९९४–९५ | २,४५१.७९ | ४६८.५४ | २,९२०.३३ | २१५.२७ | २,७०५.०६ | १,५१६.२४ |

या निधीमध्ये नगरपरिषदांनी आवश्यक त्या रकमा जमा केल्या व त्या रकमांचा वेळोवेळी वापरही केलेला दिसतो. "क" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत ४ नगरपरिषदांनी हा निधी ठेवल्याचे दिसत नाही.

### निवृत्तिवेतन निधी

८.७२ हा निधी १२ महानगरपालिकांपैकी ७ महानगरपालिकांनीच ठेवला आहे. निधी न ठेवणाऱ्यांमध्ये नवीमुंबई, कल्याण, कोल्हापूर, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांचा समावेश आहे. याही निधीच्या बाबतीत किती रक्कम जमा करावी याबाबतची माहिती बऱ्याच नागरी संस्थांना असल्याचे दिसून येत नाही. निवृत्तिवेतन निधीबाबतची माहिती पुढील तक्ता क्र. ८.८ मध्ये दिली आहे :—

## तक्ता क्रमांक ८.८

## निवृत्तिवेतन निधी

(रु. कोटींत)

| महानगरपालिका | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमितपणे जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. मुंबई .. | १९९०-९१ | ३४.८४ | ४६.५३ | ८१.३७ | ४६.८२ | ३४.५५ | ४५.०२ |
| | १९९४-९५ | २८.३४ | .. | २८.३४ | .. | २८.३४ | उ. ना. |
| २. ठाणे .. | १९९०-९१ | ०.३८ | ०.०३ | ०.४१ | .. | ०.४१ | उ. ना. |
| | १९९४-९५ | ०.४९ | ०.०४ | ०.५३ | .. | ०.५३ | उ. ना. |
| ३. नाशिक .. | १९९०-९१ | ०.१७ | ०.८२ | ०.९९ | ०.८८ | ०.११ | ०.६५ |
| | १९९४-९५ | ०.३४ | १.५७ | १.९१ | १.५१ | ०.४० | १.५५ |
| ४. पुणे .. | १९९०-९१ | १.२८ | ५.१४ | ६.४२ | ४.३१ | २.१२ | उ. ना. |
| | १९९४-९५ | ४.५८ | १०.३२ | १४.९० | ९.३० | ५.६० | उ. ना. |
| ५. पिंपरी-चिंचवंड .. | १९९०-९१ | ०.०४ | ०.०२ | ०.०६ | .. | ०.०६ | उ. ना. |
| | १९९४-९५ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | .. | उ. ना. | उ. ना. |
| ६. सोलापूर .. | १९९०-९१ | ०.७४ | ०.०० | ०.७४ | .. | ०.७४ | उ. ना. |
| | १९९४-९५ | ०.७४ | ०.३८ | १.११ | .. | १.११ | उ. ना. |
| ७. औरंगाबाद .. | १९९०-९१ | ०.५९ | ०.०९ | ०.६८ | .. | ०.६८ | उ. ना. |
| | १९९४-९५ | १.१३ | ०.०० | १.१४ | ०.३८ | ०.७५ | उ. ना. |
| एकूण .. | १९९०-९१ | ३८.०५ | ५२.६३ | ९०.६८ | ५२.०१ | ३८.६७ | ४५.६७ |
| | १९९४-९५ | ३५.६२ | १२.३१ | ४७.९३ | ११.१९ | ३६.७४ | १.५५ |
| **नगरपरिषदा** | | | | | | | (रुपये लाखांत) |
| अ-वर्ग .. | १९९०-९१ | ११४.४१ | ४८४.३३ | ५९८.७४ | ४५४.१७ | १४४.५६ | १३३.५२ |
| | १९९४-९५ | २५६.०५ | ८०९.५७ | १०६५.६२ | ७६०.३५ | ३०५.२७ | १३१.३९ |
| ब-वर्ग .. | १९९०-९१ | ९५.१८ | १८४.५२ | २७९.७० | १७९.९९ | ९९.७१ | १६३.०७ |
| | १९९४-९५ | १७६.८५ | ३५३.१८ | ५३०.०३ | ३१५.११ | २१४.९२ | २७७.४० |
| क-वर्ग .. | १९९०-९१ | ७४.३७ | १६७.४४ | २४१.८१ | १६१.२० | ८०.६२ | १०३.०१ |
| | १९९४-९५ | ११०.९४ | २८८.३१ | ३९९.२५ | २५७.४० | १४१.८५ | १७३.५३ |
| एकूण .. | १९९०-९१ | २८३.९६ | ८३६.२९ | ११२०.२५ | ७९५.३६ | ३२४.८९ | ३९९.६० |
| | १९९४-९५ | ५४३.८४ | १४५१.०६ | १९९४.९० | १३३२.८६ | ६६२.०४ | ५८२.३२ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येईल की, या निधीमध्ये ठेवावयाच्या रकमा जमा करण्याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न होत नाहीत. नगरपरिषदांच्या बाबतीत अ-वर्गामध्ये ५ नगरपरिषदांनी ब वर्गात ६ तर क वर्गात ४६ नगरपरिषदांनी या निधीची माहिती उपलब्ध करून दिली नाही किंबहुना असा निधी या नगरपरिषदांनी ठेवला नाही असा निष्कर्ष काढल्यास तो चुकीचा ठरू नये. निधीचा वापर विचारात घेतल्यास बरीच मोठी रक्कम उपयोगात आणल्याचे दिसून येते.

घसारा निधी

८.७३. हा निधी १२ पैकी ५ महानगरपालिकांनी अद्याप निर्माण केल्याचे दिसत नाही. या पाचांमध्ये मुंबई, नवी मुंबई, कल्याण, पिंपरी-चिंचवड व अमरावती ह्या महानगरपालिकांचा समावेश आहे. ठाणे महानगरपालिकेने हा निधी १९९१-९२ पासून ठेवण्यास सुरुवात केली. नगरपरिषदांच्या बाबतीत या निधीच्या संदर्भात परिस्थिती गंभीर आहे. बहुतेक नगरपरिषदांनी हा निधी ठेवलेला नाही. काही प्रकरणी असेही आढळून आले की, काही नगरपरिषदांनी त्यांच्या मालमत्ता व संपत्तीबाबत ज्या नोंदवह्या नियमाप्रमाणे ठेवावयाच्या असतात त्याही ठेवलेल्या नाहीत. परिणामतः नगरपरिषदांची एका विशिष्ट दिवशी किती मालमत्ता आहे व त्याचे मूल्य याबाबतची माहिती या नगरपरिषदा देऊ शकत नाहीत. त्यामुळे घसारा निधीबाबत या नगरपरिषदांनी दिलेली माहिती कितपत परिपूर्ण आहे याची शंका येते. असे असले तरीही ज्या नगरपरिषदांनी घसारा निधीबाबतची माहिती दिली आहे ती तक्ता क्र. ८.९ मध्ये दर्शविली आहे :—

तक्ता क्रमांक ८.९

**घसारा निधी**

(रु. लाखांत)

| महानगरपालिका | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमितपणे जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. ठाणे .. | १९९०-९१ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | १९९४-९५ | २.८५ | ०.२५ | ३.१० | .. | ३.१० | .. |
| २. नाशिक .. | १९९०-९१ | १६.२६ | १.५८ | १७.८४ | .. | १७.८४ | १.०० |
| | १९९४-९५ | ३८.२३ | २७.३४ | ६५.५७ | .. | ६५.५७ | २५.०० |
| ३. पुणे .. | १९९०-९१ | १३८.८४ | १४५.५६ | २८४.४० | १३०.७७ | १५३.६३ | .. |
| | १९९४-९५ | २२८.३५ | ९९.६६ | ३२८.०१ | २३१.१३ | ९६.८८ | .. |
| ४. सोलापूर .. | १९९०-९१ | ४०.०९ | ११.९४ | ५२.०३ | ५.२० | ४६.८३ | ६.२६ |
| | १९९४-९५ | ५५.४५ | ४.०८ | ५९.५३ | .. | ५९.५३ | .. |
| ५. कोल्हापूर .. | १९९०-९१ | .. | १८५.१३ | १८५.१३ | ११२.२४ | ७२.८९ | .. |
| | १९९४-९५ | ११.१९ | २५.५८ | ३६.७७ | ३३.०० | ३.७७ | .. |
| ६. औरंगाबाद .. | १९९०-९१ | २४.३८ | ३.७३ | २८.११ | .. | २८.११ | .. |
| | १९९४-९५ | ४७.०८ | ०.११ | ४७.१९ | ५.४० | ४१.७९ | .. |
| ७. नागपूर .. | १९९०-९१ | ११.९७ | ३.४३ | १५.४० | .. | १५.४० | ०.५० |
| | १९९४-९५ | २२.०५ | ४.५१ | २६.५६ | .. | २६.५६ | ०.५० |
| एकूण .. | १९९०-९१ | २३१.५४ | ३५१.३७ | ५८२.९१ | २४८.२१ | ३३४.७० | ७.७६ |
| | १९९४-९५ | ४०५.२० | १६१.५३ | ५६६.७३ | २६९.५३ | २९७.२० | २५.५० |
| **नगरपरिषदा** | | | | | | | |
| अ-वर्ग .. | १९९०-९१ | ५०.२६ | ३०.९४ | ८१.२० | १७.०४ | ६४.१६ | ६८.०३ |
| | १९९४-९५ | १२७.८३ | २९.४० | १५७.२३ | ६.८८ | १५०.३५ | २२.८२ |
| ब-वर्ग .. | १९९०-९१ | १०९.९३ | १५.८३ | १२५.७६ | १३.२२ | ११२.५४ | ४.३० |
| | १९९४-९५ | १७१.५३ | २१.८४ | १९३.३७ | ६.२१ | १८७.१६ | ९.४७ |

| महानगरपालिका | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमितपणे जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क-वर्ग .. | १९९०-९१ | ७८.१७ | १२.३५ | ९०.५२ | १.९९ | ८८.५३ | १६.८६ |
| | १९९४-९५ | १४२.१८ | ४२.३० | १८४.४८ | २३.०३ | १६१.४६ | २३.६३ |
| एकूण .. | १९९०-९१ | २३८.३६ | ५९.१२ | २९७.४८ | ३२.२५ | २६५.२३ | ८९.१९ |
| | १९९४-९५ | ४४१.५४ | ९३.५४ | ५३५.०८ | ३६.१२ | ४९८.९७ | ५५.९२ |

अ-वर्ग नगरपरिषदांमध्ये ४ नगरपरिषदांनी घसारा निधी ठेवल्याचे दिसत नाही. ब-वर्गामध्ये हा निधी न ठेवणाऱ्या नगरपरिषदांची संख्या १९ आहे, तर क-वर्गामध्ये १५९ पैकी ९१ नगरपरिषदांनी हा निधी ठेवलेला नाही. यात मराठवाडा विभागातील नगरपरिषदांची संख्या ३४ असून ती सर्वाधिक आहे, तर त्या खालोखाल अमरावती विभाग १७, पुणे विभाग १५, नागपूर विभाग १२, नाशिक विभाग ८ व कोकण विभाग ५ असा क्रम लागतो. याही निधीच्या बाबतीत दरवर्षी ज्या रकमा वर्गणी म्हणून गोळा करावयाच्या असतात त्या व्यवस्थितपणे जमा केल्याचे दिसून येत नाही.

## इतर निधी

८.७४. या निधीमध्ये भविष्य निर्वाह निधी, पाणीपुरवठा निधी, कर्ज निवारण निधी, वृक्ष निधी, वाचनालय निधी, विकास निधी, मलनिःसारण निधी, रस्ते निधी, हुतात्मा स्मृती निधी, आग व धोका निधी, इत्यादी अनेक निधींचा समावेश आहे. परंतु माहितीवरून असे दिसते की, सर्वच नगरपरिषदांनी यातील सर्वच निधी ठेवलेले नाहीत. या निधीची एकत्रित माहिती खालील तक्ता क्र. ८.१० मध्ये दिली आहे :—

तक्ता क्रमांक ८.१०

**महानगरपालिका/नगरपरिषदांचे इतर निधी**

(रु. लाखात)

| महानगरपालिका | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमितपणे जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. मुंबई .. | १९९०-९१ | १५७८.०१ | १७३.३० | १७५१.३१ | ६०.५६ | १६९०.७५ | ८५.२५ |
| | १९९४-९५ | २३०४.४३ | .. | २३०४.४३ | .. | २३०४.४३ | .. |
| २. कल्याण .. | १९९०-९१ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | १९९४-९५ | ३९५.२४ | ४४९.२९ | ८४४.५३ | ४१.६२ | ८०२.९१ | .. |
| ३. नाशिक .. | १९९०-९१ | २०८६.२३ | १३६८.२७ | ३४५४.५० | ३२२.३१ | ३१३२.१९ | ६०.०० |
| | १९९४-९५ | ५७१९.१५ | २०७७.८१ | ७७९६.९६ | १२२१.६६ | ६५७५.३० | ३४३.५२ |
| ४. पुणे .. | १९९०-९१ | ३४७६.६० | १२३७.१२ | ४७१३.७२ | २१२६.११ | २५८७.६१ | .. |
| | १९९४-९५ | ३३४०.७३ | ३४२४.४५ | ६७६५.१८ | ४०९४.२० | २६७०.९८ | .. |
| ५. पिंपरी-चिंचवड .. | १९९०-९१ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | १९९४-९५ | ७.५० | ०.२४ | ७.७४ | .. | ७.७४ | .. |

(रु. लाखात)

| महानगरपालिका | | वर्ष | सुरुवातीची शिल्लक | वर्षातील जमा | एकूण | निधीचा वापर | वर्षअखेर शिल्लक | निधीत नियमितपणे जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. सोलापूर | .. | १९९०-९१ | ३५२.४२ | ६१.०७ | ४१३.४९ | १२०.०५ | २९३.४४ | ३३.०१ |
| | | १९९४-९५ | ३४०.२४ | २६.७१ | ३६६.९५ | ४१.०५ | ३२५.९० | .. |
| ७. कोल्हापूर | .. | १९९०-९१ | १२३.४७ | २६.८५ | १५०.३२ | ४.९६ | १४५.३६ | ३०.०० |
| | | १९९४-९५ | २०८.२२ | ५४.४४ | २६२.६६ | .. | २६२.६६ | ३०.०० |
| ८. औरंगाबाद | .. | १९९०-९१ | १३.०४ | ५.०९ | १८.१३ | .. | १८.१३ | .. |
| | | १९९४-९५ | ३६.५४ | ०.१२ | ३६.६६ | .. | ३६.६६ | .. |
| ९. नागपूर | .. | १९९०-९१ | ६०३.२९ | १७६.२६ | ७७९.५५ | .. | ७७९.५५ | ५.०० |
| | | १९९४-९५ | ९१५.७० | १११.२८ | १०२६.९८ | .. | १०२६.९८ | ५.०० |
| एकूण | .. | १९९०-९१ | ८२३३.०६ | ३०४७.९६ | ११२८१.०२ | २६३३.९९ | ८६४७.०३ | २१३.२६ |
| | | १९९४-९५ | १३२६७.७५ | ६१४४.३४ | १९४१२.०९ | ५३९८.५३ | १४०१३.५६ | ३७८.५२ |
| नगरपरिषदा | | | | | | | | |
| अ-वर्ग | .. | १९९०-९१ | ४८८.२० | २९०.४५ | ७७८.६५ | १८९.८५ | ५८८.८० | १०३.६८ |
| | | १९९४-९५ | ८५३.१२ | ३९५.८४ | १२४८.९६ | ३०९.६६ | ९३९.३० | १७९.०७ |
| ब-वर्ग | .. | १९९०-९१ | ३६९.१९ | ३९३.९८ | ७६३.१७ | ३४८.६५ | ४१४.५२ | ४६.२९ |
| | | १९९४-९५ | ७८२.६९ | ७९२.७१ | १५७५.४० | ६९७.३९ | ८७८.०१ | ९१.९९ |
| क-वर्ग | .. | १९९०-९१ | ३८९.६६ | ३४८.२७ | ७३७.९३ | ३१५.३२ | ४२२.६१ | ७४.१२ |
| | | १९९४-९५ | ६३२.२१ | ५८७.५२ | १२१९.७३ | ४९४.९७ | ७२४.७७ | ११८.६२ |
| एकूण | .. | १९९०-९१ | १२४७.०५ | १०३२.७० | २२७९.७५ | ८५३.८२ | १४२५.९३ | २२४.०९ |
| | | १९९४-९५ | २२६८.०२ | १७७६.०७ | ४०४४.०९ | १५०२.०२ | २५४२.०८ | ३८९.६८ |

वर नमूद केल्याप्रमाणे वरील निधीपैकी काही निधीच काही नगरपरिषदांनी निर्माण केले आहेत. अशाप्रकारे जे निधी ठेवण्यात आले आहेत त्या निधीतील १९९४-९५ अखेर शिल्लकही बरीच मोठी आहे. एकूण असे दिसते की, हे निधी ठेवण्याबाबत नगरपरिषदांच्या स्तरावर एकवाक्यता नाही. **वेगवेगळ्या बाबीसाठी वेगवेगळे निधी ठेवणे आवश्यक आहे काय किंवा सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करून एक ठराविक असा सर्वसामान्य निधी ठेवावा किंवा कसे याबाबतचा विचार झाल्यास त्याप्रमाणे असा एकत्रित निधी ठेवण्यासाठी नगरपरिषदांना सोयीचे होईल, व त्याचे व्यवस्थापनही चांगल्याप्रकारे सभांाळता येईल. शासनाने याबाबत विचार करावा.**

८.७५. वरील निधी हे एका विशिष्ट प्रयोजनासाठी असतात व त्याचा उद्देश नागरी संस्थांच्या नियमित खर्चावर या विशिष्ट प्रयोजनावर होणाऱ्या खर्चाचा भार पडू नये व त्यामुळे नागरिकांना सेवा-सुविधा पुरविण्याबाबत कोणत्याही अडचणी येऊ नये असा आहे. शिवाय या विशिष्ट प्रयोजनासाठीचा खर्च त्या त्या निधीतून परस्पर भागविला जावा असाही आहे. परंतु असे निधी नियमाप्रमाणे ठेवण्याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न होत असल्याचे दिसून येत नाही. उलट बऱ्याच नागरी संस्थांनी हे निधी ठेवण्यात उदासीनताच दाखविली आहे. यामागे कदाचित या नागरी संस्थांचे उत्पन्न, त्यांची नियमित स्वरुपाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अपुरे पडत असावे हे असू शकेल. परंतु असे निधी

या नागरी संस्थांनी जाणीवपूर्वक निर्माण केल्यास, त्या निधीचा वापर संबंधित प्रयोजनासाठीच नव्हेतर इतर कामासाठीही करता येऊ शकतो. पर्यायाने असा स्वतःचा निधी असल्यास, विकास कार्ये तसेच इतर कार्यासाठी शासन/ वित्तीय संस्था यांचेकडून कर्जरुपाने आर्थिक मदत न घेता, निधी उपलब्ध होऊ शकतो. उदाहरण द्यायचे झाल्यास मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचारी निधीचे देता येईल. या निधीमध्ये फार मोठी रक्कम जमा असल्याने, त्यातील रक्कम महानगरपालिका विविध विकास कार्यासाठी वापरते व ती रक्कम नंतर व्याजासह परत केली जाते. यामुळे एकतर आवश्यक ती रक्कम तात्काळ उपलब्ध होते. त्यामुळे त्यातून घ्यावयाची कामे विनाविलंब हाती घेता येतात, तर निधीला व्याज मिळत असल्याने, निधीमध्येही मोठी रक्कम जमा होते. **तेव्हा अशा प्रकारचे नियमाप्रमाणे निर्माण करावयाचे निधी निर्माण केले किंवा नाही व त्याचबरोबर वेळचेवेळी त्यात रकमा जमा केल्या जातात काय हे तपासण्याची आवश्यकता आहे.**

□□□

## प्रकरण ९

# राज्य शासनाचे उत्पन्न व खर्च

९.१. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांच्या वित्तविषयक बाबींचा अभ्यास करताना सदर संस्थांना सध्या उपलब्ध असलेल्या वित्तीय उत्पन्नाच्या/खर्चाच्या आकडेवारीवरुन त्यांचे पुढील पाच वर्षासाठी म्हणजेच सन १९९६-९७ ते २०००–२००१ या काळातील उत्पन्नाची व खर्चाची आकडेवारी अंदाजित करणे, तसेच या काळात राज्य शासनाने कोणत्या साधनांद्वारे निधी उपलब्ध करून द्यावा या बाबतीत मार्गदर्शक तत्त्वेही ठरवून देणे वित्त आयोगाकडून अपेक्षित आहे.

९.२. या अनुषंगाने आयोगाने राज्य शासनाच्या वित्त विभागास राज्याच्या महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चावर आधारित एक अहवाल देण्याविषयी विनंती केली होती. त्यानुसार वित्त विभागाने एक टिपणीसह महसुली व भांडवली उत्पन्न/खर्चाची मागील पाच वर्षांची आकडेवारी व यावर आधारित पुढील पाच वर्षांची आकडेवारी वित्त आयोगास सादर केली. त्यातील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहेत :—

**(अ) राज्य शासनाचे महसूली उत्पन्न**

९.३. राज्य शासनाच्या महसुली उत्पन्नाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत :—

(१) केंद्रीय करातील राज्य शासनाचा वाटा.

(२) राज्य शासनाचा कर–महसूल.

(३) राज्य शासनाचा करेतर महसूल–यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे :–

(अ) व्याजापोटी मिळणारे उत्पन्न

(ब) इतर करेतर महसूल

(क) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान.

९.४. वरील तीनही बाबींवरील सन १९९०–९१ ते १९९४–९५ ची प्रत्यक्ष आकडेवारी व सन १९९५–९६ ची सुधारित आकडेवारी व १९९६–९७ ते २०००–२००१ पर्यंतची अंदाजित आकडेवारी तक्ता क्रमांक ९.१ मध्ये दाखविण्यात आली आहे.

**केंद्रीय करातील राज्य शासनाचा वाटा**

९.५. १० व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय करातील राज्य शासनाच्या पुढील पाच वर्षांतील (१९९६–२००१) वाटा एकूण रु. १४,२१७ कोटी एवढा अंदाजित केलेला आहे.

**राज्य शासनाचा कर-महसूल**

९.६. राज्य शासनाला स्वतःच्या करांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाची पुढील पाच वर्षांची आकडेवारी सादर करताना १९९०-९१ ते १९९४–९५ या वर्षाची प्रत्यक्ष आकडेवारी विचारात घेण्यात आली तर १९९५–९६ ची आकडेवारी तयार करताना मागील पाच वर्षांची प्रत्यक्ष आकडेवारी व १९९५–९६ या वर्षात कर आकारण्यासाठी करण्यात येणारी उपाययोजना विचारात घेऊन उपलब्ध होणाऱ्या उत्पन्नाची आकडेवारी अंदाजित करण्यात आली. करांपासून मिळणाऱ्या महसुलावरील पुढील पाच वर्षांची आकडेवारी अंदाजित करताना वेगवेगळ्या करासाठी वेगवेगळा वृद्धीदर विचारात घेण्यात आला (तक्ता क्र. ९.२). सदर वृद्धीदर विचारात घेऊन वित्त विभागाने दिलेल्या अंदाजित आकडेवारीनुसार राज्य शासनाचे १९९६–२००१ या काळातील कर-महसुलाद्वारे प्राप्त होणारे एकूण उत्पन्न जवळजवळ रु. ७२,९१७ कोटी एवढे आहे.

## राज्याची सर्वसाधारण

| अ. क्र. (१) | बाब (२) | १९९०–९१ (३) | १९९१–९२ (४) | १९९२–९३ (५) | १९९३–९४ (६) | १९९४–९५ (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न .. | ८०६७०१ | ९११२४२ | १००२४३८ | ११७८३६१ | १४२१३७८ |
| २ | केंद्राकडून मदत :– | | | | | |
| | (अ) केंद्रीय करातील व शुल्कातील वाटा. .. | ९८९८६ | १२१९६६ | १३९६६३ | १५४१३६ | १७१९८८ |
| | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | १२.२७ | १३.३८ | १३.९३ | १३.०८ | १२.१० |
| | (ब) योजनेतर अनुदाने .. | १६३३६ | १५०७७ | १३३८६ | १६३०५ | १३६४५ |
| | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | २.०३ | १.६५ | १.३४ | १.३८ | ०.९६ |
| ३ | कर महसूल .. | ५११९७३ | ५९५४३२ | ६५६०९३ | ७६९६१९ | ९४५४६६ |
| | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | ६३.४७ | ६५.३४ | ६५.४५ | ६५.३१ | ६६.५२ |
| ४ | करेतर महसूल .. | १७९४०६ | १७८७६७ | १९३२९६ | २३८३०१ | २९०२७९ |
| | एकूण उत्पन्नाशी टक्केवारी | २२.२४ | १९.६२ | १९.२८ | २०.२२ | २०.४२ |
| ५ | एकूण खर्च .. | ७४६४०२ | ८६५९०४ | ९८७०५१ | ११०९९४७ | १२८१९८८ |
| ६ | महसूल लेखा–निव्वळ .. (बाब २–बाब ६) | ६०२९९ | ४५३३८ | १५३८७ | ६८४१४ | १३९३९० |
| ७ | राखीव निधीतील सहभागासाठी केलेली निव्वळ तरतूद. | २४५४६ | ७०८६० | ९१८७० | ८०७९६ | ९५७५५ |
| ८ | कर्जे टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी विनियोजन. | ३१३७० | २५७८४ | ३४४९६ | ३८३०२ | ४३३९४ |
| ९ | निव्वळ महसुली आधिक्य/तूट. . | ११६२१५ | १४१९८२ | १४१७५३ | १८७५१२ | २७८५३९ |
| १० | निव्वळ भांडवली नियतव्यय .. (योजनेतर समायोजन) | –९६१ | ३५९६ | –१२४९७ | –४८२५ | ८२८७ |
| ११ | निव्वळ कर्ज-समायोजन .. | ९६३५९ | ११२५१६ | ५३५८६ | ३४९२१ | २१९६१७ |
| १२ | निव्वळ आकस्मिक निधी—समायोजन | –८८१४ | १८७२ | –६२०० | –१०७ | ३८८८ |
| १३ | निव्वळ लोकलेखा—समायोजन. . | २२६२४ | –३१०१० | ८३२६८ | –८८८२ | –४३५८ |
| १४ | एकूण बेरीज .. | २२५४२३ | २२८९५६ | २५९९१० | २०८६१९ | ५०५९७३ |

आधार–वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* एकूण खर्चामधे १९९७–९८ ते २०००–२००१ या काळातील बांधील खर्चाचा समावेश आहे.

क्र. ९.१

## वित्तीय स्थिती

(रुपये लाखांत)

| वर्ष | | | | | | एकूण १९९६ ते |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५–९६ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ | २००१ |
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १५८३०१६ | १६६०४४४ | १७९८८३९ | १९६५६७२ | २१४५९४१ | २३४४४५७ | ९९१५३५३ |
| १८०९१७ | २१६३४१ | २४७४५० | २८१४५४ | ३१८२९५ | ३५८१६५ | १४२१७०५ |
| ११.४३ | १३.०३ | १३.७६ | १४.३२ | १४.८३ | १५.२८ | . . |
| १३९९६ | १३९३१ | १४३२२ | १४७११ | १५०७० | १५४९१ | ७३५२५ |
| ०.८८ | ०.८४ | ०.८० | ०.७५ | ०.७० | ०.६६ | . . |
| १०८७९२६ | १२१६८९६ | १३२६६७९ | १४४६८७७ | १५७८५२६ | १७२२७४६ | ७२९१७२४ |
| ६८.७२ | ७३.२९ | ७३.७५ | ७३.६१ | ७३.५६ | ७३.४८ | . . |
| ३००१७७ | २१३२७६ | २१०३८८ | २२२६३० | २३४०५० | २४८०५५ | ११२८३९९ |
| १८.९६ | १२.८४ | ११.७० | ११.३३ | १०.९१ | १०.५८ | . . |
| १४९२८७६ | १५१८१९२ | १८९८४२६ | २१३२९७५ | २४१०५२४ | २४४५८३७ | १०४०५९५४ |
| ९०१४० | १४२२५२ | –९९५८७ | –१६७३०३ | –२६४५८३ | –१०१३८० | –४९०६०१ |
| १२८१७४ | ७२९७३ | ६९३९० | ६४४८८ | ५७९४० | ५०१४२ | ३१४९३३ |
| ४८२६२ | ५६८७५ | ६५६४० | ७५२५७ | ८३७२९ | ९०८३४ | ३७२३३५ |
| २६६५७६ | २७२१०० | ३५४४३ | –२७५५८ | –१२२९१४ | ३९५९६ | . . |
| २३७० | –१५७५४ | –३६१९९ | –५९०९० | –८४७२४ | –२६८८०० | –४६४५६७ |
| ८७४१७ | ७३९२९ | ७६७३० | ७८७१६ | ८६६३० | ९८८४० | ४१४८४५ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४५६७३ | ३६०८० | ५८१९१ | ६४८८५ | ७२१९८ | ८०१११ | ३११४६५ |
| ४०२०३६ | ३६६३५५ | १३४१६५ | ५६९५३ | –४८८१० | –५०२५३ | ४५८४१० |

**राज्य शासनाचा करेतर महसूल**

९.७. **व्याजापोटी मिळणारे उत्पन्न.**—महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व यासारखी इतर महामंडळे यांना महाराष्ट्र शासनाने जी योजनांतर्गत कर्जे उपलब्ध करून दिलेली आहेत, त्या कर्जांवरील व्याजापोटी प्राप्त होणारी रक्कम या शीर्षाखाली दर्शविण्यात येते. या शीर्षाखाली वरीलप्रमाणेच इतरही जी कर्जे दिली जातात, त्या कर्जांच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त होणारा महसूल यामध्ये वर्ग करण्यात येतो.

९.८. **इतर करेतर महसूल.**—यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या दूध विक्री योजनेपासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा समावेश आहे. तसेच वन उत्पन्न, खनिजांवरील व विशेषतः कोळशावर मिळणारे स्वामित्वधन, शासकीय रुग्णालयांमध्ये आकारलेले शुल्क व इतर अधिनियमाद्वारे लावण्यात येणाऱ्या दरापासूनचे उत्पन्न यांचा समावेश आहे. १९९६–२००१ या कालावधीतील राज्य शासनाचा अंदाजित करेतर महसूल एकूण रु. ११,२८४ कोटी एवढा आहे.

९.९. **केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान.**—घटनेच्या ७३ व्या व ७४ व्या दुरुस्तीमुळे स्थानिक संस्थांना १० व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार मिळणारे अनुदान व " नैसर्गिक आपत्ती निधी व रेल्वे प्रवासी भाड्याद्वारे प्राप्त होणाऱ्या कराबद्दल " मिळणाऱ्या अनुदानाचा समावेश आहे. काही विशिष्ट योजनांवर होणाऱ्या खर्चाच्या बदल्यात मिळणारी अनुदाने अंदाजित करताना ५ टक्के वृद्धी दर विचारात घेतला आहे. १९९६–२००१ या कालावधीत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे एकूण अंदाजित उत्पन्न रु. ७३५ कोटी एवढे आहे.

**(ब) राज्य शासनाचा महसुली खर्च**

९.१०. शासनाने वित्त आयोगाच्या कामाची जी कार्यकक्षा ठरविली आहे. त्याप्रमाणे राज्य शासनाकडील साधनसंपत्ती आणि त्यावरील मागण्या विशेषतः नागरी प्रशासन, पोलीस, सामाजिक आणि आर्थिक सेवा, ऋणविषयक सेवा आणि इतर बांधिल खर्च किंवा दायित्वे तसेच योजनेतर महसुली खर्च हे दृष्टीसमोर ठेवून शिफारसी करणे असे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे या सर्व बाबींचा तक्ता क्र. ९.१ मधील बाब क्र. ५ मध्ये विचार करण्यात आला आहे.

९.११. राज्य शासनाचा महसुली खर्च अंदाजित करताना १९९५–९६ या अलिकडील वर्षाची आकडेवारी विचारात घेऊन व यात वेगवेगळ्या बाबींवर होणाऱ्या खर्चात ३ ते १० टक्के एवढा वृद्धी दर विचारात घेऊन पुढील ५ वर्षांची आकडेवारी अंदाजित करण्यात आली आहे. १९९६–९७ ते २०००–२००१ या कालावधीतील राज्य शासनाचा महसुली खर्च रु. १०४०५९ कोटी एवढा आहे. यामध्ये महसुली खर्चाच्याबरोबर योजनांतर्गत बाबींवर होणारा बांधिल खर्चही विचारात घेण्यात आला आहे.

**(क) राज्य शासनाचा भांडवली खर्च**

९.१२. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी, लाभित क्षेत्रासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या बदल्यात द्यावी लागणारी भरपाई आणि भूजल सर्वेक्षण संस्था यावर होणारा भांडवली खर्च हा योजनेतर खर्च म्हणून भागविला जातो.

**(ड) लोक ऋण**

९.१३. यामध्ये खालील तीन बाबींचा समावेश आहे :—

(अ) राज्य शासनाचे अंतर्गत ऋण.

(ब) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी कर्जे व अग्रिम रकमा.

(क) कर्जे व अग्रिम रकमा (आंतरराज्य जमाबंदी/तडजोड).


**(ई) लोक लेखा**

९.१४. यामध्ये सर्वसाधारण भविष्य निधीमध्ये जमा होणारी रक्कम व त्यावर देय असलेले व्याज हे आरंभीची रक्कम अंदाजित करून व सध्या अस्तित्वात असलेला व्याजाचा १२ टक्के हा दर लक्षात घेऊन या लेख्यात जमा होणारी रक्कम अंदाजित केलेली आहे.

आलेख क्रमांक : ९.१

राज्याची वित्तीय स्थिती

रुपये कोटीत



९.१५. तक्ता क्र. ९.१ मध्ये महसुली उत्पन्न व महसुली खर्चाची आकडेवारी देण्यात आलेली असून, राज्य शासनाकडील एकूण आधिक्य दाखविण्यात आले आहे. महसुली उत्पन्नातून महसुली खर्च वजा जाता उरलेली रक्कम हे आधिक्य होय. याशिवाय इतर राखीवमधील जमा, कर्ज आकस्मिक निधी वगैरेमधील समायोजन लक्षात घेऊन बाब क्र. १४ मध्ये अंतिम उपलब्ध आधिक्य दाखविण्यात आले आहे.

९.१६. एकंदरीत वित्त विभागाने अंदाजित केलेल्या उत्पन्न व खर्चाच्या आकडेवारीबद्दल काही मर्यादा आहेत. अंदाजित आकडेवारीवरून पुढील पाच वर्षात उत्पन्न व खर्चात असलेले आधिक्य कमी होऊन १९९७–९८ पासून निव्वळ महसुली लेखामध्ये तूटच आढळून येते. याशिवाय नवीन वेतन आयोगाच्या शिफारशी पुढील कालावधीत लागू होण्याची शक्यता आहे. या नवीन वेतन निश्चितीमुळे शासनाच्या तिजोरीवर अधिक बोजा पडणार आहे. पण मर्यादित माहितीमुळे त्याचा नक्की किती आर्थिक बोजा पडेल हे सांगता येत नाही असे वित्त विभागाने कळविले आहे. वित्त विभागाच्या म्हणण्याप्रमाणे राज्य शासनाच्या इतर निधीतील समायोजन लक्षात घेऊनही सध्या दिसणारे आधिक्य पुढील ५ वर्षात कमी होऊन १९९९–२००० व २०००–२००१ या वर्षामध्ये प्रत्यक्ष तूटच दिसून येते. (आलेख क्र. ९.१. पहावा.)

९.१७. वित्त विभागाने पुढील पाच वर्षाचे उत्पन्न अंदाजित करताना वापरलेले वृद्धि दर व १९७०–७१ पासून १९९५–९६ या कालावधीतील प्रत्यक्ष उत्पन्नावर आढळून येणारे वृद्धि दर या दोन वेगवेगळ्या स्त्रोतातून उपलब्ध झालेल्या वृद्धि दरात बरीच तफावत आढळते. ती खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे :–

तक्ता क्र. ९.२

| बाब | | वित्त विभागाने वापरलेला वृद्धिदर | १९७०–७१ ते १९९५–९६ च्या आकडेवारीवर आधारित अर्थ व सां. संचालनालयाने काढलेला वृद्धिदर |
|---|---|---|---|
| (१) व्यवसाय कर | .. | ५.५० | १७.६३ |
| (२) जमीन महसूल | .. | ६.०० | ८.५३ |
| (३) मुद्रांक व नोंदणी शुल्क | .. | १२.५० | १८.९६ |
| (४) राज्य उत्पादन शुल्क | .. | ७.०० | २१.४४ |
| (५) विक्रीकर– | | | |
| (अ) सर्वसाधारण विक्रीकर | .. | १०.०० | .. |
| (ब) केंद्रीय विक्रीकर | .. | ९.०० | १६.११ |
| (क) मोटार स्पिरिटवरील कर | .. | ७.०० | .. |
| (ड) उसावरील कर | .. | ५.०० | .. |
| (६) मोटार वाहनावरील कर | .. | ६.७० | १४.९६ |
| (७) प्रवासी व मालावरील कर | .. | ५.७० | १३.३३ |
| (८) विजेवरील शुल्क व कर | .. | ५.५० | १४.६७ |
| (९) इतर कर– | | | |
| (अ) मनोरंजन कर | .. | ९.०० | ७.३३ |
| (ब) आराम कर | .. | ७.०० | .. |
| (क) वन विकास कर | .. | ७.०० | १२.२७ |
| (ड) इतर उपकर | .. | ५.५० | .. |
| राज्यस्तरीय सर्वसाधारण कर वसुली | .. | .. | १६.०१ |

९.१८. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने वृद्धि दर काढताना २६ वर्षांची म्हणजे १९७०–७१ ते १९९५–९६ या दीर्घ कालावधीतील प्रत्यक्ष आकडेवारी विचारात घेतली आहे आणि त्यामुळे ती वास्तववादी असावी असे आयोगाला वाटते. त्या मानाने वित्त विभागाने वेगवेगळ्या बाबींवर उत्पन्न अंदाजित करताना वापरलेले वृद्धी दर बरेच कमी आढळतात. याबाबत वित्त विभागाच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्षात चर्चा केली असता असे सांगण्यात आले की, महाराष्ट्र राज्याची औद्योगिक क्षेत्रातील आघाडी कायम ठेवून यापुढे विकासासाठी आवश्यक वातावरण निर्मिती करताना आगामी काळात कर प्रणाली आणि व्यवस्था इतर राज्याच्या तुलनेत सुसंगत आणि उद्योजकांना राज्यात उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी पोषक अशी ठेवावी लागेल. तसे करायला गेलो तर मागील २६ वर्षांत आढळून येणाऱ्या वृद्धि दराप्रमाणे यापुढे कर महसूल वाढविणे शक्य होणार नाही. त्यामुळे कर वाढीवर थोड्याशा मर्यादा पडण्याची शक्यता आहे.

९.१९. या विधानात बरेच तथ्य असले तरी याच विषयाची दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे. शासनाला त्यांचा योजनेतर खर्च भागविण्यासाठी व योजना राबविण्यासाठी मागील प्रमाणेच पुढेही अधिक निधी लागेल. निधीची ही आवश्यकता या पुढच्या काळात मागील काळापेक्षा कमी न होता वाढीच्या दिशेने जाणारी दिसेल असा युक्तीवाद करायला हरकत नाही. त्यामुळे निधीची आवश्यकता यापुढेही राहणार आहेच. ती मागील काही वर्षांत झालेल्या वाढीशी तुलनात्मक राहणार नाही हे सयुक्तिक वाटत नाही. विकासाची वाटचाल वेगाने व्हावी यासाठी केंद्र शासन आणि इतर राज्यांनाही जास्तीची साधनसंपत्ती लागणार आहे. त्यामुळे सर्व राज्ये या पुढेही एकाच पातळीवर राहतील असे गृहित धरायला हरकत नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्याने स्तुत्य प्रयत्न करून जे आधिक्य निर्माण केले आहे, ते यापुढे हळूहळू कमी होत जाईल हे म्हणणे आयोगाला स्विकारार्ह नाही. विकासाचे द्योतक असलेला योजनांतर्गत खर्च व वाढत जाणारा योजनेतर खर्च भागविण्यासाठी शासनाला आपले उत्पन्न वाढविणे भाग आहे ती क्षमता महाराष्ट्र शासनात आहे.

९.२०. विकासाच्या प्रक्रियेचा परिणाम म्हणून स्थानिक संस्थांकडे मोठ्या प्रमाणावर मालमत्ता (Infrastructure) व सेवा निर्माण झालेल्या आहेत. या मालमत्ता व सेवांचे प्रथम परिरक्षण करण्यासाठी व त्यानंतर त्या नियमितपणे चालू ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. तसे न केल्यास मागील काळात प्रयत्नाने निर्माण केलेल्या या मालमत्ता आणि सेवांचे मोठे नुकसान होईल. त्याचबरोबर विकासाची प्रक्रिया सतत चालणारी प्रक्रिया आहे ती या पुढेही गतिमान राहणार आहे. सध्या वाढत असलेल्या नागरीकरणाचा वेग पाहता नागरी संस्थांवर नागरी सेवा व सुविधा देण्यासाठी प्रचंड दबाब येत आहे. तसेच नुकत्याच झालेल्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक संस्था सध्या देत असलेल्या सुविधांपेक्षा काही अधिक सुविधा देतील व त्यामुळे आपले राहणीमान सुधारेल अशा लोकांच्याही अपेक्षा आहेत. हे सर्व एकदम शक्य नसले तरी निश्चित असे प्रयत्न करून हे साध्य करणे शक्य होईल. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचा निधी उभारावा लागेलच त्याचबरोबर शासनालाही आपल्या आधिक्यातून या संस्थांना जास्त प्रमाणात मदत करावी लागेल.

**स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १० व्या वित्त आयोगाने केलेल्या तरतुदी**

९.२१. संविधानाच्या तरतुदीप्रमाणे, केंद्रीय वित्त आयोगाने राज्य वित्त आयोगाच्या शिफारसींचा विचार करून स्थानिक स्वराज्य संस्थांना कशी अतिरिक्त मदत करावी असे प्रायोजित होते. परंतु प्रत्यक्षात राज्य वित्त आयोगाची स्थापना उशीरा झाल्यामुळे व १० व्या वित्त आयोगाचा अहवाल अंतिम होईपर्यंत राज्य वित्त आयोगाचा अहवाल प्राप्त होणे शक्य नसल्यामुळे कलम २८०(३) व कलम २७५ नुसार केंद्रीय वित्त आयोगाने एतदर्थ धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याचे ठरविले आहे. ही बाब स्वागतार्ह आहे.

९.२२. या पार्श्वभूमीवर १० व्या वित्त आयोगाने १९७१ ची जनगणना विचारात घेऊन पंचायत राज संस्थांना दरडोई चार वर्षांकरिता रु. १०० प्रमाणे एकूण तरतूद रु. ३४७.०१ कोटी म्हणजेच प्रतिवर्षी दरडोई रु. २५ एवढी तरतूद मंजूर केलेली आहे. ही १९७१ च्या जनगणनेवर आधारित असल्यामुळे प्रत्यक्षात १९९१ ची लोकसंख्या विचारात घेता ती दरडोई रु. ७१.७० म्हणजेच प्रतिवर्षी दरडोई रु. १७.९२ एवढी आहे. १९९५–९६ या वर्षासाठी १० व्या वित्त आयोगाने काहीही तरतूद केलेली नव्हती.

९.२३. वाढत्या नागरीकरणाशी निगडीत प्रश्नांना तोंड देण्यासाठी नागरी भागातील संस्थांवर दिवसेंदिवस खर्चाचा बोजा वाढत आहे. यासाठी नागरी संस्थांना १० व्या वित्त आयोगाने एकूण रु. १००० कोटींची तरतूद (देशातील सर्व राज्यांसाठी पुढील पाच वर्षांकरिता) केलेली आहे. सन १९९५–९६ मध्ये नागरी स्वराज्य संस्थांनाही निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. १९९६–९७ ते १९९९–२००० या कालावधीसाठी महाराष्ट्राला यापैकी रु. १३२.९५ कोटी इतका निधी मंजूर केलेला आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार १५७.११ लाख एवढी नागरी लोकसंख्या विचारात घेता पुढील चार वर्षांकरिता ही तरतूद प्रतिवर्षी दरडोई रु. २१.१६ एवढी आढळते. १९९१ च्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्या ३०५.११ लाख असल्यामुळे प्रत्यक्षात ही तरतूद प्रतिवर्षी दरडोई रु. १०.८९ एवढी आहे.

९.२४. उपरोक्त ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांसाठी मंजूर केलेली ही रु. ४७९.९६ कोटींची तरतूद स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदान व करातील वाटपांच्या व्यतिरिक्त ' अतिरिक्त ' निधी म्हणून उपलब्ध होईल. राज्य शासनाला १९९६–९७ या वर्षाकरिता केंद्र शासनाकडून देय असणारे अनुदान नुकतेच प्राप्त झाले आहे असे समजते. हा निधी कशाप्रकारे वापरण्यात यावा याविषयी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येत असून लवकरच ती राज्य शासनास प्राप्त होतील. त्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा विनियोग होईल. भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने दहाव्या वित्त आयोगाने या कामामध्ये लक्षणीय वाटचाल केलेली आहे.

□ □



एच ४०९४–१२

# प्रकरण १०

# जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाची साधने व गरजांचे निर्धारण

प्रास्ताविक

१०.१. प्रकरण ३ आणि ७ मध्ये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या वित्तीय बाबींच्या काही वैशिष्ट्यांचा उल्लेख केला आहे. त्यापैकी प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(१) स्वतःची उत्पन्नाची अपुरी साधने.

(२) राज्य शासनाच्या अनुदानावर मोठ्या प्रमाणात अवलंबित्व.

१०.२. राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना अनुदानाचे स्वरूपात मोठे सहाय्य मिळते. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रचलित अनुदान पद्धतीचा फायदा असा आहे की, राज्य शासन जिल्हा परिषदांचा सर्व योजनेतर खर्च आस्थापना व सप्रयोजन अनुदानाद्वारे भागविते.

१०.३. जिल्हा परिषदांशी केलेल्या चर्चेमध्ये इतर प्रश्नांबरोबर आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, जिल्हा परिषदांच्या विविध विभागांमध्ये रस्ते, इमारती, वाहने, यंत्रसामुग्री यांची देखभाल व दुरुस्ती अत्यंत अल्प प्रमाणात केली जाते. पाणीपुरवठ्याच्या व लघु पाटबंधाऱ्याच्या योजनांची अंमलबजावणी व देखभाल अपुरी असून, या योजना अकार्यक्षमरित्या चालविल्या जातात. जिल्हा परिषदांच्या विविध विभागांमध्ये रिक्त पदे आहेत. उदा. प्राथमिक शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, ग्रामसेवक यांची रिक्त पदे, सेवा देण्यासाठी आवश्यक असलेली औषधे व इतर सामुग्रीची कमतरता. जिल्हा परिषदांच्या स्तरावरील या प्रकारच्या उणीवा व अडचणी आहेत, त्या प्रकारच्या उणीवा आणि अडचणी शासनाच्या स्तरावरही आहेत. हे जरी खरे असले तरी सेवा देण्याच्या दृष्टीने पंचायती राज संस्था या ग्रामीण जनतेच्या जवळच्या संस्था असल्याने या उणीवा त्यांचे बाबतीत प्रकर्षाने जाणवतात.

१०.४. जिल्हा परिषद स्तरावर ज्वलंत प्रश्न म्हणजे " विकासात्मक स्वरूपाचे " प्रश्न होत. प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शिक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा इत्यादीसारख्या सेवांचे काही निकष आहेत. या निकषाप्रमाणे या सेवांवर करावा लागणारा खर्च बरेचदा " योजनांतर्गत खर्च " म्हणून केला जातो. राज्य शासनाच्या वार्षिक योजनेमध्ये स्थानिक क्षेत्राच्या योजनेचा आकार ठरविला जातो. स्थानिक क्षेत्राच्या योजनेच्या वाटपानुसार शासन त्या प्रयोजनासाठी सर्व आवश्यक अनुदान देते. निकष आणि सध्याची सेवांची पातळी यामध्ये तफावत असण्याची शक्यता आहे. जोपर्यंत योजना राबविण्यासाठी निधी पूर्णपणे उपलब्ध होणार नाही तोपर्यंत हीच परिस्थिती कायम राहील.

१०.५. जिल्हा परिषदांच्या बाबत गरजांचे निर्धारण ढोबळ मानाने खालीलप्रकारे करता येईल.

## (१) रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती

१०.६. जिल्हा परिषदेच्या कक्षेत प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व गाव रस्ते येतात. काही थोडे राज्य महामार्गही येतात. सार्वजनिक बांधकाम खात्याने त्या रस्त्यांची विशेष व नेहमीची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निकष ठरविलेले आहेत. जिल्हा परिषदांबरोबर झालेल्या बैठकीमध्ये निदर्शनास आणून देण्यात आले की, निकषाप्रमाणे शासनाकडून जे अनुदान मिळाले पाहिजे, त्यापेक्षा प्रत्यक्ष मिळणारे अनुदान दरवर्षी फार कमी असते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर खालील चित्र दिसते.



एच ६०९४–१२अ

## तक्ता क्र. १०.१

## रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती

(रु. लाखांत)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | १९९४-९५ | | १९९४-९५ मध्ये प्रस्तावित अनुदान व उपलब्ध अनुदान यामधील तूट |
|---|---|---|---|---|
| | | प्रमाणकानुसार आवश्यक निधी | मंजूर अनुदान | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ठाणे | १४९८.३१ | ५३६.०१ | ९६२.३० |
| २ | रायगड | ८४१.११ | २८०.१९ | ५६०.९२ |
| ३ | रत्नागिरी | १३०२.३७ | ४३८.५१ | ८६३.८६ |
| ४ | सिंधुदुर्ग | ८४३.३५ | ३०२.११ | ५४१.२४ |
| ५ | नाशिक | २८७९.२७ | ७३८.२५ | २१४१.०२ |
| ६ | धुळे | २३७८.२३ | ६२५.५४ | १०५२.६९ |
| ७ | जळगाव | २३२३.९५ | ६३८.८३ | १६८५.१२ |
| ८ | अहमदनगर | ३१४८.८१ | ८२५.३७ | २३२३.४४ |
| ९ | पुणे | २५०९.१९ | ६८३.१९ | १८२६.०० |
| १० | सातारा | २४१५.४९ | ५९९.६१ | १८१५.८८ |
| ११ | सांगली | २०९४.४१ | ६०४.५६ | १४८९.८५ |
| १२ | सोलापूर | २४१३.६० | ७०२.६४ | १७१०.९६ |
| १३ | कोल्हापूर | १७६०.३६ | ५१६.२६ | १२४४.१० |
| १४ | औरंगाबाद | १२६९.०९ | ३७४.०२ | ८९५.०७ |
| १५ | जालना | ७९८.५१ | २६१.६४ | ५३६.८७ |
| १६ | परभणी | १६२७.०२ | ५४६.८६ | १०८०.१६ |
| १७ | बीड | १४०७.६४ | ४१६.५३ | ९९१.११ |
| १८ | नांदेड | १७३३.३३ | ५४८.२९ | ११८५.०४ |
| १९ | उस्मानाबाद | ९२७.२६ | २७८.२५ | ६४९.०१ |
| २० | लातूर | १३८४.३५ | ४०४.६९ | ९७९.६६ |
| २१ | बुलढाणा | ८७०.६६ | ३०१.९४ | ५६८.७२ |
| २२ | अकोला | ९७५.९५ | ३३९.३८ | ६३६.५७ |
| २३ | अमरावती | १०७८.४८ | ३३८.९२ | ७३९.५६ |
| २४ | यवतमाळ | १३२२.२१ | ४६८.४८ | ८५३.७३ |
| २५ | वर्धा | ४६१.१ | १४९.४ | ३११.७० |
| २६ | नागपूर | १२९५.९५ | ३३४.१८ | ९६१.७७ |
| २७ | भंडारा | ११४१.३२ | ३५६.१३ | ७८५.१९ |
| २८ | चंद्रपूर | ११७६.४३ | ३१३.७१ | ८६२.७२ |
| २९ | गडचिरोली | ६९०.२२ | १८७.९७ | ५०२.२५ |
| | एकूण | ४४५६७.९७ | १३१११.४६ | ३१४५६.५१ |

१०.७. सन १९९०-९१ ते १९९४-९५ या काळामध्ये जिल्हा परिषदांना " रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती " साठी मिळालेल्या अनुदानात ९८ टक्के वाढ झाली. १९९०-९१ मध्ये हे अनुदान जवळजवळ ६६.३० कोटी एवढे होते. तर १९९४-९५ मध्ये ते १३१.११ कोटी एवढे झाले. तरीही तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन १९९४-९५ साठी मंजूर केलेले अनुदान हे मागणीच्या तुलनेत फक्त २९ टक्के एवढेच आहे. तक्त्याच्या रकाना ५ मध्ये सन १९९४-९५ मध्ये निकषाप्रमाणे अनुदानाची आवश्यकता व प्रत्यक्ष उपलब्धता यामधील तफावत दर्शविली आहे ही रक्कम फार मोठी असल्याचे दिसते.

१०.८. जिल्हा परिषदेच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये असेही निदर्शनास आले की, काळाच्या ओघात ग्रामीण भागात झालेल्या आर्थिक विकासामुळे वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे व त्यामुळे रस्त्यांची दुर्दशा मोठ्या प्रमाणात होत आहे व त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची गरजही वाढत आहे. असेही सांगण्यात आले की, ज्या जिल्ह्यामध्ये साखर कारखाने आहेत, त्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या रस्त्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. कारखान्यांच्या परिसरातील रस्ते जास्त प्रमाणात खराब होतात. उत्पादन प्रक्रियेसाठी कृषि उत्पादन व इतर कच्चा माल गोळा करतात अशा कृषि उत्पादन बाजार समित्या व इतर संस्थांच्या क्षेत्राबाबतही अशीच स्थिती आहे असे म्हणावे लागेल. परंतु या संस्था देखभाल व दुरुस्तीवर होणाऱ्या खर्चाचा वाटा जिल्हा परिषदांकरिता उचलत नाहीत.

### (२) इमारतींची देखभाल व दुरुस्ती

१०.९. काळाच्या ओघात विकास प्रक्रियेचा परिणाम म्हणून जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये निरनिराळ्या योजनांखाली इमारती मोठ्या प्रमाणात बांधल्या गेलेल्या आहेत. तथापि त्यांच्या देखभाल व दुरुस्तीची स्थिती शोचनीय आहे. ह्या इमारतींची चांगली देखभाल करण्यासाठी जिल्हा परिषदांकडे फार कमी तरतूद उपलब्ध आहे आणि शासनाकडून सुद्धा जास्त निधी उपलब्ध होत नाही. याबाबतची आयोगाने गोळा केलेली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तपासलेली व प्रमाणित केलेली माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

## तक्ता क्र. १०.२

## इमारतींची देखभाल व दुरुस्ती

(रु. लाखांत)

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | प्रमाणकानुसार एकूण निधीची आवश्यकता | १९९४-९५ मध्ये उपलब्ध अनुदान | तूट |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे . . | २३३.९१ | १९.०८ | २१४.८३ |
| २ | रायगड . . | २०३.५९ | १७.९९ | १८५.६० |
| ३ | रत्नागिरी . . | २२०.०४ | ५.३० | २१४.७४ |
| ४ | सिंधुदुर्ग . . | ११९.११ | ५.०० | ११४.११ |
| ५ | नाशिक . . | ३१३.९९ | १२.०० | ३०१.९९ |
| ६ | धुळे . . | १२४.६१ | ४.४४ | १२०.१७ |
| ७ | जळगाव . . | १८२.२६ | १५.०० | १६७.२६ |
| ८ | अहमदनगर . . | २५५.५४ | १८.३३ | २३७.२१ |
| ९ | पुणे . . | २१३.८९ | १३.७६ | २००.१३ |
| १० | सातारा . . | २०७.८७ | २.२५ | २०५.६२ |

## तक्ता क्र. १०.२—चालू

(रु. लाखांत)

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | प्रमाणकानुसार एकूण निधीची आवश्यकता | १९९४-९५ मध्ये उपलब्ध अनुदान | तूट |
|---|---|---|---|---|
| ११ | सांगली .. | १४८.७२ | २५.०० | १२३.७२ |
| १२ | सोलापूर .. | ३२५.४५ | २२.०० | ३०३.४५ |
| १३ | कोल्हापूर .. | ३६०.८२ | ७.०४ | ३५३.७८ |
| १४ | औरंगाबाद .. | २००.९४ | १७.१५ | १८३.७९ |
| १५ | जालना .. | ६३.०५ | १४.६८ | ४८.३७ |
| १६ | परभणी .. | १५६.९५ | ८.६४ | १४८.३१ |
| १७ | बीड .. | २१९.८५ | १०.९५ | २०८.९० |
| १८ | नांदेड .. | १५५.०८ | ९.६० | १४५.४८ |
| १९ | उस्मानाबाद .. | १४५.६१ | ९.१९ | १३६.४२ |
| २० | लातूर .. | ९२.९४ | २०.४५ | ७२.४९ |
| २१ | बुलढाणा .. | २७९.३१ | २९.०८ | २५०.२३ |
| २२ | अकोला .. | २०९.३ | २१.६६ | १८७.६४ |
| २३ | अमरावती .. | १४८.११ | १२.५१ | १३५.६० |
| २४ | यवतमाळ .. | १६०.७५ | १२.४५ | १४८.३० |
| २५ | वर्धा .. | ८५.८७ | १३.३३ | ७२.५४ |
| २६ | नागपूर .. | १७६.०९ | ११.७९ | १६४.३० |
| २७ | भंडारा .. | १२३.५९ | ११.८६ | १११.७३ |
| २८ | चंद्रपूर .. | २२१.९९ | १०.०० | २११.९९ |
| २९ | गडचिरोली .. | ८६.०८ | १०.०० | ७६.०८ |
| | एकूण .. | ५४३५.३१ | ३९०.५३ | ५०४४.७८ |

१०.१०. सन १९९४-९५ मध्ये ह्या प्रयोजनासाठी मागणीच्या तुलनेत ८ टक्क्यांपेक्षा कमी अनुदान उपलब्ध होते. सर्व जिल्हा परिषदांच्या पदाधिकाऱ्यांची सर्वसामान्य तक्रार होती की, जिल्हा परिषद अधिकार कक्षेत असलेल्या निवासी व इतर इमारती फार वाईट स्थितीत आहेत आणि मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च करून बांधलेल्या या इमारतींकडे दुर्लक्ष करणे लोकहिताचे होणार नाही. किंबहुना परिश्रमांनी निर्माण केलेली स्थावर मालमत्ता नष्ट होण्याच्या स्थितीत येऊ शकेल. पुढे असेही सांगण्यात आले की, जिल्हा परिषदेकडे असलेला स्वतःचा निधी फारच अपुरा असून, राज्य शासनाने मदत केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही.

### (३) वाहने, यंत्रसामुग्री व इतर पायाभूत सामुग्री

१०.११. सार्वजनिक बांधकाम विभागाने पुरविलेली माहिती व सन १९९४-९५ मध्ये दिलेल्याा अनुदानाची उपलब्धता याचे आधारे तयार केलेल्या खालील तक्त्यावरून असे दिसते की मागे नमूद केलेल्या रस्ते व इमारतींच्या तुलनेत येथे परिस्थिती थोडी चांगली आहे तथापि एक नेहमीची तक्रार अशी आहे की जिल्हा परिषदेच्या वाहनांची, यंत्रसामुग्रीची योग्य प्रकारे देखभाल व दुरुस्ती करण्यात येत नाही आणि त्यांची दुरुस्तीची परिस्थिती चांगली नाही.

## तक्ता क्र. १०.३

## वाहने, यंत्रसामुग्री आणि इतर पायाभूत सामुग्रीची देखभाल

(रु. लाखांत)

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | १९९४-९५ | | |
|---|---|---|---|---|
| | | आवश्यक निधी | उपलब्ध अनुदान | तूट |
| १ | ठाणे | १५.०० | ५.२२ | ९.७८ |
| २ | रायगड | १६.६० | ९.४२ | ७.१८ |
| ३ | रत्नागिरी | १४.०० | १२.५३ | १.४७ |
| ४ | सिंधुदुर्ग | १०.५५ | ९.३८ | १.१७ |
| ५ | नाशिक | २.६६ | २.४२ | ०.२४ |
| ६ | धुळे | १९.१५ | ११.२४ | ७.९१ |
| ७ | जळगाव | १०.७४ | ९.५५ | १.१९ |
| ८ | अहमदनगर | ६.९० | ६.०५ | ०.८५ |
| ९ | पुणे | १२.५० | १०.२५ | २.२५ |
| १० | सातारा | ६.५० | ५.६८ | ०.८२ |
| ११ | सांगली | ८.०० | ७.०५ | ०.९५ |
| १२ | सोलापूर | ५.२२ | ४.५१ | ०.७१ |
| १३ | कोल्हापूर | ४.५० | ३.८६ | ०.६४ |
| १४ | औरंगाबाद | ३१.८४ | १०.४९ | २१.३५ |
| १५ | जालना | २०.३५ | १०.७६ | ९.५९ |
| १६ | परभणी | २५.०० | १५.०० | १०.०० |
| १७ | बीड | २५.०० | १५.०० | १०.०० |
| १८ | नांदेड | ४०.०० | १६.०० | २४.०० |
| १९ | उस्मानाबाद | २३.१० | १३.२६ | ९.८४ |
| २० | लातूर | १४.२० | ८.६५ | ५.५५ |
| २१ | बुलढाणा | ४०.२० | १६.०८ | २४.१२ |
| २२ | अकोला | ३६.७८ | १४.७१ | २२.०७ |
| २३ | अमरावती | १७.९८ | १०.५४ | ७.४४ |
| २४ | यवतमाळ | २९.७५ | ११.९० | १७.८५ |
| २५ | वर्धा | २५.७५ | १५.३० | १०.४५ |
| २६ | नागपूर | १४.०० | १२.५३ | १.४७ |
| २७ | भंडारा | ६.०० | ५.२२ | ०.७८ |
| २८ | चंद्रपूर | २२.०० | १२.९५ | ९.०५ |
| २९ | गडचिरोली | १९.५० | ११.४५ | ८.०५ |
| | एकूण | ५२३.७७ | २९७.०० | २२६.७७ |

### (४) औषधे व इतर सामुग्रीची कमतरता

१०.१२. पशुसंवर्धन व सार्वजनिक आरोग्य विभागाने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, सार्वजनिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि जनावरांच्या दवाखान्यांमध्ये सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या औषधांची व इतर यंत्रसामुग्रीची नेहमीच कमतरता असते. पशुसंवर्धन दवाखान्यांच्याबाबत ही कमतरता वार्षिक रु. ७१ लाख व सार्वजनिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या बाबत वार्षिक रु. ६.६५ कोटी आहे. आम्हाला देण्यात आलेली ही कमतरता प्रत्येक जिल्ह्याच्या बाबत वेगळी आहे. आयोगाने ह्या बाबींची नोंद घेतली आहे.

### (५) जिल्हा परिषदांच्या अधिपत्याखालील लघुपाटबंधारे

१०.१३. जिल्हा परिषदेकडील सिंचन व्यवस्थापनाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे.याबाबत विस्तृत आढावा प्रकरण ७ च्या परिच्छेद ७.१८ ते ७.२० मध्ये घेण्यात आला आहे. यामध्ये सिंचन कर्मचारीवृंदाचा अभाव, हस्तांतरण प्रक्रियेत बाधा, देखभाल दुरुस्तीनिधीचा अभाव, प्रत्यक्ष सिंचन वापराची अनभिज्ञता इत्यादीबाबी निदर्शनास येतात. एकंदरीत सिंचन व्यवस्थेतील सुधारणा, सुसूत्रीकरण, दिशादर्शन व पाणीपट्टी वाढीविषयी विचार होणे आवश्यक आहे. उपलब्ध सिंचन क्षमतेचा कमी होणारा वापर ही गंभीर बाब आहे.

१०.१४. वित्त आयोगाने जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांशी व मुख्य अभियंता, (लघुपाटबंधारे) यांचेशी याविषयी वेळोवेळी चर्चा केली. या चर्चेमधून प्रकर्षाने असे जाणवले की, लघुपाटबंधारे व्यवस्थापनासाठी जिल्हा परिषदेकडे स्वतंत्रपणे हेच काम करणारा कर्मचारीवृंद नाही. यासाठी काही तांत्रिक आणि इतर कर्मचारी आणि अधिकारीवर्गाची आवश्यकता आहे. तसे केल्यास सिंचन क्षमतेचा योग्य प्रमाणात वापर आणि सिंचनपट्टीचे निर्धारण व वसुली जास्त चांगल्या प्रकारे होऊ शकेल. या आस्थापनेसाठी सुमारे रु. १.२५ कोटी दरवर्षी खर्च होईल.

१०.१५. जिल्हा परिषदांतर्गत निर्मित सिंचनक्षमतेचे चित्र बघता व राज्यभर मोठ्या प्रमाणात विखुरलेली कामे बघता देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे जरूरीचे आहे. पाटबंधारे विभागाने क्षेत्रावर आधारित देखभाल दुरुस्तीसाठी ठरविलेल्या मापदंडाप्रमाणे पुढील पाच वर्षांत दरवर्षी रु. ५ ते ९ कोटी देखभाल दुरुस्ती निधी मिळणे आवश्यक आहे.

### (६) पिण्याचे पाणीपुरवठा

१०.१६. राज्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ज्वलंत आहे. गेल्या वर्षी जुलै १९९५ मध्ये शासनाने पिण्याचे पाणीपुरवठा कार्यक्रमावर श्वेत पत्रिका काढून ह्या प्रश्नाच्या तीव्रतेची दखल घेतली आहे. ग्रामीण व शहरी भागात योग्य पाणीपुरवठा करणे या प्रश्नाची एक बाजू म्हणजे यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च करण्याची गरज आहे. त्याचबरोबर वर्षाचे काही महिने किंवा काही विशिष्ट भागात पाण्याची कमतरता असते. तसेच भूगर्भातील पाण्याच्या पातळीमुळे विहिरीचा व विंधन विहिरीचा कार्यक्रम अधिक खर्चिक व अनिश्चित झाला आहे. पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची सोय करण्याचे / वाढविण्याचे विविध योजनांद्वारे प्रयत्न झालेले आहेत. या अनुषंगाने या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजना व्यवस्थितपणे चालविणे व त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे.

१०.१७. ग्राम विकास विभागाने वित्त आयोगाला जे आवेदनपत्र दिलेले आहे. त्यामध्ये त्या विभागाने त्यांच्या विविध समस्या व गरजांचे निर्धारण केलेले आहे. या सर्वांमध्ये पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती ही बाब महत्त्वाची आहे. याबाबत निधीची आवश्यकता विभागाने खालीलप्रमाणे काढली आहे.

तक्ता क्र. १०.४

(रु. कोटींत)

| बाब | प्रत्यक्ष निधीची आवश्यकता | अनुदानाची सद्यःस्थिती | निधीचे इतर स्रोत | | एकूण उपलब्ध निधी | तूट |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण नळ पाणी-पुरवठा योजना. | ८६.०० | १२.५० | १. जिल्हा परिषदेचे अंशदान. | ७.०० | ४४.५० | ४१.५० |
| | | | २. पाणीपट्टी | २५.०० | | |
| | | | एकूण . . | ३२.०० | | |
| विंधन विहिरी | १०.५० | . . | ग्रामपंचायतीचे अंशदान | २.२५ | २.२५ | ८.२५ |
| पाणीपुरवठा योजनेच्या यंत्रसामुग्रीची स्वतंत्र देखभाल व दुरुस्ती | ८.७५ | . . | | . . | . . | ८.७५ |
| एकूण . . | १०५.४५ | १२.५० | | ३४.२५ | ४६.७५ | ५८.५० |

१०.१८. या बाबतीत वित्त आयोगाने पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग व पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या चर्चेवरून असे दिसते की, विभागाच्या मते योजना चालविण्यासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा खर्च हा एकूण भांडवली खर्चाच्या ६ टक्के ते ७ टक्के आहे. या प्रश्नाचा सखोल अभ्यास करण्यासाठी आयोगाने पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या अधिकाऱ्यांना काही प्रादेशिक आणि स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेवर येणारा देखभाल दुरुस्ती व योजना चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा अभ्यास करायला सांगितले. त्यावरून असे दिसले की, विविध योजनांवर येणाऱ्या खर्चाचे प्रमाण भांडवली खर्चाच्या १ टक्क्यापासून ४.५० टक्क्यांपर्यंत आहे आणि सरासरीप्रमाणे विचार करता या कामासाठी भांडवली खर्चाच्या ३ टक्क्यांपर्यंत खर्च देखभाल दुरुस्तीसाठी विचारात घेऊन निधीची गरज पुरेशी होईल. या चर्चेच्या वेळी सचिव (पाणीपुरवठा) सुद्धा उपस्थित होते. या आधारावर प्रादेशिक नळ पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक देखभाल दुरुस्तीचे खर्च व उत्पन्नाची उपलब्ध साधने याबाबतची मंडळाने तयार केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. १०.५

### प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असणारा निधी

(रुपये कोटीत)

| वर्ष | देखभाल व दुरुस्ती खर्च | | | उपलब्ध साधने | | | एकूण | देखभाल दुरुस्ती खर्च व उपलब्ध साधने यामधील फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नळ पाणीपुरवठा योजनेखाली येणारी खेडी | मालमत्तेची किंमत | देखभाल व दुरुस्ती खर्च मालमत्तेच्या किंमतीच्या ३ टक्के अंदाजित | शासकीय अनुदान वीज व टीसीएल अनुदानासहित | जिल्हा परिषदेचे २० टक्के अंशदान | पाणीपट्टी रु. ७५ प्रमाणे | | |
| १९९४-९५ | २००० | ४००.०० | १२.०० | ५.०० | ३.२५ | २.०० | १०.२५ | १.७५ |
| १९९५-९६ | २१०० | ५६०.०० | १६.८० | ६.०० | ३.२५ | २.१० | ११.३५ | ५.४५ |
| १९९६-९७ | २२०० | ७००.०० | २१.०० | ७.०० | ४.०० | २.२० | १३.२० | ७.८० |
| १९९७-९८ | २४०० | १०००.०० | ३०.०० | १५.०० | ४.५० | २.४० | २१.९० | ८.१० |
| १९९८-९९ | २६०० | १२००.०० | ३६.०० | १७.०० | ४.५० | २.६० | २४.१० | ११.९० |
| १९९९-०० | २८०० | १४००.०० | ४२.०० | २०.०० | ५.०० | २.८० | २७.८० | १४.२० |
| २०००-०१ | ३००० | १६००.०० | ४८.०० | २१.०० | ५.५० | ३.०० | २९.५० | १८.५० |

१०.१९ नळ पाणीपुरवठा योजनेखाली उपलब्ध असलेल्या साधनांमध्ये शासनाच्या श्वेतपत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे मिळणाऱ्या सर्वसाधारण पाणीपट्टीचे किमान दर घरटी रुपये ७५ असे गृहीत धरले आहेत. सध्या यावर शासनाच्या पातळीवर कार्यवाही व्हावयाची आहे. सध्याचे किमान दर रुपये १८ एवढेच आहेत. प्रस्तावित दराप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी व वसुली न झाल्यास तुटीचे प्रमाण वाढेल.

१०.२० पिण्याचे पाणीपुरवठा योजनांची एक बाजू अशी आहे की, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने जिल्हा परिषदांसाठी ज्या काही योजना तयार केल्या आहेत त्या स्थानिक संस्थांनी अद्याप ताब्यात घेतलेल्या नाहीत. सध्या पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ ह्या योजना चालविण्यासाठी व त्यांची दुरुस्ती करण्यासाठी प्रत्येक वर्षी रुपये ९.३९ कोटी खर्च करते. पंचायत राज संस्थांकडे यांचे हस्तांतरण झाल्यावर त्या संस्थांना ही जबाबदारी उचलावी लागेल. स्थानिक संस्थांनी ह्या योजना ताब्यात घेऊन चालवाव्यात याबाबत शासन उत्सुक असल्यामुळे आम्ही असे गृहीत धरतो की, हस्तांतराची ही प्रक्रिया १९९७-९८ या वर्षात पूर्ण होईल. तसे झाले तर जिल्हा परिषदांना या योजना चालविण्यासाठी आणखी रुपये १० कोटींची गरज लागेल. थोडक्यात पाणीपुरवठा निधीवरील अतिरिक्त आवश्यक खर्च खालीलप्रमाणे आहे.

(१) नळ पाणीपुरवठा योजनांवरील देखभाल व दुरुस्तीचा खर्च (महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण महामंडळ यांनी दिलेला खर्च–तक्ता क्र. १०.५).

(२) विंधण विहिरींवरील देखभाल दुरुस्ती खर्च रु. ८.२५ कोटी (ग्रामीण विकास विभागाकडून प्राप्त झालेला तक्ता क्र. १०.४).

(३) पंचायत राज संस्थांना लोकांना पाणीपुरवठ्याकरिता ते इतर संस्थांकडून विकत घ्यावे लागते. यावर होणाऱ्या खर्चाचा अंदाज महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ यांच्याकडून प्राप्त झाला असून, ही बाबही विचारात घेतली आहे. या बाबीवर पुढील पाच वर्षांत रु. ९.५२ कोटी खर्च होण्याची शक्यता आहे.

(४) महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाकडील योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित झाल्यानंतर येणारा जास्तीचा खर्च. (रुपये १० कोटी)

वरील बाबी आयोगाने विचारात घेऊन पुढील पाच वर्षांचा अंदाज व्यक्त केला आहे.

१०.२१. मंत्री, ग्रामविकास व रोजगार, भारत सरकार यांनी मुख्य मंत्री, महाराष्ट्र शासन यांना लिहिलेल्या पत्रात सूचना केली आहे की, राज्य वित्त आयोगाने राजीव गांधी राष्ट्रीय पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीचाही विचार करावा. त्या योजना पंचायतीकडेसुद्धा आहेत. त्या चालविण्यासाठी त्यांच्याकडे निधीची उपलब्धता असणे आवश्यक आहे. हे पत्र डिसेंबर १९९६ मध्ये आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले. आम्ही सर्व पाणीपुरवठा योजना चालविण्यासाठी व देखभाल करण्यासाठी लागणाऱ्या निधीच्या गरजेचा विचार करीत असल्यामुळे ह्यामध्ये ह्या कार्यक्रमाचा आपोआप समावेश होणार आहे.

## (७) ग्रामसेवक व इतर कर्मचारीवृंदाची कमतरता

१०.२२. ग्रामविकास विभागाने आपल्या आवेदनपत्रात ग्रामपंचायतींसाठी ग्रामसेवकांची कमतरता असल्याचे नमूद केले आहे. आम्हांला सांगण्यात आले आहे की, २,००० लोकसंख्येसाठी (जास्तीत जास्त दोन ग्रामपंचायती एक ग्रामसेवक देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. या आधारावर दरवर्षी रुपये २४ कोटींचा खर्च करावा लागेल. याचबरोबर जिल्हा परिषदांना तीन टप्प्यांमध्ये लिपिक व लेखा कर्मचारीवृंद देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. ह्या प्रयोजनासाठी पहिल्या टप्प्यात दरवर्षी रु. ८.६३ कोटी खर्च लागेल. दुसऱ्या टप्प्यात दरवर्षी रु. २१.६६ कोटी खर्च लागेल. व अंतिम टप्प्यात दरवर्षी रु. २५.७५ कोटी खर्च लागेल. तिन्ही टप्पे पूर्ण झाल्यावर दरवर्षी रु. २५.७५ कोटी खर्च येईल.

१०.२३. आयोगाने जिल्हा परिषदांकडून दिनांक ३१ मार्च १९९४ रोजी असलेला विविध वर्गातील मंजूर कर्मचारीवृंद व रिक्त पदांची स्थिती याबाबतची माहिती गोळा केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक १०.६

**जिल्हा परिषदांमधील मंजूर आणि रिक्त पदे**

| | दिनांक ३१-३-९४ रोजी मंजूर पदे | | | | दिनांक ३१-३-९४ रोजी रिक्त पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ |
| एकूण .. | ६१६ | ५५८५ | २९९३६८ | २५५२३ | १४ | ७१३ | १८५७७ | १५०१ |

१०.२४. राज्यभर २९ जिल्हा परिषदांमध्ये पसरलेल्या ह्या यंत्रणेमध्ये विविध वर्गांतील काही पदे अपरिहार्यपणे रिक्त राहतील, याची आयोगाला जाणीव आहे. येत्या काही वर्षांत जिल्हा परिषदांसाठी ग्रामसेवक देण्याचे विचाराधीन असल्यामुळे व काही लिपिक व लेखा वर्गातील कर्मचारीवृंद यांची पदे देण्याचे शासनाने मान्य केलेले असल्यामुळे आयोगाने या दोन बाबींचाच विचार केला आहे. पुढील दोन-तीन वर्षांत हा कर्मचारीवृंद दिला जाईल. अशी आशा आहे. दुसरा खर्चाचा भाग म्हणजे पुढील वर्षांमध्ये जिल्हापरिषदांच्या कर्मचारीवृंदाचे वेतन व भत्त्यांमध्ये होणारी संभाव्य वाढ हा आहे. याचा अंदाज व्यक्त करता येत नाही. वित्त विभागानेही आयोगाला कळविले आहे की, भावी वेतन आयोगामुळे राज्यावर किती आर्थिक बोजा पडणार आहे हे आज सांगता येणे शक्य नाही. आयोगास असे वाटते की, अशा प्रकारचा

जो अतिरिक्त बोजा जिल्हा परिषदांच्या कर्मचारीवृंदाबाबत निर्माण होईल तो सध्या जी आस्थापना व सप्रयोजन अनुदाने देण्याची पद्धत आहे त्यात आपोआप समाविष्ट होईल. तेव्हा त्यासाठी वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता नाही.

**(८) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम**

१०.२५. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाखाली महाराष्ट्र राज्याने दरवर्षी पाच लाख वैयक्तिक प्रसाधनगृहे बांधण्याचे उद्दिष्ट असलेला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. याचा अर्थ असा आहे की, सन १९९६-९७ ते २०००-२००१ या कालावधीत ग्रामीण भागात २६.८ लाख वैयक्तिक प्रसाधनगृहे बांधण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. हा कार्यक्रम केंद्रपुरस्कृत योजना व राज्य पुरस्कृत योजनांखाली राबवावयाचा आहे. केंद्रपुरस्कृत योजनेमध्ये दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी आहेत तर राज्याचा कार्यक्रम सर्व लाभार्थींकरिता आहे.

१०.२६. सुरुवातीला केंद्र आणि राज्याच्या योजनेमध्ये वैयक्तिक प्रसाधनगृह बांधण्याचा खर्च अनुक्रमे रु. २,५०० व रु. २,००० होता. तथापि, कमाल खर्चाच्या मर्यादा फार कमी असल्यामुळे लोकांचा प्रतिसाद फारच अल्प होता. नंतर राज्य शासनाने ही खर्चाची मर्यादा रु. ४,००० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला. केंद्र शासनाने त्यांची खर्चाची कमाल मर्यादा व हिस्सा यामध्ये बदल केला नाही. बाकीची रु. ३,००० ची रक्कम राज्य शासन, जिल्हा परिषद व लाभार्थी यांनी अनुक्रमे रु. १,५००, रु. १,००० व रु. ५०० याप्रमाणे द्यावयाची आहे. राज्यपुरस्कृत योजनेमध्ये रु. ४,००० चा सर्व खर्च राज्य शासन, जिल्हा परिषद/ग्रामपंचायत आणि लाभार्थी यांनी अनुक्रमे रु. २,५००, रु. १,००० आणि रु. ५०० या प्रमाणात द्यावयाचा आहे. लाभार्थी त्याचा हिस्सा रोख रकमेने किंवा वस्तूच्या स्वरूपात अथवा श्रमदान करून देऊ शकतो.

१०.२७. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, सर्व उपलब्ध स्रोत वापरून आणि प्रादेशिक विकास मंडळांनी काही निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही जिल्हा परिषदांना स्वतःचा हिस्सा पूर्णपणे उभा करता येत नाही. त्यांना प्रति प्रसाधनगृह रु. ३०० एवढा निधी कमी पडतो. म्हणून आयोगाकडून अशी अपेक्षा केली गेली आहे की, जिल्हा परिषदा त्यांचे वाट्याचा जो भाग सर्वतोपरी प्रयत्न करूनही उपलब्ध करू शकत नसतील तेवढ्या निधीची (रु. ३०० प्रति प्रसाधनगृह) असलेली गरज आयोगाने आपल्या शिफारसी करताना लक्षात घ्यावी. वर्षवार राज्य स्तरावर जिल्हा परिषदांचे वार्षिक उद्दीष्ट व त्यासाठी त्यांना कमी पडणारा निधी तक्ता क्र. १०.७ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता क्र. १०.७

**ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम**

| वर्ष | | वार्षिक उद्दिष्ट प्रसाधनगृहांची संख्या (लाखांत) | आवश्यक निधी (रु. लाखांत) |
|---|---|---|---|
| १९९६–९७ | .. | ४.८ | १४४० |
| १९९७–९८ | .. | ५.० | १५०० |
| १९९८–९९ | .. | ५.० | १५०० |
| १९९९–२००० | .. | ६.० | १८०० |
| २०००–२००१ | .. | ६.० | १८०० |
| एकूण | .. | २६.८ | ८०४० |

१०.२८. सर्व ग्रामीण क्षेत्रातील आरोग्य व स्वच्छता, या व्यापक कार्यक्रमाचा भाग असून याला राबविण्यासाठी निधीची कमतरता पडू नये असे आयोगाचे मत झाले आहे. हे विचारात घेऊन या कार्यक्रमासाठी सन १९९६-९७ ते २०००-२००१ या कालावधीत जिल्हा परिषदेला किती अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे हे आम्ही विचारात घेतलेले आहे.

**पंचायत समित्यांची गरज**

१०.२९. पंचायत समित्यांना स्वतःचे उत्पन्नाचे काही स्रोत नाहीत. त्यांना त्यांचे उत्पन्नासाठी राज्य शासनावर व जिल्हा परिषदांवरच अवलंबून रहावे लागते. सन १९९२ ला शासनाने वाढीव उपकर व स्थानिक उपकर अनुरूप अनुदानातील ६० टक्के हिस्सा पंचायत समित्यांना देण्याचा निर्णय घेतला. ही अनुदाने सध्या त्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दिली जातात.

१०.३०. पंचायत समित्यांचे गरजांचे निर्धारण करताना एक अडचण प्रामुख्याने येते ती म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे कार्ये व कार्यक्षेत्र परस्परव्यापी आहेत.

१०.३१. आम्ही ज्या जिल्हा परिषदांना भेटी दिल्या त्या वेळी पंचायत समित्यांच्या अपुऱ्या वित्त व्यवस्थेबद्दल सार्वत्रिक असमाधान आढळले. हे जरी खरे असले तरी यापूर्वी विशद केल्याप्रमाणे वाढीव उपकरात व स्थानिक अनुरूप अनुदानात त्यांचा वाटा शासनाने काही वर्षांपूर्वीच वाढविला आहे.

१०.३२. सध्याचे पंचायत राज व्यवस्थेत पंचायत समिती हा जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यामधील महत्त्वाचा दुवा आहे. जिल्हा परिषदेचा मोठा कर्मचारीवर्ग हा पंचायत समिती व त्याखालील स्तरावर काम करीत असतो व जिल्हा परिषदांच्या योजना तालुका स्तरावर मोठ्या प्रमाणात राबविल्या जातात. अशा प्रकारच्या सर्व कामासाठी साधनसंपत्ती जिल्हा परिषदांमार्फत उपलब्ध होते. जोपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या कार्ये व जबाबदाऱ्या स्पष्टपणे विभाजता येत नाही तोपर्यंत सध्याची परिस्थिती यापुढेही चालू राहील. अशा प्रकारची कार्यवाही शासन स्तरावर झाल्याशिवाय पंचायत समित्यांचे गरजांचे निर्धारण स्पष्टपणे करता येत नाही. असे जरी असले तरी जिल्हा परिषदांच्या गरजासाठी निधीचे वाटप करताना पंचायत समिती स्तरावर जास्त निधी मिळेल असा प्रयत्न करण्यात आला आहे.

## भाग २

**जिल्हा परिषदांचे उत्पन्नाचे निर्धारण**

१०.३३. जिल्हा परिषदांना स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत अपुरे आहेत हे आतापर्यंतच्या चर्चेवरून आढळून येते. परंतु आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, याव्यतिरिक्त काही बाबी आहेत ज्याद्वारे जिल्हा परिषदा स्वतःचे उत्पन्न निर्माण करू शकतात त्या बाबींचे विश्लेषण खालीलप्रमाणे :—

**(१) लघु पाटबंधारे**

१०.३४. जिल्हा परिषदांर्गत लघु पाटबंधारे योजनांची मागील ३ वर्षांच्या सिंचनपट्टी आकारणी व वसुलीची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

तक्ता क्रमाक १०.८

| वर्ष | | संख्या | सिंचनक्षमता (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचन (लाख हेक्टर) | पाणीपट्टी आकारणी (रु.लाख) | पाणीपट्टी वसुली (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) १९९३-९४ | .. | १४,५१८ | २.७१ | ०.९८ | ६१.६५ | १०.१० |
| (२) १९९४-९५ | .. | १६,०२८ | ३.०४ | १.४१ | ७१.४९ | १२.५३ |
| (३) १९९५-९६ | .. | १८,३०३ | ३.४० | १.५३ | ६५.८४ | १२.५६ |

१०.३५. लघु पाटबंधारे तलावांचे ५० टक्के विश्वासार्हतेचे लक्ष्य संकल्पित केलेले असते. कारण दरवर्षी ते पूर्णपणे भरतातच असे नाही. पुढील ५ वर्षांसाठी संभाव्य सिंचनवापर सध्याच्या दराने अपेक्षित पाणीपट्टी खालीलप्रमाणे आहे :—

तक्ता क्रमाक १०.९

| अ. क्र. (१) | बाब (२) | | १९९६-९७ (३) | १९९७-९८ (४) | १९९८-९९ (५) | १९९९-२००० (६) | २०००-२००१ (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निर्मित सिंचन (लक्ष हेक्टर) | .. | ३.४० | ३.८० | ४.२० | ४.६० | ५.०० |
| २. | संभाव्य प्रत्यक्ष सिंचन वापर (लक्ष हेक्टर) | | २.०० | २.३० | २.५० | २.७० | ३.०० |
| ३. | सध्याच्या दराने अपेक्षित पाणीपट्टी (रु. कोटींत) (रु. १५० प्रति हेक्टर). | | ३.०० | ३.४५ | ३.७५ | ४.०५ | ४.५० |
| ४. | अपेक्षित पाणीपट्टीचे दर (रु. प्रति हेक्टर) | | २०० | २२५ | २५० | २७५ | ३०० |
| ५. | सुधारित दराने सिंचनपट्टी (रु. कोटी) | .. | ४.०० | ५.१७ | ६.२५ | ७.४२ | ९.०० |

वरील तक्त्यावरून असे आढळून येते की, पुढील ५ वर्षांत सिंचन पाणीपट्टीचे दर दुप्पट होतील व तशी आयोगाची शिफारस आहे. आयोगाची अशी भूमिका आहे की लघुपाटबंधारे प्रकल्पाद्वारे मिळणारे उत्पन्न व त्यावर येणारा देखभाल व दुरुस्ती वगैरेचा महसुली खर्च हा २०००-२००१ या सालामध्ये तरी मिळताजुळता असावा या भूमिकेतूनच उपरोक्त पाणीपट्टीचा दर ठरविण्यात आलेला आहे. ७ व्या व १० व्या केंद्रिय वित्त आयोगाने या प्रकल्पावर केलेल्या भांडवली गुंतवणुकीवर १ टक्का तरी परतफेड मिळावी अशी शिफारस केली आहे. परंतु आयोगाने मात्र फक्त देखभाल दुरुस्ती वगैरेवर येणारा महसुली खर्चच २०००-२०००१ या सालापर्यंत पूर्णपणे उत्पन्नातून भागवावा असे सुचविले आहे. यासंदर्भात दरवर्षी सिंचनपट्टी वाढवून टप्प्याटप्प्याने खर्चाच्या ६० टक्के, ७० टक्के, ८० टक्के, ९० टक्के व १०० टक्के वसुलीचे उद्दिष्ट गाठावे अशी आयोगाची शिफारस आहे.

### (२) मत्स्यव्यवसाय

१०.३६. जिल्हा परिषदांच्या अधिपत्याखाली असलेल्या तलाव व पाणी साठयांमध्ये तांत्रिक पद्धतीने मत्स्य उत्पादन केले तर त्यापासून जिल्हा परिषदांना अतिरिक्त उत्पन्न प्राप्त होऊ शकेल ही बाब आयोगातर्फे तपासण्यात आली. सद्यःस्थितीत या स्त्रोतापासून उत्पन्न फार कमी आहे. यासाठी मत्स्य आयुक्तांच्या कार्यालयाशी सतत संपर्क ठेऊन याविषयी जिल्हावार/विभागवार माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अनुषंगाने एक बाब स्पष्ट झाली ती म्हणजे राज्य स्तरावर उपलब्ध असलेली माहिती अत्यंत त्रोटक आहे. पंचायत राज संस्थांना मत्स्य उत्पादन वाढवून आपले उत्पन्न वाढविण्याविषयी तांत्रिक सल्ला दिला गेलेला नाही वा पर्यवेक्षण करण्याकरिता राज्य स्तरावर प्रयत्न केलेले आढळून येत नाहीत. सध्या स्थानिक संस्थांना हे तलाव मच्छिमार सहकारी संस्थांना ठराविक मुदतीच्या ठेक्याने देऊन ठेका रकमेच्या स्वरूपात थोडेसे उत्पन्न मिळते. आयोगाचा या धोरणाला विरोध नाही. परंतु आधुनिक पद्धतीने मत्स्यसंवर्धन घेऊन मत्स्य उत्पादनात वाढ होईल व रोजगारही उपलब्ध होईल याकडे लक्ष देण्यात यावे. जिल्हा परिषदांना जास्त उत्पन्न मिळेल हे धोरण समोर ठेऊन ही योजना राबविली पाहिजे. या संदर्भात फक्त मच्छीमार सहकारी संस्थांची मक्तेदारी असू नये. याप्रमाणे सधन मत्स्य शेतीसाठी १० हेक्टर पर्यंत तलाव योग्य असल्याने हे तलाव मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेमार्फत देण्याचाही विचार व्हावा.

१०.३७. जिल्हा पातळीवरील संबंधित मत्स्य व्यवसाय अधिकाऱ्यांकडून तलावांची पाहणी करून, उत्पादकतेविषयी व उत्पन्नाविषयी प्रथम तांत्रिक सल्ला घेऊन नंतर सदर तलाव जाहीर लिलावाने द्यावे व अपेक्षित उत्पन्न लक्षात घेऊन ठेका रक्कम वाढविण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच तलावामध्ये जलद वाढणाऱ्या मासळीचे उत्पादन इष्टतम प्रमाणात सोडण्यासाठी ठेकेदारास बंधन घालावे.

१०.३८. जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांच्या अखत्यारितील तलावांची संख्या, त्यांचे जलक्षेत्र, सध्याचे उत्पन्न इत्यादीविषयीची जिल्हावार माहिती उपलब्ध न झाल्यामुळे या स्रोताद्वारे नक्की किती उत्पन्न मिळू शकेल याचा आयोगाला अंदाज बांधता येत नाही.

**(३) बिगर शेती जमीन कर**

१०.३९. वित्त आयोगास ठाणे जिल्हा परिषदेने " बिगर शेती जमीन कर " नावाचा विशेष कर आकारलेला आढळला. या करापासून त्या जिल्हा परिषदेस साधारणपणे रुपये १५ लाख वार्षिक उत्पन्न मिळत असल्याचे आढळते. ठाणे जिल्हा परिषदेचे स्वतःच्या उत्पन्नापैकी हे उत्पन्न ४.५टक्के असून एकूण उत्पन्नाच्या ०.२४ टक्के एवढे आहे. सध्या शेतजमिनीचे प्रमाण कमी होत असून बिगर शेती उद्योगात मोठया प्रमाणात वाढ होत असल्याचे आढळून येते. त्यामुळे या प्रकारचे कर इतरही जिल्हा परिषदांनी आकारून त्यांना आपले उत्पन्न वाढविता येईल.

**(४) जिल्हापरिषद मालमत्तेचा व्यापारी तत्त्वावर वापर**

१०.४०. जिल्हा परिषदांकडे बऱ्याच मोकळ्या जागा उपलब्ध आहेत. त्यांचा वापर न झाल्याने त्यावर अतिक्रमण झाल्याचे आढळते. या जागांचा व्यापारी तत्त्वावर वापर केल्यास जिल्हा परिषदांना नेहमीसाठी उत्पनाचे साधन उपलब्ध होईल.

**(५) पिण्याचे पाणीपट्टीची आकारणी व वसुली**

१०.४१. पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळाने नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरूस्तीसाठी जे खर्चाचे निर्धारण केले आहे त्यामध्ये प्रचलित सर्वसाधारण पाणीपट्टीचे दर वाढविले जातील व ते किमान रुपये ७५ प्रती घरटी असतील असे गृहित धरले आहे. या प्रकारचे दर शासनाच्या यासंबंधीच्या श्वेतपत्रिकेतही सुचविण्यात आले आहेत. शासनाने सर्वसाधारण पाणीपट्टीचे प्रचलित दरांत सुधारणा करून वरील दराप्रमाणे ते करणे गरजेचे आहे. शासनाने नळपाणी पुरवठा योजना व्यवस्थितरित्या चालविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर पाणीपुरवठा निधी स्थापन करून त्यात जमीन महसूल अनुदानाच्या ३५ टक्के रक्कम जमा करावी असे प्रस्तावित केले आहे. असे केल्यास पाणीपुरवठा निधीसाठी जादा निधी ग्रामपंचायतीमार्फत उपलब्ध होईल. मात्र त्यामुळे ग्रामपंचायतींच्या इतर कार्यक्रमांवर त्याचा परिणाम होणार आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी येणारा देखभाल दुरूस्ती वगैरे महसुली खर्च पाणीपट्टी आकारून वसूल करावा असे अपेक्षित आहे. आयोग अशी शिफारस करीत आहे की या पाणीपट्टी दरात टप्प्याटप्प्याने वाढ करून १९९७-९८ ते २०००-२००१ या ४ वर्षात येणाऱ्या खर्चाच्या अनुक्रमे ७० टक्के, ८० टक्के, ९० टक्के, व १०० टक्के वसुली पाणीपट्टीद्वारे व्हावी. सन २०००-२००१ सालापर्यंत पाणीपुरवठा योजनेचा खर्च पाणीपट्टीच्या वसुलीद्वारे १०० टक्के भरून निघेपर्यंत उत्पन्न व खर्च यामधील तूट भरून काढण्यासाठी वरील शिफारसीला अनुसरून अनुदान देण्यात यावे. तक्ता क्र. १०.१० मध्ये अतिरिक्त उत्पन्न अंदाजित करताना हस्तांतरित योजनांवरील खर्च जरी लक्षात घेतला असला तरी या हस्तांतराच्या प्रक्रियेतील अनिश्चितता लक्षात घेता ह्या संदर्भातील अतिरिक्त उत्पन्न मात्र लक्षात घेतलेले नाही.

## भाग ३

१०.४२ १९९४-९५ हे पायाभूत वर्ष घेऊन व १९९०-९१ ते १९९४-९५ या पाच वर्षांत जिल्हा परिषदांनी दिलेली उत्पन्न व खर्चाची माहिती पुढील वर्षाची आकडेवारी अंदाजित करण्याकरिता वापरण्यात आली आहे. ती आकडेवारी पुढील वर्षासाठी जिल्हावार अंदाजित करून राज्यस्तरावर संकलित करण्यात आली आहे.

१०.४३ उत्पन्नाची बाजू विचारात घेताना जिल्हा परिषदनिहाय त्यांचे स्वतःचे उत्पन्न व त्यांना मिळणारी अनुदाने असे दोन विभाग करण्यात आले. पुढील पाच वर्षांचे उत्पन्नही जिल्हा परिषदानिहाय अंदाजित करून राज्यस्तरीय स्वतःचे उत्पन्न व एकूण अनुदाने यांचे संकलन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदांनी लघुपाटबंधारे व पाणीपुरवठा या दोन बाबींच्या देखभाल दुरुस्तीवर येणारा खर्च २०००-२००१ सालापर्यंत अनुक्रमे सिंचनपट्टी व पाणीपट्टी लावून वसूल करावा. या आयोगाच्या भूमिकेनुसार त्यांना या दोन बाबींवर प्राप्त होणारे उत्पन्न अंदाजित केले आहे. यानुसार जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाचा वृद्धिदर १७.०८ टक्के आढळून आला आहे. जिल्हा परिषदांना पुढील पाच वर्षांत मिळणारा अंदाजित अनुदानाचा वृद्धिदर १५.४८ टक्के आढळून आला आहे. राज्यस्तरीय एकूण उत्पन्नाचा वृद्धिदर १५.५५ टक्के आढळून आला आहे.

१०.४४ याच पद्धतीने खर्चाची आकडेवारीही अंदाजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदानिहाय वेगवेगळ्या बाबींवर झालेला मागील पाच वर्षांचा खर्च बघून त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांच्या खर्चाचे वृद्धी दर निश्चित करण्यात आले व त्यावरून राज्यस्तरीय खर्चाची आकडेवारी संकलित करण्यात आली.

१०.४५ भाग-१ मध्ये जिल्हा परिषदांच्या गरजांच्या वेगवेगळ्या बाबींवर निर्धारण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष खर्चाची बाबवार आकडेवारी उपलब्ध न झाल्यामुळे मानकाप्रमाणे येणारा देखभाल व दुरुस्तीचा खर्च व प्रत्यक्षात १९९४-९५ या वर्षांमध्ये त्यांना मिळालेला निधी किंवा अतिरिक्त निधीची मागणी विचारात घेऊन त्यांना आवश्यक असलेल्या अतिरिक्त खर्चाची आकडेवारी काढण्यात आली आहे. हा अतिरिक्त खर्च १९९४-९५ या वर्षातील माहितीवर आधारित असल्यामुळे मुद्रास्फितीचा परिणाम लक्षात घेऊन यामध्ये दरवर्षी ७ टक्केनी वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाखाली ग्रामीण प्रसाधनगृहे बांधण्याची नवी योजना असून यावर पुढील पाच वर्षांत होणारा खर्च संबंधित विभागाने उपलब्ध करून दिला आहे. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाखाली जिल्हा परिषदांना त्यांच्या हिश्यातील द्यावयाच्या निधीपैकी कमी पडणारा निधी विचारात घेऊन व पुढील चार वर्षांचे ग्रामीण प्रसाधनगृहे बांधण्याचे उद्दिष्ट लक्षात घेऊन या बाबींवर येणारा अतिरिक्त खर्च अंदाजित करण्यात आला आहे. नळ पाणीपुरवठा योजनांवरही पुढील पाच वर्षात येणाऱ्या खर्चाचा अंदाज महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाने तयार करून दिला आहे व तो आयोगाने स्विकारला आहे. तसेच लघुपाटबंधारे प्रकल्पांवर पुढील पाच वर्षांत येणारा खर्च संदर्भित विभागाने सादर केला असून तोही आयोगाने स्विकारला आहे.

१०.४६ याप्रमाणे उपरोक्त बाबींवरील अंदाजित केलेला अतिरिक्त खर्च व मागील खर्च विचारात घेऊन पुढील पाच वर्षांसाठी अंदाजित केलेला खर्च या दोन बाबी लक्षात घेऊन जिल्हा परिषदांना पुढील पाच वर्षांत कराव्या लागणाऱ्या एकूण खर्चाचा अंदाज तयार करण्यात आला आहे. याप्रमाणे अंदाजित केलेल्या एकूण खर्चाचा वार्षिक वृद्धी दर १३.०२ टक्के एवढा आढळून आला आहे.

१०.४७ जिल्हा परिषदांच्या खर्चासाठी ज्या प्रकारची अनुदाने शासनाच्या विविध विभागांकडून उपलब्ध करून देण्यात येतात ती बऱ्याच वेळेला आर्थिक वर्षाच्या शेवटी अखर्चित रहातात. तसे राहण्याची अनेक कारणे आहेत. ह्या अखर्चित राहिलेल्या रकमा पुढील वर्षात परत कराव्या लागतात. अशा प्रकारच्या रकमांचे प्रमाण उत्पन्नाच्या मानाने सर्वसाधारणपणे ५ टक्के पर्यंत आहे. या कारणामुळे जो खर्च कमी दिसतो त्याचा अर्थ असा होत नाही की, खर्चापेक्षा उत्पन्नाची साधने जास्त आहेत. याच कारणामुळे वर सांगितलेले उत्पन्नाचे वृद्धी दर खर्चापेक्षा जास्त दिसतात आणि ते त्याचप्रमाणे पुढेही प्रक्षेपित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे पुढील अंदाज थोड्याफार प्रमाणात प्रत्यक्ष परिस्थितीला धरून नाहीत असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु ते वस्तुस्थितीचेच निदर्शक आहेत.

१०.४८ वरीलप्रमाणे जिल्हा परिषदांचे उत्पन्न व खर्च अंदाजित केल्यावर त्यामध्ये आढळून येणारी तफावत ही " तूट " म्हणून दर्शविण्यात आली आहे.

१०.४९ जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाचा, त्यांना मिळणाऱ्या अनुदानाचा व त्यांच्या खर्चाचा आढळून आलेला वृद्धी दर प्रकरण-३ मध्ये दिलेल्या वृद्धी दराशी मिळता जुळता असणार नाही. याचे कारण म्हणजे जिल्हा परिषदनिहाय त्यांचे स्वतःचे उत्पन्न व अनुदान यात फरक आहे. त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांचे वृद्धी दर संख्याशास्त्रीय तंत्राने स्वतंत्रपणे काढण्यात आले असून या वृद्धी दरानुसार पुढील उत्पन्न/खर्चाची आकडेवारी अंदाजित करण्यात आली आहे. अशाप्रकारे अंदाजित केलेली जिल्हानिहाय आकडेवारी राज्यस्तरावर संकलित केलेली आहे. प्रकरण-३ मधील राज्यस्तरीय आकडेवारी पुढील ५ वर्षांचे राज्यस्तरीय अंदाज तयार करण्यासाठी जशीच्या तशी वापरण्यात आलेली नाही.

१०.५० ग्रामपंचायतींसाठी सुद्धा अशा प्रकारे आढळून येणाऱ्या तुटीचा विचार करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींची माहिती ही बाहेरील संस्थेने ग्रामपंचायतींच्या वित्तीय बाबींवर तयार केलेल्या नमुना अहवालातील आकडेवारीवर आधारित आहे. या माहितीमध्ये काही सुधारणा करून आयोगाने सुधारित माहिती ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च अंदाजित करण्या करता वापरली आहे याबाबत विस्तृत विवेचन प्रकरण-११ मध्ये करण्यात आले असून उत्पन्न व खर्चाची सुधारित माहिती तक्ता क्र. ११.३ मध्ये दर्शविण्यात आली आहे. परंतु पंचायत राज संस्थांचे चित्र एकत्रित स्पष्ट होण्यासाठी ही माहिती या तक्त्यातही दर्शविण्यात आली आहे.

१०.५१ जिल्हा परिषदांना आपल्या योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेला निधी व त्यांचे स्वतःचे उत्पन्न यामधील तूट व ग्रामपंचायतींनी आवश्यक त्या सुविधा देण्यासाठी त्यांना कमी पडत असलेला निधी या दोन्ही बाबी विचारात घेऊन पंचायत राज संस्थांच्या बाबतीत आढळून आलेली एकूण तूट तक्ता क्र. १०.१० मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक १०.१०**

पंचायत राज संस्थांचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | बाब | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण (१९९६-९७ ते २०००-२००१) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **जिल्हा परिषद** | | | | | | |
| १. | स्वतःचे उत्पन्न | ६५.२५ | ७०.९४ | ७७.७५ | ८५.८७ | ९५.५७ | ३९५.३८ |
| २. | अतिरिक्त उत्पन्न | | | | | | |
| | (अ) पिण्याचे पाणी | १९.३३ | २९.३१ | ३८.८६ | ५०.१२ | ६२.५० | २००.१२ |
| | (ब) लघुपाटबंधारे | ४.०० | ५.१७ | ६.२५ | ७.४२ | ९.०० | ३१.८४ |
| | (क) एकूण अतिरिक्त उत्पन्न (अ+ब) | २३.३३ | ३४.४८ | ४५.११ | ५७.५४ | ७१.५० | २३१.९६ |
| ३. | स्वतःचे एकूण उत्पन्न [१ + २(क)] | ८८.५८ | १०५.४२ | १२२.८६ | १४३.४१ | १६७.०७ | ६२७.३४ |
| ४. | अनुदाने | २१७६.९७ | २५११.९८ | २८९८.५० | ३३४८.६० | ३८७१.९० | १४८०६.९५ |
| ५. | एकूण उत्पन्न (३+४) | २२६५.५५ | २६१६.४० | ३०२१.३६ | ३४९२.०१ | ४०३८.९७ | १५४३४.२९ |
| ६. | खर्च | २०८५.२७ | २३७१.६९ | २७०३.१४ | ३०८९.३२ | ३५४३.३७ | १३७९२.७९ |
| | अतिरिक्त खर्च | | | | | | |
| | (अ) इमारत, रस्ते आणि यंत्रसामुग्री व वाहने दुरुस्ती तसेच पशुसंवर्धन आणि सार्वजनिक आरोग्य. | ४२८.९३ | ४५८.९६ | ४९१.१० | ५२५.४४ | ५६२.२५ | २४६६.६८ |
| | (ब) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम | १४.४० | १५.०० | १५.०० | १८.०० | १८.०० | ८०.४० |
| | (क) पाणीपुरवठा | | | | | | |
| | (१) सध्या अस्तित्वात असलेल्या योजना | ३२.२१ | ४१.८७ | ४८.५७ | ५५.६९ | ६२.५० | २४०.८४ |
| | (२) पुढे हस्तांतरित होणाऱ्या योजना | १०.०० | १०.०० | १०.०० | १०.०० | १०.०० | ५०.०० |
| | (ड) लघुपाटबंधारे देखभाल दुरुस्ती | ५.१० | ६.९० | ७.६० | ८.३० | ९.०० | ३६.९० |
| ७. | एकूण अतिरिक्त खर्च [अ+ब+क+ड] | ४९०.६४ | ५३२.७३ | ५७२.२७ | ६१७.४३ | ६६१.७५ | २८७४.८२ |
| ८. | एकूण खर्च [६+७] | २५७५.९१ | २९०४.४२ | ३२७५.४१ | ३७०६.७५ | ४२०५.१२ | १६६६७.६१ |
| ९. | उत्पन्न व खर्चातील तूट [८–५] | ३१०.३६ | २८८.०२ | २५४.०५ | २१४.७४ | १६६.१५ | १२३३.३२ |
| | **ग्रामपंचायत** | | | | | | |
| १०. | स्वतःचे उत्पन्न | ९२.६६ | १०७.४८ | १२४.६८ | १४४.६३ | १६७.७७ | ६३७.२२ |
| ११. | अनुदाने | ८६.१९ | ९९.९६ | ११६.०२ | १३४.७८ | १५६.७१ | ५९३.६६ |
| १२. | एकूण उत्पन्न [१०+११] | १७८.८५ | २०७.४४ | २४०.७० | २७९.४१ | ३२४.४८ | १२३०.८८ |
| १३. | एकूण खर्च | २३६.०३ | २७१.४१ | ३१२.४१ | ३६०.०० | ४१५.३३ | १५९५.१८ |
| १४. | एकूण तूट [१३–१२] | ५७.१८ | ६३.९७ | ७१.७१ | ८०.५९ | ९०.८५ | ३६४.३० |
| १५. | पंचायत राज संस्थांची एकूण तूट [९+१४] | ३६७.५४ | ३५१.९९ | ३२५.७६ | २९५.३३ | २५७.०० | १५९७.६२ |

आधार.—जिल्हापरिषदा व संबंधित विभागाकडून गोळा केलेली आणि महाराष्ट्र वित्त आयोगाद्वारे अंदाजित करण्यात आलेली माहिती.

□ □

प्रकरण ११

# ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचीं साधने व गरजांचे निर्धारण

११.१. राज्यातील तळागाळातील ग्रामीण जनतेला सेवा व सुविधा पुरविणाऱ्या ग्रामपंचायती या अत्यंत महत्त्वाच्या संस्था आहेत अशी आयोगाची भूमिका आहे. या ग्रामपंचायतींची संख्या फार मोठी असून, त्या राज्याच्या वेगवेगळ्या भागात कार्यरत असून त्यांचे सामाजिक, आर्थिक व प्रादेशिक गुणधर्म वेगवेगळे आहेत. म्हणून आयोगाला असे वाटले की, ग्रामीण जनतेच्या वित्तीय गरजा व त्यांचे निर्धारण योग्य प्रकारे होण्यासाठी एक विस्तृत पाहणी घेण्याची आवश्यकता आहे की ज्याद्वारे पाहणीचा अहवाल पुढील काळात संदर्भासाठी आधारभूत ठरू शकेल.

११.२. वित्त आयोगाकडे ग्रामपंचायतींच्या वित्तीय बाबींची तीन वेगवेगळ्या आधाराद्वारे माहिती उपलब्ध आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे दर वर्षी प्रकाशित होणाऱ्या ' महाराष्ट्राची आर्थिक पाहणी ' या मध्ये वित्तीय बाबींची माहिती प्रकाशित करण्यात येते. ही माहिती संदर्भित वर्षासाठी असल्यामुळे सदर माहिती अंतरिम माहिती म्हणून समजण्यात येते. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी प्रकाशित झाल्यावर किंबहुना आर्थिक वर्ष समाप्तीनंतर जिल्हा परिषदांचे लेखे अद्ययावत करण्यात येतात व त्यामुळे आर्थिक पाहणीत प्रकाशित केलेल्या आकडेवारीत व अद्ययावत आकडेवारीत फरक आढळून येतो. शिवाय आर्थिक पाहणीत प्रकाशित होणारी आकडेवारी मोजक्या स्वरूपात असते व त्यात ग्रामपंचायतींच्या/जिल्हा परिषदांच्या विविध वित्तीय बाबींवर विस्तृतपणे आकडेवारी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ही आकडेवारी वित्त आयोगाच्या कामकाजासाठी फारशी उपयुक्त ठरली नाही. वित्त आयोगाने जिल्हा परिषदांकडून गोळा केलेल्या माहितीमध्ये आर्थिक दर्जा व देत असलेल्या सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पन्न / खर्चाचा अंदाज येत नाही. किंबहुना ग्रामपंचायतींना त्यांचे अंदाजपत्रक तयार करताना नियमाप्रमाणे शिलकीचे अंदाजपत्रक तयार करावे लागत असल्यामुळे त्यांचा वार्षिक खर्च हा वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेतच असतो. त्यामुळे त्यांच्या सुविधांचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता असली तरी त्यासाठी जो अतिरिक्त खर्च येईल त्याचा अंदाज त्यांच्या सद्यःस्थितीतील आकडेवारीवरून वित्त आयोगास प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून आयोगाने महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा वित्तविषयक बाबींचा नमुना पाहणी तत्त्वावर अभ्यास करून एक अहवाल तयार करण्याचे काम पुणे येथील " सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस " (सेंटर) या संस्थेला दिले. सेंटरने नमुना तत्त्वावर महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांतील ८२० ग्रामपंचायती निवडून व प्रत्यक्ष ग्रामपंचायतींच्या कार्यालयात जाऊन ही माहिती गोळा केली व उत्पन्न व खर्चाचे राज्यस्तरीय अंदाज तयार केले.

११.३. सेंटरने राज्यस्तरीय अंदाजित केलेली ग्रामपंचायतींच्या उत्पन्न व खर्चाची माहिती व वित्त आयोगाने संकलित केलेली माहिती बहुतांशी मिळतीजुळती आहे व त्यामुळे सेंटरने गोळा केलेली माहिती व त्यावर आधारित अंदाज विश्वसनीय आहेत. अर्थातच संख्या शास्त्रीय पद्धतीने पुढील ५ वर्षासाठी अंदाजित केलेली माहिती विश्वसनीय म्हणून स्वीकारण्यात आली. या माहितीची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे वेगवेगळया बाबींवर ही माहिती उपलब्ध असून लोकसंख्या गटनिहाय उपलब्ध आहे. तसेच सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चाचा यामध्ये विचार करण्यात आला आहे व ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढविण्याची क्षमता लक्षात घेता उत्पन्नाचे अंदाज वर्तविण्यात आले आहेत. त्यामुळे पुढील ५ वर्षांतील ग्रामापंचायतींच्या महसूल वाढविण्याच्या ज्या संभाव्य बाबी आहेत त्या निर्देशित करून व त्यांचा जास्तीत जास्त वापर करून ग्रामपंचायतींना मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देणे वित्त आयोगास सोपे झाले.



'' ४०९४-१३अ

**अभ्यास पद्धती**

११.४. सदर पाहणीसाठी नमुना निवड खालीलप्रमाणे करण्यात आली. औरंगाबाद महसूल विभागातून ३ जिल्हे व इतर ५ महसुली विभागांतून प्रत्येकी दोन जिल्हे निवडण्यात आले. निवडलेल्या दोन जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आदिवासी व दुसरा बिगर आदिवासी निवडण्यात आला. औरंगाबाद जिल्ह्यातील तीनपैकी दोन जिल्हे ' बिगर आदिवासी ' निवडण्यात आले. याप्रमाणे निवडलेल्या १३ जिल्ह्यांतून प्रत्येकी तीन तालुके खालीलप्रमाणे निवडण्यात आले. (१) प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्या असलेला, (२) अविकसित / अवर्षणप्रवण क्षेत्र असलेला, (३) सर्वाधिक विकसित असलेला अशा प्रकारे निवडलेल्या ३९ तालुक्यांतून प्रत्येकी २० ग्रामपंचायतींची यादृच्छिक (Random) पद्धतीने निवड करण्यात आली. याप्रमाणे सुरूवातीला ७८० ग्रामपंचायती निवडण्यात आल्या असल्या तरी त्यानंतर आयोगाने सूचना केल्याप्रमाणे पुणे, नाशिक, नागपूर व अमरावती या चार महसुली विभागांतील; कोल्हापूर, नाशिक, गडचिरोली व यवतमाळ या चार जिल्ह्यांतील करवीर, नाशिक, गडचिरोली व यवतमाळ या चार तालुक्यांमधून प्रत्येकी १० ग्रामपंचायती यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आल्या. त्यामुळे या पाहणीत राज्याच्या १७ जिल्ह्यांतील ४३ तालुक्यांतील ८२० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

११.५. १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ग्रामीण लोकसंख्या उपलब्ध आहे. परंतु ग्रामपंचायतनिहाय लोकसंख्या उपलब्ध नाही. महाराष्ट्र वित्त आयोगाने गोळा केलेल्या माहितीत जिल्हानिहाय व लोकसंख्यागटनिहाय ग्रामपंचायतींची विभागणी उपलब्ध होती. ही चौकट राज्यस्तरीय आकडेवारी अंदाजित करण्याकरिता वापरण्यात आली. एकूण ग्रामपंचायती चार लोकसंख्यागटांत विभागल्या आहेत. या लोकसंख्यागटांनुसार त्यांना आवश्यक असलेल्या सुविधा व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाची पातळी बदलत जाते. त्यामुळे संबंधित लोकसंख्या गटासाठी पाहणीत आढळून आलेल्या उत्पन्न व खर्चाच्या आकडेवारीवरून पुढील आकडेवारी अंदाजित करण्यात आली आहे. १९९०-९१ ते १९९४-९५ या ५ वर्षांच्या कालावधीसाठी ही आकडेवारी तयार करताना सेंटरने संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करून काढण्यात आलेला वृद्धिदर वापरून पुढील ५ वर्षांसाठी राज्यस्तरीय लोकसंख्यागटनिहाय उत्पन्न / खर्चाची आकडेवारी अंदाजित केली आहे.

११.६. मागील वर्षाच्या तुलनेत पुढील वर्षाच्या आकडेवारीत वाढ होणार हे नैसर्गिक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे किंमतीमधील वाढ लक्षात घेता ' मुद्रास्फिती ' व प्रत्यक्ष कर आकारणीसाठी " सुधारित कराचे दर व करवसुलीची कार्यप्रणाली " या दोन बाबींवर भविष्यातही स्थानिक संस्थांच्या उत्पन्न व खर्चामध्ये वाढ होणे स्वाभाविक आहे. पुढील पाच वर्षांचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज काढताना तीन वेगवेगळ्या प्रकारे सेंटरने आकडेवारी अंदाजित केली आहे.

११.७. पहिल्या प्रकारे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी अंदाजित करताना ग्रामपंचायतींना वेगवेगळ्या बाबींवर द्यावयाच्या सुविधांचा विचार करण्यात आला असून, सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी अनिवार्य असणाऱ्या खर्चाची पातळी निश्चित करण्यात आली आहे. या अनुषंगाने सुविधा दिल्यानंतर त्याद्वारे वाढीव उत्पन्नाची अपेक्षा आहे. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकाराद्वारे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी अंदाजित करताना उत्पन्न व खर्चासाठी वेगवेगळ्या सुविधा देत असलेल्या ग्रामपंचायतींची प्रत्यक्ष संख्या विचारात घेण्यात आली व सध्या जरी प्रत्यक्ष सुविधा देत असलेल्या ग्रामपंचायती कमी असल्या तरी अनुक्रमे पुढील ५ वर्षांत व १० वर्षांत या सेवा सर्व ग्रामपंचायती उपलब्ध करून देतील असे गृहित धरून त्यासाठी येणारा खर्च व त्यातून मिळणारे उत्पन्न याचा विचार करण्यात आला. या दोन्ही प्रकारांनुसार आकडेवारी तयार करताना मागील ५ वर्षांच्या माहितीवर आधारित आढळून येणारे वृद्धिदरच पुढे कायम राहतील असे गृहित धरून उत्पन्न/खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले.

११.८. अर्थातच या तीन वेगवेगळ्या प्रकारांनुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज काढताना अवलंबिलेली भूमिका वेगवेगळी आहे. प्रकार-१ नुसार अंदाजित केलेल्या उत्पन्न व खर्चात चलनवाढ, सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असणारा खर्च व सुविधा देत असलेल्या ग्रामपंचायतींच्या संख्येत होणारी नैसर्गिक वाढ या बाबी अंतर्भूत आहेत व त्यामुळे उत्पन्न व खर्चाचे वृद्धिदर ऐतिहासिक वृद्धिदरापेक्षा बऱ्याच वरच्या पातळीवर होते. ही आकडेवारी आयोगाने आदर्श म्हणून स्वीकारली आहे. अशा प्रकारे ग्रामपंचायतींनी करावयाचा राज्यस्तरीय खर्च व त्यांना मिळणारे उत्पन्न, अनुदान व तूट खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक ११.१

(रुपये कोटीत)

| बाब | | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर व करेतर महसूल | .. | ८३.७१ | १०८.७० | १४२.२८ | १८७.९६ | २५१.०२ | १५४.७४ |
| अनुदाने | .. | १०१.७९ | ११४.९३ | १२९.८० | १४६.६५ | १६५.७४ | १३१.७८ |
| एकूण उत्पन्न | .. | १८५.५० | २२३.६३ | २७२.०८ | ३३४.६१ | ४१६.७६ | २८६.५२ |
| एकूण खर्च | .. | २९९.६५ | ३५५.२५ | ४२१.६६ | ५०१.०७ | ५९६.१७ | ४३४.७६ |
| एकूण तूट | .. | ११४.१५ | १३१.६२ | १४९.५८ | १६६.४६ | १७९.४१ | १४८.२४ |
| *दरडोई तूट | .. | २२.९७ | २६.४८ | ३०.१० | ३३.४९ | ३६.१० | २९.८२ |

* ग्रामीण लोकसंख्या ४.८४ कोटी; पाच वर्षाची तूट–७४१.२ कोटी (१४८.२४ × ५)

११.९. वरीलप्रमाणे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी अंदाजित करताना ज्या बाबी विचारात घेतल्या त्या खालीलप्रमाणे आहेत :—

(१) १९९४-९५ चे उत्पन्न व खर्चाची पातळी वाढवून प्रथम १९९६-९७ ची पातळी निश्चित करण्यात आली व ह्या पातळीला संबंधित वृद्धिदर लावून पुढील आकडेवारी काढण्यात आली.

(२) पुढील पाच वर्षांची उत्पन्न व खर्चाची आकडेवारी अंदाजित करण्याकरिता वापरण्यात आलेले वृद्धिदर हे मागील पाच वर्षांत आढळून आलेल्या ऐतिहासिक वृद्धिदरांपेक्षा कमी नसावेत.

(३) खर्चाच्या बाबींवरील वृद्धिदर चलनवाढीच्या दरापेक्षा कमी नसावा व सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त खर्च या वृद्धिदरामध्ये अंतर्भूत असावा. १९९६-९७ ते २०००-२००१ या कालासाठी अंदाजित केलेल्या खर्चाचा वृद्धिदर १८.७६ टक्के आहे. १९९४-९५ च्या आकडेवारीशी तुलना करता १९९६-९७ च्या खर्चाची पातळी १३३.३२ टक्क्यांनी वाढविण्यात आली आहे.

(४) पाणी व रस्त्यांवरील दिवे या दोन बाबींवर अंदाजित केलेल्या आवश्यक खर्चाच्या पातळीएवढी उत्पन्नाची पातळी किमान २०००-२००१ या वर्षापर्यंत व्हावी.

(५) खर्चाच्या पातळीबरोबरच उत्पन्नाची पातळी वाढविणे अनिवार्य आहे. या दृष्टीने लोकसंख्या गटनिहाय कर देण्याची क्षमता लक्षात घेऊन उत्पन्नाचे वृद्धिदर ठरविण्यात आलेले आहेत. यानुसार ग्रामपंचायतींच्या स्वतःच्या उत्पन्नाचा वृद्धिदर ३१.५७ टक्के आढळून आला आहे.

११.१०. वरीलप्रमाणे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी अंदाजित करण्यासाठी व वृद्धिदर ठरविताना उपरोक्त निकषाबरोबरच सेंटरने त्यांचा क्षेत्रीय अनुभव, शासकीय व अशासकीय पदाधिकारी यांच्याबरोबर झालेली चर्चा व त्यानुसार तारतम्य वापरून हे उत्पन्न/खर्च व त्यांचे वृद्धिदर ठरविण्यात आले आहेत. काही वेळेला लोकसंख्या गटानुसार वेगवेगळ्या गटांतील तौलनिक स्थितीचे संतुलन राखण्यासाठीनवीन वृद्धी दर सुनिश्चित करण्यात आले किंवा ते तसे ठरविण्यात आले. याप्रमाणे तयार केलेल्या लोकसंख्या गटनिहाय आकडेवारीवरुन राज्यस्तरीय आकडेवारी तयार करण्यात आली.

११.११. वरीलप्रमाणे भूमिका घेऊन तयार केलेल्या आकडेवारीनुसार असे आढळून येते की, राज्यातील सर्व ग्रामपंचायतींसाठी जवळजवळ रु. १४८ कोटी एवढ्या अतिरिक्त वार्षिक निधीची म्हणजेच पुढील पाच वर्षांसाठी जवळजवळ ७४१ कोटी रु. एवढ्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे.

११.१२. सेंटरच्या मते ही उत्पन्नाची पातळी गाठणे शक्य आहे. पण आयोगाला याचे वित्तीय परिणाम मोठे दिसतात. सर्व प्रकारच्या सुविधांच्या पातळीमध्ये सुधारणा होणे हे उत्पन्नात बसत नसल्यामुळे आयोगाने फक्त " पाणीपुरवठा " व " स्वच्छता व आरोग्य " यावर लक्ष केंद्रित केले. म्हणूनच पाणी व स्वच्छता व आरोग्य यावर करावयाचा खर्च पूर्वीप्रमाणेच सेंटरने सुचविलेल्या त्याच्या अहवालातील आवश्यक पातळीवर ठेवण्यात आला. १९९४-९५ शी तुलना करता १९९६-९७ मध्ये " पाणीपुरवठा " वर झालेल्या खर्चात ९७ टक्के तर " स्वच्छता व आरोग्य " या बाबींवर १८७ टक्के वाढ करण्यात आली. उरलेल्या खर्चाच्या बाबतीत मात्र वरील मुद्दे लक्षात घेता मागील ५ वर्षांत आढळून आल्याप्रमाणे पुढील ५ वर्षे खर्च होईल असे गृहित धरण्यात आले. याप्रमाणे अंदाजित केलेल्या खर्चाचा वृद्धीदर १५.१७ टक्के एवढा आढळून आलेला आहे.

११.१३. याशिवाय ग्रामपंचायतींच्या हंगामी कर्मचाऱ्यांना " किमान वेतन " देण्याची मागणी आहे. सदर प्रलंबित मागणी पूर्ण करावयाची झाल्यास खर्चाची पातळी आणखी वाढते. या बाबींवर येणाऱ्या खर्चाची योग्य ती आकडेवारी ग्रामीण विकास विभागाकडून प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे ह्या बाबींवर येणारा खर्च ग्रामपंचायतींच्या खर्चात अंतर्भूत केलेला नाही.

११.१४. पुढील ५ वर्षांतील उत्पन्न अंदाजित करताना एकूण उत्पन्नाचे (१) कर व करेतर महसूल व (२) अनुदाने असे दोन भाग करण्यात आले आहेत. आयोगाने अर्थ व सांख्यिकी संचालनालयाला उत्पन्न व खर्चाचे दीर्घकालीन वृद्धीदर काढण्यास सांगितले होते. तो उत्पन्नाचा वृद्धीदर ९.५७ टक्के एवढा आढळून आला. वित्त आयोगाने गोळा केलेल्या माहितीप्रमाणे एकूण उत्पन्नाचा वृद्धीदर १६.२३ टक्के आहे. म्हणून आयोगाची अशी अपेक्षा आहे की, ग्रामपंचायतींनी आपले उत्पन्न १६ टक्क्यांनी वाढवावे यामध्ये घरपट्टी, पाणीपट्टी यामधील वाढ व इतर बाबींचा समावेश आहे.

११.१५. सेंटरने निर्धारित केलेला पाणीपुरवठ्यावरील खर्च आयोगाने स्वीकारला आहे. आयोगाची अशी अपेक्षा आहे की, पाणीपुरवठ्यावर अंदाजित केलेल्या खर्चापैकी २०००-२००१ सालापर्यंत ७० टक्के खर्च ग्रामपंचायतींनी स्वतःच्या उत्पन्नातून भागवावा. पाणीपुरवठ्यावरील निर्धारित केलेला खर्च, सध्या आकारत असलेल्या पाणीपट्टीत टप्प्याटप्प्याने वाढ करून या बाबींवर त्यांना मिळणारे उत्पन्न व उर्वरित खर्च खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्रमांक ११.२

(रुपये कोटीत)

| अ. क्र. (१) | बाब (२) | १९९६-९७ (३) | १९९७-९८ (४) | १९९८-९९ (५) | १९९९-२००० (६) | २०००-२००१ (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा योजनांवरील एकूण खर्च | ३८.८३ | ४६.६० | ५५.९२ | ६७.१० | ८०.५२ |
| २ | खर्चाची पातळी पाणीपट्टी आकारून गाठण्याचे प्रस्तावित लक्ष्य. | .. | ५० टक्के | ६० टक्के | ६५ टक्के | ७० टक्के |
| ३ | प्रस्तावित लक्ष्याप्रमाणे पाणीपट्टीची आवश्यक वसुली. | .. | २३.३० | ३३.५५ | ४३.६२ | ५६.३६ |
| ४ | उर्वरित खर्च | .. | २३.३० | २२.३६ | २३.४८ | २४.१० |

११.१६. वरीलप्रमाणे पाणीपट्टीद्वारे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न पाहता ग्रामपंचायतींना त्यांचे १६ टक्के वृद्धि दराचे उद्दिष्ट साध्य करता येईल. यामध्ये ग्रामपंचायतींच्या स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत असलेल्या घरपट्टी, दिवाबत्ती कर, साफसफाई कर व त्यांच्या उत्पन्नाचे अप्रत्यक्ष साधन ठरणाऱ्या " सामाजिक वनीकरण " सारख्या शासकीय योजना या बाबींपासून शक्य असलेल्या वाढीव उत्पन्नाचा समावेश नाही. अशा प्रकारे भूमिका घेऊन ग्रामपंचायतींचा उत्पन्न, खर्च व तूट यावरील अंदाजित आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक ११.३

(रुपये कोटीत)

| बाब | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| कर व करेतर महसूल . . | ९२.६६ | १०७.४८ | १२४.६८ | १४४.६३ | १६७.७७ | १२७.४४ |
| अनुदाने . . | ८६.१९ | ९९.९६ | ११६.०२ | १३४.७८ | १५६.७१ | ११८.७२ |
| एकूण उत्पन्न . . | १७८.८५ | २०७.४४ | २४०.७० | २७९.४१ | ३२४.४८ | २४६.१७ |
| एकूण खर्च . . | २३६.०३ | २७१.४१ | ३१२.४१ | ३६०.०० | ४१५.३३ | ३१९.०४ |
| एकूण तूट . . | ५७.१८ | ६३.९७ | ७१.७१ | ८०.५९ | ९०.८५ | ७२.८६ |
| तुटीची खर्चाशी टक्केवारी | २४.२२ % | २३.५७ % | २२.९५ % | २२.३९ % | २१.८७ % | २२.८४ |
| दरडोई तूट . . | ११.८१ | १३.२१ | १४.८२ | १६.६५ | १८.७७ | १५.०५ |

११.१७. तक्ता क्रमांक ११.१ व ११.३ मधील आकडेवारीची तुलना करता यात प्रामुख्याने जो फरक आहे तो असा की तक्ता क्रमांक ११.१ मधील १९९६–९७ च्या आकडेवारीची पातळी प्रथम गृहित दराने ठरवून त्यावर वृद्धि दर लावण्यात आले तर तक्ता क्रमांक ११.३ मध्ये (पाणीपुरवठा आणि आरोग्य या बाबींवरील खर्च वगळता) १९९४–९५ च्या पातळीवरच नियमित दराने वृद्धि दर लावून १९९६–९७ ची पातळी ठरविण्यात आली व पुढेही याच नियमित दराने त्यात वाढ झाली.

११.१८. जरी नैसर्गिक वृद्धि दरामुळे सर्वसामान्यपणे विविध सुविधांचा दर्जा व मात्रा सुधारेल तरी ग्रमपंचायतींनी पिण्याचे पाणी, आरोग्य व स्वच्छता यावर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायती आपले उत्पन्न वाढविण्यासाठी कर व फी आकारतील व त्याची वसुली करण्याकरता विशेष प्रयत्न करतील अशी आयोगाची अपेक्षा आहे. विशेषतः ग्रामपंचायती पाणीपट्टी आकारून आपले उत्पन्न वाढवतील. काही करेतर महसुलांच्या बाबींद्वारेही ग्रामपंचायती आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतील. यापैकी एक बाब म्हणजे " सामाजिक वनीकरण " होय. ग्रामपंचायती ह्या व अशा सर्व बाबींचा उपयोग करून आपले स्वतःचे उत्पन्न वाढविण्याचा व सक्षम होण्याचा प्रयत्न करतील हा आयोगाला विश्वास आहे.

□ □

प्रकरण १२

# नागरी संस्थांच्या उत्पन्नाची साधने व गरजांचे निर्धारण

१२.१. नागरी स्थानिक संस्थांच्या आर्थिक गरजांची ठळक वर्गवारी महसुली व भांडवली गरजा अशी करता येईल. महसुली गरजांमध्ये संस्थेचा बांधील खर्च अस्तित्वात असलेल्या सेवा चालू ठेवणे, मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करणे व कर्जफेड इ. बाबींचा समावेश आहे. या संस्थांवर सोपविलेल्या कार्ये व कर्तव्यांपोटी नवीन सेवा-सुविधा निर्माण करणे, अस्तित्वात असलेल्या सुविधांत भर घालणे व त्यांत सुधारणा करणे यामुळे भांडवली गरजा निर्माण होतात व त्या भांडवली खर्चाचा मोठा भाग विविध वित्तीय संस्थांमार्फत कर्जे घेऊन भागविण्यात येतो.

१२.२. नागरी संस्थांच्या उत्पन्नाची साधने व गरजांमधील तफावत काढण्याचे काही प्रयत्न मागे झालेले आहेत. अशा प्रकारचा पहिला प्रयत्न १९६३ मध्ये गठित केलेल्या मंत्र्यांच्या समितीने जी झकेरिया समिती म्हणून ओळखली जाते, केला होता. या समितीने नागरी क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या काही सेवांसाठी " किमान प्रमाणके " निश्चित केली. समितीला असे आढळून आले की, या किमान प्रमाणकानुसार सेवा देण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व वर्गांच्या नागरी संस्थांना रु. ३६.८० कोटीची गरज असेल. त्यावेळच्या प्रचलित उत्पन्नाची पातळी रु. २९.१० कोटी विचारात घेतल्यानंतर एकूण तूट रु. ७.७० कोटी असल्याचे दिसून आले.

१२.३. महाराष्ट्र शासनाने सन १९७३ मध्ये नेमलेल्या बी. पी. पटेल समितीने, झकेरिया समितीने जी गरज निर्धारित केली होती, ती लक्षात घेऊन उत्पन्नाची साधने वाढविण्याबाबतच केवळ शिफारसी केल्या.

१२.४. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अर्बन अफेअर्स, नवी दिल्ली या संस्थेने केलेल्या क्षेत्रीय पाहणीप्रमाणे सन १९७९-८० मध्ये संपूर्ण देशासाठी एकूण महसुली व भांडवली खर्चामधील तफावत अनुक्रमे रु. २१,००२ कोटी आणि रु. १,१२,२३१ कोटी काढली होती. महाराष्ट्रासाठी ही तूट अनुक्रमे रु. ४,३०९ कोटी व रु. ११,३३१ कोटी होती. नियोजन आयोगाच्या इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक्स आणि नियोजन आयोगाच्या टास्क फोर्सने केलेल्या एका अभ्यासात नागरी क्षेत्रातील उत्पन्नाची साधने व गरजा यांमधील तफावत सारखी वाढत असल्याचे नमूद केले होते. भाववाढ, वाढते नागरीकरण आणि लोकांच्या अपेक्षा इत्यादीमुळे या तफावतीमध्ये त्यानंतरच्या कालावधीत बरीच वाढ झाली असेल. तथापि, ह्या तफावतीची सन १९७९-८० ची पातळी फार मोठी होती व त्यासाठीच उत्पन्नाच्या साधनांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती.

१२.५. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्सेस अँड पॉलिसी या संस्थेने राज्य वित्त आयोगांना सहाय्य करण्यासाठी मे, १९९५ मध्ये " म्युनिसिपल फिस्कल रिलेशन्स (ऑप्शन अँड परस्पेक्टिव्हज्) फॉर दि स्टेट फायनान्स कमिशन्स " असे शिर्षक असलेली पुस्तिका तयार केली आहे. या पुस्तिकेमध्ये देशातील निवडक नागरी संस्थांचा (महाराष्ट्र त्यातील एक राज्य आहे) अभ्यास केला आहे. या संस्थेने उत्पन्न वाढण्याची क्षमता, खर्चाच्या गरजा आणि तफावत यांची परिगणना करण्याची पद्धती सुचविली आहे. या पद्धतीत असे गृहित धरण्यात आले की, एकाच प्रवर्गातील ज्या नगरपरिषदांचा दरडोई खर्च सर्वाधिक आहे, त्या नगरपरिषदांच्या सेवासुविधा पुरविण्याची पातळी त्या वर्गातील इतर नागरी संस्थांचा (ज्यांचा दरडोई खर्च त्या पातळीपेक्षा कमी आहे) तुलनेत

चांगली आहे. अशा प्रकारे सर्वात जास्त दरडोई खर्च असलेल्या नागरी संस्था त्या-त्या प्रवर्गासाठी प्रमाण धरून आणि अशा प्रमाणाच्या नागरी संस्थेचा दरडोई खर्च आणि त्याच प्रवर्गातील इतर नागरी संस्थांचा दरडोई खर्च यामधील तफावत विचारात घेऊन गरजांमधील तूट काढण्यात आली. ही तफावत भरून काढण्यासाठी व नागरी संस्थांच्या उत्पन्न वाढविण्याच्या क्षमतेचा अंदाज घेण्यासाठी उत्पन्नाच्या बाजूला अशाच प्रकारचे तत्त्व प्रत्येक प्रवर्गाच्या नगरपरिषदेसाठी वापरले आहे. एकाच प्रवर्गातील ज्या नगरपरिषदांचे दरडोई स्वतःचे उत्पन्न सर्वात जास्त आहे, त्याला त्याच प्रवर्गासाठी प्रमाण मानले आहे. त्या प्रवर्गातील या "प्रमाण" नागरी संस्थेचे व इतर नागरी संस्थांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत याला उत्पन्नाची संभाव्य क्षमता असे संबोधण्यात आले.

१२.६. ही पद्धत अनुसरल्यास महाराष्ट्र राज्यातील चारही प्रकारच्या नागरी संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नाची क्षमता आणि खर्चाच्या गरजा खालील तक्ता क्र. १२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिसून येतील. हे अंदाज १९९४-९५ या वर्षाची उत्पन्न व खर्चाची पातळी विचारात घेऊन काढले आहेत आणि ही उत्पन्न क्षमता व खर्चाची गरज २०००-२००१ या वर्षापर्यंत गाठण्यात येईल असे गृहित धरले आहे :—

तक्ता क्र. १२.१

**सर्वात जास्त दरडोई खर्च हे प्रमाण विचारात घेऊन उत्पन्नाची क्षमता व खर्चाची गरज व त्यातील तफावत**

| | नागरी संस्थेचा वर्ग | उत्पन्न क्षमता रु. लाखात | खर्चाची गरज रु. लाखात | तफावत रु. लाखात |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका .. | ४,०१,९८२ | ३,४५,२६४ | + ५६,७१८ |
| २ | "अ" वर्ग नगरपरिषद .. | ६२,०५७ | ६५,४९४ | — ३,४३७ |
| ३ | "ब" वर्ग नगरपरिषद .. | ४६,२८७ | ४१,९०६ | + ४,३८१ |
| ४ | "क" वर्ग नगरपरिषद .. | २८,५७१ | ३३,३७२ | — ४,८०१ |
| | एकूण .. | ५,३८,८९७ | ४,८६,०३६ | + ५२,८६१ |

१२.७. नगरविकास विभागाने जून १९९५ मध्ये आयोगाला सादर केलेल्या आवेदनपत्रामध्ये नगरपरिषदांच्या तीन प्रवर्गांसाठी उत्पन्न व खर्च यांमधील तूट काढली आहे. ती तक्ता क्र. १२.२ येथे पहावी. नगरविकास विभागाने यासाठी वापरलेली पद्धत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :—

"सन १९९१-९२ ते १९९३-९४ या वर्षाची महसुली उत्पन्न व खर्चाची आकडेवारी गोळा करण्यात आली. त्यावरून एकत्रित वाढीचा दर काढण्यात आला. सन १९९४-९५ चे नागरी संस्थांचे अर्थसंकल्प उपलब्ध नसल्यामुळे सन १९९१-९२ ते १९९३-९४ या काळात दिसून आलेल्या वाढीच्या दराच्या दुप्पट दराने सन १९९५-९६ या वर्षासाठीचे अंदाज काढण्यात आंले तर त्यापुढील वर्षांसाठी म्हणजे १९९५-९६ ते १९९९-२००० मध्ये वरील एकेरी वाढीचा दर चालू राहील असे गृहित धरून त्याआधारे अंदाज काढले आहेत."

तक्ता क्र. १२.२

## महाराष्ट्र राज्यातील २३२ नगरपरिषदांच्या उत्पन्न व खर्चाचे पाच वर्षाचे अंदाज

(रुपये कोटीत)

| परिषद वर्ग | ऐतिहासिक प्रत्यक्ष माहिती | | | सरासरी वाढीचा दर | १९९४-९५ | अंदाज | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९३-९४ | | | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० |
| **अ-वर्ग (२३ न.प.)——** | | | | | | | | | | |
| (अ) उत्पन्न | १३०.२३ | १४३.१२ | १५५.५४ | ९.३० | उ. ना. | १८४.०० | २०१.१० | २१९.८० | २४०.२५ | २६२.६० |
| (ब) वसुली उत्पन्नाच्या ८५% | | | | | | १५६.४० | १७०.९५ | १८६.८५ | २०४.२० | २२३.२० |
| (क) खर्च | १३१.९५ | १४४.९६ | १६०.३८ | १०.३० | उ. ना. | १९२.९४ | २१२.२० | २३४.०६ | २५८.१८ | २८४.८० |
| **अंदाजित तूट (क)–(ब)——** | .. | .. | .. | .. | .. | (३६.५४) | (४१.२५) | (४७.२१) | (५३.९८) | (६१.६०) |
| **ब-वर्ग (५० न.प.)——** | | | | | | | | | | |
| (अ) उत्पन्न | ९६.१२ | ११४.८८ | १३१.७६ | १७.३० (१०%) | उ. ना. | १५८.१० | १७३.९० | १९१.३० | २१०.४० | २३१.४५ |
| (ब) वसुली उत्पन्नाच्या ९०% | | | | | उ. ना. | १४२.९० | १५६.५० | १७२.२० | १८९.४० | २०८.३० |
| (क) खर्च | ९५.५७ | ११२.४० | १४६.०४ | २३.७५ (२०%) | उ. ना. | १७५.२४ | २१०.३० | २५२.४० | ३०२.८० | ३६३.४० |
| अंदाजित तूट (क)–(ब) | .. | .. | .. | .. | | (३२.३४) | (५३.८०) | (८०.२०) | (११३.४०) | (१५५.१०) |
| **क-वर्ग (१६० न.प.)——** | | | | | | | | | | |
| (अ) उत्पन्न | ८३.३८ | ९५.४२ | १२०.०३ | १४%/१५% | उ. ना. | १५६.०३ | १७७.८० | २०२.७० | २३१.१० | २६३.४५ |
| (ब) वसुली उत्पन्नाच्या ९०% | | | | | उ. ना. | १४०.४० | १६०.०० | १८२.४० | २०८.०० | २३७.१० |
| (क) खर्च | ९१.७८ | १०५.४४ | ११७.३० | ११%/१५% | उ. ना. | १४०.८० | १६१.९० | १८६.२० | २१४.१० | २४६.२० |
| अंदाजित तूट (क)–(ब) | .. | .. | .. | .. | .. | (०.४०) | (१.९०) | (३.८०) | (६.१०) | (९.१०) |

**आधार——**नगरविकास विभागाचे ज्ञापन.

१२.८. नगरविकास विभागाची वरील पद्धत आयोगाला अडचणीची वाटते. भविष्यकाळातील गरजा विचारात न घेता आवश्यक उत्पन्न व खर्चाचे साधे अंदाज काढले आहेत. दुसरे असे की, रस्ते, इमारती व इतर पायाभूत सुविधा यांच्या देखभाल, दुरुस्तीच्या बाबतीत सध्या ज्या उणीवा आहेत त्या विचारात घेतलेल्या नाहीत. सद्यःपरिस्थितीतच कमी वा अधिक प्रमाणात पुढील पाच वर्षांत चालू राहील असे यात गृहित धरले आहे. सध्या रस्ते व इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीकडे सर्वसाधारणपणे दुर्लक्ष केले जाते. पाणीपुरवठ्याच्या योजनांचे व्यवस्थापन अकार्यक्षम आहे, तर झोपडपट्टी वस्त्यांमध्ये मुलभूत सेवा सुविधा पुरविण्याच्याही समस्या आहेत. सध्याच्या स्थितीमध्ये आमुलाग्र सुधारणा होण्यास काही कालावधी लागणार असला तरी त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे अन्यथा परिस्थितीत कधीच सुधारणा होणार नाहीत.

१२.९. आयोगाला पूर्ण जाणीव आहे की, गरजांच्या निर्धारणासाठी जे अशक्य आहे व साध्य करता येणार नाही अशा अवास्तविक गरजांचा आधार घेणे म्हणजे केवळ सांख्यिकीय आकडेवारीची गोळाबेरीज असेल. म्हणूनच आयोगाने वेगळा मार्ग स्वीकारला आहे. आयोगाने ज्या काही मुख्य अडचणी व प्रश्न आहेत अशा बाबींचा विचार करून त्यातील तुटी काढण्याचा प्रयत्न केला आहे. याला काही मर्यादा असल्यामुळे हे प्रयत्न परिपूर्ण नाहीत. आयोगाला वाटते की, घटनेच्या तरतुदीप्रमाणे अशा प्रकारचा हा पहिला प्रयत्न असून भविष्यकाळातील अंदाजासाठी एक पाया म्हणून सुरूवात ठरू शकेल. यापुढे गरजांचे निर्धारण करताना नागरी संस्थांनी करावयाची विविध प्रकारची कार्ये व कर्तव्ये विचारात घेऊन त्यासाठी त्यांना किती निधीची गरज आहे त्याचे अंदाज काढायला पाहिजेत.

१२.१०. नागरी संस्थांच्या खर्चासाठी आवश्यक असलेला निधी विविध मार्गांनी प्राप्त होतो. उदा. स्वतःचे उत्पन्न, निरनिराळ्या प्रयोजनांसाठीची अनुदाने व कर्जे, अंदाजित खर्च व अंदाजित उत्पन्नातील तफावत ही सर्वसाधारणपणे तूट म्हणून धरता येईल. तथापि, या संकल्पनेबाबतही काही अडचणी आहेत. सर्व प्रथम निकषाप्रमाणे खर्चाची आवश्यकता नेहमीच काढता येत नाही. अचानक उद्‌भवणाऱ्या निकडीच्या गरजा व बाबींसाठी थोड्या कालावधीत निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. उदा. नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण होणारे प्रश्न व अचानक उद्‌भवणारे साथीची रोगराई इ. अशा परिस्थितीत नागरी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थेत लवचिकता असावी लागते. दुसरे म्हणजे काही मोठ्या नागरी क्षेत्रातील विविध प्रभागांमध्ये (उदा. मध्यवर्ती व्यापारी क्षेत्र आणि निवासी क्षेत्र) यात पुरवावयाच्या सेवांची वेगवेगळी पातळी असते. त्यामुळे सर्वच प्रभागांमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक सेवांचा समान दर्जा / स्तर राखता येणे कठीण जाते. त्यामुळे या विशेष बाबींचाही गरजांचे निर्धारण व्यक्तिनिष्ठ तत्त्वावर अवलंबून असते.

१२.११. आयोगाने नागरी संस्थांची कर्तव्ये व कार्याच्या काही बाबींचा विचार करून त्यासाठी अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यातील तूट काढली आहे.

१२.१२. **रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती**—रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. काही महानगरपालिका आणि कदाचित काही नगरपरिषदा वगळता रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाकडे फारच दुर्लक्ष झालेले आहे. याबाबतचा ऊहापोह प्रकरण ८ मधील परिच्छेद ८.६० ते ८.६१ मध्ये केला आहे. परिच्छेद ८.६१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने नागरी संस्थांच्या क्षेत्रातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी भारत सरकारच्या रस्ते वाहतूक मंत्रालयाने ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे आवश्यक निधीचे निर्धारण केले आहे. तसेच १९९४-९५ मध्ये नागरी संस्थांनी रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी केलेला प्रत्यक्ष खर्च या बाबीवरील खर्चाच्या वार्षिक वाढीचा दर विचारात घेऊन १९९६-९७ साठी खर्चाचा अंदाज काढला आहे. निकषाप्रमाणे आवश्यक निधी व १९९६-९७ चे खर्चाचे अंदाज यातील तफावत काढली असून, ती खालील तक्ता क्र. १२.३ मध्ये दिली आहे :—

## तक्ता क्र. १२.३

### नागरी क्षेत्रातील रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा निधी

(रु. लाखांत)

| नगरपालिका वर्ग | | रस्त्यांची लांबी (कि. मी.) | निकषाप्रमाणे आवश्यक निधी | १९९६-९७ मधील अपेक्षित खर्च | तूट |
|---|---|---|---|---|---|
| **महानगरपालिका** | | | | | |
| १. मुंबई | . . | १,७७० | ७,५१२.०० | २,३०८.६० | ५,२०३.४० |
| २. ठाणे | . . | २०४ | ४१६.७० | १७३.१३ | २४३.५७ |
| ३. नवी मुंबई | . . | ७४ | १३४.१२ | २७.८५ | १०६.२७ |
| ४. कल्याण | . . | ४२६ | ७७२.१२ | १८९.०९ | ५८३.०३ |
| ५. नाशिक | . . | ८५२ | १,६८८.०० | ७००.१३ | ९८७.८७ |
| ६. पुणे | . . | ५७० | १,६३८.२४ | २७८.४८ | १,३५९.७६ |
| ७. पिंपरी-चिंचवड | . . | ४३९ | १,१२३.०७ | ४३२.९२ | ६९०.१५ |
| ८. सोलापूर | . . | ३७४ | ६१७.९४ | १७.५७ | ६००.३७ |
| ९. कोल्हापूर | . . | ३३१ | ५४५.३१ | ५०.४७ | ४९४.८४ |
| १०. औरंगाबाद | . . | ३९१ | ६५९.२८ | १७४.३७ | ४८४.९१ |
| ११. अमरावती | . . | ५९९ | ९७५.६९ | ३.७३ | ९७१.९६ |
| १२. नागपूर | . . | ७०४ | १,३४२.५० | १,१२०.५८ | २२१.९२ |
| एकूण | . . | ६,७३४ | १७,४२४.९७ | ५,४७६.९२ | ११,९४८.०५ |
| **नगरपारिषदा** | | | | | |
| अ-वर्ग | . . | ४,२४६ | ७,८७८.९९ | २,१५०.२७ | ५,७२८.७२ |
| ब-वर्ग | . . | २,७३० | ४,६६२.०३ | ६७३.२३ | ३,९८८.८० |
| क-वर्ग | . . | ३,९३० | ४,४०४.७२ | ७८८.३८ | ३,६१६.३४ |
| एकूण | . . | १०,९०६ | १६,९४५.७४ | ३,६११.८८ | १३,३३३.८६ |
| एकूण | . . | १७,६४० | ३४,३७०.७१ | ९,०८८.८० | २५,२८१.९१ |

१२.१३. नागरी संस्थांना देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधी व त्यांनी प्रत्यक्ष केलेला खर्च यात फारच मोठी तफावत आहे. महानगरपालिकांसाठी एकूण तूट रु.११९.४८ कोटीची असून त्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेचा वाटा ४३.५५% म्हणजे सर्वाधिक आहे. त्या खालोखाल नाशिक व पुणे या महानगरपालिकांचा क्रम लागतो. नगरपरिषदांची तूट रु. १३३.३४ कोटीची आहे व त्यातही अ वर्ग नगरपरिषदांचा वाटा फार मोठा आहे. महानगरपालिका व नगरपरिषदा मिळून एकूण तूट रु. २५२.८२ कोटीची असून त्यांना दरडोई रु. ८६ ची गरज आहे. सध्या शासनाकडून महानगरपालिका (मुंबई वगळून) व नगरपरिषदांना राज्य मोटार वाहन कराद्वारे गोळा होणाऱ्या निव्वळ रकमेतून १०% रक्कम लोकसंख्येच्या आधारावर वितरीत करण्यासाठी वेगळी काढली जाते. त्यानुसार १९९४-९५ या वर्षात नागरी संस्थांना रस्ता अनुदानापोटी केवळ रु. २४.९६ कोटी म्हणजेच दरडोई रु. १२.९० (मुंबई महानगरपालिका वगळून) प्राप्त झाले. ही रक्कम नागरी संस्थांना वर दर्शविलेल्या मागणीच्या तुलनेत फारच अल्प आहे. या संस्थांना आर्थिकदृष्ट्या मदत केल्याशिवाय रस्ते देखभाल व दुरुस्तीचे काम व्यवस्थितपणे होऊ शकणार नाही.

१२.१४. **इमारतींची देखभाल.**—ज्या नागरी संस्थांच्या अनेक इमारती आहेत. त्यांची देखभाल सध्या तरी व्यवस्थितपणे होत नाही. निधीची कमतरता तसेच भांडवली खर्चासाठी निधी उपलब्ध करून द्यावा लागत असल्यामुळे या देखभाल व दुरुस्तीच्या कामाकडे टाळाटाळ केली जाते. याबाबतचा सविस्तर उहापोह प्रकरण ८ मधील परि. ८.६२ व ८.६३ मध्ये केला आहे. सार्वजनिक व बांधकाम विभागाने या नागरी क्षेत्रातील निरनिराळ्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निकषाप्रमाणे किती खर्च येईल याची आकडेवारी दिली आहे. तसेच या संस्थांनी इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी १९९४-९५ मधील प्रत्यक्ष खर्च या बाबीवरील खर्चाच्या वार्षिक वाढीचा दर विचारात घेऊन १९९६-९७ चे खर्चाचे अंदाज काढले आहेत. निकषाप्रमाणे आवश्यक निधी व १९९६-९७ चे खर्चाचे अंदाज विचारात घेऊन त्यातील तफावत काढली असून त्याचा तपशील तक्ता क्र. १२.४ मध्ये दिला आहे. ज्या नागरी संस्थांचा १९९६-९७ चा अंदाजित खर्च निकषाप्रमाणे लागणाऱ्या निधीपेक्षा कमी आहे त्याचीच तूट विचारात घेतली आहे.

तक्ता क्र. १२.४

**नागरी क्षेत्रातील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारा निधी**

(रु. लाखांत)

| नगरपालिका वर्ग | इमारतींची संख्या | इमारतीचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | निकषाप्रमाणे आवश्यक निधी | १९९६-९७ मधील अपेक्षित खर्च | तूट |
|---|---|---|---|---|---|
| **महानगरपालिका** | | | | | |
| १. मुंबई .. | ६७४८ | २७१२३४२ | १३८३.३३ | १०४५.७८ | ३३७.५५ |
| २. ठाणे .. | २७१ | १४६२३२ | ७४.५९ | १९१.६२ | तूट नाही |
| ३. नवी मुंबई .. | .. | .. | .. | २०.२३ | तूट नाही |
| ४. कल्याण .. | ९६ | २४८०२ | १२.६४ | ३३.३३ | तूट नाही |
| ५. नाशिक .. | १५५ | १३२०४४ | ६७.३४ | ६९.१७ | तूट नाही |
| ६. पुणे .. | २१६ | २०७९५० | १०६.०५ | १२८.८० | तूट नाही |
| ७. पिंपरी-चिंचवड | १४० | १५४९१० | ७९.०१ | ७३.३५ | ५.६६ |
| ८. सोलापूर .. | १४२३ | ३७७९७१ | १९२.७७ | ६.७० | १८६.०७ |
| ९. कोल्हापूर .. | १८८ | ८९३०७ | ४५.५५ | ३१.१९ | १४.३६ |
| १०. औरंगाबाद .. | २५४ | ६६१६२ | ३३.७४ | ४९.३७ | तूट नाही |
| ११. अमरावती .. | ७४ | ४५२७१ | २३.०९ | २.८४ | २०.२५ |
| १२. नागपूर .. | १२२ | ४६४९७ | २३.७१ | ६.४५ | १७.२६ |
| एकूण .. | ९६८७ | ४००३४८८ | २०४१.८२ | १६५८.८३ | ५८१.१५ * |
| **नगरपरिषदा** | | | | | |
| अ-वर्ग .. | १९३३ | १०८५८५२ | ६५२.१० | ३७०.५७ | ३८५.९६ |
| ब-वर्ग .. | ३१३३ | ६४२३९२ | ३१८.७० | १३०.६९ | १८८.०१ |
| क-वर्ग .. | ४७४४ | ७५६६७३ | ३७५.४९ | २८७.८२ | ८७.६७ |
| एकूण (अ+ब+क) .. | ९८१० | २४८४९१७ | १३४६.२९ | ७८९.०८ | ५५७.२१ |
| एकूण (न. प.+म. न. पा.) .. | १९४९७ | ६४८८४०५ | ३३८८.११ | २४४७.९१ | ११३८.३६ |

* (फक्त तुट विचारात घेतली.)

१२.१५. वरील तक्त्यातील माहितीनुसार महानगरपालिका क्षेत्रांत देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या रकमेच्या ८१.२ टक्के रक्कम या संस्था खर्च करू शकत असल्या तरी काही महानगरपालिकांच्या खर्चातील तूट रु. ५.८१ कोटींची आहे. हेच प्रमाण सर्व नगरपरिषदांसाठी ५८.६ टक्के आहे. नगरपरिषदांचा वर्गनिहाय विचार केल्यास क वर्ग नगरपरिषदांनी निकषाच्या प्रमाणात ७६.६ टक्के खर्च केला तर सर्वात कमी खर्च ४१ टक्के ब वर्गाचा आहे. अ वर्ग नगरपरिषदा ५६.८ टक्के खर्च करतात. या बाबीवरील काही महानगरपालिकांचा खर्च मात्र निकषापेक्षाही जास्त असल्याचे दिसून आले आहे. उदा. ठाणे, कल्याण, नाशिक, पुणे व औरंगाबाद. एकूण सर्व नागरी संस्थाना या बाबीसाठी एकूण रु. ११.३८ कोटीची अतिरिक्त गरज असून त्यांत महानगरपालिकांचा वाटा रु. ५.८१ कोटीचा, तर नगरपरिषदांचा वाटा रु. ५.५७ कोटीचा आहे. इतर बाबींवरील आवश्यक खर्च सांभाळून वरील तूट भरून काढणे या संस्थांना कठीण आहे. **परंतु नागरी संस्थांच्या मालकीच्या संपत्तीची जपणूक व त्या व्यवस्थित ठेवण्याची नितांत गरज आहे व पुढील जबर नुकसान टाळण्याचे दृष्टीने या बाबीकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे झाले आहे.**

पाणीपुरवठा

१२.१६. पिण्याच्या पाण्याचा पुरवठ्याचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. त्याकडे दोन स्तरावरून बघता येईल. एक स्तर म्हणजे पिण्याच्या पाण्याचे स्रोत निर्माण करण्यासाठी, प्रक्रिया करण्याच्या व्यवस्थेसाठी व वितरणाची यंत्रणा यासाठी करावा लागणारा भांडवली खर्च हा आहे. भांडवली खर्चाची गरज ही योजनेच्या वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे लोकवर्गणी किंवा नगरपरिषदेचा वाटा, सहाय्यक अनुदान व कर्जे याद्वारे उभारली जाते.

१२.१७. नागरी संस्था वित्तीय संस्थांचे कर्जाची परतफेड नियमितपणे करीत नाहीत ही प्रमुख बाब आहे. काही वेळा वित्तीय संस्थांचे कर्जफेडीसाठी शासन महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाला नगरपरिषदांकडून वसूल करावयाच्या अटीवर काही निधी देत असते. परंतु मंडळाने वित्तीय संस्थांना परतफेड केलेली रक्कम आणि नगरपरिषदांकडून वसूल केलेली रक्कम यामध्ये नेहमीच तफावत असते. शिवाय वसुलीत बराच कालावधी जातो. यामुळे पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या आर्थिक व्यवहारात अडचणी निर्माण होतात. या अडचणीवर मात करण्यासाठी शासन स्थानिक संस्थांना अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या रकमांतून कर्जाचे हप्ते कापून घेते. त्यामुळे ज्या नागरी संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत त्यांच्या अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतो.

१२.१८. कर्जफेडीच्या रकमाशिवाय महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाची इतर देणीही नगरपरिषदांकडे आहेत. दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी असलेली कर्जाची स्थिती, त्याची परतफेड आाणि महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाचे देणे याबाबतची माहिती खालील तक्त्यात पाहता येईल.

तक्ता क्र. १२.५

**महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाला नागरी संस्थांकडून दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी येणे रकमा**

| अ.क्र. | बाब | रक्कम (रुपये कोटींमध्ये) |
|---|---|---|
| १ | पाण्याची विक्री | |
| | (अ) बिलाप्रमाणे .. .. .. | ७५.९२ |
| | (ब) विलंब झालेल्या देण्यावरील आकारणी .. .. .. | ३५.८२ |
| २ | देखभाल दुरुस्ती .. .. .. | २४.२३ |
| ३ | लोकवर्गणी .. .. .. | ५.६२ |

## तक्ता क्र. १२.५—चालू

| अ.क्र. | बाब | रक्कम (रुपये कोटींमध्ये) |
|---|---|---|
| ४ | पूर्ण अनामत रकमांच्या योजना .. .. .. | ०.२६ |
| ५ | इतर .. .. .. | ०.१४ |
| ६ | कर्ज .. .. .. | ५०.३३ |
| ७ | हमी शुल्क .. .. .. | १.१५ |
| ८ | मुद्रांक शुल्क .. .. .. | ०.१२ |
| | एकूण .. | १९३.५९ |

१२.१९. या प्रश्नाची दुसरी बाजू अशी आहे की, पाणीपुरवठ्याची योजना चालविण्यासाठी होणारा खर्च व पाणीपट्टीपासून मिळणारे उत्पन्न यामध्ये फार मोठी तफावत आहे.

१२.२०. मुंबई व पुणे महानगरपालिका व एखाददुसरी नगरपरिषद वगळता राज्यातील इतर सर्व नागरी संस्थांच्या पाणीपुरवठ्याच्या योजना तोट्यामध्ये चालतात. या ठिकाणी तोटा याचा अर्थ योजना चालविणे. तिची देखभाल करणे याचा खर्च व तिच्या व्यवस्थापनाचा खर्च इ. या संस्थांना पाणीपट्टीमधून मिळणाऱ्या उत्पन्नातून भागविता येत नाही, असा आहे. थोडक्यात शहरी लोकांना सवलतीच्या पाणीपट्टी दराने पाणीपुरवठा केला जातो. याचाच अर्थ असा की, पाण्याचा खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण महसुलातून निधी वळविला जातो आणि / किंवा इतर संस्थांची देणी वेळेवर न देता थकविली जातात. पाणीपुरवठा योजना राबविताना इतर संस्थांची जी थकबाकी आहे त्यात महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याही थकबाकीचा समावेश आहे.

१२.२१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून केलेल्या पाणीपुरवठ्यासाठी नागरी संस्थांना फार मोठ्या रकमा देय आहेत. त्याची आकडेवारी खाली दिली आहे.

## तक्ता क्र. १२.६

**दिनांक ३१ मार्च १९९६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देय असलेल्या रकमा**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | स्थानिक संस्थांचे नाव | पाणीपट्टी | देणी उशीरा दिल्यामुळे केलेली आकारणी | दंडनीय रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका .. | ६३३.११ | ५४३.९१ | ४३०.०९ | १६०७.११ |
| २ | औरंगाबाद महानगरपालिका .. | ५.८६ | १.२३ | .. | ७.०९ |
| ३ | नवी मुंबई महानगरपालिका .. | १०३.१६ | ३९८.९९ | ३२६.१३ | ८२८.२८ |
| ४ | कल्याण महानगरपालिका .. | ८७५.३४ | १२७.९४ | ७४.४३ | १०७७.७१ |
| | सर्व महानगरपालिका .. | १६१७.४७ | १०७२.०७ | ८३०.६५ | ३५२०.१९ |
| | नगरपरिषदा .. | १९०१.४६ | २४३.१० | ४.२३ | २१४८.७९ |
| | एकूण .. | ३५१८.९३ | १३१५.१७ | ८३४.८८ | ५६६८.९८ |

* (उल्हासनगरला महानगरपालिका म्हणून जाहीर केले आहे. परंतु वरील माहितीत तिचा समावेश नगरपरिषदांमध्ये केला आहे.)

महानगरपालिका व नगरपरिषदांच्या गरजांचे निर्धारण करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे वरील दायित्व लक्षात घेतले आहे.

### आरोग्य व स्वच्छता

१२.२२. याबाबत प्रकरण ८ च्या परिच्छेद ८.४३ ते ८.४६ मध्ये चर्चा केलेली आहे. या बाबींसाठींच्या गरजांचे निर्धारण भांडवली खर्चाच्या गरजांमध्ये किंवा महसुली खर्चातील सर्वसाधारण वाढ यामध्ये विचारांत घेतली आहे.

### गटारे, जलनिःसारण व स्वच्छता

१२.२३. काही मोठे नागरी भाग वगळता गटारे व जलनिःसारण हे दुर्लक्षित असे कार्य आहे. बहुतेक सर्व नगरपरिषदांच्या क्षेत्रात गटारे उघडी आहेत, जलनिःसारणाच्या सोयी असल्यास त्या फारच अल्प आहेत. केरकचऱ्याची विल्हेवाट लावली जाते, परंतु त्यात सुधारणा करण्यास बराच वाव आहे. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाची पद्धती फारशी समाधानकारक नाही. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने नगरविकास विभागाच्या विनंतीवरून राज्यातील २५ नगरपरिषदांचा अभ्यास केला होता. या अभ्यासाचा एक भाग घनकचरा व्यवस्थापन, गटारे, जलनिःसारण व स्वच्छता याबाबत होता. या अभ्यासावरून केरकचरा काढण्याची सोय ज्या प्रमाणात असायला पाहिजे त्याच्यापेक्षा कमीच आहे. या बाबींसाठींचे गरजांचे निर्धारण महसुली तसेच भांडवली खर्चाच्या निर्धारणातील वाढीमध्ये विचारात घेतले आहे.

### झोपडपट्टी सुधारणा

१२.२४. झोपडपट्टी सुधारणेबाबतच्या निरनिराळ्या प्रश्नांचा उहापोह प्रकरण ८ मधील परिच्छेद ८.५४ ते ८.५७ मध्ये केला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये आवश्यक त्या मुलभूत नागरी सेवा सुविधांची तरतूद करणे हा या प्रश्नाचा एक भाग आहे याची येथे दखल घेण्यात आली आहे. सेवासुविधा पुरविण्यासाठी केलेल्या भांडवली खर्चाची प्रतिपूर्ती काही प्रमाणात शासनाकडून करण्यात येत असली तरी या संस्था त्यापेक्षा कितीतरी अधिक खर्च त्यावर करीत असतात. (तक्ता क्र. ८.५ पहावा) त्यातील तफावत गरजांच्या निर्धारणात विचारात घेतली आहे. दुसरे असे की, नागरी संस्थांनी या सेवा सुविधांबाबत काही सेवाशुल्क आकारले आहेत. परंतु त्याच्या वसुलीबाबत अडचणी असून त्याची फार मोठी थकबाकी आहे. या क्षेत्रामध्ये नागरी संस्थांनी अधिक चांगले कार्य करण्याची गरज आहे.

### शिक्षण

१२.२५. नागरी संस्थांची शैक्षणिक जबाबदारी विशेषतः प्राथमिक शिक्षणाबाबत फार मोठी आहे. शाळांच्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठीचा खर्च हा एक गरजेचा भाग असून, शिक्षणाबाबतच्या गरजांचा विचार महसुली तसेच भांडवली खर्चाच्या अंदाजांत लक्षात घेतला आहे.

### भांडवली गरजा

१२.२६. नागरी संस्था त्यांच्या भांडवली खर्चासाठी लागणाऱ्या निधीची गरज त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन भागवितात. शासनाकडून काही विशिष्ट प्रयोजनासाठी अनुदाने उपलब्ध केली जातात. केंद्र पुरस्कृत योजना व इतर योजनांतर्गत कार्यक्रमांसाठी काही प्रमाणात निधी उपलब्ध होत असतो. आयोगाने पुढील पाच वर्षातील खर्चाच्या अंदाजाबाबतची माहिती महानगरपालिकांकडून गोळा केली आहे तर नगरपरिषदांसाठी ती १९९०-९१ ते १९९४-९५ या वर्षांच्या भांडवली खर्चातील वार्षिक वाढीचे दर लक्षात घेऊन निश्चित केली आहे. ती माहिती खालील तक्ता क्र. १२.७ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. १२.७

## महानगरपालिका व नगरपरिषदांचे महसुली व भांडवली खर्चाचे अंदाज

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | नागरी संस्था | बाब | १९९४-९५ चा प्रत्यक्ष खर्च | खर्चाचे अंदाज | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मुंबई | महसुली | १,५२,१२७ | १,७३,७९० | १,९९,२८२ | २,२४,९०६ | २,५७,१०२ | २,९२,४८७ | ३,३४,१११ |
| | | भांडवली | ३४,५४१ | ४७,७६८ | ७७,९५५ | १,०९,१८१ | १,२८,३५६ | १,२२,०८१ | १,०१,६०७ |
| २ | ठाणे | महसुली | ८,९७७ | १०,६६६ | १२,९१२ | १५,४५४ | १८,५०१ | २२,१६० | २६,१५६ |
| | | भांडवली | ३,५६२ | ३,६१६ | ४,४२२ | ५,०५८ | ५,७८५ | ६,६१९ | ७,५७४ |
| ३ | नवी मुंबई | महसुली | ६६१ | ७५१ | ३,४४७ | ४,२९८ | ५,०३५ | ६,४४५ | ७,२४७ |
| | | भांडवली | ५६९ | ६१७ | २,०७५ | २,६६२ | ३,१०० | ३,२४९ | ३,४२० |
| ४ | कल्याण | महसुली | ४,३३४ | ६,१७१ | ९,०८९ | १०,६१२ | १२,३२५ | १३,९९८ | १५,८३२ |
| | | भांडवली | ३,५४८ | ३,८०५ | ५,४२६ | ७,८०० | ८,५४९ | ९,४३३ | १०,२१७ |
| ५ | नाशिक | महसुली | ५,३८२ | ५,७१४ | ६,९५८ | ८,००२ | ९,२०० | १०,५८२ | १२,१६९ |
| | | भांडवली | २,८२२ | ४,७२५ | १२,९०० | १२,७६८ | १३,६८८ | १४,५९३ | १५,४५५ |
| ६ | पुणे | महसुली | १३,८९२ | १६,५२९ | १९,६६६ | २१,९०० | २४,४४४ | २७,२७१ | ३०,४३८ |
| | | भांडवली | ३,२८९ | ६,९०० | ११,३३३ | ८,४०० | १७,२०० | २१,३०० | १९,६०० |
| ७ | पिंपरी-चिंचवड | महसुली | ७,०७७ | ५,६४१ | ८,७५४ | ६,७६८ | ७,४४५ | ८,१९१ | ९,०१० |
| | | भांडवली | २,४९८ | २,९४५ | १६,५०८ | ९,६३९ | १०,४८८ | ११,५०४ | ११,०२६ |
| ८ | सोलापूर | महसुली | ४,२४६ | ४,४१८ | ५,५७२ | ६,४५८ | ७,६४७ | ९,१०७ | १०,५५१ |
| | | भांडवली | ४१२ | ४२३ | ५५८ | ७१३ | ८४१ | ९६१ | १,३४५ |
| ९ | कोल्हापूर | महसुली | ३,९५१ | ४,४३८ | ४,७५८ | ५,५१२ | ६,५४४ | ७,६९७ | ९,५०३ |
| | | भांडवली | ४६३ | ५३५ | २,३०७ | ३,५६५ | ३,६३८ | ३,६०५ | २,७७४ |
| १० | औरंगाबाद | महसुली | २,९६५ | ४,९५७ | ५,७१३ | ६,६९६ | ७,७०० | ८,८४९ | १०,१६३ |
| | | भांडवली | १,२८३ | १,७७२ | २,०३७ | २,३४२ | २,६९५ | ३,०९९ | ३,५६४ |
| ११ | अमरावती | महसुली | १,६४९ | १,८११ | २,२५१ | २,५३७ | २,८५६ | ३,२२२ | ३,६४३ |
| | | भांडवली | ९०४ | ३१२ | ३,१२५ | ३,३९७ | ३,५८६ | ३,८८५ | ४,०८९ |
| १२ | नागपूर | महसुली | ८,४४६ | ९,००८ | १०,३२१ | ११,८५६ | १३,६२१ | १५,६४३ | १८,०८७ |
| | | भांडवली | २,७६५ | ४,०५३ | ५,१८५ | ५,६२९ | ५,९४९ | ६,९८६ | ७,२९४ |
| | एकूण | महसुली | २,१३,७०७ | २,४३,८९४ | २,८८,७२३ | ३,२५,०९९ | ३,७२,४२१ | ४,२५,६५२ | ४,८७,७१० |
| | | भांडवली | ५६,६५६ | ७७,४७१ | १,४३,८३१ | १,७१,१५४ | २,०३,८७५ | २,०७,३१५ | १,८७,९६५ |
| | | एकूण | २,७०,३६३ | ३,२१,३६५ | ४,३२,५५४ | ४,९६,२५३ | ५,७६,२९६ | ६,३२,९६७ | ६,७५,६७५ |

तक्ता क्र. १२.७—चालू

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक (१) | नागरी संस्था (२) | बाब (३) | १९९४-९५ चा प्रत्यक्ष खर्च (४) | खर्चाचे अंदाज | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १९९५-९६ (५) | १९९६-९७ (६) | १९९७-९८ (७) | १९९८-९९ (८) | १९९९-२००० (९) | २०००-२००१ (१०) |
| | अ-वर्ग नगरपरिषदा | महसुली | २३,४५६ | २६,९३० | ३०,९१८ | ३५,४९७ | ४०,७५४ | ४६,७४९ | ५३,७१९ |
| | | भांडवली | ५,५४१ | ६,५४० | ७,५८४ | ८,७९४ | १०,१९६ | ११,८२३ | १३,७०९ |
| | ब-वर्ग नगरपरिषदा | महसुली | ११,९४७ | १३,३६६ | १४,९५२ | १६,७२७ | १८,७१३ | २०,९३४ | २३,४१९ |
| | | भांडवली | ३,२२७ | ४,२३५ | ५,२३४ | ६,४६८ | ७,९९४ | ९,८७८ | १२,२०८ |
| | क-वर्ग नगरपरिषदा | महसुली | ११,३४५ | १२,७३८ | १४,३०२ | १६,०५८ | १८,०२९ | २०,२४२ | २२,७२७ |
| | | भांडवली | २,३६६ | २,६०२ | २,८७४ | ३,१७३ | ३,५०४ | ३,८७० | ४,२७४ |
| | सर्व नगरपरिषदा | महसुली | ४६,७४८ | ५३,०३४ | ६०,१७२ | ६८,२८२ | ७७,४९६ | ८७,९२५ | ९९,८६५ |
| | | भांडवली | ११,१३४ | १३,३७७ | १५,६९२ | १८,४३५ | २१,६९४ | २५,५७१ | ३०,१९१ |
| | | एकूण | ५७,८८२ | ६६,४११ | ७५,८६४ | ८६,७१७ | ९९,१९० | १,१३,४९६ | १,३०,०५६ |
| | सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा | महसुली | २,६०,४५५ | २,९६,९२८ | ३,४८,८९५ | ३,९३,३८१ | ४,४९,९१७ | ५,१३,५७७ | ५,८७,५७५ |
| | | भांडवली | ६७,७९० | ९०,८४८ | १,५९,५२३ | १,८९,५८९ | २,२५,५६९ | २,३२,८८६ | २,१८,१५६ |
| | | एकूण | ३,२८,२४५ | ३,८७,७७६ | ५,०८,४१८ | ५,८२,९७० | ६,७५,४८६ | ७,४६,४६३ | ८,०५,७३१ |

आधार.—(१) महानगरपालिकांच्या महसुली व भांडवली खर्चाचे अंदाज संबंधित महानगरपालिकांनी दिलेल्या अंदाजावर आधारित आहेत.

(२) नगरपरिषदांसाठीचे खर्चाचे अंदाज या संस्थांच्या १९९०-९१ ते १९९४-९५ या वर्षातील महसूली तसेच भांडवली खर्चाच्या वाढीच्या दरावर आधारित आहेत.

## महसूली व भांडवली खर्च

१२.२७. महसूली तसेच भांडवली निधीच्या गरजांचे अंदाज महानगरपालिकांनी स्वतः काढले आहेत. बऱ्याच प्रकरणी आयोगाला महानगरपालिकांच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्याचा योग आला. नागरी संस्थांची ही गरज खर्चाच्या बाजूला विचारात घेतली असून ही गरज भागविण्यासाठी या संस्थांना उत्पन्नाच्या साधनसंपत्तीपासूनचे उत्पन्न वाढवावे लागेल असे गृहीत धरले आहे. नगरपरिषदांच्या बाबतीत महसुली तसेच भांडवली खर्चाचे अंदाज त्या त्या खर्चाच्या ऐतिहासिक वार्षिक वाढीचा दर विचारांत घेऊन काढले आहेत.

१२.२८. **कर्ज परतफेड.**—नागरी संस्थांना त्यांच्या विविध भांडवली योजनांसाठी वित्तीय संस्थांकडून कर्जे घ्यावी लागतात. यापैकी बहुतेक कर्जे पाणीपुरवठा व मलनिःसारणाच्या योजनांसाठी घेतली जातात. काही नागरी संस्थांनी इतर प्रयोजनासाठीही कर्जे घेतली आहेत. व्यापारी संकुल बांधणीसाठी कर्ज हे त्यापैकी एक आहे. पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनांसाठी घेतलेल्या कर्जाचे संनियंत्रण महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून केले जाते. कारण बहुतेक प्रकरणी हे मंडळ योजनांचे कार्यान्वयन करणारी संस्था आहे. आयोगाने गोळा केलेली



५ ४०९४-१४३

महानगरपालिका व नगरपरिषदांच्या कर्जाच्या दायित्वाची माहिती प्रकरण ५ मधील अनुक्रमे तक्ता क्र. ५.२५ व ५.४७ मध्ये दिली आहे. याच प्रकरणाच्या तक्ता क्र. ५.२६ व ५.४८ मध्ये महानगरपालिका व नगरपरिषदांच्या कर्जाच्या परतफेडीचा तपशील दिला आहे. महानगरपालिकांच्या बाबतीत कर्जफेडीची स्थिती चांगली आहे. तर नगरपरिषदांच्या बाबतीत मात्र ती फार वाईट आहे. बऱ्याच वेळा त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे तर बरेचदा वाईट वित्तीय व्यवस्थापनामुळेही थकबाकी राहते. दिनांक ३१ मार्च १९९५ अखेर नगरपरिषदांची तक्ता क्र. ५.२६ व ५.४८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण कर्जाची थकबाकी रु. ८३.३५ कोटी होती. परंतु गरजांच्या निर्धारणांत याचा वेगळा समावेश केला नाही. परंतु खर्च व उत्पन्नातील तफावत काढण्यासाठी महाराष्ट्र पाणीपुरवठा मंडळाचे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कर्जाचे दायित्व खर्चाच्या बाजूला विचारात घेतले आहे.

१२.२९. **इतर संस्थांची देणी.**—पाणीपुरवठ्यासंबंधी चर्चा करताना महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची देणी विचारात घेतली आहेत. रस्त्यांवरील दिवाबत्ती व पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या विजेपोटी या संस्था महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे मोठे देणे लागतात. तथापि, वारंवार प्रयत्न करूनही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या देण्याबाबतची विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून दिली नाही. आयोगाकडे आलेली माहिती ग्रामीण व नागरी या दोन्ही संस्थांची माहिती एकत्रित असल्याने आणि मंडळ ती वेगळी करून देऊ न शकल्याने तसेच ही माहिती उपयोगाची न वाटल्यामुळे ती खर्चाच्या/गरजांच्या निर्धारणामध्ये विचारात घेतली नाही.

१२.३०. परिच्छेद क्र. १२.१२ व १२.१४ मधील रस्ते, इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीवरील खर्च त्याचबरोबर परिच्छेद क्र. १२.२४ मधील झोपडपट्टी सुधारणेसाठी जो खर्च विचारात घेतला आहे, त्या खर्चाचे १९९६-९७ ते २०००-२००१ पर्यंतचे अंदाज त्यात सर्वसाधारणपणे ७ टक्के वाढ होईल असे गृहीत धरून काढले आहेत. महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे दायित्वाबाबतची माहिती, त्या संस्था विलंबापोटी आकारलेला दंड कमी करतील या गृहीतावर, ही माहिती महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी वर्गनिहाय उपलब्ध नसल्याने, एकत्रितपणे तक्त्याचे शेवटी दाखवून त्याचेही अंदाज तक्ता क्र. १२.८, १२.९ व १२.१२ मध्ये काढले आहेत.

तक्ता क्र. १२.८

**अतिरिक्त गरजांचे निर्धारण**

(रुपये कोटीत)

| महानगरपालिका/ नगरपारिषदा वर्ग (१) | १९९५-९६ (२) | १९९६-९७ (३) | १९९७-९८ (४) | १९९८-९९ (५) | १९९९-२००० (६) | २०००-२००१ (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका– | | | | | | |
| रस्ते .. .. | ... | ११९.४८ | १२७.८४ | १३६.७९ | १४६.३७ | १५६.६१ |
| इमारती .. .. | ... | ५.८१ | ६.२२ | ६.६५ | ७.१२ | ७.६२ |
| गलिच्छवस्ती .. .. | ६.२९ | ६.७३ | ७.२० | ७.७१ | ८.२५ | ८.८२ |
| एकूण .. | ६.२९ | १३२.०२ | १४१.२६ | १५१.१५ | १६१.७३ | १७३.०५ |

(रुपये कोटीत)

| महानगरपालिका/ नगरपारिषदा वर्ग | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| नगरपरिषदा— | | | | | | |
| अ-वर्ग—रस्ते | ... | ५७.२९ | ६१.३० | ६५.५९ | ७०.१८ | ७५.१० |
| इमारती | ... | ३.८६ | ४.१३ | ४.४२ | ४.७३ | ५.०६ |
| गलिच्छवस्ती | ३.१५ | ३.३७ | ३.६० | ३.८५ | ४.१२ | ४.४१ |
| एकूण | ३.१५ | ६४.५२ | ६९.०३ | ७३.८६ | ७९.०३ | ८४.५७ |
| ब-वर्ग—रस्ते | ... | ३९.८९ | ४२.६८ | ४५.६७ | ४८.८७ | ५२.२९ |
| इमारती | ... | १.८८ | २.०१ | २.१५ | २.३० | २.४६ |
| गलिच्छवस्ती | १.१८ | १.२६ | १.३५ | १.४४ | १.५४ | १.६५ |
| एकूण | १.१८ | ४३.०३ | ४६.०४ | ४९.२६ | ५२.७१ | ५६.४० |
| क-वर्ग—रस्ते | ... | ३६.१४ | ३८.६७ | ४१.३८ | ४४.२७ | ४७.३७ |
| इमारती | ... | ०.८८ | ०.९४ | १.०१ | १.०८ | १.१५ |
| गलिच्छवस्ती | ०.९८ | १.०५ | १.१३ | १.२१ | १.२९ | १.३८ |
| एकूण | ०.९८ | ३८.०७ | ४०.७४ | ४३.५९ | ४६.६४ | ४९.९१ |
| एकूण नगरपरिषदा— | | | | | | |
| रस्ते | ... | १३३.३२ | १४२.६५ | १५२.७४ | १६३.३२ | १७४.७६ |
| इमारती | ... | ६.६२ | ७.०८ | ७.५८ | ८.११ | ८.६८ |
| गलिच्छवस्ती | ५.३१ | ५.६८ | ६.०८ | ६.५० | ६.९६ | ७.४४ |
| एकूण | ५.३१ | १४५.६२ | १५५.८१ | १६६.७२ | १७८.३९ | १९०.८८ |
| एकूण महानगरपालिका व नगरपरिषदा— | | | | | | |
| रस्ते | ... | २५२.८० | २७०.५० | २८९.४३ | ३०९.६९ | ३३१.३७ |
| इमारती | ... | १२.४३ | १३.३० | १४.२३ | १५.२३ | १६.२९ |
| गलिच्छवस्ती | ११.६० | १२.४१ | १३.२८ | १४.२१ | १५.२० | १६.२७ |
| एकूण | ११.६० | २७७.६४ | २९७.०८ | ३१७.८७ | ३४०.१२ | ३६३.९३ |
| इतर दायित्वे— | | | | | | |
| महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाचे दायित्व. | ... | ... | ३९.५० | ३९.५० | ३९.५० | २९.२७ |
| महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ... | ... | ९.०० | ९.०० | ९.०० | ८.१५ |
| एकूण | ११.६० | २७७.६४ | ३४५.५८ | ३६६.३७ | ३८८.६२ | ४११.३५ |

१२.३१. महसुली व भांडवली खर्चाचे तक्ता क्र. १२.७ मध्ये केलेले निर्धारण व तक्ता क्र. १२.८ मध्ये रस्ते इमारती इत्यादीबाबतचे केलेले निर्धारण एकत्रितपणे विचारात घेतल्यास या नागरी संस्थांच्या एकूण खर्चाचे निर्धारण खालील तक्ता क्र. १२.९ मध्ये दाखविल्याप्रमाणे आहे.

तक्ता क्र. १२.९

## नागरी संस्थांच्या महसुली/भांडवली व इतर दायित्वे यावरील एकूण खर्चाचे १९९५-९६ ते २०००-२००१ पर्यंतचे निर्धारण

(रुपये कोटीत)

| महानगरपालिका/ नगरपरिषदा वर्ग | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| महानगरपालिका .. .. | ३,२१९.९४ | ४,४५७.५६ | ५,१०३.७९ | ५,९१४.११ | ६,४९१.४० | ६,९२९.८० |
| नगरपरिषदा— | | | | | | |
| अ-वर्ग .. .. | ३३७.८५ | ४४९.६१ | ५११.९४ | ५८३.३६ | ६६५.१५ | ७५८.८५ |
| ब-वर्ग .. .. | १७७.१९ | २४४.८९ | २७७.९९ | ३१६.३३ | ३६०.८३ | ४१२.६७ |
| क-वर्ग .. .. | १५४.३८ | २०९.८३ | २३३.०५ | २५८.९२ | २८७.७६ | ३१९.९१ |
| एकूण नगरपरिषदा .. | ६६९.४२ | ९०४.३३ | १,०२२.९८ | १,१५८.६१ | १,३१३.७४ | १,४९१.४३ |
| एकूण महानगरपालिका व नगरपरिषदा.. | ३,८८९.३६ | ५,३६१.८९ | ६,१२६.७७ | ७,०७२.७२ | ७,८०५.१४ | ८,४२१.२३ |
| अधिक महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाचे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे दायित्व. | ... | .. | ४८.५० | ४८.५० | ४८.५० | ४७.४२ |
| एकूण खर्चाचे निर्धारण .. | ३,८८९.३६ | ५,३६१.८९ | ६,१७५.२७ | ७,१२१.२२ | ७,८५३.६४ | ८,४६८.६५ |

भाग २

# साधनसंपत्तीचे निर्धारण

१२.३२. नागरी संस्थांच्या वित्तीय बाबींचा विचार करता त्यांच्यात स्वतःच्या साधनांद्वारे उत्पन्न वाढविण्याची क्षमता आहे असे येथे गृहीत धरले आहे. तसेच या संस्थांच्या महसुली उत्पन्नातून काही निधी भांडवली खर्चासाठी उपलब्ध असेल असेही एक गृहीत आहे. भांडवली खर्चासाठी आवश्यक असलेल्या निधीची तूट योजनांतर्गत तरतुदीमधून, कर्ज उभारून आणि शासनाकडून मदत घेऊन भरून काढली पाहिजे. महसुली खर्चाच्याबाबत शासनाने शक्य होईल तेवढे अनुदान व शासकीय करातील हिस्सा देऊन त्यांना मदत केली पाहिजे. या नागरी संस्थांची आर्थिक स्थिती सुदृढ व्हावी या दृष्टिकोनातून शासनाने या संस्थांना शासन करातील वाटा व अनुदानाचे स्वरूपात मदत करण्यासाठी महत्त्वाची व पूरक अशी भूमिका बजावावी असे आयोगाला वाटते. त्याचबरोबर या संस्थांना स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने आवश्यक त्या तरतुदी कायद्यात करून त्यांना मदत केली पाहिजे.

१२.३३. अशा प्रकारे ढोबळ मानाने मूलभूत निकष ठरविल्यानंतर नागरी संस्थांच्या स्वतःच्या साधनसंपत्तीचे निर्धारण करण्यात येत आहे.

१२.३४. आयोगाने अर्थ व सांख्यिकी संचालनालयाला, राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या उत्पन्न वाढीचा दीर्घकालीन दरांचा कल काढण्यास सांगितले होते. हे वाढीचे कल सन १९८३-८४ ते १९९३-९४ हा कालावधी विचारात घेऊन काढण्यात आले. या कालावधीमध्ये महानगरपालिकांचे स्वतःचे उत्पन्न दरवर्षी १७.६२ टक्के या दराने वाढल्याचे आढळून आले. स्वतःच्या उत्पन्नातील विविध घटकांचा वाढीचा दर खालीलप्रमाणे होता.

| | | |
|---|---|---|
| (१) | जकात .. .. .. .. | १६.२० टक्के |
| (२) | जमीन व मालमत्तांवरील कर .. .. .. | १७.२८ टक्के |
| (३) | नागरी संस्थांच्या मालमत्ता पासूनचे उत्पन्न .. | २३.८८ टक्के |
| (४) | वाणिज्यिक आस्थापनेपासून उत्पन्न .. .. | २४.७८ टक्के |
| (५) | इतर .. .. .. .. | २४.०० टक्के |
| | एकूण .. | १७.६२ टक्के |

सन १९७०-७१ ते १९९५-९६ या कालावधीमध्ये राज्याचा महसुली उत्पन्न वाढीचा दर १५.४० टक्के होता. त्याचेशी नागरी संस्थांच्या उत्पन्न वाढीचे दर तुलनात्मक दृष्ट्या चांगले आहेत.

१२.३५ नगरपरिषदांबाबत म्हणावयाचे झाल्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आकडेवारीवरून तीनही वर्गातील नगरपरिषदांचे एकत्रित स्वतःचे उत्पन्न १३.८८ टक्के या दराने वाढले आहे. या वाढीच्या दरामध्ये जकात, मालमत्ता कर, नागरी संस्थांच्या मालमत्तेपासूनचे उत्पन्न व इतर उत्पन्न याच्या उत्पन्नाच्या वाढीचे दर अनुक्रमे १७.०९ टक्के, २९.३६ टक्के, १४.३५ टक्के व १४.७९ टक्के होते. वरील दर हे नगरविकास विभागाने परिच्छेद क्रमांक १२.७ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यातील दरापेक्षा " अ " वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत जास्त आहेत. तर " ब " वर्ग नगरपरिषदांच्याबाबत कमी आहेत. " क " वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत मात्र हे दर सारखेच आहेत.

१२.३६. आयोगाने संकलित केलेल्या माहितीवरून स्वतःच्या उत्पन्न वाढीचे वार्षिक दर खालीलप्रमाणे आहेत (संदर्भ तक्ता क्र. ५.१० व ५.३१) :—

| | | |
|---|---|---|
| (१) | महानगरपालिका .. .. .. .. | १७.०७ टक्के |
| (२) | ' अ ' वर्ग नगरपारिषदा .. .. .. | १८.७५ टक्के |
| (३) | ' ब ' वर्ग नगरपरिषदा .. .. .. .. | २०.७५ टक्के |
| (४) | ' क ' वर्ग नगरपरिषदा .. .. .. | १७.४० टक्के |
| (५) | एकूण वाढीचा दर (एकूण म.न.पा. व न. प. धरून) .. | १७.३६ टक्के |

१२.३७. आयोगाने काढलेले उत्पन्न वाढीचे दर सन १९९०-९१ ते १९९४-९५ या कालावधीवर आधारित असून, ते उपरोल्लिखित अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने काढलेल्या वाढीच्या दरापेक्षा जास्त आहेत. आकडेवारीच्या विश्लेषणासाठी जो कालावधी आयोगापुढे होता. त्या कालावधीमध्ये नागरी संस्थांच्या वित्तीय स्थितीत काही महत्त्वाच्या घडामोडी झाल्याचे दिसून आले. प्रथम असे की, नागरी संस्था मालमत्ता कराचे पुनर्निर्धारण करण्यासाठी नियमित व योग्य त्याप्रमाणे मालमत्तांचे मूल्यांकन करीत नव्हत्या. त्यामुळे शासनाने हे काम नगररचना संचालनालयाकडे सोपविले. ह्या कामाला सन १९९३-९४ व १९९४-९५ मध्ये गती मिळाली व ते अद्यापही प्रगतीपथावर आहे. फेरमूल्यांकनानंतर काही नगरपरिषदांना मालमत्ता करापोटी फार मोठ्या रकमा मिळणे अपेक्षित होते. परंतु फेरमूल्यांकनाबाबत काही वाद निर्माण झाल्याने प्रकरणे कोर्टात दाखल झाली. परंतु ज्या ठिकाणी फेरमूल्यांकनानुसार कर आकारणी करून वसुली करण्यात आली तेथील मालमत्ता कराच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली. दुसरी बाब अशी की, बऱ्याच नगरपरिषदांनी जकातीच्या वसुलीचे काम खाजगी संस्थांकडे सोपविले. सुरुवातीला यामुळे जकातीच्या उत्पन्नात चांगली वाढ झाली, परंतु नंतर मात्र सुरुवातीचा जोम व वाढ दिसून आली नाही, तिसरी बाब म्हणजे, उत्पन्नात वाढ करण्याची नगरपरिषदांमध्ये जाग निर्माण झाली. तथापि, ही उत्पन्नातील वाढ सर्वच बाबींच्या संदर्भात नव्हती तर, निवडक बाबींपुरतीच मर्यादित होती. पाणीपुरवठ्याचे दर आणि इतर शुल्क/आकार यांचे बाबतीत अद्यापही बरीच सुधारणा करण्यास वाव आहे.

१२.३८. जकात वसुलीचे खाजगीकरण व नागरी मालमत्तांचे फेरमूल्यांकन यामुळे जर भविष्यात अपेक्षित असे उत्पन्न मिळाले नाही तर मागील पाच वर्षांच्या अल्प कालावधीसाठी आढळलेला वाढीचा कल पुढे तसाच राहील असे सांगता येणार नाही असे आयोगाला वाटते. या संदर्भात विचारांती आयोगाचे असे मत आहे की, महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी सन १९९६-९७ ते २०००-२००१ या वर्षांमध्ये स्वतःच्या उत्पन्नातील वार्षिक वाढीचा दर परिच्छेद १२.४७ येथे नमूद केल्याप्रमाणे राखल्यास ते त्यांच्या उत्तम कामांचे एक मूल्यमापन असेल.

१२.३९. नगरपरिषदांच्या कामाचे मूल्यमापन करताना ज्या नागरी संस्थांनी उत्पन्न वाढीसाठी भरीव प्रयत्न केलेले नाहीत त्यांची काही उदाहरणे आयोगाच्या निदर्शनास आली असून त्यांनी याबाबत अधिक प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे. उदा. ' अ ' वर्ग नगरपषिदांमध्ये अहमदनगर व जालना नगरपरिषदा. सन १९९३-९४ मध्ये त्यांच्या मालमत्ता कराचा दर २२ टक्के होता (या वर्गासाठी सन १९९४ मध्ये सुधारित केलेला किमान व कमाल दर २३-२८ टक्के आहे.) अहमदनगर व जालना नगरपरिषदांच्या जकातीच्या उत्पन्नाचा वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे ८.५४ टक्के व १३.४१ टक्के दिसून आला. तो " अ " वर्ग नगरपरिषदांसाठीच्या १९.५६ टक्के या दराच्या तुलनेत बराच कमी होता. " ब " वर्ग नगरपरिषदांमध्ये मालमत्ता कराचा प्रत्यक्ष दर किमान दराच्या जवळ असणाऱ्या नगरपरिषदांमध्ये खोपोली, अमळनेर, पाचोरा, बार्शी, हिंगोली, परळी-वैजनाथ, उदगीर, वाशिम व आर्वी यांचा समावेश आहे. (' ब ' वर्ग नगरपरिषदांचे सन १९९४ मध्ये सुधारित केलेले दर २२-२७ टक्के आहेत) ह्या सर्व नगरपरिषदा मालमत्ता करांची आकारणी २३ टक्केप्रमाणे करतात. " क " वर्ग नगरपरषदांमध्ये कर्जत नगरपरिषद ही अद्यापही २० टक्के दराने मालमत्ता कर आकारते, पण ती नव्याने निर्माण झालेली नगरपरिषद आहे. मालमत्ता कराचा दर २२ टक्के च्या जवळपास असलेल्या इतर नगरपरिषदमध्ये शिरूर, बिलोली, मुदखेड, जळगांव-जामोद, नांदुरा, सिंदखेडा राजा, उमरखेड व नरखेड यांचा समावेश आहे (' क ' वर्ग नगरपरिषदांच सुधारित दर २१-२६ टक्के आहे). ह्यापैकी काही नगरपरिषदांचा

जकातीच्या उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचा दर १० टक्के पेक्षाही कमी दिसून आला आहे. 'ब' वर्ग आणि 'क' वर्ग नगरपरिषदांच्या जकातीच्या उत्पन्नाचा वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे २०.४६ टक्के आणि १८.२६ टक्के असल्याचे आयोगाला आढळले आहे.

१२.४०. **आयोगाची अशी शिफारस आहे की, महानगरपालिका/नगरपरिषदांच्या वित्तीय व्यवस्थापनात आढळून आलेल्या उणीवांबाबत शासन/नगरपालिका प्रशासन संचालनालयाला आपले मत/अभिप्राय या संस्थांना कळविता यावेत व नागरी संस्थांनी त्याबाबत विहित मुदतीत ते मत/अभिप्राय त्यांच्या सर्वसाधारण सभेपुढे मांडावेत आणि ह्या उणिवा दूर करण्याबाबत केलेली उपाययोजना कळवावी. याबाबत योग्य ती तरतूद कायद्यात करण्यात यावी.** नगरपरिषदांची कार्ये व आर्थिक बाबींच्या संदर्भात शासन व नागरी संस्था यांच्यात नियमितपणे व मोकळेपणाने संवाद साधता येण्यास वाव आहे, कारण शेवटी नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे हे दोघांचेही उद्दिष्ट आहे, असे आयोगाला वाटते.

आता उत्पन्नाच्या काही ठराविक बाबींचा विचार करू या—

## १. मालमत्ता कर

१२.४१. नागरी संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नात मालमत्ता कराच्या उत्पन्नाचा वाटा जकातीनंतर दुसऱ्या क्रमाकांवर असल्या तरी नागरी संस्थांचे हे एक महत्त्वाचे उत्पनाचे साधन आहे. आयोगाच्या मते या उत्पन्नाच्या साधनाचा पूर्णतः वापर झालेला नाही. या संदर्भात नागरी संस्थांच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेत आयोगाला असे आढळून आले की, हा एक प्रत्यक्ष कर असल्याने नागरिक त्याची सांगड नागरी संस्था देत असलेल्या सेवांच्या दर्जाशी लावतात. या कराच्या दरात प्रदीर्घ कालावधीनंतर अचानक केलेल्या वाढीमुळे नागरिकांमध्ये अंसतोष व विरोध निर्माण होतो. तथापि, आयोगाला अस वाटते की, **कराच्या दरवाढीच्या प्रस्तावामुळे जनतेमध्ये काही विरोधात्मक प्रतिक्रिया अपेक्षित असते. परंतु कर निश्चितीची पद्धत वाजवी व योग्य असावी आणि त्याच्या मोबदल्यात सेवा-सुविधांचा दर्जा सुधारल्यामुळे थोडे अधिक लाभ मिळतात असे नागरिकांना वाटले पाहिजे.** वरील अभिप्राय लक्षांत घेऊन आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :—

(१) मालमत्ता कराचे किमान व कमाल दर सर्व वर्गाच्या नगरपरिषदांसाठी १९९४ मध्ये सुधारित करण्यात आलेले आहेत. **आयोग शिफारस करते की, १९९६-९७ ते २०००-२००१ या पाच वर्षांच्या कालावधीत या दरात ५ टक्के एवढी टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात यावी.**

(२) आयोग पुढे अशी शिफारस करते की, **दराची कमाल मर्यादा काढून टाकून आणि किमान दरांची मर्यादा कायद्याप्रमाणे कायम ठेवून त्यापुढे सुसह्य आणि योग्य असे कराचे दर निश्चित करण्याचे स्वातंत्र्य नगरपरिषदांना देण्यात यावे.** आयोगाला अशी आशा आहे की, या नागरी संस्था त्यांना घटनेने प्रदान केलेला स्वायत्ततेचा दर्जा विचारात घेऊन या बाबतचे निर्णय न्यायपूर्वक व जबाबदारीने घेतील.

(३) त्याचबरोबर नागरी संस्थांनी त्यांची थकबाकी कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. आयोगाला असे आढळून आले की, सर्व नगरपरिषदा/महानगरपालिकांची सर्व करांची एकूण थकबाकी फार मोठी आहे. विवाद आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे काही थकबाकी राहील हे मान्य केले तरी थकबाकी वसूल करण्याच्या प्रयत्नात कमतरता येऊ नये. वास्तविक पाहता थकबाकीची वसुली ही नागरी संस्थांच्या चांगल्या कामाचे द्योतक असावे असे आयोगाला वाटते.

## २. जकात महसूल

१२.४२. महानगरपालिका व नगरपरिषदांना आयोगाने भेटी दिल्या असता चर्चेमध्ये असे एकमताने सांगण्यात आले की, जकात हे त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन असून त्यांना यासारखेच वाढीव उत्पन्न देणारे दुसरे पर्यायी साधन उपलब्ध करून देईपर्यंत जकात कर चालू ठेवावा. पुढे असेही सांगण्यात आले की, ज्या काही राज्यांनी जकात कर

रद्द करून त्याच्या ऐवजी नागरी संस्थांना ज्या भरपाईच्या रकमा प्रदान केल्या त्या पुरेशा असल्याचे सिद्ध झाले नाही. जकातीच्या उत्पन्नाएवढे उत्पन्न देणारे साधन दिल्याशिवाय जर जकात कर रद्द केला तर या नागरी संस्थांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होतील. अलिकडेच शासनाने नवी मुंबईमध्ये जकात कराऐवजी लेखाधारित जकात उपकराची योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. या प्रयोगाचे परिणाम अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. तेव्हा ही प्रायोगिक पद्धत व जकात यात कोणती पद्धत योग्य/अयोग्य यावर भाष्य न करता आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :—

१२.४३. (१) नागरी संस्थांच्या स्वतःच्या एकूण उत्पन्नात जकातीच्या उत्पन्नाचा वाटा जवळजवळ ७४ टक्के असून या उत्पनाच्या वार्षिक वाढीचा दरही फार मोठा आहे ; राज्य शासनाच्या विक्रीकराच्या वाढीच्या दराशी त्याची चांगलीच तुलना होऊ शकते. जकातीच्या वसुलीत पळवाटा, गळती व भ्रष्टाचार आहे आणि याशिवाय व्यापाऱ्यांना तो गैरसोयीचा आहे अशा प्रकारच्या तक्रारी आहेत. **आयोगाला असे वाटते की, नागरी संस्थांनी या तक्रारींची गंभीरपणे दखल घेऊन त्या दूर केल्या पाहिजेत.** ज्या नागरी संस्था स्वतःच्या यंत्रणेकडून जकातीची वसुली करतात त्याची तुलना खाजगी संस्थांकडून वसुली करणाऱ्या समतुल्य अशा नागरी संस्थांशी केल्यास, कोणती पद्धती अधिक प्रभावी व कमी दोष असणारी असेल हे पाहता येईल. जकात वसुलीच्या खाजगीकरणाबाबत प्रकरण ८ च्या परि. क्र. ८.१९ ते ८.२६ मध्ये सविस्तर चर्चा केली आहे.

### (२) करेतर उत्पन्न व इतर उत्पन्न

१२.४४. या दोन्हीबाबतचा सविस्तर तपशील प्रकरण ८ मधील परि. ८.२० ते ८.३० ध्ये दिला आहे. या संदर्भात आयोगाची अशी शिफारस आहे की, **या बाबींपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याच्या दरांमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात व सेवा आकारातून त्यांचेवर होणारा खर्च भरून निघेल त्या पातळीपर्यंत तरी दर वाढविले पाहिजेत.**

१२.४५. **पिण्याच्या पाण्याचा पुरवठा.**—सर्व नागरी संस्थांमध्ये पिण्याचे पाणीपुरवठ्याच्या प्रश्न हा ज्वलंत प्रश्न आहे. मुंबई आणि पुणे महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा पिण्याच्या पाणीपुरवठा योजना त्यांच्या सर्वसाधारण महसुलामधून मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य देऊन चालवितात. पिण्याच्या पाणीपुरवठ्याच्या योजनांचे उत्पन्न, खर्च व तूट याबबातची माहिती खालील तक्त्यात दिली आहे :—

तक्ता क्रमांक : १२.१०

**पाणीपुरवठ्यावरील खर्च व उत्पन्नाचा तपशील, १९९४-९५**

(रुपये लाखांत)

| महानगरपालिका/नगरपालिका | योजनेचा चालविण्याचा व देखभालीचा खर्च | पाणीपट्टीचे उत्पन्न | उत्पन्न व खर्चातील आधिक्य | उत्पन्नाची खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **(अ) महानगरपालिका** | | | | |
| १. मुंबई व पुणे महानगरपालिका .. .. | २०१४६.०० | ४६५५२.०० | + २६४०६.०० | .... |
| २. ठाणे, नाशिक, ओरंगाबाद व नागपूर महानगरपालिका | ९३९६.६१ | ३००९.४२ | — ६३८७.२९ | ३२.०३ |
| ३. इतर महानगरपालिका .. .. | ४२०५.२१ | २३६३.३९ | — १८०.८२ | ५६.२० |
| **(ब) नगरपरिषदा** | | | | |
| १. अ–वर्ग .. .. | ४०२४.४५ | १६५८.९६ | — ३३६५.४९ | ३३.०२ |
| २. ब–वर्ग .. .. | ३३६८.३६ | ३०८.६४ | — २४५९.७२ | २६.९८ |
| ३. क–वर्ग .. .. | २४३०.१४ | ७२१.५७ | — १७०८.५७ | २९.९६ |

वरील तक्त्यामध्ये ठाणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद महानगरपालिका वेगळ्या दाखविल्या आहेत. कारण त्यांच्या उत्पन्नाची खर्चाशी टक्केवारी नगरपरिषदांच्या टक्केवारीपेक्षा चांगली नाही. ही स्थिती सुधारण्याची गरज आहे. वास्तविकपणे पाणीपुरवठ्याच्या योजना ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविल्या पाहिजेत. सध्या पाण्यापासून मिळणारे उत्पन्न त्यावर होणाऱ्या खर्चाचे तुलनेत फारच कमी आहे. किंबहुना काही अपवाद वगळता सर्वच नागरी संस्था सवलतीच्या दराने जनतेला पाणीपुरवठा करतात व यापोटी येणारी तुट इतर उत्पन्नातून भरून काढली जाते. ही अत्यंत गंभीर परिस्थिती आहे व त्यात निश्चित अशी उपाययोजना करून पाणीपुरवठ्यावरील तूट कमी करण्याची गरज आहे. ही तूट एकाएकी भरून काढता येणार नाही याची आयोगाला जाणीव आहे. परंतु टप्प्याटप्प्याने पाणी दरांत वाढ करून खर्च व उत्पन्नातील तफावत कमी करता येईल. आयोगाची अशी शिफारस आहे की, **या नागरी संस्थानी पाणीपुरवठ्यासाठी ज्या महसुली खर्चाचे अंदाज दिले आहेत त्यापैकी जो खर्च पाणीपुरवठ्यासाठी करतात त्यापैकी किमान ७० टक्के वसुली १९९७–९८ मध्ये होईल या दृष्टीने पाण्याचे दर वाढविण्यात यावेत व त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी ते ८० टक्के, ९० टक्के व सन २०००–२००१ पर्यंत पाणीपुरवठ्यावरील १०० टक्के खर्च वसूल होईल अशा प्रकारे पाणीपट्टीचे दर वाढवावेत व पाण्यावरील खर्च व उत्पन्नात संतुलन साधावे.**

१२.४६. शासनाने पाणीपुरवठ्याच्या संदर्भात काढलेल्या श्वेतपत्रिकेत जे धोरण जाहीर केले त्यास अनुलक्षून आयोग अशी शिफारस करते की, **सर्व नागरी संस्थांनी पाणीपुरवठ्यासाठी अर्थसंकल्पात सवतंत्रपणे अंदाज तयार करावेत. जेणेकरून या महत्त्वाच्या विषयाचे आर्थिक मूल्यमापन एका दृष्टिक्षेपात वेगळे असे निदर्शनास येईल.**

१२.४७. आयोग असे गृहीत धरते की, वर नमूद केलेल्या सर्व शिफारशींची योग्य अंमलबजावणी झाल्यास महानगरपालिका व नगरपरिषदांच्या उत्पन्नात दरवर्षी चांगलीच वाढ होईल. परिच्छेद १२.४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे **पाणीपुरवठ्याच्या सर्वच योजना, खर्च व उत्पन्नाच्या दृष्टीने २०००–२००१ या वर्षापर्यंत स्वयंपूर्ण व संतुलित व्हाव्यात अशी आयोगाची शिफारस आहे.** आयोग नागरी संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नातील वार्षिक वाढीचे दर (पाण्याच्या उत्पन्नातील वाढ लक्षात घेऊन) खालीलप्रमाणे सुचवू इच्छिते :—

| | | | |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | .. | .. | १८ टक्के |
| नगरपालिका अ–वर्ग | .. | .. | १८ टक्के |
| ब–वर्ग | .. | .. | १६ टक्के |
| क–वर्ग | .. | .. | १६ टक्के |

वरील आधार लक्षात घेऊन या नागरी संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नाचे अंदाज काढण्यात आले आहेत व त्याचा तपशील खालील तक्ता क्र. १२.११ मध्ये दिला आहे. सध्याच्या पातळीप्रमाणे जी अनुदाने मिळतात त्यांचे अंदाज ७ टक्के वाढीच्या दराने प्रक्षेपित करून वेगळी दाखविली आहेत. त्यासाठी तक्ता क्र. १२.१२ पहावा.

### तक्ता क्रमांक १२.११

### नागरी संस्थांच्या स्वतःच्या साधनापासूनच्या उत्पन्नाचे अंदाज

(रुपये कोटींत)

| महानगरपालिका/ नगरपरिषदा | १९९५–९६ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका .. | २,८०९.५८ | ३,३४२.१५ | ३,९५२.४१ | ४,६६४.९० | ५,५१५.०३ | ६,५०२.६४ |
| नगरपरिषदा— | | | | | | |
| अ–वर्ग .. | २८०.४९ | ३३०.९७ | ३९०.५५ | ४६०.८५ | ५४३.८० | ६४१.६८ |
| ब–वर्ग .. | १३३.५९ | १५४.९६ | १७९.७५ | २०८.५१ | २४१.८८ | २८०.५८ |
| क–वर्ग .. | १००.१७ | ११६.१९ | १३४.७८ | १५६.३५ | १८१.३६ | २१०.३८ |
| एकूण नगरपरिषदा .. | ५१४.२५ | ६०२.१२ | ७०५.०८ | ८२५.७१ | ९६७.०४ | १,१३२.६४ |
| एकूण महानगरपालिका व नगरपरिषदा. | ३,३२३.८३ | ३,९४४.२७ | ४,६५७.४९ | ५,४९०.६१ | ६,४८२.०७ | ७,६३५.२८ |

टीप.—(१) महानगरपालिका व अ-वर्ग नगरपरिषदांचे उत्पन्नाचे अंदाज १९९४–९५ मधील उत्पन्नांच्या आधारावर वार्षिक उत्पन्न वाढीचा दर १८ टक्के विचारात घेऊन काढले आहेत.

(२) ब–वर्ग व क–वर्ग नगरपरिषदांचे अंदाज १९९४-९५ मधील उत्पन्नाच्या आधारावर १६ टक्के वार्षिक उत्पन्न वाढीचा दर विचारात घेऊन काढले आहेत.

(३) महानगरपालिका/नगरपरिषदांचे वरील अंदाजात पाणीपुरवठ्यावरील खर्चाची वसुली १९९७–९८ मध्ये पाण्यावरील खर्चाच्या ७० टक्के, १९९८–९९ मध्ये ८० टक्के, १९९९–२००० मध्ये ९० टक्के व शेवटच्या वर्षी १०० टक्के असेल असे गृहीत धरले आहे.

## भाग ३

### गरजा, उत्पन्नाची साधने व तफावत

१२.४८. काही विशिष्ट गरजांचे निर्धारण आयोगाने कशा प्रकारे केले आहे याबाबतचा आराखडा मागील परिच्छेदात दिला आहे. थोडक्यात नागरी संस्थांच्या स्वतःच्या साधनांपासूनच्या उत्पन्नाचे निर्धारण तक्ता क्र. १२.११ मध्ये पहावे. या उत्पन्नात सध्याच्या अनुदानाच्या रकमा प्रक्षेपित करून समाविष्ट केल्यास एकूण उत्पन्नाचे अंदाज उपलब्ध होतात. तसेच खर्चाचे अंदाज प्रक्षेपित करून त्यांत अतिरिक्त गरजांच्या खर्चाचा समावेश करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे अंदाजित केलेल्या उत्पन्न व खर्चाच्या आकडेवारीवरून काढलेली तफावत तक्ता क्र. १२.१२ मध्ये दाखविली आहे.

१२.४९. विविध प्रयोजनांसाठी नागरी संस्थांनी घेतलेल्या कर्जाच्या मुद्दलाची व व्याजाची परतफेड करण्याची जबाबदारी व इतर संस्थांची देय झालेली व वेळेत परतफेड न केलेली दायित्वे इ. प्रकारच्या जबाबदाऱ्या नागरी संस्थांनी भविष्यात पूर्णतः पार पाडल्या पाहिजेत अशी आयोगाची भूमिका आहे. या दायित्वांत विलंबापोटी आकारलेल्या रकमा व दंड यांचाही समावेश आहे. तथापि आयोगाला आशा आहे की, नागरी संस्थांचा आर्थिक बोजा कमी करण्यासाठी शासन व इतर शासकीय संस्थांनी आकारणी केलेल्या दंडाची रक्कम कमी करतील. त्याचबरोबर नगरपरिषदांनी त्यांच्या दायित्वाच्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्यासाठी कडक आर्थिक शिस्त बाळगणे आवश्यक आहे. या बाबीवरील गरजांचे निर्धारण तक्ता क्र. १२.८ मध्ये दिले आहे, तर वरील खर्च धरून एकूण महानगरपालिका व नगरपरिषदांच्या गरजांचे निर्धारण तक्ता क्र. १२.९ मध्ये दाखविण्यात आले आहे.

१२.५०. महसुली खर्चाच्या काही घटकांच्या बाबींचे निर्धारण करता आले नाही. नागरी संस्थांच्या कर्मचारीवृंदाच्या वेतन, भत्ते व सेवानिवृत्तिवेतन, उपदान इत्यादींमध्ये सुधारित वेतनवाढीमुळे पडणारा संभाव्य आर्थिक बोजा ही एक त्यापैकी बाब आहे. या बाबीमुळे पडणारा अतिरिक्त आर्थिक बोजा जेव्हा उद्भवेल त्यावेळी नागरी संस्थांना त्याला तोंड द्यावे लागणार आहे.

## तक्ता क्रमांक १२.१२

### नागरी संस्थांच्या उत्पन्न व खर्चातील तफावत [तक्ता क्र. १२.९ व १२.११ चे आधारावर]

[रुपये कोटींत]

| महानगरपालिका/ नगरपरिषदा | बाब | १९९५–९६ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका— | | | | | | | |
| | स्वतःचे उत्पन्न | २,८०९.५८ | ३,३४२.१५ | ३,९५२.४१ | ४,६६४.९० | ५,५१५.०३ | ६,५०२.६४ |
| | सध्याची अनुदाने | १३०.७३ | १३९.८८ | १४९.६७ | १६०.१५ | १७१.३६ | १८३.३६ |
| | एकूण उत्पन्न | २,९४०.३१ | ३,४८२.०३ | ४,१०२.०८ | ४,८२५.०५ | ५,६८६.३९ | ६,६८६.०० |
| | खर्च | ३,२१९.९४ | ४,४५७.५६ | ५,१०३.७९ | ५,९१४.११ | ६,४९१.४० | ६,९२९.८० |
| | निव्वळ तफावत | २७९.६३ | ९७५.५३ | १,००१.७१ | १,०८९.०६ | ८०५.०१ | २४३.८० |
| नगरपरिषदा अ-वर्ग | स्वतःचे उत्पन्न | २८०.४९ | ३३०.९७ | ३९०.५५ | ४६०.८५ | ५४३.८० | ६४१.६८ |
| | सध्याची अनुदाने | ४६.७० | ४९.९७ | ५३.४७ | ५७.२१ | ६१.२२ | ६५.५१ |
| | एकूण उत्पन्न | ३२७.१९ | ३८०.९४ | ४४४.०२ | ५१८.०६ | ६०५.०२ | ७०७.१९ |
| | खर्च | ३३७.८५ | ४४९.६१ | ५११.९४ | ५८३.३६ | ६६५.१५ | ७५८.८५ |
| | निव्वळ तफावत | १०.६६ | ६८.६७ | ६७.९२ | ६५.३० | ६०.१३ | ५१.६६ |
| ब-वर्ग | स्वतःचे उत्पन्न | १३३.५९ | १५४.९६ | १७९.७५ | २०८.५१ | २४१.८८ | २८०.५८ |
| | सध्याची अनुदाने | ३६.२६ | ३८.८० | ४१.५२ | ४४.२३ | ४७.५३ | ५०.८६ |
| | एकूण उत्पन्न | १६९.८५ | १९३.७६ | २२१.२७ | २५३.७४ | २८९.४१ | ३३१.४४ |
| | खर्च | १७७.१९ | २४४.८९ | २७७.९९ | ३१६.३३ | ३६०.८३ | ४१२.६७ |
| | निव्वळ तफावत | ७.३४ | ५१.१३ | ५६.७२ | ६३.५९ | ७१.४२ | ८१.२३ |
| क-वर्ग | स्वतःचे उत्पन्न | १००.१७ | ११६.१९ | १३४.७८ | १५६.३५ | १८१.३६ | २१०.३८ |
| | सध्याची अनुदाने | ४१.४९ | ४४.३९ | ४७.५० | ५०.८३ | ५४.३८ | ५८.१९ |
| | एकूण उत्पन्न | १४१.६६ | १६०.५८ | १८२.२८ | २०७.१८ | २३५.७४ | २६८.५७ |
| | खर्च | १५४.३८ | २०९.८३ | २३३.०५ | २५८.९२ | २८७.७६ | ३१९.९१ |
| | निव्वळ तफावत | १२.७२ | ४९.२५ | ५०.७७ | ५१.७४ | ५२.०२ | ५१.३४ |
| एकूण नगरपरिषदा | स्वतःचे उत्पन्न | ५१४.२५ | ६०२.१२ | ७०५.०८ | ८२५.७१ | ९६७.०४ | १,१३२.६४ |
| | सध्याची अनुदाने | १२४.४५ | १३३.१७ | १४२.४९ | १५२.२७ | १६३.१४ | १७४.५६ |
| | एकूण उत्पन्न | ६३८.७० | ७३५.२८ | ८४७.५७ | ९७७.९८ | १,१३०.१८ | १,३०७.२० |
| | खर्च | ६६९.४२ | ९०४.३३ | १,०२२.९८ | १,१५८.६१ | १,३१३.७४ | १,४९१.४३ |
| | निव्वळ तफावत | ३०.७२ | १६९.०४ | १७५.४१ | १८०.६३ | १८३.५६ | १८४.२३ |
| एकूण महानगरपालिका/ नगरपरिषदा | स्वतःचे उत्पन्न | ३,३२३.८३ | ३,९४४.२७ | ४,६५७.४९ | ५,४९०.६१ | ६,४८२.०७ | ७,६३५.२८ |
| | सध्याची अनुदाने | २५५.१९ | २७३.०५ | २९२.१६ | ३१२.४२ | ३३४.५० | ३५७.९१ |
| | एकूण उत्पन्न | ३,५७९.०२ | ४,२१७.३२ | ४,९४९.६५ | ५,८०३.०३ | ६,८१६.५७ | ७,९९३.१९ |
| | खर्च | ३,८८९.३६ | ५,३६१.८९ | ६,१२६.७७ | ७,०७२.७२ | ७,८०५.१४ | ८,४२१.२३ |
| | निव्वळ तफावत | ३१०.३४ | १,१४४.५७ | १,१७७.१२ | १,२६९.६९ | ९८८.५७ | ४२८.०४ |
| अधिक :— महाराष्ट्र पाणीपुरवठा व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे दायित्व | | .. | .. | ४८.५० | ४८.५० | ४८.५० | ४७.४२ |
| | एकूण निव्वळ तफावत | ३१०.३४ | १,१४४.५७ | १,२२५.६२ | १,३१८.१९ | १,०३७.०७ | ४७५.४६ |

□ □

## प्रकरण १३

# करांचा वाटा व अनुदानाविषयीच्या शिफारशी

**प्रस्तावना**

१३.१. पंचायत राज संस्था आणि नागरी संस्थांच्या विविध गरजांसाठी किती निधीची आवश्यकता आहे त्याचा उहापोह प्रकरण क्र. १०, ११ व १२ मध्ये केला आहे. वरील प्रकरणात विशद केल्याप्रमाणे ही आवश्यकता काढताना काही विशिष्ट बाबींचा/क्षेत्रांचाच विचार केला असला तरी ग्रामीण व नागरी भागातील निरनिराळे कार्यक्रम व सेवासुविधांची देखभाल/दुरूस्ती तसेच त्या व्यवस्थितपणे चालू राहतील याची काळजी घेतली आहे. विकासात्मक गरजांची सांगड सध्या आखणी सुरू असलेल्या नवव्या पंचवार्षिक योजनेशी घातली आहे. त्याशिवाय विकासात्मक कार्यक्रम राज्यातील विकास मंडळांकडूनही राबवावयाचे आहेत. वर नमूद केलेल्या बाबींचा खर्च केल्यानंतर या नागरी संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नातील शिल्लक निधीत काही प्रमाणात का होईना अतिरिक्त निधीचे वितरण करून भर टाकावी म्हणजे त्यामुळे त्यांच्या भांडवली खर्चासाठी जादा निधी उपलब्ध होईल असा आयोगाचा उद्देश आहे.

१३.२. आयोगाचा हा अहवाल १९९६-९७ हे आर्थिक वर्ष जवळजवळ संपण्याच्या वेळी अंतिम करण्यात येत आहे. आयोगाने असे गृहीत धरले आहे की, आयोगाने केलेल्या शिफारशी शासन सन १९९७-९८ या आर्थिक वर्षापासून अंमलात आणील आणि म्हणूनच अनुदान / कराचा वाटा इत्यादीच्या वितरणाची आकडेवारी १९९७-९८ नंतरच्या पुढील कालावधीसाठी देण्यात आली आहे. आयोगाने असे गृहीत धरले आहे की, या प्रकरणाच्या भाग १ व २ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार मिळणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त या स्थानिक स्वराज्य संस्थांना सध्या मिळत असलेली अनुदानेही खालील बाबींच्या आधीन राहून तशीच पुढे चालू राहतील. (१) आयोगाने जेथे जेथे दरडोईप्रमाणे अनुदान व कराचा वाटा देण्याचे प्रस्तावित केले आहे, तेथे तेथे १९९१ ची लोकसंख्या आधारभूत धरण्यात यावी. (२) आयोगाची अशी भूमिका आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणीपुरवठ्याच्या व पाटबंधाऱ्यांच्या संदर्भातील महसूली खर्चाबाबत २००१ पर्यंत स्वयंपूर्ण व्हावे. त्याविषयांची चर्चा परिच्छेद १०.३५, १०.४१, ११.१५ व १२.४५ मध्ये केली आहे. म्हणूनच शासनाची या संदर्भातील अनुदाने या धोरणाला अनुसरून असावीत.

## भाग-१
## पंचायत राज संस्था

### (१) पंचायत राज संस्थांना मिळणारा जमीन महसूल व त्यावरील उपकर

१३.३. जमीन महसूलावरील उपकर हे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमातील तरतुदीन्वये जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना दोन प्रकारे जमीन महसुलावरील उपकर प्राप्त होतो. पहिला प्रकार मूळ उपकराचा असून, तो सामान्य जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयास २०० पैसे याप्रमाणे उपलब्ध होतो. दुसरा प्रकार वाढीव उपकराचा असून सामान्य जमीन महसुलाच्या दर रुपयासाठी ५०० पैसे एवढे अनुदान मिळते. ग्रामपंचायतींसाठी उपकराचा दर रुपयामागे १०० पैसे एवढा आहे. पंचायत राज संस्थांचे बाबतीत उपकरांचे दर सन १९९३ साली वाढविण्यात आले. वाढीव उपकराद्वारे मिळणारे उत्पन्न ६० : ४० या प्रमाणात पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना वाटले जाते. सध्याच्या पद्धतीप्रमाणे पंचायत राज संस्थांना हे उपकर अनुदान वसुलीच्या प्रमाणात शासनाकडून उपलब्ध होते.

१३.४. उपकरातील उत्पन्न मिळण्यास पंचायत राज संस्थांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते व जिल्हा परिषदांच्या एकंदर वित्तीय व्यवस्थेवर त्यांचा काय परिणाम होतो याचा आढावा यापूर्वी (परिच्छेद ७.६ व ७.७.) मध्ये घेण्यात आला आहे. पूर्वी विशद केलेल्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी आयोग खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे :-

(१) पंचायत राज संस्थांना मिळणारा जमीन महसूल व त्यावर आधारित उपकराच्या अनुदानाचे वितरण हे वसुलीशी न जोडता त्यांच्या मागणीशी जोडण्यात यावे. आयोगाला असे सांगण्यात आले की, सध्या उपकरांच्या वसुलीचा दर ५० टक्के ते ६० टक्के एवढा आहे. त्यामुळे आयोगाची अशी शिफारस आहे की प्रत्येक वर्षाचा जमीन महसूल व त्यावरील उपकर अनुदान मागणीच्या ६६.६७ टक्के पंचायत राज संस्थांना आगाऊ म्हणून एक किंवा दोन हप्त्यांत देण्यात यावा.या अनुदानापेक्षा जादा वसुली झाली असल्यास तेवढा फरक पुढील वर्षात त्यांना देण्यात यावा. मात्र त्या वर्षात दिलेल्या अनुदानापेक्षा कमी वसुली झाल्यास या संस्थांकडून वसुली करण्यात येऊ नये.

(२) शासनाने महसूल यंत्रणेस जमीन महसूल व त्यावरील उपकर वसुलीकडे इतर शासकीय वसुलीप्रमाणे लक्ष देण्याचे आदेश द्यावेत. याप्रमाणे कारवाई झाल्यास शासनावरही मागणीप्रमाणे अनुदानाचा अतिरिक्त भार पडणार नाही व पंचायत राज संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यास त्यामुळे मदत होईल.

१३.५. आयोगास शासनाकडून असे सांगण्यात आले की, काही जिल्हा परिषदांनी कमाल ५०० पैसेपर्यंत वाढीव उपकर आकारलेला नाही. काही जिल्हा परिषदांनी तो पूर्वीप्रमाणेच ठेवलेला आहे. १९९७-९८ नंतर सर्व जिल्हा परिषदा आपले उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हा दर ५०० पैशांपर्यंत वाढविणार आहेत व त्याप्रमाणे त्यांना जादा उत्पन्न मिळेल असे आयोगाने गृहित धरले आहे. या वाढीव उपकरावर जादा दराने त्यांना अनुरूप उपकर अनुदानही प्राप्त होईल व त्याप्रमाणे आयोगाने निधीचे वाटप प्रस्तावित केले आहे. याचबरोबर आयोगाला असे सुचवावेसे वाटते की, हे अनुदान जिल्हा परिषद उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे याच्या वसुलीबाबत स्थगिती देण्यात येऊ नये. अशी स्थगिती शासनाच्या स्तरावर देण्यात आली तर त्यामुळे जिल्हा परिषदांचे जे नुकसान होईल त्याची भरपाई त्यांना देण्यात यावी.

१३.६. जिल्हा परिषदांना मूळ उपकर व वाढीव उपकरापासून मिळणारे अतिरिक्त उत्पन्नाचे अंदाज खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहेत.

(रुपये लाखांत)

| | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मूळ उपकर | ५९४ | ५९४ | ५९४ | ५९४ | २,३७६ |
| वाढीव कर | ३३६ | ३३६ | ३३६ | ३३६ | १,३४४ |

## (२) सिंचन पट्टीवरील उपकर

१३.७. सध्या जिल्हा परिषदांना देण्यासाठी सिंचन पट्टीवरील दर रुपयामागे २० पैसे उपकर लावण्यात येतो. प्रचलित उपकराचा दर १९६९ पासून लागू आहे. सध्या जिल्हा परिषदांना हा उपकर त्याचे वसुलीचे व अंदाजपत्रकीय तरतुदीचे अधीन राहून दिला जातो.

१३.८. आयोगाजवळ असलेल्या माहितीनुसार १९९४-९५ साठी उपकराच्या वसुलीचे प्रमाण फक्त ४९ टक्के होते. त्या वसुलीचे ४८ टक्के अनुदान जिल्हा परिषदांना देण्यात आले. म्हणजे मागणीच्या १/४ रक्कम फक्त प्रत्यक्षात जिल्हा परिषदांना देण्यात आली. अशा परिस्थितीत आयोगाची अशी शिफारस आहे की, जमीन महसूल व त्यावरील उपकर अनुदानाप्रमाणेच हा उपकर मागणीच्या ६६.६७ टक्के जिल्हा परिषदांना आगाऊ म्हणून देण्यात यावा. या अनुदानापेक्षा जादा वसुली झाली असल्यास तेवढा फरक त्यापुढील वर्षी त्यांना देण्यात यावा. मात्र दिलेल्या अनुदानापेक्षा कमी वसुली झाल्यास जिल्हा परिषदांकडून कोणत्याही प्रकारची वसुली करण्यात येऊ नये.

१३.९. शासनाने पाटबंधारे विभागास सिंचनपट्टीवरील उपकराच्या वसुलीकडे लक्ष देण्याचे आदेश द्यावेत.

१३.१०. वरील शिफारशींपासून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ११४२ | १२२२ | १३०७ | १३९९ | ५०७० |

(३) स्थानिक उपकर अनुरूप अनुदान

१३.११. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना वाढीव उपकरावर हे अनुदान प्राप्त होते. यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांचे प्राप्तीचे प्रमाण ४० : ६० असे आहे. आयोगाने वाढीव उपकर हा मागणीचे ६६.६७ टक्के देण्यात यावा अशी शिफारस केली आहे. त्यामुळे स्थानिक उपकर अनुरूप अनुदान वाढीव प्रमाणात जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना प्राप्त होईल. या अनुदानापासून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५९३ | ५९३ | ५९३ | ५९३ | २,३७२ |

(४) वन महसूल अनुदान

१३.१२. जिल्हा परिषदांना त्यांचे हद्दीतील वन क्षेत्रामधील परियोजना व कामे करण्यासाठी वन महसुलाच्या ७ टक्के अनुदान मिळते. जिल्हा परिषदांना वन क्षेत्रातील परियोजना अधिक चांगल्या रितीने राबविण्यासाठी या अनुदानाचे प्रमाण १० टक्के करण्यात यावे अशी आयोगाची शिफारस आहे. वन महसूल अनुदानाचे प्रमाण वाढविल्यामुळे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ९४० | १००६ | १०७६ | ११५२ | ४१७४ |

(५) अभिकरण शुल्क

१३.१३. जिल्हा परिषदांकडे शासनाने अभिकरण तत्त्वावर सोपविण्यात आलेल्या योजनांवरील खर्चाच्या ३ टक्के रक्कम जिल्हा परिषदांना कराव्या लागणाऱ्या जादा खर्चाची भरपाई म्हणून दिली जाते. ही रक्कम अतिशय कमी असते अशी बहुतेक सर्व जिल्हा परिषदांची तक्रार आहे. शासनही स्वतः अनामत स्वरूपाच्या कामासाठी १७ ते



एच ४०९४-१५

१८ टक्के सेन्टेज चार्जेस आकारते. अभिकरण तत्त्वावरील योजनांसाठी अभिकरण शुल्काच्या दरात वाढ करण्याची गरज असून ३ टक्के ऐवजी १० टक्के इतका दर करण्यात यावा अशी आयोगाची शिफारस आहे. वाढीव दरामुळे जिल्हा परिषदांना मिळणारे वाढीव उत्पन्न खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १०८३ | ११५९ | १२३९ | १३२६ | ४८०७ |

## (६) जिल्हा परिषद रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती अनुदान

१३.१४. आयोगास असे आढळून आले की, जिल्हा परिषदांना त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मिळणारा निधी अपुरा आहे. सन १९९४-९५ मध्ये त्यांना रस्ता दुरूस्तीसाठी मिळणारा निधी आवश्यक निकषाच्या २९ टक्के इतकाच आहे. यामुळे आयोगाची अशी शिफारस आहे की, जिल्हा परिषदांना १९९७-९८ पासून २०००-२००१ पर्यंत रस्ता दुरूस्तीसाठी मिळणाऱ्या अनुदानाचे प्रमाण निकषाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निधीच्या ४० टक्के करण्यात यावे. वरील किमान प्रमाणाएवढे अनुदान उपलब्ध करून देताना त्या त्या वर्षाचे निकष विचारात घेण्यात यावेत व हे निकष ठरविताना वाहनांच्या संख्येत झालेल्या प्रचंड वाढीचाही विचार व्हावा. जिल्हा परिषदांना मिळणारे अतिरिक्त अनुदानाचे अंदाज खालील तक्त्यात दर्शविले आहेत.

(रुपये लाखांत)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६००६ | ६४२६ | ६८७६ | ७३५७ | २६६६५ |

## (७) जिल्हा परिषद इमारतींची देखभाल व दुरुस्ती अनुदान

१३.१५. सन १९९४-९५ च्या आकडेवारीनुसार जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची प्रमाणकानुसार गरज ५४३५ लाख रुपये होती. त्यापैकी शासनाकडून त्यांना देखभाल व दुरुस्तीसाठी ३९० लाख अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. हे प्रमाण त्यांच्या मागणीच्या ८ टक्के पेक्षाही कमी होते. देखभाल व दुरुस्तीअभावी मोठ्या प्रमाणात खर्च करून बांधलेल्या इमारतींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे आयोगास वाटते.

१३.१६. १९९७-९८ या वर्षापासून जिल्हा परिषदांना इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठी निकषाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निधीच्या ५०% प्रमाणे रक्कम उपलब्ध करून द्यावी अशी आयोगाची शिफारस आहे. जिल्हा परिषदांना मिळणारे अतिरिक्त अनुदान खालील तक्यात दर्शविले आहे.

(रुपये लाखात)

| १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| २८५१ | ३०५१ | ३२६४ | ३४९३ | १२६५९ |

१३.१७. दहाव्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केल्यानुसार राज्य शासनाने सन १९९६-९७ साठी प्राथमिक शाळेच्या इमारती व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीसाठी ३० कोटी रुपयांचे अनुदान जिल्हा परिषदांना दिले आहे. जिल्हा परिषदांकडील इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी केंद्रीय वित्त आयोगाने जिल्हा परिषदांसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीचाही वापर करण्यात यावा या मताशी आयोग सहमत आहे. या निधीतून जिल्हा परिषद इमारती दुरुस्तीसाठी जी रक्कम उपलब्ध होईल ती वरील शिफारस केलेल्या निधीसाठी समायोजित करावी.

१३.१८. वरील सर्व शिफारशींमुळे जिल्हा परिषदांना मिळू शकणारे एकत्रित अतिरिक्त उत्पन्न तक्ता क्र. १३.१ मध्ये दर्शविण्यात आले आहे. अतिरिक्त अनुदान धरून जिल्हा परिषदांना मिळणारे एकूण अंदाजित उत्पन्न तक्ता क्र. १३.२ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

### तक्ता क्रमांक १३.१

### वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे जिल्हा परिषदांना मिळू शकणाऱ्या अतिरिक्त अनुदानाचा अंदाज

(रुपये लाखात)

| अ. क्र. | अनुदानाचा प्रकार | १९९४-९५ मध्ये दिलेली रक्कम | अतिरिक्त निधीचे वाटप | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण (४+५+६+७) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मूळ उपकर .. | ३३९ | ५९४ | ५९४ | ५९४ | ५९४ | २३७६ |
| २ | वाढीव उपकर .. | ५९७ | ३३६ | ३३६ | ३३६ | ३३६ | १३४४ |
| ३ | सिंचनपट्टी उपकर .. | ३०२ | ११४२ | १२२२ | १३०७ | १३९९ | ५०७० |
| ४ | स्थानिक उपकर अनुरुप अनुदान | ९०० | ५९३ | ५९३ | ५९३ | ५९३ | २३७२ |
| ५ | वन महसूल अनुदान .. | १०१७ | ९४० | १००६ | १०७६ | ११५२ | ४१७४ |
| ६ | अभिकरण शुल्क .. | ३७९ | १०८३ | ११५९ | १२३९ | १३२६ | ४८०७ |
| ७ | रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान .. | १३१११ | ६००६ | ६४२६ | ६८७६ | ७३५७ | २६६६५ |
| ८ | इमारती दुरुस्तीसाठी अनुदान | ३९१ | २८५१ | ३०५१ | ३२६४ | ३४९३ | १२६५९ |
| | एकूण .. | १७०३६ | १३५४५ | १४३८७ | १५२८५ | १६२५० | ५९४६७ |

### तक्ता क्र. १३.२

### वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदांना अनुदानापासून मिळू शकणारे एकूण अंदाजित उत्पन्न

(रुपये लाखात)

| अ.क्र. | कराचा वाटा/ अनुदानाचा प्रकार | १९९४-९५ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण (१९९७-९८ ते २००१) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | सध्याचे अंदाजित उत्पन्न | .. | २२६५५५ | २६१६४० | ३०२१३६ | ३४९२०१ | ४०३८९७ | १३१६८७४ |
| २ | शिफारशीनुसार मिळू शकणारे अतिरिक्त उत्पन्न | .. | .. | १३५४५ | १४३८७ | १५२८५ | १६२५० | ५९४६७ |
| | एकूण | .. | २२६५५५ | २७५१८५ | ३१६५२३ | २६४४८६ | ४२०१४७ | १३७६३४१ |



४०९४-१५अ

### जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न

१३.१९. जिल्हा परिषदा स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी काही बाबी ज्याद्वारे उत्पन्नाचे स्रोत निर्माण करू शकतील याचा आढावा जिल्हा परिषदांचे गरजांचे निर्धारण प्रकरण १० मधील भाग २ मध्ये घेण्यात आला आहे. त्यामध्ये पाणीपट्टी व सिंचनपट्टी यापासून जिल्हा परिषदेला/मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त खाली नमूद केल्याप्रमाणे दोन प्रकारे जिल्हा परिषदांना उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

### (१) हस्तांतरित्त अभिकरण तत्त्वावरील योजनांपासूनचे उत्पन्न

१३.२०. जिल्हा परिषदांना हस्तांतरित व अभिकरण तत्त्वांवरील योजनापासून काही उत्पन्न प्राप्त होते. विशेषतः अभियांत्रिकी विभागाच्या यंत्रसामुग्रीचे भाडे व प्राथमिक आरोग्य केंद्राचे शुल्क याचा त्यात समावेश होतो. या प्रकारचे उत्पन्न शासनाकडे हस्तांतरित न करता जिल्हा परिषदांकडेच ठेवण्यात यावे अशी आयोगाची शिफारस आहे. ज्या योजनेअंतर्गत हे उत्पन्न प्राप्त होते त्या योजनेच्या परिचालनासाठीच त्याचा वापर व्हावा अशी आयोगाची अपेक्षा आहे. हस्तांतरित व अभिकरण योजनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची आयोगाकडे जी त्रोटक माहिती उपलब्ध आहे त्यानुसार जिल्हा परिषदांना यापासून दरवर्षी १४५ लाख रुपये उत्पन्न प्राप्त होईल असा अंदाज आहे.

### (२) बिगर शेती जमीन कर

१३.२१. जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाच्या निर्धारणामध्ये बिगर शेती जमीन कराचा उल्लेख करण्यात आला आहे. हा विशेष कर प्रत्येक जिल्हा परिषदेने आकारावा अशी आयोगाची शिफारस आहे. या करापासून साधारणपणे सर्व जिल्हा परिषदांना दरवर्षी १०० लाख रुपयाचे उत्पन्न प्राप्त होईल असा अंदाज आहे.

१३.२२. वरील सर्व स्रोतापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अंदाजित आकडे खालील तक्त्यात देण्यात येत आहेत.

तक्ता क्रमांक १३.३

(रुपये लाखात)

| बाब | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| पिण्याचे पाणी | २९३१ | ३८८६ | ५०१२ | ६२५० | १८०७९ |
| लघुपाटबंधारे पासूनची सिंचनपट्टी. | ५१७ | ६२५ | ७४२ | ९०० | २७८४ |
| हस्तांतरीत योजनापासूनचे उत्पन्न. | १४५ | १५५ | १६६ | १७७ | ६४३ |
| बिगर शेती कर | १०० | १०७ | ११४ | १२२ | ४४३ |
| एकूण .. | ३६९३ | ४७७३ | ६०३४ | ७४४९ | २१९४९ |

१३.२३. जिल्हा परिषदांना जी जादा आर्थिक साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत त्यातून त्यांनी औषध व इतर सामुग्रीची कमतरता यासाठी आवश्यक असणारा खर्च करावा. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदांनी अनुरूप रक्कम उपलब्ध करावी अशी अपेक्षा आहे. त्या रकमेची तरतूद, त्यांनी याच अतिरिक्त निधीतून करावी.

### पंचायत समिती

१३.२४ पंचायत समित्यांची स्वतःची उत्पन्नाची साधने म्हणजे वाढीव उपकरामधील ६० टक्के हिस्सा व स्थानिक उपकर अनुरूप अनुदाने मधील ६० टक्के हिस्सा ही होत. या उत्पन्नाच्या साधनांचा ऊहापोह जिल्हा परिषदामधील वाटपात करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेसाठी वरील अनुदानाबाबत करण्यात आलेल्या शिफारसी या पंचायत समित्यांनाही लागू पडतात. पंचायत समित्यांना मिळणारे अतिरिक्त उत्पन्न तक्ता क्रमांक १३.४ मध्ये दर्शविण्यात आले आहे. अतिरिक्त अनुदान धरून पंचायत समितींना मिळणारे एकूण अंदाजित उत्पन्न तक्ता क्रमांक १३.५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्रमांक १३.४

**वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे पंचायत समित्यांना अनुदानापासून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न**

(रुपये लाखांत)

| बाब | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| वाढीव उपकर .. | ४४३ | ४४३ | ४४३ | ४४३ | १७७२ |
| स्थानिक उपकर अनुरूप अनुदान | ८९० | ८९० | ८९० | ८९० | ३५६० |
| एकूण .. | १३३३ | १३३३ | १३३३ | १३३३ | ५३३२ |

तक्ता क्रमांक १३.५

**वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे पंचायत समित्यांना अनुदानापासून मिळणारे एकूण अंदाजित उत्पन्न**

(रुपये लाखांत)

| बाब | १९९४-९५ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण १९९७-९८ ते २००१ (४+५+६+७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (१) सध्याचे अंदाजित उत्पन्न | ६१६ | ५२६ | ४८६ | ४४९ | ४१५ | ३८४ | १७३४ |
| (२) शिफारशीनुसार मिळू शकणारे अतिरिक्त उत्पन्न. | .. | .. | १३३३ | १३३३ | १३३३ | १३३३ | ५३३२ |
| एकूण .. | ६१६ | ५२६ | १८१९ | १७८२ | १७४८ | १७१७ | ७०६६ |

१३.२५ पंचायत समित्यांना या शिफारशीन्वये अतिरिक्त निधी उपलब्ध होत असल्याने त्यांच्या कर्तव्यविषयक काही बाबी स्पष्टपणे विषद करून ती कर्तव्ये शासनाने त्यांचेवर सोपवावी अशी आयोगाची शिफारस आहे.

### प्रोत्साहनपर अनुदान

१३.२६ उपरोल्लेखित अनुदाने ही जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची आर्थिक स्थिती सुधारावी व काही विशिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी त्यांना निधीची अडचण भासू नये याकरिता द्यावयाची आहेत. त्याचा संबंध संस्थांच्या कार्यक्षमतेशी निगडित केलेला नाही. या संस्थांच्या व्यवस्थापनात सुधारणा होऊन त्यांच्या साधनसंपत्तीत वाढ व्हावी

आणि प्रशासकीय कार्यक्षमता गतीमान करून ग्रामीण लोकसंख्येला पुरेशा सेवासुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने खालील दर्शविलेल्या अटीवर प्रत्येक जिल्हा परिषदेस दरवर्षी रुपये २५ लाख प्रोत्साहनपर अनुदान द्यावे अशी आयोगाची शिफारस आहे.

१. प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांतर्गत होणाऱ्या पाणीपुरवठ्यावरील होणाऱ्या महसुली खर्चाच्या १९९७-९८ मध्ये किमान ७० टक्के, १९९८-९९ मध्ये किमान ८० टक्के, १९९९-२००० मध्ये किमान ९० टक्के व २०००-०१ मध्ये किमान १०० टक्के वसूली पाणीपट्टीपासून व्हावी.

२. जिल्हा परिषद पाटबंधारे योजनांच्या देखभाल, दुरुस्ती वगैरे महसुली खर्चाच्या १९९७-९८ मध्ये किमान ७० टक्के, १९९८-९९ मध्ये किमान ८० टक्के, १९९९-२००० मध्ये किमान ९० टक्के, २०००-०१ मध्ये किमान १०० टक्के वसुली सिंचनपट्टीपासून व्हावी.

१३.२७ प्रोत्साहन अनुदानापैकी ५० टक्के रक्कम पंचायत समित्यांना जिल्हा परिषदांकडून समान प्रमाणात प्राप्त होईल.

१३.२८ जिल्हापरिषदांच्या उत्पन्नाचा फार मोठा भाग त्यांना शासनाकडून आस्थापना आणि सप्रयोजन अनुदानाच्या माध्यमाने मिळत असतो. या पद्धतीने मिळणारे उत्पन्न संपूर्ण किंवा सुरुवातीला काही प्रमाणात कराचा वाटा म्हणून उपलब्ध करून देता यावे अशी आयोगाची भूमिका आहे. परंतु तसे केल्याने काय आर्थिक, प्रशासनिक आणि दूरगामी असे परिणाम होतील याचा अभ्यास करणे आवश्यक असल्यामुळे आणि भविष्यकाळात जिल्हा परिषदेच्या नोकरवर्गाचे पगार आणि भत्ते यांच्यात काय वाढ होईल याचा अंदाज बांधता येत नसल्यामुळे सध्याच्या अनुदानाच्या पद्धतीत बदल करण्यात आला नाही. म्हणून उत्पन्न आणि खर्चाचे अंदाज सध्याचीच परिस्थिती विचारात घेऊन बांधण्यात आलेले आहेत. सध्याच्या पद्धतीत आणि परिस्थितीत बदल करणे आवश्यक आहे असे आयोगाला वाटते. म्हणून यामुळे सध्याच्या अनुदान तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी निधी, कराच्या वाट्याच्या स्वरूपात देता येणे शक्य व्हावे याचा शासनाने सखोल अभ्यास करावा आणि त्या दिशेने पाऊल उचलावे व २०००-२००१ पर्यंत ते अनुदानाच्या ऐवजी कराच्या वाट्याच्या रूपानेच उत्पन्न उपलब्ध होण्याची प्रक्रिया पूर्ण करावी अशी आयोगाची शिफारस आहे. यामुळे उत्पन्नाच्या उपलब्धतेत एक प्रकारची निश्चितता येईल व जिल्हा परिषदांना त्यांच्या कामासंबंधात प्राथम्य ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळेल व त्यामुळे घटनादुरुस्तीचे या संस्थांना स्वायत्त करण्याचे उद्दिष्ट बऱ्याच प्रमाणात साध्य होईल.

## ग्रामपंचायती

१३.२९. ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज हे तक्ता क्रमांक ११.३ मध्ये देण्यात आले आहेत. हे अंदाज ग्रामपंचायतींच्या उत्पन्न व खर्चातील तफावत निर्धारित करण्याकरिता लक्षात घेण्यात आले असून, १९९६–९७ ते २०००–२००१ या कालावधीसाठी दरडोई तफावत दर्शविण्यात आली आहे. ही तफावत लक्षात घेऊन आयोगाने ग्रामपंचायतींना अतिरिक्त निधीच्या वाटपाबाबत शिफारशी करतांना प्रामुख्याने ज्या बाबींचा विचार केला त्या खालीलप्रमाणे.—

### (१) जमीन महसूल अनुदान

१३.३०. सध्या जिल्हा परिषदांप्रमाणेच ग्रामपंचायतींना सामान्य जमीन महसुलाच्या वसुलीच्या ५ वर्षांच्या सरासरीएवढे अनुदान देण्यात येते. हे अनुदान मागणीच्या ६६.६७ टक्के देण्यात यावे अशी आयोगाने परिच्छेद क्रमांक १३.४ मधील (१) मध्ये शिफारस केली आहे. या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना अंदाजे खालीलप्रमाणे अतिरिक्त उत्पन्न मिळेल.

(रुपये लाखांत)

| १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५१ | ५१ | ५१ | ५१ | २०४ |

(२) जमीन महसुलावरील ग्रामपंचायत उपकर

१३.३१. सामान्य जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयामागे १०० पैशाप्रमाणे उपकर अनुदान ग्रामपंचायतींना प्राप्त होते. आयोगाने जमीन महसुलावरील उपकराबाबत परिच्छेद क्रमांक १३.४ मधील (१) येथे शिफारस केली आहे. या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना अंदाजे खालीलप्रमाणे अतिरिक्त उत्पन्न मिळेल.

(रुपये लाखांत)

| १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ३७७ | ३७७ | ३७७ | ३७७ | १५०८ |

(३) व्यवसाय कर

१३.३२. व्यवसाय कराचे उत्पन्न सध्या राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होते. यापैकी काही वाटा ग्रामपंचायतींना देण्यात यावा असे आयोगाचे मत आहे. शासनाच्या या स्रोताद्वारे झालेल्या एकूण वसुलीपैकी १० टक्के रक्कम वेगळी काढून स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावी असे आयोगाने परिच्छेद क्रमांक १३.४६ मध्ये सुचविले आहे. त्यापैकी २० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या आधारावर दरडोई प्रमाणे देण्यात यावी अशी आयोग शिफारस करीत आहे. व्यवसाय कराचे पुढील पाच वर्षांचे उत्पन्न अंदाजित करताना व्यवसाय कराच्या १९९६–९७ च्या अधिकृत आकडेवारीत ५.५ टक्के वाढ धरण्यात आली आहे, हे वित्त विभागाने वित्त आयोगाला सादर केलेल्या अहवालाशी सुसंगत आहे.

(रुपये लाखात)

| १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–०१ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७०९ | ७४८ | ७८९ | ८३२ | ३०७८ |

(४) ग्रामपंचायतींना अतिरिक्त दरडोई अनुदान

१३.३३ सध्या ग्रामपंचायतींना मिळत असलेली अनुदाने व वरीलप्रमाणे अतिरिक्त निधीच्या वाटपाबरोबर खालीलप्रमाणे दरडोई अतिरिक्त अनुदान देण्याची आयोग शिफारस करीत आहे. त्याचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत.

| वर्ष | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| अतिरिक्त दरडोई अनुदान (रु.) | ८ | ९ | १० | ११ | — |
| राज्यस्तरीय एकूण अंदाजित अनुदान (रु. लाखांत) | ३८७२ | ४३५६ | ४८४० | ५३२४ | १८३९२ |

१३.३४ आयोगाने वरीलप्रमाणे अतिरिक्त निधीच्या वाटपाची शिफारस केल्यानंतर तूट भरून काढण्यासाठी ज्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे ती ग्रामपंचायतींनी स्वतःचे उत्पन्न वाढवून भरून काढावी.

१३.३५ ग्रामपंचायतींना आयोगाच्या शिफारशींनुसार कराचा हिस्सा व अनुदानापासून मिळणारे अंदाजित अतिरिक्त उत्पन्न तक्ता क्र. १३.६ मध्ये दाखविण्यात आले आहे.

तक्ता क्रमाक १३.६

**वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना कराचा हिस्सा व अनुदानापासून मिळू शकणारे अतिरिक्त अंदाजित उत्पन्न**

(रुपये लाखांत)

| कराचा हिस्सा/ अनुदानाचा प्रकार | संस्था | १९९४–९५ मधील प्रत्यक्ष वाटप | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–०१ | एकूण (१९९७–९८ ते २०००–०१) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. जमीन महसूल अनुदान | ग्रामपंचायत | ५१ | ५१ | ५१ | ५१ | ५१ | २०४ |
| २. जमीन महसुलावरील उपकर | | ९० | ३७७ | ३७७ | ३७७ | ३७७ | १५०८ |
| ३. व्यवसाय करातील हिस्सा | | .. | ७०९ | ७४८ | ७८९ | ८३२ | ३०७८ |
| ४. दरडोई अनुदानाप्रमाणे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न. | | .. | ३८७२ | ४३५६ | ४८४० | ५३२४ | १८३९२ |
| एकूण अतिरिक्त उत्पन्न | | .. | ५००९ | ५५३२ | ६०५७ | ६५८४ | २३१८२ |

१३.३६. ग्रामपंचायतींना सध्या मिळणारी अनुदाने व शिफारशींप्रमाणे निधीचे अतिरिक्त वाटप केल्यानंतर मिळणारे एकूण उत्पन्न तक्ता क्रमांक १३.७ मध्ये दाखविण्यात आले आहे.

तक्ता क्र. १३.७

**वित्त आयोगाच्या शिफारशींप्रमाणे ग्रामपंचायतींना कराचा हिस्सा व अनुदानापासून मिळू शकणारे एकूण अंदाजित उत्पन्न**

(रु. लाखांत)

| कराचा हिस्सा / अनुदानाचा प्रकार | १९९४-९५ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-०१ | एकूण १९९७-९८ ते २००१ (४+५+६+७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| सध्याचे उत्पन्न (अंदाजित) | १३२५४ | १७८८५ | २०७४४ | २४०७० | २७९४१ | ३२४४८ | १०५२०३ |
| शिफारशींनुसार मिळू शकणारे अंदाजित अतिरिक्त उत्पन्न | . . | . . | ५००९ | ५५३२ | ६०५७ | ६५८४ | २३१८२ |
| एकूण . . | १३२५४ | १७८८५ | २५७५३ | २९६०२ | ३३९९८ | ३९०३२ | १२८३८५ |

१३.३७. वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे पंचायत राज संस्थांना मिळणाऱ्या एकूण निधीचे वाटप तक्ता क्र. १३.८ मध्ये दर्शविले आहे. पंचायत समित्यांच्या गरजांचे निर्धारण करता येत नसल्यामुळे, तक्ता क्र. १३.८ मधील त्यांच्याबाबतचे खर्चाचे अंदाज केवळ नाममात्र आहेत. आयोगाच्या शिफारशीमुळे उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त निधीचा वापर त्यांचे स्थान पंचायत राज यंत्रणेत जास्त बळकट करण्यासाठी करता येईल.

तक्ता क्रमांक १३.८

**आयोगाच्या शिफारशीपूर्वी आणि शिफारशीनंतर निधी वितरणाची अपेक्षित स्थिती**

(रु. कोटींत)

| संस्था | बाब | शिफारशींपूर्वी | | शिफारशींनंतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०–९१ | १९९४–९५ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| जिल्हा परिषद | स्वतःचे उत्पन्न . . | ४८.७५ | ५६.७३ | ८८.५८ | १०५.४२ | १२२.८६ | १४३.४१ | १६७.०७ |
| | सध्याची अनुदाने . . | ९२५.३४ | १,६३९.९७ | २,१७६.९७ | २,५१०.९८ | २,८९८.५० | ३.३४८.६० | ३.८७१.९० |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | . . . | . . . | . . . | १३५.४५ | १४३.८७ | १५२.८५ | १६२.५० |
| | एकूण उत्पन्न . . | ९७४.०९ | १,६९६.७० | २,२६५.५५ | २,७५१.८५ | ३,१६५.२३ | ३,६४४.८६ | ४,२०१.४७ |
| | खर्च . . | ९५१,०५ | १,५५१.८५ | २,५७५.९१ | २,९०४.४२ | ३,२७५.४१ | ३,७०६.७५ | ४,२०५.१२ |
| | तफावत . . | . . . | . . . | ३१०.३६ | १५२.५७ | ११०.१८ | ६१.८९ | ३.६५ |
| पंचायत समिती | स्वतःचे उत्पन्न } सध्याची अनुदाने } . . | ८.९१ | ६.१६ | ५.२६ | ४.८६ | ४.४९ | ४.१५ | ३.८४ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | . . . | . . . | . . . | १३.३३ | १३.३३ | १३.३३ | १३.३३ |

(रु. कोटींत)

| संस्था | बाब | शिफारशींपूर्वी | | शिफारशींनंतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०–९१ | १९९४–९५ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | एकूण उत्पन्न .. | ८.९१ | ६.१६ | ५.२६ | १८.१९ | १७.८२ | १७.४८ | १७.१७ |
| | खर्च .. | ७.७१ | ६.४० | ५.९७ | ५.७७ | ५.५७ | ५.३८ | ५.२० |
| | तफावत (अ) .. | (–)१.२० | ०.२४ | ०.७१ | (–)१२.४२ | (–)१२.२५ | (–)१२.१० | (–)११.९७ |
| ग्रामपंचायत | स्वतःचे उत्पन्न .. | ४८.८६ | ९३.४६ | ९२.६६ | १०७.४८ | १२४.६८ | १४४.६३ | १६७.७७ |
| | सध्याची अनुदाने .. | २५.८० | ३९.०८ | ८६.१९ | ९९.९६ | ११६.०२ | १३४.७८ | १५६.७१ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | ५०.०९ | ५५.३२ | ६०.५७ | ६५.८४ |
| | एकूण उत्पन्न .. | ७४.६६ | १३२.५४ | १७८.८५ | २५७.५३ | २९६.०२ | ३३९.९८ | ३९०.३२ |
| | खर्च .. | ६९.७२ | १२४.५० | २३६.०३ | २७१.४१ | ३१२.४१ | ३६०.०० | ४१५.३३ |
| | तफावत .. | ... | ... | ५७.१८ | १३.८८ | १६.३९ | २०.०२ | २५.०१ |
| एकूण (जि. प. + प. स. + ग्रा. पं.) | स्वतःचे उत्पन्न सध्याची अनुदाने .. | १,०५७.६६ | १,८३५.४० | २,४४९.६६ | २,८२८.७० | ३,२६६.५५ | ३,७७५.५७ | ४,३६७.२९ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | .. | ... | १९८.८७ | २१२.५२ | २२६.७५ | २४१.६७ |
| | एकूण उत्पन्न .. | १,०५७.६६ | १,८३५.४० | २,४४९.६६ | ३,०२७.५७ | ३,४७९.०७ | ४,००२.३२ | ४,६०८.९६ |
| | खर्च .. | १,०२८.४८ | १,६८२.७५ | २,८१७.९० | ३,१८१.६० | ३,५९३.३९ | ४,०७२.१३ | ४,६२५.६५ |
| | तफावत (अ) .. | (–)२९.१८ | (–)१५२.६५ | ३६८.२५ | १५४.०३ | ११४.३२ | ६९.८१ | १६.६९ |

## भाग २

### (नागरी संस्था)

१३.३८. अनुदानाबाबतच्या आकडेवारी संदर्भात प्रकरण ५ मधील परिच्छेद क्र. ५.४३, ५.९३, ५.१५७ व प्रकरण ८ मधील क्र. ८.३१ मध्ये विस्तृत उहापोह केला आहे. आकडेवारीतील फरक विचारात घेता अतिरिक्त निधीची रक्कम अंदाजित करण्यासाठी आयोगाला मिळालेली नगरपरिषदांची आकडेवारी विचारात न घेता संचालक, नगरपालिका प्रशासनाने दिलेल्या १९९४-९५ च्या आकडेवारीचा आधार घेणे उचित ठरेल. महानगरपालिकांच्या बाबतीत शासनाची माहिती उपलब्ध न झाल्याने महानगरपालिकांनी दिलेल्या आकडेवारीचाच आधार घेतला आहे. अतिरिक्त निधीचे १९९७-९८ ते २०००-२००१ साठी अंदाज काढताना, १९९४-९५ च्या पातळीवरील अनुदानात ७ टक्के या दराने वाढ होईल हे लक्षात घेतले आहे. प्रकरण १२ मध्ये नागरी संस्थांच्या उत्पन्न-खर्च आणि गरजांचे अंदाज घेऊन तूट काढली आहे. ही तूट काही प्रमाणात भरून काढण्यासाठी अतिरिक्त निधी कसा उपलब्ध करून द्यावा याबद्दलच्या आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

**(१) महागाई भत्ता अनुदान**

१३.३९. सध्या राज्यातील सर्व नगरपरिषदांना त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचा खर्च भागविण्यासाठी आर्थिक मदत व्हावी म्हणून राज्य शासनाकडून महागाई भत्ता अनुदान " अ " वर्ग नगरपरिषदांना ८० टक्के, " ब " वर्ग नगरपरिषदांना ८५ टक्के आणि " क " वर्ग नगरपरिषदांना ९० टक्के या दरांप्रमाणे देण्यात येते. हे अनुदान नगरपरिषदांनी मागील वित्तीय वर्षात मालमत्ता कराच्या केलेल्या वसुलीच्या संदर्भात शासनाने विहित केलेल्या प्रमाणांत दिले जाते. या नगरपरिषदांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता महागाई भत्ता अनुदानाच्या टक्केवारीत काही वाढ करावी व ती अ-वर्गासाठी ९० टक्के, ब-वर्ग व क-वर्ग नगरपरिषदांसाठी १०० टक्के असावी अशी आयोगाची शिफारस आहे. या वाढीमुळे या नगरपरिषदांना जे अतिरिक्त अनुदान प्राप्त होईल त्याचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत :—

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | | | | अनुदान अनुज्ञेय नाही | | |
| नगरपरिषदा– | | | | | | |
| अ-वर्ग | .. | ४२४ | ४५४ | ४८६ | ५२० | १८८४ |
| ब-वर्ग | .. | ४२३ | ४५३ | ४८५ | ५१९ | १८८० |
| क-वर्ग | .. | २९६ | ३१७ | ३३९ | ३६३ | १३१५ |
| एकूण | .. | ११४३ | १२२४ | १३१० | १४०२ | ५०७९ |

आयोगाचे असे मत आहे की, सध्या ज्या अटी व शर्तींवर महागाई भत्ता अनुदानाचे वितरण करण्यांत येते त्याचे काटेकोरपणे पालन होत नाही. नगरपरिषदांनी त्यांच्या सर्व प्रकारच्या कराच्या वसुलीबाबत जास्त दक्षता घेतली पाहीजे. वसुलीचे प्रमाण हे चालू मागणी व थकबाकी एकत्रित विचारात घेऊन पाहीले पाहीजे. हे निकष विचारांत घेताना शासनाने / न्यायालयाने स्थगिती दिल्यास किंवा मुल्यांकनाबाबत वाद असल्यास तेवढी

मागणी लक्षात घेऊ नये. हे लक्ष समोर ठेऊन आयोग महागाई भत्ता वाटपाचे सध्याच्या निकषामध्ये (प्रकरण ५ मधील परिच्छेद क्र. ५.४४ पहावे) खालीलप्रमाणे सुधारणा सुचवित आहे :—

| वसुलीची टक्केवारी | अनुदान |
|---|---|
| ६० % पर्यंत | ७० % |
| ६० % ते ७० % पर्यंत | ८० % |
| ७६ % ते ८५ % पर्यंत | ८५ % |
| ८५ % चे वर | १०० % |

### (२) मुख्याधिकारी वेतन व भत्ते अनुदान

१३.४०. ज्या क वर्ग नगरपरिषदांची लोकसंख्या १५००० पेक्षा कमी आहे त्यांना सध्या राज्य शासनाकडून मुख्याधिकाऱ्यांच्या वेतन व भत्ते यावरील खर्चापोटी अनुदान दिले जाते. १९९१ च्या जनगणनेनुसार हे अनुदान सध्या राज्यातील ४२ नगरपरिषदांना मिळते. सर्वच क-वर्ग नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सारखीच असल्याने त्यांच्यात काही फरक करावा असे आयोगाला योग्य वाटत नाही. म्हणून आयोगाची अशी शिफारस आहे की, लोकसंख्येची विहित केलेली मर्यादा काढून टाकण्यात द्यावी आणि हे अनुदान सर्व क-वर्ग नगरपरिषदांना देण्यात यावे. याबाबत अतिरिक्त अनुदानाचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत :—

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | अनुदान अनुज्ञेय नाही | | | | |
| नगरपरिषदा– | | | | | |
| अ-वर्ग .. | अनुदान अनुज्ञेय नाही. | | | | |
| ब-वर्ग .. | अनुदान अनुज्ञेय नाही. | | | | |
| क-वर्ग .. | १२८.६८ | १३७.६९ | १४७.३२ | १५७.६४ | ५७१.३३ |

### (३) जमीन महसूल व बिनशेतसारा अनुदान

१३.४१. राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रामध्ये वसूल केलेल्या जमीन महसुलाच्या १५ टक्के रक्कम व बिनशेतीसारा महसुलाच्या ७५ टक्के रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते. आयोगाची अशी शिफारस आहे की, जमीन महसुलाच्या अनुदान रूपाने महानगरपालिका व नगरपरिषदांना देण्यात येणाऱ्या रकमेत सध्याच्या १५ टक्क्यांवरून ७५ टक्केपर्यंत वाढ करण्यात यावी. बिनशेतसारा अनुदानाचे सध्याचेच दर कायम राहतील. त्यानुसार ही दोन्ही अनुदाने ७५ टक्के या दराने देण्यात येतील. समानीकरण अनुदान देण्यासाठी १५,००० लोकसंख्येची अट शासनाने सध्या विहित केली आहे ती काढून टाकावी व हे अनुदान सर्व ' क ' वर्ग नगरपरिषदांना लागू करण्यात यावे. जमीन महसूल व बिनशेतसारा महसुलापासून जे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नात महानगरपालिका क्षेत्रात जमीन महसूल व बिनशेतसारा महसुलाचा भाग किती याची माहिती वेगळी उपलब्ध नसल्याने अतिरिक्त निधीचे अंदाज काढता आले नाहीत. तरीपण ढोबळमानाने केलेले अतिरिक्त अनुदानाचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत. जमीन महसुलाच्या उत्पन्न वाढीचा दर जवळजवळ स्थिर असल्याने, या बाबीपासून पुढील कालावधीत नागरी संस्थांना मिळणारे अनुदानही स्थिर राहील असे गृहीत धरले आहे.

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका .. | २६७.२६ | २६७.३६ | २६७.३६ | २६७.३६ | १०६९.४४ |
| नगरपरिषदा– | | | | | |
| अ-वर्ग .. | ७.८५ | ७.८५ | ७.८५ | ७.८५ | ३१.४० |
| ब-वर्ग .. | ४.३६ | ४.३६ | ४.३६ | ४.३६ | १७.४४ |
| क-वर्ग .. | ५.२३ | ५.२३ | ५.२३ | ५.२३ | २०.९२ |
| एकूण .. | २८४.८० | २८४.८० | २८४.८० | २८४.८० | ११३९.२० |

**(४) करमणूक करातील हिस्सा**

१३.४२. हा कर राज्य शासन आकारते. सर्व नगरपरिषदांना त्यांच्या हद्दीत, मागील वर्षात गोळा झालेल्या करमणूक कराच्या रकमेमधून, विशिष्ट टक्केवारीने या करातील हिस्सा अनुदान रूपाने देण्यात येतो. सध्याची वर्गनिहाय टक्केवारी अ-वर्ग नगरपरिषदा ३० टक्के, ब-वर्ग ३५ टक्के,क-वर्ग ४० टक्के तर महानगरपालिकांना १० टक्के अशी आहे. वास्तविक पाहता करमणूक कर हा स्थानिक कर म्हणून ओळखला जातो. नागरी संस्थांच्या साधनसंपत्तीबाबत पूर्वी ज्या समित्या व आयोगांनी अभ्यास केला आहे, त्यांनी सुद्धा करमणूक कर स्थानिक स्तरावर आकारावयाचा कर आहे व त्यापासूनचे उत्पन्न स्थानिक संस्थांना मिळावे असे निर्देशित केले होते. तरीपण राज्य शासनाचे उत्पन्न व नागरी संस्थांचे उत्पन्न यात समतोल राखला जाईल हे विचारात घेऊन आयोगाची अशी शिफारस आहे की, करमणूक करापोटी त्या त्या संस्थांच्या क्षेत्रात गोळा होणाऱ्या करातील वाटा " शासन करातील हिस्सा " म्हणून अ-वर्ग नगरपरिषदांना ५० टक्के, ब-वर्ग नगरपरिषदांना ९० टक्के, क-वर्ग नगरपरिषदांना १०० टक्के तर महानगरपालिकांना २५ टक्के या सुधारित दराने द्यावा. या कराच्या हिश्शापोटी नागरी संस्थांना मिळणाऱ्या अतिरिक्त निधीचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत :—

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका .. | ७७६.२४ | ८३०.५८ | ८८८.७२ | ९५०.९३ | ३४४६.४७ |
| नगरपरिषदा– | | | | | |
| अ-वर्ग .. | २३५.८५ | २५३.३६ | २७०.०३ | २८८.९३ | १०४७.१७ |
| ब-वर्ग .. | ४०८.४० | ४३६.९९ | ४६७.५८ | ५००.३१ | १८१३.२८ |
| क-वर्ग .. | २३८.७१ | २५५.४२ | २७३.३० | २९२.४३ | १०५९.८६ |
| एकूण .. | १६५९.२० | १७७५.३५ | १८९९.६३ | २०३२.६० | ७३६६.७८ |

## (५) रस्ता अनुदान

१३.४३. मोटार वाहन कराद्वारे राज्य शासनाला मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातील १० टक्के रक्कम वेगळी काढून ती सर्व नागरी संस्थाना (मुंबई वगळून) लोकसंख्येच्या आधारावर रस्ता अनुदान म्हणून दिली जाते. या संदर्भात आयोगाची अशी शिफारस आहे की, यापुढे मोटार वाहन कराच्या निव्वळ उत्पन्नातील २५ टक्के रक्कम वेगळी काढून ती सर्वच नागरी संस्थांना मुंबईसह लोकसंख्येच्या आधारावर " करातील हिस्सा " म्हणून वितरीत करण्यात यावी. ज्या नागरी संस्था पूर्वी मोटार वाहन कर वसूल करीत होत्या, परंतु १९५८ च्या मोटार वाहन कायद्यानुसार त्यांना या वसुलीस मनाई करण्यात आली त्यांना जे मोटार वाहन कर अनुदान, नुकसान भरपाईच्या स्वरूपात दिले जाते, ते यापुढेही चालू राहील. मुंबई महानगरपालिकेला त्याच्या क्षेत्रात व्हील टॅक्स पासून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त हे रस्ता अनुदान मिळेल. मुंबई शहराचे प्रश्न वेगळ्या दृष्टीने महत्वाचे असल्याने त्यासाठी पूर्वी न मिळणारा हा वाटा आयोगाने प्रस्तावित केला आहे. या शिफारशीमुळे नगरपरिषदांना व महानगरपालिकांना मिळणाऱ्या अतिरिक्त निधीचे अंदाज खालीलप्रमाणे आहेत.

(रुपये लाखात)

| नागरी संस्था | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | १,४५६.३२ | १,५५८.२६ | १,६६७.३४ | १,७४८.०५ | ६,४२९.९७ |
| नगरपरिषदा– | | | | | |
| अ-वर्ग .. | ९००.०० | ९६३.०० | १०३०.४१ | ११००.५४ | ३,९९५.९५ |
| ब-वर्ग .. | ५३२.८४ | ५७०.१४ | ६१०.०५ | ६५२.७५ | २,३६५.७८ |
| क-वर्ग .. | ७०३.१४ | ७५२.३६ | ८०५.०२ | ८६१.३८ | ३,१२१.९० |
| एकूण .. | ३,५९२.३० | ३,८४३.७६ | ४,११२.८२ | ४,३६४.७२ | १५,९१३.६० |

## (६) मुद्रांक शुल्क अनुदान

१३.४४. नगरपरिषदा क्षेत्रातील स्थावर मालमत्ता हस्तांतराच्या संदर्भातील लेख्यांच्या प्रतिभूत रकमेवर महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या कलम १४७-अ नुसार अर्धा टक्का या दराने अधिभार आकारला जातो. तो नगरपरिषदांना अनुदान म्हणून दिला जातो. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १५८ अन्वये १ टक्का या दराने गोळा केलेल्या अतिरिक्त रकमेचे वाटप पंचायत राज संस्थांना मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदान म्हणून केले जाते. पंचायत राज संस्था आणि नागरी संस्था यामध्ये समानता रहावी म्हणून आयोगाची अशी शिफारस आहे की, नागरी संस्थांचे बाबतीतही अधिभाराची टक्केवारी अर्धा टक्क्यावरून वाढवून १ टक्का करावी व त्याची रक्कम नगरपरिषदांना देण्यात यावी, महानगरपालिकांना सध्या हे अनुदान मिळत नाही, महानगरपालिका क्षेत्रातही १ टक्का याप्रमाणे अधिभार लावण्याची तरतूद करून ती रक्कम महानगरपालिकांनाही देण्यात यावी अशी आयोगाची शिफारस आहे. सध्या नागपूर सुधार प्रन्यास याला $^1/_2$ टक्का याप्रमाणे मुद्रांक शुल्क अनुदान देण्यात येते. आयोगाची अशी शिफारस आहे की, नागपूर सुधार प्रन्यासाचे वरील अनुदान चालू ठेऊन, प्रस्तावाप्रमाणे जी अतिरिक्त रक्कम उपलब्ध होईल ती नागपूर महानगरपालिकेला द्यावी. मुद्रांक शुल्क अधिभाराच्या या शिफारशीमुळे नगरपरिषदांना मिळणाऱ्या अतिरिक्त अनुदानाचे अंदाज खाली दिले आहेत. महानगरपालिकांच्या संदर्भात आकडेवारी उपलब्ध नसल्याने अतिरिक्त अनुदानाचे अंदाज काढता आले नाहीत. परंतु ते भरीव अनुदान असेल.

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | .. | | | माहिती उपलब्ध नाही. | | |
| नगरपरिषदा– | | | | | | |
| अ-वर्ग | .. | २५.१९ | २६.९५ | २८.८४ | ३०.८६ | १११.८४ |
| ब-वर्ग | .. | २६.३३ | २८.१८ | ३०.१५ | ३२.२६ | ११६.९२ |
| क-वर्ग | .. | ६२.९७ | ६७.३८ | ७२.०९ | ७७.१४ | २७९.५८ |
| एकूण | .. | ११४.४९ | १२२.५१ | १३१.०८ | १४०.२६ | ५०८.३४ |

### (७) गौण खनिज अनुदान

१३.४५. हे अनुदान फक्त क-वर्ग नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रात गौण खनिजापासून गोळा होणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेतून रु. १ लाख या मर्यादेपर्यंत दिले जाते. हे अनुदान यापुढेही असेच चालू ठेवण्यात यावे. परंतु अनुदानासाठीची सध्याची कमाल मर्यादा रु. ५ लाखापर्यंत वाढवावी अशी आयोगाची शिफारस आहे. स्वामित्वधन रु. १ लाख पेक्षा जास्त असणाऱ्या संस्थांची संख्या राज्यात केवळ ५-६ असल्याचे समजते. तेव्हा या वाढीमुळे या ५-६ क-वर्ग नगरपरिषदांना जास्तीत जास्त अंदाजित रु. ६ लाख एवढे अतिरिक्त अनुदान मिळेल.

### (८) व्यवसाय कर अनुदान (शासन करातील हिस्सा)

१३.४६. व्यवसाय कर मुळात स्थानिक संस्थांचा कर म्हणून लावण्यात येत होता आणि पूर्वी काही नागरी संस्था हा कर आकारीतही होत्या. मात्र १९७५ पासून हा कर राज्य शासनाने रोजगार हमी योजनेसाठी अतिरिक्त निधी प्राप्त व्हावा या उद्देशाने स्वतःकडे घेतला. ज्या नागरी संस्था हा कर त्यांच्या क्षेत्रात आकारीत होत्या, त्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून आजही काही ठराविक अशी अत्यल्प रक्कम राज्य शासनाकडून दिली जाते. या व्यतिरिक्त ह्या करातून कोणतेही अनुदान/वाटा स्थानिक संस्थांना देण्यात येत नाही. या करापासून राज्य शासनाला नागरी क्षेत्रात आणि ग्रामीण क्षेत्रात किती रक्कम प्राप्त होते अशी फोड देणारी आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही. मात्र नागरी क्षेत्रात या करापासूनच्या उत्पन्नाचे प्रमाण ९० टक्के असून ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे ते १० टक्के आहे असे विक्रीकर खात्याकडून सांगण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिती व मुळात हा कर या स्थानिक संस्थांचा होता हे लक्षात घेता आयोगाची अशी शिफारस आहे की, या कराच्या निव्वळ उत्पन्नातून १० टक्के रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यासाठी वेगळी काढावी आणि त्यातील ८० टक्के वाटा नागरी संस्थांना तर २० टक्के वाटा ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या आधारावर दरडोई प्रमाणात वितरीत करण्यात यावा. ग्रामीण भागात व्यवसाय कर वसुलीचे प्रमाण १० टक्के असले तरी ग्रामीण भागाची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता २० टक्के वाटा ग्रामपंचायतींना द्यावा असा आयोगाचा प्रस्ताव आहे. ह्या करातील जी रक्कम स्थानिक संस्थांमध्ये वाटली जाईल ती " करातील हिस्सा " म्हणून असेल. आयोगाकडे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार राज्याला १९९६-९७ मध्ये या करापासून रु. ३३६ कोटी एवढे उत्पन्न अपेक्षित आहे. वर सुचविल्याप्रमाणे नागरी संस्थांना या करातील हिस्सा म्हणून किती रक्कम प्राप्त होईल याचा अंदाज घेतला असून तो खालीलप्रमाणे असेल. या अतिरिक्त निधीशिवाय सध्या ज्या ज्या नागरी संस्थांना नुकसान भरपाई म्हणून काही रक्कम दिली जाते ती पुढेही चालू राहील.

(रुपये लाखात)

| नागरी संस्था | | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | .. | १,६८८.६९ | १,८०६.८९ | १,९३३.२८ | २,०६८.७२ | ७,४९७.५८ |
| नगरपरिषदा— | | | | | | |
| अ-वर्ग | .. | ४३३.१७ | ४६३.४९ | ४९५.९४ | ५३०.६५ | १,९२३.२५ |
| ब-वर्ग | .. | २५६.१६ | २८३.७२ | ३०३.५८ | ३२४.८३ | १,१७७.२९ |
| क-वर्ग | .. | ३०६.७२ | ३२८.१९ | ३५१.१६ | ३७५.७५ | १,३६१.८२ |
| एकूण | | २,६९३.७४ | २,८८२.२९ | ३,०८३.९६ | ३,२९९.९५ | ११,९५९.९४ |

(९) झोपडपट्टी सुधार अनुदान

१३.४७. राज्यातील नागरी भागात काही निवडक शहरांमध्ये (अंदाजे ६१) शासनाचे वतीने झोपडपट्टी सुधार योजना राबविली जाते. या शहरातील घोषित झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी केलेल्या भांडवली खर्चापोटी दरडोई रु. ५०० प्रमाणे शासनाकडून सहाय्यक अनुदान संबंधित नागरी संस्थांना दिले जात होते. ही खर्चाची मर्यादा दिनांक १ एप्रिल १९९६ पासून दरडोई रु. ८०० पर्यंत वाढविली आहे. यात मुंबई व पुणे या महानगरपालिकांचा समावेश नाही. अनेक शहरात घोषित झोपडपट्ट्यांबरोबरच अघोषित झोपडपट्ट्यांमध्येही बरीच वाढ झाली आहे व या झोपडपट्टीमध्ये सेवा-सुविधा पुरविण्यासाठी या नागरी संस्थांवर दबाव वाढत आहे. त्यामुळे या संस्थांचा खर्चही वाढला आहे. ही वाढीव खर्चाची पूर्तता होण्यासाठी सध्याची रु. ८०० ही मर्यादा वाढवून, ती रु. १२००ते रु. १५०० करावी अशी नागरी संस्थांची मागणी असली तरी, ही मर्यादा रु. १००० करावी अशी आयोगाची शिफारस आहे.

(१०) गिरीस्थान नगरपरिषदांना विशेष अनुदान

१३.४८. राज्यातील गिरीस्थान नगरपरिषदांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण प्रकरण ५ मधील परिच्छेद ५.१८० ते ५.१८४ मध्ये केले आहे. राज्यात ६ गिरीस्थान नगरपरिषदा (माथेरान, पांचगणी, महाबळेश्वर, पन्हाळा, खुल्दाबाद, चिखलदरा) आहेत व त्या सर्व क वर्गात मोडतात. या नगरपरिषदांची स्थानिक लोकसंख्या कमी असली तरी पर्यटकांची सतत वर्दळ लक्षात घेता त्यांची लोकसंख्या इतर संस्थांच्या तुलनेत नेहमीच जास्त असते. ही प्रेक्षणीय स्थळे असल्याने त्यांच्या गरजाही इतरांपेक्षा थोड्या वेगळ्या प्रकारच्या आहेत. राज्य शासनाचे पर्यटनाला महत्त्व देण्याचे धोरण त्याचबरोबर उत्पन्न वाढीसाठी या संस्थांना फारसा वाव नाही हे विचारात घेता या संस्थांना पर्यटकांसाठी वेगवेगळ्या सोई सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. आयोग या दृष्टिकोनातून प्रत्येकी दरवर्षी रु. १० लाख एवढे विशेष असे '' पर्यटन विकास अनुदान '' द्यावे अशी आयोगाची शिफारस आहे. हे अनुदान त्यांना मिळत असलेल्या इतर अनुदानाव्यतिरिक्त असेल. यामुळे या ६ संस्थांना दरवर्षी एकूण रु. ६०.०० लाख अतिरिक्त मिळतील.

(११) प्राथमिक शिक्षण अनुदान

१३.४९. राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांना प्राथमिक शिक्षणाच्या मान्य बाबींवरील खर्चाच्या खाली नमूद केलेल्या टक्केवारीप्रमाणे प्राथमिक शिक्षण अनुदान वितरीत करण्यात येते. या टक्केवारीत अ व ब वर्गासाठी १० टक्के ने वाढ करावी अशी आयोगाची शिफारस आहे. महानगरपालिकांच्या व क-वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत सध्या ज्या दराने अनुदान दिले जाते, तेच यापुढे चालू रहावे. मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण अनुदानाच्या सध्याच्या २० टक्के दरात १९९५-९६ पासून दरवर्षी ५ टक्क्याने वाढ करून २०००-२००१ पर्यंत तो दर ५० टक्के इतका करावयाचा आहे. या संदर्भात आयोगाची अशी शिफारस आहे की, मुंबई महानगरपालिकेलाही प्राथमिक शिक्षण अनुदान टप्प्याटप्प्याने न वाढविता १९९७-९८ पासूनच इतर महानगरपालिकांसारखे ५० टक्के प्रमाणे देण्यात यावे.

| महानगरपालिका/ नगरपरिषदा | | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| अ-वर्ग | .. | ८० टक्के | ९० टक्के |
| ब-वर्ग | .. | ९० टक्के | १०० टक्के |
| क-वर्ग | .. | १०० टक्के | १०० टक्के |
| महानगरपालिका | .. | ५० टक्के | ५० टक्के |

(१२) प्रोत्साहनात्मक अनुदान (इन्सेन्टिव्ह ग्रँट)

१३.५०. उपरोल्लेखित अनुदाने ही काही विशिष्ट प्रयोजनासाठी देण्यात यावयाची आहेत व त्यांचा संबंध, काही अनुदानाचा अपवाद वगळता, त्या संस्थांच्या कार्यक्षमतेशी निगडीत केलेला नाही. या संस्थांच्या व्यवस्थापनात सुधारणा होऊन त्यांच्या साधनसंपत्तीत वाढ व्हावी आणि प्रशासकीय कार्यक्षमता गतीमान करून नागरिकांना पुरेशा सेवासुविधा

उपलब्ध व्हाव्यात या हेतूने खाली दर्शविलेल्या अटींवर प्रोत्साहनात्मक अनुदान खालीलप्रमाणे द्यावे अशी आयोगाची शिफारस आहे :—

| नागरी स्थानिक संस्था | प्रोत्साहनात्मक अनुदानाची रक्कम | अनुदानासाठी किमान विहित अटी |
|---|---|---|
| महानगरपालिका | प्रत्येकी रु. १ कोटी | (१) शहरातील पाणीपुरवठ्यावरील होणाऱ्या महसुली खर्चाची * १९९७-९८ मध्ये ७० टक्के, १९९८-९९ मध्ये ८० टक्के, १९९९-२००० मध्ये ९० टक्के व २०००-२००१ मध्ये १०० टक्के वसुली पाणीपट्टीपासून व्हावी. |
| अ-वर्ग नगरपरिषदा | प्रत्येकी रु. ४० लाख | (२) मालमत्ता कराची वसुली एकूण मागणीच्या (थकबाकीच्या मागणीसह) ८० टक्के व्हावी. |
| ब-वर्ग नगरपरिषदा | प्रत्येकी रु. २५ लाख | (३) मालमत्ता कराची वसुली एकूण मागणीच्या (थकबाकीच्या मागणीसह) ८० टक्के व्हावी. |
| क-वर्ग नगरपरिषदा | प्रत्येकी रु. १५ लाख | (४) करेतर उत्पन्नात दरवर्षी २५ टक्के नी वाढ व्हावी. |

* पाणी पुरवठ्यावरील खर्चामध्ये योजना चालविण्याचा खर्च, देखभाल दुरुस्ती, पाणी खरेदी, आस्थापना इत्यादीच्या खर्चाचा समावेश असेल. परंतु कर्ज परतफेडीचा समावेश नसेल. या खर्चाची वसुली वर नमूद केलेल्या टक्केवारीप्रमाणे व्हावी.

**अन्य बाबी**

१३.५१. (१) नागरी संस्थांनी त्यांच्या क्षेत्रात पायाभूत सेवा सुविधांमध्ये तातडीने वाढ करण्याची आवश्यकता आहे हे आयोगाचे लक्षात आले आहे. राज्य शासनाने यासाठी स्वतंत्र विशेष असा " नागरी विकास निधी " निर्माण करावा व यासाठी जागतिक बँकेकडून योग्य असे सहाय्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावा.

(२) बदलत्या आर्थिक संकल्पना लक्षात घेता आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या नागरी संस्थांनी बाजारात पदार्पण करून विकास कार्यासाठी अतिरिक्त निधी उभारण्यासाठीही आता योग्य वेळ आली आहे. या संदर्भात काही महानगरपालिकांनी यापूर्वीच उचललेली पावले निश्चितच उल्लेखनीय आहेत. तेव्हा शासनाने आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या नागरी संस्थांना त्यांच्या कार्यक्रमाची गुणवत्ता विचारात घेऊन अशा प्रस्तावांना उत्तेजन देण्याची आवश्यकता आहे.

(३) मुंबई या शहराचे महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात विशेष असे स्थान आहे. जगातील मोठ्या शहरांमध्ये मुंबई हे एक महत्त्वाचे व प्रमुख शहर म्हणून ओळखले गेले आहे. या शहराचे महत्त्व व त्याची आंतरराष्ट्रीय किर्ती जोपासणेच आवश्यक नाही तर त्यात सुधारणा करण्याचीही तितकीच आवश्यकता आहे. आयोगाचा असा दृष्टिकोन आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात पायाभूत नागरी सेवासुविधांचा जो दर्जा आहे, तो देशात उत्कृष्ट असावा एवढेच नव्हे तर तो आंतरराष्ट्रीय दर्जाशी तौलनिक असा असावा. मुंबई महानगरपालिकेला स्वतःच्या उत्पन्नाची बरीच साधने आहेत. असे असले तरी तिच्या गरजा देखिल फार मोठ्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या वरील बाबींसाठीच्या गरजांची दखल घेऊन आयोगाने काही अतिरिक्त निधी देण्याबद्दलच्या शिफारशी वरील परिच्छेदात केलेल्या आहेत. आयोगाला अशी आशा आहे की, अशा प्रकारची नवी साधने महानगरपालिकेला देखिल नागरी जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी स्वतःचे उत्पन्न वाढविण्यास उद्युक्त करतील.

१३.५२. आयोगाच्या उपरोक्त शिफारशीनुसार नागरी संस्थांना शासन कराचा हिस्सा/अनुदाने याद्वारे मिळणाऱ्या अतिरिक्त निधीचा एकत्रित तपशिल अनुदाननिहाय खालील तक्ता क्र. १३.९ मध्ये दाखविला आहे.

## तक्ता क्रमांक १३.९

## वित्त आयोगाच्या शिफारशीप्रमाणे नागरी संस्थांना मिळणाऱ्या अतिरिक्त अनुदान/करातील हिस्स्याचे अंदाज

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | शासकीय कराचा हिस्सा/ अनुदानाचा प्रकार | नागरी संस्था | १९९४-९५ मध्ये दिलेली रक्कम | अतिरिक्त निधीचे अंदाज | | | | | एकूण (५ + ६ ७ + ८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | महागाई भत्ता .. | महानगरपालिका | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | २,९६३.०० | ... | ४२४.०० | ४५४.०० | ४८६.०० | ५२०.०० | १,८८४.०० |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | २,०९३.०० | ... | ४२३.०० | ४५३.०० | ४८५.०० | ५१९.०० | १,८८०.०० |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | २,३२८.०० | ... | २९६.०० | ३१७.०० | ३३९.०० | ३६३.०० | १,३१५.०० |
| | | एकूण .. | ७,३८४.०० | ... | १,१४३.०० | १,२२४.०० | १,३१०.०० | १,४०२.०० | ५,०७९.०० |
| २ | मुख्याधिकारी वेतन व भत्ते .. | क-वर्ग नगरपरिषदा | ४०.०० | ... | १२८.६८ | १३७.६९ | १४७.३२ | १५७.६४ | ५७१.३३ |
| ३ | जमीन महसूल व बिन शेतसारा अनुदान | महानगरपालिका | ५५७.०० | ... | २६७.३६ | २६७.३६ | २६७.३६ | २६७.३६ | १,०६९.४४ |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | ३५.७२ | ... | ७.८५ | ७.८५ | ७.८५ | ७.८५ | ३१.४० |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | १९.९५ | ... | ४.३६ | ४.३६ | ४.३६ | ४.३६ | १७.४४ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | २४.३५ | ... | ५.२३ | ५.२३ | ५.२३ | ५.२३ | २०.९२ |
| | | एकूण .. | ६३७.०२ | ... | २८४.८० | २८४.८० | २८४.८० | २८४.८० | १,१३९.२० |
| ४ | करमणूक कर (करातील हिस्सा) | महानगरपालिका | ४५२.०० | ... | ७७६.२४ | ८३०.५८ | ८८८.७२ | ९५०.९३ | ३,४४६.४७ |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | ३०९.०० | ... | २३५.८५ | २५२.३६ | २७०.०३ | २८८.९३ | १,०४७.१७ |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | २२७.०० | ... | ४०८.४० | ४३६.९९ | ४६७.५८ | ५००.३१ | १,८१३.२८ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | १३९.०० | ... | २३८.७१ | २५५.४२ | २७३.३० | २९२.४३ | १,०५९.८६ |
| | | एकूण .. | १,१२७.०० | ... | १,६५९.२० | १,७७५.३५ | १,८९९.६३ | २,०३२.६० | ७,३६६.७८ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | रस्ता अनुदान (मोटार वाहन करातील हिस्सा) | महानगरपालिका | ८४८.०० | ... | १,४५६.३२ | १,५५८.२६ | १,६६७.३४ | १,७४८.०५ | ६,४२९.९७ |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | ५२४.०६ | ... | ९००.०० | ९६३.०० | १,०३०.४१ | १,१०२.५४ | ३,९९५.९५ |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | ३१०.२७ | ... | ५३२.८४ | ५७०.१४ | ६१०.०५ | ६५२.७५ | २,३६५.७८ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | ४०९.४३ | ... | ७०३.१४ | ७५२.३६ | ८०५.०२ | ८६१.३८ | ३,१२१.९० |
| | | एकूण .. | २,०९१.७६ | ... | ३,५९२.३० | ३,८४३.७६ | ४,११२.८२ | ४,३६४.७२ | १५,९१३.६० |
| ६ | मुद्रांक शुल्क अनुदान .. | महानगरपालिका | | | माहितीअभावी अंदाज देता येत नाही | | | | |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | २२.०० | ... | २५.१९ | २६.९५ | २८.८४ | ३०.८६ | १११.८४ |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | २३.०० | ... | २६.३३ | २८.१८ | ३०.१५ | ३२.२६ | ११६.९२ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | ५५.०० | ... | ६२.९७ | ६७.३८ | ७२.०९ | ७७.१४ | २७९.५८ |
| | | एकूण .. | १००.०० | ... | ११४.४९ | १२२.५१ | १३१.०८ | १४०.२६ | ५०८.३४ |
| ७ | गौण खनिज अनुदान .. | क-वर्ग नगरपरिषदा | २४.४० | ... | ६.०० | ६.०० | ६.०० | ६.०० | २४.०० |
| ८ | व्यवसाय करातील हिस्सा .. | महानगरपालिका | ... | ... | १,६८८.६९ | १,८०६.८९ | १,९३३.२८ | २,०६८.७२ | ७,४९७.६८ |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | ४३३.१७ | ४६३.४९ | ४९५.९४ | ५३०.६५ | १,९२३.२५ |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | २६५.१६ | २८३.७२ | ३०३.५८ | ३२४.८३ | १,१७७.२९ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | ३०६.७२ | ३२८.१९ | ३५१.१६ | ३७५.७५ | १,३६१.८२ |
| | | एकूण .. | ... | ... | २,६९३.७४ | २,८८२.२९ | ३,०८३.९६ | ३,२९९.९५ | ११,९५९.९४ |

## तक्ता क्रमांक १३.९—पुढे चालू

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक (१) | शासकीय कराचा हिस्सा/ अनुदानाचा प्रकार (२) | नागरी संस्था (३) | १९९४-९५ मध्ये दिलेली रक्कम (४) | अतिरिक्त निधीचे अंदाज १९९६-९७ (५) | १९९७-९८ (६) | १९९८-९९ (७) | १९९९-२००० (८) | २०००-२००१ (९) | एकूण (५ + ६ ७ + ८) (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | गौण खनिज अनुदान .. | क-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | ६०.०० | ६०.०० | ६०.०० | ६०.०० | २४०.०० |
| १० | शिक्षण अनुदान .. | महानगरपालिका व नगरपरिषदा | माहितीअभावी अंदाज देता येत नाही | | | | | | |
| | एकूण .. | महानगरपालिका | ... | ... | ४,१८८.६१ | ४,४६३.०९ | ४,७५६.७० | ५,०३५.०६ | १८,४४३.४६ |
| | | अ-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | २,०२६.०६ | २,१६७.६५ | २,३१९.०७ | २,४८०.८३ | ८,९९३.६१ |
| | | ब-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | १,६६०.०९ | १,७७६.३९ | १,९००.७२ | २,०३३.५१ | ७,३७०.७१ |
| | | क-वर्ग नगरपरिषदा | ... | ... | १,८०७.४५ | १,९२९.२७ | २,०५९.१२ | २,१९८.५७ | ७,९९४.४१ |
| | | एकूण .. | ... | ... | ९,६८२.२१ | १०,३३६.४० | ११,०३५.६१ | ११,७४७.९७ | ४२,८०२.१९ |

१३.५३. नागरी संस्थांना सध्याच्या पद्धतीनुसार मिळणारी अनुदाने तसेच वरील शिफारशीनुसार तक्ता क्र. १३.९ मधील अतिरिक्त अनुदाने लक्षात घेऊन एकूण मिळणारी अनुदाने इत्यादीचा तपशिल नागरी संस्थानिहाय खालील तक्ता क्र. १३.१० मध्ये दाखविला आहे. परिच्छेद क्र. १३.४४ व १३.४९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकांना मुद्रांक शुल्क अनुदान व सर्वच नागरी संस्थांना शिक्षण अनुदानापोटी मिळणारी अनुदाने यात समाविष्ट नाहीत. ती तक्ता क्र. १३.८ मध्ये दिलेल्या अनुदाना व्यतिरिक्त या संस्थांना देय असतील.

## तक्ता क्र. १३.१०

### वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार नागरी संस्थांच्या एकूण अनुदानाचे अंदाज

(रु. लाखांत)

| नागरी संस्था | १९९४-९५ | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) महानगरपालिका .. | १२,२१७.७६ | १३,०७३.०० | १३,९८८.११ | १९,१५५.८९ | २०,४७८.०८ | २१,८९२.७४ | २३,३७०.६२ |
| (२) नगरपरिषदा | | | | | | | |
| अ वर्ग .. .. | ४,३६४.९१ | ४,६७०.४५ | ४,९९७.३९ | ७,३७३.२६ | ७,८८९.१५ | ८,४४१.०७ | ९,०३१.३८ |
| ब वर्ग .. .. | ३,३८९.०३ | ३,६२६.२६ | ३,८८०.१० | ५,८११.८० | ६,१९९.७२ | ६,५५४.०१ | ७,११९.५३ |
| क वर्ग .. .. | ३,८७७.५१ | ४,१४८.९४ | ४,४३९.३६ | ६,५५७.५७ | ७,०११.८९ | ७,४९७.५१ | ८,०१७.६६ |
| एकूण नगरपरिषदा .. | ११,६३१.४५ | १२,४४५.६५ | १३,३१६.८५ | १९,७२४.६३ | २१,१००.७६ | २२,५९२.६० | २४,१६८.५७ |
| एकूण (मनपा/नप) (१ + २) .. | २३,८४९.२१ | २५,५१८.६५ | २७,३०४.९६ | ३८,८९८.५२ | ४१,५७८.८४ | ४४,४८५.३४ | ४७,५३९.१९ |

टीप.—(१) अतिरिक्त अनुदानाच्या रकमांमध्ये सर्वच नागरी संस्थांच्या शिक्षण अनुदानासाठीच्या रकमांचे निर्धारण समाविष्ट नाही, तर महानगरपालिकांच्या बाबतीत अतिरिक्त रकमांमध्ये मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रकमा समाविष्ट नाहीत.

(२) नागरी संस्थांच्या आकडेवारीवरून सध्याच्या अनुदानाचे अंदाज व त्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधी धरून वरील आंकडेवारी काढली आहे.

१३.५४. आयोगाच्या शिफारशींपूर्वी व शिफारशींनंतर नागरी स्थानिक संस्थांची वित्तीय स्थिती कशी असेल त्याची माहिती खालील तक्ता क्र. १३.११ मध्ये दाखविली आहे.

## तक्ता क्रमांक १३.११

### आयोगाच्या शिफारशीपूर्वी आणि शिफारशीनंतर निधी वितरणाची अपेक्षित स्थिती

(रु. कोटीत)

| संस्था | बाब | शिफारशीपूर्वी | | | शिफारशीनंतर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०–९१ | १९९४–९५ | १९९६–९७ | १९९७–९८ | १९९८–९९ | १९९९–२००० | २०००–२००१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| (१) म. न. पा. | स्वतःचे उत्पन्न .. | १,२६६.१४ | २,३६७.७० | ३,३४२.१५ | ३,९५२.४१ | ४,६६४.९० | ५,५१५.०३ | ६,५०२.६४ |
| | सध्याची अनुदाने .. | ७९.९१ | १२२.१८ | १३९.८८ | १४९.६७ | १६०.१५ | १७१.३६ | १८३.३६ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिकत निधीचे अंदाज | ... | ... | ... | ४१.८९ | ४४.६३ | ४७.५७ | ५०.३५ |
| | एकूण उत्पन्न .. | १,३४६.०५ | २,४८९.८८ | ३,४८२.०३ | ४,१४३.९७ | ४,८६९.६८ | ५,७३३.९६ | ६,७३६.३५ |
| | एकूण खर्च .. | १,४०९.८२ | २,७०३.६६ | ४,४५७.५६ | ५,१०३.७९ | ५,९१४.११ | ६,४९१.४० | ६,९२९.८० |
| | तफावत .. | ६३.७६ | २१३.७८ | ९७५.५३ | ९५९.८२ | १,०४४.४३ | ७५७.४४ | १९३.४५ |

| संस्था | बाब | शिफारशीपूर्वी | | | शिफारशीनंतर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९०-९१ | १९९४-९५ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| (२) 'अ' वर्ग | स्वतःचे उत्पन्न .. | १२०.५० | २३७.७० | ३३०.९७ | ३९०.५५ | ४६०.८५ | ५४३.८० | ६४१.६८ |
| | सध्याची अनुदाने .. | ४१.०० | ४३.६५ | ४९.९७ | ५३.४७ | ५७.२१ | ६१.२२ | ६५.५१ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | २०.२६ | २१.६८ | २३.१९ | २४.८१ |
| | एकूण उत्पन्न .. | १६१.५० | २८१.३५ | ३८०.९४ | ४६४.२८ | ५३९.७४ | ६२८.२१ | ७३२.०० |
| | एकूण खर्च .. | १६८.९९ | २८९.९७ | ४४९.६१ | ५११.९४ | ५८३.३६ | ६६५.१५ | ७५८.८५ |
| | तफावत .. | ७.४९ | ८.६२ | ६८.६७ | ४७.६६ | ४३.६२ | ३६.९४ | २६.८५ |
| (३) 'ब' वर्ग | स्वतःचे उत्पन्न .. | ५४.८६ | ११५.१६ | १५४.९६ | १७९.७५ | २०८.५१ | २४१.८८ | २८०.५८ |
| | सध्याची अनुदाने .. | २७.५६ | ३३.८९ | ३८.८० | ४१.५२ | ४४.२३ | ४७.५३ | ५०.८६ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | १६.६० | १७.७६ | १९.०१ | २०.३३ |
| | एकूण उत्पन्न .. | ८२.४२ | १४९.०५ | १९३.७६ | २३७.८७ | २७०.५० | ३०८.४२ | ३५१.७७ |
| | एकूण खर्च .. | ८९.५७ | १५३.७५ | २४४.८९ | २७७.९९ | ३१६.३३ | ३६०.८३ | ४१२.६७ |
| | तफावत .. | ७.१५ | ४.७० | ५१.१३ | ४०.१२ | ४५.८३ | ५२.४१ | ६०.९० |
| (४) 'क' वर्ग | स्वतःचे उत्पन्न .. | ४५.३० | ८६.३५ | ११६.१९ | १३४.७८ | १५६.३५ | १८१.३६ | २१०.३८ |
| | सध्याची अनुदाने .. | ३०.९१ | ३८.७८ | ४४.३९ | ४७.५० | ५०.८३ | ५४.३८ | ५८.१९ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | १८.०७ | १९.२९ | २०.५९ | २१.९९ |
| | एकूण उत्पन्न .. | ७६.२१ | १२५.१३ | १६०.५८ | २००.३५ | २२६.४७ | २५६.३३ | २९०.५६ |
| | एकूण खर्च .. | ८९.१२ | १३७.१२ | २०९.८३ | २३३.०५ | २५८.९२ | २८७.७६ | ३१९.९१ |
| | तफावत .. | १२.९१ | ११.९९ | ४९.२५ | ३२.७० | ३२.४५ | ३१.४३ | २९.३५ |
| (५) एकूण नगर-परिषदा (२+३+४) | स्वतःचे उत्पन्न .. | २२०.६६ | ४३९.२१ | ६०२.१२ | ७०५.०८ | ८२५.७१ | ९६७.०४ | १,१३२.६४ |
| | सध्याची अनुदाने .. | ९९.४७ | ११६.३२ | १३३.१७ | १४२.४९ | १५२.२७ | १६३.१४ | १७४.५६ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | ५४.९३ | ५८.७३ | ६२.७९ | ६७.१३ |
| | एकूण उत्पन्न .. | ३२०.१३ | ५५५.५३ | ७३५.२९ | ९०२.५० | १,०३६.७१ | १,१९२.९७ | १,३७४.३३ |
| | एकूण खर्च .. | ३४७.६८ | ५८०.८३ | ९०४.३३ | १,०२२.९८ | १,१५८.६१ | १,३१३.७४ | १,४९१.४३ |
| | तफावत .. | २७.५५ | २५.३० | १६९.०४ | १२०.४८ | १२१.९० | १२०.७७ | ११७.१० |
| एकूण महानगर-पालिका व नगरपरिषदा (१ + ५) | स्वतःचे उत्पन्न .. | १,४८६.८० | २,८०६.९२ | ३,९४४.२७ | ४,६५७.४९ | ५,४९०.६१ | ६,४८२.०७ | ७,६३५.२८ |
| | सध्याची अनुदाने .. | १७९.३७ | २३८.४९ | २७३.०५ | २९२.१६ | ३१२.४२ | ३३४.५० | ३५७.९१ |
| | आयोगाच्या शिफारशीनुसार अतिरिक्त निधीचे अंदाज | ... | ... | ... | ९६.८२ | १०३.३६ | ११०.३६ | ११७.४८ |
| | एकूण उत्पन्न .. | १,६६६.१८ | ३,०४५.४१ | ४,२१७.३२ | ५,०४६.४७ | ५,९०६.३९ | ६,९२६.९३ | ८,११०.६७ |
| | एकूण खर्च .. | ७५७.४९ | ३,२८४.४९ | ५,३६१.८९ | ६,१२६.७७ | ७,०७२.७२ | ७,८०५.१४ | ८,४२१.२३ |
| | तफावत (अ) .. | ९१.३१ | २३९.०८ | १,१४४.५७ | १,०८०.३० | १,१६६.३३ | ८७८.२१ | ३१०.५६ |
| | अधिक म. पा.पु. व ज. नि. मंडळ व म. औ. वि. मंडळाचे दायित्व (ब) | ... | ... | ... | ४८.५० | ४८.५० | ४८.५० | ४७.४२ |
| | तफावत (अ + ब) | ९१.३१ | २३९.०८ | १,१४४.५७ | १,१२८.८० | १.२१४.८३ | ९२६.७१ | ३५७.९८ |

१३.५५. वित्त आयोगाच्या उपरोक्त शिफारशी विचारात घेता पंचायत राज संस्था आणि नागरी संस्था यांना मिळणारी एकूण अनुदाने किंवा करांचा वाटा एकत्रितपणे तक्ता क्र. १३.१२ मध्ये दाखविला आहे. या तक्त्यावरून आयोगाच्या शिफारशींनुसार उत्पन्न व खर्चातील तफावत कितीने भरून काढली हे दिसून येईल. भरून न निघालेली तफावत या संस्थांनी स्वतःच्या उत्पन्नात शक्यतेवढी वाढ करून, भरून काढावी लागेल. त्याचबरोबर राज्य शासनाला या संस्थांच्या गरजांमुळे वाढणाऱ्या खर्चाचा अंदाज घेऊन व त्यात आवश्यक त्या सुधारणा करून तो पुढील केंद्रिय वित्त आयोगाला विचारार्थ सादर करावा लागेल.

**तक्ता क्र. १३.१२**

**पंचायत राज संस्था व नागरी संस्थांच्या उत्पन्न व खर्चाची अंतिम अंदाजित स्थिती**

(रु. कोटींत)

| बाब | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|
| **(१) पंचायत राज संस्था–** | | | | | |
| (अ) खर्च व उत्पन्नातील तफावत | ३६८.२५ | ३५२.९० | ३२६.८४ | २९६.५६ | २५८.३६ |
| (ब) शिफारशींनुसार अतिरिक्त करांचा हिस्सा / अनुदानाचे अंदाज. | .. | १९८.८७ | २१२.५२ | २२६.७५ | २४१.६७ |
| (क) निव्वळ तफावत (अ–ब) | ३६८.२५ | १५४.०३ | ११४.३२ | ६९.८१ | १६.६९ |
| **(२) नागरी संस्था–** | | | | | |
| (अ) खर्च व उत्पन्नातील तफावत (तक्ता क्र. १२.१२ प्रमाणे) | ११४४.५७ | १२२५.६२ | १३१८.१९ | १०३७.०७ | ४७५.४६ |
| (ब) शिफारशींनुसार अतिरिक्त करांचा हिस्सा / अनुदानाचे अंदाज. | .. | ९६.८२ | १०३.३६ | ११०.२६ | ११७.४८ |
| (क) निव्वळ तफावत (अ–ब) | ११४४.५७ | ११२८.८० | १२१४.८३ | ९२६.८१ | ३५७.९८ |
| **(३) एकूण–** | | | | | |
| (अ) पंचायत राज संस्था व नागरी संस्थांची एकूण तफावत. | १५१२.८२ | १५७८.५२ | १६४५.०३ | १३३३.६३ | ७३३.८२ |
| (ब) शिफारशींनुसार अतिरिक्त करांचा हिस्सा / अनुदानाचे अंदाज. | .. | २९५.६९ | ३१५.८८ | ३३७.०१ | ३५९.१५ |
| (क) निव्वळ तफावत (अ–ब) | १५१२.८२ | १२८२.८३ | १३२९.१५ | ९९६.६२ | ३७४.६७ |

□ □

## प्रकरण १४

# संकीर्ण

१४.१. पंचायत राज संस्थांच्या संदर्भात अनुच्छेद २४३-आय(१) (ब) व (क) तर नागरी संस्थांच्या बाबतीत अनुच्छेद २४३-वाय मधील तरतूदीच्या संदर्भात वित्त आयोगाच्या मते ज्या काही विविक्षित बाबींचा, पंचायत राज संस्था आणि नागरी संस्थांच्या आर्थिक व प्रशासकीय कार्यक्षमतेवर प्रभाव पडतो याचाही अभ्यास आयोगाने केला आहे. वरील तरतुदीनुसार नागरी संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि शासनाने आयोगाकडे सोपविलेल्या इतर बाबी किंवा या संस्थांची आर्थिक स्थिती सुदृढ होण्यासाठी आयोगाने उपाययोजना सुचवावयाच्या आहेत. या संस्थांच्या वित्तिय व प्रशासकीय बाबींशी निगडीत असलेल्या नियंत्रण व निरीक्षण, लेखा परिक्षण, सांख्यिकी, माहिती संचयिका, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि इतर बाबींचा यात समावेश आहे. त्याचबरोबर या स्थानिक संस्थांच्या प्रशासनात व कार्यपद्धतीत दृश्यता व पारदर्शकता कशी येईल याचाही आयोगाने विचार केला आहे. आयोगाला अशी आशा आहे की, आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी आधीच्या प्रकरणात दिलेल्या तसेच खाली दिलेल्याप्रमाणे झाल्यास त्यामुळे एक उत्तम असे प्रशासकीय व वित्तिय व्यवस्थापन निर्माण होईल व त्याचा फायदा पुढील वित्त आयोगाला होईल.

### नगरपालिका प्रशासन संचालनालयाची भूमिका

१४.२. महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ७४ अन्वये संचालक, नगरपालिका प्रशासन तसेच विभागीय व जिल्हा स्तरावर नगरपालिका प्रशासन यंत्रणा निर्माण करण्याची तरतूद आहे. महानगरपालिकांसाठी अशी तरतूद नाही.

महाराष्ट्र शासनाने १९६६ मध्ये नगरपालिका प्रशासन संचालनालयाची स्थापना केली व १९९३ मध्ये शासनाने स्वतंत्र अशा अधिकाऱ्याची संचालक नगरपालिका प्रशासन म्हणून नियुक्ती केली. तत्पूर्वी नगरविकास विभागाचे सचिव हे या संचालनालयाचे पदसिद्ध संचालक होते. विभागीय व जिल्हा स्तरावर विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी हे संचालनालयाच्या सर्वसाधारण देखरेखीखाली सध्या विविध कार्ये पार पाडतात. आतापर्यंतच्या कार्यपद्धतीवरून संचालनालय नगर परिषदांना अनुदानाचे वाटप व कर्मचाऱ्यांच्या काही नवीन पदांच्या निर्मितीस मान्यता देण्याचे काम व थोड्याफार प्रमाणात निरीक्षण व नियंत्रणाचे काम करीत आहे. तथापि संचालनालयाच्या कार्यालयातील तसेच विभागीय व जिल्हा स्तरावरील या संघटना कमकुवत व प्रभावहीन अशा दिसून आल्या. विभागीय व जिल्हा कार्यालयातील संचालनालयाच्या कक्षाचे व्यवस्थापन व नियंत्रण विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा संचालनालयाकडून प्रभाविपणे केले जात नाही. याचे एक कारण असे की, हे कक्ष संचालनालय व विभागीय आयुक्त वा जिल्हाधिकारी या दोन अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली येत असल्याने त्यावर दुहेरी नियंत्रण असते व दुसरे असे की, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त हे त्यांच्यावर सोपविलेल्या विविधांगी कार्ये व जबाबदाऱ्यांत पूर्णतः व्यस्त असतात. त्यामुळे नगरपालिका प्रशासन संचालनालय ही संघटना नागरी संस्थांच्या कामकाजावर देखरेखीची भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडू शकत नाही. **तेव्हा प्रभावी नियंत्रण व निरिक्षणाची भूमिका पार पाडण्यासाठी ही संघटना राज्य, विभागीय व जिल्हा स्तरावर अधिक बळकट करण्यात यावी असे आयोगाचे मत आहे. इतकेच नव्हे तर या संघटनेने नागरी संस्थांच्या विकासात्मक कार्याकडेही लक्ष ठेवले पाहिजे. नागरी संस्थांच्या**

**विविध कार्यावर देखरेख करण्याच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन संचालनालय तसेच विभागीय आयुक्तांचे व जिल्हाधिकारी कार्यालयांतील त्यांचे कक्ष योग्य त्या रितीने संघटित करून बळकट करण्यात यावे व त्यांनी संचालनालयाचे नियंत्रणाखालीच काम करावे** अशी आयोगाची शिफारस आहे. जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना काही वैधानिक अधिकार प्रदान केले असल्याने हे कक्ष त्यांच्या अधिपत्याखालीच काम करतील. परंतु प्रशासकीय नियंत्रण मात्र नगरपालिका प्रशासन संचालनालयाचेच असेल.

१४.३. आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, सध्या नगरपरिषदांची निरीक्षणे व तपासणी केली जाते ते वरवरचे व केवळ नित्याचे काम असून फार प्रभावी नाही. या निरीक्षण व तपासणीत प्रशासकीय व वित्तीय बाबींचा सखोल अभ्यास करण्याचा विशेष असा प्रयत्न केला जात नाही. या परिस्थितीला अनेक बाबी कारणीभूत आहेत. या कक्षात काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे बहुतेक महसूल विभागांतून घेण्यात आलेले आहेत व या कर्मचाऱ्यांच्या सतत बदल्या होत असतात. दुसरे म्हणजे त्यांना नगर परिषदांच्या विविध कार्याची माहिती नसते. तसेच अशी माहिती प्राप्त करून त्याप्रमाणे मार्गदर्शन करण्याची त्यांची मानसिक तयारीही नसते. **आयोगाची अशी शिफारस आहे की, या कक्षामध्ये योग्य असे अनुभवी कर्मचारी / अधिकारी असावेत आणि त्यांना करावयाच्या कामाबाबतचे योग्य ते प्रशिक्षण देण्यात यावे.**

१४.४. **नगरपालिका प्रशासन संचालनालयाने केवळ नियंत्रण व तपासणी करणारी यंत्रणा म्हणूनच काम करू नये, तर विकासाच्या योजना राबविण्यासाठी नगरविकास विभागाचे एक प्रमुख अंग म्हणूनही कार्य करावे.** त्याच बरोबर नागरी क्षेत्रात ज्या विविध विकासाच्या योजनांचे नियोजन व नियंत्रण करावयाचे आहे. ते सुयोग्यपणे करण्यास मदत व्हावी म्हणून या नागरी संस्थांची वित्तीय तसेच इतर बाबींची आवश्यक ती माहिती व आकडेवारी संकलित करणे आवश्यक असेल.

### संचालक. नगररचना यांची भूमिका

१४.५. राज्यातील नागरी विभागातील नियोजन व विकासासाठी संचालक, नगररचना आणि त्यांची राज्यातील प्रशासकीय यंत्रणा, त्यांचेकडून अपेक्षित असल्याप्रमाणे महत्त्वाची भूमिका बजावीत असते. काही वर्षापूर्वी शासनाच्या असे निदर्शनास आले की, १९६५ च्या महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे या नगरपरिषदा त्यांच्या कार्यक्षेत्रातील दर चार वर्षांनी करावयाचे मालमत्तांचे फेरमूल्यांकन करीत नव्हत्या, त्यामुळे नगररचना संचालनालयातील तज्ज्ञ मुल्यनिर्धारकांकडून हे मूल्यांकनाचे काम करण्याचे आदेश देण्यात आले. शासनाचे आदेश निघाल्यापासून मार्च, १९९५ पर्यंतच्या तीन वर्षांच्या कालावधीत या संचालनालयाने १२७ नगरपरिषदांचे काम पूर्ण केले, तर ३९ नगरपरिषदांचे काम प्रगतीपथावर होते असे आयोगाने गोळा केलेल्या माहितीवरून दिसून येते. उर्वरित काम मार्च, १९९७ पर्यंत पूर्ण होईल अशी संचालनालयाची अपेक्षा आहे. हे कामाचे वेळापत्रक बरेच वेळखाऊ आहे. नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी करावयाचे फेरमूल्यांकनाचे चक्र पुनःश्च सुरू करावयाचे झाल्यास हे काम करण्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्याची गरज आहे. या कामात होणाऱ्या विलंबासाठी नगररचना संचालनालय दोषी नाही याची आयोगाला जाणीव आहे. कारण या संचालनालयाला त्याच्यावर सोपविलेल्या स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पाडून, फेरमूल्यांकनाचे मोठा अवाका असलेले काम पार पाडावे लागते. फेरमूल्यांकनाचे काम नगरपरिषदांनी करण्याऐवजी यापुढेही नगररचना संचालनालयाच्या तांत्रिक ज्ञान असलेल्या अधिकाऱ्यांकडून करून घेण्याचे चालू राहील असे गृहित धरण्यात येत आहे. हे काम करून घेण्याच्या बाबतीत हाच एक प्रभावी मार्ग आहे असेदेखील आयोगाला वाटते, तेव्हा हीच व्यवस्था भविष्यकाळातही चालू ठेवावयाची असल्यास आयोगाची अशी शिफारस आहे की, हे काम प्रभाविपणे पार पाडण्यासाठी नगररचना संचालनालय वेगवेगळ्या स्तरावर बळकट करण्यात यावे. या कामासाठी दरवर्षी रुपये ४५ लाख खर्च असणारा नवीन पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन असल्याचे समजते. **नवीन पदे निर्माण करण्यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच या सेवेसाठी काही शुल्क आकारून ते नगरपरिषदांना लावण्याबाबत शासनाने विचार करावा अशी आयोगाची शिफारस आहे.**

१४.६. नगर रचना संचालनालयाने आतापर्यंत जे काम केले त्याचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, मालमत्तांच्या कराची आकारणी फेरमूल्यांकनानंतर २-३ वर्षांचा कालावधी उलटल्यावरही नगरपरिषदांनी केली नाही. काही नगरपरिषदांच्या क्षेत्रांत मूल्यांकनाचे काम १९९२-९३ या वर्षांत पूर्ण होऊनही त्याची अंमलबजावणी १९९५-९६ मध्येही झाली नाही. अशा विलंबामुळे फेरमूल्यांकनासाठी केलेले सर्व प्रयत्न फार उपयोगी ठरत नाहीत. काही प्रकरणी मालमत्तांचे फेरमूल्यांकन खूपच जास्त झाल्याने मालमत्ताधारक नाराज आहेत हेदेखील खरेआहे. या फेरमूल्यांकना विरूद्ध दाखल केलेल्या तक्रारी / दावे यांचे जलद निराकरण करण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांचे अधिपत्याखाली एक यंत्रणा निर्माण केली असल्याचेही सांगण्यात आले. **आयोगाचे असे मत आहे की, सुधारित मालमत्तांच्या करांची आकारणी ते काम पूर्ण झाल्यापासून एक वर्षांचे आत होण्याच्या दृष्टीने एक यंत्रणा व पद्धती विहित करण्यात यावी.** आयोगाची अशी अपेक्षा आहे की, मूल्यांकनातील सुधारणा त्याविरूद्ध दाखल झालेले दावे व त्यानुसार करावयाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात योग्य ती पुनर्रचना केल्यास विलंब टाळता येऊ शकेल. तसेच या फेरमूल्यांकनाच्या अंमलबजावणीमुळे नगर परिषदांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचेही त्वरीत दिसून येईल.

आयोगाची अशीही शिफारस आहे की, मालमत्तांच्या फेरमूल्यांकनाचे स्तरावर मोकळेपणा व पारदर्शकता असल्यास त्याविरूद्धच्या तक्रारी व याचिकांची संख्याही कमीत कमी असेल.

## स्थानिक निधी लेखा परीक्षण

१४.७. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या तरतुदीनुसार मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा हे वैधानिक लेखा परीक्षक म्हणून राज्यातील २९ जिल्हा परिषदा, २९७ पंचायत समित्या, २३१ नगरपरिषदा, ५५ शिक्षण मंडळे व इतर काही संस्थांचे लेखापरीक्षण करतात. या व्यतिरिक्त मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षण नियमावली, १९६१ च्या उपबंधान्वये सुमारे २७,००० ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण त्यांचेकडून करण्यात येते.

१४.८. एका संस्थेचे एका वर्षाचे लेखा परीक्षणास एक घटक म्हणून संबोधण्यात येते. प्रत्येक घटकाचे लेखापरीक्षणासाठी ठराविक श्रमदिन निश्चित करण्यात येतात व त्यानुसार लेखा परीक्षक विहित श्रमदिनात लेखा परीक्षण करतात. सन १९७५ मध्ये श्रमदिनाची परिगणना निश्चित करण्यात आली होती. त्यामध्ये अद्यापही प्रत्येक संस्थेचे आर्थिक व्यवहारात उल्लेखनीय वाढ झाली असताना, वाढ झालेली नाही. प्रत्येक घटकाच्या श्रमदिनात सुधारणा म्हणजे अप्रत्यक्षरित्या मुख्य लेखा परीक्षक यांचे अधिपत्याखाली असलेला लेखा परीक्षण कर्मचारीवर्ग पुरेसा आहे किंवा कसे याबद्दल विचार करावा लागतो. आयोगाला असे सांगण्यात आले की, पंचायत राज संस्थांपैकी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांचे लेखापरीक्षण हे नियमितपणे पूर्ण केले जाते व ते १९९४-९५ पर्यन्त पूर्ण झाले आहे व १९९३-९४ या वर्षाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल विधी मंडळास सादर करण्यासाठी तयार आहे. मात्र ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षणात अडचण आहे. बोंगिरवार समितीचे अहवालानुसार रुपये ५,००० चे दर वार्षिक उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक यांना करावयाचे आहे. अशा ग्रामपंचायतींचे प्रमाण एकूणाशी ८० टक्के आहे.

१४.९. ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षणाची थकित स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| प्रलंबित लेखा परिक्षणाचे वर्ष | | थकित घटकांची संख्या |
|---|---|---|
| (१) एक वर्षाचे आत | .. | १९,६४५ |
| (२) १ ते २ वर्ष | .. | १६,४३९ |
| (३) २ ते ३ वर्ष | .. | ८,७९३ |
| (४) ३ ते ४ वर्ष | .. | ३,९९२ |
| (५) ४ वर्षे व पुढील | .. | ६,८६६ |
| एकूण | .. | ५५,७३५ |

शासनाने त्यांचे निर्णय ग्रामविकास विभाग, क्र. जरोयो-१०९२/प्र. ४९/जल-१८, दिनांक २ मार्च १९९४ नुसार जवाहर रोजगार योजनेचे लेखापरीक्षण मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे सोपविले आहे. याकरिता काही कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. परंतु त्यातील अर्धी पदे मार्च, १९९६ पर्यंत भरण्यात आली नव्हती. त्यामुळे एकूण १०६३४८ घटकांपैकी, ४२९१० घटकांचे लेखा परीक्षण झाले आहे व उरलेल्या घटकांचे लेखा परीक्षण थकित आहे.

१४.१०. वरील विश्लेषणावरून खालीलप्रमाणे कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

**(१) मुख्य लेखा परीक्षकांच्या आस्थापनेवरील जी काही रिक्त पदे खालील शिफारस क्र. २ लक्षात घेता रिक्त राहत असतील ती तातडीने भरण्यात यावी. म्हणजे लेखा परीक्षणाचे काम मागे पडणार नाही. त्याचबरोबर लेखा परिक्षणावर वाढणारा आस्थापना खर्च नियंत्रित करण्यासाठी बाहेरील लेखा परीक्षक नेमता येईल किंवा कसे याचा विचार करण्यात यावा.**

**(२) बोंगिरवार समितीने लेखा परिक्षणासाठी ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नावर घातलेली मर्यादा जुनी झाल्याने ती रु. २५,००० पर्यंत वाढविण्यात यावी.** ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातही यापुढे सतत वाढ होत राहील. यामुळे मुख्य लेखा परीक्षकांचे काम काही प्रमाणात कमी होईलच. हे कमी झालेले काम जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत करून घ्यावे. सध्याची जवाहर रोजगार योजना व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे लेखा परीक्षणात काही बदल सुचविण्यात येत नाही.

(३) वरील शिफारस करताना आयोग सुचवू इच्छिते की, लेखा परीक्षणात फक्त घटकांचे परिमाणांचे बरोबर त्यांचे दर्जाकडेही लक्ष देण्यात यावे.

१४.११. सध्याची नगरपरिषदांचे लेखा परीक्षणांची परिस्थितीही तशीच असमाधानकारक आहे.

जानेवारी, १९९६ अखेरची नगरपरिषदा लेखा परीक्षणाची परिस्थिती खालीलप्रमाणे होती.

| कालावधी | | नगरपरिषदा | शिक्षण मंडळे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ वर्षाचे आत | .. | २०७ | ५९ | २६६ |
| १ ते २ वर्ष | .. | १६८ | ५३ | २२१ |
| २ ते ३ वर्ष | .. | १२४ | ३५ | १५९ |
| ३ ते ४ वर्ष | .. | ४२ | २० | ६२ |
| ४ वर्ष व पुढे | .. | ७८ | ४३ | १२१ |
| एकूण | .. | ६१९ | २१० | ८२९ |

१४.१२. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांना पंचायत राज संस्थांचे व नगरपरिषदांचे लेखापरीक्षकांचे काम असे व्यवस्थित करणे आवश्यक आहे की, जिल्हा परिषदांच्या लेखा परीक्षणामुळे नगरपरिषदांचे लेखा परीक्षण मागे पडणार नाही. आज नगरपरिषदांचे लेखा परीक्षणाकडे कमी लक्ष देण्यात येते असे दिसते. हे म्हणत असताना आयोग अशी शिफारस करीत आहे की **लेखापरीक्षणाची गती वाढविण्यासाठी मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांची प्रशासकीय यंत्रणा मजबूत करण्यात यावी.**

१४.१३. आयोगाला लेखापरीक्षणाचा आढावा घेताना असे आढळले की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकित लेखा परीक्षण आक्षेपांची संख्या योग्य अनुपालनाअभावी फार मोठ्या प्रमाणात आहे. पंचायत राज संस्थेचे बाबतीत मार्च, १९९४ अखेरीस ८६५४६ परिच्छेद थकित होते. त्यात गुंतलेली रक्कम रुपये ४९६.२९ कोटी होती. तर

नगरपरिषदांच्या लेखा परिक्षणाचे ११८५९८ परिच्छेद थकित असून, त्यामध्ये ३२२.७२ कोटी रुपये एवढी रक्कम गुंतलेली आहे. नगरपरिषदांच्या उदासीन वृत्तीमुळे व कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे लेखा आक्षेपांच्या अनुपालनाकडे दुर्लक्ष होत आहे. लेखा आक्षेपांच्या अनुपालनाचे संदर्भात प्रकरण ७ मधील परिच्छेद ७.१२ मध्ये अमान्य रकमेबाबत केलेली शिफारस येथेही लागू पडते.

१४.१४. नगरपरिषदांचे आर्थिक व्यवहार दिवसेंदिवस वाढत आहेत. याव्यतिरिक्त भांडार पडताळणी, वेतन निश्चिती पडताळणी, निवृत्तीवेतन मंजुरी इत्यादी कामेही आहेत. नगरपरिषद लेखा संहितेत हे काम करण्यासाठी अंतर्गत लेखा परीक्षण शाखा निर्माण करण्याची तरतूद असूनही बऱ्याच नगरपरिषदांमध्ये अशा तऱ्हेची शाखा निर्माण करण्यात आली नाही. निधीअभावी बऱ्याच नगरपरिषदा अशा तऱ्हेची यंत्रणा उभी करू शकत नाहीत याची आयोगास कल्पना आहे. **तरीसुद्धा आयोग अशी शिफारस करीत आहे की, प्रत्येक नगरपरिषदेकडे त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार एक छोटी अंतर्गत लेखा परीक्षण शाखा शक्यतो त्यांचे सध्याच्या कर्मचारीवर्गातून निर्माण करण्यात यावी. या कर्मचाऱ्यांना नगरपरिषदांच्या लेख्यांचे व लेखापरीक्षणाचे प्रशिक्षण देण्यात यावे. संचालक नगरपालिका प्रशासन यांनी याबाबत पुढाकार घ्यावा.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखा परीक्षणात लेखा परीक्षकांना त्यांचे भांडार व साठे पडताळणीचे अधिकार नाहीत. लेखा परीक्षण योग्य, परिपूर्ण व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने साठ्यांची व भांडाराची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक असते, **म्हणून लेखापरीक्षकास अशा पडताळणीचे तसेच हे परीक्षण परिपूर्ण होण्यासाठी आवश्यक ते अधिकार देण्यात यावेत.**

**सनदी लेखापालांच्या व्यवसायात प्रवेश करू इच्छिणाऱ्या प्रशिक्षणार्थींना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेखा परीक्षणाचा अनुभव मिळावा तसेच मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचेकडे असलेले थकित लेखापरीक्षणाचे कामही त्यांच्या सेवा वापरून सुलभ व कमी व्हावे या दृष्टीने ' इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टन्ट ' यांच्या सहकार्याने शासनाने योजना आखावी.**

१४.१५. सध्याच्या स्थितीत नगरपरिषदांचे विशेषतः जकातीपासून मिळत असलेल्या उत्पन्नात मोठी वाढ दिसत आहे. नुकतीच शासनाने नगरपरिषदांना जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यास परवानगी दिली आहे. सध्याचे कर वसुली पद्धतीत जी नगरपरिषदेमार्फत किंवा खाजगी अभिकर्त्याकडून केली जाते, त्यात बऱ्याच उणीवा उदाहरणार्थ करचुकवेगिरी, प्रशासकीय यंत्रणेत व पद्धतीत दोष, भ्रष्टाचार इत्यादी आहेत. आयोगास असे वाटते की **या उणिवांकडे फक्त नगरपरिषदेच्या अंतर्गत प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याचे नसून यामध्ये वस्तुनिष्ठता, व्यावसायिकता व पारदर्शकता आणण्यासाठी संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी तयार केलेले बाहेरील लेखापरीक्षकांचे पॅनेल असावे.** या पॅनेलच्या तज्ज्ञांकडे जकात करातील गळती थांबविण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांचे व आवश्यकतेनुसार बाहेरील व्यक्तींचे अभिलेखे तपासण्याचे काम देण्यात यावे. या अभिलेखे तपासण्याच्या पद्धतीसाठी ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशनच्या सल्ल्याने त्यांच्या पद्धतीचा वापर व्हावा की ज्यायोगे तपासणीची गुणवत्ता उच्च दर्जाची राहून उद्दिष्ट साध्य होईल. प्रथमतः ही पद्धत काही थोड्या नगरपरिषदांमध्ये चाचणीदाखल सुरू करण्यात यावी व नंतर चाचणीच्या निष्कर्षाप्रमाणे ही पद्धत पुढे प्रमाणीकृत करता येईल व सर्वसामान्यपणे वापरता येईल.

## प्रशिक्षण

१४.१६. पंचायत राज संस्था व नागरी संस्थांच्या बाबतीत वित्तीय लेखे तसेच इतर माहितीचे अभिलेखे ठेवण्याची सद्यःस्थिती अत्यंत वाईट असून अभिलेखे व माहिती ठेवण्यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जात नाही असे आयोगाला दिसून आले आहे. वित्तीय बाबींच्या संदर्भातील अपुरे ज्ञान व पुरेशा अनुभवाअभावी असा प्रकार झाल्याचे दिसून येते. बदलत्या काळानुरूप लेखे व वित्तीय बाबींची माहिती ठेवण्यातही योग्य ते बदल होणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे जो कर्मचारीवृंद हे काम करतो त्यांना लेखे तसेच वित्तीय बाबींचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक

आहे. त्याचबरोबर त्यांना माहितीच्या संकलनासाठी उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक उपकरणांचा माहिती ठेवण्यासाठी व त्याचा व्यवस्थापनात वापर करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. या उद्देशाने वेगवेगळया प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या गटांसाठी योग्य अशा प्रशिक्षणाचे कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. सध्या प्रशिक्षणाच्या ज्या सुविधा उपलब्ध आहेत. त्या पुरेशा प्रमाणात नाहीत. **महाराष्ट्र शासनाची प्रमुख अशी प्रशिक्षण संस्था ' यशदा ', पुणे यांनी राष्ट्रीय स्तरावरील संस्था उदा. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, हैद्राबाद, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्याशी सल्लामसलत करुन पंचायत राज संस्था व नागरी संस्थांच्या वेगवेगळया स्तरांवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी योग्य त्या प्रकारे कार्यक्रम आखून त्याचे नियंत्रण करावे असे आयोग सुचवू इच्छितो.** प्रशिक्षणात लेखे ठेवणे. निरनिराळ्या करांची माहिती, तसेच भांडाराचे व्यवस्थापन यावर विशेष करून भर देण्यात यावा. हे प्रशिक्षण शक्यतोवर साध्या सरळ मराठी भाषेतून देण्यात यावे व ज्या संस्थांचे हे कर्मचारी असतील त्यांना त्या संस्थांचे कायदे, त्यातील वेगवेगळया बाबींच्या व्याख्या, त्यांचे अर्थ, खर्च/उत्पन्नाचे वर्गीकरण, त्यातील भेद, इत्यादींच्या संकल्पना स्पष्ट होतील अशा पद्धतीचे मुलभूत असे प्रशिक्षण असावे. **हे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या पूर्वी तसेच त्यांच्या ज्ञानाची उजळणी म्हणून दोन स्तरांवर घेता येईल. यशदा या संस्थेने चालना देणारी संस्था म्हणून महत्त्वाची भूमिका बजावावी व जिल्हा परिषदा किंवा नगरपरिषदांच्या कार्यालयांत असे प्रशिक्षण आयोजित करून प्रशिक्षण देण्यासाठी योग्य तो प्रशिक्षण कार्यक्रम आखावा.** आवश्यक तेथे जिल्हा परिषदा तसेच नागरी संस्थांचे गट तयार करूनही त्यांना प्रशिक्षण देता येईल.

१४.१७. पंचायत राज संस्था तसेच नागरी स्थानिक संस्थांचे लेखे ठेवणे व त्याचे परीक्षणाच्या संदर्भात अखिल भारतीय स्तरावरील सनदी लेखापालांच्या प्रमुख संस्थेचे (इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टन्टस् ऑफ इंडिया) या संस्थांच्या लेख्यातील उणिवा व त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनही घेण्यात यावे.

**सांख्यिकीय आधारभूत माहिती संचयिका निर्माण करणे**

१४.१८. आयोगास त्याच्या कार्यात एका प्रमुख अडचणीस तोंड द्यावे लागले. ती म्हणजे क्षेत्रीय स्तरावर पुरेशी आर्थिक बाबींची अधारभूत माहिती उपलब्ध नव्हती. तसेच जी माहिती उपलब्ध आहे, तिचे वरील पातळीवर एकत्रिकरण होत नाही. पुष्कळदा जी माहिती एकाच विषयावर वेगवेगळया स्त्रोतांकडून गोळा केली जाते, त्यामध्ये बराच फरक आढळून आला. जी माहिती एकाच विभागाकडून वेगवेगळया वेळेस गोळा करण्यात आली त्यामध्येही आश्चर्यकारकरित्या फरक आढळून आला. त्यामुळे असे म्हणावे लागते की, सध्या आधारभूत माहिती गोळा करण्यासाठी व तिचे एकत्रिकरण करण्यासाठी कोणतीही प्रमाणीकृत पद्धत नाही. म्हगजेच उपलब्ध सांख्यिकीय माहिती विश्वसनीय व भरवशाची आहे असे निश्चितपणे म्हणता येत नाही. **आयोगास त्यामुळे असे वाटते की, पंचायत राज संस्थांच्या व नागरी संस्थांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत माहितीसाठी एक आधारभूत माहिती संचयिका असावी.** त्यामध्ये खालील माहितीचा समावेश असावा.

(१) निरनिराळ्या लेखाशिर्षाखालील जमा व खर्च

(२) उत्पन्नाच्या बाबींची मागणी, वसुली व थकित रक्कम.

(३) कर्जाची देयता व परतफेड.

(४) कर, फी, शुल्क यांचे चालू दर व ते कोणत्या वर्षापासून लागू आहेत.

(५) निरनिराळ्या प्रकारच्या सेवांवर होणारा खर्च.

(६) निरनिराळे निधी जसे राखीव निधी याची सविस्तर माहिती व त्यांची वर्षअखेरची स्थिती,

(७) शासनाची देय व दिलेली अनुदाने,

(८) वर्षामध्ये निर्माण झालेली मत्ता,

(९) व्यापारी उपक्रम, त्यांचे उत्पन्न व खर्च, त्यांचेपासून मिळणाऱ्या सोयींचा वापर.

आवश्यकतेनुसार वरील बाबींमध्ये काही अतिरिक्त बाबींचा समावेश करता येईल.

१४.१९. **आयोग अशी शिफारस करू इच्छिते की, निश्चित वेळापत्रकानुसार प्राथमिक स्तरावरून मिळणाऱ्या माहितीचे एकत्रीकरण व तपासणी जिल्हा स्तरावर करण्यात यावी व अंतिमरित्या त्याचे एकत्रीकरण, संकलन व विश्लेषण हे काम राज्य स्तरावर करण्यात यावे. माहिती गोळा करण्याचे व एकत्रित करण्याचे आणि माहिती संचयिका ठेवण्याचे राज्यस्तरीय काम संचालक, अर्थ व सांख्यिकी यांनी करावे.** क्षेत्रीय स्तरावरून राज्य स्तरावर येणारी आधारभूत माहिती गोळा करण्यासाठी असलेल्या वेळापत्रकाची प्रत्येक स्तरावर काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. या तऱ्हेची आधारभूत माहिती संचयिका पुढील वित्त आयोगास व राज्य शासनाच्या विभागांनाच नव्हे तर केंद्र शासनाला व संशोधन संस्थांनासुद्धा उपयोगी ठरणार आहे.

खाजगीकरण

१४.२०. खाजगीकरणाच्या प्रश्नाचा दोन दृष्टिकोनातून विचार करता येईल. एक म्हणजे स्थानिक संस्था ज्या सेवा उपलब्ध करते, त्या कर्मचाऱ्यांमार्फत दिल्या जात असल्याने त्यावर आस्थापना व इतर खर्च होत असतो. या खर्चात सतत वाढ होत असल्याने हा खर्च कमी होण्याचे दृष्टिने या सेवा खाजगी संस्थांकडून स्थानिक संस्थांच्या पर्यवेक्षणाखाली करता येतील काय हे पाहता येईल. या प्रश्नाची दुसरी बाजू अशी की, खाजगी संस्थांना कमी प्रमाणात का होईना काही नफा मिळण्याची शक्यता असल्याने अशा खाजगी संस्था त्यांना असे काम सोपविल्यास ते शीघ्रतेने पार पाडतील. असे असले तरी ही कामे निष्काळजीपणे केली जात नाहीत व कामाचा दर्जा कमी होणार नाही, हे पाहण्यासाठी त्यावर पर्यवेक्षणाची आवश्यकता असेल. पण **खाजगी कंत्राटदारांकडून करून घेतलेल्या कामाचा दर्जा खराब आहे अशा तक्रारींना वाव असू नये म्हणून पुरेसे निकष लावून खाजगीकरणाचा पर्याय उपलब्ध असावा अशी सूचना करावीशी वाटते.**

१४.२१. जकात कराच्या वसुलीचे खाजगीकरणासंदर्भात यापूर्वीच्या प्रकरणात सविस्तर चर्चा केली आहे. ही खाजगीकरणाची पद्धत कितपत योग्य वा अयोग्य आहे ते अधिक अनुभव घेतल्यानंतरच काही काळाने ठरविता येईल. दरम्यानच्या अल्प कालावधीत या पद्धतीत ज्या काही त्रुटी आढळून आल्या आहेत त्या दूर करण्यासाठी प्रकरण ८ मधील परिच्छेद ८.२५ मध्ये काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. **नागरी संस्थांच्या बाबतीत ज्या बाबींचा खाजगीकरणासाठी विचार करता येईल त्यात शहरातील केरकचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावणे, रस्त्यावरील दिव्यांची देखरेख/दुरूस्ती, वाहनतळ (जेथे असेल तेथे) चालविणे इत्यादींचा विचार करता येईल. शक्य असेल तेथे स्थानिक संस्थांच्या मालकीच्या बाजारपेठांचे व्यवस्थापनही, त्याबाबतच्या निविदा मागवून व त्या स्वीकारून खाजगी संस्थांकडे सोपविता येईल.**

१४.२२. **पंचायत राज संस्थांच्या बाबतीतही अशीच व्यवस्था राबविता येईल. नागरी संस्थांच्या बाबतीत ज्या बाबी वर नमूद केल्या आहेत, त्या बाबींचा ग्रामपंचायतींसाठीही विचार करता येईल काय, याची शक्यता अजमावण्यात यावी. या व्यतिरिक्त जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या तलावांतील/जलाशयांतील मत्स्य उत्पादन काही ठराविक सहकारी संस्थांकडे सोपविण्याऐवजी त्याचा लिलाव करून जादा बोली देणाऱ्याला देता येईल काय, याचाही विचार व्हावा.** प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांद्वारे अपेक्षित असलेल्या प्राथमिक आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देण्यात शासनाला अडचणी येत आहेत. बरीचशी आरोग्य केंद्रे चालविण्यासाठी डॉक्टरांची तसेच इतर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची चणचण भासते. तेव्हा ज्या निवडक ग्रामीण भागात या कामासाठी इमारती उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी आरोग्य सुविधा जे डॉक्टर, खाजगी व्यवसाय सांभाळून, समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत जनतेला सवलतीच्या दराने सेवा देण्यास तयार असतील त्यांना देण्याबाबतची शक्यताही अजमावता येईल. ज्या पद्धतीने धर्मादाय संस्था नागरी भागात अशा प्रकारचे काम करतात, त्याच आधारे वरील योजना राबविण्याबाबत विचार करता येईल.

१४.२३. वरील परिच्छेदात, ज्या बाबींचा खाजगीकरणासाठी विचार केला आहे, त्या परिपूर्ण आहेत किंवा संपल्या आहेत असे नसून जसाजसा कालावधी जाईल तसातसा नवीन क्षेत्राचाही या संदर्भात विचार करता येऊ शकेल.

## दर सुधार समिती (रेट रिव्हिजन कमिटी)

१४.२४. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, कराचे दर, शुल्क, सेवांचे आकार आणि इतर प्रकारचे येणे यांमध्ये अद्याप पर्यंत वेळोवेळी पुरेशा सुधारणा करण्यात येत नाहीत. त्यातील काही बाबींच्या दरामध्ये सुधारणा केली असली तरी असे करताना अधिक उत्पन्न देणाऱ्या बाबींच्या दरामध्येच ठराविक बदल केले जातात. वस्तुत: दरांची संपूर्ण अनुसूची सुधारण्याचा विचार केला जात नाही.

१४.२५. स्थानिक संस्थांनी ज्या प्रमाणात शक्य असेल त्या प्रमाणात साधनसंपत्तीत वाढ करण्यासाठी सेवा सुविधांचे दर, इतर शुल्क अशाप्रकारे अद्ययावत करावेत की, जेणेकरून सुविधा पुरविण्यासाठी येणारा खर्च त्यामधून भागविता येऊ शकेल. एवढेच तव्हे तर ठराविक कालावधी नंतर या करांचे दर आणि शुल्कामध्ये वेळोवेळी सुधारणाही केल्या पाहिजेत. पंचायत राज संस्था व नागरी संस्थांबरोबर झालेल्या आयोगाच्या बैठकीत एकमताने असा दृष्टिकोन व्यक्त करण्यात आला की, नागरी संस्थांचा जनतेशी निकटचा दैनंदिन संबंध येत असल्याने या संस्थांना करांच्या दरांमध्ये वरचेवर सुधारणा करणे शक्य होत नाही. परंतु राज्य शासनाने कर व शुल्कांचे दरात सुधारणा करण्याचे आदेश दिल्यास त्याची अंमलबजावणी ते करू शकतात. घटना दुरुस्तीप्रमाणे या स्थानिक संस्था स्वायत्त असल्याने त्यांच्या व्यवहारात राज्य शासनाचा वारंवार हस्तक्षेप असू नये याची आयोगाला जाणीव आहे. परंतु या संदर्भात आयोगाशी झालेल्या चर्चेत जे विचार व्यक्त झाले त्याकडे आयोगाला दुर्लक्ष करता येत नाही. **म्हणून आयोग असे सुचविते की, राज्य शासनाने पंचायत राज संस्था व नागरी संस्थांसाठी दर ३ वर्षांनी स्वतंत्र अशी समिती स्थापन करावी व या समितीला ''दर सुधार समिती '' असे संबोधण्यात यावे. स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींना या समितीमध्ये योग्य प्रतिनिधित्व असावे.** या समितीने सध्याच्या करांचे दर, शुल्क तसेच सेवासुविधांचे दर, त्या सेवासुविधा पुरविण्यासाठी होणारा खर्च इ. चा अभ्यास करून दर, शुल्क, आकार व पथकर इ. च्या संपूर्ण अनुसूचीमध्ये बदल करण्यासाठी शिफारशी कराव्यात. या समितीला गरज भासल्यास जनतेच्या मताचाही ती मागोवा घेऊ शकेल. अशा प्रकारे सुचविलेले दर शासनाने मान्य केल्यास ते शासकीय आदेशान्वये अंमलात आणता येऊ शकतील. पंचायत राज संस्था आणि नागरी संस्थांना शासनाने मान्य केलेल्या वरील समितीच्या शिफाशींची अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

## जिल्हा परिषदांचे रस्ते

१४.२६. यापूर्वीच्या प्रकरणात उल्लेख करण्यात आला आहे की, ज्या जिल्हा परिषदांना आयोगाने भेटी दिल्या, तेथील पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, साखर कारखाने, कृषि उत्पन्न बाजार समित्या व इतर औद्योगिक आस्थापना जिल्हापरिषदांचे रस्ते वापरत असल्याने ते मोठ्या प्रमाणात नादुरुस्त होतात. या संस्था जिल्हापरिषदांचे रस्ते वापरत असल्याने व त्यामुळे सर्वसाधारण दुरुस्त्यांपेक्षा या रस्त्यांवर जास्त खर्च येत असल्याने रस्त्यांच्या देखमालीसाठी त्यांचेकडून काही अंशदान मिळावे, या तऱ्हेची मागणी अयोगास योग्य वाटते. ही मागणी ग्रामीण भागासाठी मर्यादित नाही, तर नागरी भागासाठी जेथे अशा प्रकारचे कारखाने आहेत, त्यांनाही लागू पडते. **शासनाने या मागणीची कायदेशीर बाजू तपासावी व साखर कारखाने, कृषि उत्पन्न बाजार समिती व इतर तत्सम संस्था ज्या अशा प्रकारचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे रस्ते व इतर पायाभूत सोयी मोठ्या प्रमाणात वापरतात, त्यांना त्यांचे देखभाल व दुरुस्तीसाठी काही अंशदान देण्यासाठी बाध्य करता येईल काय याबाबत कायद्याचा अभ्यास करून योग्य ती उपाययोजना केली जावी असे वित्त आयोगाला वाटते.**

## मालमत्तेच्या नोंदवह्या

१४.२७. आयोगास असे आढळले की, पंचायत राज संस्था व नागरी संस्था त्यांच्या चल व अचल मालमत्तेच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवत नाहीत. आयोगास ही गंभीर त्रुटी वाटते. मागील काही वर्षांत बरीच चल व अचल संपत्ती विकासात्मक प्रक्रियेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निर्माण झाली आहे. याची देखभाल व योग्य वापर हा पुढील प्रश्न आहे. आयोगास असे आढळले की, संपत्तीच्या योग्य माहितीअभावी या संस्था घसारा निधीचे परिगणन करू शकत

नाहीत, या संपत्तीच्या गुंतवणुकीवरील प्राप्तीचे निर्धारण किंवा नियंत्रण करता येत नाही. तसेच त्यांचे दुरुस्तीसाठी तातडीने माहिती पुरवू शकत नाहीत. आयोग शिफारस करु इच्छितो की, **या चल व अचल संपत्तीच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात याव्यात व त्याचा वरील उद्देशाच्या संदर्भात विचार व्हावा.**

आस्थापना खर्च

१४.२८. नागरी तसेच ग्रामीण विभागांना या स्थानिक संस्था ज्या सेवा-सुविधा देत असतात त्या बहुतांशी मनुष्यबळावर आधारित असतात. त्यामुळे या संस्थांच्या एकूण खर्चामध्ये वेतन व मजुरीवरील खर्चाचे प्रमाण फार मोठे असते ही बाब समजण्यासारखी आहे. नागरी संस्थांचे बाबतीत वेतनावरील खर्च एका विशिष्ट मर्यादेत असावा व त्यामुळे या संस्थांना सेवा-सुविधा देण्यासाठी काही साधनसंपत्ती शिल्लक रहावी यासाठी शासनाने काही मर्यादाही ठरवून दिली आहे. आस्थापना खर्चाचे प्रमाण हे वेतन तसेच भत्ते व इतर बाबींच्या दरावर अवलंबून असते. एकाच प्रकारच्या कर्मचारी वर्गासाठी निरनिराळ्या महानगरपालिकांच्या वेतन व भत्यांत खूप मोठी तफावत आहे आणि या एकमेव कारणामुळे आस्थापनेच्या खर्चात फार मोठी तफावत दिसून येते असे आयोगाला आढळले आहे. मध्यंतरी शहरातील एका प्रमुख वर्तमानपत्रात मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते राज्यात तसेच देशतील राज्य व केंद्र शासनाच्या उपक्रमासाठी लागू असलेल्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असल्याची बाब चर्चिली गेली होती, या महानगरपालिकांच्या वेतन व भत्त्यांवर बंधन लावावे अशी आयोगाची इच्छा नाही परंतु **एक समान वेतन धोरण असावे व वेतन श्रेण्यामध्ये दबाव आणून वाढ करण्यासाठी जी अमर्याद स्पर्धा चालते त्यावर काहीतरी निर्बंध असावे असे आयोगाला वाटते.** मुंबई महानगरपालिकेच्या पदाधिकारी/अधिकाऱ्यांशी चर्चा करताना ही बाब विशेषत्वाने चर्चेला आली. मुंबई महानगरपालिकेला त्यांच्या भांडवली खर्चाच्या योजना राबविण्यासाठी फार मोठ्या साधनसंपत्तीची गरज असल्याचे आयोगाला सांगण्यात आले तर दुसरीकडे राज्यातच नव्हे तर देशातील महानगरपालिकांच्या तुलनेत मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतनश्रेण्या सर्वाधिक का आहेत, त्याचे समाधानकारक व संयुक्तिक असे स्पष्टीकरण त्यांना देता आले नाही. अशा प्रकारची विसंगती टाळण्यासाठी सर्वांना मान्य असे वेतन धोरण असावे, ज्यात स्वेच्छा निर्णयासाठी वाव असावा, परंतु त्याच बरोबर वेतनाची कमाल मर्यादा मात्र केंद्र व राज्य शासन तसेच केंद्रीय व राज्य उपक्रमाच्या समकक्ष पदांच्या वेतनाशी जवळजवळ समान असतील याची खात्री करून ध्यावी लागेल. हा प्रश्न अत्यंत संवेदनक्षम असल्याने राज्य शासनाला याचे समाधानकारक असे उत्तर शोधून काढावे लागेल. त्याच बरोबर या सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचा आस्थापना खर्च त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या काही मर्यादेचे आत असावा या दृष्टीने, यापूर्वी विहित केलेल्या निकषांचा, पुनर्विचार व्हावा असे आयोगास वाटते.

स्थानिक संस्थांच्या प्रशासनातील पारदर्शकता

१४.२९. **स्थानिक संस्थांच्या कार्यात व कार्यक्रमात काही प्रमाणात पारदर्शकता असावी अशी आयोगाची शिफारस आहे.** या संस्था जनतेसाठी कोणती कामे करणार आहेत आणि त्या संदर्भात या संस्थांच्या अडचणी काय आहेत याची जाणीव जनतेला करून देणे आवश्यक आहे. या दृष्टीने या संस्थांचे उत्पन्न, खर्च, आस्थापनेवरील खर्च, वेगवेगळ्या सेवा पुरविण्यावरील खर्च, मालमत्ता करापासूनचे दरडोई उत्पन्न, पाण्याचे दर, पाणीपुरवठ्यासाठी होणारा खर्च व इतर सुविधांवरील खर्च व इतर बाबींची माहिती जनतेच्या माहीतीसाठी प्रसिद्ध केल्यास, या संस्थांच्या कामाचा व्याप, त्याची रूपरेषा, अडचणी व त्यातील त्रुटी याबाबत वस्तुनिष्ठ माहीती जनतेला उपलब्ध होईल. जिल्हापरिषदांच्या बाबतीतही वेगवेगळ्या योजना व कार्यक्रमांच्या भांडवली खर्चाची माहिती, वेगवेगळ्या सेवा तसेच त्या बाबींपासूनचे उत्पन्न व त्याचा वापर याबाबतचाही तपशील त्यात समाविष्ट असावा. तसेच जेथे खर्चासाठी उदा. रस्ते बांधणी, इमारत दुरुस्तीसाठी निकष विहित केलेले असतात तेथे निकषांच्यावर काही मर्यादेच्या बाहेर खर्च होणार असल्यास त्याची माहिती व त्याबाबतची संयुक्तिक कारणेदेखील प्रसिद्ध करण्यांत यावी, ही माहिती प्रसिद्ध करण्यामागचा उद्देश, ती प्रसिद्ध करावी या तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याचा नसून प्रसार माध्यमातून ती जनतेला कळावी व त्याद्वारे नागरिकांची जागरुकता वाढावी असा आहे.

१४.३०. या स्थानिक संस्थांची कार्ये व कर्तव्ये यांचा विचार केल्यास, ती बहुतेक जनकल्याण व लोकहितासाठी असल्याचे दिसून येईल. तेव्हा ज्या प्रकरणांत गोपनीयतेचे तत्व पाळणे अपरिहार्य आहे तेवढ्या बाबी वगळता जनहिताच्या व लोककल्याणाच्या बाबी जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध झाल्या पाहिजेत अशी आयोगाची भूमिका आहे. अशाप्रकारच्या व्यवस्थेमुळे या संस्थांच्या प्रशासनात पारदर्शकता येईल व त्याचबरोबर सध्या जनतेला या बाबींची अजिबात माहिती नसल्यामुळे, जे गैरसमज होतात ते कमी होतील व थोड्या प्रमाणांत का होईना गैरप्रकारांनाही आळा बसू शकेल. जनतेत जागृती झाल्याने ती काही बाबींवर उत्तम असे विचार व मुद्देही सुचवू शकते. हे पारदर्शकतेचे तत्त्व अंमलात आल्यास जनतेला करांच्या दायित्त्वामध्ये का वाढ झाली याची जाणीव असेल व त्याचा दृश्य परिणाम म्हणजे अशा वाढीव करांच्या प्रस्तावांना त्यांचा फारसा विरोध असणार नाही.

१४.३१. पंचायत राज संस्था तसेच नागरी संस्थाच्या उत्पन्नाची साधने, करांचा ढाचा, कर निर्धारणाची पद्धत व त्यामुळे नागरीकांवर पडणारा बोजा, तसेच या संस्थांचा विविध जनकल्याणाच्या बाबींवरील खर्च, सेवा-सुविधा-पुरविण्यासाठी लागणारा खर्च या संबंधीची तुलनात्मक माहिती जनतेला मिळावी व त्याद्वारे लोकशिक्षण व्हावे अशा दृष्टीकोनातून केलेल्या कार्याची माहिती देणारी प्रदर्शने किंवा जनसंपर्क अभियान किंवा नागरिकांबरोबर विचार विनियमासाठी एक सप्ताह अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. अशा मोहिमांमुळे नागरिकांना केवळ या संस्थांच्या कार्याचा अभ्यास करण्याची व त्यामध्ये सहभागी होण्याची संधीच उपलब्ध होणार नाही तर नागरिकाकडून उपयुक्त अशा सूचना व विचारही या संस्थांना प्राप्त होतील. अशा प्रकारच्या जनजागृतीच्या मोहिमांसाठी लागणारा कांही खर्च या संस्थांनी केल्यास व शासनानेही वेगळा निधी उभारून वा अन्य मार्गाने यास भरघोस हातभार लावल्यास ते या संस्थाच्या कामात पारदर्शकता येण्यासाठीचे एक नवीन पाऊल असेल.

१४.३२. **स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत लोकांत जागृती निर्माण करण्याचा एक मार्ग असाही असू शकतो की, समाजात सुप्तपणे अस्तित्वात असलेल्या आपल्या शहराबद्दलच्या अगर गावाबद्दलच्या आपुलकीला किंवा प्रेमाला जागृत करून त्यांच्यातील दानशूरपणाला आवाहन करणे.** अनेक महत्त्वाचे प्रकल्प या भावनेतून साकार झाल्याची उदाहरणे आहेत. समाजातील ही भावना समजून घेऊन तिला योग्य प्रकारे चालना देऊन कार्यान्वित केल्यास तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा एक अभिनंदनीय भाग असू शकतो व त्यातून लोकांच्या सोयी-सुविधा निर्माण होऊ शकतात अगर त्यांत भर पडू शकते. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींना आपल्या शहराच्या अगर गावाच्या विकासासाठी या भावनेचा फायदा करून घेता आला पाहिजे.

**कर्जासंबंधीचे क्रेडिट रेटिंग**

१४.३३. आयोगासाठी असलेल्या अटी व शर्तीच्या दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ५(ड) च्या अनुषंगाने पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक संस्थांच्या कर्जाच्याबाबत आयोग खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे :—

**(अ) अशा प्रकारच्या सर्व संस्थांसाठी क्रिसिल (CRISIL) सारख्या कमर्शियल रेटिंग एजन्सीचा किंवा आय.सी.आय.सी.आय. सारख्या वित्तीय संस्थांचा सल्ला घेऊन शासन यंत्रणेत अंतर्गत रेटिंगची पद्धती विकसित करावी.**

**ज्या प्रस्तावांमध्ये राज्य शासनाने स्थानिक संस्थांसाठी कर्ज व कर्जाची हमी द्यावी अशी अपेक्षा असेल अशा प्रस्तावांचा क्रेडिट रेटिंगच्या अनुषंगाने वेळोवेळी ठरविलेल्या सर्वमान्य सुरक्षा पातळीच्या संदर्भातच विचार करावा.**

**(ब) सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जाच्याबाबत आयोग अशी शिफारस करीत आहे की, जर एखादी स्थानिक संस्था व्याज किंवा कर्जाचा हप्ता राज्य शासन किंवा इतर संस्थांना एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता देण्यास असमर्थ ठरली तर त्या संस्थेच्या व्यवहारात विशेष लक्ष घालून करेतर दर, करदर**

**आणि वसुली यांत जर काही त्रुटी आढळल्या तर याबाबत त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात अगर यासाठी दुसरी एखादी उपाययोजना करावी. परंतु संस्थांचा कर्जव्यवहार नियंत्रणाच्या बाहेर जाऊ देऊ नये.**

भांडवली गुंतवणुकीवर प्राप्ती

१४.३४. अटी व शर्तींच्या परिच्छेद क्र. ५ (जी) प्रमाणे स्थानिक संस्थांच्या आर्थिक बाबींपैकी या संस्थांच्या विविध प्रकल्प व उपक्रमांच्या गुंतवणुकीतून काही उत्पन्न विहित करता येईल काय याबाबत आयोगाने पहावे असे अपेक्षित आहे. या प्रकल्प व उपक्रमापैकी लगेच मनात येणारे प्रकल्प व उपक्रम म्हणजे पंचायती राज संस्थांचे पाटबंधारे व पाणीपुरवठ्याच्या योजना व नागरी संस्थांचे परिवहन प्रकल्प होत. आयोगाचे असे मत आहे की, प्रकल्प आणि उपक्रम यांपैकी ज्यांना व्यापारी अंग आहे, त्यांनी गुंतवणुकीवर काही प्राप्ती दिली पाहिजे. परंतु याबाबत काही समस्या आहेत. विकासाच्या योजना पूर्णपणे कार्यान्वित व्हायला दीर्घ कालावधी घेतात. कोणतीही प्राप्ती होण्यासाठी प्रकल्पांचा/उपक्रमांचा पूर्ण उपयोग होणे आवश्यक असते. जनता आणि शासकीय स्तरावर विकास प्रकल्पाकडे कशा प्रकारे पाहिले जाते. उदा. व्यापारी गुंतवणुकीच्या स्वरूपाचे प्रकल्प की जनतेच्या कल्याणासाठीचे प्रकल्प यावर प्राप्तीच्या संदर्भातील निर्णय अवलंबून असतात. **आयोगाला असे वाटते की, पाटबंधारे व पाणीपुरवठ्याच्या योजनांसारख्या विकासाच्या योजनांच्याबाबत उपभोक्त्यांकडून कमीत कमी योजना राबविण्याचा व त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचा खर्च भागविता येईल इतकी तरी शुल्क वसुली केली पाहिजे.** आज या बहुतेक प्रकरणी प्रकल्प राबविण्याचा व त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याचा खर्चही वसूल करण्यात येत नाही. हे प्रथम उद्दिष्ट ठेवले पाहिजे. गुंतवणुकीवर प्राप्ती जरी अपेक्षित असली तरी सध्यातरी ती शक्य आहे असे आयोगाला वाटत नाही.

**नगरपालिकांचा परिवहन प्रकल्प हा अभ्यास करण्यासारखा स्वतंत्र विषय आहे.** नफ्यावर विपरित परिणाम करणारा एक घटक म्हणजे शहरी भागात परिवहनाची सेवा देण्यासाठी होणारा जादा खर्च हा होय. नागरी संस्थांना विविध कारणांमुळे भाडे निश्चित करण्याचे स्वातंत्र्य नाही. प्रथमदर्शनी असे दिसते की, परिवहन सेवेची जोपर्यंत आर्थिक दृष्ट्या जास्त फायदेशीर उपक्रमांशी सांगड घालून एकूण प्रकल्प राबविले जात नाही, तोपर्यंत एका उपक्रमात होणारा तोटा फायदेशीर उपक्रमाच्या नफ्यातून काही प्रमाणांत का होईना भरून काढता येणार नाही. **परिवहन उपक्रम स्वतःहून परिपूर्ण असा नफ्याचा प्रकल्प होऊ शकेल काय याचा स्वतंत्र अभ्यास आवश्यक आहे.**

**नागरी संस्थांच्या बाजार संकुलाबाबत आयोगाने अहवालाच्या प्रकरण ५ मध्ये चर्चा केलेली आहे. या उपक्रमातून या संस्थांना जास्तीत जास्त उत्पन्न मिळाले पाहिजे. इतकेच नव्हे तर कर्ज व व्याजाची परतफेड आणि देखभाल दुरुस्तीचा खर्चही वसूल होऊन काही अतिरिक्त उत्पन्न मिळेल असे पाहिले पाहिजे.**

मालमत्तांच्या संदर्भात प्राप्तीचा दर जरी निश्चित करता येऊ शकला नाही, तरी स्थानिक संस्थांच्या सर्व मालमत्तांच्या बाबत घसारा निधी असणे आवश्यक आहे. **आयोग शिफारस करीत आहे की, विविध मालमत्तांसाठी विहित दराने घसारा निधी निर्माण करण्याबाबत तसेच त्या प्रमाणात दरवर्षी गुंतवणूक करण्याबाबत शासनाने आग्रह धरावा. जर एखादी स्थानिक संस्था घसारा निधीत गुंतवणूक करण्यास असमर्थ असेल तर वर्षाच्या शेवटच्या दिनांकापर्यंतच्या थकबाकीची परिपूर्ण माहिती स्थानिक संस्थांच्या जमाखर्चाच्या लेख्यामध्ये देण्यात यावी.**

पंचायत राज संस्थांचा निधी

१४.३५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १३०(३) (ब) नुसार जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायत या संस्थांना आपला निधी राज्य शासन मान्य करील अशा सहकारी संस्थेत ठेवता येतो. सध्या ह्या संदर्भात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निधी ठेवण्याचे आदेश शासनाने दिलेले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक क्र. UBD/No. D.S.P.C.B.C.I.R./१८/१३.०१.००.९६-९७, दिनांक ३० ऑगस्ट १९९६



एच ४०९४-१७अ

नुसार सर्व सहकारी बँकांना जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती इ. संस्थांची बचत खाती उघडण्यास परवानगी दिलेली आहे. तरी पंचायत राज संस्थांना सक्षम सहकारी बँकेतही निधी ठेवण्याची अनुज्ञा देण्यात यावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**आपत्ती निवारण**

१४.३६. नवव्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या ' आपत्ती निवारण निधी ' योजनेच्या धर्तीवर आपत्ती निवारणाची योजना सुरू करण्यासाठी व आपत्ती निवारण निधी असण्याची गरज विचारात घेण्यासाठी शिफारस करण्याची बाब आयोगाच्या विचारार्थ दिलेल्या विषयांपैकी एक आहे. राज्य शासनाचा अशाप्रकारचा ' आपत्ती निवारण निधी ' आहे. जेव्हा मोठ्या आपत्ती कोसळतात, तेव्हा अशा प्रकारच्या अनपेक्षित व कोणत्याही प्रकारची वित्तीय तरतूद नसलेल्या आपत्तीला तोंड देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. तथापि असे दिसून आले आहे की अशा परिस्थितीत या स्थानिक संस्था राज्य शासनाच्या मदतीची अपेक्षा करतात आणि जर त्यांना त्यासाठी काही निधी उपलब्ध करून द्यावयाचा झाल्यास, त्यांचेकडे असा स्वतःचा राखीव निधी नसल्यामुळे त्यांना कशीबशी साधनसंपत्ती उभी करावी लागते. परिणामतः त्यांचे उपन्न व खर्चाचे अंदाज पूर्णपणे विस्कळीत होतात. पंचायत राज संस्थांचे बाबतीत सांगायचे झाल्यास या संस्थांना स्वतःचे असे पुरेसे उत्पन्न नाही. त्यामुळे त्यांना केवळ राज्य शासनावर मदतीसाठी अवलंबून रहावे लागते. तथापि नागरी संस्थांना स्वतःचे असे मोठे उत्पन्न असते. त्यांच्या महसुली व भांडवली खर्चाच्या गरजा भागविण्यासाठी या उत्पन्नांत वाढ करणे जरूरीचे आहे असे मान्य केले तरीही आकस्मिकरित्या उद्‌भवणाऱ्या प्रसंगांना समर्थपणे तोंड देण्यासाठी त्यांचेजवळ लहानसा का होईना एक राखीव निधी असणे गरजेचे आहे. **त्यामुळे आयोग अशी शिफारस करीत आहे की, प्रत्येक नागरी संस्थेने तिच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या अर्ध्या टक्क्याइतकी रक्कम दरवर्षीच्या अर्थसंकल्पात वेगळी बाजूला काढून तो ' आपत्ती निवारण निधी ' म्हणून वेगळा ठेवावा.** या निधीचा उपयोग आपत्ती निवारणसाठी केला जाईलच, परंतु इतर वेळी नागरी संस्थांच्या क्षेत्रांत जे विविध प्रकारचे तातडीचे प्रश्न निर्माण होतात, उदाहरणार्थ साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव, अतिवृष्टीमुळे रस्ते व पायाभूत सेवासुविधांना होणारी हानी, त्यासाठी देखील या निधीचा वापर करता येऊ शकेल. परिस्थितीच्या गरजेनुसार अशा प्रकारे गठित केलेल्या निधीमधील रकमांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता भासली तरी या आकस्मिक आपत्तींना तोंड देण्यासाठी काही निधी उपलब्ध आहे असा विश्वास या संस्थांना असेल व त्यामुळे त्यांचे खर्च उत्पन्नाचे अंदाज कोलमडून पडणार नाहीत.

**जिल्हा नियोजन समिती व महानगर नियोजन समितीची स्थापना**

१४.३७. भारतीय संविधानात झालेल्या ७४ व्या दुरुस्तीनुसार घटनेतील अनुच्छेद २४३-झेड-डी अन्वये प्रत्येक राज्यामध्ये जिल्हा स्तरावर नगरपालिकांनी व पंचायतींनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रीकरण करून संपूर्ण जिल्ह्यासाठी एकच प्रारूप योजना तयार करण्यासाठी " जिल्हा नियोजन समिती " स्थापन करण्याची तसेच अनुच्छेद २४३-झेड-ई अन्वये संपूर्ण महानगर क्षेत्रासाठी विकास योजनांचा आराखडा तयार करण्याकरिता एक " महानगर नियोजन समिती " स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

१४.३८. वरील दोन्ही समित्यांच्या स्थापनेसंदर्भात आयोग अशी शिफारस करीत आहे की, राज्य शासनाने घटनेतील तरतुदी विचारात घेऊन सदर समित्यांची रचना, सभासद संख्या, अध्यक्षांची निवड आणि या समित्यांकडे सोपवावयाची कार्ये, त्यांची कार्यपद्धती इत्यादी व अनुषंगिक बाबीसंदर्भात कायदा करावा.

१४.३९. सध्या राज्यात जिल्हा स्तरावर पंचवार्षिक व वार्षिक योजनांचे नियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात '' जिल्हा नियोजन व विकास मंडळ ' (डी.पी.डी.सी.) राज्य शासनाने स्थापन केलेले आहे. शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यांना कळविलेल्या नियतव्ययाच्या आधारे जिल्हा नियोजन व विकास मंडळे त्यांच्या योजनांचे आराखडे तयार करतात व त्यानंतर मंडळाने तयार केलेल्या योजना त्यांच्या प्रतिनिधींशी राज्य स्तरावर चर्चा करून अंतिम करण्यात येतात व त्या योजनांचा अंतर्भाव राज्य योजनेमध्ये करण्यात येतो. मात्र असे दिसून येते की. बऱ्याचशा योजना या मागील कालावधीपासून पुढे सुरू राहणाऱ्या असतात. त्यामुळे प्रत्यक्षात जिल्हा आराखड्यातील मोठी तरतूद अशा योजनांच्या खर्चासाठी बांधिल स्वरूपाची केलेली आढळून येते. परिणामतः जिल्हा स्तरावरील निकड लक्षात घेऊन स्वतःच्य विवेकाने व तारतम्याने नव्या योजना आखण्यास फारसा वाव दिसून येत नाही. तसेच उक्त मंडळात ग्रामीण भागातील प्रतिनिधीत्त्व जास्त असल्यामुळे सर्वसाधारणपणे ग्रामीण भागाला प्राधान्य देण्यात येत असून, शहरी भागाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही.

१४.४०. **ग्रामीण व नागरी क्षेत्राला समान प्राधान्य मिळावे आणि समान हिताच्या बाबींसंदर्भात जिल्हा स्तरावर स्वपुढाकाराने संतुलित समतोल नियोजन व्हावे हा संविधानातील दुरुस्तीचा व्यापक असा हेतू आहे व तो साध्य करण्यासाठी शासनाने संविधानातील तरतुदीनुसार '' जिल्हा नियोजन समिती '' आणि ' महानगर नियोजन समिती ' यांची स्थापना लवकरात लवकर करावी अशी आयोगाची शिफारस आहे.**

भविष्यकाळासाठी सूचना

१४.४१. ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्ती अन्वये घटनेच्या अनुच्छेद २८० मध्ये खंड ३(बब) व ३(क) चा समावेश करून दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरुस्तीअन्वये केंद्रीय वित्त आयोगावर, राज्य वित्त आयोगाचे शिफारशींनुसार, पंचायत राज संस्थांच्या व नागरी संस्थांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांची अनुपूर्ती करण्यासाठी राज्याचा एकत्रित निधी वाढविण्यास उपाय सुचविण्याचे काम सोपविण्यात आले आहे. जेव्हा या राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती, तेव्हा दहाव्या केंद्रीय वित्त आयोगाचे काम अंतिम स्थितीत पोहोचले होते. तरीसुद्धा त्यांनी पंचायत राज संस्थांसाठी व नागरी संस्थांसाठी अंतरिम आधारावर काही तरतुदी केल्या आहेत. या तरतुदींचा काही मार्गदर्शक सूचनांप्रमाणे (ज्या तयार करण्यात येत आहेत) वापर करावयाचा आहे. तरीसुद्धा या तरतुदी पगार व भत्त्यांसाठी खर्च करावयाच्या नाहीत हे त्यातील मुख्य सूत्र राहणार आहे. हा निःसंशय प्रशंसनीय विचार असून आयोग त्यास सहमती दर्शविते.

१४.४२. केंद्रीय वित्त खात्याने त्याचे या वाटपासंबंधातील सूचनांप्रमाणे ही अनुदाने राज्य योजनेचा भाग म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना वर्ग करण्यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत.

आयोग सुद्धा असे सांगू इच्छितो की, ही अनुदाने भांडवली स्वरूपाच्या, ज्यामुळे पायाभूत सोयी वाढतात अशा कामावर खर्च करण्यात यावीत. पंचायत राज संस्थांमध्ये विकासात्मक स्वरूपाचे कार्यक्रम योजना अनुदानातून घेण्यात येत असल्याने अडचणी नाहीत. मात्र महाराष्ट्रातील नागरी संस्थांमध्ये त्यांच्या भांडवली स्वरूपाच्या गरजा या बऱ्याच प्रमाणात त्यांचे स्वतःचे उत्पन्नातून भागविण्यात येतात. त्यामुळे हा खर्च विकासात्मक स्वरूपाचा असूनसुद्धा राज्याच्या योजनेत दिसत नाही. त्यामुळे आयोगास हे योग्य वाटते की. **नागरी संस्थांच्या भांडवली स्वरूपाच्या गरजांसाठी केंद्रिय वित्त आयोगाने दिलेला निधी उपलब्ध व्हावा.**

**या व्यतिरिक्त स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अनुरूप अंशदानाच्या मागणीचा आग्रह धरण्यात येऊ नये.** कारण या संस्थांपैकी काही संस्थांची आर्थिक स्थिती चांगली नाही. ज्या संस्था अनुरूप अंशदान देऊ शकत नसतील त्यांची तरतूद राज्य शासनाने आपल्या योजनेतून करावी.

१४.४३. आयोगाने पंचायत राज संस्थेसाठी व नागरी संस्थांकरिता आयोगाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार तूट काढली आहे. ही तूट फार मोठी आहे. वाटपाची तत्त्वे ठरविताना आयोगाने राज्याचे स्त्रोतामध्ये हिस्सा देताना स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे स्वतःचे उत्पन्नही वाढवावे अशी काळजी घेतली आहे. तरीसुद्धा बरीच तूट शिल्लक राहते, कारण उत्पन्नाची साधने गरजेपेक्षा कमी आहेत. आयोग त्यामुळे सुचवू इच्छितो की, जेव्हा पुढील केंद्रीय वित्त आयोग काम सुरू करेल त्यावेळेस शासनाच्या संबंधित खात्यांनी या वित्त आयोगाने तयार केलेल्या माहितीचा आधार घेऊन पंचायत राज संस्थांची व नागरी संस्थांची बाजू त्यांचेसमोर मांडावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गरजांचे व आवश्यकतेचे निर्धारण ही यापुढे सतत चालणारी प्रक्रीया असेल. त्यामुळे त्यांची उत्पन्नाची साधने, त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कार्यांशी अनुरूप राहतील, व घटनेचे ध्येय साध्य होईल.

# उपसंहार

घटनेतील ७३ व ७४ व्या दुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने संविधानाच्या २४३-आय व २४३-वाय या अनुच्छेदांच्या अनुषंगाने अधिसूचना क्र. एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल, १९९४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना कर, कराचा वाटा व सहाय्यक अनुदान देण्यासाठी तत्त्वे ठरविण्याबाबत शिफारशी करण्याकरिता पहिला महाराष्ट्र राज्य वित्त आयोग गठीत केला आहे.

आयोगाने राज्यातील काही पंचायती राज संस्था व नागरी स्वराज्य संस्थांना भेटी देऊन त्यांचे पदाधिकारी व अधिकारी तसेच राज्य शासनाच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. या क्षेत्राशी संबंधित असलेल्या काही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांबरोबरही चर्चा केली. त्यांनी केलेल्या विविध सूचना, दिलेली माहिती व व्यक्त केलेली मते यांचा सखोल अभ्यास करून पंचायत राज संस्था व नागरी संस्थांच्या आर्थिक अडचणी व प्रश्न याबाबत शिफारशी केलेल्या आहेत. हे करतांना आयोगाने राज्य शासनाची आर्थिक क्षमता आणि त्याच बरोबर पंचायत राज संस्था व नागरी संस्था यांची देण्यात येणाऱ्या निधीचा योग्य रीतीने अर्थपूर्ण वापर करू शकण्याची कुवतही लक्षांत घेतली आहे. या संस्थांना विविध गरजांसाठी लागणाऱ्या निधीची आवश्यकता काढतांना कांही विशिष्ट बाबींचा/क्षेत्रांचा विचार केला असला तरी ग्रामीण व नागरी भागातील निरनिराळे कार्यक्रम, योजना व सेवा-सुविधांची देखभाल व दुरुस्ती तसेच त्या व्यवस्थितपणे चालू रहातील याबाबत काळजी घेतली आहे. याचबरोबर या ग्रामीण आणि नागरी संस्था स्वतः प्रयत्न करून अधिक निधी उभारु शकतील या दृष्टीने अभ्यास करून शिफारशी केल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रशासनिक आणि आर्थिक कार्यपद्धतीत सुधारणा करून त्यांच्या कामाचा दर्जा आणि पातळी सुधारली पाहिजे असे आयोगाचे मत आहे आणि हा दृष्टीकोन समोर ठेवून शिफारशी केल्या आहेत.

आयोगाचा हा अहवाल सन १९९६–९७ हे वर्ष जवळजवळ संपत असताना पूर्ण झाला आहे. आयोगाने केलेल्या शिफारशी सन १९९७–९८ या आर्थिक वर्षापासून शासन अंमलात आणील असे आयोगाने गृहित धरले आहे आणि त्या अनुषंगाने शिफारशी केल्या आहेत.

आयोगाच्या कामकाजाच्या निमित्ताने झालेल्या भेटीगाठी व चर्चा व केलेला अभ्यास अनेक कल्पनांना आकार देत होता. आयोगाची कार्यकक्षा आणि वेळ यांची मर्यादा लक्षात घेता सर्वच संकल्पना शिफारशींच्या स्वरूपात नमूद करता आल्या नाहीत. तरीही आम्ही प्रयत्नांची पराकाष्टा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यापुढील विकासाच्या वाटचालीला एक दिशा देऊ शकणाऱ्या या राज्याच्या पहिल्या वित्त आयोगाच्या कामात आम्हाला सहभागी होता आले याचा आम्हाला आनंद आणि अभिमान वाटतो.

वित्त आयोगाने वैधानिक विकास मंडळाच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांबरोबरही चर्चा केली. त्यामध्ये श्री. दिवाकर रावते, अध्यक्ष व श्री. भुजंगराव कुळकर्णी, सदस्य, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद याचा विशेष उल्लेख करावा लेगेल. त्यानी आयोगाशी चर्चा करून कांही उपयुक्त सूचना करण्यासाठी आपला अमूल्य वेळ दिला.

मा. मुख्यमंत्री संबंधित खात्यांचे मान्यवर मंत्री आणि विधीमंडळ सदस्य यांचेशी झालेल्या चर्चाही फलप्रद ठरल्या आहेत.

**श्री. मकरंद कु. हेरवाडकर**

अध्यक्ष

**श्री. विजयराय तातेड**
सदस्य

**श्री. दिवाकर कळसूलकर**
सदस्य

**श्री. श्रीपाद पटवारी**
सदस्य

**श्री. प्रे. प्र. महाना**

सदस्य-सचिव.

# आभार

वित्त आयोगाने ग्रामपंचायतींच्या आर्थिक बाबींचा अभ्यास करून अहवाल देण्याचे काम सेंटर ऑफ स्टडिज इन सोशल सायन्सेस, पुणे या संस्थेला दिले होते. या संस्थेचे अध्यक्ष, डॉ. ए. पी कुलकर्णी तसेच उप संचालक, श्री. अभय टिळक व वरिष्ठ संशोधन अधिकारी, श्री. भास्कर मुजुमदार यांनी फार मेहनत घेऊन, अहवाल तयार करून आयोगाला दिला. तसेच आयोगाबरोबर अनेक वेळा चर्चा करून आयोगाला आवश्यक असलेली माहिती पुरविली.

२. श्री. गोविंदभाई श्रॉफ, अध्यक्ष, स्वामी रामानंद तीर्थ इन्स्टिट्यूट ऑफ सोशिओ इकॉनॉमिक रिसर्च अँड नॅशनल इंटिग्रेशन संस्था, औरंगाबाद; श्री. वसंत नाचणे, डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट, मुंबई; श्री. विनय सहस्रबुद्धे, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई यांच्याबरोबर आयोगाने केलेल्या चर्चेचा आयोगाला उपयोग झाला.

३. श्री. के. आर. खानोलकर, माजी संचालक, अखिल भारतीय स्वराज्य संस्था, मुंबई आणि त्यांचे इतर सहकारी यांनी आयोगाला वेळोवेळी आवश्यक ती माहिती पुरविली व त्यांनी केलेल्या सूचनांचा आयोगाला उपयोग झाला.

४. वित्त आयोगाने काही जिल्हा परिषदा तसेच महानगरपालिका व नगरपरिषदा यांना भेटी देऊन त्यांचे पदाधिकारी व अधिकारी यांच्याबरोबर चर्चा केली. या चर्चेमध्ये या पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी आयोगाला उपयुक्त अशी माहिती देऊन सर्व प्रकारचे सहकार्य दिले.

५. मंत्रालयाच्या विविध विभागांचे सचिव तसेच राज्य शासनाच्या कार्यालयांचे अधिकारी यांनी आयोगाला आवश्यक ती माहिती वेळेवर देऊन मदत केली आहे. विशेषतः ग्रामीण विकास विभाग, नगरविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जलसंधारण आणि रो. ह. यो. विभाग आणि त्यांच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयांनी आयोगाला वेळोवेळी सहकार्य दिले. आयोगाशी संबंधित प्रशासनिक विभाग म्हणजे वित्त विभागाने आयोगाच्या संपूर्ण कालावधीत काम सुकर आणि वेळेवर होण्यासाठी पूर्ण सहकार्य दिले.

६. श्री. प्र. शं. मोरे, संचालक; श्री. प्र. ल. पुरकर, उप संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री आणि पुस्तक भांडार, मुंबई; तसेच श्री. प. ज. गोसावी, व्यवस्थापक; श्री. अ. कृ. राव, सहाय्यक व्यवस्थापक; श्री. ज. स. नागवेकर, लेखपट यंत्रचालक, तसेच इतर संबंधित कर्मचारीवृंद, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी आयोगाच्या अहवालाची छपाई विहित मुदतीत सुबक व चांगल्या प्रकारे करून दिली.

७. श्री. प. ग. पाटील, संचालक, भाषा संचालनालय, मुंबई यांनी आयोगाला मदत केली आहे.

८. श्री. भा. मा. नगराळे, संचालक व श्री. मा. वि. गोखले, सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी वेळोवेळी आयोगाला मदत केली. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण केंद्राने आयोगाने गोळा केलेल्या माहितीचे संगणित्रीकरण करून दिले. यासाठी श्री. वि. र. गाडगीळ, अपर संचालक व श्रीमती अ. दि. देव, सहसंचालक यांनी स्वतः जातीने परिश्रम घेऊन माहितीचे योग्य प्रकारे संकलन करण्यास मोलाचा हातभार लावला.

९. महाराष्ट्र वित्त आयोगातील खालील अधिकाऱ्यांनी मेहनतीने आयोगाचे काम पूर्ण करण्यास खूप मदत केली.

(१) श्री. म. क. झनकर .. उप सचिव

(२) श्री. प्र. वा. पांढरीपांडे .. विशेष कार्य अधिकारी

(३) श्रीमती शै. मु. अपराजित. .. प्रभारी अधिकारी

(४) श्री. स. शां. नारकर .. अवर सचिव

(५) श्री. रा. पां. मुंडे .. अवर सचिव

(६) श्री. वि. शं. शास्त्रकार .. विशेष कार्य अधिकारी

(७) श्री. ना. हे. सोनारे .. कक्ष अधिकारी व अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक

(८) श्री. सु. कु. मोटवानी .. सांख्यिकी अधिकारी.

१०. आयोगातील श्री. एम्. बाळकृष्णन्, श्रीमती प्र. प्र. आठवले, श्रीमती यो. या. खानोलकर, श्रीमती प्रि. प्र. हळदणकर, कु. सु. र. थोरात या लघुलेखकांनी अतिशय श्रम घेऊन अहवालाच्या टंकलेखनाचे काम वेळेवर करून दिले. तसेच आयोगातील इतर कर्मचारी, सर्वश्री अं. ए. भाबड, वि. ब. पवार; सांख्यिकी सहाय्यक; सर्वश्री रा. ह. पाध्ये, गं. वि. मठपती, सहाय्यक; श्री. प्र. स. ठाकूर, रोख लेखापाल; कु. शु. पां. कडू, देयक लेखापाल आणि सर्वश्री. प्र. दे. काळे, रा. ना. नितनवरे, लिपिक-टंकलेखक या सर्वांनी आयोगाच्या कामात चांगले योगदान दिले आहे. आयोगात काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थोड्या अवधीसाठी काम केले. त्यांच्या कामाचाही आयोगाला उपयोग झाला.

□ □

# शिफारशींचा गोषवारा

(१) अनुदान व कराच्या वाटपाबाबतच्या शिफारशी

### पंचायत राज संस्था

पंचायत राज संस्थांना मिळालेल्या जमीन महसूल व त्यावर आधारित उपकराच्या अनुदानाचे वितरण हे वसुलीशी न जोडता त्यांच्या मागणीशी जोडण्यात यावे. प्रत्येक वर्षाचा जमीन महसूल व त्यावरील उपकर अनुदान मागणीच्या ६६.६७ टक्के पंचायत राज संस्थांना आगाऊ म्हणून एक किंवा दोन हप्त्यात देण्यात यावा. या अनुदानापेक्षा जादा वसुली झाली असल्यास तेवढा फरक पुढील वर्षात देण्यात यावा. मात्र त्या वर्षात दिलेल्या अनुदानापेक्षा कमी वसुली झाल्यास या संस्थांकडून वसुली करण्यात येऊ नये. १३.४

जमीन महसुलावरील उपकर अनुदानाप्रमाणे सिंचन पट्टीवरील उपकर मागणीच्या ६६.६७ टक्के जिल्हा परिषदांना आगाऊ म्हणून देण्यात यावा. या अनुदानापेक्षा जादा वसुली झाली असल्यास तेवढा फरक त्या पुढील वर्षी देण्यात यावा. मात्र दिलेल्या अनुदानापेक्षा कमी वसुली झाल्यास जिल्हा परिषदांकडून कोणत्याही प्रकारची वसुली करू नये.

१३.८

जिल्हा परिषदांना वन क्षेत्रातील परियोजना अधिक चांगल्या रीतीने राबविण्यासाठी वन महसूल अनुदानाचे प्रमाण १० टक्के करण्यात यावे. १३.१२

अभिकरण शुल्काचा दर खर्चाच्या ३ टक्के ऐवजी १० टक्के इतका द्यावा. १३.१३

जिल्हा परिषदांना सन १९९७-९८ या वर्षी रस्ता दुरुस्तीसाठी मिळणाऱ्या अनुदानाचे, प्रमाण निकषाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निधीच्या ४० टक्के करण्यात यावे. १३.१४

हस्तांतरित व अभिकरण तत्त्वावरील योजनांपासूनचे उत्पन्न शासनाकडे हस्तांतरित न करता जिल्हा परिषदांकडे ठेवण्यात यावे. १३.२०

बिगर शेती जमीन कर प्रत्येक जिल्हा परिषदेने आकारावा. १३.२१

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या या संस्थांच्या व्यवस्थापनात सुधारणा होऊन त्यांच्या साधनसंपत्तीत वाढ व्हावी आणि प्रशासकीय कार्यक्षमता गतीमान करून ग्रामीण लोकसंख्येला पुरेशा सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतुने काही अटींवर प्रत्येक जिल्हा परिषदेस दरवर्षी रुपये २५ लाख प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. १३.२६

प्रोत्साहन अनुदानापैकी ५० टक्के रक्कम पंचायत समित्यांना जिल्हा परिषदांकडून समान प्रमाणात प्राप्त होईल.

१३.२७

यापुढे सध्याच्या अनुदान तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी निधी कराच्या वाट्याच्या स्वरूपात देता येणे शक्य व्हावे याचा शासनाने सखोल अभ्यास करावा आणि त्या दिशेने पाऊल उचलावे व सन २००१ पर्यंत ते अनुदानाच्या ऐवजी कराच्या वाट्याच्या रुपाने उत्पन्न उपलब्ध होण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. १३.२८

सध्या ग्रामपंचायतींना सामान्य जमीन महसूल अनुदान ५ वर्षांच्या सरासरी एवढे देण्यात येते, हे अनुदान एकूण मागणीच्या ६६.६७ टक्के अग्रीम स्वरूपात देण्यात यावे. १३.३०

सामान्य जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयामागे १०० पैसे प्रमाणे उपकर अनुदान ग्रामपंचायतींना प्राप्त होतो. हा उपकरही मागणीच्या ६६.६७ टक्के अग्रीम स्वरूपात देण्यात यावा. १३.३१

राज्य शासनास " व्यवसाय कर " या स्त्रोताद्वारे प्राप्त होणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम वेगळी काढून त्यातील २० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या आधारावर दरडोईप्रमाणे देण्यात यावी. १३.३२

### नागरी स्थानिक संस्था

महागाई भत्ता अनुदानाची टक्केवारी अ-वर्गासाठी ९० टक्के ब-वर्ग व क-वर्ग नगरपरिषदांसाठी १०० टक्के अशी करावी. १३.३९

मुख्याधिकारी वेतन, भत्ते अनुदान वितरणासंबंधीची १५,००० लोकसंख्येची विहित केलेली मर्यादा काढून टाकण्यात यावी आणि हे अनुदान सर्व क-वर्ग नगरपरिषदांना देण्यात यावे. १३.४०

जमीन महसूल अनुदान सर्व नागरी संस्थांना सध्याच्या १५ टक्के ऐवजी ७५ टक्के या दराप्रमाणे देण्यात यावे. १३.४१

करमणूक करापोटी नागरी संस्थांच्या क्षेत्रात गोळा होणाऱ्या या करातील वाटा शासन करातील हिस्सा म्हणून अ-वर्ग नगरपरिषदांना ५० टक्के, ब-वर्ग नगरपरिषदांना ९० टक्के, क-वर्ग नगरपरिषदांना १०० टक्के तर महानगरपालिकांना २५ टक्के या सुधारित दराने देण्यात यावा. १३.४२

मोटार वाहन कराद्वारे राज्य शासनाला मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातील १० टक्के रक्कम वेगळी काढून ती सर्व नागरी संस्थांना (मुंबई महानगरपालिका वगळून) लोकसंख्येच्या आधारावर रस्ते अनुदान म्हणून दिली जाते. आयोगाची अशी शिफारस आहे की, यापुढे मोटार वाहन कराच्या निव्वळ उत्पन्नातील २५ टक्के रक्कम वेगळी काढून ती सर्वच नागरी संस्थांना मुंबई महानगरपालिकेसह लोकसंख्येच्या आधारावर " शासन करातील हिस्सा " म्हणून वितरित करण्यात यावी. मुंबई महानगरपालिकेला तिच्या क्षेत्रात व्हील टॅक्स पासून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त हे रस्ता अनुदान मिळेल. १३.४३

मुद्रांक शुल्कावरील अधिभाराची टक्केवारी १/२ टक्के वरून वाढवून ती १ टक्का करावी व त्याची रक्कम नगरपरिषदांना देण्यात यावी. सध्या महानगरपालिकांना मुद्रांक शुल्क अनुदान मिळत नाही. महानगरपालिका क्षेत्रातही १ टक्का प्रमाणे अधिभार लावण्याची तरतूद करून ती रक्कम सर्व महानगरपालिकांना देण्यात यावी. सध्या नागपूर सुधार प्रन्यासला १/२ टक्के याप्रमाणे मुद्रांक शुल्क अनुदान देण्यात येते. नागपूर सुधार प्रन्यासाला वरील अनुदान चालू ठेवून प्रस्तावाप्रमाणे जी अतिरिक्त रक्कम उपलब्ध होईल ती नागपूर महानगरपालिकेला द्यावी. १३.४४

क-वर्ग नगरपरिषदांना गौण खनिज अनुदान देण्याबद्दल सध्या जी रु. १ लाखाची कमाल मर्यादा आहे. ती रु. ५ लाखापर्यंत वाढवावी. १३.४५

राज्य शासनाला व्यवसाय करातून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नातून १० टक्के रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यासाठी वेगळी काढावी आणि त्यातील ८० टक्के वाटा नागरी संस्थांना (महानगरपालिका व नगरपरिषदा) १९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर दरडोईनुसार वितरीत करण्यात यावा. या करातील जी रक्कम या संस्थेमध्ये वाटली जाईल ती करातील हिस्सा म्हणून असेल. १३.४६

झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत नागरी संस्थांना सध्या दिल्या जाणाऱ्या सहाय्यक अनुदानाची दरडोई रु. ८०० ही मर्यादा वाढवून ती दरडोई रु. १,००० अशी करण्यात यावी. १३.४७

गिरीस्थान नगरपरिषदांना प्रत्येकी दरवर्षी रु. १० लाख एवढे विशेष असे " पर्यटन विकास अनुदान " द्यावे. हे अनुदान त्यांना मिळत असलेल्या इतर अनुदानाव्यतिरिक्त असेल. १३.४८

अ-वर्ग व ब-वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत असलेल्या प्राथमिक शिक्षण अनुदानाच्या सध्याच्या टक्केवारीत १० टक्केने वाढ करावी. मुंबई महानगरपालिकेलाही प्राथमिक शिक्षण अनुदान टप्प्याटप्प्याने न वाढविता १९९७-९८ पासूनच इतर महानगरपालिकांसारखे ५० टक्केप्रमाणे देण्यात यावे. १३.४९

प्रत्येक महानगरपालिका आणि प्रत्येक अ-वर्ग, ब-वर्ग व क-वर्ग नगरपरिषद यांना अनुक्रमे रु. १ कोटी, रु. ४० लाख, रु. २५ लाख, रु. १५ लाख इतके प्रोत्साहनात्मक अनुदान, सदर परिच्छेदात या अनुदानासाठी विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात यावे. १३.५०

## (२) कर व शुल्काबाबतच्या शिफारशी

### (अ) मालमत्ता कर

मालमत्ता कराच्या दराची कमाल मर्यादा गाठावयाचा प्रयत्न केल्यास या नगरपरिषदांचे उत्पन्न बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. ५.१४३

आयोगाच्या मते शासनाने पुणे जिल्हा परिषदेने अनुसरलेल्या पद्धतीचा अभ्यास करून इमारत व जमिनीवरील कर विषयाच्या तरतुदीत योग्य ती सुधारणा करावी म्हणजे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल. ७.३४

मालमत्ता कराच्या महसुलात होणारे आर्थिक नुकसान तसेच एकाच शहरातील नागरिकांवर होत असलेली कर आकारणीतील विषमता दूर करण्याचे दृष्टीकोनातून भाडे नियंत्रण अधिनियमात आणि नागरी संस्थांच्या अधिनियमात योग्य त्या सुधारणा होणे गरजेचे आहे. या संदर्भात भारत सरकारने तयार केलेला " नमुना भाडेनियंत्रण कायदा, १९९२ ' (मॉडेल रेन्ट कंट्रोल लॉ १९९२) मधील तरतुदी विचारात घेऊन, भाडेनियंत्रण अधिनियमात सुधारणा करता येईल काय, याचा शासनाने विचार करावा आणि भाडेनियंत्रण कायद्याचा प्रभाव नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे करयोग्य मूल्य निर्धारित करताना पडणार नाही अशी सुधारणा करण्यात यावी. नागरी क्षेत्रात सध्या मालमत्तांचे करयोग्य मूल्य काढताना त्या जागेचे भाडे मूल्य विचारात घेतले जाते. करयोग्य मूल्य काढण्यासाठी भाडे मूल्याऐवजी मालमत्तांचे क्षेत्रफळच फक्त विचारात घेऊन त्या आधारावर कराचे दर ठरविता येतील किंवा कसे, याबाबत विचार व्हावा असे आयोगाला वाटते. यात असे दर ठरवितांना इमारतीचे स्थान, क्षेत्रफळ, बांधकामाचा प्रकार या बाबींना योग्य तो भार (वेटेज) देऊन विरूद्ध अर्थसहाय्यित तत्त्वाची (क्रॉस सबसिडी) अंमलबजावणी केली तर उत्पन्नात चांगली वाढ होऊ शकेल. ८.६

नागरी क्षेत्रातील मालमत्तांचे फेरमुल्यांकन समयबद्ध रीतीने वेळचेवेळी झाले पाहिजे. म्हणजे नागरीकांवर कराचा अचानक बोजा पडणार नाही व त्यामुळे त्यांच्यात असंतोषही निर्माण होणार नाही. तसेच फेरमूल्यांकानुसार करावयाच्या कर आकारणीची अंमलबजावणी संबंधित नागरी संस्थांनी त्वरित अंमलात आणली पाहिजे. ८.९

नगरपरिषदांच्या अधिनियमामध्ये मालमत्तांचे फेरमूल्यांकन दर ४ वर्षांनी करण्याची स्पष्ट तरतूद आहे. तशी स्पष्ट तरतूद महानगरपालिकांच्या अधिनियमामध्ये नाही. फेरमूल्यांकनाबाबत अधिनियमात निश्चित स्वरूपाची स्पष्ट तरतूद करण्यात यावी अशी काही महानगरपालिकांची मागणी आहे व ती योग्य असल्याचे आयोगाचे मत आहे. ८.१०

वित्त आयोगाची अशी शिफारस आहे की, मालमत्ता कराच्या थकित रकमेवर भरावयाच्या शिक्षात्मक व्याजाचा दर दरमहा एकूण देय रकमेच्या २ टक्के एवढा असावा. ८.११

मालमत्ता कराच्या रकमेबाबत काही विवाद निर्माण झाल्यास, अपिल दाखल करण्यापूर्वी मालमत्ताधारकाने पूर्वीच्या मागणीच्या १०० टक्के रक्कम तरी नागरी संस्थांकडे भरणे आवश्यक असेल. त्याचबरोबर या विवादाचा निकाल लागेपर्यंतच्या नंतरच्या वर्षांच्या मागणीपोटीही पूर्वीच्या मागणीएवढी १०० टक्के रक्कम नागरी संस्थांकडे प्रथम भरावी अशी तरतूद नियमात/अधिनियमात होणे आवश्यक आहे. ८.१२

नागरी क्षेत्रातील मोकळ्या भूखंडावर कर आकारणीची पद्धत, त्यांचे मूल्यांकन, कराचे दर इत्यादीबाबत निश्चित अशी मार्गदर्शक तत्त्वे ठरवून नियमात योग्य ते बदल तातडीने करणे आवश्यक आहे. ८.१३

काही सार्वजनिक हिताचे खास कारण असल्याशिवाय सर्वच सरकारी मालमत्तेवर (यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे, महामंडळे यांच्याही मालमत्तांचा समावेश असेल) स्थानिक संस्थांना सर्वसाधारण करदात्याप्रमाणे मालमत्ता कर आकारणीचे अधिकार दिले पाहिजेत आणि कराचा भरणा केला पाहिजे. या दृष्टीने तपशीलवार अभ्यास करून अधिनियमात योग्य त्या सुधारणा करण्यासाठी विचार व्हावा. केंद्र शासनाच्या आणि त्यांची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमे, मंडळे, महामंडळे इत्यादींच्या मालमत्तांवर वरील प्रकारे कर आकारणी करण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या कायद्यात अथवा नियमात बदल करणे आवश्यक असल्यास, त्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा. ८.१६

नागरी संस्थांनी झोपडपट्ट्यांवर मालमत्ता कराची आकारणी, सवलतीच्या दराने का होईना करून त्याद्वारे उत्पन्न प्राप्त केलेच पाहिजे व देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च तरी परिणामकारकपणे वसूल झाला पाहिजे या दृष्टीने कारवाई करावी अशी आयोगाची भूमिका आहे. इतकेच नव्हेतर अशा झोपडपट्ट्या नव्याने निर्माण होणार नाहीत याबाबत शासनाने योग्य ते निर्बंध लादले पाहिजेत. ८.५७

१९९६-९७ ते २०००-२००१ या पाच वर्षांच्या कालावधीत मालमत्ता कराच्या दरात ५ टक्के एवढी टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात यावी. १२.४१ (१)

मालमत्ता करातील कमाल मर्यादा काढून टाकून आणि किमान दराची मर्यादा कायद्याप्रमाणे कायम ठेवून त्यापुढे सुसह्य आणि योग्य असे कराचे दर निश्चित करण्याचे स्वातंत्र्य नगरपरिषदांना देण्यात यावे. १२.४१ (२)

(ब) जकात

जकात कराचे किमान व कमाल दर नियमान्वये निश्चित केले असले तरी बऱ्याच नागरी संस्था जकात करासाठी विहित केलेली कराची कमाल मर्यादा गाठण्यासाठी प्रयत्नशील नाहीत. कमाल मर्यादेपर्यंत कर आकारणीचा प्रयत्न झाल्यास या करापासूनच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्याची शक्यता आहे. इतकेच नव्हे तर नियमानुसार विहित केलेल्या किमान व कमाल दरांचे कालानुरुप पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे. ५.३४

नगरपरिषदांसाठी शासनाने १९६६ मध्ये तयार केलेले नगरपरिषद जकात नियम अंमलात आहेत. आता जवळजवळ ३० वर्षांचा कालावधी लोटला असून व्यापार उदीमाच्या प्रकारातही आमूलाग्र बदल झाले आहेत. हे विचारात घेता जकात नियमातील तरतुदींचे काळानुरुप पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे. ८.१८

जकात नाक्यावर आयात करण्यात आलेल्या मालावर भरलेली जकात कितपत बरोबर भरली याचा पडताळा प्रचलित पद्धतीत घेता येत नाही. या पद्धतीत थोडी सुधारणा करून व्यापाऱ्यांचे लेखे तपासण्यासाठी नगरपरिषदांच्या अधिकाऱ्यांना / बाह्य लेखापरिक्षकांना अधिकार देण्याबाबत नियमात योग्य त्या सुधारणा करण्याचा विचार व्हावा. ८.१८-ब

खाजगीकरणामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांचा सखोल विचार करून त्याप्रमाणे नियमांत किंवा पद्धतीमध्ये योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच ज्या नागरी संस्थांचा जकातीपासूनच्या उत्पन्न वाढीचा दर संबंधित वर्गाच्या सरासरी जकात उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा कमी असेल, त्या नागरी संस्थांना जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यासाठी, नियमात योग्य त्या तरतुदी करून भाग पाडले पाहिजे. ८.२६

जकात वसुलीमधील उणिवांकडे फक्त नगरपरिषदेच्या अंतर्गत प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याचे नसून यामध्ये वस्तुनिष्ठता, व्यावसायिकता व पारदर्शकता आणण्यासाठी संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी तयार केलेले बाहेरील लेखापरिक्षकांचे पॅनेल असावे. ही पद्धत काही थोड्या नगरपरिषदांमध्ये चाचणी दाखल सुरू करण्यात यावी व नंतर चाचणीच्या निष्कर्षाप्रमाणे ही पद्धत पुढे प्रमाणीकृत करता येईल व सर्वसामान्यपणे वापरता येईल. १४.१५

(क) करेतर उत्पन्न (पाणीपट्टी, सिंचनपट्टी)

पाणीपुरवठा योजनांवरील हा खर्च भरून निघण्यासाठी व या योजना ना नफा, ना तोटा या तत्त्वावर चालविण्याचे दृष्टीने पाणीपट्टीच्या दरात योग्य वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. ५.११५

सेवा सुविधा पुरविण्यासाठी लागणारा खर्च व त्यासाठी आकारलेले दर / शुल्क इत्यादीची सांगड घातल्यास व त्याचे वेळोवेळी पुनर्विलोकन करून त्यात नियमितपणे सुधारणा केल्यास या बाबींपासून होणाऱ्या उत्पन्नात चांगली वाढ होण्याची शक्यता आहे. स्वतःचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून या बाबी विचारात घेऊन त्यानुसार त्यांच्या दरात वाढ केली पाहिजे. ५.१५४

जमीन महसुलातील व सिंचनपट्टीवरील उपकर अनुदान जिल्हा परिषदांना मागणीच्या आधारे देणे, मागणीचे दर ठरले असल्याने प्रत्यक्ष मागणीच्या आधारे देय अनुदानाची रक्कम एका ठराविक कालावधीसाठी निश्चित करण्यात यावी व त्याची शासनाच्या अर्थसंकल्पात दरवर्षी तरतूद करण्यात यावी. उपकराचे दर जेव्हा बदलतील त्यावेळी आणि त्या बदलानुसार या रकमेत फ़रक करावा. शिवाय ही रक्कम वर्षातून दोन किंवा अधिक आगाऊ हप्त्यात जिल्हा परिषदांना वितरीत करावी. म्हणजे जिल्हा परिषदांना अर्थसंकल्पिय नियंत्रण व खर्चाचे नियोजन करणे सुलभ होईल. ७.७

ज्या गावात नळ पाणीपुरवठा योजना नाही तेथे पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी विंधन विहिरीचाच वापर होतो. हे लक्षात घेऊन त्या गावामधील सार्वजनिक विहिरी व विंधन विहिरीवर ग्रामपंचायतीने ऐच्छिक कराऐवजी अनिवार्य कर समजून सामान्य पाणीपट्टी आकारण्याची गरज आहे. त्यासाठी ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्ती होणे आवश्यक आहे. ७.२७

नागरी क्षेत्रात औद्योगिक व वाणिज्यीक कामासाठी पाण्याचा वापर होतो. त्या पाणीपुरवठ्याच्या दरात वाढ करावी व या दराचे वेळोवेळी पुनर्विलोकन व्हावे. यामुळे घरगुती वापराच्या पाणीपुरवठ्यात होणारे नुकसान इतर प्रयोजनासाठी वापरावयाच्या पाण्याच्या फायद्यातून (क्रॉस सबसीडायझेशन प्रिंसिपल) काही प्रमाणात का होईना भरून काढता येईल. ८.४८

या नागरी संस्थांनी पाणीपुरवठ्यासाठी ज्या महसुली खर्चाचे अंदाज दिले आहेत त्यापैकी जो खर्च पाणीपुरवठ्यासाठी करतात त्यापैकी किमान ७० टक्के वसुली १९९७-९८ मध्ये होईल या दृष्टीने पाण्याचे दर वाढविण्यात यावेत व त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी ते ८० टक्के, ९० टक्के व सन २०००-२००१ पर्यंत पाणीपुरवठ्यावरील १०० टक्के खर्च वसूल होईल अशा प्रकारे पाणीपट्टीचे दर वाढवावे व पाण्यावरील खर्च व उत्पन्नात संतुलन साधावे. १२.४५

(ड) इतर कर (सर्वसाधारण करांच्या संदर्भात)

ज्या महानगरपालिकांचे इतर करापासूनचे उत्पन्न फ़ारच कमी आहे त्यांनी या करात समाविष्ट असलेल्या करविषयक बाबी, त्यांचे दर इत्यादीचे पुनर्विलोकन करून या उत्पन्नात वाढ होईल असे प्रयत्न करण्यास बराच वाव आहे. ५.८६

नागरी क्षेत्रात सेवा सुविधा पुरविण्यासाठी जो खर्च केला जातो, किमान तेवढा खर्च तरी निघावा यासाठी शुल्क, दर व आकार यांच्या दरात वेळोवेळी सुधारणा होणे व करेतर उत्पन्न वाढीचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. ५.८८

नगरपरिषदांना महागाई भत्ता अनुदान हे त्यांनी केलेल्या कराच्या वसुलीच्या प्रमाणात दिले जाते व वसुलीची टक्केवारी कमी असल्यास अनुदानाच्या रकमेतही कपात केली जाते. अशा प्रकारच्या वजातीमुळे होणारे दुहेरी नुकसान टाळण्याच्या दृष्टीकोनातून नगरपरिषदांनी वसुलीची टक्केवारी वाढविली पाहिजे. ५.१४७

किमान व कमाल करांच्या दराबाबत स्थानिक संस्थांवर असलेल्या मर्यादा कमी करण्याची किंबहुना कमाल मर्यादा संबंधित संस्थांच्या अखत्यारित असावी अशी आयोगाची भूमिका आहे. ६.२४

उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने दर आकारणीच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचण्यासाठी नागरी संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत. ८.३(२)

नागरी संस्थांनी करांच्या दरात सुधारणा करण्याबाबत शासन मान्यतेसाठी पाठविलेल्या प्रस्तावांसंदर्भात आयोग असे सुचविते की, नियमामध्ये सुधारणा करण्याचे जे प्रस्ताव असतात आणि ज्याबाबतचा अंतिम निर्णय शासनाच्या स्तरावर होतो, अशा प्रस्तावांबाबत शक्यतोवर तीन महिन्यांच्या आत शासनाने आपला निर्णय संबंधित नागरी संस्थेला कळवावा. ज्या प्रस्तावासंदर्भात अधिनियमात बदल करणे अपेक्षित आहे, असे प्रस्ताव शासनाने विधीमंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्याकरिता प्राधान्याने कार्यवाही करावी. ८.३(३)

इतर करांच्या वेगवेगळ्या बाबींच्या दरांचा व त्यांच्या उत्पन्नाचा वेळोवेळी अढावा घेतल्यास व दरामध्ये योग्य त्या सुधारणा केल्यास या बाबींपासून या संस्थांना चांगले उत्पन्न प्राप्त होईल. या दृष्टीने आटोकाट प्रयत्न झाले पाहिजेत. ८.२७

सर्व शुल्क व आकाराचे ठराविक कालांतराने पुनर्विलोकन करून त्यांचे दर त्यावरील चालू खर्चाचे पातळीवर आणले पाहिजेत. ज्या शुल्काचे बाबतीत त्यावर होणारा एकूण खर्च सेवा आकारातून पूर्णतः भरून निघण्याची शक्यता आहे, तेथपर्यंत वाढविले पाहिजेत. ८.२९

**(३) प्रशासकीय सुधारणेबाबत शिफारशी**

नगरपरिषदांच्या आस्थापना खर्चाचा वाजवी अंदाज व त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने नगरपरिषदेचे एकूण उत्पन्न व आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे तसेच स्वयंधारित योजनावरील कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच रोजंदारीवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन इ. विचारात घेऊन वेतनावरील एकूण खर्चाची तुलना उत्पन्नाशी करण्याबाबत विचार व्हावा असे आयोगाला वाटते. स्वयंधारित योजनेपासूनचे उत्पन्न व त्यावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च याचा वरीलप्रकारे विचार झाल्यास, प्रत्यक्ष सेवा-सुविधा पुरविण्यासाठी किती खर्च या नागरी संस्था करतात याचा आढावा घ्यावा. ५.२४

नागरी संस्थांचा अस्थापना खर्च योग्य त्या मर्यादेत राहील यासाठी तसेच वेगवेगळ्या नागरी संस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यात एकसूत्रीपणा असावा या दृष्टीकोनातून एक निश्चित असे समान धोरण ठरविले पाहिजे. ५.२५

नगरपरिषदांच्या लेखा-विषयक नोंदीमध्ये अनुदानाबाबतच्या नोंदीमधील त्रुटी वर्षानुवर्षे आढळून येत आहेत. हे टाळण्याचे दृष्टीने यां संदर्भात नगरविकास विभाग नगरपालिका प्रशासन संचालनालय, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच लेखापरीक्षकांनी लक्ष घालून अशा त्रुटी राहणार नाहीत यासाठी योग्य ती संहिता आखून देऊन त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे हे वरचेवर तपासणे आवश्यक आहे. ५.१६०

स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्त करण्याचे अपेक्षित उद्दिष्ट गाठण्याकरिता आर्थिक बाबींचाच विचार न करता प्रशासकीय नियंत्रण, स्थानिक संस्थांना स्वतंत्रपणे, लवचिकतेने कार्य करण्यात अडथळा करणाऱ्या मर्यादा बाबतचे कायदे इ. यासारख्या क्षेत्रांचाही एकत्र विचार केला पाहिजे. ६.२१

प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यापर्यंत वर्षाचे कमीतकमी ७५ टक्के अनुदान व उर्वरित अनुदान फेब्रुवारी महिन्यापर्यंत शासनाने वाटप करणे गरजेचे आहे. ७.११

नागरी संस्थांना अनुदानापोटी अपेक्षित किती रक्कम व केव्हा मिळेल याबाबतची पूर्व माहिती असणे आवश्यक आहे असे आयोगाला वाटते. यामुळे या संस्थांच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाचे अंदाजांवर फारसा विपरित परिणाम होणार नाही. आर्थिक वर्षाच्या अगदी शेवटच्या आठवड्यात अनुदान निधीचे वितरण हे टाळले जावे. अनुदानाच्या ज्या वजाती करावयाच्या आहेत त्याची पूर्व माहिती या संस्थांना वेळीच देण्यात यावी. ८.३२

महानगरपालिका / नगरपरिषदांच्या वित्तीय व्यवस्थापनात आढळून आलेल्या उणीवांबाबत शासन / नगरपालिका प्रशासन संचालनालयाला आपले मत / अभिप्राय या संस्थांना कळविता यावे व नागरी संस्थांनी त्याबाबत विहित मुदतीत ते मत / अभिप्राय त्यांच्या सर्वसाधारण सभेपुढे मांडावे आणि ह्या उणीवा दूर करण्याबाबत केलेली उपाययोजना कळवावी. याबाबत योग्य ती तरतूद कायद्यात असावी. १२.४०

सर्व नागरी संस्थांनी पाणीपुरवठ्यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्रपणे अंदाज तयार करावेत. जेणेकरून या महत्त्वाच्या विषयाचे आर्थिक मूल्यमापन एका दृष्टीक्षेपात वेगळे असे निदर्शनास येईल. १२.४६

प्रभावी नियंत्रण व निरीक्षणाची भूमिका पार पाडण्यासाठी नगरपालिका प्रशासन संचालनालय ही संघटना राज्य विभागीय व जिल्हा स्तरावर अधिक बळकट करण्यात यावी असे आयोगाचे मत आहे. इतकेच नव्हे तर, या संघटनेने नगर परिषदांच्या विकासात्मक कार्याकडेही लक्ष ठेवले पाहिजे. त्यांच्या विविध कार्यांवर देखरेख करण्याच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन संचालनालय तसेच विभागीय आयुक्तांचे व जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांचे कक्ष योग्य त्या रीतीने संघटित करून बळकट करण्यात यावे व त्यांनी संचालनालयाचे नियंत्रणाखालील काम करावे. १४.२

नगरपालिका प्रशासन संचालनालयाने केवळ नियंत्रण व तपासणी करणारी यंत्रणा म्हणूनच काम करू नये. तर विकासाच्या योजना राबविण्यासाठी नगरविकास विभागाचे एक प्रमुख अंग म्हणूनही कार्य करावे. १४.४

नगरपरिषद क्षेत्रातील मालमत्तांच्या फेरमुल्यांकनाचे काम गतीने व मुदतीत होण्यासाठी नगररचना संचालनालय वेगवेगळ्या स्तरावर बळकट करण्यात यावे. या संचालनालयात नवीन पदे निर्माण करण्यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी. तसेच या संचालनालयाकडून फेरमूल्यांकनासंदर्भात होत असलेल्या कामाबद्दल काही शुल्क नगरपरिषदांना आकारण्याबाबत शासनाने विचार करावा. १४.५

नगरपरिषद क्षेत्रातील मालमत्तांच्या फेरमुल्यांकनामुळे सुधारित करण्यात आलेल्या मालमत्तांच्या करांची आकारणी ते काम पूर्ण झाल्यापासून एक वर्षाचे आत होण्याच्या दृष्टीने एक यंत्रणा व पद्धती विहित करण्यात यावी. १४.६

नागरी क्षेत्रात शहरातील केरकचरा गोळा करणे. त्याची विल्हेवाट, दिव्यांची देखरेख, दुरूस्ती, वाहनतळ चालविणे इ. चा खाजगीकरणासाठी विचार करता येईल. शक्य असेल तेथे स्थानिक संस्थांच्या मालकीच्या बाजारपेठाचे व्यवस्थापनही खाजगी संस्थांकडे सोपविता येईल. १४.२१

एक समान वेतन धोरण असावे व वेतनश्रेण्यांमध्ये दबाव आणून वाढ करण्यासाठी जी अमर्याद स्पर्धा चालते त्यावर काहीतरी निर्बंध असावे. १३.२८

पंचायत राज संस्था व नागरी स्थानिक संस्थांच्या कर्जाच्या बाबत क्रिसिल सारख्या कमर्शियल रेटींग एजन्सी किंवा आय. सी. आय. सी. आय. यासारख्या वित्तीय संस्थांचा सल्ला घेऊन शासन यंत्रणेत अंतर्गत रेटींगची पद्धती विकसित करावी. ज्या प्रस्तावामध्ये राज्य शासनाने स्थानिक संस्थासाठी कर्ज व कर्जाची हमी द्यावी अशी अपेक्षा असेल अशा प्रस्तावांचा क्रेडिट रेटिंगच्या अनुषंगाने वेळोवेळी ठरविलेल्या सर्वसामान्य सुरक्षा पातळीच्या संदर्भात विचार करावा. १४.३३(अ)

### (४) लेखा परिक्षणाबाबतच्या शिफारशी

आयोगाची अशी शिफारस आहे की, अमान्य रकमांबाबत लेखापरिक्षण अहवाल मिळाल्यापासून २ वर्षात निर्णय घेऊन त्या संबंधित व्यक्तींकडून किंवा संस्थांकडून त्याची वसुली करण्याची दक्षता घ्यावी किंवा योग्य वाटल्यास केवळ तांत्रिक मुद्यातून उद्भवणारे आक्षेप दूर करून टाकावेत की, ज्या योगे अशी कुठलीही रक्कम २ वर्षांहून अधिक कालावधीत आक्षेपाधिन राहू शकणार नाही. तसेच आधीच्या थकीत रकमाबाबतही या प्रकारचा आढावा घेऊन कार्यवाही करावी. ७.१२.



एच ४०१४-१८

मुख्य लेखापरीक्षकांच्या आस्थापनेवरील जी काही रिक्त पदे खालील शिफारस क्र. २ लक्षात घेता रिक्त राहात असतील ती तातडीने भरण्यात यावी. म्हणजे लेखापरीक्षणाचे काम मागे पडणार नाही. त्याचबरोबर लेखा-परीक्षणावर वाढणारा आस्थापना खर्च नियंत्रित करण्यासाठी बाहेरील लेखापरीक्षक नेमता येतील किंवा कसे याचा विचार करण्यात यावा. १४.१०(१)

बोंगिरवार समितीने लेखापरीक्षणासाठी ग्रामपंचायतींच्या वार्षिक उत्पन्नावर घातलेली मर्यादा जुनी झाल्याने ती रु. २५,००० पर्यंत वाढविण्यात यावी. १४.१०(२)

लेखापरीक्षणाची गती वाढविण्यासाठी मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांची प्रशासकीय यंत्रणा मजबूत करण्यात यावी. १४.१२

प्रत्येक नगरपरिषदेकडे तिच्या आर्थिक क्षमतेनुसार एक छोटी अंतर्गत लेखापरीक्षण शाखा शक्यतो तिच्या सध्याच्या कर्मचारीवर्गातून निर्माण करण्यात यावी. या कर्मचाऱ्यांना नगरपरिषदांच्या लेख्यांचे व लेखापरीक्षणाचे प्रशिक्षण देण्यात यावे. संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी याबाबत पुढाकार घ्यावा. लेखापरीक्षकास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भांडार व साठे पडताळणीचे तसेच हे परीक्षण परिपूर्ण होण्यासाठी आवश्यक ते अधिकार देण्यात यावेत.

सनदी लेखापालांच्या व्यवसायात प्रवेश करू इच्छिणाऱ्या प्रशिक्षणार्थींना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवा परीक्षणाचा अनुभव मिळावा तसेच मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचेकडे असलेले थकित लेखा परीक्षणाचे कामही त्यांच्या सेवा वापरून सुलभ व कमी व्हावे या दृष्टीने " इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टन्ट " यांचे सहकार्याने शासनाने योजना आखावी. १४.१४

### (५) आधारसामुग्री संचयिकाबाबतच्या शिफारशी

पंचायत राज संस्थांच्या व नागरी संस्थांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत माहितीसाठी एक आधारभूत माहिती संचयिका असावी. १४.१८

निश्चित वेळापत्रकानुसार प्राथमिक स्तरावरून मिळणाऱ्या माहितीचे एकत्रीकरण व तपासणी जिल्हा स्तरावर करण्यात यावी व अंतिमरीत्या त्याचे एकत्रीकरण, संकलन व विश्लेषण हे काम राज्य स्तरावर करण्यात यावे. माहिती गोळा करण्याचे व एकत्रित करण्याचे आणि माहिती संचयिका ठेवण्याचे राज्य स्तरीय काम संचालक, अर्थ व सांख्यिकी यांनी करावे. १४.१९

### (६) संकीर्ण

व्यापारी संकुलाद्वारे निर्माण केलेल्या परंतु वापरात नसलेल्या सोयींची संख्या फारशी नसली तरी या सोयीपासून उत्पन्नाचे नुकसान होते ते टाळण्यासाठी या सोयींचा योग्य वापर झाला पाहिजे. ५.९२

व्यापारी संकुलापासून नागरी संस्थांना उत्पन्न मिळते हे निर्विवाद सत्य असले तरी या उत्पन्नाची एकूण भांडवली गुंतवणुकीशी सांगड घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच गुंतवणूक दीर्घकालीन मुदतीचे ठेवीत बँकेमध्ये किंवा इतरत्र केली असता जे उत्पन्न प्राप्त झाले असते किमान तेवढ्या उत्पन्न दराने तरी व्यापारी संकुलांपासून उत्पन्न मिळावे या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. ५.१५७

गिरीस्थान नगरपरिषदांच्या ज्या सेवासुविधांचा वापर त्यांच्या क्षेत्रांत व्यापारी व औद्योगिक कारणासाठी केला जातो अशा सेवासुविधांसाठी सर्वसाधारण दराने आकारणी न करता वाणिज्यिक दराने आकारणी केली पाहिजे. तसेच ही गिरीस्थाने सुस्थितीत राहण्यासाठी व पर्यटनासाठी अधिक आकर्षक करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना इतर नगरपरिषदांसारखीच वागणूक न देता पर्यटनाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचे राज्याचे धोरण विचारात घेऊन या नगरपरिषदांना आर्थिक मदतीच्या बाबतीत झुकते माप देण्याची आवश्यकता आहे. ५.१८४

नागरी संस्थांच्या सर्व कायद्यांतील तरतुदींमध्ये करांच्या दराबाबत सध्या तरी एकवाक्यता दिसून येत नाही. यापुढे सर्व कायद्यांमध्ये एकवाक्यता यावी या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. ८.३(१)

नागरी संस्थांनी त्यांच्या मालकीच्या मोकळ्या जमिनीवर व्यापारी संकुले/गाळे उभारल्यास व त्यांची एकरकमी विक्री केल्यास, त्यापासून नागरी संस्थांना फार मोठे उत्पन्नही मिळेल व अशा जागी झोपडपट्ट्या उभ्या राहणार नाहीत, त्या दृष्टीने अधिनियमांत योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात. ८.३०

नागरी संस्थांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. आणि सार्वजनिक नळांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे पाण्याचा काटकसरीने उपयोग तसेच घरातील नळांमधून पाण्याचा अपव्यय होणार नाही यासाठी जनतेत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. ८.४६

महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाने पाण्याची प्रक्रिया व वितरणात २० टक्के पाण्याचा अपव्यय ग्राह्य धरला आहे. आयोगाच्या मते हे प्रमाण फार मोठे आहे. पाणी वितरण व्यवस्थेत जास्तीत जास्त पाण्याचा अपव्यय १५ टक्क्यांच्या मर्यादेत असावा.त्याचबरोबर पाणी वितरणात जो पाण्याचा अपव्यय होतो तो टाळण्यासाठी प्रशासकीय स्तरावर आटोकाट प्रयत्न होणे जरुरीचे आहे. तसेच जनजागृतीद्वारे पाण्याचा अपव्यय टाळता येऊ शकेल. ८.४६

पाणीपुरवठा योजना " ना नफा ना तोटा " या तत्त्वावर चालविण्यासाठी व कर्जाचे दायित्व पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून पाण्याचे योग्य ते दर खर्चाच्या आधारावर निश्चित केले पाहिजे. इतकेच नव्हेतर वेळोवेळी पाणीपुरवठ्यासाठी केलेल्या खर्चाचा आढावा घेऊन दरांमध्ये अशा सुधारणा केल्या पाहिजेत की जेणेकरून पाणीपुरवठयावर केलेल्या खर्चाची १०० टक्के वसुली होईल. ८.४६

पाणीपुरवठा योजना, जल-मलनिस्सारण योजना किंवा इतर मोठ्या भांडवली खर्चाच्या लोकोपयोगी योजनांचा खर्च भागविण्यासाठी आर्थिक मदत म्हणून नागरिकांचा सहभाग असला पाहिजे. यासाठी संबंधित नागरी संस्थांनी अशा योजनांची माहिती व त्यापासून जनतेला होणारे फायदे याची जाणीव प्रसार माध्यमांद्वारे करून दिली पाहिजे. तसेच पुढे जाऊन जनतेच्या वित्तीय बांधिलकीमुळे काही निधी उपलब्ध होईल किंवा श्रमदानाद्वारेही खर्चात बचत होईल याकडेही लक्ष द्यायला पाहिजे. पर्यायाने नागरी संस्थांवर पडणारा भांडवली खर्चाचा बोजा थोड्या प्रमाणात का होईना, कमी होईल. महत्त्वाचे म्हणजे अशा योजनांबद्दल जनतेची वित्तीय बांधिलकी असल्याने त्यांच्या मनात आत्मियता निर्माण होईल असे प्रयत्न नागरी संस्थेने करायला पाहिजेत. ८.४६

नागरी संस्थांनी आरोग्य व स्वच्छताविषयक सेवा पुरविण्यासाठी योग्य असे व्यवस्थापन राबविले पाहिजे. यासाठी त्यांनी आवश्यक तो खर्च उपलब्ध निधीतून केला पाहिजे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यामधील काही बाबींचे व्यवस्थापन करताना खाजगीकरणाचा मार्ग अवलंबिण्यास हरकत नसावी. ८.५०

नागरी संस्था मालमत्ताधारकांवर मलनिःस्सारण कर आकारित असल्यामुळे या योजनांच्या देखभाल/दुरुस्तीकडे आणि त्यामध्ये सुधारणा करण्याकडे त्यांनी पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे. भुयारी गटार योजनेअंतर्गत सांडपाण्यावर प्रक्रिया झाल्यानंतर जे निरुपयोगी पाणी सोडले जाते अशा पाण्याचा उपयोग जवळच्या क्षेत्रामध्ये सिंचनासाठी होऊ शकेल आणि असे केल्यास संबंधित संस्थांना काही महसुलही उपलब्ध होऊ शकेल याबद्दल विचार झाला पाहिजे. ८.५१

कमी खर्चाच्या स्वच्छता योजना नगरपरिषदा व महानगरपालिका यांनी त्यांच्या क्षेत्रात यशस्वीरितीने कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करावा. ८.५३

भांडवली खर्चाच्या योजनांकरिता कर्ज उभारणीचे जे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर होतात त्यांना विनाविलंब व वेळीच मान्यता दिली गेली पाहिजे. त्यात शासकीय हमीची गरज नसल्यास त्या प्रस्तावाना त्वरीत मान्यता ६० दिवसांचे आत देण्यात यावी. तर ज्या प्रस्तावांस शासकीय हमी आवश्यक असेल, त्या प्रस्तावांना ६ महिन्यांचे आत शासनाने मान्यता द्यावी किंवा निर्णय कळवावा. अन्यथा या कालावधीनंतर या प्रस्तावांना शासनाने मंजुरी दिली आहे असे गृहित धरण्यात यावे. ८.५८(१)



एच ४०९४-१८अ

नागरी संस्थांच्या ज्या कर्जासाठी शासनाकडून हमी दिली जाते, ती सरसकट न देता निवडक बाबींच्या संदर्भातच देण्यात यावी. ज्या योजनांमुळे शहरातील आम नागरिकांना (नागरिकांच्या काही विवक्षित गटाला नव्हे) लाभ मिळणार असेल व नागरी संस्थेलाही काही आर्थिक फायदे होणार असतील अशाच योजनांसाठी हमी देण्यात यावी. ८.५८(२)

राज्यातील ग्रामीण तसेच नागरी भागातील निरनिराळ्या पाणीपुरवठा, जलनि:सारण योजना निर्माण करण्याची जबाबदारी सध्या महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळाकडे सोपविली जाते. तुर्तासतरी या मंडळाचा या बाबतीत एकाधिकार असल्याचे दिसते. मंडळाने आजपर्यंत अनेक योजना यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. हे जरी खरे असले तरी नागरी संस्था या स्वायत्त संस्था आहेत. त्यांनी वरील प्रकारच्या भांडवली खर्चाच्या योजना सध्याच्या स्पर्धात्मक युगांत या एकमेव संस्थेकडूनच करून घ्याव्या असे बंधन त्यांच्यावर असू नये. त्यांना त्यांच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा, भुयारी गटार, जलनि:स्सारण इत्यादींच्या योजना तयार करून पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील योग्य अशा तज्ज्ञ व अभियांत्रिकी ज्ञान असलेल्या संस्थांशी / मंडळांशी स्वतंत्रपणे करार करण्याची मुभा असायला पाहिजे. ज्या योजनांसाठी शासनाकडून काही आर्थिक मदत वा अनुदान मिळते त्या योजनांसंदर्भातही वरील पद्धतीस शासनाची हरकत असू नये. ही सूचना शासनाच्या खाजगीकरणाच्या धोरणाशी सुसंगत अशीच ठरेल. ८.५८(३)

व्यापारी संकुल उभारणी करताना नागरी संस्थेच्या उत्पन्नांत वाढ होण्याचा प्रमुख उद्देश असावा व ही बाब केवळ व्यापारी उलाढालीचे साधन होऊ नये. त्याशिवाय नागरी क्षेत्रात अत्यावश्यक असलेल्या सेवा सुविधांकडे दुर्लक्ष करून या संकुल उभारणीच्या कार्यक्रमास प्राधान्य देणेही उचित ठरणार नाही. ८.५९

नागरी संस्थांनी नगर रचना व विकास कार्याच्या योजना आखून त्या राबविण्यासाठी योग्य प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच ज्या नागरी संस्थांनी विकास आकार अद्याप आकारला नाही किंवा त्यांनी वेगळा विकास निधी ठेवला नाही त्यांनी विकास आकार आकारुन निधी ठेवणे व त्याचा वापर नियोजित नगर रचना व विकास कार्यासाठी करणे उचित ठरेल. ८.६८

वेगवेगळ्या बाबीसाठी वेगवेगळे निधी ठेवणे आवश्यक आहे .काय किंवा सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करून एक ठराविक असा सर्वसामान्य निधी ठेवावा किंवा कसे याबाबतचा विचार झाल्यास त्याप्रमाणे असा एकत्रित निधी ठेवण्यासाठी नगरपरिषदांना सोयीचे होईल, व त्याचे व्यवस्थापनही चांगल्याप्रकारे सांभाळता येईल. शासनाने याबाबत विचार करावा ८.७४

अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्याने स्तुत्य प्रयत्न करून जे आधिक्य निर्माण केले आहे, ते यापुढे हळूहळू कमी होत जाईल हे म्हणणे आयोगाला स्वीकारार्ह नाही. विकासाचे द्योतक असलेला योजनांतर्गत खर्च व वाढत जाणारा योजनेतर खर्च भागविण्यासाठी शासनाला आपले उत्पन्न वाढविणे भाग आहे. ती क्षमता महाराष्ट्र शासनात आहे. ९.१९

पाणीपुरवठ्याच्या सर्वच योजना खर्च व उत्पन्नाच्या दृष्टीने २०००–२००१ या वर्षापर्यंत स्वयंपूर्ण व संतुलित व्हाव्यात. १२.४७

नागरी क्षेत्रात पायाभूत सेवासुविधांमध्ये वाढ करण्याकरिता राज्य शासनाने स्वतंत्र असा " नागरी विकास निधी " निर्माण करावा व त्यासाठी जागतिक बँकेकडून योग्य असे सहाय्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावेत.

शासनाने आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या नागरी संस्थांना त्यांच्या कार्यक्रमाची गुणवत्ता विचारात घेऊन भांडवली बाजारात पदार्पण करण्यासंदर्भात त्यांच्याकडून असे प्रस्ताव आल्यास उत्तेजन द्यावे. १३.५२

महाराष्ट्र शासनाची प्रमुख अशी प्रशिक्षण संस्था यशदा पुणे यांनी राष्ट्रीय स्तरावरील संस्था उदा. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, हैद्राबाद, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचेशी सल्लामसलत करून पंचायत राज संस्था व नागरी संस्थांच्या वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना या संस्थांच्या एकूण

कामकाजाबाबत प्रशिक्षण देण्यासाठी (विशेषतः या संस्थांच्या वित्तीय बाबीसंदर्भात) योग्य त्या प्रकारे कार्यक्रम आखून त्याचे नियंत्रण करावे, प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्यापूर्वी तसेच त्यांच्या ज्ञानाची उजळणी म्हणून अशा दोन स्तरावर घेता येईल. ' यशदा ' या संस्थेने चालना देणारी संस्था म्हणून महत्वाची भूमिका बजावावी. १४.१६

राज्य शासनाने पंचायत राज संस्था व नागरी संस्थांसाठी दर ३ वर्षानी स्वतंत्र अशी समिती स्थापन करावी व या समितीला " दर सुधार समिती " असे संबोधण्यात यावे. स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींना या समितीमध्ये योग्य प्रतिनिधीत्व असावे. १४.२५

शासनाने या मागणीची कायदेशीर बाजू तपासावी व साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समिती व इतर तत्सम संस्था ज्या अशा प्रकारचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे रस्ते व इतर पायाभूत सोयी मोठ्या प्रमाणात वापरतात त्यांना त्यांचे देखभाल व दुरस्तीसाठी काही अंशदान देण्यासाठी बाध्य करता येईल. १४.२६

चल व अचल संपत्तीच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात याव्यात. १४.२७

एक समान वेतन धोरण असावे व वेतन श्रेण्यामध्ये दबाब आणून वाढ करण्यासाठी जी अमर्याद स्पर्धा चालते त्यावर काहीतरी निर्बंध असावे. १४.२८

स्थानिक संस्थांच्या कार्यात व कार्यक्रमांत काही प्रमाणांत पारदर्शकता असावी. १४.२९

स्थानिक स्वराज्य संस्थाबाबत लोकांत जागृती निर्माण करण्याचा एक फायदा असाही असू शकतो की, समाजात सुप्तपणे अस्तित्वात असलेल्या आपल्या शहराबद्दलच्या अगर गावाबद्दलच्या आपुलकीला किंवा प्रेमाला जागृत करून त्यांच्यातील दानशूरपणाला आवाहन करणे. १४.३२

सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जाच्या बाबत जर एखादी स्थानिक संस्था व्याज किंवा कर्जाचा हप्ता राज्य शासन किंवा इतर संस्थांना एक वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता देण्यास असमर्थ ठरली तर त्या संस्थेच्या व्यवहारात विशेष लक्ष घालून करेतर दर, कर दर आणि वसुली यात जर काही त्रुटी आढळल्या तर याबाबत त्वरीत उपाययोजना करावी, परंतु संस्थांचा कर्ज व्यवहार नियंत्रणाच्या बाहेर जाऊ देऊ नये १४.३३(ब)

नागरी संस्थांचे परिवहन प्रकल्प हा अभ्यास करण्यासारखा स्वतंत्र विषय आहे. परिवहन उपक्रम स्वतःहून परिपूर्ण असा नफ्याचा प्रकल्प होऊ शकेल काय याचा स्वतंत्र अभ्यास आवश्यक आहे. १४.३४(क)

नागरी संस्थांच्या विविध मालमत्तांसाठी विहित दराने घसारा निधी निर्माण करण्याबाबत तसेच त्याप्रमाणात दरवर्षी गुंतवणूक करण्याबाबत शासनाने आग्रह धरावा, जर एखादी स्थानिक संस्था घसारा निधीत गुंतवणूक करण्यास असमर्थ असेल तर वर्षाच्या शेवटच्या दिनांकापर्यंतच्या थकबाकीची परिपुर्ण माहिती स्थानिक संस्थांच्या जमाखर्चाच्या लेख्यामध्ये देण्यात यावी. १४.३४(ड)

प्रत्येक नागरी संस्थेने तिच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या अर्ध्या टक्क्याइतकी रक्कम दरवर्षीच्या अर्थसंकल्पात वेगळी बाजुला काढून तो " आपत्ती निवारण निधी " म्हणून वेगळा ठेवावा. १४.३६

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील १३०(३)(ब) नुसार जिल्हापरिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायत या संस्थाना आपला निधी राज्य शासन मान्य करील अशा सहकारी संस्थेत ठेवता येतो. सध्या या संदर्भात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निधी ठेवण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक क्रमांक UBD/No. D.S.P.C.B.C.I.R./18/13, 01.00.96-97, दिनांक ३० ऑगस्ट, १९९६ नुसार सर्व सहकारी बँकांना जिल्हापरिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायत इत्यादी संस्थांची बचत खाती उघडण्यास परवानगी दिलेली आहे. तरी पंचायत राज संस्थाना सक्षम सहकारी बँकेतही निधी ठेवण्याची अनुज्ञा देण्यात यावी अशी आयोगाची शिफारस आहे. १४.३५

शासनाने संविधानातील तरतूदीनुसार " जिल्हा नियोजन समिती " आणि " महानगर नियोजन समिती " यांची स्थापना लवकरात लवकर करावी. १४.४०.

□ □

# परिशिष्टे

# परिशिष्टांची सूची


| अनुक्रमांक | परिशिष्ट क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १ | महाराष्ट्र वित्त आयोगाच्या स्थापनेबाबत शासनाची दिनांक २३ एप्रिल १९९४ ची अधिसूचना | (५)-(८) |
| २ | २ | महाराष्ट्र वित्त आयोगाच्या तीन अशासकीय सदस्यांच्या नेमणुकीबाबतची शासनाची दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ ची अधिसूचना. | (९)-(१०) |
| ३ | ३ | वित्त आयोगाचे अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप यांचा दिनांक ५ सप्टेंबर १९९५ चा राजीनामा .. | (११) |
| ४ | ४ | श्री. शांताराम घोलप यांचा अर्ज स्वीकारल्याबद्दल आणि वित्त आयोगाचे नवीन अध्यक्ष, श्री. सुरेश प्रभू यांची नेमणूक केल्याबद्दल शासनाची दिनांक ५ ऑक्टोबर १९९५ ची अधिसूचना. | (१२)-(१३) |
| ५ | ५ | महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ जानेवारी १९९६ पर्यंत वाढवून दिल्याबद्दल शासनाची दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ ची अधिसूचना. | (१४)-(१५) |
| ६ | ६ | वित्त आयोगाची पुनर्रचना केल्याची व आयोगाची मुदत दिनांक ३० जून १९९६ पर्यंत वाढवून दिल्याबाबत शासनाची दिनांक १ फेब्रुवारी १९९६ ची अधिसूचना. | (१६)-(१७) |
| ७ | ७ | श्री. सुरेश प्रभू यांचा अध्यक्षपदाचा दिनांक २७ मार्च १९९६ चा राजीनामा .. | (१८) |
| ८ | ८ | श्री. सुरेश प्रभू यांचा राजीनामा स्वीकारल्याबाबत शासनाची दिनांक २९ मार्च १९९६ ची अधिसूचना | (१९) |
| ९ | ९ | महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर १९९६ पर्यंत वाढवून दिल्याबद्दल शासनाची दिनांक २९ जून १९९६ ची अधिसूचना. | (२०) |
| १० | १० | श्री. मकरंद हेरवाडकर यांची अध्यक्ष म्हणून नेमणुकीबाबतची शासनाची दिनांक ४ जुलै १९९६ ची अधिसूचना. | (२१) |
| ११ | ११ | महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ डिसेंबर १९९६ पर्यंत वाढवून दिल्याबद्दल शासनाची दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ ची अधिसूचना. | (२२) |
| १२ | १२ | महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ जानेवारी १९९७ पर्यंत वाढवून दिल्याबद्दल शासनाची दिनांक १६ जानेवारी १९९७ ची अधिसूचना. | (२३) |
| १३ | १३ | विधानमंडळ सदस्यांना त्यांच्या सूचना/अभिप्राय देण्याबाबत वित्त आयोगाचे अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप यांनी त्यांना दिनांक २६ जुलै १९९४ रोजी लिहिलेले पत्र. | (२४) |
| १४ | १४ | दी सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पुणे या संस्थेकडून ग्रामपंचायतींचा नमुना अभ्यास करून घेण्याबाबत शासनाच्या मंजुरीचे दिनांक १४ फेब्रुवारी १९९५ चे आदेश. | (२५) |
| १५ | १५ | राज्यातील ग्रामपंचायती, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी काही अधिकाऱ्यांची मदत घेण्यासाठी एक पॅनेल तयार करण्याबाबतचे दिनांक २४ फेब्रुवारी १९९५ चे आदेश. | (२६)-(३१) |
| १६ | १६ | राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी श्री. मादुस्कर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नेमणूक करणारे दिनांक २ मार्च १९९५ चे पत्र. | (३२)-(३५) |
| १७ | १७ | राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी गट तयार करण्याबाबत दिनांक २ मार्च १९९५ चे पत्र. | (३६)-(३७) |
| १८ | १८ | राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी काही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमण्याबाबतचे दिनांक ३ मार्च १९९५ चे पत्र. | (३८)-(३९) |
| १९ | १९ | संचालक, दि सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस, पुणे यांच्याकडून महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा वित्तविषयक नमुना अभ्यास करून घेण्याबाबत दिलेल्या शर्ती व अटींबाबतचे दिनांक ९ मार्च १९९५ चे पत्र. | (४०)-(४४) |

| अनुक्रमांक | परिशिष्ट क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २० | २० | ऑल इंडिया इस्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, अंधेरी यांच्याकडून मेमोरँडम मागविण्यासाठी लिहिलेले दिनांक ३० मार्च १९९५ चे पत्र. | (४५) |
| २१ | २१ | विधिमंडळाच्या सदस्यांकडून त्यांच्या सूचना मागविण्यासाठी वित्त आयोगाचे अध्यक्ष, श्री. शांताराम घोलप यांनी त्यांना लिहिलेले दिनांक एप्रिल, १९९५ चे पत्र. | (४६) |
| २२ | २२ | महाराष्ट्र वित्त आयोगाने भेटी दिलेल्या जिल्हा परिषदांची यादी .. | (४७) |
| २३ | २३ | महाराष्ट्र वित्त आयोगाने भेटी दिलेल्या नगरपरिषदा व महानगरपालिकांची यादी .. | (४८) |
| २४ | २४ | वित्त आयोगाने राज्यातील विविध जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांना भेटी दिल्या त्या वेळी चर्चेत आलेले मुद्दे. | (४९)-(५२) |
| २५ | २५ | आयोगाच्या स्थापनेपासून आयोगाच्या झालेल्या बैठकांचे विवरणपत्र .. | (५३) |
| २६ | २६ | आयोगाच्या बैठकीसाठी बोलाविलेल्या पदाधिकाऱ्यांची/अधिकाऱ्यांची माहिती .. | (५४) |

परिशिष्ट क्रमांक १

असा. क्र. १०३ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

**गुरुवार, एप्रिल २८, १९९४/वैशाख ८, शके १९१६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांच्याव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ एप्रिल १९९४

क्रमांक एसएफसी. १०९४/सीआर-२२/अर्थबळ.—महाराष्ट्राच्या राज्यपालांचा खालील आदेश माहितीसाठी दिनांक २३ एप्रिल १९९४ चे **असाधरण राजपत्र,** भाग चार-ब मध्ये इंग्रजीतून प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर आदेशाचा मराठी अनुवाद आता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### आदेश

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय च्या तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून, महाराष्ट्र शासन पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करीत असून श्री. शांताराम जी. घोलप हे त्याचे अध्यक्ष असतील व त्यामध्ये श्री. आर. सी. सिन्हा, आय. ए. एस. हे सदस्य-सचिव असतील. उर्वरित तीन सदस्यांची नियुक्ती स्वतंत्रपणे करण्यात येईल.

२. सदस्य-सचिव हा आयोगाचा पूर्ववेळ सदस्य असेल तर अध्यक्ष व इतर सदस्य हे आयोगाचे अंशकालिक सदस्य असतील.

३. अध्यक्ष व इतर सदस्य हे, आपापले पद ज्या दिनांकाला धारण करतील त्या दिनांकापासून दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत पद धारण करतील.

४. आयोग, पुढील बाबींच्या संबंधात शिफारस करील :—

(अ) राज्याकडून वसूल करण्यात यावयाच्या, कर, शुल्के, पथकर व फी यांच्यापासून मिळणाऱ्या व संविधानाच्या भाग नऊ व भाग नऊ-अ अन्वये, पंचायती व नगरपालिका यांच्यात विभागून द्यावयाच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य, पंचायती व नगरपालिका यांच्यात वितरण करणे व अशा उत्पन्नामधील पंचायती व नगरपालिका यांच्या संबंधित हिश्श्याचे पंचायती व सर्व पातळ्यांवरील नगरपालिका यांच्यात वाटप करणे;

(ब) पंचायती किंवा यथास्थिति, नगरपालिका यांच्याकडे अभिहस्तांकित करण्यात येतील किंवा यथास्थिति, पंचायती किंवा नगरपालिका यांच्याकडून ज्याचे विनियोजन करण्यात येईल असे कर, शुल्के, पथकर व फी निर्धारित करणे;

(क) पंचायती किंवा यथास्थिती, नगरपालिका यांना राज्याच्या एकत्रिकृत निधीमधून देण्यात यावयाच्या सहाय्यक अनुदानाचे नियंत्रण करणारी तत्त्वे ठरवणे.

५. आयोग आपल्या शिफारशी करताना इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टीही विचारात घेईल :—

(अ) १९९४-९५ या वर्षात पंचायती व नगरपालिका यांची कराधान पातळी जितकीअसेल त्या आधारे दिनांक १ एप्रिल १९९६ पासूनच्या पुढील पाच वर्षांमधील राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या महसुली जमा व महसुली खर्चामधील (योजनेतर किंवा विकासेतर किंवा दोन्ही) दृश्य तफावत.

(ब) पंचायती व नगरपालिका यांनी महसूल मिळविण्याच्या कोणकोणत्या उपलब्ध व संभाव्य मार्गांचा कितपत वापर केला आहे व अशा उपाययोजनांमुळे त्यांच्यामधील महसुलांची तफावत कशा रीतीने व कितपत कमी होऊ शकते.

(क) खंड (अ) आणि (ब) च्या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाकडून पंचायती आणि नगरपालिका यांना देण्यात यावयाच्या वित्तीय सहाय्याची तत्त्वे आयोगाकडून निर्धारित करण्यात येतील.

उपरोक्त निरनिराळ्या बाबींवरील आपल्या शिफारशी करताना आयोग १९९१ च्या जनगणनेचे लोकसंख्येचे आकडे विचारात घेईल. त्या बाबतीत लोकसंख्या हा कर आणि शुल्के व सहाय्यक अनुदाने यांची प्रक्रिया निर्धारित करण्यातील एक आधारभूत घटक असल्याचे समजण्यात येईल.

(ड) पंचायती आणि नगरपालिका यांची दिनांक ३१ मार्च १९९४ रोजी असलेली अदत्त ऋणांची स्थिती आणि :—

(एक) पंचायती आणि नगरपालिका यांच्या कर्जे घेण्याच्या क्षमतेचे नियमन करण्यासाठी तत्त्वे व कार्यपद्धती विनिर्दिष्ट करील; आणि,

(दोन) त्यांची स्थिती विचारात घेऊन ऋणांच्या दायित्वांचा अंतर्भाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना विनिर्दिष्ट करील.

(इ) राज्य शासनाकडील साधनसंपत्ती आणि त्यावरील मागण्या विशेषतः नागरी प्रशासन, पोलीस, सामाजिक आणि आर्थिक सेवा, ऋणविषयक सेवा आणि इतर सर्व बांधिलखर्च किंवा दायित्वे आणि योजनेतर महसुली खर्च यांसाठीच्या मागण्या विनिर्दिष्ट करील.

(फ) पंचायती आणि नगरपालिका यांच्या भांडवली मतांचे परिरक्षण व निगा आणि त्यांच्या साधनसंपत्तीची स्थिती योग्य रित्या विचारात घेऊन त्यांच्या पर्याप्त परिरक्षणाची मानके तपशीलवार तयार करील आणि त्यांची दायित्वे पार पाडण्यासाठी स्थानिकरीत्या साधनसंपत्ती संघटित करून कामी लावण्याचे उपाय योजील.

(ग) पाटबंधारे प्रकल्प, परिवहन उपक्रम, नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या योजना, विंधण विहिरींचे कार्यक्रम आणि वाणिज्यिक स्वरूपाची कोणतीही कामे असल्यास अशी इतर कामे यांच्यामध्ये यथास्थिती पंचायती आणि नगरपालिका यांनी कोणतीही गुंतवणूक केली असल्यास अशा गुंतवणुकीवर वाजवी प्राप्ती निश्चितपणे मिळण्याची गरज विनिर्दिष्ट करील.

६. आयोगास, नवव्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या आपत्ती निवारण निधी योजनेच्या धर्तीवर आपत्ती निवारणाची योजना सुरू करण्यासाठी आणि आपत्ती निवारण निधी असण्याची गरज विचारात घेण्यासाठी शिफारशी करता येतील.

७. आयोग दिनांक १ एप्रिल १९९६ पासून सुरू होणाऱ्या पुढील पाच वर्षांच्या कालावधीसंबंधातील उपरोक्तपैकी प्रत्येक बाबीवरील आपला अहवाल ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत सादर करील. आयोग, त्याने कोणत्या आधारावर आपले निष्कर्ष काढले आहेत ते नमूद करील आणि उपलब्ध जमा व खर्चाच्या अंदाजाची संबंधित आकडेवारी तयार करील.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

## परिशिष्ट क्रमांक १

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated 23rd April 1994

No. SFC-1094/CR-22/Arthabal.—The following order made by the Governor of Maharashtra is published for general information :—

## order

In pursuance of the provisions of Article 243-I, read with Article 243-Y of the Constitution of India and the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provisions) Act, 1994, the Government of Maharashtra is pleased to constitute the First Maharashtra Finance Commission consisting of Shri Shantaram G. Gholap as the Chairman and Shri R. C. Sinha, I. A. S. as the Member-Secretary. Three other members will be appointed separately.

2. The Member-Secretary shall render whole time service while the Chairman and other Members will render part-time service on the Commission.

3. The Chairman and the other Members shall hold office from the date on which they respectively assume office upto the 31st day of October 1995.

4. The Commission shall make recommendations relating to the following matters :—

(*a*) The distribution between the State, the Panchayats and the Municipalities of the net proceeds of the taxes, duties, tolls and fees leviable by the State which may be divided amongst them under Part IX and Part IX-A of the Constitution and the allocation between the Panchayats and the Municipalaities at all levels of their respective shares of such proceeds ;

(*b*) The determination of the taxes, duties, tolls and fees which may be assigned to, or appropriated by the Panchayats or, as the case may be, the Municipalities.

(*c*) The principles which should govern the grants-in-aid to the Panchayats or, as the case may be, the Municipalities from the Consolidated Fund of the State.

5. In making its recommendations, the Commission shall have regard, among other consideration, to—

(*a*) The projected gap between the Revenue Receipts and the revenue expenditutes (Non-Plan or Non-Developmental or both) of the Panchayats and the Municipalaities in the State for five years from 1st April 1996 on the basis of their levels of taxation likely to be reached in 1994-95;

(*b*) The measures and the extent to which the Panchayats and the Municipalities have exploited the available and the potential sources. of revenue and the manner and extent to which their revenue gap can be reduced by such measures;

(*c*) The principles of financial assistance from the State Government to the Panchayats and Municipalities as may be determined by the Commission taking into account the provisions of clauses (*a*) and (*b*) above.

In making its recommendations on the various matters aforesaid, the Commission shall adopt the population figures of 1991 Census, where population is regarded as a factor for determination of devolution of taxes and duties and grants-in-aid;

(*d*) The outstanding debt position as on 31st March 1994 of the Panchayats and the Municipalities and specify—

(*i*) The principles and the procedures to regulate the borrowing power of the Panchayats and the Municipalities; and

(*ii*) The steps needed to contain the debt liabilities taking into account their resource position;

(*e*) The resources of the State Government and the demands thereon, the particular, on account of expenditure on Civil administration, Police, Social and Economic Services; Debt servicing and all other committed expenditures or liabilities and Non-Plan Revenue Expenditure;

(*f*) The maintenance and upkeep of the capital assets of the Panchayats and the Municipalities, and work out the norms for their adequate maintenance with due regard to their resource position and introduce measures for mobililising resources locally to meet these liabilities;

(*g*) The need for ensuring reasonable returns on investments made, if any, by Panchayats and the Municipalities, as the case may be, in irrigation projects, " transport undertaking ", pipe, water supply schemes, borewell programmes and other activities of commercial nature, if any.

6. The Commission may make recommendations about introducing a scheme for Calamity Relief and considering the need to have a Calamity Relief Fund on the lines of the Calamity Relief Fund Scheme recommended by the Ninth Finance Commission.

7. The Commission shall make its report available by the 31st October 1995 on each of the matters aforesaid, covering a period of five years commenncing on the 1st day of April 1996. The Commission shall indicate the basis on which it has arrived at its findings and make all the relevant data of estimates of receipts and expenditure available.

P. C. ALEXANDER,

Governor of Maharashtra,

# परिशिष्ट क्रमांक २



## आदेश

आदेश क्रमांक एसएफसी. १०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल, १९९४ अन्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच आयोगाचे अध्यक्ष व सदस्य-सचिव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित तीन सदस्य पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर याद्वारे खालीलप्रमाणे नियुक्त करण्यात येत आहेत :—

(१) श्री. द. म. सुकथनकर

(२) श्रीमती प्रभावती झाडबुके

(३) श्री. संतोषराव गोडे

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

परिशिष्ट क्रमांक २

असा. क्र. २४४ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, ऑक्टोबर १९, १९९४/आश्विन २७, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated 19th October 1994.

*NOTIFICATION*

No. Mavia, 1094/CR-39/Arthabal.—The following order made by the Governor of Maharashtra is published for general information. Marathi traslation of the order is also published :—

**Order**

Under Order No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated 23rd April 1994, the First Maharashtra Finance Commission has been constituted and the Chairman and the Member-Secretary of the Commission have been appointed. The other three members are hereby appointed on the First Maharashtra Finance Commission as follows :—

(1) Shri D. M. Sukathankar

(2) Smt. Prabhavati Zadbuke

(3) Shri Santoshrao Gode

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

# परिशिष्ट क्रमांक ३

**S. G. GHOLAP**
Phone No. 4734772
4733995
5th September 1995

To
The Governor,
Maharashtra State.

**Sub.**—Resignation of the Chairmanship of Maharashtra Finance Commission.

Respected Sir,

You have made my appointment as Chairman, Finance Commission, by your Order dated 23rd April 1994. I am very much thankful for the same.

I hereby give my resignation of the Chairmanship of the Maharashtra Finance Commission.

Thank you.

Sd.

(S. G. GHOLAP)

# परिशिष्ट क्रमांक ४



## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर, १९९५

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक ५ ऑक्टोबर, १९९५ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

## आदेश

क्रमांक एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ आणि क्रमांक मविआ. १०९४/सीआर-३९/अर्थबळ, दिनांक १९ ऑक्टोबर, १९९४ च्या आदेशान्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे व आयोगावर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. शांताराम जी. घोलप, अध्यक्ष, पहिला महाराष्ट्र वित्त आयोग यांनी राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ५ सप्टेबर १९९५ च्या त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षराने लिहिलेल्या पत्राने राजीनामा सादर केला आहे व तो त्यांचा राजीनामा दिनांक ५ सप्टेंबर, १९९५ पासून स्वीकृत करण्यात आला आहे.

२. श्री. सुरेश प्रमू यांना पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर अध्यक्ष म्हणून, ते पदाचा कार्यभार ज्या दिनांकास स्वीकारतील त्या दिनांकापासून याद्वारे नियुक्त करण्यात येत आहे.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

परिशिष्ट क्रमांक ४

असा. क्र. २४४

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑक्टोबर १०, १९९५/आश्वीन १८, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 5th October 1995.

The following Order No. Mavia 1095/CR-28/Arthbal, dated the 5th October 1995 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

Under Order No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated 23rd April 1994, and Order No. Mavia 1094/Cr-39/ Arthbal, dated 19th October 1994, the First Maharashtra Finance Commission has been constituted and the Chairman and the Members of the Commission have been appointed. Shri Shataram G. Gholap, Chairman of the First Maharashtra Finance Commission has resigned from his office with effect from 5th September 1995 by writing under his hand a letter dated 5th September, 1995 and the same has been accepted with effect from 5th September, 1995.

2. Shri Suresh Prabhu is hereby appointed on the First Maharashtra Finance Commission as the Chairman, with effect from the date he takes charge of the post.

**P. C. ALEXANDER,**
Governor of Maharashtra.



एच ४०९४-१९अ

# परिशिष्ट क्रमांक ५



## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९५

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेश क्रमांक मविआ. १०९५/सीआर-५५/अर्थबळ, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९५ चा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

## आदेश

क्रमांक एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल, १९९४ अन्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. सदर आयोगाची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९५ रोजी संपत आहे. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत याद्वारे पुढील तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत म्हणजे दिनांक ३१ जानेवारी, १९९६ पर्यंत वाढविण्यास शासन मंजुरी देत आहे.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

असा. क्र. २००

परिशिष्ट क्रमांक ५

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑक्टोबर ३१, १९९५/कार्तिक ९, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 31st October, 1994.

The following Order No. Mavia 1095/CR-55/Arthbal, dated the 31st Obtober, 1995 made by the Governor of Maharashtra is publishd for general information :—

**Order**

Under Order No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated 23rd April 1994, the First Maharashtra Finance Commission has been constituted, the term of which ends on 31st October, 1995. The government is pleased to extend the term of the First Maharashtra Finance Commission for further period of three months i.e. upto 31st January, 1996.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

परिशिष्ट क्रमांक ६

असा. क्र. २७ रजिस्टर्ड नं. एमएच/वाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, फेब्रुवारी १, १९९६/माघ १२, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ गममांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांच्यावयतिरिक्त) नियम व आदेश

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ फेब्रुवारी १९९६

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक १ फेब्रुवारी १९९६ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

### आदेश

आदेश क्रमांक एसएफसी-१०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ अन्वये एक अध्यक्ष, तीन सदस्य व एक सदस्य-सचिव यांचा अंतर्भाव असलेल्या पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आदेश क्र. मविआ. १०९५/सीआर-५५/अर्थबळ. दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ अन्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत, दिनांक १ नोव्हेंबर १९९५ पासून पुढे तीन महिन्यांकरिता म्हणजे दिनांक ३१ जानेवारी १९९६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. आदेश क्र. मविआ. १०९४/सीआर-३९/अर्थबळ, दिनांक १९ ऑक्टोबर १९९४ अन्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर श्री. द. मु. सुकथनकर, श्रीमती प्रमावती झाडबुके व श्री. संतोषराव गोडे यांची " सदस्य " म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे व श्री. सुरेश प्रभू यांची पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर अध्यक्ष म्हणून आदेश क्र. मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ. दिनांक ५ ऑक्टोबर १९९५ अन्वये नियुक्ती करण्यात आली आंहे. ज्या मुदतीकरिता अध्यक्ष व सदस्यांची पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर नेमणूक करण्यात आली होती ती मुदत दिनांक ३१ जानेवारी १९९६ रोजी संपते. महाराष्ट्र शासन दिनांक १ फेब्रुवारी १९९६ पासून पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची पुनर्रचना पुढीलप्रमाणे करीत आहे :—

(१) श्री. सुरेश प्रभू .. .. अध्यक्ष.
(२) श्री. दिवाकर कळसुळकर .. .. सदस्य.
(३) श्री. विजय तातेड .. .. सदस्य.
(४) श्री. श्रीपाद पटवारी .. .. सदस्य.
(५) श्री. पी. पी. महाना .. .. सदस्य-सचिव.

२. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर " अध्यक्ष " व " सदस्य-सचिव " म्हणून श्री. सुरेश प्रभू व श्री. पी. पी. महाना यांची करण्यात आलेली नेमणूक दिनांक १ फेब्रुवारी १९९६ पासून दिनांक ३० जून १९९६ पर्यंत पुढे चालू राहील. इतर सदस्य, आपल्या पदाचा कार्यभार १ फेब्रुवरी १९९६ किंवा तदनंतर ज्या तारखेला स्वाकारतील, त्या तारखेपासून दिनाक ३० जून १९९६ पर्यंत पद धारण करतील.

३. आदेश क्र. एसएफसी. १०९४/सीआर-२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ मध्ये परिच्छेद ४, ५, ६ व ७ नुसार निर्धारित केलेल्या विचारार्थ विषयातील प्रत्येक बाबीवरील आपला अहबाल आयोग दिनांक ३० जून १९९६ पर्यंत सादर करील.

पी. सी. अलेक्झांडर,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 1st February 1996

The following Order No. Mavia. 1095/CR-28/Arthabal, dated 1st February 1996 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

The First Maharashtra Finance Commission consisting of a Chairman, three members and one Member-Secretary has been constituted, *vide* order No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated 23rd April 1994. The term of the First Maharashtra Finance Commission has been extended for further period of three months from 1st November 1995, i.e. upto 31st January 1996, *vide* Order No. Mavia. 1095/CR-55/Arthabal, dated the 31st October 1995, Shri D. M. Sukthankar, Smt. Prabhavati Zadbuke and Satoshrao Gode have been appointed on the First Maharashtra Finance Commission as members *vide* Order No. Mavia. 1094/ CR-39/Arthabal, dated the 19th October 1994 and Shri Suresh Prabhu has been appointed as the Chairman on the First Maharashtra Finance Commission *vide* Order No. Mavia. 1095/CR-28/Arthabal, dated the 5th October 1995. The term for which the Chairman and members of the First Maharashtra Finance Commission have been appointed comes to an end on 31st January 1996. The Government is pleased to reconstitute the First Maharashtra Finance Commission with effect from 1st February 1996 as follows :—

(1) Shri Suresh prabhu ... ... Chairman.
(2) Shri Diwakar Kalsulkar ... ... Member.
(3) Shri Vijay Tater ... ... Member.
(4) Shri Shripad Patwari ... ... Member.
(5) Shri P. P. Mahana ... ... Member-Secretary.

2. The appointment of Shri Suresh Prabhu and Shri P. P. Mahana as the Chairman and the Member-Secretary on the First Maharashtra Finance Commission shall remain continued further upto the 30th June 1996 with effect from 1st February 1996. The other three members shall hold office upto the 30th June 1996 from the date on which they take charge of the post individually on 1st February 1996 or thereafter.

3. The Commission shall make its report available by 30th June 1996 on each of the trms of reference laid down in paragraphs No. 4, 5, 6 and 7 of the Order No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated 23rd April 1994.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

# परिशिष्ट क्रमांक ७

**SURESH PRABHU**
B-21, ' Sadhana ',
16th Road, Khar,
Mumbai 400 052.
Tel. Home : 6496040
27th March 1996.

Governor,
State of Maharashtra,
Mumbai.

His excellencies,

I hereby resign from the Chairmanship of the Maharashtra Finance Commission with immediate effect.

Thanking You.

Yours fathfully,

Sd/—

(SURESH PRABHU)

# परिशिष्ट क्रमांक ८

(शासनाच्या राजपत्रत प्रसिद्ध करावयाचे)

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मार्च १९९६

## अधिसूचना

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक २९ मार्च १९९६ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

## आदेश

आदेश क्रमांक मविआ-१०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक ५ ऑक्टोबर १९९५ च्या आदेशान्वये श्री. सुरेश प्रभू यांची पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली होती. क्र. मविआ-१०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक १ फेब्रुवारी १९९६ च्या आदेशान्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची पुनर्रचना करण्यात आली असून श्री. सुरेश प्रभू यांची अध्यक्ष म्हणून करण्यात आलेली नियुक्ती पुढे चालू ठेवण्यात आली आहे. श्री. सुरेश प्रभू, अध्यक्ष, पहिला वित्त आयोग यांनी दिनांक २७ मार्च १९९६ च्या त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षराने लिहिलेल्या पत्राने राजीनामा सादर केला आहे. श्री. सुरेश प्रभू यांचा राजीनामा दिनांक २७ मार्च १९९६ पासून याद्वारे स्वीकृत करण्यात येत आहे.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

(To be published in the **Government Gazette**)

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 29th March 1996

## Notification

The following Order No. Mavia. 1095/CR-28/Arthbal, dated the 29th March 1996 made by the Governor of Maharashtra is published for general information.

## Order

Under Order No. Mavia-1095/CR-28/Arthbal, dated 5th October 1995, Shri Suresh Prabhu was appointed as the Chairman on the First Maharashtra Finance commission. Under Order No. Mavia-1095/CR-28/Arthbal, dated the 1st february 1996, the First Maharashtra Finance Commission has been reconstituted and the appointment of Shri Suresh Prabhu as Chairman has been continued further. Shri Suresh Prabhu, Chairman of the first Maharashtra Finance Commission has resigned his office with effect from 27th March, 1996 by writing under his hand a letter dated 27th March 1996. The resignation tendered by Shri Suresh Prabhu is hereby accepted with effect from 27th March 1996.

**P. C. ALEXANDER,**

Government of Maharashtra.

परिशिष्ट क्रमांक ९

असा. क्र. १२९

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, जून २९, १९९६/आषाढ ८, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th June 1996

The following Order No. Mavia, 1096/CR-17/Arthabal, dated the 27th June 1996 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

Under Order No. Mavia, 1096/CR-28/Arthabal, dated the 1st February 1996, the first Maharashtra Finance Commission has been reconstituted. The term of reconstituted Commission ends on 30th June 1996. The Government of Maharashtra is pleased to extend the term of Commission upto 31st Octol 1996.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

**वित्त विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ जून १९९६

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९६/सीआर-१७/अर्थबळ, दिनांक २७ जून १९९६ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक १ फेब्रुवारी १९९६ च्या आदेशान्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची पुनर्रचना करण्यात आली आहे. पुनर्रचित आयोगाची मुदत दिनांक ३० जून १९९६ रोजी संपते. ही मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर १९९६ पर्यंत वाढविण्यास शासन मंजुरी देत आहे.

पी. सी. अलेक्झांडर,
महाराष्ट्राचे राज्यपाल

परिशिष्ट क्रमांक १०

असा. क्र. १३५

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै ४, १९९६/आषाढ १३, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th July 1996

The following Order No. Mavia, 1095/CR-28/Arthabal, dated the 2nd July 1996 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

The resignation tendered by Shri Suresh Prabhu, Chairman of the First Maharashtra Finance Commission has been accepted with effect from 27th March 1996 *vide* Order No. Mavia. 1095/CR-28/ Arthabal, dated the 29th March 1996, Shri Makarand K. Herwadkar is hereby appointed as Chairman of the First Maharashtra Finance Commission. He shall hold office upto 31st October 1996 from the date on which he takes charge of the post.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै १९९६

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक २ जुलै १९९६ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

श्री. सुरेश प्रभू, अध्यक्ष, पहिला महाराष्ट्र वित्त आयोग यांनी दिलेला राजीनामा आदेश क्रमांक मविआ. १०९५/सीआर-२८/अर्थबळ, दिनांक २९ मार्च १९९६ नुसार दिनांक २७ मार्च १९९६ पासून स्वीकृत करण्यात आला आहे. पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगावर श्री. मकरंद हेरवाडकर, यांना याद्वारे अध्यक्ष म्हणून नेमण्यात येत आहे. ते अध्यक्षपदाचा कार्यभार ज्या तारखेस स्वीकारतील, त्या तारखेपासून दिनांक ३१ ऑक्टोबर १९९६ पर्यंत पद धारण करतील.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

# परिशिष्ट क्रमांक ११

(शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करावयाचे)

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑक्टोबर १९९६

अधिसूचना

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९६/सीआर-१७/अर्थबळ, दिनांक २८ ऑक्टोबर १९९६ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

आदेश

क्रमांक मविआ. १०९६/सीआर-१७/अर्थबळ, दिनांक २७ जून १९९६ च्या आदेशान्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर १९९६ पर्यंत पुढे वाढविण्यात आली आहे. आयोगाची मुदत आणखी पुढे दिनांक ३१ डिसेंबर १९९६ पर्यंत वाढविण्यास शासन मंजुरी देत आहे.

पी. सी. अलेक्झांडर,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

(To be published in the Government Gazette)

**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th October 1996

***NOTIFICATION***

The following Order No. Mavia. 1096/CR-17/Arthabal, dated the 28th October 1996 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

Under Order No. Mavia. 1096/CR-17/Arthabal, dated the 27th June 1996, the term of first Maharashtra Finance Commission has been extended upto 31st October 1996. The Government of Maharashtra is pleased to extend the term of Commission further upto 31st December 1996.

P. C. ALEXANDER,
Governor of Maharashtra.

# परिशिष्ट क्रमांक १२

**(To be published in the Government Gazette)**

**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th January 1997

***NOTIFICATION***

The following Order No. Mavia. 1096/CR-17/Arthabal, dated the 12th January 1997 made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

Under Order No. Mavia. 1096/CR-17/Arthabal, dated the 28th October 1996, the term of first Maharashtra Finance Commission has been extended upto 31st December 1996. The Government of Maharashtra is pleased to extend the term of Commission further upto 31st January 1997.

P. C. ALEXANDER,

Governor of Maharashtra.

**(शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करावयाचे)**

**वित्त विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी १९९७

**अधिसूचना**

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या क्रमांक मविआ. १०९६/सीआर-१७/अर्थबळ, दिनांक १२ जानेवारी १९९७ च्या आदेशाचा मराठी अनुवाद माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**आदेश**

क्रमांक मविआ. १०९६/सीआर-१७/अर्थबळ, दिनांक २८ ऑक्टोबर १९९६ च्या आदेशान्वये पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची मुदत दिनांक ३१ डिसेंबर १९९६ पर्यंत पुढे वाढविण्यात आली आहे. आयोगाची मुदत आणखी पुढे दिनांक ३१ जानेवारी १९९७ पर्यंत वाढविण्यास शासन मंजुरी देत आहे.

**पी. सी. अलेक्झांडर,**

महाराष्ट्राचे राज्यपाल.

## परिशिष्ट क्रमांक १३

# महाराष्ट्र वित्त आयोग

## महाराष्ट्र शासन

क्रमांक मविआ. १२९४/सीआर. ४८/९४.
शासकीय कुटीर क-५
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर
मुंबई ४०० ०३९.
दिनांक २६ जुलै, १९९४.

प्रति,
श्री. ......................................................................, आमदार,
......................................................................
......................................................................
जिल्हा ......................................................................

**विषय :** महाराष्ट्र वित्त आयोगाकडे राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/जिल्हा परिषदा/ग्रामपंचायती यांच्या संदर्भात वित्तीय बाबी वषयक सूचना करणे.

महोदय,

आपणास विदितच आहे की, मा. राज्यपालांच्या दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या अधिसूचनेद्वारे राज्यात प्रथमतःच वित्त आयोग स्थापन करण्यात आला आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात वित्त आयोगाच्या कार्यकक्षा व त्यात अंतर्भूत असलेल्या वित्तीय बाबींचे सविस्तर विवेचन क्रमांक एसएफसी. १०९४/सीआर. २२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या अधिसूचनेत विषद करण्यात आले आहे, त्याची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे.

२. वित्त आयोगाकडे सोपविण्यात आलेल्या बाबी व कार्यकक्षा लक्षात घेता, आपल्या क्षेत्रातील महानगरपालिका/नगरपालिका/जिल्हा परिषदा/ग्राम पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांना कायद्यानुसार उपलब्ध असलेली स्वतःची उत्पन्नाची साधने, शासकीय अनुदाने व कर्ज व त्याद्वारे मिळणारे उत्पन्न, त्यांच्या प्रत्यक्ष वित्तीय गरजा/समस्या व त्या सोडविण्यासाठी पैसा कमी पडत असल्यास सबळ कारणे दाखवून, शक्य असलेल्या उपाययोजना संदर्भात आपल्या काही सूचना असू शकतील.

३. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, वरील मुद्द्यांच्या अनुषंगाने आपल्या काही सूचना असल्यास त्या १ महिन्याच्या अवधीत वित्त आयोगाकडे [उपरोक्त पत्त्यावर] पाठवाव्यात, की जेणेकरून वित्त आयोगाला त्या अनुषंगाने साधकबाधक चर्चा करून योग्य ते निष्कर्ष काढणे शक्य होऊन शासनाला योग्य त्या शिफारशी करणे शक्य होईल.

आपला

(शांताराम जी. घोलप)
अध्यक्ष
महाराष्ट्र वित्त आयोग.

सहपत्र : दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या अधिसूचनेची प्रत.

# परिशिष्ट क्रमांक १४

क्रमांक : मविआ. १०९५ / सीआर-६/ अर्थबळ
**महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १४ फेब्रुवारी १९९५.

**विषय :** " दी सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस. पुणे "
या संस्थेकडून महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा वित्तविषयक नमुना अभ्यास
महाराष्ट्र वित्त आयोगाकडून करून घेण्याबाबत शासनाची मंजुरी.

**वाचा :** सदस्य सचिव, महाराष्ट्र वित्त आयोग, मुंबई, यांची क्र. एमएफसी. १२९४ / सीआर-१४८ / ९४.
दिनांक २३ जानेवारी १९९५ ची कार्यालयीन टिप्पणी.

**ज्ञापन :**

उपरोक्त टिप्पणीतील प्रस्तावास अनुसरून सदस्य सचिव, महाराष्ट्र वित्त आयोग, मुंबई यांना मला असे कळविण्याचा निदेश आहे की, महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा व पंचायत समितींचा वित्तविषयक अभ्यास " दी सेंटर ऑफ स्टडीज इनसोशल सायन्सेस, पुणे " या संस्थेकडून करून घेण्याच्या प्रस्तावास तसेच सदर संस्थेस खाली दिल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने रक्कम प्रदान करण्याकरिता लागणाऱ्या एकूण रुपये १० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) खर्चास शासन मंजुरी देत आहे.

| | रुपये |
|---|---|
| (अ) संस्थेकडे काम सोपविल्यानंतर काम सुरू होण्यापूर्वी ३० टक्के .. .. .. | ३ लक्ष |
| (ब) काम सुरू झाल्यानंतर एक महिन्यानंतर ३० टक्के .. .. .. | ३ लक्ष |
| (क) संस्थेने क्षेत्रीय स्तरावरील काम पूर्ण केल्यानंतर म्हणजे काम सुरू होऊन साधारणतः तीन महिने झाल्यानंतर २० टक्के. .. | २ लक्ष |
| (ड) संस्थेने महाराष्ट्र वित्त आयोगास अहवाल सादर केल्यानंतर २० टक्के .. .. .. | २ लक्ष |
| एकूण .. | १० लक्ष |

उपरोक्त खर्च " २०७०, इतर प्रशासनिक सेवा; ८०० इतर खर्च, (पाच) महाराष्ट्र वित्त आयोग (८०० ०२० १) " खाली खर्ची टाकण्यात यावा. उपरोक्त खर्चापैकी (अ) पुढे दिलेला खर्च रु. ३ लक्ष हा सन १९९४-९५ करिता मंजूर करण्यात आलेल्या त्याखालील आर्थिक तरतुदींतून भागविण्यात यावा व उर्वरित खर्च सन १९९५-९६ करिता मंजूर होणाऱ्या तरतुदींतून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**( क. र. सरवैय्या )**
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रति,

सदस्य सचिव, महाराष्ट्र वित्त आयोग कार्यालय, मुंबई.

प्रत,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अधिदान), मुंबई.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र वित्त आयोग, मुंबई.
उप सचिव, महाराष्ट्र वित्त आयोग कार्यालय, क-४, क-५, शासकीय कुटीर, मंत्रालयासमोर, मुंबई.
प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (अर्थबळ).

# परिशिष्ट क्रमांक १५

महाराष्ट्र वित्त आयोग
राज्यातील ग्रामपंचायती/नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाटी काही अधिकाऱ्यांची मदत घेण्यासाठी " एक पॅनेल " तयार करण्याबाबत.

# महाराष्ट्र वित्त आयोग

**महाराष्ट्र शासन**

परिपत्रक क्रमाक मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१,
शासकीय कुटीर क-५, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३९.
दिनांक २४ फेब्रुवारी १९९५.

**परिपत्रक**

राज्यपालांनी त्यांच्या दिनांक २३ एप्रिल १९९४ च्या अधिवेशनाद्वारे महाराष्ट्रासाठी प्रथम वित्त आयोग स्थापन केला आहे. वित्त आयोगाला त्यांच्याकडे सोपविलेली कामे सुलभपणे पार पाडण्यासाठी व अहवाल तयार करणेसाठी राज्यातील ग्रामपंचायती/जिल्हा परिषदा/नगरपरिषदा व महानगरपालिका यांच्या आर्थिक परिस्थिती आणि संबंधित विषयाबाबत वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. वित्त आयोगाला हा अहवाल दिनांक ३१ ऑक्टोबर १९९५ च्या आत मा. राज्यपाल यांना सादर करावयाचा असल्याने बऱ्याच वेळा काही तातडीच्या कामाबाबत माहिती घेणे, चर्चा करणे अथवा सल्ला घेणे अगत्याचे ठरते. अशा वेळी सर्व राज्यातून अधिकाऱ्यांना तसदी देण्याऐवजी काही ठराविक माहितगारांकडून त्वरित माहिती घेणे किंवा सल्ला घेणे हे जरुरीचे आहे. म्हणून वित्त आयोगाने सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अधिकाऱ्यांचे " पॅनल [Resource Group] " तयार केलेले आहे.

वरील अधिकाऱ्यांनी वित्त आयोगास जेव्हा जेव्हा त्यांच्या सेवेची जरुरी भासेल त्या वेळी तत्परतेने निर्देशित केलेल्या जागी व वेळी उपस्थित राहून मदत करावी आणि सहकार्य करावे.

महाराष्ट्र वित्त आयोग यांच्या मान्यतेने,

सही/—
**(प्रे. प्र. महाना)**
सदस्य-सचिव,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रति

मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
आयोगातील सर्व अधिकारी,
मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (नावाने),
संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा, (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत),
संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषदा (नावाने),
संबंधित करआकारणी व करसंकलन अधिकारी आणि
महानगरपालिकांतील संबंधित अधिकारी (नावाने), आयुक्त, महानगरपालिका यांच्यामार्फत.
निवड नस्ती.

(१) जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची यादी :—

(१) श्री. नितीन करीर, पुणे.

(२) श्री. अरविंद सिंग, नागपूर.

(३) श्री. राजेश कुमार, बीड.

(४) श्री. आय. एस. चहल, नाशिक.

(५) श्री. राजेश अग्रवाल, जळगांव.

(२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांची यादी :—

(१) श्री. एस. एस. देशमुख, जिल्हा परिषद, नागपूर.

(२) श्री. एस. पी. कानडे, जिल्हा परिषद, नाशिक.

(३) श्री. बी. सी. हंगे, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

(४) श्री. डी. डी. वाव्हळ, जिल्हा परिषद, ठाणे.

(५) श्री. सु. म. खानापुरे, जिल्हा परिषद, पुणे.

(३) मुख्याधिकाऱ्यांची यादी :—

(१) श्री. डी. एस. पायगुडे, प्रशासक, नालासोपारा/ठाणे.

(२) श्री. र. बा. मवासी, मुख्याधिकारी, धुळे नगरपालिका, जिल्हा धुळे.

(३) श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगाव नगरपालिका, जिल्हा जळगांव.

(४) श्री. पी. जे. ओरपे, मुख्याधिकारी, वसई नगरपालिका, जिल्हा ठाणे.

(५) श्री. एस. डी. शिंदे, मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर/ठाणे.

(६) श्री. ह. भा. भोंगळे, मुख्याधिकारी, उरण नगरपालिका, जिल्हा अलिबाग.

(७) डॉ. किशोर क्षीरसागर, मुख्याधिकारी, मीरा-भाईन्दर नगरपालिका, जिल्हा ठाणे.

(४) कर आकारणी व कर संकलनाबाबत व महानगरपालिकेतील इतर अधिकाऱ्यांची यादी :—

(१) श्री. मादुस्कर, उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

(२) श्री. पी. पी. जानवलकर, कर आकारणी व कर संकलन, मुंबई महानगरपालिका, मुंबई.

(३) श्री. एम. ए. शानबाग, उप महाव्यवस्थापक, मुंबई महानगरपालिका, विद्युत पुरवठा व परिवहन सेवा, मुंबई.

(४) श्री. मोरे, मुख्य लेखा अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे.

(५) श्री. एस. डी. फुटाणे, परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(६) श्री. ए. एम. सय्यद, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# परिशिष्ट क्रमांक १५ चे सहपत्र

महाराष्ट्र वित्त आयोग
राज्यातील ग्रामपंचायती/नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाटी काही अधिकाऱ्यांची मदत घेण्यासाठी "एक पॅनेल" तयार करण्याबाबत.

# महाराष्ट्र वित्त आयोग

**महाराष्ट्र शासन**

परिपत्रक क्रमांक-मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१
शासकीय कुटीर क-५, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३९.
दिनांक २ मार्च १९९५

**वाचा :** महाराष्ट्र वित्त आयोगाचे परिपत्रक क्रमांक : मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/का-१,
दिनांक २४ फेब्रुवारी, १९९५.

**पूरक परिपत्रक :**

महाराष्ट्र वित्त आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २४ फेब्रुवारी १९९५ च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र वित्त आयोगाला त्यांच्या कामाबाबत माहिती घेणे, चर्चा करणे अथवा सल्ला घेणे यासाठी एक पॅनल (रिसोर्स ग्रुप) तयार करण्यात आलेला आहे. त्या पॅनलच्या मुख्य अधिकारी/प्रशासक यांच्या यादीमध्ये श्री. मो. रा. चव्हाण, प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपालिका यांचाही समावेश करण्यात येत आहे.

वरील अधिकाऱ्यांनी वित्त आयोगास जेव्हा जेव्हा त्यांच्या सेवेची जरुरी भासेल त्यावेळी तत्परतेने निर्देशित केलेल्या जागी व वेळी उपस्थित राहून मदत करावी आणि सहकार्य करावे.

सही/—
**(प्रे. प्र. महाना)**
सदस्य-सचिव,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रति

मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
आयोगातील सर्व अधिकारी,
मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (नावाने),
संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा,
(मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत),
संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषदा (नावाने),
संबंधित कर आकारणी व कर संकलन अधिकारी आणि
महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी (नावाने), आयुक्त, महानगरपालिका यांच्यामार्फत.
श्री. मो. रा. चव्हाण, प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जिल्हा ठाणे,
प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय.

# परिशिष्ट क्रमांक १५ चे सहपत्र

**महाराष्ट्र वित्त आयोग**
**राज्यातील ग्रामपंचायती/नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी काही अधिकाऱ्यांची मदत घेण्यासाठी '' एक पॅनेल '' तयार करण्याबाबत.**

# महाराष्ट्र वित्त आयोग

**महाराष्ट्र शासन**

शुद्धीपत्रक क्रमांक-मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१
शासकीय कुटीर क-५, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३९.
दिनांक ३ मार्च १९९५

**वाचा :** महाराष्ट्र वित्त आयोगाचे परिपत्रक क्रमांक : मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/का-१, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९५.

**शुद्धीपत्रक :**

महाराष्ट्र वित्त आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २४ फेब्रुवारी १९९५ च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र वित्त आयोगाला त्यांच्या कामाबाबत माहिती घेणे, चर्चा करणे अथवा सल्ला घेणे यासाठी एक पॅनेल (रिसोर्स ग्रुप) तयार करण्यात आलेला आहे. त्या पॅनेलमधील क्र. २ च्या यादीमध्ये श्री. एस. एस. देशमुख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या नांवापुढे '' जिल्हा परिषद नागपूर '' या शब्दाच्या ऐवजी '' जिल्हा परिषद अहमदनगर '' असे वाचावे.

सही/—
**(प्रे. प्र. महाना)**
सदस्य-सचिव,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रति

मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
आयोगातील सर्व अधिकारी,
मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (नावाने),
संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा,
(मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत),
प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती.

# परिशिष्ट क्रमांक १५ चे सहपत्र

महाराष्ट्र वित्त आयोग
राज्यातील ग्रामपंचायती/नगरपालिका/महानगरपालिका यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी काही अधिकाऱ्यांची मदत घेण्यासाठी '' एक पॅनेल '' तयार करण्याबाबत.

# महाराष्ट्र वित्त आयोग

**महाराष्ट्र शासन**

परिपत्रक क्रमाक-मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१
शासकीय कुटीर क-५, मादाम कामा मार्ग
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३९.
दिनांक ३ मार्च १९९५

**वाचा :** महाराष्ट्र वित्त आयोगाचे परिपत्रक क्रमांक : मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/का-१, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९५.

**पूरक परिपत्रक :**

महाराष्ट्र वित्त आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २४ फेब्रुवारी १९९५ च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र वित्त आयोगाला त्यांच्या कामाबाबत माहिती घेणे, चर्चा करणे अथवा सल्ला घेणे यासाठी एक पॅनेल (रिसोर्स ग्रुप) तयार करण्यात आलेला आहे. त्यातील पॅनेल क्रमांक २ मध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या यादीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येत आहे :—

(६) श्री. एस. आर. ठाकरे, जिल्हा परिषद, अकोला.
(७) श्री. एच. पी. घुगल, जिल्हा परिषद, चंद्रपूर.

सही/—
**(प्रे. प्र. महाना)**
सदस्य-सचिव,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रति

मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
आयोगातील सर्व अधिकारी,
मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (नावाने),
संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा,
(मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत),
संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषदा (नावाने),
* संबंधित कर आकारणी व कर संकलन अधिकारी
श्री. एस. आर. ठाकरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला.
श्री. एच. पी. घुगल, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती.
* श्री. पी. बी. जानवलकर, कर निर्धारक व वसुलीकार, मुंबई महानगरपालिका, मुंबई.
* श्री. व्ही. टी. मोरे, मुख्य लेखा अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे.
* श्री. एन. एम. सय्यद, मुख्य लेखा अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# परिशिष्ट क्रमांक १५ चे सहपत्र

## महाराष्ट्र वित्त आयोग

### महाराष्ट्र शासन

क्रमांक : मविआ. ३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१,
शासकीय कुटीर क-५, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३९.
दिनांक ३ मार्च १९९५

प्रति

श्री. एस. डी. शिंदे,
मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जिल्हा ठाणे.
डॉ. किशोर क्षीरसागर,
मुख्याधिकारी, मीरा-भाईन्दर नगरपालिका, जिल्हा ठाणे.
श्री. डी. एस. पायगुडे,
प्रशासक, नालासोपारा नगरपालिका, जिल्हा ठाणे.
श्री. मो. रा. चव्हाण,
प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जिल्हा ठाणे.

**विषय :** राज्यातील नगरपालिकांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी " अभ्यास गट " तयार करणेबाबत.

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र वित्त आयोगाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक २४ फेब्रुवारी, १९९५.
(२) महाराष्ट्र वित्त आयोगाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक २ मार्च, १९९५.

मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की, दिनांक २ मार्च १९९५ रोजी सकाळी वित्त आयोगाचे कार्यालयात वरील विषयाबाबत झालेल्या बैठकीमध्ये तयार करण्यात आलेल्या अभ्यासगटांचे आमंत्रक म्हणून आपणास नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर अभ्यासगटाच्या बैठका व चर्चा नियमितपणे होऊन आवश्यक अहवाल दिनांक १५ एप्रिल, १९९५ च्या विहित मुदतीत आयोगास सादर करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपणावर राहील. कृपया याची नोंद घ्यावी. वरील संदर्भाधीन दोन्ही पत्रांच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

सही/–
**(र. सु. मोरे)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रति अग्रेषित—
मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
आयोगातील सर्व अधिकारी,
मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
नगरपालिकांशी संबंधित अभ्यासगटांमधील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
निवड नस्ती.

## परिशिष्ट क्र. १६

P. P. Mahana,
Member Secretary.

D.O. No. MFC-3095/CR-45/95/D-1
MAHARASHTRA FINANCE COMMISSION
GOVERNMENT OF MAHARASHTRA,
Government Bungalow C-5
Madam Cama Road
Opp. Mantralaya, Bombay 400 039.

March 2, 1995.

Dear Shri Maduskar,

Maharashtra Finance Commission *vide* Circular No. मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्यासन-१. dated 24th February 1995 has set up four Panel of resource persons of which one panel deals specifically with the issues concerning the Municipal Corporations in Maharashtra. The Commission has prepared a list of subjects pertaining to the Municipal Councils. A copy of this list is enclosed. All the issues included in the enclosed paper are equally relevant subjects for study in respect of the Municipal Corporations. From among the resource persons, the following Group is constituted to study these issues and submit a report to the Commission by 15th April 1995. There may however be some special problems limited to a prticular Municipal Corparation which can be brought out in the report. Particular attention is invited to Item No. VIII. It is expected that the study report should suggest whether any statutory intervention or amendment will help to improve the financial position of the Municipal Corporations. Recommendations of the last type will then be examined in consultation with the Departments of Urban Development and Law and Judiciary.

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Shri A. B. Maduskar<br>Deputy Municipal Commissioner, (P)<br>Bombay Municipal Corporation. | ... | Chairman |
| (2) | Shri P. B. Janwalkar<br>Assessor and Collector of Tax,<br>Bombay Municipal C orporation. | ... | Member |
| (3) | Shri V. T. More<br>Chief Accountant,<br>Pune Municipal Corporation. | ... | Member |
| (4) | Shri A. N. Sayyed<br>Chief Accounts and<br>Finance Officer,<br>Nagpur Municipal Corporation. | ... | Member |

Necessary action is requested.

With regards

Sd/-

(P. P. Mahana)

Shri A. B. Maduskar,
Deputy Municipal Commissioner (P.),
Bombay Municipal Corporation,
Mahapalika Marg,
Bombay 400 001.

Copy to—

(1) Shri P. B. Janwalkar, Assessor & Collector of Tax, Bombay Municipal Corporation.

(2) Shri V. T. More, Chief Accountant, Pune Municipal Corporation.

(3) Shri A. M. Sayyed, Chief Accounts & Finance Officer, Nagpur Municipal Corporation.

Copy with compliments to—

(1) Municipal Commissioner, Pune Municipal Corporation, Pune.

(2) Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation, Bombay.

(3) Municipal Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.

Subjects for Study—Municipal Councils

(I) *Consolidated Property Tax.*—C. P. Tax constitutes only 6 to 7 per cent. of the total income of the Municipal Councils. Even then in the statutory scheme of things it constitute an important item of income. While this source of income is somewhat inflexible and stagnant, the issues which need to be studied are as follows:

(1) The annual demand of the tax, the recovery in the year, percentage of recovery, accumulated arrears of tax if any (if possible breakup of arrears by years). What action does the Municipal bodies takes to recover very old arrears ? Is there any stage at which old arrears are written off ?

(2) How frequently the tax revision is done ? How good and reliable is the base on which the tax is levied ? Can any improvement be suggested to the tax base or to the method of levy of tax. What is the time-lag which is involved in fixing the tax liability and the actual commencement of recovery of tax ?

(3) With the process of rapid urbanisation, what is the status of new properties in so far as the valuation and fixing of tax liability is concerned ? Is it possible to improve the system of valuation of property ? What measures can be suggested to improve upon the present system of ?

(4) What is the present system of any levy on the properties of the Central Government State and Central Government undertakings, Railways, Defence establishments and the State Government which are within the municipal area. Can any improvement be suggested to the existing system to increase the resources of the Local Bodies ?

(5) Is it possible to levy surcharge or cessor street tax linked or unlinked with the property tax ? What will be the advantages or disadvantages of linking them or not linking them with property tax ?

(6) Which are the areas of inefficiency in tax administration and how can they be eliminated for better resource mobilization ?

(7) What are the present levies in respect of the huts in the slum areas ? How adequate they are in relation to the services provided ? Is there any scope for raising them to a reasonable level and to cover the cost of services and amenities ?

(8) What are the statutory amendments which may be required to enable the Municipal Councils/Corporations to raise their revenues from property tax ?

(II) *Study of Octroi Tax.*—Octroi can be said to be the daily bread and butter of the Municipal Councils and it contributes between 20 to 40 per cent. of the total revenue of the Municipal bodies. It will have to be studied whether there can be any more reliable substitute for octroi if the same is abolished. If octroi continues to exist, the present schedule may have to be looked into to see whether it is updated in terms of commodities at regular intervals, whether the rates both by weight or value of goods are revised from time to time. What are the short-comings and loopholes in the octroi administration and how they can be curbed or removed ? What is the experience and pitfalls in the privatisation of octroi like " ring formation " in the receipt of offers, nexus between the contractors and Municipal Counsellors and the like, whether privatisation is a suitable area in the field of tax collection ?

What are the statutory amendments which may be required to enable the Municipal Councils/ Corporations to raise their revenues from Octroi.

(III) Which are the potential area of taxation fees and licences which are unexploited or under-exploited ? What will be the affordable rates if such areas were to be fully exploited ? What statutory intervention or amendments are required to exploit such sources adequately ? The Municipal Councils/ Corporations levy certain licence fees. It needs to be studied whether they are periodically revised to increase the revenues. If not why this revision should not be done at a regular interval of say 3 to 5 years. Similarly Municipalities provide certain services like certifed copies etc. for which charges are levied. These charges are often related to the cost of service. These costs have been going up from time to time and one simple reason is the rise in the salaries and allowances of the staff. The question is whether service charges are raised from time to time to keep pace with the rising cost ? if not, why they should not be revised, say, after every 2-3 years ?

(IV) Water charges both for domestic and non-domestic use are in a class by themselves. Firstly, they are very low and bear no relation to the cost of production. Secondly, they vary greatly from Municipality to Municipality for no apparent reason. Thirdly, apart from the heavy subsidy which the Municipal councils

provide, a considerable part of the subsidy is on account of the non payment of bills of the MSEB and Maharashtra Water Supply and Sewerage Board. Whatever the compulsions, political or otherwise, a certain amount of discipline both in the economic use of water and the level of subsidy needs to be introduced. Without that this service alone will consume a very large portion of the Municipal resources. This entire area needs to be studied to see what measure of discipline can be introduced ?

(V) *Civic Services in slum Areas.*— Due to rapid urbanisation there is a sharp increase in the slum population within and on the fringes of the geographical area of the Municipal Cororations, and to a great extent in and around many A and B Class Municipalities. The standard of civic amenities may not be on a reasonable standard in those rural areas which have recently been included in the geographical limits of urban bodies. The quantity and quality of services in such areas needs to be studied. It also requires a study whether amenities are provided in such areas from plan funds or non-plan funds and what is the proportion of such funds in the total expenditure ? It may also be indicated what kind of charges are levied in these areas for the provision of civic amenities. The need and extent of upgradation of services in such areas might help in working out the gap in revenue and expenditure.

(VI) The Municipal bodies may have invested funds in assets of commercial nature. Some of the Municipalities are also running transport services. It needs to be studied how these investments can become financially viable and provide reasonable returns on investment. If the investments cannot become viable, the reasons for that will have to be investigated.

(VII) A detailed study based on exprience, either from our State, or any other State may have to be taken up to see which are the potential and safe areas for privatization of services, the comparison of costs on account of privatization and provision of services by the Municipality, the comparison of quality of service and the savings and deployment of staff resulting from privatization.

(VIII) Some of the statutory provisions of the Muncipalities Act or the Acts governing the Corporations may have been noticed as a source of difficulties and problems. These provisions may be specified and suggestions may be made as to what kind of amendments can be recommended to facilitate more efficient functioning of the Municipal bodies ?

(IX) Municipal Corporations may have special difficulties or problems. These may be in the nature of creation of civic amenities, upgradation of amenities in the slum areas, maintenance of existing assets or infrastructure. These specific problems may be brught out indicating how they are being tackled at present, what is the source of funding and what are the expectations from the finance Commission by way of recommendation to the goverment ? A and/or B Class Municipalities having any views in the matter may also spell them out.

(X) The municipal bodies levy development/betterment charges which it seems are merged with the general revenues. The question for consideration is whether they should be separately accounted for in the municipal budget and the amounts so collected should be spent on the creation of civic amenities and development in the relevant areas within the municipal jurisdiction.

# परिशिष्ट क्र. १७

क्रमांक मविआ-३०९५/प्र.क्र. ४५/९५/कार्यासन-१
महाराष्ट्र वित्त आयोग
महाराष्ट्र शासन
शासकीय कुटीर क-५
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर
मुंबई ४०० ०३९.

दिनांक २ मार्च १९९५.

प्रति,

(१) प्रशासक,
भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जिल्हा ठाणे.
(२) मुख्याधिकारी,
धुळे नगरपालिका, जिल्हा धुळे.
(३) मुख्याधिकारी,
जळगाव नगरपालिका, जिल्हा जळगाव.
(४) मुख्याधिकारी,
वसई नगरपालिका, जिल्हा ठाणे.
(५) मुख्याधिकारी,
उरण नगरपालिका, जिल्हा अलिबाग.
(६) मुख्याधिकारी,
भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जिल्हा ठाणे.
(७) मुख्याधिकारी,
मीरा-भाईंदर नगरपालिका, जिल्हा ठाणे.
(८) प्रशासक,
नालासोपारा नगरपालिका, जिल्हा ठाणे.

**विषय :** वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी पॅनेल तयार करण्याबाबत.
**संदर्भ :** महाराष्ट्र वित्त आयोगाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक २४ फेब्रुवारी १९९५.

वरील संदर्भांकित परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. दिनांक २ मार्च १९९५ रोजी नगरपालिकांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करण्यासाठी आपल्याशी चर्चा करण्यासाठी एक छोटीशी टिप्पणी आपल्याला देण्यात आली होती व त्या टिप्पणीप्रमाणे खालील विषय चर्चिले गेले :—

(१) एकत्रित मालमत्ता कर.
(२) जकात कर.
(३) फी व लायसन्स फी.
(४) पाणीपुरवठ्याचे दर.
(५) गलिच्छ वस्त्यांमध्ये पुरवावयाच्या सोयी व त्यावर येणारा खर्च.
(६) नगरपालिकांची वाणिज्यिक गुंतवणूक व त्यावर येणारे उत्पन्न.
(७) नगरपालिकेच्या काही सेवांचे खाजगीकरण करण्यास वाव.
(८) नगरपालिकांसंबंधी असलेल्या कायद्यात, नियमावलीत व उपविधीनियम व नगरपालिकांच्या लेखांविषयांचे नियम यात करावयाच्या सुधारणा.
(९) विकास शुल्क (बेटरमेंट अॅन्ड डेव्हलपमेंट चार्जेस) आणि त्यातून येणाऱ्या उत्पन्नाचा वापर.

वरील विषयावर चर्चा करताना असे ठरले की, पॅनेलमध्ये असलेल्या नगरपालिकांचे मुख्याधिकारी आणि प्रशासक यांमधून चार गट तयार

करावेत व त्यांच्याकडे वरील विषयासंबंधी सखोल अभ्यास करण्याचे सोपवावे. या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे पॅनेल तयार करण्यात येत आहेत :–

| पॅनेल क्रमांक (१) | अधिकाऱ्यांचे नाव (२) | आमंत्रक (३) | विषय (४) |
|---|---|---|---|
| १ | (१) श्री. डी. एस. पायगुडे, प्रशासक, नालासोपारा, जि. ठाणे.<br>(२) श्री. एस. डी. शिंदे, मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जि. ठाणे.<br>(३) श्री. पी. जे. ओरपे, मुख्याधिकारी, वसई नगरपालिका, जि. ठाणे.<br>(४) श्री. र. खा. मवासी, मुख्याधिकारी, धुळे नगरपालिका, जि. धुळे.<br>(५) श्री. नाईक, मुख्याधिकारी, लोणावळा नगरपालिका, जि. पुणे (आमंत्रित). | मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर नगरपालिका. | (१) मालमत्ता कर.<br>(२) ऑक्ट्रॉय.<br>(३) खाजगीकरणास असलेला वाव.<br>(४) विकासशुल्क (बेटरमेंट ॲन्ड डेव्हलपमेंट चार्जेस) आणि त्या उत्पन्नाचा वापर. |
| २ | (१) श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगाव नगरपालिका, जि. जळगाव.<br>(२) डॉ. किशोर क्षीरसागर, मुख्याधिकारी, मीरा-भाईंदर नगरपालिका, जि. ठाणे.<br>(३) श्री. ह. भा. भोंगळे, मुख्याधिकारी, उरण नगरपालिका, जि. रायगड.<br>(४) श्री. एस. डी. शिंदे, मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जि. ठाणे. | मुख्याधिकारी, मीरा-भाईंदर नगरपालिका. | (१) या व्यतिरिक्त (नॉनटॅक्स रेव्हेन्यू) उत्पन्नाची साधने, उदा. फीज, लायसन्स फीज, पाणीपुरवठा दर व इतर तत्सम उत्पन्न. |
| ३ | (१) श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगांव नगरपालिका, जि. जळगाव.<br>(२) श्री. र. खा. मवासी, मुख्याधिकारी, धुळे नगरपालिका, जि. धुळे.<br>(३) श्री. पी. जे. ओरपे, मुख्याधिकारी, वसई नगरपालिका, जि. ठाणे.<br>(४) श्री. डी. एस. पायगुडे, प्रशासक, नालासोपारा नगरपालिका, जि. ठाणे. | प्रशासक, नालासोपारा नगरपालिका. | (१) गलिच्छ वस्त्यांमधील सोयी उपलब्ध करण्यासाठी करावयाचा खर्च व त्यासंबंधी मिळणारी ग्रँट वगैरे.<br>(२) वाणिज्यिक स्वरूपाच्या गुंतवणुकीवर येणारे उत्पन्न. |
| ४ | (१) श्री. मो. रा. चव्हाण, प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जि. ठाणे.<br>(२) श्री. डी. एस. पायगुडे, प्रशासक, नालासोपारा, जि. ठाणे.<br>(३) श्री. र. खा. मवासी, मुख्याधिकारी, धुळे नगरपालिका, जि. धुळे.<br>(४) श्री. पी. जे. ओरपे, मुख्याधिकारी, वसई नगरपालिका, जि. ठाणे.<br>(५) श्री. बी. आर. मराठे, मुख्याधिकारी, जळगाव नगरपालिका, जि. जळगाव.<br>(६) श्री. एस. डी. शिंदे, मुख्याधिकारी, भिवंडी-निजामपूर नगरपालिका, जि. ठाणे.<br>(७) श्री. ह. भा. भोंगळे, मुख्याधिकारी, उरण नगरपालिका, जि. रायगड.<br>(८) डॉ. किशोर क्षीरसागर, मुख्याधिकारी, मीरा-भाईंदर नगरपालिका, जि. ठाणे. | प्रशासक, भिवंडी-निजामपूर नगरपालिका. | (१) नगरपालिका कायदा तसेच नगरपालिका उपविधीनियम व नगरपालिका लेखाविषयक नियम यांचा अभ्यास करून उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक व उपयुक्त दुरुस्त्या सुचविणे. |

वरील सर्व अभ्यासगटांनी आपापले अहवाल या आयोगाला दिनांक १५ एप्रिल १९९५ पूर्वी सादर करावेत अशी विनंती करण्यात येत आहे.

सदस्य-सचिव, महाराष्ट्र वित्त आयोग यांच्या आदेशानुसार,

**व. श. ठाकूर,**
विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र वित्त आयोग.

प्रत अग्रेषित : -

१. मा. अध्यक्ष यांचे स्वीय सहायक,
२. आयोगातील सर्व अधिकारी,
३. मा. सदस्य, महाराष्ट्र वित्त आयोग,
४. सर्व संबंधित अधिकारी (नावाने),
५. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई,
६. संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई.
७. निवड नस्ती.

# परिशिष्ट क्र. १८

P. P. Mahana,
Member Secretary.

D.O. No. MFC-3095/CR-45/95/D-1
MAHARASHTRA FINANCE COMMISSION
GOVERNMENT OF MAHARASHTRA
Government Bungalow C-5
Madam Cama Road
Opp. Mantralaya, Bombay 400 039.

Dated March 3, 1995.

Dear,

Please refer to Circular No. मविआ-३०९५/प्र. क्र. ४५/९५/कार्या-१, dated 24th February 1995 under which four panels of resource persons have been constituted to assist the Commission in its function and duties. Two of these panels viz. those of the CEOs. of the Zilla Parishads and Chief Accounts and Finance Officers of the Zilla Parishads pertain to the Panchayat Raj Institutions. The Commission has prepared a note copy of which is enclosed which lists out some of the issues which need to be investigated in detail. These issues have been clubbed together for the sake of convenience and Members of the two panels mentioned above have been assigned to take up the studies in question and submit their reports to the Commission latest by 30th April 1995. The CEOs who will chair these study groups will be free to co-opt other suitable persons from their own Zilla Prishad to facilitate the work. If necessary with the permission of the Divisional Commissioner, knowledgeable officials from other districts may be also be co-opted keeping however the size of the group as small and compact as possible.

| | |
|---|---|
| (1) Study of Zilla Parishads own resources and exploring areas of potential to augment such resources. The study will also include consideration of reasonable returns on the investments particularly of commercial nature which Zilla Parishad may have made. | Shri Nitin Kareer, Chief Executive Officer, Zilla Parishad, Pune.<br>Shri S. M. Khanapure, CAFO., Zilla Parishad, Pune. |
| (2) Study of maintenance of assets, vehicles, infra-structure including assets acquired by the Zilla Parishad from the district local boards. The study should include consideration of the present norms of maintenance and repairs if they exist or to suggest norms where they have not been framed by the Departments. The study should bring out adequate measures to maintain the existing assets in good condition. | Shri Arvind Singh, Chief Executive Officer, Zilla Parishad, Nagpur.<br>Shri H. P. Ghugal, Chief Accounts and Finance Officer, Z. P. Chandrapur.<br>Shri S. R. Thakare, CAFO., Zilla Parishad, Akola. |
| (3) The study of present state of water supply schemes including Irrigation Schemes to focus on the problems of these schemes and to suggest solutions. Attempts should also be made to see how reasoable returns can be obtained from such schemes. In short, the attempt should be to suggest measures which will emphasise certain amount of discipline in the use of water and in making these schemes viable financially. | Shri I. S. Chahal, Chief Executive Officer, Zilla Parishad, Nashik.<br>Shri S. P. Kanade, CAFO., Nashik.<br>Shri S. S. Deshmukh, CAFO., Ahmednagar. |
| (4) Study on the strengthening of Gram Panchayats and Panchayat Samitis financially so as to enable them to perform their duties and functions effectively and efficiently. In regard to the Gram Panchayats the role of JRY in the performance of those functions which the Village Panchayat is expected to perform under the V. P. Act may be kept in view. | Shri Rajesh Kumar, Cheif Executive Officer, Zilla Parishad, Beed.<br>Shri B. C. Hunge, Chief Accounts and Finance Officer, Osmanabad. |

| | |
|---|---|
| (5) Deficiency in staff if any particularly at the level of the Gram Panchayat and the need to strengthen the Panchayat Raj Institutions at various levels. The study should also include examination and suggestion of statutory amendments wherever required to strengthen such institutions. | Shri Rajesh Agarwal, Chief Executive Officer, Zilla Parishad, Jalgaon assisted by CAFO., Thane. |

Your attention is also invited to D.O. Letter No. MS. 1095/CR-45/95/Desk-2, dated 24th February 1995 from the Chief Secretary to the Chief Executive Officers of Zilla Parishads among others, directing them to extend full co-operation to the Commission in the performance of its functions. The above study groups have been constituted in pursuance of the instructions of the Chief Secretary which may please be kept in mind.

With regards,

Yours Sincerely,

**P. P. Mahana**

Copy by post w.c. to—

1. Shri Rajesh Agarwal, Chief Executive Officer, Zilla Parishad, Jalgaon.
2. Commissioner (Revenue) Konkan Dn. New Bombay.
3. Commissioner (Revenue) Amravati Dn. Amaravati.
4. Commissioner (Revenue) Aurangabad Dn., Aurangabad.
5. Commissioner (Revenue) Nashik Dn. Nashik.

# परिशिष्ट क्र. १९

मविआ-१२९४/प्र. क्र. १२८/९५/का-१

दिनांक ९ मार्च, १९९५.

प्रति,

संचालक,
दि सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस,
बी-६, काला बसंत सोसायटी,
१५ वा रस्ता, प्रभात रोड,
पुणे ४११ ००४.

**विषय :** महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा वित्तविषयक नमुना अभ्यास करून घेण्याबाबत.

**संदर्भ :** (१) शासन ज्ञापन वित्त विभाग, क्र. मविआ-१०९५/सीआर-६/अर्थबळ, दिनांक २४ फेब्रुवारी १९९५.
(२) आपला वरील विषयाबाबतचा दिनांक २१ जानेवारी १९९५ चा प्रस्ताव व
(३) वित्त आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १५ फेब्रुवारी १९९५ चे पत्र.

महोदय,

वरील संदर्भानुसार आपणास असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, वित्त आयोगाने तयार केलेल्या प्रशासकीय अटी व शर्ती परिशिष्ट " अ " मध्ये दिलेले असून, उद्दिष्ट परिशिष्ट " ब " मध्ये दिलेले आहे. ते आपल्या माहितीसाठी सोबत जोडलेले आहेत.

वरील बाबी आपणांस मान्य असल्यास तसे त्वरित कळवावे, म्हणजे पुढील कार्यवाही करता येईल.

आपला विश्वासू,

**स. शां. नारकर**
अवर सचिव,
महाराष्ट्र वित्त आयोग.

सोबत–परिशिष्ट " अ " व " ब "

# महाराष्ट्र वित्त आयोग

## परिशिष्ट अ

### प्रशासकीय अटी व शर्ती

१. अभ्यासाकरिता गोळा करण्यात आलेली माहिती अचूक व विश्वसनीय असल्याबाबतची पडताळणी शासनातर्फे करण्याचे अधिकार वित्त आयोग राखून ठेवत आहे.

२. शासनांतर्फे अथवा शासकीय संस्थांतर्फे पुरविण्यात आलेली माहिती व कागदपत्रे तसेच संस्थेने प्रत्यक्षरित्या गोळा केलेली माहिती, गोळा केलेल्या माहितीवर आधारित तक्ते व पहाणीचा अहवाल गोपनीय समजण्यात येईल आणि अशी माहिती शासनाच्या पूर्वपरवानगिशिवाय इतर दुसऱ्या कोणत्याही संस्था व व्यक्तीला पुरविण्याचे किंवा प्रकाशित करण्याचे अधिकार संस्थेला नाहीत.

३. मूल्यामापन अभ्यास घेताना उद्‌भवणाऱ्या कोणत्याही मतभेदासंबंधी शासन अथवा शासनातर्फे नामनिर्देशन केलेल्या प्रतिनिधीचा निर्णय अंतिम राहील व तो संस्थेवर बंधनकारक असेल.

४. संस्थेने घेतलेला मूल्यमापन अभ्यास समाधानकारक नसल्याचे आढळल्यास तो स्थगित किंवा बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील. त्यामुळे संस्थेला अदा करावयाच्या रकमेचे हप्ते रोखण्याचे अथवा अदा केलेली रक्कम वसूल करण्याचे अथवा पूर्ण किंवा अंशता अभ्यास संस्थेच्या स्वतःच्या खर्चाने परत करण्यास सांगण्याचे संपूर्ण अधिकार शासनास राहतील. याबाबतीत शासनाचे निर्णय अंतिम आणि संस्थेला बंधनकारक राहतील.

५. संशोधन व क्षेत्रीय कामाचा अनुभव व तांत्रिक ज्ञान असलेले कर्मचारी संस्थेतर्फे या कामासाठी नेमले जातील.

६. संस्थेने प्रथम प्रारूप अहवाल सादर केला पाहिजे. प्रारूप अहवालाच्या २ प्रती अर्थ व सांख्यिकी संचालनालय व ५ प्रती वित्त आयोगास सादर कराव्यात.

७. शासनाने विहित केलेल्या मुदतीत अथवा तत्पूर्वी संस्थेने अंतिम अहवालाच्या ५ प्रती (इंग्रजीमध्ये) तयार कराव्यात.

८. वित्त आयोगास सदर अंतिम अहवाल व अहवालासाठी तयार केलेले तक्तीकरण कार्यक्रम तक्ते संस्थेच्या खर्चाने शासनाकडे पाठवावे लागतील.

९. सदर अभ्यासासाठी तयार केलेली प्रश्नावली व माहिती भरलेली प्रपत्रके तसेच इतर मुलभूत माहिती संस्थेने स्वतःच्या खर्चाने शासनास सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील तसेच सद्रर माहितीवर संस्थेचा कोणताही अधिकार राहणार नाही. तसेच सदर माहिती शासनाच्या परवानगी शिवाय संस्थेला अन्यत्र कुठेही वापरता येणार नाही.

१०. संशोधन प्रकल्पाच्या १० लाख रुपयांच्या प्रस्तावास वित्त आयोगाने मंजुरी दिलेली असून तो खर्च खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| | | रुपये |
|---|---|---|
| (अ) | संस्थेकडे काम सोपविल्यानंतर काम सुरु होण्यापूर्वी ३० टक्के. .. | ३ लक्ष |
| (ब) | काम सुरू झाल्यानंतर एक महिन्यानंतर ३० टक्के .. | ३ लक्ष |
| (क) | संस्थेने क्षेत्रीय स्तरावरील कामपूर्ण केल्यानंतर म्हणजे काम सुरू होऊन साधारणतः तीन महिने झाल्यानंतर २० टक्के. .. | २ लक्ष |
| (ड) | संस्थेने महाराष्ट्र वित्त आयोगास अहवाल सादर केल्यानंतर २० टक्के .. | २ लक्ष |
| | एकूण रुपये | १० लक्ष |

११. सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे संस्थेने अंतरिम अहवाल दिनांक १ जून १९९५ रोजी व अंतिम अहवाल दिनांक ३० जून १९९५ रोजी वित्त आयोगास सादर करावा.

१२. प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीस कामाची प्रगती संस्थेने कळवावी.

## परिशिष्ट ब

### Objectives of the Study of Village Panchayat Finances

Maharashtra Finance Commission (MFC) has been constituted to study the finances of urban and rural local bodies and make suitable recommendations to the government. To achieve this objective the MFC among other things, proposes to undertake a Study of Village Panchayat Finances on a sample basis. In addition, it is also proposed that the study should include the selected Panchayat Samitis to see how they can play a more meaningful role in the three tiered Panchayat Raj System.

The objectives of the study are as follows :—

2.1. To study the sources of income of V.Ps for the past three years (i.e. 1991-92 to 1993-94) and draw conclusions about the adequacy or therwise of the existing resources of income of the V.Ps. In this study the tax base and the receipts from various taxes, duties, tolls, fee, etc. will be examined to see whether the V.Ps have exhausted all the avenues of income.

The study will include examination of (a) initial arrears, (b) demand for the year, (c) recovery during the year, (d) outstanding arrears at the end of the year for each of the tax, duties, fees, etc., (e) data on tax base and (f) rate of tax etc. The reasons for recurring arrears should be identified. The efficiency of the tax collection system should be examined and recommendations about this may be made.

The study will compare the sources of revenue exploited/not exploited/under-exploited by Gram Panchayats with reference to the statutory provisions to see if such unexploited/under exploited sources can be recommended to the concerned Gram Panchayats. Additional revenue income likely to be thus generated will also be estimated.

2.2. The quantum and proportion of government grants/assistance received by the V.P. in the total income according to various sources of grants/assistance and the dependence of the V.P. on such sources of income. To study whether the Government grant/assistance is received in time, the time-lag in the release of government assistance and its impact on the resource position and flow of funds of the V.P.

2.3. To study whether there is a potential for fully exploiting the sources of tax and non-tax revenue, duties, tolls, fees, etc., by modifying the tax base, the tax rates and the amount of additional revenue likely to be generated. If this requires amendment in the relevant statutory provisions and rules the same may be suggested. It may be examined as to whether the village panchayat make a conscious effort to augment their sources of income.

2.4. To study various items of expenditure to see whether sufficient provision has been made in the budget to meet the minimum requirement of services of the rural population with reference to the duties and functions of the V.P.s under V.P. Act. This will broadly cover the following aspects, (i) Payment of wages and salaries to the staff/labourers, (ii) Charges to be paid for the services received by the V.P. like electricity, telephone, transport, water etc., (iii) expenditure on maintenance and repair of capital assets, (iv) expenditure on materials/services, purchased for carrying out its duties and responsibilities and (v) other social services provided to the people. Suggestions for controlling wasteful expenditure including possible reduction in expenditure on administration may be made. The study should identify savings if any, by controlling of wasteful expenditure. Questions may be framed to examine whether minimum needs programme of the Government is being implemented adequately.

2.5. To study the aspects of maintenance and upkeep of infrastructural facilities and capital assets of V.P. like buildings, roads, bridges/culverts, streets-lights, water works, sanitary facilities and other structures/equipment, etc. This will also mean study of the existing norms of maintenance and need for revising them if inadequate, wherever necessary.

2.6. To study the debt position of the V.P.'s, their present liabilites and whether adequate provisions are made in the budget to service the debt. This includes various sources of the debts and the steps needed to contain the debt liability having regard to resource position of the V.P. To examine the investments (i.g. mrkets, etc.) made by V.P.'s and returns obtained on them and whether the investments are well conceived and whether conscious efforts are made to maximize returns on investments.

2.7. To study the present condition and adequacy of various infrastructural facilities/services provided by the V.P. such as roads, lighting, drainage, water-supply, public latrines, sanitation, health facilities, etc. For deciding the adequacy, the average level of service and norms based on population may be taken into account, if wuch norms exist as present.

2.8. As per the terms of reference of the Commission, the projected gap between revenue receipts and revenue expenditure of the V.Ps. for the five years from 1st April 1996, has to be worked out. In so far as the receipts are concerned, due consideration will have to be given to the level of taxation likely to be reached in 1994-95 and the additional revenue that may accrue in future through additional resource mobilization by the V.P. and/or financial assistance by the State, and/or new sources of revenue, if any, that may be recommended by the study. On the expenditure side-consideration will have to be given to the fact that the level of services normally expected to be given by the V.Ps. and the present level may differ. The normative approach may be taken into account where such norms of services already exist. If such norms do not exist, normative approach based on " ideal village " and " most desirable level of services " may be avoided and ad-hoc recommendations at an average and normal level may be mde to improve and/or provide the services. Based on the above revenue resource gap may be worked out for five years (1996-97 to 2001-2002) and suitable recommendations to bridge this gap may also be made.

2.9. To study various social services provided by the Panchayats and the estimates of expenditure required to provide the social services to the population.

2.10. To study the existing staff/personnel (by type of activity) employed by the V.P., their adequacy qualitatively and quantitatively and make suitable recommendation for strengthening the staff of the V.P. It may also be considered whether the V.P. employs unnecessary and/or seasonal staff; and if so, what measures can be devised to control such establishment expenditure.

2.11. To study the working and finance of the 39 Panchayat Samities selected in the sample. To examine the role of Panchayat Samities in the Panchayat Raj System and to suggest measures to strengthen it.

2.12. Horizontal study of Municipalities and Gram Panchayats, similarly placed geographically and populationwise to look at their respective performance in terms of mobilization of resources and level of services.

2.13. To study the role of Jawahar Rojgar Yojana in augmenting the V.P. finances and its contribution to the provision of services which the V.P. is required to make as per the statuotary provisions.

2.14. Study of the existing vertical linkages in the three tier Panchayat Raj System and recommendations to make more efficient and effective.

2.15. To study the aspects of environmental improvement, among other things, through social forestry; non-conventional sources of energy, rural sanitation and garbage and sewerage disposal and make appropriate recommendations.

प्रे. प्र. महाना,
सदस्य-सचिव.

महाराष्ट्र वित्त आयोग
महाराष्ट्र शासन
शासकीय कुटीर क-५
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर
मुंबई ४०० ०३९.

दिनांक : ९ मार्च, १९९५.

# प्रमाणपत्र

पंचायती राज्य व्यवस्थेंतर्गत पंचायत समित्यांची कार्यपद्धती व भूमिका तसेच ग्रामपंचायतींच्या आर्थिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाने पुणे येथील सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस या संशोधन संस्थेची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र शासनाच्यां अधिकृत निर्णयानुसार प्रवर्तित करण्यात आलेल्या या अभ्यासाचा प्रारंभ १५ फेब्रुवारी १९९५ रोजी झाला असून त्याची पूर्तता चार महिन्यांच्या कालावधीत व्हावयाची आहे. शासकीय स्तरावरील उपलब्ध सांख्यिकी व अन्य प्रकारची माहिती, सर्वेक्षणाद्वारे जमा केलेली माहिती व अन्य संदर्भ साहित्याच्या विश्लेषणाबरोबरच विविध संबंधित शासकीय अधिकारी, जिल्हा परिषदांचे पदाधिकारी इत्यादींच्या प्रत्यक्ष मुलाखतींचाही समावेश या अभ्यासाच्या कार्यवाहीत केलेला आहे. साहजिकच संबंधित शासन यंत्रणा व जिल्हा परिषदांचे प्रशासन यांचे सक्रीय सहकार्य या अभ्यासाच्या समयबद्ध व यशस्वी पूर्ततेसाठी आवश्यक व अनिवार्य आहे. प्रस्तुत शासननियुक्त संशोधन संस्थेचे संशोधन अधिकारी व अन्वेषक आवश्यक त्या अधिकृत प्रमाणपत्रकांसह आपल्याकडे वेळोवेळी येतील, तेव्हा आपण त्याना सर्वतोपरी सहकार्य करावे, ही विनंती.

सही
(प्रे. प्र. महाना),
सदस्य-सचिव.

## परिशिष्ट क्र. २०

P. P. Mahana,
Member-Secretary.

D.O. No. 1095/CR. 67/95/03
MAHARASHTRA FINANCE COMMISSION
GOVERNMENT OF MAHARASHTRA,
Government Bungalow C-5,
Madam Cama Road,
Opp. Mantralaya, Bombay 400 039.

Dated : 30th march 1995

*Subject.*—Recommendations to be made for State Finance Commission.

Dear,

You know that the government of Maharashtra have constituted the State finance commission laying down the terms of references *vide* government Notification No. SFC. 1094/CR-22/Arthabal, dated the 23rd april 1994. The Commission which started functioning from May 1994 has to submit its report to the Government by 31st October 1995.

In the past, the Government had constituted Municipal finance commission under the Chairmanship of Shri B. P. Patel, I.C.S. (Rtd.). At that time your Institute had submitted a memorandum to the Commission *vide* letter, dated 22nd January 1974, which was included as Annexure III to the Patel committee Report. (Copy enclosed for ready reference).

This time also we would welcme your views and suggestions in the form of a memorandum, on receipt of which discussions will be held with you and your officers if necessary. I shall be grateful if you will give the Commission benefit of your advice and suggestions by the 15th April, 1995.

Yours,
Sd/-
(P. P. Mahana).

Shri K. R. Khanolkar,
Director General,
All India Institute of Local Self-Government,
Sthanik Raj Bhavan, C. D. Barfiwala Marg,
Andheri (West), Mumbai 400 059.

# परिशिष्ट क्रमांक २१

महाराष्ट्र शासन

शांताराम घोलप

अध्यक्ष

क्रमांक–मविआ–१०९५/प्र.क्र. /कार्या. ३.

महाराष्ट्र वित्त आयोग
महाराष्ट्र शासन
शासकीय कुटीर क-५,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर
मुंबई ४०० ०३९.

दिनांक एप्रिल १९९५.

*विषय :* महाराष्ट्र वित्त आयोग
राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका तसेच
ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हापरिषदा
कार्यक्षम करण्यासाठी त्यांच्या वित्तीय बाबींचा
अभ्यास करण्याच्या दृष्टीने सूचना/शिफारशी
पाठविण्याबाबत.

स.न.वि.वि.

आपल्याला माहितच आहे की, भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीला अनुसरून महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग अधिसूचना क्र. एसएफसी–१०९४/सीआर–२२/अर्थबळ, दिनांक २३ एप्रिल १९९४ अन्वये महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना केलेली आहे. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती पंचायत समित्या व जिल्हापरिषदा यांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी वित्त आयोगाला त्यांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास करून योग्य त्या सूचना व शिफारशींचा अहवाल शासनाला दिनांक ३० ऑक्टोबर १९९५ पर्यंत सादर करावयाचा आहे. त्या दृष्टीने वित्त आयोग प्रयत्नशील आहे. उपरोक्त अहवाल तयार करतांना आयोगाला ज्या बाबींच्या संबंधात शिफारशी करावयाच्या आहेत त्या बाबी तसेच हे करतांना विचारात घ्यावयाच्या इतर बाबी सोबतच्या जोडपत्रात आपल्या माहितीसाठी दिलेल्या आहेत.

२. आपणांस राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचनेची व कार्याची चांगलीच माहिती व अनुभव आहे. आपल्या या अनुभवाचा वित्त आयोगास उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे. तरी आपण वित्त आयोगाच्या तयार करण्यात येणाऱ्या अहवालास उपयुक्त होतील अशा सूचना व शिफारशी आयोगास त्वरित पाठविल्यास मी आपला आभारी राहीन.

आपला
(शांताराम घोलप)
अध्यक्ष
महाराष्ट्र वित्त आयोग,
महाराष्ट्र शासन, मुंबई

प्रति,
श्री. ...............
विधानसभा सदस्य,
विधान भवन, मुंबई.

# परिशिष्ट क्रमांक २२

महाराष्ट्र वित्त आयोगाने खाली दर्शविलेल्या जिल्हा परिषदांना भेटी देऊन त्यांच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली :—

| विभाग | जिल्हा परिषदेचे नाव | चर्चा केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (१) कोकण विभाग .. | (१) ठाणे जिल्हा परिषद .. | ११ ऑक्टोबर १९९४ |
| | (२) रायगड जिल्हा परिषद .. | ११ नोव्हेंबर १९९४ |
| | (३) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद .. | २९ मे १९९५ व १२ सप्टेंबर १९९५ |
| | (४) रत्नागिरी जिल्हा परिषद .. | १२ सप्टेंबर १९९५ |
| (२) नाशिक विभाग .. | (१) नाशिक जिल्हा परिषद .. | ५ डिसेंबर १९९५ |
| | (२) जळगांव जिल्हा परिषद .. | २० ऑगस्ट १९९६ |
| | (३) धुळे जिल्हा परिषद .. | २० ऑगस्ट १९९६ |
| (३) पुणे विभाग .. | (१) पुणे जिल्हा परिषद .. | २ मे १९९५ |
| | (२) सातारा जिल्हा परिषद .. | ३ मे १९९५ |
| | (३) कोल्हापूर जिल्हा परिषद .. | ३० मे १९९५ |
| (४) नागपूर विभाग .. | (१) नागपूर जिल्हा परिषद .. | २४ एप्रिल १९९५ |
| | (२) चंद्रपूर जिल्हा परिषद .. | २५ एप्रिल १९९५ |
| | (३) गडचिरोली जिल्हा परिषद .. | २५ एप्रिल १९९५ |
| (५) औरंगाबाद विभाग .. | (१) जालना जिल्हा परिषद .. | ११ मार्च १९९६ |
| | (२) परभणी जिल्हा परिषद .. | ११ मार्च १९९६ |
| | (३) औरंगाबाद जिल्हा परिषद .. | १२ मार्च १९९६ |
| | (४) बीड जिल्हा परिषद .. | ७ ऑगस्ट १९९६ |
| | (५) उस्मानाबाद जिल्हा परिषद .. | ७ ऑगस्ट १९९६ |
| (६) अमरावती विभाग .. | (१) अमरावती जिल्हा परिषद .. | १५ मे १९९५ |
| | (२) यवतमाळ जिल्हा परिषद .. | १६ मे १९९५ |

# परिशिष्ट क्रमांक २३

महाराष्ट्र वित्त आयोगाने खाली दर्शविलेल्या नगरपरिषदा व महानगरपालिका यांना भेटी देऊन/त्यांना आयोगाच्या कार्यालयात अथवा अन्य ठिकाणी बोलावून त्यांच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली :—

| विभाग | नगरपरिषद/ महानगरपालिकाचे नाव | चर्चा केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (१) कोकण विभाग | (१) मुंबई महानगरपालिका | २६ जुलै १९९५ व १० सप्टेंबर १९९६ |
| | (२) रत्नागिरी नगरपरिषद | १२ सप्टेंबर १९९६ |
| | (३) नवी मुंबई महानगरपालिका | २२ मे १९९५ व २ डिसेंबर १९९६ |
| | (४) कल्याण महानगरपालिका | २ डिसेंबर १९९६ |
| | (५) कर्जत नगरपरिषद<br>(६) महाड नगरपरिषद<br>(७) उरण नगरपरिषद | २९ नोव्हेंबर १९९४. |
| | (८) जव्हार नगरपरिषद<br>(९) मिरा-भाईंदर नगरपालिका | २३ डिसेंबर १९९६ |
| | (१०) कुळगांव-बदलापूर नगरपरिषद<br>(११) भिवंडी-निजामपूर नगरपरिषद | २३ डिसेंबर १९९४ व २७ ऑगस्ट १९९६ |
| | (१२) ठाणे महानगरपालिका<br>(१३) अंबरनाथ नगरपरिषद<br>(१४) उल्हासनगर परिषद | २७ ऑगस्ट १९९६ |
| (२) नाशिक विभाग | (१) नाशिक महानगरपालिका | ४ मे १९९५ व २१ ऑगस्ट १९९६ |
| | (२) इगतपुरी नगरपरिषद<br>(३) त्रिंबक नगरपरिषद | ५ डिसेंबर १९९४ |
| | (४) मालेगाव नगरपरिषद | ५ डिसेंबर १९९४ व २१ ऑगस्ट १९९६ |
| (३) पुणे विभाग | (१) पुणे महानगरपालिका<br>(२) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका<br>(३) सोलापूर महानगरपालिका<br>(४) कोल्हापूर महानगरपालिका | ४ मे १९९५ |
| | (५) सातारा नगरपरिषद | ३ मे १९९५ |
| (४) नागपूर विभाग | (१) नागपूर महानगरपालिका | २४ एप्रिल १९९५ व ६ सप्टेंबर १९९६ |
| (५) औरंगाबाद विभाग | (१) औरंगाबाद महानगरपालिका | १२ मार्च १९९६ |
| | (२) जालना नगरपरिषद | ११ मार्च १९९६ |
| | (३) पैठण नगरपरिषद | १२ मार्च १९९६ |
| (६) अमरावती विभाग | (१) अमरावती महानगरपालिका | १५ मे १९९५ व ६ सप्टेंबर १९९६ |
| | (२) यवतमाळ नगरपरिषद | १६ मे १९९५ |

या शिवाय सदस्यातील सर्व १२ महानगरपालिकांच्या आयुक्तांबरोबर सप्टेंबर ऑक्टोबर १९९४ या दोन महिन्यांत वित्त आयोगाच्या कार्यालयात आयोगाने चर्चा केली आहे.

# परिशिष्ट क्र. २४

## (१) जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्राम पंचायत

महाराष्ट्र वित्त आयोगाने काही जिल्हा परिषदांना भेटी दिलेल्या आहेत. त्यावेळी जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे.

**ठाणे जिल्हा परिषद :**

(१) जिल्हाधिकाऱ्यांकडून जमीन महसूल वसुली एकदम होत नाही त्यामुळे उपकराचे अनुदान हप्त्याहप्त्याने मिळते. त्याचा जिल्हा परिषदेच्या आर्थिक बाबींवर परिणाम होतो. याबाबतची वसुली पूर्णपणे व लवकर होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यावरच जबाबदारी टाकण्यांत यावी. तसेच पाणीपट्टी वरील उपकराची वसुली वेळीच होत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होते. जिल्हा परिषदेला मिळणारे उपकर अनुदान हे वसुलीवर आधारित आहे. उपकराची वसुली ही शासनाची जबाबदारी आहे. उपकर वसुली १०० टक्के होईल असे अपेक्षित धरून जिल्हा परिषदेला सुरुवातीच्या काळातच वर्षाच्या सुरुवातीला अनुदान देण्यात यावे.

(२) जिल्हा परिषदेला कलम १२३ खालील योजना राबविण्यासाठी एजन्सी चार्जेस मिळतात. त्याच धर्तीवर कलम २६१ खाली जिल्हा परिषदेस हस्तांतरित केलेल्या योजनांवरील एजन्सी चार्जेस देण्यांत यावेत. तसेच हे एजन्सी चार्जेस ३ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात यावेत.

(३) ठाणे जिल्ह्यांत आदिवासी उपयोजनेसाठी नेमलेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना दिलेल्या अधिकारामुळे जिल्हा परिषदेचे अधिकार कमी झालेले आहेत. त्यामुळे अशा प्रकारचे अधिकारी नेमण्याऐवजी आदिवासी उपयोजनेचे काम जिल्हा परिषदेकडे सुपूर्द केल्यास त्याची अंमलबजावणी चांगली होईल.

**रायगड जिल्हा परिषद :**

(१) जिल्हा परिषदेस शिक्षण व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी कोणतेही अनुदान मिळत नाही. तसेच रस्ते दुरुस्तीसाठी जे अनुदान प्राप्त होते ते शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे मिळत नाही. तरी जिल्हा परिषदेस देखभाल व दुरुस्तीसाठी अनुदान देण्यात यावे.

(२) रायगड जिल्हा हा मुंबई या औद्योगिक शहराशेजारी असल्याने या जिल्ह्यांत मोठ्या उद्योगांचे अनेक पूरक उद्योग निघतात. त्यामुळे जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामीण भागातील दळणवळण, शिक्षण, आरोग्य इत्यादी जिल्हा परिषद देत असलेल्या सुविधांवर अधिक ताण पडत आहे. अशा रितीने जिल्हा परिषदेला औद्योगिक कारखान्यांशेजारी असलेल्या वस्त्यांच्या सोयी सुविधांवर खर्च करावा लागत असल्याने संबंधित कारखान्यांच्या उलाढालींवर उलाढाल कर बसवून त्यातील काही रक्कम जिल्हा परिषदेला ती देत असलेल्या सुविधांची पूर्तता म्हणून उपलब्ध करावी. यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम मधील कलम १५७ मध्ये आवश्यक ती दुरूस्ती करण्यात यावी.

**नाशिक जिल्हा परिषद :**

(१) शासकीय अनुदानातून निर्माण होणाऱ्या मालमत्तेची देखभाल करण्यासाठी योग्य प्रमाणात देखभाल खर्च मंजूर करणे आवश्यक आहे.

(२) जिल्ह्यांमध्ये गावांच्या प्रमाणात ग्रामसेवकांची पदे कमी असल्यामुळे एका ग्रामसेवकास दोन-तीन ग्रामपंचायतींचा कारभार पहावा लागतो. त्यामुळे ते काम व्यवस्थित पाहू शकत नाहीत. या पदांना " Staffing Pattern " तयार करून देणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे एका ग्रामपंचायतीस एक ग्रामसेवक असावा.

**नागपूर जिल्हा परिषद :**

(१) प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींची देखभाल व दुरूस्तीसाठी शासनाने अनुदान पुरवावे.

(२) पंचायत समितीला स्वतंत्र अधिकार व निधी द्यावा जेणेकरून पंचायत समिती आपल्या क्षेत्रात काही प्रगती करू शकेल. सध्या पंचायत समितीस वाढीव अनुदानाव्यतिरिक्त दुसरे स्वतःचे उत्पन्न नाही. पंचायत समितीस शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या योजना राबवाव्या लागतात. मात्र त्यात पंचायत समितीस स्वतंत्र अधिकार नाहीत. तेव्हा पंचायत समितीस स्वतंत्र अधिकार व निधी प्राप्त झाल्यास पंचायत समिती आपल्या क्षेत्रात काही प्रगती करू शकेल.

(३) जिल्हा परिषदेला मिळणारे एजन्सी चार्जेस ३ टक्के ऐवजी ५ टक्के करण्यात यावेत.

**चंद्रपूर जिल्हा परिषद :**

(१) प्रत्येक तालुक्याला कृषि बाजार समित्या झालेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेस उत्पन्न कमी झाले आहे. कृषि बाजार समित्यांच्या उत्पन्नाचा काही हिस्सा जिल्हा परिषदेस मिळावा.

(२) जंगल महसूल अनुदान ७ टक्के ते १० टक्के करण्यात यावे.

**गडचिरोली जिल्हा परिषद :**

(१) शासनाकडून सुधारित अनुदान मार्च महिन्याच्या शेवटी प्राप्त होते त्यामुळे शासकीय अनुदानाचे पूर्णपणे विनियोजन करण्यास अडचणी निर्माण होतात. हे अनुदान वेळेवर मिळाले पाहिजे.

(२) आरोग्य विभागांतर्गत इमारती बांधण्यासाठी अनुदान मिळते. त्यांच्या दुरूस्तीसाठी काहीच अनुदान मिळत नाही. यासाठी दरवर्षी कमीत कमी रु. १० लाख मिळावेत.

(३) ग्रामपंचायत विकासासाठी शासनाकडून जमीन महसूल अनुदान व समानीकरण अनुदानातून दरडोई उत्पन्न रु. १ मिळते ते कमीत कमी दरडोई १० मिळाले पाहिजे.

**यवतमाळ जिल्हा परिषद :**

(१) शाळा बांधकामासाठी व दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

**सातारा जिल्हा परिषद :**

(१) जिल्हा परिषदेस व्यवसाय कर व पथ कर बसवून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा देण्यात यावा.

(२) जिल्ह्यांत कार्यरत असणाऱ्या साखर कारखान्याला एक टन ऊसामागे मिळणाऱ्या उत्पनातील काही रक्कम जिल्हा परिषदेस मिळणे आवश्यक आहे.

(३) वन विभागाने वृक्ष संवर्धन करून वनीकरण जिल्हा परिषदेला हस्तांतरित करावे म्हणजे जिल्हा परिषदेला त्यापासून काही प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.

(४) बांधकाम विभागाचे रस्त्यांच्या देखभाल व दुरूस्तीचे खर्चाचे अनुदान जिल्हा परिषदेला सन १९७८ सालच्या विहित पद्धतीनुसार मिळते. यामध्ये सुधारणा करून प्राप्त परिस्थितीत रस्ते व त्यांच्या देखमालीचा प्रचलित खर्च विचारात घेऊन अनुदान निश्चित करावे.

**सिंधुदुर्ग जिल्हा परिषद :**

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यांत डोंगराळ उताराचा भाग असल्यामुळे व जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात हानी होते. म्हणून जिल्हा परिषदेच्या ताब्यातील रस्त्यांची दुरूस्ती व देखमालीसाठी शासनाने सर्वसाधारण निकष विचारात न घेता जादा निधी उपलब्ध करावा.

**कोल्हापूर जिल्हा परिषद :**

(१) जिल्हा परिषद कार्य क्षेत्रातील विक्री कर, व्यवसाय कर यापासून उत्पन्नातील योग्य वाटा स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावा.

(२) जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रांत असलेले साखर कारखाने विकास निधी जमा करतात. या विकास निधीपैकी २५ टक्के रक्कम जिल्हा परिषदांना कारखाना क्षेत्रातील विकास कामासाठी देण्यांत येतो.

(३) ऊस खरेदीवर शासनाला ' खरेदी कर ' दिला जातो. त्याचा काही भाग जिल्हा परिषदेला मिळाला पाहिजे.

(४) जिल्हा परिषदेच्या मालकीच्या शाळांची देखभाल व दुरूस्तीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही तेव्हा देखमाली व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

(५) पंचायत समितीस काही अनुदाने सुरू करावीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६२ चे कलम १८८ नुसार पंचायत समितीस पूर्वी गट अनुदाने मिळत होती. या गट अनुदानातून पंचायत समिती क्षेत्रात विकासाची कामे घेता येत होती. ही अनुदाने शासनाने बंद केली आहेत. ग्रामीण विकासाची गती वाढविणेसाठी दरडोई रु. ५ प्रमाणे पंचायत समितीस गट अनुदाने मिळावीत.

(६) जिल्हा परिषदेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन जमीन महसूलावरील उपकर व वाढीव उपकर हे आहे. आजपर्यंतचा अनुभव पाहता हे अनुदान कधीच वेळेवर मिळत नाही. त्यामुळे योजना राबविण्यांत अडचणी येतात. उपकराच्या कोषागारात जमा होणारी रक्कम जमेच्या लेखा शिर्षाखाली जमा न करता ठेवी या लेखा शिर्षाखाली जमा करावी. प्रत्येक तिमाहीत अशी जमा झालेली रक्कम पुढील तिमाहीत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेला अदा करावी. म्हणजे रक्कम देण्यास होणारा विलंब कमी होईल. अशाच प्रकारची पद्धत पाणीपट्टी उपकरासाठी अवलंबिण्यात यावी.

## नगरपालिका/महानगरपालिका

महाराष्ट्र वित्त आयोगाने काही नगरपालिका व महानगरपालिकांना भेटी दिलेल्या आहेत. त्यावेळी त्यांच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे.

**नगरपालिकांनी उपस्थित केलेले मुद्दे :**

(१) पाणीपुरवठा योजनेत तोटा येतो. पाणीपट्टीचे दर वाढविणे अडचणीचे आहे. तज्ञ व तांत्रिक कर्मचारी पाणीपुरवठ्याच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी उपलब्ध नाहीत. पाणीपुरवठ्यासाठी वीजेची देयके युनिटवर न आकारता अश्वशक्तीवर आकारल्यास पाणीपुरवठ्याचा खर्च कमी होऊ शकेल.

(२) नगरपालिकांना महागाई भत्त्यावरील अनुदान शासनाकडून मिळते. तथापि, महागाई भत्ता मूळ पगारात अंतर्भूत केल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारावर होणारा खर्च वाढता असतो. तसेच वेळोवेळी जी पगारवाढ होते, बोनस द्यावा लागतो त्यावेळीही खर्चात भर पडते. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनावर अनुदान मिळत नाही, ते मिळावयास पाहिजे.

(३) नगरपालिकांच्या उत्पन्नाच्या तुलनेने सुख-सुविधा पुरविण्यासाठी बराच खर्च येतो. उत्पन्नाची साधने फारशी नाहीत. येणाऱ्या खर्चानुसार शासकीय अनुदाने मिळावीत.

(४) रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी अधिक आर्थिक सहाय्य मिळाले पाहिजे. रस्ता अनुदानात वाढ करण्यात यावी.

(५) करमणुक कराचे मिळणारे अनुदान वाढवून द्यावे.

(अ) व्यवसाय कर हा स्थानिक पातळीवर आकारला जातो. तो पूर्णपणे नगरपालिकांना मिळावा.

(ब) शासनाचा अबकारी कर तसेच विक्रीकर तसेच केंद्र शासनाचा आयकर यामधून काही वाटा मिळावा.

(क) स्टँप ड्यूटीवर मिळणारे अनुदान हे वाढवून मिळावे.

(ड) शासनाच्या रोजगार हमी योजना करातून तसेच शिक्षण करातून काही रक्कम नगरपालिकेस मिळावी.

(६) शासकीय अनुदाने वेळेवर मिळत नाहीत तसेच अनुदानाची थकित रक्कम ही देखिल वेळेवर मिळत नाही. असेही निदर्शनास आणण्यात आले की, अनुज्ञेय अनुदानाच्या देय रकमेतून कपात केली जाते.

(७) नगरपालिकांच्या क्षेत्राबाहेरील हद्दीलगतच्या ग्रामीण परिसरांना सुख-सुविधा पुरवाव्या लागतात. त्या भागातील लोक नगरपालिकांच्या हद्दीमध्ये राहतात. सुख-सुविधांवर ताण पडतो. मात्र हद्दीलगतच्या परिसरातून उत्पन्न मिळत नाही. तेव्हा जेथे शक्य आहे तेथे हद्दवाढ करण्याबाबत विचार व्हावा.

(८) आदिवासी भागातील नगरपालिकांना उत्पन्न कमी मिळते कारण जमिनीचा विकास, बांधकामे, व्यवसाय इत्यादी फारशा प्रमाणात वाढत नाही अशा ठिकाणी वाढीव अनुदान मिळावे.

(९) घरपट्टी व जकातीचे दर यासंबंधीच्या नियमातील विहित केलेली कमाल व किमान मर्यादा वाढवून मिळावी.

(१०) जकात कर रद्द तर करू नयेच परंतु वीजेवर जकात आकारण्याची तरतूद नियमांत करावी.

(११) नैसर्गिक आपत्ती व आणीबाणीच्या परिस्थितीसाठी शासनाकडून भरीव स्वरूपाची आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

(१२) मालमत्ता कराची आकारणी ही रेटेबल व्हॅल्यूवर आधारित आहे आणि रेटेबल व्हॅल्यूची वाढ भाडे नियंत्रण कायद्याच्या तरतुदीमुळे जवळजवळ खुंटलेली आहे. मालमत्ता कराची आकारणी करताना भाडे नियंत्रण कायद्यातील तरतुदींशी संबंध नसावा. याबद्दल आवश्यक त्या सुधारणा नगरपालिकेशी संबंधित अधिनियमात करण्यात याव्यात.

## विशिष्ट महानगरपालिकांनी विशिष्ट बाबतीत उपस्थित केलेल मुद्दे

**मुंबई महानगरपालिका :**

(१) मुंबई महानगरपालिकेला आतापर्यंत प्राथमिक शिक्षणावर २० टक्के अनुदान मिळत असे. (इतर महानगरपालिकांना ५० टक्के मिळत होते) इतर महानगरपालिकांप्रमाणे ५० टक्के अनुदान मिळावे अशी महानगरपालिकेची मागणी होती. ती शासनाने तत्वतः टप्प्याटप्प्याने देण्याचे मान्य केले. महानगरपालिकेची विनंती अशी आहे की, सदर अनुदान टप्प्याटप्प्याने न देता एकसाथ द्यावे.

तसेच महानगरपालिकेने अशीही मागणी केली आहे की, प्राथमिक शाळेशी संलग्न असलेले ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शिक्षणाचा भाग समजून त्यावर १०० टक्के खर्च राज्य शासनाने द्यावा.

(२) मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महापालिकेच्या जुन्या मालमत्ता दुरूस्ती उपकराच्या कक्षेत आणाव्यात म्हणजे जुन्या मालमत्तांच्या दुरूस्तीचा प्रश्न काही अंशी मिटू शकेल.

(३) मुंबई महानगरपालिकेने सुचविले की, इतर महानगरपालिकांना त्यांच्या हद्दीमध्ये वसूल केलेल्या वाहन करातील जसा १० टक्के हिस्सा मिळतो तसा तो मुंबई महानगरपालिकेस मिळावा.

(४) मुंबई महानगरपालिकेने असाही मुद्दा उपस्थित केला आहे की, वैद्यकीय शिक्षण पुरविणे ही महानगरपालिकेची वैधानिक जबाबदारी नाही तरीही महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय चालविते. यासाठी येणाऱ्या खर्चाच्या संदर्भात शासनाने महानगरपालिकेस आवर्ती अनुदान द्यावे.

**नवी मुंबई महानगरपालिका :**

(१) नवी मुंबई सारख्या नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिकेला उत्पन्नाची साधने मर्यादित आहेत. मालमत्ता करापासूनचे उत्पन्न मिळण्यास कोर्ट प्रकरणामुळे विलंब होत आहे. जकात कर आकारण्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. अशा परिस्थितीत या महानगरपालिकेस शासकीय अनुदानावर अवलंबून रहावे लागते.

**नागपूर महानगरपालिका :**

(१) नागपूर महानगरपालिकेने नमूद केले की, १९९३-९४ साली नैसर्गिक आपत्तीमुळे शहरातील रस्ते खराब झाले व इतरही नुकसान झाले. रस्त्यांच्या संदर्भात विशेष अनुदान मिळावे अशी सूचना महानगरपालिकेने केली आहे.

(२) नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड आणि नागपूर महानगरपालिका या तीन संस्थांमार्फत शहरात विकासाची कामे कार्यान्वित होत असतात. मात्र प्रशासनाच्या दृष्टीने ह्या तीन संस्थांमध्ये सुसूत्रता आढळून येत नाही. ती यावयास पाहिजे. नागपूर सुधार प्रन्यासला अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्टँप ड्यूटीचा काही हिस्सा मिळतो. मात्र नागपूर महानगरपालिका विकास कामे व सुधारणा करीत असून देखिल स्टँप ड्यूटीमधून काही वाटा मिळत नाही तो मिळावा.

तसेच नागपूर सुधार प्रन्यास शहरामध्ये जमीन, भूखंड-विकसित करते आणि ते संबंधितांना विकते. विकास कामे झाल्यानंतर सदर भाग महानगर पालिकेकडे हस्तांतरित केला जातो. असे असले तरी नागपूर सुधार प्रन्यास संबंधित भूखंड धारकांकडून २ टक्के ग्राऊंड रेंट कायम स्वरूपी वसूल करते. मात्र महानगरपालिकेस या ग्राऊंड रेंटमधून कोणताही हिस्सा मिळत नाही. तो मिळावा अशी महानगरपालिकेची मागणी आहे.

(३) महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार महापालिकेस नागपूर सुधार प्रन्यासला सांविधानिक अंशदान द्यावे लागते. त्यापासून महानगरपालिकेस मुक्त करावे अशीही मागणी महानगरपालिकेची आहे.

**अमरावती महानगरपालिका :**

(१) ही महानगरपालिका स्थापन करताना असे गृहित धरण्यात आले होते की आजूबाजूच्या क्षेत्रात व्यापार-उद्योग याची वाढ होईल. मात्र प्रत्यक्षात तसे घडून न आल्यामुळे महानगरपालिका ही आर्थिकदृष्ट्या कमकुवत राहिली. या महानगरपालिकेने असे सुचविले आहे की तिला ' अ ' वर्ग नगरपालिकेप्रमाणे शासकीय अनुदान मिळावे.

**महानगरपालिकांनी उपस्थित केलेले इतर सर्वसाधारण मुद्दे**

(१) राज्य शासनाच्या व्यवसाय कर, करमणूक कर याची संपूर्ण रक्कम महापालिकेस देण्यात यावी. कारण हे स्थानिक पातळीवर वसूल करण्यात येणारे कर आहेत. विक्रीकर व आयकर यातील काही हिस्सा मिळावा. तसेच रोजगार हमी योजना कर आणि शिक्षणकर व राज्य उत्पादन शुल्क यामधूनही हिस्सा मिळावा.

(२) मोटार व्हेईकल टॅक्समध्ये महापालिकेस मिळणारा हिस्सा वाढवून द्यावा. रस्ते अनुदानाच्या दरात वाढ करण्यात यावी. अनुदानाचा दरडोई दर वाढविण्यात यावा.

(३) जमिन महसूल व बिन शेतसारा यांची संपूर्ण रक्कम महापालिकांना मिळावी.

(४) स्टँप ड्यूटीवर सरचार्ज आकारून ती रक्कम महापालिकेस देण्यात यावी तसेच असेही सुचविले आहे की, स्टँप ड्यूटीच्या वसुलीचा काही वाटा महानगरपालिकेस देण्यात यावा.

(५) प्राथमिक शिक्षणावर जिल्हा परिषदांना ज्याप्रमाणे १०० टक्के अनुदान मिळते त्याप्रमाणे महापालिकांनाही मिळावे.

(६) विजेवर जकात कर लावण्याची अनुमती मिळावी.

(७) शासकीय अनुदाने वर्षाच्या अगदी शेवटी वितरित केली जातात. ती साधारणतः १२ महिन्यांच्या हप्त्यात उपलब्ध करावीत. अनुदाने वर्षाच्या सुरुवातीला देण्यात यावीत.

(८) अधिनियमाच्या सध्याच्या तरतुदी अन्वये मालमत्ता कराच्या दरामध्ये ठराविक काळानंतर रिव्हीजन करण्याची तरतूद नाही. ती करण्यात यावी. रेटेबल व्हॅल्यू ठराविक काळानंतर सुधारित करण्यास अनुमती मिळावी. यासाठी आवश्यक त्या सुधारणा महानगरपालिकांच्या अधिनियमांमध्ये करण्यात याव्यात. भाडे नियंत्रण कायद्यामुळे मालमत्ता कराच्या उत्पन्नाला बाधा येते. मालमत्तांचे अॅसेसमेंट करताना त्याचा भाडे नियंत्रण कायद्याशी संबंध नसावा.

(९) पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी विकत घेतले जाते. त्याचा दर फारच आहे. खर्चाच्या तुलनेत पाण्यापासून मिळणारे उत्पन्न कमी आहे. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत तोटा येतो. पाण्यासाठी जो वीजपुरवठा केला जातो त्याचा दर सवलतीचा असावा.

(१०) झोपडपट्टी वस्त्यांमध्ये ज्या सुविधा पुरवविल्या जातात त्याबद्दलचे शुल्क वसूल होत नाही. शासनाकडून याबद्दल फारशी आर्थिक मदत मिळत नाही, ती मिळावी. गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य वाढवून मिळावे.

(११) राज्य शासन, केंद्र शासन, विविध रेल्वेज्, बंदर विश्वस्त इत्यादींच्या मालकीच्या मालमत्तांवर मालमत्ता कर सवलतीच्या अगर कमी दराने आकारला जातो. तेव्हा असे सुचविले आहे की, सर्वसाधारण मालमत्ता धारक देण असलेल्या दराने वरील शासकीय मालमत्तांवर कर आकारण्याची तरतूद अधिनियमात करावी.

(१२) महापालिकांच्या हद्दीलगत जी गांवे आहेत अशा ठिकाणी ज्या महानगरपालिका सेवा पुरवितात त्यांना तेथून काही उत्पन्न मिळत नाही. अशा ठिकाणी हद्दवाढ करण्याचे सुचविले आहे.

# परिशिष्ट क्रमांक २५

महाराष्ट्र वित्त आयोगाच्या स्थापनेपासून दिनांक ३१ जानेवारी १९९७ पर्यंत झालेल्या बैठकांचे विवरणपत्र :

| अ. क्र. | अध्यक्षांचे नाव | | कालावधी | त्या कालावधीत झालेल्या बैठका |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शांताराम घोलप | .. | दिनांक ७ एप्रिल १९९४ ते ५ सप्टेंबर १९९५ | ४९ |
| २ | श्री. सुरेश प्रभु | .. | दिनांक २० फेब्रुवारी १९९६ ते २९ मार्च १९९६ | ५ |
| ३ | श्री. मकरंद हेरवाडकर | .. | दिनांक १२ जुलै १९९६ ते ३१ जानेवारी १९९७ | ५२ |

वरील अध्यक्षांच्या कालावधीत हजर असलेल्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या सदस्यांच्या झालेल्या बैठकांची माहिती :

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | | कालावधी | उपस्थित राहिलेल्या बैठकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. द. म. सुकथनकर | .. | दिनांक ८ नोव्हेंबर १९९४ ते १८ जानेवारी १९९६ | २३ |
| २ | श्रीमती प्रभावती झाडबुके | .. | दिनांक ८ नोव्हेंबर १९९४ ते १८ जानेवारी १९९६ | २२ |
| ३ | श्री. संतोषराव गोडे | .. | दिनांक ८ नोव्हेंबर १९९४ ते १८ जानेवारी १९९६ | २५ |
| ४ | श्री. दिवाकर कळसुलकर | .. | दिनांक २० फेब्रुवारी १९९६ ते ३१ जानेवारी १९९७ | ५१ |
| ५ | श्री. विजय राज तातेड | .. | दिनांक २० फेब्रुवारी १९९६ ते ३१ जानेवारी १९९७ | ३९ |
| ६ | श्री. श्रीपाद पटवारी | .. | दिनांक २० फेब्रुवारी १९९६ ते ३१ जानेवारी १९९७ | ५४ |

# परिशिष्ट क्रमांक २६

महाराष्ट्र वित्त आयोगाच्या बैठकीसाठी बोलाविण्यात आलेल्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या नावांचे विवरणपत्र :

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे/पदाधिकाऱ्यांचे नाव | | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश भा. दळवी | .. | महापौर, कल्याण महानगरपालिका. |
| २ | सौ. सु. प्र. दंडे | .. | महापौर, नवी मुंबई महानगरपालिका. |
| ३ | श्री. य. ल. राजवाडे | .. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग. |
| ४ | श्री. के. नलिनाक्षन | .. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग. |
| ५ | श्री. व्ही. रंगनाथन | .. | प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. |
| ६ | श्री. सुरेश कुमार | .. | सचिव, ग्राम विकास विभाग. |
| ७ | श्री. ना. बा. पाटील | .. | सचिव, ग्राम विकास विभाग. |
| ८ | श्रीमती कुमुद बन्सल | .. | सचिव, शालेय शिक्षण विभाग. |
| ९ | श्रीमती अरूणा बागची | .. | सचिव, आदिवासी विकास विभाग. |
| १० | श्रीमती चंद्रा अय्यंगार | .. | सचिव, महिला व बाल कल्याण विभाग. |
| ११ | श्री. श्रीकांत सिंह | .. | आयुक्त, अमरावती महानगरपालिका. |
| १२ | श्री. अमिताभ चंद्र | .. | आयुक्त, नाशिक महानगरपालिका. |
| १३ | श्री. माथनकर | .. | आयुक्त, सोलापूर महानगरपालिका. |
| १४ | श्री. प्र. स. मंचेकर | .. | आयुक्त, ठाणे महानगरपालिका. |
| १५ | श्री. बी. एन. झामरे | .. | आयुक्त, नागपूर महानगरपालिका. |
| १६ | श्री. टी सी. शेखर | .. | प्रशासक, कल्याण महानगरपालिका. |
| १७ | श्री. बिपीन मलीक | .. | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका. |
| १८ | श्री. शरद काळे | .. | आयुक्त, मुंबई महानगरपालिका. |
| १९ | श्री. अनुपम दासगुप्ता | .. | अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका. |
| २० | श्री. रत्नाकर कुलकर्णी | .. | आयुक्त, पुणे महानगरपालिका. |
| २१ | श्री. श्रीनिवास पाटील | .. | आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका. |
| २२ | श्री. सुरेशचंद्र | .. | महाव्यवस्थापक, बीईएसटी, मुंबई. |
| २३ | श्री. व. र. द्रविड | .. | डायरेक्टर ऑफ म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन. |
| २४ | श्री. आर. जी. बनसोडे | .. | संचालक, नगर प्रशासन, मुंबई. |
| २५ | श्री. अ. रा. पाथरकर | .. | संचालक, नगररचना, महाराष्ट्र शासन, पुणे. |
| २६ | श्री. अ. भा. मादुस्कर | .. | सहआयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका. |
| २७ | श्री. अ. प्र. कुळकर्णी | .. | संचालक, सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सेस. पुणे. |
| २८ | श्री. विनय सहस्रबुद्धे | .. | कार्यकारी संचालक, आर. एम. प्रबोधिनी. |
| २९ | श्री. रा. मा. सगणे | .. | सदस्य-सचिव, पाणी पुरवठा व जल निःस्सारण मंडळ. |
| ३० | श्री. पी. बी. जानवलकर | .. | कर आकारणी व कर संकलन, मुंबई. |
| ३१ | श्री. श. रा. तांबे | .. | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते). |
| ३२ | श्री. गो का. देशपांडे | .. | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकामे). |
| ३३ | श्री. दि. च. पंत | .. | संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे. |
| ३४ | श्री. एम. ए. शानबाग | .. | उप महाव्यवस्थापक, मुंबई महानगरपालिका विद्युत पुरवठा व परिवहन सेवा. |

ACADEMY OF ...